# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे  इतिवृत्तांत

**दिनांक १८-०४-१९९६ ते ३१-१२-१९९६**

**रजिष्टर क्र. ०२**

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

## दिनांक १८/०४/९६ रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**गुरुवार दिनांक १८.४.९६ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रबोधनकार कै.केशव सिताराम ठाकरे सभागृहात मा.महापौर सौ.सुनंदा कोल्हे यांचे अध्यक्षतेखाली औरंगाबाद महानगरपालिकाच्या सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली.**

**ह्या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १ | सौ.ज्योत्स्ना दौलतराव हिवराळे | स.सभासद |
| २ | सौ.रुखमनबाई खंडेराव लोंखडे | --''--- |
| ३ | श्री.अफसरखान यासिनखाँन | --''-- |
| ४ | श्री.प्रभाकर सिताराम विधाते | --''-- |
| ५ | सौ.साजेदा बेगम | --''-- |
| ६ | श्री.म.सलिम म.हनिफ कुरैशी | --''-- |
| ७ | श्री.गौतम भागाजी खरात | --''-- |
| ८ | श्री.ॲड.गणेश किशनराव वानखेडे | --''-- |
| ९ | सौ.रजनी रमेश जोशी | --''-- |
| १० | सौ.उषाबाई दिलीप गायकवाड | --''-- |
| ११ | सौ.विमलाबाई नंदकुमार मुंडलिक | --''-- |
| १२ | सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे | --''-- |
| १३ | श्री.गौतम लिंबाजी लांडगे | --''--- |
| १४ | श्री.महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --''-- |
| १५ | श्री.अभिमन्यु रामभाऊ भालेराव | --''-- |
| १६ | श्री.नरेंद्र यादवराव पाटील | --''-- |
| १७ | श्री.काशिनाथ हरिभाऊ कोकाटे | --''-- |
| १८ | श्री.सुदाम रामदास सोनवणे | --''-- |
| १९ | श्री.कंवरसिंग किसनसिंग बैनाडे | --''-- |
| २० | श्री.रविंद्र बाबुराव इंगळे | --''-- |
| २१ | सौ.पद्मा बाबुराव शिंदे | --''-- |
| २२ | श्री.सुभाष भिकाजी टाकळकर | --''-- |
| २३ | श्री.प्रफुल्ल लालचंद मालानी | --''-- |
| २४ | श्रीमती चंपाबाई विश्वनाथ | --''-- |
| २५ | सौ.धनश्री अशोक विसपुते | --''-- |
| २६ | सौ.स.फरहदबानो भ्र.मो.नवाब | --''-- |
| २७ | श्री.फजलउल्लाखाँन अजमद उल्लाखान | --''-- |
| २८ | श्री.अजीजखाँन गणीखाँ | --''-- |
| २९ | श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | --''-- |
| ३० | श्री.महंमद मुश्ताक अहेमद | --''-- |
| ३१ | सौ.नुरजहाँ बेगम अ.रहेमान खान | --''-- |
| ३२ | श्री.वसंत विनायकराव देशमुख | --''-- |

| | | |
|---|---|---|
| ३३ | श्री.हाजी मोहसिन अहेमद हाजी बशिर | --''-- |
| ३४ | श्री.मुजीब आलमशाह मीर आलमशाह | --''-- |
| ३५ | सौ.स.मोसिना बिहकीस विखारोद्दीन | --''-- |
| ३६ | श्री.अ.जावेद रज्जाक | --''-- |
| ३७ | श्रीमती स.जाहेदा बेगम म.जमीर | --''-- |
| ३८ | श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे | --''-- |
| ३९ | श्री.किशोर बाबुलाल तुळशिबागवाले | --''-- |
| ४० | सौ.यशोदा धनंजय वाडेकर | --''-- |
| ४१ | श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाल | --''-- |
| ४२ | श्री.स.हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन | --''-- |
| ४३ | श्री.स.म.अ.रऊफ म.अ.माबुद | --''-- |
| ४४ | श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबउद्दीन | --''-- |
| ४५ | श्री.धिरज शांतीलाल खोरडीया | --''-- |
| ४६ | श्री.प्रदीप शिवनारायण जैस्वाल | --''-- |
| ४७ | श्री.सय्यद अली मीरा सलामी | --''-- |
| ४८ | श्री.रमेश दिपचंद लाहोट | --''-- |
| ४९ | श्री.संजय किसनराव केनेकर | --''-- |
| ५० | श्री.फैय्याज अहेमद म.हाजी कुरैशी | --''-- |
| ५१ | सौ.मुक्ताबाई सुदाम वाघमारे | --''-- |
| ५२ | सौ.लता श्रिनिवास दलाल | --''-- |
| ५३ | श्री.जयवंत केशवराव ओक | --''-- |
| ५४ | सौ.अल्का रमेश पाटील | --''-- |
| ५५ | सौ.शकुंतला हरिदास धांडे | --''-- |
| ५६ | श्री.अब्दुल रशिदखान मामू | --''-- |
| ५७ | श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह | --''-- |
| ५८ | कु.माया लिंबाजी लाडवाणी | --''-- |
| ५९ | डॉ.भागवत किशनराव कराड | --''-- |
| ६० | सौ.सविता संजय आव्हाड | --''-- |
| ६१ | सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | --''-- |
| ६२ | श्री. अ.रशिद अ.सत्तार | --''-- |
| ६३ | श्री. तरवेंद्रासिंह महेंद्रसिंह धिल्लन | --''-- |
| ६४ | श्री.विखारोद्दीन पि.खुदलोद्दीन | --''-- |
| ६५ | श्री.विकास रतनलाल जैन | --''-- |
| ६६ | श्री.गंगाधर सुखदेव गाडे | --''-- |
| ६७ | श्री.गजानन रामकिसन बारवाल | --''-- |
| ६८ | श्री.मनमोहनसिंग करमसिंग ओबेराय | --''-- |
| ६९ | श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे | --''-- |
| ७० | श्री.संजय रामदास जोशी | --''-- |
| ७१ | श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर | --''-- |
| ७२ | श्री.अविनाश लक्ष्मण कुमावत | --''-- |
| ७३ | श्री.राजकुमार उर्फ सांडू बचाटे | --''-- |
| ७४ | सौ.राधाबाई तळेकर | --''-- |

| | | |
|---|---|---|
| ७५ | श्री.नरसिंग मुरलीधर ढगे | --''-- |
| ७६ | श्री.विठ्ठल किसन यादव | --''-- |
| ७७ | श्री.विजयकुमार गजानन मेहेर | --''-- |
| ७८ | सौ.मंदा धनंजय काळुसे | --''-- |
| ७९ | श्री.बन्सी तुळशिराम गांगवे | --''-- |
| ८० | श्री.भागवत देविदास घडामोडे | --''-- |
| ८१ | श्री.कचरु चंद्रभान नवपुते | --''—— |

**सभेची सुरुवात वंदेमातरम् या गिताने सुरुवात झाली.**

**विषय क्रं. १/१**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (अ) निवडणूक नियमावलीचे कलम ४५ व ४७ नुसार महापौर यांची ह्यांची निवड करणे.

**संवाद**

महापौर : महापौर पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या ज्या उमेदवारांना आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यासाठी अर्धा तास वेळ देण्यात येतो.

नगर सचिव : निवडणूक पद्धती विषयीची माहिती विषद केली. प्रत्येक स.सदस्यास एक गुणाकाराच्या आकाराची फुली मारण्याचा अधिकारी आहे. मतपत्रिकेवर कोणत्याही निशाणी अथवा ओळख दिसेल अशी खुण आढळल्यास मतपत्रिका रद्द होईल. महानगर पालिकेने परविलेल्या पेननेच फुलीची खुण करावयाची आहे.

श्री.कचरु नवपुते : महापौर पदासाठी स.सभासद सर्वश्री नरेंद्र पाटील जयवंत ओक, सौ.अल्का पाटील, गजानन बारवाल, सौ.शकुंतला धांडे, प्रभाकर विधाते, प्रफुल्ल मालानी आणि तरवेंद्रसिंग धिल्लन यांचे उमेदवारी अर्ज आले आहेत.

श्री.प्रदिप जैस्वाल : उमेदवारी अर्ज परत घेण्यासाठी देण्यात आलेला वेळ संपलेला आहे. उर्वरीत उमेदवारांची नांवे जाहीर करावी.

मा.महापौर : महापौर पदासाठी स.सभासद श्री.गजानन बारवाल व सभासद श्री.नरेंद्र पाटील यांचे उमेदवारी अर्ज आहेत. मतपत्रिका तयार करण्यासाठी अर्धा तास वेळ देण्यात येत आहे.

मा.महापौरांचे आदेशानुसार नगर सचिव यांनी मतपत्रिका बनवून सभागृहात आणल्या. सदरील मतपत्रिका एकत्रीत केल्या (मिक्स) आणि मतदानासाठी आलेल्या सदस्यांना निवडणूक प्रक्रियेसाठी मतदान अधिकाऱ्याकडे वाटप करण्यासाठी दिल्या. स.सदस्याच्या यादीप्रमाणे नावे पुकारण्यात आली. त्यानुसार स.सभासद मतदान करीत असतांना स.सभासद श्री.कोकाटे मतदान कक्षात मतदानासाठी गेले. श्री.कोकाटे यांनी मतदान कक्षात स.नगरसेविका श्रीमती सविता आव्हाड या बसून असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. त्या घटनेमुळे मतदान प्रक्रियेच्या नियमाचा भंग होत असल्याची हरकत विरोधी पक्ष नेता व सभासदांनी घेतली व आतापर्यंत झालेले मतदान रद्द करुन फेरमतदानाची मागणी केली. यावर मा.महापौर यांनी सदरील बाब तपासून पाहण्यासाठी सुचीत केले असता स.नगरसेविका

श्रीमती सविता आव्हाड या त्यांच्या लहान मुलास पाजण्यासाठी बसलेल्या असल्याचे सत्तारुढ पक्षाच्या सदस्यंनी मा.महौरांचे निदर्शनास आणून दिले.

वरील घटनेबाबत मा.महापौर यांनी विरोधी पक्ष व सत्तारुढ पक्षाचे सदस्यांशी केलेल्या सुचनेनुसार वैधानिक तपासून आतापर्यंत झालेली मतदान प्रक्रिया सभा तहकूब न करता रद्द करुन नव्याने मतदान घेण्यासत यावे असे घोषित केले व त्यानुसार सभागृहाने त्यास सर्वानूमती मान्यता दिली.

वरील मान्यतेनुसार झालेल्या मतदानाच्या मतपत्रिका मतपेटीतून सर्वासमक्ष काढून सिलबंद करण्यात आल्या. या नंतर मोकळी असलेली मतपेटी सभागृहात दाखवून सिलबंद करण्यात आली व पुन्हा मतदान प्रक्रियेस सुरुवात करण्यात आली. या मतदानासाठी मा.महापौर यांनी दीड तासाचा अवधी देण्यात येत असल्याचे घोषित केले.

वरील घोषणेनुसार नगर सचिव यांनी १३.३० वाजता निवडणूक प्रक्रिया सुरु केली.

निवडणूक प्रक्रिया चालू असतांना स.सभासद श्री.मुजीब आलम शहा खान यांनी मतपत्रिका आणि स्थळप्रत ह्या दोन्हीवर सारखाच नंबर असल्याचे मतदान गुप्ततेचा भंग हात असल्याची हरकत घेतली व मतदान थांबविण्याची मागणी केली. याबाबत विरोधी पक्ष सदस्यांनी दिलेला लेखी आक्षेप नामंजुर करण्यात येत असल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

विरोधी पक्षाने दिलेल्या लेखी आक्षेप कोणत्या कारणाने नामंजुर करण्यात आला याचा खुलासा करण्याची मागणी सर्वश्री मनमोहनसिंग ओबेराय, नरेंद्र पाटील, श्री.गंगाधर गाडे आदी सदस्यांनी केली.

मतपत्रिकेवर दोन्ही ठिकाणी नंबर असणे ही पध्दत बरोबर आहे. १९८८ मध्ये सुध्दा मतदानाच्या वेळी हीच पध्दत होती असे स.नगरसेवक श्री.प्रदीप जैस्वाल यांनी सुचीत केले.

विरोधी पक्षाच्या लेखी आक्षेपाबाबत यापूर्वीच निर्णय दिलेला असल्याने मतपत्रिका चालू राहिल असे मा.महापौर यांनी सुचित केले.

मतदानासाठी दिलेला वेळ संपल्यानंतर मतपेटी मा.महापौर यांची प्रति स्वाक्षरी घेऊन समक्ष उघडण्यात आली व छाननी अधिकारी यांचेकडे मतमोजणी देण्यात आल्या.

मा.महापौर : मतमोजणी नुसार स.सभासद श्री.नरेंद्र पाटील यांना ३५ आणि स.सभासद श्री.गजानन बारवाल यांना ०७ मते पडली असून मतपत्रिकांची मोजणी करीत असतांना एका मतपत्रिकेच्या घडीतून पाच रुपयाची नोट आढळून आली. सदरील नोट सचिवांनी महानगरपालका फंडात जमा करावी. स.सदस्य श्री.बारवाल हे विजयी झाल्याचे घोषित करण्यात येते.

**ठराव :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१)(अ) व निवडणूक नियमावली कम ४५ व ४७ नुसार श्री.गजानन बारवाल यांची महापौर पदी मताधिक्याने झालेल्या निवडीस सर्वानुमते मजुंरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २/१ मा. उपमहापौर यांची निवड करणे.**

संवाद : उपमहापौर पदासाठी ज्या उमेदवारांना आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यासाठी अर्धा तासाचा वेळ देण्यात येतो.

मा.महापौर (नवनिर्वाचित) : स.सभासद यांच्या भावना विचारात घेता आणखी पंधरा मिनिटांचा कालावधी उमेदवारी अर्ज परत घेण्यास वाढवून देण्यात येत आहे.

नगर सचिव : उपमहापौर पदासाठी स.सभासद श्री.स.अ.एकबालोद्दीन व स.सभासद श्री.विजयकुमार मेहेर यांची उमेदवारी आहे. मतदानासाठी ०४.४५ पर्यंत वेळ देण्यात येत आहे.

मा. महापौर : मतदानास एक तासानी सुरुवात होईल.

मा. महापौर : ज्या स. सभासदाचे मतदान बाकी आहे त्यासाठी दहा मिनिटाचा वेळ वाढवून देण्यात येत आहे.

मा.महापौर : एकुण मतदान ८१ स.सभासद डॉ.विजयकुमार मेहेर ४७ व स.भासद श्री.स.एकबालोद्दीन ३३ एकमत बाद झालेले आहे. स.सदस्य डॉ.विजयकुमार मेहेर हे विजय झाल्याचे घोषित करण्यात येते.

**ठराव क्र :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१)(अ) व निवडणूक नियमावली कलम ४५ व ४७ नुसार डॉ.विजयकुमार मेहेर यांची उपमहापौर पदी मताधिक्याने झालेल्या निवडीस सर्वानुमते मजुंरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर स.सभासदांची समयोचित भाषणे झाली. जनगणमन ह्या राष्ट्रीय गीतानंतर सभा संपाल्याचे मा.महापौर यांनी जाहीर केले.

मा.महापौर
महापालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १८.५.९६ रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**शनिवार दिनांक १८.५.९६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.महापौर श्री.गजानन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात औरंगाबाद महानगरपालकेच्या सर्व साधारण सभेस सुरुवात झाली.**

ह्या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. विजयकुमार मेहेर | मा. उपमहापौर |
| २ | श्री. अफसरखाँ यासिन खाँ | स.सभासद |
| ३ | श्री. प्रभाकर सिताराम विधाते | --''-- |
| ४ | सौ. साजेदा बेगम | --''-- |
| ५ | श्री.म.सलिम म.हनिफ कुरैशी | --''-- |
| ६ | सौ. उषाबाई दिलीप गायकवाड | --''-- |
| ७ | सौ. विमलबाई नंदकुमार गुंडलिक | --''-- |
| ८ | सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | --''-- |
| ९ | श्री. गौतम लिंबाजी लांडगे | --''-- |
| १० | श्री.अभिमन्यु रामभाऊ भालेराव | --''-- |
| ११ | श्री.काशिनाथ हरिभाऊ कोकाटे | --''-- |
| १२ | श्री.सुदाम रामदास सोनवणे | --''-- |
| १३ | श्री.रविंद्र बाबुराव इंगळे | --''-- |
| १४ | श्री.कंवरसिंग किसनसिंग बैनाडे | --''-- |
| १५ | सौ. पद्मा बाबुराव शिंदे | --''-- |
| १६ | श्री.सुभाष भिकाजी टाकळकर | --''-- |
| १७ | श्री.प्रफुल्ल लालचंद मालानी | --''-- |
| १८ | श्रीमती चंपाबाई पांचाळ | --''-- |
| १९ | श्री.कप्पलउल्लाखान अप्पमत उल्लाखान | --''-- |
| २० | श्रीमती अजिदा बेगम म.मुस्तफा | --''-- |
| २१ | श्रीमती नुरजहाँ बेगम अ. रहेमान | --''-- |
| २२ | श्री.वसंत विनायक देशमुख | --''-- |
| २३ | श्री.हाजी मोहसिन महेमद हाजी बशिर | --''-- |
| २४ | श्रीमती मोहसिना बिल्कीस बिरवारोद्दीन | --''-- |
| २५ | अब्दुल जावेद रज्जाक | --''-- |
| २६ | श्रीमती जाहेदा बेगम मो जमीर | --''-- |
| २७ | श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे | --''-- |
| २८ | सौ. यशोदा वाडेकर | --''-- |
| २९ | श्री.किशोर बाबुलाल तुळशि बागवाले | --''-- |
| ३० | श्री.हमीद उद्दीन नाबा फसियोद्दीन | --''-- |
| ३१ | श्री.सैय्यद अहेमद एकबालउद्दीन | --''-- |
| ३२ | श्री.धिरज शांतीलाल खखोरडीया | --''-- |

| | | |
|---|---|---|
| ३३ | श्री.प्रदिप शिवनारायण जैस्वाल | --''-- |
| ३४ | श्री.सैय्यद अली मिरा सलामी | --''-- |
| ३५ | श्री.जयवंत केशवराव ओक | --''-- |
| ३६ | सौ. शकुंतला हरीदास धांडे | --''-- |
| ३७ | कु.माया लिंबाजी लाडवाणी | --''-- |
| ३८ | डॉ.भागवत किशनराव कराड | --''-- |
| ३९ | सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | --''-- |
| ४० | श्री.अब्दूल रशिद अ.सत्तार | --''-- |
| ४१ | श्री. तरवेंद्रसिंग महिंद्रसिंग धिल्लन | --''-- |
| ४२ | श्री.विखारोद्दीन पि.खुद्‌बोद्दीन | --''-- |
| ४३ | श्री.विकास रतनलाल जैन | --''-- |
| ४४ | श्री.गंगाधर सुखदेव गाडे | --''-- |
| ४५ | श्री.मनमोहनसिंग करमसिंग ओबेरॉय | --''-- |
| ४६ | श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे | --''-- |
| ४७ | श्री.संजय रामदास जोशी | --''-- |
| ४८ | श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर | --''-- |
| ४९ | सौ. ज्योत्सना हिवराळे | --''-- |
| ५० | श्री.राजकुमार उर्फ सांडू बचाटे | --''-- |
| ५१ | श्री.नरसिंग मुरलीधर ढगे | --''-- |
| ५२ | श्री.विठ्ठल किसन जाधव | --''-- |
| ५३ | सौ. सुनंदा उत्तम कोल्हे | --''-- |
| ५४ | श्री.बन्सी तुळशिराम गांगवे | --''-- |
| ५५ | श्री.भागवत देविदास घडामोडे | --''-- |

सभेची सुरुवात ''वंदे मातरम'' या गिताने झाली.

स.नगरसेवक श्री.अजीजखाँन यांचे नातेवाईक श्रीमती उमराव बी. स.नगरसेवक श्री.गंगाधर गाडे यांचे सासरे श्री.अंबादास इंगळे आणि श्री.बाळासाहेब ठाकरे यांचे सुपुत्र श्री.बिंदा ठाकरे यांचे दुःखद निधनाबद्दल स.नगरसेवक श्री.गिरजाराम हाळनोर ह्यांनी मांडलेल्या प्रस्तावास ००.०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून सभागृहातर्फे श्रध्दांजली अपर्ण करण्यात आली.

औरंगाबाद महानगरपालिकेचे माजी महापौर स्थायी समितीचे माजी सभापती श्री.प्रदिपकुमार जैस्वाल यांची औरंगाबाद लोकसभा मतदार संघातून औरंगाबाद विभागाचे खासदार म्हणून निवड झाल्यबद्दल स.नगरसेवक श्री.गिरजाराम हाळनोर यांनी मांडलेल्या अभिनंदाचे ठरावास स.नगरसेवक श्री. प्रफुल्ल मालानी व श्री. मनमोहनसिंग ओबेराय यांनी अनुमोदन देवून स.नगरसेवक यांनी मांडलेला ठराव मंजूर करण्यास हरकत नाही. या सभागृहाचे माजी महापौर, स्थायी समितीचे माजी सभापती श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांची खासदार म्हणून निवड झाल्याबद्दल हे सभागृह अभिंनदन करीत आहे.

**ठराव :** औरंगाबाद महानगरपालिकेचे माजी महापौर,स्थायी समितीचे माजी सभापती श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांची औरंगाबाद लोकसभा मतदार संघातून खासदार म्हणून निवड

झाल्याबद्दल सभागृहातर्फे श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांचे अभिनंदन करण्यात येते. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील बी.डी.एस.कंपनीने जकात कराची रक्कम न भरण्याबाबत औरंगाबाद महानगरपालिकेचे मा.आयुक्त श्री. भोगे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बी.डी.ए.कंपनीस बील लावण्याचा धाडसी निर्णय घेण्यात आला. ह्या धाडसी निर्णयाबाबत सर्व नगरसेवक मा.आयुक्त यांचे पाठीशी आहे. यासाठी मा.आयुक्त यांचे अभिनंदनाचे ठराव स.नगरसेवक श्री.प्रकाश निकाळजे यांनी मांडला. त्यास स.नगरसेवक श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय श्री.प्रकाश निकाळजे यांनी मांडला त्यास स.नगरसेवक श्री.मनमोहन सिंग ओबेराय यांनी अनुमोदन दिले.

**श्री.हमीदउद्दीन :** मा.आयुक्तांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर करत असतांना बी.डी.ए.कंपनीस लावण्यात आलेल्या सील प्रकरणी मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

**ठराव :** चिकलठाणा आद्योगिक वसाहतीतील बी.डी.ए. ह्या कंपनीने जकात न भरल्याबाबत ह्या कंपनीस सील लावून महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर टाकण्यासाठी महानगरपालिका आयुक्त श्री.भोगे साहेब यांनी जो धाडसी निर्णय घेतला त्याबद्दल सभागृहातर्फे मा.आयुक्त यांचे अभिनंदन करण्यात येते.

त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

श्री. गिरजाराम हाळनोर : औरंगाबाद महानगरपालिकेचे माजी महापौर श्री.प्रदिपकुमार जैस्वाल यांचे औरंगाबाद लोकसभा मतदार संघाचे खासदार म्हणून निवड झाल्याबद्दल जो अभिनंदनाचा ठराव संमत झाला त्याच बरोबर केंद्रात जो सत्ता परिवर्तन होवून भाजपाचे सरकार आणि भाजपा नेते मा. श्री.अटलबिहारी वाजपेयी यांची पंतप्रधान पदी नेमणूक झाली त्याबद्दलही

संजय जोशी : अभिनंदनाचा ठराव संमत करण्यात यावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेराय : माजी महापौर श्री.प्रदिपकुमार जैस्वाल यांची औरंगाबाद लोकसभा मतदार संघाचे खासदार म्हणून अभिनंदनाच ठराव संमत करणे ही बाब योग्य असली तरी सत्ता परिवर्तनाचा ठराव सभगृहात आणून राजकारण करणे योग्य होणार नाही. सध्या पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू आहे. अशा परिस्थितीत ठराव घेता येणार नाही. तेव्हा मा.महापौर यांनी राष्ट्रगिताची परवानगी द्यावी.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल : सभागृहातर्फे माझ्या अभिनंदनाचा ठराव संमत केल्याबद्दल मी सर्व सभासद सथा सभागृहाचा ऋणी आहे. तसेच मा.महापौर मा.उपमहापौर यांना धन्यवाद देतो. आणि मा. विभागीय आयुक्त यांनी आचारसंहिते बाबत वृत्तपत्रात जो खुलासा केला त्याबाबत मा.आयुक्त त्यांनी खुलासा करावा. ह्या शहराच्या नागरिकांचे अनेक प्रश्न सभागृहाच्या निर्णयामुळे अडकून पडले आहेत व पर्यायाने शहराचा विकास थांबला आहे.

मा.आयुक्त : वृत्तपत्रातील बातमी बाबत मा.विभागीय आयुक्त यांना पत्र देवून मार्गदर्शन करण्याची विनंती करण्यात आली आहे. दुपारपर्यंत खुलासा मिळण्याची शक्यता आहे. त्यानंतर कामाला सुरुवात करता येईल.

श्री.हमीद उद्दीन ताबा : पदवीधर मतदर संघाची निवडणूक आहे. यात मतदान करणारे सर्व नागरिक सुशिक्षित आहेत. याचा विचार करता महानगरपालिका / जिल्हा

परिषद यांच्या सभासाठी हरकत नाही असे पत्रकार परिषदेत सांगितले आहे.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल, श्री.मनमोहनसिंग ओबेराय : शहरातील जनतेच्या प्रश्नावर निर्णय घेवून जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी मा.महापौर व मा.आयुक्त यांनी आचार संहितेबाबत लवकरात लवकर खुलासा प्राप्त करुन घ्यावा व पुढील सभा आयोजित करावी.

मा.महापौर : स.नगरसेवक श्री.मनमोहनसिंग ओबेराय व श्री.प्रदिपकुमार जैस्वाल यांच्या सुचनेबाबत मा.आयुक्त यांनी खुलासा केलेलाच आहे.

आजची सभा तहकुब करण्यात येते.

"जन गण मन" या राष्ट्रगीता नंतर सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | मा.महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद हानगरपलिका औरंगाबाद

**सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**दिनांक १७/६/९६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.महापौर श्री. गजानन बारवाल यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेस खालील स.नगरसेवक तसेच महानगरपालिका अधिकारी उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १. श्री.विजयकुमार मेहेर | उपमहापौर |
| २. सौ.रुखमनबाई खंडेराव लोंखडे | --''--- |
| ३. श्री.अफसरखान यासिनखॉंन | --''-- |
| ४. श्री.प्रभाकर सिताराम विधाते | --''--- |
| ५. सौ.साजेदा बेगम | --''-- |
| ६. श्री.म.सलिम म.हनिफ कुरैशी | --''-- |
| ७. श्री.गौतम भागाजी खरात | --''-- |
| ८. सौ.रजनी रमेश जोशी | --''-- |
| ९. सौ.उषाबाई दिलीप गायकवाड | --''-- |
| १०.सौ.विमलाबाई नंदकुमार मुंडलिक | --''-- |
| ११.सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे | --''-- |
| १२ श्री.गौतम लिंबाजी लांडगे | --''--- |
| १२.श्री.अभिमन्यु रामभाऊ भालेराव | --''-- |
| १३.श्री.नरेंद्र यादवराव पाटील | --''-- |
| १४.श्री.काशिनाथ हरिभाऊ कोकाटे | --''-- |
| १५.श्री.सुदाम रामदास सोनवणे | --''-- |
| १६.श्री.रविंद्र बाबुराव इंगळे | --''-- |
| १७.श्री.कंवरसिंग किसनसिंग बैनाडे | --''-- |
| १८.सौ.पद्मा बाबुराव शिंदे | --''-- |
| १९.श्री.सुभाष भिकाजी टाकळकर | --''-- |
| २०.श्री.प्रफुल्ल लालचंद मालानी | --''-- |
| २१.श्रीमती चंपाबाई पांचाळ | --'' |
| २२.सौ.धनश्री अशोक विसपुते | --''-- |
| २३.श्री.फप्पलउल्लाखॉंन अप्पमद उल्लाखान | --'' |
| २४.श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | --''-- |
| २५.श्री.महंमद मुश्ताक अहेमद | --''-- |
| २६.सौ.नुरजहॉं बेगम अ.रहेमान खान | --''-- |
| २७.श्री.वसंत विनायकराव देशमुख | --''-- |
| २८.श्री.हाजी मोहसिन अहेमद हाजी बशिर | --''-- |
| २९.सौ.स.मोसिना बिहकीस विखारोद्दीन | --''-- |
| ३०.श्री.अ.जावेद रज्जाक | --''-- |
| ३१.श्रीमती स.जाहेदा बेगम म.जमीर | --''-- |

| | |
|---|---|
| ३२.श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे | --''-- |
| ३३.सौ.यशोदा धनंजय वाडेकर | --''-- |
| ३४.श्री.किशोर बाबुलाल तुळशिबागवाले | --''-- |
| ३५.श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाल | --''-- |
| ३६.श्री.स.हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन | --''-- |
| ३७.श्री.स.म.अ.रऊफ म.अ.माबुद | --''-- |
| ३८.श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबउद्दीन | --''-- |
| ३९.श्री.प्रदीप शिवनारायण जैस्वाल | --''-- |
| ४०.श्री.रमेश दिपचंद लाहोट | --''-- |
| ४१.श्री.संजय किसनराव केनेकर | --''-- |
| ४२.सौ.लता श्रिनिवास दलाल | --''— |
| ४३.सौ.अल्का रमेश पाटील | --''-- |
| ४४.सौ.शकुंतला हरिदास धांडे | --''-- |
| ४५.श्री.अब्दुल रशिदखान मामू | --''-- |
| ४६.श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह | --''-- |
| ४७.कु.माया लिंबाजी लाडवाणी | --''-- |
| ४८.डॉ.भागवत किशनराव कराड | --''-- |
| ४९.सौ.सविता संजय आव्हाड | --''-- |
| ५०.सौ.निर्मला विठ्ठल कांबळे | --''-- |
| ५१.श्री.तरवेंद्रसिंह महेंद्रसिंह धिल्लन | --''-- |
| ५२.श्री.विखारोद्दीन पि.खुदलोद्दीन | --''— |
| ५३.श्री.विकास रतनलाल जैन | --''— |
| ५४.श्री.गंगाधर सुखदेव गाडे | --''— |
| ५५.श्री.मनमोहनसिंग करमसिंग ओबेराय | --''-- |
| ५६.श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे | --''-- |
| ५७.श्री.संजय रामदास जोशी | --''-- |
| ५८.श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर | --''-- |
| ५९.श्री.अविनाश लक्ष्मण कुमावत | --''-- |
| ६०.सौ. ज्योत्स्ना अविनाश दौलतराव हिवराळे | --''-- |
| ६१.श्री.राजकुमार उर्फ सांडू बचाटे | --''-- |
| ६२.सौ.राधाबाई तळेकर | --''— |
| ६३.श्री.विठ्ठल किसन यादव | --''-- |
| ६४.सौ.मंदा धनंजय काळुसे | --''— |
| ६५.श्री.बन्सी तुळशिराम गांगवे | --''-- |
| ६६.श्री.भागवत देविदास घडामोडे | --''-- |
| ६७.श्री.कचरु चंद्रभान नवपुते | --''— |

सभेची सुरुवात ''वंदे मातरम'' या गीताने झाली.

स.नगरसेवक तथा सभागृहनेता श्री.बंडू ओक यांच्या आजी काशिबाई ओक यांचे तसेच माजी राष्ट्रपती श्री. निलम संजीव रेड्डी यांचे दुःखद निधन झाले आहे. सभागृहातर्फे त्यांना श्रध्दाजंली वाहण्यात यावी असा प्रस्ताव सर्वश्री कचरु नवपुते व श्री.संजय जोशी

यांनी सभागृहात मांडल्याने कै.काशिबाई ओक व श्री. निलम संजीव रेड्डी यांना महानगरपालिकेतर्फे श्रध्दांजली वाहण्यात आली.

**श्री.नरेंद्र पाटील :** सभेची सुरुवात व शेवट राष्ट्रगीताने होते. मात्र हे म्हणत असताना सर्वांचा सुर एकच होत नाही. तेव्हा सभागृहात "वंदे मातरम" व "जन गण मन" ह्या राष्ट्रगीताच्या ध्वनी मुद्रिका वाजवण्यात याव्यात. याच बरोबर जे स.नगरसेवक राष्ट्रगीत म्हणू इच्छितात त्यांनी राष्ट्रगीत म्हणावे.

सध्या आचार संहिता चालू असल्याने इतर विषयाबद्दल चर्चा करता येणार नाही. तथापि दै.मराठवाड्यात आलेल्या "शिवसेना नगरसेवकाने दमदाटी करुन जलवाहिणीचे कंत्राट लाटले" या मथळ्याखाली आलेल्या बातमीची गांभीर्याने दखल घ्यावयास हवी. याची समिती बनवून चौकशी झाली पाहिजे अशा प्रकारची अरेरावी चालणार नाही.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** "वंदे मातरम" व "जन गण मन" ह्या राष्ट्रगीतांचा ध्वनीमुद्रिका वाजवण्यास आमचा विरोध नाही. याचबरोबर जे स.नगरसेवक राष्ट्रगीत म्हणू इच्छितात त्यांनीही राष्ट्रगीत म्हणावे टेंडर सबंधाने मा.आयुक्तांनी स्वतः अशा प्रकारांची चौकशी करा. सबंधीत कॉन्टेक्टरनेही तशी लेखी तक्रार करावयास पाहिजे.

**मा.महापौर :** सभेच्या सुरुवातीस "वंदे मातरम" व सभेच्या शेवटी म्हटले जाणारे राष्ट्रगीत "जन गण मन" यांच्या ध्वनीमुद्रिका आगामी सर्वसाधारण सभेपासून वापरल्या जातील. याच बरोबर जे स.नगरसेवक राष्ट्रगीत म्हणू इच्छितात तेही राष्ट्रगीत म्हणू शकतात. स.नगरसेवक श्री. नरेंद्र पाटील यांनी उपस्थित केलेल्या मुद्यावरती मा.आयुक्त चौकशी करुन आपला अहवाल सभागृहापुढे ठेवतील.

श्री. नरेंद्र पाटील : आयुक्तांनी चौकशी करण्यावरती आमचा आक्षेप नाही. हा प्रकार एका स.नगरसेवककडून घडलेला असल्याने चौकशी समितीत नगरसेवकांचाही समावेश असणे आवश्यक आहे.

श्री.प्रदिप जैस्वाल : सध्या आचारसंहिता चालू असल्याने सभासदांना चौकशी समितीत घेता येणार नाही. यामुळे आयुक्तानींच स्वतः चौकशी करुन अहवाल सभागृहापुढे सादर करावा.

श्री. गौतम खरात : सध्या पावसाळा सुरु झालेला आहे. मी अत्यंत महत्वाच्या विषयावर सभागृहासमोर मांडत आहे. घाटी दवाखान्यात बरेचसे रुग्ण हे मलेरिया, गॅस्ट्रो आदी सारख्या आजारामुळे उपचारासाठी दाखल झालेले आहेत. काही रुग्ण घाटी दवाखान्यात जाऊ शकत नाही. शहरात एकुण किती रुग्ण आहेत ज्यांना हिवताप गॅस्ट्रो झालेला आहे. शहरातील दुर्गंधी बाबतच्या तक्रारी वाढलेल्या आहेत. बरेचसे नाले वाहत नाहीत. त्यामुळे रोगराई वाढत जाते. याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

मा.आयुक्त : वृत्तपत्रातील काही गोष्टीचे मथळे भडक असतात. पावसाळ्यासारख्या दिवसात साधारणतः शिळे अन्नपदार्थ वगैरे खाण्याने उलट्या, जुलाब होतात. कोणत्याही कारणाने होणाऱ्या उलट्या जुलाबास लागलीच गॅस्ट्रो म्हटले जाते. साधारणपणे जूनमध्ये गॅस्ट्रोच्या केसेस वाढतात. हा सर्वसाधारणपणे

अनुभाव आहे. तरीही साथीचे रोग उदभवू नये यासाठी प्रशासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

आरोग्य वैद्यकिय अधिकारी : घाटी दवाखान्यात गॅस्ट्रोसारख्या रुग्णांची माहिती घेतली असता आढळून आले की, १७० केसेस पैकी बहुतांश रुग्ण हे ग्रामीण भागातून उपचारार्थ सरकारी दवाखान्यात आलेले आहेत. बहुतेक केसेस ह्या अन्नातील विषबाधेमुळे झालेल्या आहेत. महानगरपालिका क्षेत्रातील ११ रुग्णांची महानगर पालिकेतर्फे चौकशी कली जाते व ज्या भागातील केसेस असतील त्या भागातील पाण्याचे नमुणे घेणे, विशेष साफसफाई, फवारणी करुन घेणे आदी उपाय योजना केल्या जातात. घाटी दवाखान्यात आलेल्या रुग्णांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता दवाखान्यात दिलेल्या पत्यावर उभे रुग्ण रहात नसल्याचेही काही प्रकरणांमधून दिसून आले. शहरातील हॉटेलस मधून वापरले जाणारे पाण्याचेही नमुणे घेण्यात आलेले आहेत व ज्या हॉटेलमधील पाणी दुषित आढळून आले अशा हॉटेल मालकांविरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे. महानगरपालिकेतर्फे पाणी शुध्दीकरणासाठी हॅलोजन गोळयांचे वाटप केले जाते. परंतु ह्या गोळ्यांचा वापर होत नसल्याचेही दिसून येते. सिडको दवाखान्यात गॅस्ट्रो रुग्णांवरती उपचार करण्यासाठी खास कक्ष उघडण्यात आलेला आहे.

मा.आयुक्त : महानगरपालिकेच्या चुकीमुळे किती जणांना गॅस्ट्रोची बाधा झाली हे पाहिले असता दिसून आले की, बहुतेक केसेस ह्या अन्नातील विषबाधेमुळे लग्नसराईतील शिळे अन्न खाल्यामुळे झालेल्या आहेत. एक दोन केसेसमध्ये दुषित पाण्यामुळे गॅस्ट्रो झाल्याचे दिसून आले. गॅस्ट्रो पिडीतांचे पाणी झपाट्याने कमी होत असते व अशा रुग्णांना एकाच दिवसाच्या ट्रिटमेंटने काही होत नाही. पाण्याचे सॅम्पल्स तीन प्रकारचे घेतले जातात. घरगुती व हॉटेल्समधून वापरले जाणारे पाणी यापैकी ३१ टक्के पाणी पिण्यास अयोग्य दिसून आले. घरगुती वापरातील ५० ते ६० टक्के सॅम्पल्स अनफिट वर हॉटेल्स मधील ७० ते ८० टक्के सॅम्पल्स अनफिट आढळून आले. अशा हॉटेल मालकाचे लायसन्स रद्द करण्यात येणार नाही.

श्री.जावेद रज्जाक : शहरातील सडकी फळे विक्रेत्यांविरुध्द काय मोहिम राबविले जाते. हॅलोजन टॅबलेस कोण वाटतो. अशा गोळ्या वाटणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रथम त्याच्या वापराबाबत प्रशिक्षण द्यावयास पहिजे. शहागंज, औरंगपूरा, भाजी मंडईतून मोठ्या प्रमाणावर घाण असते.

मा.महापौर : स्वच्छतेच्या संदर्भाने मागील आठ-दहा दिवसांपासून विशेष मोहिम राबविली जात आहे.

श्री जावेद रज्जाक : हॅलोजन टॅबलेट्स स्वच्छता निरीक्षकामार्फत न वाटता मुकादमातर्फे वाटल्या जातात. तसेच माझ्या वॉर्डातील पाईप लाईन संदर्भाने मी वेळोवेळी कार्यकारी अभियेंता, उपअभियंता यांच्याशी संपर्क साधलेला आहे. ह्या लाईनची केवळ टेस्टिंग होणे आहे. यामुळे पाणी लोकांना न मिळता रस्त्यावर वाहत आहे.

श्रीमती नुरजहाँ बेगम : विभाग क्रं.३ मध्ये वॉर्डातील दिल्या जाणाऱ्या तक्रारीकडे लक्ष दिले जात नाही. स्टाफ कमी झाल्याने कामे होत नाहीत हेच नेहमी सांगितले जाते.

मा.महापौर : विभागीय अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे स.नगरसेवककडून येणाऱ्या तक्रारींची योग्य दखल घेऊन कामे पार पाडावी.

श्री.मोहसीन अहेमद हमीउद्दीन ताबा : आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे म्हणणे दिशाभूल करणारे आहे. कोणत्या हॉटेल्सचे लायसन्स रद्द केले याची माहिती देण्यात यावी.

मा.महापौर : ३१ हॉटेल मालकांविरुध्द कार्यवाही केल्याचे मा.आयुक्तांनी सांगितलेलेच आहे. सध्या आचारसंहिता चालू असल्याने इतर विषयावरती चर्चा करता येणार नाही. गॅस्ट्रोसारख्या महत्वाच्या प्रश्नावर चर्चा झालेलीच आहे.

राष्ट्रगीतानंतर ११.४५ वाजता सभेचे कामकाज संपन्न झाल्याचे मा.महापौरांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| नगरसचिव | मा.महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# ***औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद***

**दिनांक २०.७.९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**शनिवार दि.२०/७/९६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.महापौर श्री.गजानन रामकिसन बारवाल यांच्या अध्यक्षतेखाली कै.केशवन सिताराम ठाकरे सभागृहात औरंगाबात महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस "वंदे मातरम" या गीताने सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.नगरसेवक उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १. श्री. विजयकुमार मेहेर | उप.महापौर |
| २. सौ. रुखमनबाई खंडेराव लोंखडे | स.नगरसेवक |
| ३. श्री.प्रभाकर सिताराम विधाते | --''-- |
| ४. सौ.साजेदा बेगम | --''-- |
| ५. श्री.म.सलिम म.हनिफ कुरैशी | --''-- |
| ६. श्री.गौतम भागाजी खरात | --''-- |
| ७. श्री.ॲड.गणेश किशनराव वानखेडे | --''-- |
| ८. सौ.रजनी रमेश जोशी | --''-- |
| ९. सौ.उषाबाई दिलीप गायकवाड | --''-- |
| १०.सौ.विमलाबाई नंदकुमार मुंडलिक | --''-- |
| ११.सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे | --''-- |
| १२.श्री.गौतम लिंबाजी लांडगे | --''-- |
| १३.श्री.महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --''-- |
| १४.श्री.अभिमन्यु रामभाऊ भालेराव | --''-- |
| १५.श्री.नरेंद्र यादवराव पाटील | --''-- |
| १६.श्री.काशिनाथ हरिभाऊ कोकाटे | --''-- |
| १७.श्री.सुदाम रामदास सोनवणे | --''-- |
| १८.श्री.रविंद्र बाबुराव इंगळे | --''-- |
| १९.श्री.कंवरसिंग किसनसिंग बैनाडे | --''-- |
| २०.सौ.पद्मा बाबुराव शिंदे | --''-- |
| २१.श्री.सुभाष भिकाजी टाकळकर | --''-- |
| २२.श्री.प्रफुल्ल लालचंद मालानी | --''-- |
| २३.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --''-- |
| २४.सौ.धनश्री अशोक विसपुते | --''-- |
| २५.सौ.स.फरहदबानो भ्र.मो.नवाब | --''-- |
| २६.श्री.फजलउल्लाखाँन अप्पमद उल्लाखान | --''-- |
| २७.श्री.अजीजखाँन गणीखाँ | --''-- |
| २८.श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | --''-- |
| २९.श्री.महंमद मुश्ताक अहेमद | --''-- |
| ३०.सौ.नुरजहाँ बेगम अ.रहेमान खान | --''-- |
| ३१.श्री.वसंत विनायकराव देशमुख | --''-- |
| ३२.श्री.हाजी मोहसिन अहेमद हाजी बशिर | --''-- |

| | |
|---|---|
| ३३.श्री.मुजीब आलमशाह मीर आलमशाह | --''-- |
| ३४.सौ.स.मोहसिना बिहकीस विखारोद्दीन | --''-- |
| ३५.श्री.अ.जावेद रज्जाक | --''-- |
| ३६.श्रीमती स.जाहेदा बेगम म.जमीर | --''-- |
| ३७.श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे | --''— |
| ३८.सौ.यशोदा धनंजय वाडेकर | --''-- |
| ३९.श्री.किशोर बाबुलाल तुळशिबागवाले | --''-- |
| ४०.श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाल | --''-- |
| ४१.श्री.स.हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन | --''-- |
| ४२.श्री.स.म.अ.रऊफ म.अ.माबुद | --''-- |
| ४३.श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबउद्दीन | --''-- |
| ४४.श्री.धिरज शांतीलाल खोखोरडीया | --''— |
| ४५.श्री.सय्यद अली मीरा सलामी | --''-- |
| ४६.श्री.रमेश दिपचंद लाहोट | --''-- |
| ४७.श्री.संजय किसनराव केनेकर | --''-- |
| ४८.सौ.मुक्ताबाई सुदाम वाघमारे | --''-- |
| ४९.सौ.लता श्रिनिवास दलाल | --''— |
| ५०.सौ.अल्का रमेश पाटील | --''-- |
| ५१.सौ.शकुंतला हरिदास धांडे | --''-- |
| ५२.श्री.अब्दुल रशिदखान मामू | --''— |
| ५३.श्री.जयवंत केशवराव ओक | --''-- |
| ५४.श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह | --''— |
| ५५.डॉ.भागवत किशनराव कराड | --''-- |
| ५६.सौ.सविता संजय आव्हाड | --''-- |
| ५७.सौ.निर्मला विठ्ठल कांबळे | --''-- |
| ५८.श्री.अ.रशिद अ.सत्तार | --''-- |
| ५९.श्री.तरवेंद्रसिंह महेंद्रसिंह धिल्लन | --''-- |
| ६०.श्री.विखारोद्दीन पि.खुदलोद्दीन | --''— |
| ६१.श्री.गंगाधर सुखदेव गाडे | --''-- |
| ६२.श्री.विकास रतनलाल जैन | --''-- |
| ६३.श्री.गणमोहनसिंग करमसिंग ओबेराय | --''-- |
| ६४.श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे | --''-- |
| ६५.श्री.संजय रामदास जोशी | --''-- |
| ६६.श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर | --''-- |
| ६७.श्री.अविनाश लक्ष्मण कुमावत | --''-- |
| ६८.सौ. जोत्सना दौलतराव हिवराळे | --''-- |
| ६९.श्री.राजकुमार उर्फ सांडू बचाटे | --''-- |
| ७०.सौ.राधाबाई तळेकर | --''-- |
| ७१.श्री.नरसिंग मुरलीधर ढगे | --''-- |
| ७२.श्री.विठ्ठल किसन जाधव | --''-- |
| ७३.सौ.मंदा धनंजय काळुसे | --''-- |

७४.सौ.सुनंदा उत्तम कोल्हे --''--
७५.श्री.बन्सी तुळशिराम गांगवे --''--
७६.श्री.भागवत देविदास घडामोडे --''--
७७.श्री.बन्सी तुळशिराम गांगवे --''--
७८.श्री.कचरु चंद्रभान नवपुते --''——

**संवाद :**

श्री.महादेव सुर्यवंशी : श्रीमती नर्मदाबाई जगन्नाथ बनकर व मा.महापौर यांचे पुतणे दिपनारायण बारवाल यांचे अशातच दुखःद निधन झाल्याने त्यांना सभागृहात दोन मिनीटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

मा.महापौर : मध्यंतरीच्या काळात आारसंहिता लागू असल्याने महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभांमधून निर्णयात्मक ठराव घेता आले नाहीत. सर्व स.सभासदांना विषयपत्रिका मिळालीच असेल. त्याप्रमाणे प्रथम गत बैठकीतील इतिवृत्तांवरती चर्चा झाल्यानंतर इतर विषयांवर चर्चा केली जाईल.

श्री. गौतम खरात : मी मांडलेल्या लक्षवेधी सुचनेवरती प्रथम सभागृहात चर्चा घडवून आणण्यात यावी व नंतरच इतर विषय चर्चिले जाते.

श्री. नरेंद्र पाटील : दि.१७.६.९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभोत "एका सेना नगरसेवकाने दमदाटी करुन टेंडर" या वृत्तपत्रातील बातमीवर चौकशी करुन या सर्वसाधारण सभेत मा.आयुक्त अहवाल सादर करणार होते. तो अहवाल सादर करण्यात यावा.

काही दिवसापूर्वी पर्यावरणावरती याच सभागृहात एका परिषदेचे आयोजन करण्यात अलेले होते. व महानगर पालिकेच्या बोध चिन्हावर एक बॅनरही लावण्यात आले होते. सर्वसाधारण सभा ज्या सभागृहात होतात त्या सभागृहात इतर कोणतेही कामकाज चालविले जावू नये.

जावेद रज्जाक : श्री. नरेंद्र पाटील यांच्या सुचनेस माझे अनुमोदन आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : पर्यावरण परिषदेसाठी हा हॉल उपलब्ध करुन देण्यात आला होत. व त्यासाठी मा.महापौर यांची नियुक्ती घेण्यात आली होती. मा.महापौरांच्या अनुमतीने महत्वांच्या बैठकीसांठी सभागृह उपलब्ध करुन देता येते.

मा.महापौर : पर्यावरण परिषदेसाठी मराठवाड्यातील विविध नगर परिषदाचे नगराध्यक्ष व इतर उच्चय पदस्थ अधिकारीही येणार होते. यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने महानगरपालिकेचे सर्वसाधारण सभेचे सभागृह उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार हे सभागृह देण्यात आले होते. याबाबत कोणताही गैरअर्थ काढण्यात येवू नये. महानगरपालिकेच्या टाऊन हॉल मध्येही एक सभागृह आहे. ते येथून पुढे अशा उपक्रमासाठी उलब्ध करुन देण्यात येईल.

श्री. कचरु नवपुते : पर्यावरणासारख्या अत्यंत महत्वच्या विषयावरती परिषद भरविण्यात आली होती व त्यातही विविध नगर परिषदांचे नगराध्यक्ष उपस्थित होते. तेव्हा यात सभागृहाचा गैरवापर होण्याचा काही प्रश्नच उद्‌भवत नाही.

महादेव सुर्यवंशी : स.नगरसेवक श्री. नरेंद्र पाटील हे नेहमीच सभागृहात स्वतःच शहाणपणा दाखवत असतात.

नरेंद्र पाटील : श्री. सुर्यवंशी यांनी आपले शब्द परत घ्यावेत.

श्री. गिरजाराम हाळनोर : विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्या पक्ष कार्यकर्त्यांना सभागृहात मा.महापौरांना उद्देशून बोलण्याची सूचना द्यावी.

श्री. नरेंद्र पाटील : मी सभागृहात कोणाचेही नाव घेवून बोललेलो नाही.

मा.महापौर : सर्वप्रथम आपण मिनिटसवरती चर्चा करण्यात यावी.

श्री. नरेंद्र पाटील : मागील सर्वसाधारण सभेत आपण निर्णय दिला होता की, मराठवाडा दैनिकात आलेल्या बातमीचा अहवाल आगामी सर्वसाधारण सभेत प्रथम ठेवण्यात येईल. त्यानुसार प्रथम अहवाल सभागृहात सादर करण्यात यावा व नंतर इतर प्रश्नांवरती चर्चा करण्यात यावी.

श्री. महादेव सुर्यवंशी : श्री.नरेंद्र पाटील यांनी मागील सर्वसाधारण सभेत एका स.नगरसेवक टेंडर हिसकावून घेतले याची चौकशी करावी अशी मागणी केली होती. यावर मा.महापौर कोणती रुलिंग नाही. तथापि मा. श्री. जैस्वाल साहेबांनी सांगितलले की, आचारसंहिता असल्याने इतर विषयांवरती चर्चा करता येणार नाही. तेव्हा चौकशी करुन आयुक्तांनी अहवाल सादर करावा.

श्री. मिरा सलामी : प्रथम लक्षवेधी सूचनेवरती चर्चा करण्यात यावी व नंतरच इतिवृत्तावर चर्चा करण्यात यावी.

मा.महापौर : सर्वप्रथम इतिवृत्तावरती चर्चा करण्यात यावी. त्यांनतर लक्षवेधी सूचना विचारात घेतली जाईल.

श्री. मनमोहनसिंग ओबेराय : प्रथम लक्षवेधी सूचना विचारात घेण्यात यावी व त्यानंतर इतर कामकाज करण्यात यावे.

श्री. जयवंत ओक : लक्षवेधी सुचनेवर चर्चा घडवून आणण्याचा अधिकारी मा.महापौरचा आहे. श्री. नरेंद्र पाटील यांनी इतिवृत्तावरती चर्चा सुरु केलेली आहे.

सचिव : श्री. गौतम खरात यांनी लक्षवेधी सुचना मांडली आहे की, डॉ.मेहेर उपमहापौर यांनी उपमहापौर पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर त्या दालनाचे शुध्दीकरण केले. भटजी आणून मंत्र, पुजापाठ केला तो का? केवळ अगोदरच उपमहापौर दलित होते म्हणून?

श्री. गौतम खरात : श्री. विजयकुमार मेहेर यांनी उपमहापौरपदी आरुढ झाल्यानंतर त्यांनी आपल्या दालनात सत्यनारायणची पूजा केली. यापूर्वीच महापौरांनी वा सभापतींना सभागृहनेता यांनी आपल्या भटजी वगैरे आणून मंत्रपाठ केल्याचे मला आठवत नाही उपमहापौरांनी स्वतःची प्रॉपर्टी समजून कार्यालयात भटजी आणून, गोमुत्र शिंपडून दालनाचे शुध्दीकरण केले. याची कारणे काय? याचे कारण असे की, यापुर्वीचे उपमहापौर दलित समाजाचे होते. अशा उपमहापौरांना खुर्चीवर बसण्याचा अधिकार नाही. शासनाच्या कोणत्या परिपत्रकानुसार अशा प्रकारचे कर्मकांड केले याची चौकशी झाली पाहिजे. मागे एकदा बिहारमध्ये जग जीवनराम यांनी महात्मा गांधीच्या पुतळ्याचे उद्घाटन झाल्यानंतर तेव्हाही मनुवादी व जातीयवादी लोकांनी पुतळ्याचे उद्घाटन झाल्यानंतर केवळ जगजीवनराम दलित होते म्हणून त्याचे शुध्दीकरण केले.

श्री. प्रभाकर विधाते : श्री. खरात यांना माहित असावयास पाहिजे की, सध्याचे उपमहापौर सध्या जिथे बसत आहेत ते दालन आणि उपमहापौर नसून स्थायी समितीचे

सभागृह आहे. खुर्च्याही सर्व नविन आहेत तेव्हा खरात यांचा आरोप खरा नाही. त्यांनी सभागृहात माफी मागावी. (स.नगरसेवक श्री. गौतम खरात यांच्या वक्तव्यावरती सेना नगरसेवक शेमशेमच्या घोषणा देतात.)

सौ. ज्योत्स्ना हिवराळे : श्री. विजयकुमार मेहेर यांची उपमहापौरपदी निवड झाल्यानंतर मी स्वतः त्यांचे स्वागत केले व त्यांना उपमहापौरांच्या खुर्चीवर बसविले. त्यांनी शुध्दीकरण वगैरे केले असा काही प्रकार घडलेला मला माहीत नाही.

श्री. गंगाधर गाडे : श्री. मेहेर यांच्या सांगण्यावरुन हा खुलासा सौ.हिवराळे यांनी केले आहे. त्यांनी सांगितले की, त्यांच्या अनुपस्थितीत दालनात पूजा केली गेली हा देश निधर्मी आहे. भाजपातील दलितांनी मने दुखावली जावू नयेत यासाठी माजी उपमहापौरांच्या अनुपस्थित श्री. मेहेर यांनी दालनात सत्यनारायण पूजा केली. श्री. मेहेर यांच्या धार्मिकपणाबाबत मी बोलणार नाही. त्यांनी पदासोबत धर्म घेऊ नये. धर्म ही वैयक्ति बाब आहे. त्यांचे कृत्य हे निषेधार्ह आहे. त्यांच्या कॅबीनच्या पूजनासाठी झालेला खर्च हा वसुल करता येतो का हेही पाहिले पाहिजे. म्हणून त्यांनी स्वतः होवून आपल्या पदाचा राजीनामा द्यावयास हवा.

श्री. गिरजाराम हाळनोर : श्री. गंगाधर गाडे यांचे आरोप बिनबुडाचे आहेत. सौ. ज्योत्स्नाबाई हिवराळे यांची उपमहापौरपदी निवड करतांना त्यांची जात पाहिली गेली नाही. आम्ही जातीयवादी दृष्टीकोन ठेवत नाहीत. पूजा कोणाच्या हाताने करावयाची हा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे.

मा.महापौर : आज सभेत अनेक महत्वपूर्ण विषयांवरत चर्चा करावयाची आहे. तेव्हा वेळेचे महत्व लक्षात घेवून सभासदांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

श्री. संजय जोशी : माजी उपमहापौरांनी खुलासा केलेलाच आहे, श्री. मेहेर यांनी त्यांच्या समोर असे कोणतेही कृत्य केलेले नाही. उलट त्यांनी मेहेर यांची उपमहापौरपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन करुन त्यांना पदभार स्विकारण्याबाबत सुचविले असता. उपमहापौरच्या खुर्चीवर बसले. यानंतर श्री.मेहेर यांनी मंत्रपाठ करण्याच प्रश्नच येत नाही. सध्या उपमहापौर ज्या पक्षाचे आहेत त्याच भाजपाने जास्तीत जास्त दलितांना व इतर मागसवर्गीयांना संधी प्राप्त करुन दिल्या आहेत. त्यामुळे माजी उपमहापौर दलित होत्या म्हणून श्री. विजयकुमार मेहेर यांनी त्यांच्या दालनाचे शुध्दीकरण केले हे म्हणणे खोटे आहे. याबद्दल मी आरोप करणाऱ्या सदस्यांचा निषेध करतो.

श्री. गंगाधर गाडे : श्री. मेहेर हे कोणत्या धर्माचे आहेत. याबद्दल मी बोलणार नाही. पूर्वीही अनेक नगराध्यक्ष, महापौर झालेले आहेत. मात्र कोणीही अशा प्रकारचे कृत्य केलेले नाही. सत्यनारायणासाठी झालेल्या खर्चाच्या पावत्याही प्रशासनाकडे पाठविण्याचा प्रयत्न झालेला आहे. म्हणून त्यांनी स्वतःहून आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे.

मा.महापौर : सभासदांनी शांतपणे आपल्या भावना व्यक्त कराव्यात. सर्वांना आपले म्हणणे मांडण्यास संधी दिली जाईल. उपमहापौरांच्या प्रश्नावरती स्वतः खुलासा करतील सर्वांनी शांतपणे बसावे.

श्री. मिरा सलामी : जेव्हा हिंदुस्थानाची वाटणी झाली तेव्हा मौलाना आझाद म्हणाले होते की, पाकिस्तानात पाक आहे तर हा काय नापाक आहे. यावरुन असे लक्षात

येते की, यपूर्वी त्या खुर्चीवर जे उपमहापौर बसले होते ते नापाक होते कारण की ते नीचजातचे होते. म्हणून उपमहापौरांनी शुध्दीकरण केले.

सेना नगरसेवक श्री. मिरा सलामी यांच्या वक्तव्यावर शेमशेमच्या घोषणा देतात.

मा.महापौर : सभागृहनेता, विरोधी पक्षनेता यांनी सभासदांना शांत बसण्याबाबत सूचना द्याव्यात. श्री. मिरा सलामी यांनी सभागृहाची जाहीर माफी मागावी.

सभागृहात घोषणा दिल्या जातात.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : मा.महापौरांनी प्रथम मिरा सलामी यांचे पूर्ण म्हणणे ऐकून घ्यावे.

श्री. जयर्वेत ओक : सभागृजहात उपशब्द वापरल्यामुळे श्री. मिरा सलामी यांचे सभासदतव रद्द करावे.

मा. महापौर : सर्व स. सभासदांच्या भावना लक्षात घेता श्री. मिरा सलामी यांचे सदसत्व एङ्ख दिवसासाठी रद्द करण्यात येते. कारण आपण वापरलेल्या शब्दाने सभगृहाचा अपमान झालेला आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मा. महापौरांनी निर्णयाचा फेरविचार करावा. श्री. सलामी यचांच्या शब्दाचा गैरअर्थ लावला जात आहे. तो हिंदी शब्द आहे.

श्री. जयवंत ओक : मा.महापौरांनी रुलिंग दिलेली आहे. त्यानुसार स.सभासदाने सभागृहाबाहेर जावयास हवे प्रथम निर्णयाची अंमलबजावणी व्हावी.

मा.महापौर : स.नगरसेवकांनी आपले म्हणणे संयमाने मांडावे. सर्वांनी आपल्या जागेवर बसावे. सर्वांनी सहकार्याची भावना ठेवावी. घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल.

श्री. मिरा सलामी : "निची जाती" हा मी हिंदी शब्द वापरला त्याचा गैरअर्थ काढला गेला यासाठी मागासवर्गीय हा मराठी शब्द आहे. त्यामुळे माझे सभासदत्व रद्द करण्याचा प्रश्नच येत नाही. हिंदी समजत नसेल तर त्यासाठी मी मागासवर्गीय हा शब्द वापरतो.

मा.महापौर : एकदा दिलेला निर्णयाची अंमलबजावणी झाल्यानंतर आपल्या म्हणण्यावर विचार केला जाईल. १२.३० वाजता मा.महापौर यांच्या टेबलावरील राजदंड आघाडी नगरसेवकांनी पळवल्याने मा.महापौरांनी सभा तहकूब केली. राजदंड परत सभागृहात मा.महापौरांच्या टेबलावर आणल्याने १.०० वाजत सभा पूर्ववत सुरु झाली.

मा.महापौर : सभेच्या सुरुवातीस मी स्पष्ट केले होते की, सर्व सभासदांना त्याचें म्हणणे मांडण्यासाठी वेळ दिला जाईल तरीही सभागृहामध्ये गोंधळ झाला. सभासदांच्या भावना लक्षात घेता स. सभासद श्री. मिरा सलामी यांचे सभासदत्व एक दिवसासाठी रद्द करण्यात येते. तसेच श्री.गौतम खरात यांनी राजदंड सभागृहातबाहेर पळवून नेल्याने त्यांचे सभासदत्व चार दिवसांसाठी रद्द करण्यात येते.

श्री. मिरा सलामी : माझे म्हणणे पूर्णपणे ऐकून न घेतले गेल्याने सभसदांचा गैरसमज झालेला आहे. हिंदी शब्दाचा गैरअर्थ काढला गेला. महापौरांचा मान ठेवण्यासाठी मी पाच मिनीटे सभागृहाबाहेर जाण्यास तयार आहे.

मा. सभागृहातील उपस्थितीत सदस्यांच्या भावना लक्षात घेता श्री. मिरा सलामी यांचे सभासदत्व एक दिवसासाठी रद्द केलेले आहे. तेंव्हा त्यानी सभागृह सोडावे.

श्री. मनमोहनसिंग ओबेराय : सभासदाने दिलगीरी व्यक्त केलेली आहे. तेव्हा महापौरांनी आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा.

श्री. गौतम खरात : श्री. मिरा सलामी यांच्या हिंदी शब्दाचा गैरअर्थ काढला गेला. उपमहापौरांनी केलेले कर्मकांड घटनेच्या कोणत्याही कलमात बसत नाही. हा देश निधर्मी आहे. त्यांनी कर्मकांडासारखे प्रकार कार्यालयात करावयास नको होते. असे म्हणावयाचे होते आणि म्हणून मी राजदंड पळविला. सभागृहाचा मी मान ठेवणार आहे आणि यासाठी मी सभागृहाबाहेर जात आहे.

श्री. विजयकुमार मेहेर उपमहापौर : कोणतेही शुभकार्य करतांना आपण प्रार्थना म्हणतो, शाळेचा वा इतर इमारतीचे काम सुरु करण्यापूर्वी आपण भूमीपूजन करतो. मी गोमुत्र आणले नाही, शिंपडले नाही आणि खुर्चीही शुद्ध केली नाही. गोमुत्र शिंपडण्याने पवित्र होते अशी जर कोणा सभासदाची भावना असेल तर त्यांनी बादलीवर गोमुत्र आणून स्वतःवर ओतून घ्यावे व अंतःकरणाने शुध्द व्हावे. समाजामध्ये दुफळीचे वातावरण निर्माण करु नका आणि जातीजातीमध्ये तेढ निर्माण करु नका. मागील तीन महिन्यापासून मी उपमहापौर म्हणून कसा वागत आहे हे सर्व स.नगरसेवकांना व अधिकाऱ्यांना माहित आहे. माझ्याकडून केव्हाही जातपात असा प्रकार घडलेला नाही व भविष्यातही घडणार नाही याची आपण हमी देतो. केवळ सर्वत्र लोकप्रियता मिळविण्यासाठी काही सभासदांनी हा मार्ग अवलंविला आहे. आपणही काचेच्या घरात बसलेले आहात तेव्हा इतरांना दगड मारु नका अशी मी सूचना करु इच्छितो.

श्री. गंगाधर गाडे : उपमहापौरांनी येथे सांगितले की, आपण असे काही केलेले नाही व गौतम खरात हे प्रसिध्दीसाठी सर्व करत आहेत. जर आपण परवानगी दिली तर अथवा सत्यशोधनासाठी कमेटी स्थापन करणार असाल तर या प्रकारचे सर्व पुरावे आम्ही सादर करु शकू. जातीजातीत तेढ निर्माण करण्याचे कोणासही कारण नाही. कोणत्याही धर्माबाबत आपणांस अनादर नाही. धर्माबद्दल प्रेम असावे पण त्याचे प्रदर्शन कशासाठी उपमहापौरांनी सत्यनारायणाची पूजा केली हे खरेच आहे.

मा.महापौर : या प्रश्नावरती बरीच चर्चा झालेली आहे. यानंतर विषय क्रं.१ वरत कोणास बोलावयाचे असेल तर त्यांनी बोलावे. आघाडीचे नगरसेवक १.१० वाजता सभात्याग करतात व १.२० वाजता सभागृहात परत येतात.

**विषय क्र ३/१.**

दिनांक १८.४.९६ रोजी तसेच दि.१८.५.९६ व १७/६/९६रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद :

श्री. गिरजाराम हाळनोर : दि.११.३.९६ च्या सर्वसाधारण सभेत जकाती संबंधाने मा.आयुक्तांनी निवेदन केले आहे की, "जकात कराचा अपेक्षित ३० कोटी रक्कमेत ३० टक्के वाढ होईल" असे निर्धारीत धरुन तरतूद केलेली आहे. त्यानुसार जकात करात कोणतीही वाढ केलेली नाही. महाराष्ट्र डिस्टिलरी कंपनी विरुध्दचा जकात कराबाबत दावा महापालिकेने उच्च न्यायालयात जिंकला आहे. म्हणजे एक कोटी उत्पन्न दरवर्षी वाढणार परंतु आयुक्तांचे हे

म्हणणे बरोबर नाही. हे उत्पन्न एक कोटीने वाढणार नाही तर साधारणतः ३५ लाख रुपये उत्पन्न मिळणार आहे. बजेट केवळ वाढविण्यात आलेले आहे. त्यानुसार दुरुस्ती करण्यात यावी.

श्री. नरेंद्र पाटील : अर्थसंकल्पीय बैठकीत आयुक्तांसमवेत या प्रश्नावर बरीच चर्चा झाली होती. श्री. हाळनोर यांनी सांगितले ते बरोबर आहे. बी.डी.ए. व महाराष्ट्र डिस्टिलरी यांच्याकडून मागील येणे हे ५ कोटीचे होते. येणारे उत्पन्न रुपये दोन कोटी हे चुकीचे उत्पन्न पकडले गेले. येणारे उत्पन्न गृहीत धरुन त्याचा खर्च दाखविणे हे चुकीचे आहे. तेव्हा अर्थसंकल्पात तरतुद करण्यात यावी.

मा.महापौर : त्या कंपन्याकडून साधारणतः ५० लक्ष उत्पन्न मिळेल अशी आशा करता येईल.

श्री. नरेंद्र पाटील : मा.आयुक्तांनी भविष्यातील सर्वसाधारण सभांना उपस्थित रहावे.

उप आयुक्त : २० जुलै रोजी पुणे येथील कार्येशाळेस उपस्थित रहाण्यासाठी मा.आयुक्त पुणे येथे गेलेले आहेत. ह्या बाबीची कल्पना मा.महापौरांना देण्यात आलेली आहे.

मा.महापौर : येथून पुढे सर्वसाधारण सभांना उपस्थित राहण्याबाबत मा.आयुक्तांना कळविण्यात येईल.

श्री. जावेद रज्जाक : आपसातील भांडणामुळे एका चांगल्या आयुक्ताची बदली झाली त्यामुळे शहराचा विकास योग्य प्रकारे होणार नाही.

श्री. मनमोहनसिंग ओबेराय : श्री. भोगे हे एक कर्तदक्ष अधिकारी होते. त्यांच्या अडीच वर्षाच्या कार्यकाळात शहर विकासाची अनेक कामे झालेली आहेत. तेव्हा महानगरपालिकेतर्फे त्यांना निरोप समारंभ देण्यात यावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : श्री. भोगे यांनी शहराचा चेहरामोहरा बदलला हेता. ते नॉन करप्ट होते. अशा अधिकाऱ्यांचा आदर सत्कार झाला पाहिजे.

श्री. गंगाधर गाडे : सर्व प्रथम मी महापौरांचेही अभिनंदन करतो आज सर्वप्रथम सभागृहात सर्व पक्षांच्या गटांच्या लोकानां आपण ऐकून घेत आहात. प्रथमच एखाद्या मुद्यावर सर्व सभासदांचे एकमत झाले आहे. या बरोबर एका गोष्टीचा विचार व्हावा की, डेप्युटेशनवर महानगरपालिकात येणाऱ्या उपआयुक्ताना नंबर एक दिला जातो. महानगरपिालकेच्या उपआयुक्तांना सर्व बाबींची माहिती आहे. अनुभव आहे. त्यांना नंबर दोन द्यावे हे संयुक्तिक वाटत नाही.

श्री. नरेंद्र पाटील : गत सर्वसाधारण सभेत आश्वासन दिल्यानुसार दैनिक मराठवाड्यातील बातमी बाबात खुलासा व्हावा.

कार्यकारी अभियंता : दि.१७.६.९६ राजी नारेंगाव जलवाहिणीच्या टेंडरबाबत प्रश्न उपस्थित झाला होता. या कामाच्या एकूण पाच निविदा विकल्या गेल्या होत्या. पैकी दोन निविदा कार्यालयात भरल्या गेल्या. वृत्तपत्रातील बातमी संदर्भाने निविदा खरेदी केलेल कंत्राटदाराकडे लेखी चौकशी केली असता त्यांनी कोणी दमदाटी वगैरे केल्याचे कोणीही सांगितले नाही.

श्री. नरेंद्र पाटील : या खुलाशा बाबत मी समाधानी नाही. असे प्रकार लेखी स्वरुपात कळविण्यात नाही.

मा.महापौर : जर कंत्राटदार लेखी देत नसेल तर वा कोणी तक्रार करत नसेल तर याबाबत कार्यालय करु शकते.

श्री. मनमोहनसिंग ओबेराय : प्राप्त झालेल्या निविंदाचे किती अबोव्ह वा बिले आहेत याची माहिती देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता : प्राप्त झालेल्या निविंदापैकी एक निविदा अंदाजपत्रकीय दराची आहे यामुळे अंदाजपत्रकीय दराची निविदा स्थायी समितीने मंजूर केली आहे. यात सलिम पटेल व चंद्रभान यांच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

श्री. महादेव सुर्यवंशी : आपणांकडे असेही घडते की, २५ निविदा दिल्या जातात मात्र एकच निविदा प्राप्त होते. सभासद टेंडर हिसकावून घेतले हे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही. नारेगावला सबमर्सिबल पंपाद्वारे पाणीपुरवठा केला जातो. पाऊस नसल्याने पाणी पुरवठ्यावर परिणाम झाला. ह्या भागात पाणी पुरवठा करणे गरजेचे आहे. तेव्हा आरोप प्रत्यरोपन करता कामे करण्यात यावी.

श्री. नरेंद्र पाटील : वृत्तपत्रातील बातमी चुकीची असेल तर याचा निषेध करण्यात यावा. अथवा वृत्तपत्रातील बातमी चुकीची आहे असे सभागृहात सांगण्यात यावे.

मा.महापौर : कृपया सभासदांनी शांतपणाने चर्चा करावी इतःपर असे प्रकार घडणार नाहीत याची प्रशासनाने दक्षता घ्यावी.

श्री. हमीद उद्दीन ताबा : महानगरपालिका सभागृहास मलिक अंबर नाव देण्याबाबतचा प्रस्ताव मागेच मंजूर झालेला आहे. मात्र सभागृहात अद्यापपर्यंत नांव दिले गेलेले नाही.

मा.महापौर : याची दखल घेतली जाईल.

श्री. हमीद उद्दीन ताबा : ५० शिपाई/वॉचमन यांच्या फिक्स पे बाबत मागेच ठराव पारित झालेला आहे. त्यावर कार्यवाही का होत नाही.

मा.महापौरः या संदर्भाने चौकशी केली जाईल व आवश्यक ती कार्यवाही केली जाईल.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार दि.१८.४.९६, १८.५.९६ व १७.६.९६ च्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४/२ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या बांधकामाकरिता डिसें ९६ अखेरपर्यंत बरीचशी महत्वाची कामे शासनाच्या अनुदानाची कामे चालू असून ती प्रगती पथावर आहे. शिवाय शाळा बांधणे, पुलाचे बांधकाम करणे, व्यापार, संकुल बांधणे जलनिःसरण पाईप लाईन टाकणे पाण्याचे जलकुंभ बांधणे, मुख्य रोडवर दुभाजक बांधणे, समाज मंदिर बांधणे व उद्यान विकसीत करणे इ.महत्वाची कामे चालू असून त्यासाठी सर्व संबंधित विभागातून सिंमेटची मागणी मागविली असता ती १,४९,३९५ इतक्या सिमेंट गोणीची आवश्यकता आहे. अशी माहिती मिळाली. यापैकी ५०,००० सिमेंट खरेदी करावी असे ठरले. तरी त्यानुसार सा.बां.विभाग औरंगाबाद यांचे कडील दरसूची वर्षी ९५-९६ अ.क्र.१२ अ अन्वये ५० किलो प्रति गोणी सिमेंटच्या दर १२५ प्रति टन २५००.०० असा आहे. तरी वरील सिमेंट खरेदी प्रमाणे एकुण ६२.५० लाख खर्च होईल. त्यास अंदाजपत्रकास मंजुरी दिली आहे.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. गिरजाराम हाळनोर : कामाची तातडी पाहता इतिवृत्त मंजूर होई पावेतो पुढील कार्यवाही करण्याची ही अनुमती द्यावी.

मा.महापौर : टेंडर काढण्याची परवानगी देण्यात येते.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार ५०,००० गोण्या सिमेंट खरेदी करण्यासाठी सा.बां.विभाग औरंगाबाद यांचेकडील ९५.९६ च्या दरसूची अ.क्र.१२ अ अन्वये ५० किलो प्रति गोणी सिमेंट

गोणी साठीच्या दर रु. १२५/- प्रतिगोणी प्रमाणे येणाऱ्या रुपये ६२.५० लक्षाच्या खर्चास ठरावाच्या कार्यालयसह सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.१२ मो.आंबेडकर येथील डांबरीकरण करण्याचे यापूर्वी सन ९३-९४ मध्ये एकूण रु. ६.०० लाख शासकीय अनुदानातून अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते, परंतु उपअभियंता जलनिःसरण विभाग (सिडको) यांचें ड्रेनेज लाईन टाकण्याचे व कन्व्हर्शनचे काम चालू असल्यामुळे सन ९४-९५ मध्ये काम करता आले नाही. तसेच पूर्वीच्या अंदाजपत्रकात फक्त २० मी.मी.जाडीचे सिकोट करण्याचे तरतुद होती. परंतु कन्व्हर्शनचे काम व ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम व काही भागात नाल्या दुरुस्ती व रोड क्रॉस पाईप टाकण्याचे काम चालू होते. त्यामुळे सदरील भागातील रोड अत्यंत खराब झाले. अजूनही ड्रेनेज लाईन दुरुस्ती काम चालू आहे. त्याकरिता प्रस्तुत राडवर मेकॅडम ५० मी मी जाडीचे करणे व व त्यावर २० मीमी जाडीचे सिलकोट करणे अत्यंत जरुरीचे आहे. त्याकरिता दुरुस्ती अंदाज पत्रक रक्कम रु. १५,३२,३६०/- तयार करण्यात आले असून त्यापैकी रु.६.०० लाख शासकीय अनुदानातून व उर्वरित रक्कम रु. ९,३२,३६०/- महानगरपलिका फंडातून खर्च करण्यात येईल तसेच ९६-९७ साठी नवीन डांबरीकरण करण्याकरिता २१.७०.०० लाखाची तरतूद आहे. तसेच पूर्वीचे अंदाजपत्रक सन ९२-९३ चे असल्यामुळे नविन अंदाजपत्रक सा.बां.विभागाचे सन ९५-९६ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. सदरील दुरुस्त अंदाजपत्रक मा.आयुक्त यांनी दिनांक २४.५.९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

करिता दुरुस्त अंदाजपत्रक रक्कम रु. १५,३२,३६० मंजूरी व विचारार्थ सादर.

सौ.अल्का पाटील : महिलांसाठी बोलण्याची संधी द्यावी.

ठराव : प्रस्तावात दर्शविल्यानुसार वॉर्ड क्र.१२ आंबेडकर नगर येथील रोडवर ५० मीमी जाडीचे मेकॅडम व त्यावर २० मीमी जाडीचे सिलकोट करण्यासाठी सा.बां.विभागाच्या ९५-९६ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेल्या दुरुस्त अंदाजपत्रकास रु. १५,१२,३६०/- व त्यापैकी रु. ९,३२,३६० महानगरपालिका फंडातून खर्च करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.संजयनगर (मुकूंदवाडी) दक्षिण भाग येथे डांबरीरस्ते तयार करणे करीता रक्कम रु.१५,१४,०००/- चे अंदाजपत्रक सा.बां.विभाग औरंगाबाद यांची दरसूची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आले असून मा.आयुक्तांनी दि.११.६.९६ चे प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदरील कामाकरीता महानगरपालिकेच्या सन ९१ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत डां.रस्ते या शिर्षाअंतर्गत रु.७०.०० लाखाची तरतूद केली आहे. प्रशासकीय मान्यतेस सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार (संजयनगर, मुकूंदवाडी) दक्षिण भागात डांबरी रस्ते तयार करण्याकरिता रक्कम रु. १५,१४,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७/५ :** अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, मा.सभापती यांनी दिनाक १४.६.९६ रोजी बैठक घेतली. बैठकीत शहरातील विविध रस्त्यांचे साईडला असलेली माती उचलण्याबाबत सुचित केले. शहरातील विविध रस्त्यांचे साईडला माती उचलावयाची झाल्यास त्यासाठी बांधकाम विभाग-१ साठी ५ ट्रॅक्टर व बांधकाम-२ विभागसाठी ५ ट्रॅक्टर मेकॅनिकल विभागातर्फे तीन महिन्यासाठी भाड्याने घ्यावे लागतील व त्यासाठी ५० मजूर दैनिक वेतनावर लावावे लागतील. शहरातील रस्त्यांच्या साईडला बरीच माती असल्याने सदरील काम करण्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्याकरिता लागणारा खर्च रु. ७.०० लक्ष रुपयापेक्षाही अधिक होण्याची शक्यता आहे. करीता सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेकरिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

संवादः

श्री. नरेंद्र पाटील : ही माती नैसर्गिक आहे की, रस्ते ड्रेनेज आदीचे काम झाल्यानंतर गुत्तेदाराने न उचलेली आहे याचा प्रथम खुलासा व्हावा. एखाद्या रस्त्याचे वा ड्रेनेजचे काम झाल्यानंतर तेथील माती आदी मटेरियल गुत्तेदाराने उचलावयास पाहिजे.

श्री. गिरजाराम हाळनोर : यासाठी जेंटीग मशिन खरेदी करण्यात यावे. म्हणजे वारंवार अशा गोष्टीवरती खर्च होणार नाही.

श्री. शहर अभियंता : रस्त्याचे काम करताना जी माती राहते ती माती कंत्राटदार उचलतात. या व्यतिरिक्त जी माती असते ती उचलण्यासाठी हा प्रस्ताव आहे.

श्री. मुजीब आलम शाह खान : रस्त्याच्या बाजूस पडलेली माती कंत्राटदाराने उचलावयास हवी साफसफाई करणाऱ्या कामगारांनी दररोज व्यवस्थित साफसफाई केली व माती उचलली तर असे प्रश्न उद्‌भवणार नाही.

श्री. प्रभाकर विधाते : कामे संपल्यानंतर कंत्राटदारानेच माती उचलून द्यावयास हवी पण ते हे करत नाहीत.

श्री. जावेद रज्जाक : नेमकी कोणत्या भागातील माती उचलावयास हवी याचा प्रस्तावात उल्लेख नाही.

सौ. बिल्कीस बेगम : विभागात चालू असलेल्या वा झालेल्या कामांची माहिती नगरसेवकांना दिली जात नाही. साफसफाई करणारे कर्मचारी कचरा उचलून घेता,तो जाळतात त्यामुळे नागरिकांना त्याचा त्रास होतो. नाल्यातून काढलेला कचरा उचलण्यासाठी हातगाड्या उपलब्ध करुन द्यावयास हव्यात. तो तात्काळ उचलल्याने परत रस्त्यावर सर्वत्र पसरतो.

श्री. महादेव सुर्यवंशी : कंत्राटदाराने काम झाल्यानंतर रस्त्याच्याबाजूची माती आदी मटेरियल उचलेले आहे असे मानपत्र दिल्यानंतरच त्यांचे पेमेंट देण्यात यावे. नेहमीच अशा प्रकारचा खर्च करणे शक्य होणार नाही. जेटींग मशिन खरेदीत सभापतीच्या सूचनेचा विचार व्हावा व हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

श्री. नरेंद्र पाटील : अशा प्रकारची कामे विभागीय कार्यालयाकडूनच करुन घ्यावयास हवीत. संबंधीत वॉर्डाच्या नगरसेवकाने मागणी केली असेल तर ती तातडीने उचलून घेण्यात यावी. ज्यांच्या बांधकामाची माती रस्त्यावर पडलेली असेल त्यांना ती उचलून घेण्याबाबत नोटीस देण्यात यावी. कंत्राटदारांनी नोटिस देण्यात

यावी व या व्यतिरिक्त माती रस्त्यावर रहात असेल तर ती उचलण्यासाठी म्हणून एक लाख रुपयाची तरतूद करण्यात यावी.

मा.महापौर : रु. १.०० लाखाची मंजूरी देण्यात येते ड्रेनेज/रस्त्याच्या कामाची माती महानगरपालिकेने न उचलता ती कंत्राटदाराकडून उचलून घेण्यात यावी. विभागी अधिकाऱ्यांनीही या बाबीची काळजी घ्यावी.

श्री. वसंत देशमुख : माझ्या वॉर्डात रस्त्याचे काम झालेले आहे. रस्त्यावर पडलेली माती उचलण्यासाठी वारंवार सांगूनही ती उचलली जात नाही.

मा.महापौर : संबंधित अधिकाऱ्यांनी याची दखल घ्यावी.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरात विविध रस्त्यांच्या बाजूस पडलेली माती उचलण्यासाठी रु.५.०० लाखाऐवजी रु.१.०० लाखाची तरतूदीस मान्यता देण्यात येते. रस्ते, ड्रेनेज वा तत्सम कामे करणाऱ्या कंत्राटदाराकडून काम झाल्यानंतर तात्काळ मटेरियल उचलून घेण्यात यावे. तसेच रस्त्यावर पडलेले इमारत साहित्य ही संबंधितास उचलण्यास सांगावे. या व्यतिरिक्त रस्त्यावर माती रहात असेल तरच या तरतुदीमधून खर्च करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८/६ :** मा.आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.आयुक्तांकडे नेहमी बैठका आयोजित केल्या जातात तसेच मनपा पदाधिकारी व इतर खात्याशी समन्वय राखण्याच्या दृष्टीकोनातून मा.आयुक्तांना बैठकांना उपस्थित राहावे लागते. या सभेत वेळोवेळी आवश्यक ती माहिती संकलित करावी लागते. सध्या शासनाचा कारभार मराठीतून पाहिल्या जातो. तर महानगरपालिकेच्या कामाचा व्याप दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे महानगरपालिकेवर अस्थापनेवर अवगत असलेले लघुटंकलेखक व वेतनश्रेणी १४०० ते २३०० हे पद लघुलेखक उच्चश्रेणी (मराठी) रु. २००० ते ३२०० मध्ये रुपांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.नरेंद्र पाटील : १९८९ मध्ये सेवाभर्ती नियम सर्वसाधारण सभेत मंजूरीसाठी आले. परंतु त्यात बऱ्याच त्रुटी होत्या. त्यामुळे हे नियम विधी समितीकडे पाठवून त्यात आवश्यक त्या दुरुस्त्या कराव्यात असे ठरले होते. परंतु तात्कालीन आयुक्त डॉ. गोविंद गोरे यांनी तो ठराव विधी समितीकडे पाठविला नाही व बॉडीबरखास्त झाल्यानंतर तो त्यांना हवा होता त्याप्रमाणे बनवून घेऊन शासनाकडे मंजूरीस्तव पाठविला व त्यांना हवा त्याप्रमाणे शासनाकडून मंजूर करवून घेतला. यानंतर अनेक पदे भरली गेली. काहींना वेतनश्रेण्या दिल्या गेल्या, म्हणून नवीन सेवा भरती नियम या सभागृहापुढे ठेवावेत व ते मंजूर झाल्यानंतरच पूढील वेतन श्रेण्या पदोन्नत्या देण्यात याव्यात.

श्री. अ. रशिद खॉन (मामू) : चुकीच्या सेवा भरती नियमांमुळे वैद्यकिय अधिकाऱ्यांना चुकीची वेतन श्रेणी दिली गेली. या नियमांना फायनान्स डिर्पाटमेंट ची ही मंजुरी नाही. या कायनान्स डिपार्टमेंट मंजुरी घ्यावयास हवी.

श्री. गिरजाराम हाळनोर : विधि सल्लागारांनी सेवाभर्तीनियम केव्हा बनवले गेले त्यावर कर्मचाऱ्यांच्या सूचना/हरकती मागवल्या गेल्या काय या संदर्भाने खुलासा करावा.

मा.महापौर : विधिसल्लागार काही कामानिमित्त पोलिस स्टेशनला गेलेले आहेत.

श्री. गंगाधर गाडे : प्रस्तावात दिलेली कारण मिमांसा संयुक्तिक वाटत नाही. ज्यासाठी एखाद्या कर्मचाऱ्याची नियुक्ती झालेली असते ते काम करणे हे त्याचे नैतिक कर्तव्य आहे. शासन कारभार मराठीतून संकलीत करावी लागत असली तरी त्यासाठी ज्यादा वेतन देण्याचे प्रयोजन काय महानगरपालिकेतील काही कर्मचारी संघटना मागील तीन-चार वर्षापासून त्यांच्या वेतनश्रेणीबाबत प्रश्नाबाबत प्रशासनाकडे निवेदने देत आहेत. मात्र त्यांचे प्रश्न सोडविले जात नाहीत. व्यक्तिगत पातळीवर कोणाचाही विचार होऊ नये.

सौ. लता दलाल : १९८८ ला नवीन बॉडी अस्तित्वात आल्यानंतर आर.आर.बनवले गेले. त्यावर अनेक आक्षेप आले होते. त्यावर कमेटी नेमली गेली होती. त्यानंतर १९९४ मध्ये अंतिमतः आर.आर. शासनाकडे मंजूरीसाठी पाठवले गेले व त्यास मंजूरी मिळाली. आजही या आर.आर वर अनेक कर्मचाऱ्यांचे आक्षेप आहेत. या संदर्भात मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे समाधानकारक नाहीत. प्रथम सर्वांसाठी एक जनरल पॉलिसी ठरवण्यात यावी व त्यानंतरच पदोन्नतीचे वेतनश्रेणीचे नियम सभेसमोर ठेवावेत.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : आर.आर.साठी स्वतंत्र बैठक ठेवण्यात यावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : आर.आर.च्या संदर्भाने नेहमी वेगवेगळी माहिती सांगितली जाते.

श्री. मुश्ताक अहेमद : मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी सूचना केल्यानुसार आर.आर.संदर्भाने वेगळी बैठक बोलावून आर.आर.वर चर्चा करण्यात यावी.

श्री. अ.रशिद खान (मामू) : काही गोष्टी शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे पार पाडल्या जातात तर काही बाबतीत आर.आर. चा आधार घेतला जातो. हे बरोबर नाही. यासाठी एक समिती बनविण्यात यावी व तीस कालमर्यादा घालून देण्यात यावी.

श्री. नरेंद्र पाटील : डॉ.गोविंद गोरे तत्कालीन आयुक्त यांनी सभागृहाचा हक्क भंग केला आहे तेव्हा अशा प्रकारची नोटीस देण्यात यावी.

मा.महापौर : आर.आर.वरती नव्याने विचार करण्यासाठी मा.सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता, आयुक्त, उपआयुक्त-१ यांची कमेटी स्थापन करण्यात येते. तूर्त सदरचा प्रस्ताव स्थगीत करण्यात येतो.

**ठराव :** आर.आर.वरती पुनर्विचार करण्याबाबत स्थापन करण्यात आलेल्या समितीचे कामकाज संपेपर्यंत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात येतो असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९/७** : अंतर्गत शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जिश्वेवर कॉलनी भागातील कटकट गेटपर्यंत असलेल्या कमला नेहरु नगर बाबर कॉलनी खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये ७,२९,५२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येईल.

तरि सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. ७,२९,५२०/- चे अंदाजपत्रक मंजूरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार जिश्वेवर कॉलनी भागातील कटकटगेटपर्यंत असलेल्या वस्तीत (नेहरु नगर, बाबर कॉलनी) खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या सूचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ७,२९,५२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०/८ :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, कुँवारकल्ली, जाधवमंडी भागातील रोडचे डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसूचीनुसार रक्कम रु. ५,४४,८२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या रस्ते देखभाल व दुरुस्तीचा लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. ५,४४,८२५/- चे अंदाजपत्रक मंजूरी बाबतचा प्रस्ताव स्थाई समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार कुँवारफल्ली, जाधवमंडी भागातील रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बां. खात्याच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु. ५,४४,८२५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.संजयनगर, मुकूंदवाडी येथील समाज मंदिराजवळील परिसरात मोकळ्या जागेवर प्राथमिक शाळेकरीता तीन खोल्या व मुलां-मुलीकरीता शौचालय बांधणेच्या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ चे जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रु. १०,३८,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास दि.२५.३.९६ ला मा.आयुक्तांनी "सर्वसाधारण सभेच्या" मान्यतेस्तव ठेवणे योग्य या अटीवर मान्यता दिलेली आहे. सबब सदर कामाचे रक्कम रु. १०,३८,०००/- अंदाजपत्र मंजुरीचा प्रस्ताव व विचारार्थ सादर. सदर खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे लेखा शिर्षामधून करण्यात येईल.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार, संजयनगर, मुकूंदवाडी येथील समाज मंदिराजवळील परिसरात मोकळ्या जागेवर प्राथमिक शाळेकरिता तीन खोल्या व मुला-मुलीकरिता शौचालय बांधण्याच्या कामासाठी सा.बां.विभागाच्या ९५-९६ च्या जिल्हादर सुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १०,३८,०००/- अंदाज पत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२/१०:** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.गितानगर, नेहर-अंबर टाकीसमोर म.न.पा. शाळेकरिता दोन खोल्या व शौचालय बांधणेच्या कामासाठी सा.बां.खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु.५,९७,२१०/- अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास "सर्वसाधारण सभेत" मंजूरीस्तव ठेवणे या अटीवर मा.आयुक्तांनी दि.१८.६.९६ अन्वये मंजूरी दिलेली आहे. सबब सदर कामाचे रक्कम रु.५,९७,२१०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदर खर्च सन ९६-९७ या वर्षात विकास, इमारती शाळा व दवाखाने या लेखा शिर्षकामधून करण्यात येईल.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार गितानगर, नेहर-अंबर टाकी समोर मनपा शाळेकरिता दोन खोल्या व शौचालय बांधण्याच्या कामासाठी ९५-९६ च्या सा.बां. खात्याच्या जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.५,९७,२१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३/११ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.संजयनगर (मुकूंदवाडी) उत्तरभाग येथे डांबरीरस्ते तयार करणे (पार्ट "अ") ह्या कामाकरिता रक्कम रु.१६,१०,८५०/- चे अंदाजपत्रक सा.बां. विभाग औरंगाबाद यांची दरसूची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आले असून मा.आयुक्त यांनी दि.१०.६.९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरिता महानगरपालिकेचे सन ९६-९७ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारण कार्यक्रमाअंतर्गत "डांबरी रस्ते" या शिर्षकाअंतर्गत ७०.०० तरतूद केलेली आहे.

प्रशासकीय मान्यतेस सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार संजय नगर मुकूंदवाडी शहर भागात डांबरी रस्ते तयार करणे (पार्ट "अ") च्या कामाकरिता सा.बां.खात्याच ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१६,१०,८५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. १४/१२ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केले की, सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालयामध्ये मत्सालयाची इमारत बांधणेच्या कामासाठी रक्कम रु. १९,०२,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते, परंतु मा.प्रशासक यांनी प्रस्तावात फक्त रु.१६,००,०००/- ला मंजुरी दिली होती. त्याप्रमाणे प्रशासकीय ठराव क्र.१४४ दि.१.३.९५ ला रक्कम रु. १६,००,०००/- अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. तसेच ठराव क्र.१९० दिनांक २३.३.९५ अन्वये काम करणारी एजन्सीच्या दरास मान्यता प्राप्त झालेली आहे. परंतु सदर कामामध्ये बऱ्याच अतिरिक्त बाबींची वाढ झाली असून स्थळावर मा.आयुक्तांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाप्रमाणे व वास्तुतज्ञांच्या सूचनेप्रमाणे कामात बदल झाले व त्यामुळे अंदाज पत्रकात रक्कम रु. ७,३६,०००/- ची वाढ झालेली आहे. ज्यामध्ये लाकडी खिडक्या ऐवजी लोंखडी खिडक्या, ग्रॅनाईट ऐवजी तंथुर फ्लोरिंग, रोलिंग, इमारतीच्या दर्शनी भागात ढोलपुरी दगड व ॲल्युमिनीयम खिडक्या टाकी खालील भागात मार्बल स्टोन इ. समावेश आहे.

तरी काही बाबीमध्ये काम करताना वाढ झालेली दिसत आहे.

सबब सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु.२३,३६,०००/- चे तसेच सदर वाढीव काम मूळ गुतेदार, श्री.एस.पी.सोधी यांचेकडून सन ९५-९६ चे दरसूचीनुसार करुन घेण्यात आले असून प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीस्तव व विचारार्थ सादर. सदरच्या खर्च प्राणी संग्रहालय विकसीत करण या लेखा शिर्षकामधून सन ९६-९७ मध्ये करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालय इमारत बांधण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रु.२३,३६,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच वाढीव काम मुळ गुत्तेदार श्री.एस.पी.सोधी यांचे कडून ९५-९६ च्या दरसूचीनुसार करुन घेण्यात आल्याने सदर कार्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५/१३ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.एकनाथ नगर येथील मनपा प्राथमिक शाळेच्या इमारतीवर पहिला मजला बांधणेच्या कामासाठी सा.बां.खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रु.९,८७,७१५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास दि.१७.६.९६ अन्वये मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. सबब कामाचे रक्कम रु.९,८७,७१५/- चे अंदाजपत्रक मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षकाखाली सन ९६-९७ या आर्थिक वर्षात करण्यात येईल.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार एकनाथनगर मनपा शाळेच्या इमारतीवर पहिला मजला बांधण्याच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९५-९६ जिल्हा दरसूचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.९,८७,७१५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६/१४ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, मो.कैसर कॉलनी भागात २० खाटांचे आरोग्य केंद्र बांधनेच्या कामासाठी मा.सर्वसाधारण सभा दि.२०.१२.९५ ची तहकूब सभा दि.२७.१२.९५ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदर प्रकल्पासाठी रक्कम रु.२५,००,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस लक्ष) चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सर्वसाधारण सभेमध्ये मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत मा.आयुक्तांनी दि.३.६.९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामाचे रक्कम रु.२५,००,०००/- चे अंदाजपत्रक विचारार्थ सादर.

सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने चा लेखा शिर्षामधून सन ९६-९७ मध्ये करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार कैसर कॉलनी भागात २० खाटांचे आरोग्य केंद्र बांधण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास व तसेच हा खर्च ९६-९७ च्या विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखाशिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्रं.१७/१५**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.कबाडीपुरा येथे हजरत शहाजमाल बाबा दर्ग्याच्या समोर नाल्यावर मनपा व्यापारी संकुल बांधणेच्या कामासाठी रक्कम रु.५५,००,०००/- रुपयांचे ढोबल अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून ज्यामध्ये दोन ठिकाणी शॉपिंग कॉम्लेक्स तसेच शॉपिंग कॉम्पलेक्स करीता पार्कींग

भाग ''अ'' - १) शॉपिंग कॉम्पलेक्स व पार्कींग बांधकाम – २३,०८,३५०.००

भाग ''ब'' – २) शॉपिंग कॉम्पलेक्स व पार्कींग बांधकाम – २९,४७,२५०.००

याप्रमाणे ''अ'' एकूण रक्कम रु.२३,०८,३५०.०० + २९,४७,२५०.०० = ५५,००,०००/- याप्रमाणे तयार करण्यात आलेले आहे. सदरील प्रस्ताव हा धोरणात्मक असल्यने मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवा असे दि.१५.३.९६ ला मा.आयुक्त यांनी आदेशित केले आहे. सदर बांधकामाचे दर हे चालू दरसूची नुसार घेण्यात आले असून प्रस्तावित दुकानाच्या भाडेपट्ट्यांच्या निविदा मागवून ठराविक अनामत घेवून वाटप करण्यात येतील. जेणे करुन मनपाच्या आर्थिक बाजूवर बोजा न पडता उलट उत्पनामध्ये वाढ होणार आहे व शहराच्या विकासामध्येही भर पडेल. सदर दोन ठिकणी शॉपिंग कॉम्पलेक्स व पार्कींग बांधणेच्या कामासाठी रक्कम रु.५५,००,०००/- च्या अंदाजपत्रक मंजूरीचा धोरणात्मक प्रस्ताव मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

सदरचा खर्च सन ९६-९७ या आर्थिक वर्षात व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षामधून व नियोजित दुकानाच्या येणाऱ्या अनामत रक्कमेतून करण्यात येईल.

**ठराव :** प्रतावात दर्शविल्यानुसार कबाडीपूरा येथे हजरत शहा जमाल बाबा दर्ग्यासमोर नाल्यावर व्यापारी संकुल व पार्कींगसाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.५५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रस्तावात दर्शविलेल्या अटी व शर्तीनुसार सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.संजयनगर (मुकूंदवाडी उत्तर भाग) वॉर्ड क्रं. ८० येथे ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. अर्धगोलाकार गटार बांधणे (पार्ट ''अ'') कामासाठी रक्कम रु.२१,८१,८७०/- चे अंदाजपत्रक सा.बां. खाते याची दरसूची ९५-९६ अनुसार तयार करण्यात आले असून मा.आयुक्त यांनी दिनांक २०.६.९६ रोजी प्रशासकीय मान्यतास दिली आहे.

तसेच सदरील काम झोपडपट्टी भागात नागरी सुविधा पुरविण्याकरीता आलेले रु.७.०० कोटीच्या तरतुदीपैकी ५१ घोषित झोपडपट्टी पैकी १९ झोपडपट्ट्या यु.बी.एस.पी. कार्यक्रमाअंतर्गत करण्यात येईल.

प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार संजयनगर (मुकूंदवाडी) (उत्तरभाग) वॉर्ड क्रं. ८० येथे ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. अर्धगोलाकार गटार बांधणे पार्ट (''अ'') या कामासाठी सा.बां. खात्याच्या ९५-९६ च्या दरसूची नुसार तयार करण्यात आलेल्या रु.२५,८१,८७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय १९/१७ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मजनू हिल येथील उद्यानामध्ये स्वामी विवेकानंद यांचा पुतळा बसवावा. सदर पुतळा औरंगाबाद महानगरपालिकेस श्रीमती नर्मदाबाई जगन्नाथ बनकर यांनी पुर्णाकृती ७ फूट उंचीच्या पुतळा अर्पण केला आहे. स्वामीजींचा पुतळा बसवाव म्हणून मा.महापौर, सभापती व संबंधित

विभागाचे स.नगरसेवक सतत पाठपुरावा करीत आहेत. पुतळा बसविण्याकरिता बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

परंतु शहरात नविन पुतळा बसविण्याकरिता मा.पोलिस आयुक्त व महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मंजूरी असणे आवश्यक आहे करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. नरेंद्र पाटील : पुतळ्याच्या संदर्भाने यापूर्वी समिती स्थापन झालेली आहे. परंतु तिच्या कामकाजाबाबत सभागृहात काहीही माहिती नाही. इतर ठरावा प्रमाणेच हाही ठराव पुतळासमितीकडे पाठविण्यात यावा. समिती स्थापन झालेली असतानाही अशाप्रकारचे ठराव सभागृहापुढे ठेवणे म्हणजे सभागृहाची दिशाभूल करणे आहे.

श्री. सुदाम सोनवणे : हा पुतळा महानगरपालिकेस डोनेट करण्यात आलेला आहे. केवळ स्टेज बनवून त्यावर हा पुतळा बसवायचा आहे. संबंधित नगरसेवकांची संमती द्यावयास पाहिजे होती.

श्री. काशिनाथ कोकाटे : श्रीमती बनकर यांचीही शेवटची इच्छा होती. संबंधीत नगरसेवकास विचारावयास पाहिजे होते. तेव्हा विषयांतर न करता अथवा विषययाचे भांडवल न करता पुतळा प्रस्तावित ठिकाणी बसविण्याची मंजूरी देण्यात यावी.

डॉ. भागवत कऱ्हाड : ९५-९६ मध्ये बनविण्यात आलेली कमेटी अस्तित्वात नाही. यात राजकारण न आणता संबंधित वॉर्डाच्या नगरसेवकास विश्वासात घेवून लवकरात लवकर पुतळा बसविण्यात यावा.

श्री. मुजीब आलम शहा खान : पुतळा अशा ठिकाणी बसवावा की त्याचे योग्य प्रकारे संरक्षण ही करता आले पाहिजे.

श्री. राजू इंगळे : हा पुतळा बनकर माऊलींच्या अंतिम इच्छेनुसार मजनु-हिल उद्यानातच बसवण्यात यावा. यात राजकारण करु नये.

सौ. रजनी जोशी : श्रीमती बनकर या आज आपल्यात नाहित. त्याच्या अैंतम इच्छेचा मान ठेवून व त्यांनी केलेल्या कार्य पाहून स्वामीजींचा पतळा मजनू हिल उद्यानात बसविण्यात यावा.

मा.महापौर : सभागृहातील सभासदांच्या भावना लक्षात घेता प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार मजनु-हिल उद्यानात श्रीमती नर्मदाबाई बनकर यांनी महानगरपालिककेस अर्पण केलेला स्वामी विवेकानंदाचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०/१८ :** कार्यकारी अभियंता (पापू व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.रोहिला गल्ली येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता रक्कम रु.१०,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे दि.३१.८.९५ रोजी झालेल्या जोरदार पावसामुळे नाल्यास पूर येवून लगतच्या घराचे नुकसान झाले होते.

सदरील कामाचे सुधारीत अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकीच्या सन ९४-९५ च्या दरसूची आधारे मंजूर ठरावान्वये रक्कम रु.१०,००,०००/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.२०.६.९६ ला मंजूरी दिली आहे.

तरी अ.प. रक्कम रु.१०,००,०००/- या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :** कार्यकारी अभियंता (पापू व ज.नि.) यांनी प्रस्तावात दर्शविल्यानुसार रोहिल गल्ली येथे नाल्यास संरक्षित भिंत बांधण्यासाठी परिसर अभियांत्रिकीच्या सन ९४-९५ च्या दरसूची अन्वये तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१०,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१/१९**

सन १९८३ मध्ये तयार करण्यात आलेल्या धरणासंबंधी खरेदीच्या उपविधित थोडा फार बदल करुन दि.१८.१०.९५ रोजी झालेल्या स्थायी समितीतील इतिवृत्तांचा प.क्र.३ मध्ये मा.सभापसतींनी दिलेल्या आदेशानुसार कर्मचाऱ्यांना घर खरेदी/बांधणीबाबतचे उपविधी तयार केले आहेत. त्या उपविधीच्या नियमानुसार अत्यंत उल्प प्रमाणात कर्ज पुरवठा होतो. अल्प पुरवठा झाल्यामुळे या रक्कमेतून कर्मचारी स्वतःचे घर उभारु शकत नाही. तेव्हा याबाबतचा वाढीव रक्कमेचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर पाठवावा.

त्यानुसार मा.आयुक्तांनी जुना उपविधीत थोडाफार बदल करुन पुढीलप्रमाणे नविन उपविधीस मान्यता दिली आहे.

०१. महाराष्ट्र शासननिर्णय क्र.घबां/अ-१०९२/प्र.क्र.७६/२२ विनीमय दि.३.१.९२ नुसार नविन बांधवयाच्या किंवा विकत घ्यावयाच्या तयार घराची किंमत (जमीनची किंमत वगळून) शासकीय कर्मचाऱ्याचे मूळ मासिक वेतनाच्या १५० पट परंतु किमान रु.२.५० लाख आणि कमाल रु. ६.०० लाख या विहित मर्यादा असावी असे नमुद केले आहे.

०२. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.घबां/अ१०९४/प्र.क्र.८९/९४ विनीमय दि.२७.४.९४ नुसार वरीलप्रमाण (क्र.१) शासन निर्णयातील परिच्छेद मध्ये १५०५२ परंतु किमान रु.२.५० लाख असावी असे नमुद केले असले तरी घर बांधणी अग्रीम मंजुरीसाठी सक्षम प्राधिकारी ही किमान मर्यादा प्रकरणाचे गुणवत्तेच्या आधारे शिथिल करु शकतील म्हणजेच शसकीय कर्मचारी रु. २.५० लाखापेक्षा कमी किंमतीचे घर घेण्यास पात्र ठरविता येईल. मात्र सदर परिच्छेदातील कमाल रु.६.०० लाख ही विहित कमाल मर्यादाशिथिल करण्याचे अधिकारी सहाय्य अधिकाऱ्यांना नाहीत असे आदेश दिलेले आहेत.

०३. तसेच शासन निर्णय घ.बां./१०९५/प्र.क्र.५४/९५ विनीमय दि.१०.७.९५ नुसार जुने घर विकत घेण्यासाठी अग्रीम नियमात अनुज्ञेय अग्रीमाची मर्यादा दर्शविण्यात आलेली आहे. ''मुल्यांकन करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तिनी (ॲथोराईज्ड-व्हॅल्युअर्स) दिलेल्या प्रमाणामध्ये नमुद केलेली जुन्या घराची किंमत किंवा संबंधित राज्य शासकीय कर्मचाऱ्याला नविन घर बांधण्यासाठी किंवा नविन तयार घर खरेदी करण्यासाठी विद्यमान नियमानुसार जेवढा घर बांधणी अग्रीम अनुज्ञेय असेल त्या रक्कमेएवढा म्हणजेच मुळ वेतनाच्या ५० पट एवढी रक्कम या दोन्ही रक्कमापैकी जी रक्कम कमी असेल एवढा घर बांधणी अग्रीम उपरोल्लोखित प्रयोजनासाठी अनुज्ञेय राहिल असे आदेश आहेत.

वरील दर्शविलेल्या शासन निर्णयाच्या आधारे व महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीना व तरतुदीचा विचार करुन सन १९८३ मध्ये तयार करण्यात आलेल्या घर बांधणी / खरेदीच्या उपविहित थोडा फार बदल करुन नविन उपविधी

या मसुदा तयार करण्यात आलेला आहे. मागील उपविधीतील सर्व नियम व अटी तशाच ठेवून फक्त अग्रीम रकमेची मर्यादा या नियमात पुढीलप्रमाणे बदल करण्यात आलेला आहे.

४.अ) रेखांकन विभागात नविन बांधणी करिता कर्मचाऱ्यांना मुळ वेतनाच्या १५० पट किंवा किमान २.५० लाख व कमाल रु. ६.०० लाख पैकी जी रक्कम कमी असेल ती मर्यादा दाखविण्यात येईल.

ब) नविन घर, बंगला फ्लॅट खरेदी करीता मुळ वेतनाच्या ५० पट किंवा किमान २.५० लाख व कमाल ६.०० लाखपैकी जी रक्कम कमी असेल ती मर्यादा फक्त रेखांकन (ले आउट) विभागातील घर, बंगला, फ्लॅट इ.खरेदी करीताच राहील.

क) कर्मचारी सध्याच्या घरात राहतो व ते घर स्वतःच्या नावावर असेल तर फक्त त्या राहत्या घराच्या वाढीव कामाकरिता मुळ पगाराच्या २० पट किंवा कमाल रु. ५०,०००/- पैकी जी रक्कम कमी असेल ती मर्यादा ठरविण्यात येईल.

ड) कर्मचारी सध्या ज्या घरात राहतो व ते घर स्वतःच्या नावावर असेल तर फक्त त्या घराच्या फक्त दुरुस्तीच्या कामाकरिता मुळ वेतनाच्या १० पट जास्तीत जास्त रु. २५.०००/- पैकी जी रक्कम कमी असेल ती मर्यादा ठरविण्यात येईल.

जुन्या उपविधीत फक्त वरीलप्रमाणे बदल करुन बाकीचे सर्व नियम, शर्ती व अटी तशाच ठेवण्यात आलेल्या आहेत.

**संवाद**

लेखाधिकारी : महानगरपालिका कर्मचाऱ्यांना घर बांधणीसाठी रु.७५,०००/- पर्यंतची कर्ज मर्यादा होती. महाराष्ट्र शासनाची कर्ज मर्यादा जी असेल त्याच धर्तीवर महानगरपालिका कर्मचाऱ्यांनाही घरबांधणीसाठी कर्ज देण्यात यावे अशा आशयाची निवेदने प्रशासनाकडे आल्याने शासनाच्या दि.३.१०.९२ नुसार शासकीय कर्मचाऱ्यांना मुळवेतनाच्या १५० पट परंतु किमान २.५० लाख ही मर्यादा विहीत केलेले आहे. त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

अ.रशिद खान (मामू) :शासन निणर्यानुसार ५० टक्के कर्ज द्यावयास हवे १५० पट ही मर्यादा आहे. हा शासन निर्णय आपणास लागू नाही.

श्री. मुश्ताक अहेमद : तूर्त हा ठराव स्थगित ठेवण्यास यावा. सर्वांना जी.आरच्या कॉपीज द्याव्यात.

लेखाधिकारी : जुने घर व नविन घर बांधणे यासाठी शासनाच्या वेगवेगळ्या मर्यादा आहेत.

मा.महापौर : पूर्ण माहितीसह पुढील बैठकीस ठराव परत ठेवावा. तोपर्यंत ठराव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव**

ठराव सर्वानुमते स्थगित ठेवण्यात येतो. पुढील सर्वसाधारण सभेत संपर्ण माहितीसह प्रस्ताव ठेवावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रं.२२/२०**

जुने वाहन खरेदी करण्या करीतांचे नियम

(फक्त विभाग प्रमुख व शाखा प्रमुखाकरिता)

कर्ज मंजुरीच्या शर्ती व अटी

१. चार चाकी वाहन खरेदी देण्यात येणाऱ्या कर्जातून खरेदी केलेले वाहन कार्यालयीन कामासाठीच वापरण्यात यावे.

२. खरेदी केलेले वाहन महानगरपालिकेच्या नावे गहाण ठेवावे लागेल व सदरचे वाहन दुसऱ्या संस्थेस गहाण किंवा विक्रीकरता येणार नाही.

कर्जमर्यादा

मुळ वेतनाच्या ५० पट किंव जास्तीत जास्त १ लाख किंवा वाहनाच्या किंमती एवढी रक्कम यापैकी जी सर्वात कमी राहील ती कर्ज मर्यादा ग्राह्य धरली जाईल.

तारण

खरेदी केलेले वाहन महानगरपालिकेस तारण करुन देणे बंधनकारक राहील व तशा प्रकारची नोंद रितसरपणे वाहन पुस्तीकेवर करावी लागेल व कर्जाची पूर्ण परतफेड झाल्याशिवाय वाहन दुसऱ्या संस्थेस किंवा व्यक्तिस विक्री किंवा गहाण ठेवता येणार नाही.

१ कर्जाची रक्कम मासिक पगारातून न कपात करण्यात येईल. कर्जाची मूळ रक्कम ७२ मासिक समान हप्त्यात किंवा सेवा कालावधी संपेपावेतो येणारे हप्ते व द्यावयाची रक्कम नंतरच्या २४ समान हप्त्यात वसुल केली जाईल.

२ व्याजाचा दर महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जाहिर केलेल्या आदेशाप्रमाणे आकारण्यात येईल.

३. कर्जधारक कर्ज परतफेड मूदतीच्या आत सेर्वानिवृत्त झाल्यास कर्जाची पुर्ण रक्कम व्याजासह संबंधिताच्या सेवानिवृत्ती उपदान किंवा भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमेतून एक रकमी वसुल केली जाईल.

४. विहत कालावधीत कर्जाची पूर्ण रक्कम परतफेड करु न शकल्यास अशा परिस्थितीत संबंधिताकडून दंडनिय व्याज शासन निर्णयानुसार वसुल केले जाईल.

५.कर्जधारक सेवेत असताना मयत झाल्यास त्यांच्या कडून येणारी वसुली बाबत व्याजामध्यच सवलत देण्याबाबत फक्त आयुक्त/प्रशासक हेच निर्णय घेऊ शकतील.

६. घेतलेल्या कर्जाची परतफेडीची रक्कम आयुक्त/प्रशासक यांच्या पूर्व परवानगी शिवाय स्थगित किंवा थांबविता येणार नाही.

चार चाकी वाहन (कार, जीप,इ.) कर्ज

(फक्त विभाग प्रमुख व शाखा प्रमुखांकरिता)

१. कर्ज मागणीकरणारा अधिकारी महानगरपालकेच्या स्थायी अस्थापनेवर असला पाहिजे.

२. अस्थायी अस्थापनेवर अधिकाऱ्याच्या बाबतीत स्थायी सेवाकाल सलग ५ वर्षे व त्यापेक्षा जास्त असावयास पाहिजे व त्याची सेवा समाधानकारक असल्याची आयुक्त/प्रशासक यांची खात्री झाली पाहिजे.

३. पती/पत्नी महानगरपालिका सेवेत असतील व ते कर्ज घेण्यास पात्र असतील अशा परिस्थितीत दोघांपैकी एका अधिकाऱ्यास चार चाकी वाहन कर्ज मागणी करता येईल.

कर्ज मंजुरीच्या शर्ती व अटी

१. चार चाकी वाहन खरेदी देण्यात येणाऱ्या कर्जातून खरेदी केलेले वाहन कार्यालयीन कामासाठीच वापरण्यात यावे.
२. खरेदी केलेले वाहन महानगरपालिकेच्या नावे गहाण ठेवावे लागेल व सदस्य वाहन दुसऱ्या संस्थेस गहाण किंवा विक्री करता येणार नाही.

कर्ज मर्यादा

१. मुळ वेतनाच्या १० पट किंवा जास्तीत जास्त २ लाख किंवा वाहनाच्या किंमती एवढी रक्कम या पैकी जी सर्वात कमी राहील ती कर्जमर्यादा ग्राह्य धरली जाईल

तारण

खरेदी केलेले वाहन महानगरपालिकेस तारण करून देणे बंधनकारक राहिल व तशा प्रकारची नोंद रितसरपणे वाहन पुस्तीकेवद करावी लागेल व कर्जाची पूर्ण पततफेड झाल्याशिवाय वाहन दुसऱ्या संस्थेस किंवा व्यक्तीस विक्री किंवा गहाण ठेवता येणार नाही.

२. कर्जाच रक्कम मासिक पगारातून कपात करण्यात येईल. कर्जाची मूळ रक्कम १४४ समान मासिक हप्त्यात व व्याजाची रक्कम नंतरच्या ४८ समान हप्त्यात वसुल केली जाईल.
३. व्याजाचा दर महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जाहिर केलेल्या आदेशाप्रमाणे आकारण्यात येईल.
४. कर्जधारक कर्ज परतफेड मुदतीच्या आत सेवानिवृत्त झाल्यास कर्जाची पूर्ण रक्कम व्याजासह संबंधितांच्या सेवानिवृत्ती उपदान किंवा भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमेतून एक रक्कमी वसुल केली जाईल.
५. विहीत कालवधीत कर्जाची पूर्ण रक्कम परतफेड करु न शकल्यास अशा परिस्थितीत संबंधितांकडून दंडनिय व्याज शासन निर्णयानुसार वसुल केले जाईल.
६. कर्जधारक सेवेत असताना मयत झाल्यास त्यांच्या कडून येणारी वसुलीबाबत व्याजामध्ये सवलत देण्याबाबत फक्त आयुक्त/प्रशासक हेच निर्णय घेऊ शकतील.
७. घेतलेल्या कर्जाची परतफेडीची रक्कम आयुक्त/प्रशासक यांच्या पूर्व परवानगी शिवाय स्थगित किंवा थांबविता येणार नाही.

मोपेड, स्कुटर, मोटार सायकल, दुचाकी वाहन खरेदी नियमावली

१. महानगरपालिकेच्या स्थायी कर्मचारी असणे आवश्यक आहे.
२. अस्थायी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांचा सेवाकाळ कमीत कमी पाच वर्षे व त्यापेक्षा जास्त असावयास पाहिजे व त्याची सेवा समाधानकारक असल्याची आयुक्त/प्रशासक यांची खात्री झाली पाहिजे.

नोट :

१. जर पती/पत्नी दोघेही महानगरपलिका सेवेत असतील व ते कर्ज घेण्यास पात्र असतील तर अशा परिस्थितीत दोघांपैकी एकाच कर्मचाऱ्यांस कर्ज मागणी करता येईल.
२. ‘‘वाहन’’ या संज्ञेत कोणतेही मोपेड, स्कुटर, मोटार सायकल दुचाकी यांचा समावेश असेल.

कर्ज मंजूरीच्या शर्ती व अटी

१. वाहन फक्त स्वतःच्या वापरासाठी खरेदी करणे आवश्यक आहे.
२. कार्यालयातर्फे वाहन खरेदीसाठी देण्यात येणाऱ्या कर्जातून घेतलेले फक्त महानगरपालिकेच्या नांवे गहाण ठेवता येईल व ते इतर संस्थेस गहाण किंवा विक्री करता येणार नाही.

कर्जमर्यादा

१. मुळ वेतनाच्या ३० पट किंवा ३५०००/- किंवा वाहनाच्या किंमतीच्या ७५ टक्के यापैकी जी रक्कम सर्वात कमी असेल ती कर्ज मर्यादा फक्त मोटारसायकल या वाहनाकरिता राहील.
२. मुळ पगाराच्या २० पट किंवा २०,०००/- किंवा वाहनाच्या किंमतीच्या ७५ टक्के यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्जमर्यादा फक्त स्कुटर करिता राहील.
३. मुळ पगाराच्या १० पट किंवा १०,०००/- किंवा वाहनाच्या किंमतीच्या ७५ टक्के यापैकी जी रक्कम सर्वात कमी असेल ती कर्ज मर्यादा फक्त मोपेड वाहनाकरिता राहील.

वरीलप्रमाणे सर्व वाहन कर्जाच्या मागणी अर्जासोबत संबंधित वाहनाचे शहरातील अधिकृत विक्रेतेकडे २५ टक्के रक्कम भरल्याची पावती सादर करणे बंधनकारक राहील.

तारण

३ वरीलप्रमाणे वाहनास मंजूर झालेल्या कर्जातून खरेदी केलेले वाहन महानगरपालिकेस तारण करुन देणे बंधनकारक राहील. व तशी रितसर नोंद वाहनाच्या नोंदणी पुस्तिकेवर घेण्यात येईल. एकदा महानगरपालिकेस तारण केलेले वाहन कार्यालयाच्या पूर्वपरवानगी शिवाय किंवा कर्जाची पूर्ण परत फेड झाल्याशिंवाय दुसरीकडे तारण, गहाण व विक्री करता येणार नाही.

कर्ज परतफेड

१. वरीलप्रमाणे वाहन खरेदीसाठी देण्यात आलेल्या कर्जाची परतफेड मासिक पगारातून करण्यात येईल. कर्जाची समान ५५ हप्त्यात वसुल केली जाईल.
२. कर्जाच्या व्याजाची रक्कम समान १२ हप्त्यात वसुल केली जाईल.
३. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार व्याजाचा दर आकारला जाईल.
४. कर्जधारक कर्जफेड परत फेड मुदतीच्या आत सेवानिवृत्त झाल्यास कर्जाची रक्कम व्याजासहित त्याच्या सेवानिवृत्ती उपदान किंव भविष्यनिर्वाह निधीतून एक रकमी वसुल केली जाईल.
५. कर्मचारी विहित कालावधीतच्या आत कर्जाची रक्कम परतफेड करु न शकल्यास संबंधीताकडून दंडनिय व्याज महाराष्ट्र शासनाच्या नियमाप्रमाणे आकरण्यात येईल.
६. घेतलेल्या कर्जाची परतफेडीची रक्कम आयुक्त / प्रशासन यांच्या पूर्वपरवानगीशिवाय स्थानिक किंवा थांबविता येणार नाही.

**संवाद**

लेखाधिकारी : महानगरपालिकेतील बऱ्याचशा अधिकाऱ्यांना साईटवरती जावे लागते. तथापि त्यातील सर्वांनाच महानगरपालिकेने वाहने पुरविली नाहीत. या अनुषंगाने महानगरपालिका अधिकाऱ्यांना अंदाजपत्रिकीय सभेच्यावेळी माजी सभापतींना कर्जाबाबत विनंती केली होती. त्या अनुषंगाने अंदाजपत्रकात २० लाखाची तरतुद ही केलेली आहे. अशाप्रकारचे कर्ज अधिकाऱ्यांना दिले तर अशा गाड्यावरती महानगरपालिकेस इंधन खर्च करण्याची गरज पडणार नाही. या साठी अधिकाऱ्यांना कनव्हेनियस अलाऊन्स देण्यात यावा. याची मर्यादा २५०० ते ३००० असावी असेही त्यावेळी चर्चिले होते.

श्री. मनमोहन सिंग ओबेराय : कर्ज दिल्यानंतर अधिकाऱ्यांनी तीच गाडी वापरावी इतरांच्या गाडीतून फिरु नये.

श्री. अ.रशिद खान (मामू) : जुन्या ऐवजी नविन गाड्याच देण्यात याव्यात व्याजाचा दर १४ टक्के ऐवजी ६ टक्के ठेवावा.

लेखाधिकारी : नविन व जुनी दोन्ही प्रकारच्या गाड्यांसाठी कर्ज प्रस्तावित केले आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : व्याज दराबाबत फेर विचार व्हावा. कर्ज नविन गाडीसाठी देण्यात यावी.

श्री. नरेंद्र पाटील : कोणतीही संस्था जुन्या गाड्या खरेदीसाठी आर्थिक सहकार्य करत नाही. चार चाकी ऐवजी दुचाकी वाहन खरेदीसाठी कर्ज देण्यात यावे. बऱ्याचशा नगरसेवकांकडे ही कार्यालयास येण्यासाठी गाड्या नाहीत त्यांनाही कर्ज देण्याचा विचार व्हावा.

श्री. प्रफुल्ल मालानी : नगरसेवकांनाही गाड्या खरेदीसाठी कर्ज द्यावी.

सौ. लता दलाल : ज्या नगरसेविकांना दुचाकी वाहनाची आवश्यकता आहे त्यांना कर्ज देण्यात यावे. पती –पत्नी दोघेही नौकरीस असतील तर दोघांनीही कर्ज देण्यात यावे.

श्री. गंगाधार गाडे : नगरसेवकांना कर्ज देण्याचे समर्थन करता येणार नाही यासाठी मा.महापौरांनी एखाद्या बॅंकेकडे आपला शब्द टाकावा व कर्ज मिळवून द्यावे.

श्री. नरेंद्र पाटील : ३०४० लोकांना कर्ज देणे महानगरपालिकेस अशक्य नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : हे बरोबर नाही. हा पैसा महानगरपालिकेंचा आहे. तो अशा प्रकारे वापरता येणार नाही.

डॉ.भागवत कराड : ज्यांना सेवानिवृत्त होण्यास ४-५ वर्ष आहेत त्यांनाही गाड्या देणार का?

श्री. मनमोहनसिंग ओबेराय : ज्या नगरसेविका गाडी खरेदी करु इच्छितात त्यांना एक वर्षाचे मानधन एक रकमी देण्यात यावे.

मा.महापौर : ज्या नगरसेविका गाडी खरेदी करु इच्छितात त्यांनी मागणी केल्यास त्यांना एक वर्षाचे मानधन एक रकमी देण्यात येईल.

श्री. मुश्ताक अहेमद : ज्यांना नेहमी क्षेत्रिय कामे पाहावी लागतात त्यांना प्राधान्याने कर्ज देण्यात यावे.

मा.महापौर : ८ टक्के व्याजदर आकारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते व कनव्हेनियन्स अलाऊन्स रु. ३०००/- देण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार महापालिका विभाग व शाखा प्रमुखांना केवळ नविन चार चाकी व तसेच कर्मचारी यांना दुचाकी वाहन खरेदी करण्यासाठी व त्या अनुषंगाने प्रस्तावात दर्शविल्यास आलेल्या अटी व शर्तीना सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. कर्ज मंजूर करताना क्षेत्रिय कामे करणाऱ्या अधिकाऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे. याच बरोबर व्याज दर ८ टक्के आकारण्यात यावा. याचबरोबर क्षेत्रिय कामे करणाऱ्या आधिकाऱ्यांनी कर्जाऊ रक्कमेतून गाडी घेतल्यानंतर त्यांना रु.३०००/- कनव्हेनस अलाउन्स देण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३/२१ :**

औरंगाबाद शहरातील वाहने उद्योग धंदे, शहराचे शैक्षणिक व पर्यटन विषयक महत्व, विभागीय मुख्यालय व मध्यवर्ती स्थान इ.मुळे शहरात बाहेरुन येणाऱ्या बाहेरगांवी

जाणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत झालेल्या वाढीच्या तुलनेत राज्य परिवहन मंडळाच्या बसेसमध्ये/सुविधामध्ये वाढ झालेली नाही. तसेच दरम्यानच्या काळात खाजगी बस वाहतुकीबाबत शासनाचे धोरण दिलेली परवानगी इ.मुळे शहरात प्रवाशांचे मागणीनुसार खाजगी बस वाहतुकदारांच्या पर्यायाने खाजगी बसेसच्या संख्येत बरीच वाढ झाली आहे.

व्यापक संघटनेचा अभाव व खाजगी बस उद्योग धंद्यातील उद्योजकांचा वैयक्तिक सहभाग व स्वतंत्र बस स्थानक नसल्याने त्या उद्योगात नियोजन नसल्याचे दिसून येते. परिणामतः विशेषकरुन बसेसच्या पार्कींगमध्ये सुसूत्रता नसल्यामुळे रिकाम्या वेळात बसेस विशिष्ट जागी उभ्या न राहात शहरातील रस्त्यावर/मुख्य रस्त्यावर (उदा.अदालत रोड ते समर्थनगर, हॉटेल डार्लिंगच्या मागील बाजुस बस स्थानकासमोर इ.) उभ्या राहतात त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होतो. रिकाम्या वेळात गाड्या उभ्या केल्यानंतर बसची साफसफाई, बसेस धुणे, बसचे संबंधित कर्मचारी चालक, साफसफाई करणारे (क्लिनर) इ.मुळे लगतच्या रहिवाशांना त्रास होतो व त्यांच्या तक्रारी महानगरपालिकेकडे/पोलिस विभागाकडे प्राप्त होतात. शिवाय रस्ताही खराब होतो. जनतेस होणारा त्रास, गैरसोय, रस्ता दुरुस्तीचा खर्च टाळण्यासाठी व रिकाम्या वेळेत रस्त्यावर उभ्या राहणाऱ्या बसेसमुळे इतर वाहनांच्या रहदारीस होणारा अडथळा टाळण्यासाठी रस्त्यावर उभ्या राहणाऱ्या बसेसवर नियंत्रण असावे. याकरिता तसेच भविष्यातील खाजगी बसेसमध्ये होणारी वाढ विचारात घेऊन संबंधीत सर्व खाजगी वाहतुकधारकांनी त्यांच्या बसेस उभ्या राहण्याकरिता बसेसची साफसफाई करण्याकरिता (पार्कींगकरिता) वेगळी व्यवस्था करण्यास प्रवृत्त व्हावे व त्यांचेसाठी स्वतंत्र बस स्थानक उभारावे. या दृष्टीने अशा खाजगी बसेसकरिता बसेस रस्त्यावर उभ्या राहण्यासाठी संबंधिताकडून प्रत्येक बसमागे प्रतिदिन पार्कींग शुल्कसेवा/सेवा शुल्क आकारावे अशी महानगरपालिकेची धारणा आहे.

या बाबतची कारणे खालीलप्रमाणे आहे.

१. रस्त्याखालील जमिन संपादित करुन महानगरपालिकेकडून रस्ते बांधण्यात येतात, रस्त्याची वेळोवेळी दुरुस्ती, डांबरीकरण करावे लागते. त्यासाठी महानगरपाकिचा बराच खर्च होतो. पर्यायाने जनतेचा पैसा खर्च होतो.

२. रस्त्याचा मुख्य उद्देश रहदारी असून फक्त काही प्रमाणात शहरातील रहिवाश्यांची खाजगी वाहने वैयक्तिक वापरा करिता असतात त्यांचे पार्कींगकरिता म्हणून वापर करता येतो.

३. खाजगी वाहतुकदारांचा बस वाहतुक, खाजगी बस, व उद्योग असल्याने त्यामागील त्यांचा व्यापारी दृष्टिकोन पाहता महानगरपालिकेने रस्त्याचा बसेस उभी करण्यासाठी वापर करणे, रहदारीस अडथळा निर्माण करणे, लगतच्या रहिवाश्यांना त्रास होईल असे वातावरण निर्माण करणे संयुक्तिक वाटत नाही.

४. उलट खाजगी बस वाहतुकदार हे व्यावसायिक असून व्यापारी तत्वावर बस वाहतूक करीत असल्यामुळे त्यांनी रस्त्यावरील रहदारीस अडथळा होणार नाही. दैनंदिन वापरामध्ये अडचण होणार नाही. दैनंदिन वापरामध्ये अडचण होणार नाही या दृष्टीकोनातून त्यांचे व्यवस्थेकरीता स्वतंत्र पार्कींग व्यवस्था, बस स्थानकाची, तरतूद करावी असे पार्कींग व्यवस्थेस प्रवृत्त होतील व बस स्थानक स्वतंत्र्य पार्कींग व्यवस्था उभारण्याचा ते गांभीर्याने विचार करतील.

येथे असे नमुद करण्यात येते की, पुणे महानगरपालिकेने खाजगी वाहतुकदारांच्या बसेस रस्त्यावर अनधिकृत पार्क केल्यामुळे जप्त केल्या व संबंधितांस प्रत्येक बसमागे रु.३०००/- दंड भरण्याबाबत नोटीस दिल्या व वसुलही करण्यात आला असे करण्यापुर्वी पुणे

महानगरपालिकेने शहरातील रस्त्यावर अनधिकृत पार्कींग केल्यास दंड भरण्याबाबत कळविले होते व तो न भरल्यामुळे वरीलप्रमाणे बस जप्त करण्याची कार्यवाही केली.

बहुतेक बसेस रात्रीच्या फेऱ्या करीत असल्याने त्यांना दिवसा रिकामा वेळ असतोच जवळपास १२ तासापर्यंत अशा बसेसचे रस्त्यावर पार्कींग असते. करीता अशा बसेस करीता संबंधिताकडून रु.७५ प्रितिदिन पार्कींग शुल्क/सेवा शुल्क म्हणून आकारणी करावी असा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येतो.

तसेच जालनारोड, जाफर गेट ते मोंढा नाका रोड टेलिफोन एक्सचेंज ते लक्ष्मण चावडी रोड हॉटेल मिंगलिंग समोरील रोकड हनुमान कॉलनीतील अभिनय सिनेमाकडे जाणारा रस्ता इ.रस्त्यावर मोठ्या प्रमाणात ट्रॅक्सचे पार्कींग केले जते व दिवसभर रस्त्यावर ट्रॅक्स उभ्या राहतात, तसेच मुख्य बस स्थानकालगतच्या परिसरात रस्त्यावर खाजगी टेम्पो, मेटॅडोर, जिप्त इ.करिता अशा रितीने प्रतिदिन पार्कींग शुल्क आकारावे असे मत आहे व तेही रु.७५ प्रतिदिन असावे.

असे शुल्क आकारल्यामुळे रस्त्यावर अभ्या राहणाऱ्या बसेस, ट्रॅक्स इतर वाहनांच संख्येस आळा बसेल व विनाकारण उभ्या राहणाऱ्या वाहनांची संख्या कमी होवून संबंधीत प्रतिदिन शुल्क भरावे लागणार असल्याने त्याची पर्यायी व्यवस्था करण्याबाबत गांभिर्याने विचार करतील. परिणामतः रस्त्यावरील अडथळे दूर होवून वाहतुक सुरळित सुलभ होईल. रस्ते खराब होणार नाहीत. जनतेस होणारा त्रास / गैरसोय दूर होईल.

तसेच वरील पार्कींग शुल्क आकारणी ही फक्त दोन वर्षाकरिताच असून वरील कालावधीत खाजगी बस वाहतुकदार, ट्रक वाहतुकदार वगैरेनी स्वतंत्र जागा संपादीत करुन कोणत्याही परिस्थितीत रस्त्यावर वाहने पार्क होणार नाही. याची खबरदारी घ्यावी. अन्यथा दोन वर्षानंतर वरील वाहने जप्त करण्यात येतील.

या प्रस्तावामुळे जरी महानगरपालिकेला उत्पन मिळणार असेल तरी यांतील मुख्य उद्देश वरील वाहतुकदारांनी नजिकच्या भविष्यामध्ये आपल्या व्यावसासाठी स्वतंत्र जागा संपादीत करुन रहदारीला होणारा अडथळा दूर करणे आहे.

करिता वरील प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. प्रस्ताव मान्य झाल्यानंतर त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची कार्यवाही निश्चित करणेत येईल.

**संवाद :**

डॉ.भावगत कराड : खाजगी वाहन धारक अत्यंत निष्काळजीपणाने वाहने उभी करतात. त्यांना पार्कींग साठी जगा उपलब्ध करुन देण्यात यावी.

श्री. रशिद खान (मामू) : टॅक्स कमी करण्यात यावा.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्यानुसार अटी व शर्तीसह पार्कींग शुल्क रु.७५/- प्रतिदिन ऐवजी रु.४०/- प्रतिदिन या दुरुस्तीसह प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येतो.

**विषय क्र. २४/२२ :**

औरंगाबाद शहरा करीताच्या मंजूर विकास योजना मधील हॉटेल अमरप्रित बीड बायपास रोड ह्या २४.०० मिटर रुंद रस्ता विकासाचे काम सुरु करण्यात आलेले आहे.

या रस्त्यावर शहानुरमियाँदर्गा नजिक रेल्वेच्या लेव्हल क्रॉसिंगचे काम करणे आवश्यक आहे. या करिता रेल्वे विभागाशी पत्रव्यवहार करुन विचारणा करता त्यांनी कळविल्याप्रमाणे रेल्वे क्रॉसिंगच्या कामाकरिता किमानखर्च रु.६.०० लाख येणार असल्याने व तेवढी रक्कम रेल्वे विभागाकडे जमा केल्यानंतर सदर रेल्वे क्रॉसिंग काम रेल्वे विभागाकडून

करण्यात येणार आहे. करिता रक्कम रुपये ६.०० लाख रेल्वे विभागाकडे जमा करण्यासाठी यापूर्वी ठराव क्र.१३८/५ दि.१८.१.९६ सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली आहे.

मात्र दरम्यानच्या काळात रेल्वे विभागाने पत्रे देऊन सुधारित अंदाजपत्रकानुसार रेल्वे क्रॉसिंगकरिता खर्च रु.९.०० लाख येणार असल्याचे कळविले आहे.

सदरील रस्त्याचे पूर्ण होत असलेले काम व ह्या रस्त्यामुळे जालरोडचे दक्षिण भागात जालना रोड ते बीड बायपास रोडला जोडणारा एक मुख्य रस्ता अस्तित्वात येवून सातारा परिसर शहरास सरळ जोडला जाणार असल्यामुळे त्या रेल्वे क्रॉसिंगचे काम करणे आवश्यक आहे. यासाठी सुधाररित अंदाजपत्रसंबंधाने रक्कम रु.९.०० लाख रेल्वे विभागाला जमा करण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार हॉटेल अमरप्रितचे बीड बायपास रोडच्या २४ मीटर रुंद रस्त्यावर शहानूरमियाँ दर्ग्यानजिक रेल्वे लेव्हल क्रॉसिंगच्या कामासाठी रु. ९.०० लाख एवढी रक्कम रेल्वे खात्याकडे भरण्यासाठी सर्वानुमते मंजूरी देण्यात येते

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५/२३ :** जीवनबाई तापडिया चॅरिटेबल ट्रस्ट यांनी मो.नक्षत्रवाडी गट नं.१४४ मध्ये असलेले औरंगाबाद शहराचे वाढीव हद्दी करीताच्या मंजूर वकास योजनेमधील उद्यानाकरीताचे आरक्षणात बदल करुन सार्वजनिक वापरासाठी त्यामध्ये बदल करण्याची विनंती केली आहे. त्या संदर्भाने दि.१८.११.९५ चे सर्वसाधारण सभेत ठराव क्र.८६/७ वे ठराव मंजूर झालेला आहे.

औरंगाबाद शहराचे वाढीव हद्दीकरीता तयार करण्यात आलेल्या विकास योजनेला महाराष्ट्र शासनाने यांचे निर्णय क्र.टीपीएस-३००८-४७४/सीआर-८८/नावि-१२ दि.१५.१०.९१ ने अंतिम मान्यता दिलेली आहे. व त्या मंजूर विकास योजनेनुसार मो.नक्षत्रवाडी येथील गट क्र.११४ पैकी जमीन आरक्षण क्र.५१/डी ने उद्यानाकरीता आरक्षीत केलेली आहे. अर्जदाराने ज्या जागेत त्यांचे ट्रस्ट मार्फत कै.मिनाताई ठाकरे यांचे स्मृती प्रित्यर्थ वृध्दाश्रम बांधण्याचे प्रस्तावित केलेले असून ती जागा सदर आरक्षणाचे मधोमध असून त्यामुळे उर्वरीत आरक्षणाचे दोन स्वतंत्र भाग पडतात. ह्यापैकी जेथे कै.मिनाताई ठाकरे यांचे स्मृतिप्रित्यर्थ वृध्दाश्रम बांधण्याचे प्रस्तावित केलेले आहे. तो भाग सदर योजना अंमलात आणणेकरिता आरक्षणातून वगळणे आवश्यक आहे. दरम्यान योजना अंमलात आणण्याच्या दृष्टीने इतर आवश्यक बाबींची पुर्तता करण्याचे कार्यवाहीअंतर्गत उदा.संस्थेस बांधकाम आराखडा मंजूर करणे, त्यानुसार अंदाजपत्रक तयार करुन निधी उपलब्ध करणे इ. संस्थेस महानगरपालिकेने सशर्त बांधकाम परवानगी दिलली आहे. (संचिका क्रं १६८/१७/९६ परवान क्रं.१२०/९६ दिनांक ३.६.९६) ह्यातील प्रमुख अट अशी आहे की, (१) ह्या किरकोळ फेर बदलाचे प्रस्तावास शासनाची मान्यता मिळेल असे गृहीत धरुन बांधकाम परवानगी दिलेली आहे. जर शासनाने सदरील प्रस्ताव नामंजुर केला तर ट्रस्टने केलेले सर्व बांधकाम स्वखर्चाने पाडून टाकावे. महानगरपालिका त्याबाबत कसलाही मोबदला घेणार नाही. (२) किरकोळ फेरबदलाचा प्रस्ताव मंजूर झाला तरच सदर प्रकल्पाकरिता मिळणारे शासकीय अनुदान द्यावे अन्यथा प्रस्ताव नामंजूर झाल्यास द्येय घेणारे शासकीय अनुदान देण्यात येवू नये असे संबंधित विभागाच्या (समाज कल्याण विभाग) अधिकाऱ्यांना कळविलेले आहे.

"वृध्दाश्रम" ही शासनाची योजना तो प्रकल्प राबविण्यासाठी सेवाभावी संस्थेचा सहभाग त्याकरिता दिलेली बांधकाम परवानगी व शासनाचे धोरण इ.सह सदर

प्रकल्पामागील व्यापक सामाजिक दृष्टीकोन विचारात घेता सदर प्रकल्पाकरिता मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी निवड करुन निश्चित केलेली मो.नक्षत्रवाडी स.न.११४/वै. मधील जागा जी शहराचे वाढीव हद्दीकरिता मंजूर केलेल्या विकास योजनामध्ये उद्यानाकरिता आरक्षीत आहे तेवढी जागा त्या आरक्षणातून वगळून वृध्दाश्रमाच्या वापरासाठी रहिवास विभागात अंतर्भूत करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनामधील गौण फेरबदलाची कार्यवाही करावी लागेल. याबाबत शासनानेही पत्र क्र.टीपीएस/३०९६/४८प्र.१६/नवि ९ दिनांक १८ जून १९९६ नुसार किरकोळ फेरबदलाचा प्रस्ताव तयार करुन शासनास मंजूरीसाठी सादर करण्यास कळविले आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करावयाची पुढील कार्यवाहीअंतर्गत शासनाची अंतिम मंजूरी घेण्याकरिता ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीस अनुसरुन फेरफार करण्यास सदर अधिनियमाच्या उपरोक्त कलमान्वये सुचविल्याप्रमाणे मंजूरी देण्यात यावी आणि प्रस्तावित फेरफारास अंतिम स्वरुप देण्याकरिता जनतेकडून सूचना/हरकती मागविण्याचे आणि अंतिम प्रस्तावास मंजूरी मिळविण्याकरिता राज्य शासनाकडे आवश्यक तो पत्रव्यववहार करण्याचे अधिकारी सुचविल्याप्रमाणे मा.आयुक्तांना देण्यात यावेत.

करिता प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

संवाद :

श्री. नरेंद्र पाटील : हा ठराव चुकीचा आहे. जर ट्रस्टची जागा आरक्षीत जागेच्या मध्यभागी येत असेल तर ट्रस्टला जागा एका बाजूस देण्यात यावी व तेवढीच जागा आरक्षणातून वगळण्यात यावी.

मा.महापौर :वृध्दाश्रमासाठी आवश्यक आहे तेवढी जागा आरक्षणातून वगळण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार जीवनबाई तापडिया चॅरिटेबल ट्रस्ट यांन गट नं. ११४/पै. नक्षत्रवाडी येथे स्व. मिनाताई ठाकरे यांचे स्मृति प्रित्यर्थ वृध्दाश्रम बांधण्यासाठी देण्यात आलेली जागा आरक्षणातून वगळण्याचा प्रस्तावास सर्वानुमतें मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६/२४ :** औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना १९७५ नुसार आरक्षणक क्रमांक ७७ (क्षेत्र १४४९८ चौमी) ''गार्डन'' करिता आरक्षित आहे. नुकत्याच प्रसिध्द झालेल्या प्रारुप विकास योजनेनुसार वरील आरक्षणाचा नंबर ७९ असून त्या खालील क्षेत्र १०.००० चौमी आहे.

मंजूर विकास योजनेतील प्रस्तावानुसार आरक्षण क्रमांक ७७ मधील मोकळी जागा महानगरपालिकेने भुसंपादन अधिनियमानुसार संपादन केली आहे व ती सध्या महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. न.भु.क्र.१३४६० व १३४६१ क्षेत्र १७,९२७ चौमी आहे.

मा.सतिश त्रिपाठी, राजभवन मलबार हिल मुंबई यांचे पत्र क्र.जीराएस-९६/२३८ दि.२३ जानेवारी १९९६ नुसार वाल्मिकी समाजाच्याकरिता निवासासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थेस जागा प्रदान करणे बाबत कळविलेली आहे. नियोजित वाल्मिक मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी एकुण ५४ भुधारकांची यादी दिलेली आहे सदरील आरक्षण

लगत वाल्मिक समाजाची घरे आहेत. त्यामुळे त्यांनी सदरील संपादीत क्षेत्र वरील गृह निर्माण संस्थेस प्रदान करणे बाबत कळविले आहे.

सबब सदरील आरक्षण निवासी भागात समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेसाठी सर्व साधारण सभेत मंजूरी घेणेबाबत तसेच प्रारुप विकास योजनेतील आरक्षण वगळणे साठी नियोजित समिती (प्लनिंग कमेटी) यांचेकडे पाठविणेस्तव प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

संवाद :

श्री. हमीद ताबा : अद्याप जागा महानगरपालिकेने ॲक्वायर केलेली नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : वाल्मिकी समाजाच्या महापालिका कर्मचाऱ्यांसाठी ही जागा मागीतलेली आहे.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र.७७ मधील मोकळी जागा नियोजित वाल्मिक मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या ५४ लाभधारकांना देण्याच्या दृष्टीकोनातून आरक्षित जागा निवासी भागात समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलासाठी नियोजन समितीकडे पाठविण्याची सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७/२५ :** शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८ अन्वये भूतपूर्व औरंगाबाद नगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील (१९७५) ''ना विकास'' क्षेत्र वगळून व शासनाने सिडको अधिसूचीत (नविन औरंगाबाद) क्षेत्रातून वगळलेल्या क्षेत्राकरिता प्रारुप विकास योजना औरंगाबाद (सुधारित) प्रसिध्द झालेल्या विकास योजनेसंबंधी आलेल्या सूचना व हरकती यांचा विचार करणे करिता शासन निर्णय क्रं.टीपीएस-३०९५/९५४ सिआर-६७/९५/युडी-९ दिनांक ८.१.९६ रोजीच्या आदेशान्वये नियोजन समितीची नेमणूक केली आहे.

सदर नियोजन समितीने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८(३) अन्वये नियोजन समितीने विकास योजनेसंबंधी प्राप्त सूचना व हरकती संदर्भाने संबंधीतांस सूनावणी देऊन त्यावर नियोजन समितीने विकास योजनेसंबंधी प्राप्त सूचना व हरकती संदर्भाने संबंधितस सूनावणी देऊन त्यावर नियोजन समितीने विचार करुन आपला अहवाल निर्णय नेमणुकीचे पासून दोन महिन्याचे आत सादर करावयास असतो.

नियोजन समितीने प्रारुप विकास योजनामधील सूचना व हरकती प्राप्त आरक्षणाची तसेच रस्त्यांची स्थळ पाहणी व नागरिकांना सुनावणी देण्याचे काम पूर्ण केलेले आहे. नियोजन समितीस त्यापूर्वी ठराव क्र.१७१/११ दि.१६.४.९६ अन्वये सर्वसाधारण सभेने दि.८.३.९६ पासून सहा महिन्यासाठी मुदतवाढ मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यनुसार शासन क्र.टीपीएस-३०९५/९५४/सिआर-६७/९५/युडी-९ दि.८.१.९६ अन्वये शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २८ अन्वये भुतपूर्व औरंगाबाद नगर पालिकेच्या मंजूर विकास योजनेतील (१९७५) ''ना विकास'' क्षेत्र वगळून व शासनाने सिडको अधिसूचित (नविन औरंगाबाद) क्षेत्रातून वगळलेल्या प्रारुप विकास योजना औरंगाबाद (सुधारित) संबंधी सूचना व हरकती संबंधाने

विचार करण्यासाठी स्थापन केलेल्या नियोजन समितीस ८.६.९६ पासून सहा महिन्यासाठी मुदतवाढ देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८/२६ :**

मंजूर विकास योजना औरंगाबाद (वाढीव हद्द) १९९१ मधील मो.औरंगाबाद येथील सर्व्हे नं.९६ ही जमीन ना विकास क्षेत्रात दर्शविलेली आहे. सदरील सर्व्हे नं.९६ मधील जमीन क्षेत्र ८५ आर ही गिरीदर्शन को-ऑप हौसींग सोसायटी लि.औरंगाबाद या संस्थेच्या मालकीची असून सदरच्या सोसायटीच्या जमिनीला दि.२०.११.६५ चे आदेशानुसार अकृषीक परवानगी मिळाली आहे. तसेच नगर परिषद औरंगाबाद व सहाय्यक संचालक नगर रचना, औरंगाबाद यांनी अनुक्रमे १९६८ व सन १९६६ साली अभिन्यास मंजूरी दिलेली आहे. पुराणवस्तु संशोधन खाते यांनी दि.१२.४.१९६५ च्या पत्रानुसार सदरील संस्थेस निवास वापरासाठी संमती दिलेली आहे.

वरील परिस्थिती संबंधित गृहनिर्माण संस्थेने औरंगाबाद महानगरपालिकेकडे विनंती अर्जाद्वारे मांडल्यामुळे व नियोजनाच्या दृष्टीकोनातून सदरील गृहनिर्माण संस्थेची जागा निवासी भागाता समाविष्ट करणे इष्ट असल्या कारणाने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदलाचा प्रस्ताव करण्यात आला. त्या प्रस्तावास दि.१६.९.९५ च्या सर्व साधारण सभेने ठराव क्रं.१० अन्वये मंजूरी दिल्यानंतर त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही अंतर्गत स्थानिक वर्तमानपत्रात (दि.१.१.९६ चे दैनिक लोकमत व दै.सिटीजन्स) अधिसुचना प्रसिध्द करुन ह्या फेरबदलाचे प्रस्तावासंबंधाचे कोणाचे काही आक्षेप सूचना/हरकती असतील तर त्या महानगरपालिकेकडे सदर सूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात दाखल कराव्यात म्हणून सुचित केले होते. दरम्यान सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे दि.७ मार्च १९९६ च्या राज्यपत्रात प्रसिध्द झाली. अधिसूचना प्रसिध्दी नंतरच्या विहीत कालमर्यादेत या फेरबदलाचे प्रस्ताव संबंधाने कसलाही आक्षेप, हरकती सूचना कोणकडूनही दाखल झाल्या नाहीत. सबब ह्या सदर किरकोळ फेरबदलाचे प्रस्तावास मान्यता दिल्यास सदर प्रस्ताव अंतीम मान्यतेच्या पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे सादर करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री. रशिदखान (मामू) : जागा नक्की कोठे आहे याचा बोध होत नाही. पुढील बैठकीत ठराव ठेवण्यात यावा.

सहा.संचालक (नगररचना) : हा ठराव पूर्वीच मंजूर झालेला होता.

श्री. जावेद रज्जाक : ठराव मंजूर झालेला नाही. स्थळ पाहणी होणार होती. ती झालीच नाही.

मा.महापौर : तूर्त प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो. पुढील बैठकीत संपूर्ण माहितीस्तव प्रस्ताव ठेवावा.

**ठराव :**

प्रस्ताव स्थगित करण्यात येतो. पुढील सर्वसाधारण सभेत संपूर्ण माहितीसह प्रस्ताव ठेवावा असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९/२७ :**

नागरिक संघर्ष समिती राजीव गांधीनगर, प्रभाग क्र.७८ एन-२ यांनी अर्ज देवून त्यांच्या खालील मागण्या पूर्ण करुन कामे सुरु करण्यात यावे व ही कामे न केल्यास त्यांना आरक्षण उपोषनास बसणार असल्याचे त्यांच्या अर्जात नमुद केले आहे.

१. ड्रेनेज पाईप लाईन टाकणे.
२. राजीव गांधीनगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे.
३. पथ दिवे लावणे (स्ट्रिट लाईट)
४. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे.

राजीव गांधीनगर एन-२ सिडको भाग महानगरपालिका हद्दीत आहे. परंतु महानगरपालिका नियोजन व विकास प्राधिकरणाच्या हद्दी बाहेर असून त्या भागांसाठी नियोजन व विकास प्राधिकरण सिडको आहे. ही वसाहत सिडकोच्या जागेवर अनधिकृतपणे वसलेली आहे. या वसाहतीधारकांकडून महानगरपालिकेस विकास खर्च किंवा विकासशुल्क देखील वसुल करता येत नाही. एका वसाहतीसाठी २५ टक्के रक्कम लोकवर्गणी घेवून जलवाहिणी टाकण्याचा निर्णय यापूर्वी सर्वसाधारण सभेने घेतलेला आहे. त्यास योग्य प्रतिसाद मिळत नाही.

अशा प्रकरची योजनचा सर्वत्र अवलंब केला तर महानगरपालिकेवर आर्थिक बोजा पडेल आणि इतर अधिकृत वसाहती व यांच्याकडून १०० टक्के विकास खर्च व विकास शुल्क जमा करुन घेण्यात आलेले आहे अशा वसाहतीत विकासाची कामे करण्यासाठी महानगरपालिकेकडे आर्थिक बळ राहणार नाही. तरी अशी कामे करावयाचीच झाल्यास अशा वसाहतीमधून करण्यात येणारे कामाच्या रक्कमे इतकी १०० टक्के रक्कम जमा होणे आवश्यक वाटते वरील परिस्थितीत अशा अनिधिकृत आणि सिडको नियोजन व विकास प्राधिकरण हद्दीत महानगरपालिकेची कामे करण्याच्या संदर्भात सर्वसाधारण सभेच्या निर्णयास्तव सादर करण्यात येते.

संवाद :

श्री. गिरजाराम हाळनोर : ज्याप्रमाणे इतर काही वसाहतीतून २५ टक्के रक्कम घेवून विकासाची कामे केली जात आहेत त्याचप्रमाण याही वसाहतीतून २५ टक्के रक्कम घेवून विकासाची कामे हाती घेण्यात यावीत. जोयर्पंत पुर्नरक्कम वसुल होत नाही तो कामे सुरु करु नये.

सौ. नंदा काळुसे : २५ टक्के रक्कम भरुन घेवून विकासाची कामे हाती घेण्यात यावीत तोपर्यंत कामास सुरुवात करु नये जे लोक उपोषनास बसले होते त्यांनीच २५ टक्के रक्कम वसुल करावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेराय : ज्या भागातील लोक २५ टक्के रक्कम भरतील त्याच भागातील कामे सुरु करण्यात यावीत.

मा.प्र.आयुक्त : राजीव नगरला सोयी सवलती देण्याचा प्रश्न आहे. हा भाग सिडको नोटीफाईड एरियात येतो. पूर्वीही एका वसाहतीत नागरी सुविधा पुरवण्या संदर्भाने २५ टक्के विकास रक्कम त्या भागांतील नागरिंकाकडून घ्यावी असे ठरले होते. तथापि यावयाच्या तीन कोटी रुपयापैकी तीन लाख रुपये ही जमा झालेले नाहीत पैसा जमा करण्याची कोणी तरी जबाबदारी घ्यावयास हवी.

श्री. काशिनाथ कोकाटे : हा भाग स्लम म्हणून घोषित करावा व त्यानंतर या भागास १०० टक्के सुविधा पुरवाव्यात.

कार्यकारी अभियंता : राजीव नगर ही भाग सिडकोचा नोटीफाईड एरियात वसलेला आहे. अशा ठिकाणी ड्रेनेज रस्त्यासारखी कामे करावयाची तर महानगरपालिकेस कोट्यावधीचा फंड लागेल या वसाहती कडून महानगरपालिकेस वोंटरमेंट चार्जेस, डेव्हलोपमेंट चार्जेस आदी करही मिळत नाही.

श्री. नरेंद्र पाटील : पुंडलिक नगरात महापालिका २५ टक्के खर्च भरा व नागरी सुविधा मिळवा ही योजना राबविली जाते मग या नगरात का नको.

श्री. जयवंत ओक : राजीवनगर हा भाग महापालिका हद्दीत येत नाही त्यामुळे या भागात सुविधा पुरविता येणार नाहीत. सिडकोने हा भाग महापालिकेकडे हस्तांतरीत केल्यानंतर सुविधा पुरविण्याचा विचार व्हावा.

श्री. प्रकाश निकाळजे : महापालिका स्वतः खर्च करु शकत असेल तर मा.मंत्री महोदयाकडून पैसे मागविण्याचा प्रयत्न करावा.

मा.महापौर : राजीव गांधी नगर हा सिडकोचा नोटीफाईड एरिया आहे. तथापि स.नगरसेवकांच्या भावना लक्षात घेता अशा एरियामधून नागरी सुविधा पुरविण्याबाबत संबंधीतांनी प्रथम एस्टीमेंट तयार करुन घ्यावे. २५ टक्के रक्कम त्यांनी महापालिकेकडे भरावी म्हणजे पुढील कामे करता येतील. वास्तविक पाहता सिडकोनेच त्या सुविधा पुरवावयास पाहिजेत. परंतु कालांतराने आपण सिडको महापालिकेकडे हस्तांतरीत करुन घेणारच आहोत. म्हणून हा निर्णय घेण्यात येत आहे. मा.मंत्रालयाकडून आवश्यक तो फंड मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार राजीव गांधी नगरात नागरी सुविधा पुरविण्या संदर्भाने तेथील नागरिकांनी एस्टिमें तयार झाल्यानंतर २५ टक्के रक्कम प्रथम महानगरपालिकेकडे भरावी व त्यानंतरच रस्ते, ड्रेनेज आदी सुविधा पुरविल्या जातील असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०/२८ :** अतिरिक्त शहर अभियंता महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहे की, हमालवाडा व सिल्क मिल्क कॉलनी येथील नागरिकांना शहरात येण्यासाठी रेल्वे स्टेशन ओलांडून शहरात यावे लागते. त्यामुळे नागरिकांना अपघात होण्याची शक्यता होती. करिता रेल्वे स्टेशन भागात फुट ओव्हर ब्रीज बांधणे बाबत तेथील नागरिकांची बरीच जुनी मागणी होती. त्याकरिता सन १९९४ साली रेल्वे प्राधिकरणाचे अंदाजपत्रकानुसार २१,४९,८६,४५०.०० खर्च येणार होता. त्यावेळेस सदरील कामावर एवढा खर्च करण महानगरपालिकेस शक्य नव्हते. त्यामुळे शासकीय अनुदान प्राप्त कराण्यासाठी शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यानंतर सदरील कामासाठी शासनाकडून प्राप्त झालेल्या रुपये १० कोटी अनुदानात रुपये ७० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. सदरील काम हे रेल्वे प्राधिकरण डिपॉझिट टर्म बेसीसवर करणार आहे. करिता रेल्वे प्राधिकरणास रुपये ४९,८६,४५२.०० देण्याचे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर. सदरिल काम हे सन १९९६-९७ मध्ये होणार असल्याने सदरिल कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ होण्याची शक्यता आहे. परंतु आद्यस्थितीत पत्र क्र.डीओ/वायडब्ल्यू/३५१/डब्ल्यूआय/एफ.ओ.बी./सन/१ दि.१२.६.९६ नुसार रुपये ४९,८६,४५२.०० रक्कम रेल्वे प्राधिकरणाकडे भरणे आहे. तरी प्रस्तावित रक्कम जमा करण्याचे मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री. मनमोहनसिंग ओबेराय : शहर विकास समिती वरती मा.महापौरांना घ्यावयास हवे होते. परंतु घेतले गेले नाही. ही बाब योग्य नाही. आम्ही या संदर्भाने शासनाकडे पाठपुरावा करु.

मा.महापौर : याची इतिवृत्तात नोंद घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार रेल्वे स्टेशन भागात फुट ओव्हर ब्रीज बांधण्यासाठी रु. ४९,८६,४५०.०० रेल्वे प्राधिकरणाकडे भरण्याची सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

५.१५ वाजा मा.महापौरांनी १५ मिनिटांसाठी सभा तहकुब केली.

सभा परत ५.३० वाजता सुरु झाली.

"ऐनवेळचे विषय"

**विषय क्र. ३१/१ :** लेखाधिकारी-१ यांनी प्रस्ताव सादर केला की, दि.१९.६.९५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र.११/७ अन्वये सभासद स्वेच्छानिधी नियमावलीत मान्यता देतांना नियम क्र.१,२ (१) व ३ कायम ठेवून नियम क्र.२ मधील खालील दर्शविलेल्या पोट नियम क्र.२ ते ७ पुर्णतः वगळण्यात आले होते. दिनांक १९.२.९६ रोजी संपन्न झालेल्या अर्थसंकल्प स्थायी समिती बैठकीमध्ये मा.सभापती यांनी संस्थाना मदत करण्याबाबत प्रशासनाने स्वतंत्र नियमावली तयार करावी म्हणून आदेशित केलेले आहे. त्यानुसार सुधारित नियमावली सादर करण्यात येत आहे. त्याचा "स्वेच्छानिधी" नियमावलीत समावेश व्हावा.

नियम क्र.३ : संस्थेत आर्थिक मदत देतांना खालील निकष असतील.

पोटीनियम क्र. २. संस्थेविरुध्द कोणताही चौकशी चालू नसली पाहिजे.

३ संस्थेचे दरवर्षी सनदी लेखापाल (चार्टड अकौन्टंट) मार्फत लेखा परिक्षण अहवाल प्रस्तावासोबत दिले पाहिजे.

४. संस्थेची स्वतःची काही स्थावर मालमत्ता असली पाहिजे आणि त्यांचा तपशिल उल्लेख संस्थेचा भत्ता व दायित्व (स्टेटमेंट ऑफ ॲसेटस आणि लॅबिलिटीज) चे वितरण असले पहिजे.

५. संस्थेचे नियोजित इमारत बांधकामाचे आराखडे व अंदाजपत्रके वास्तुशास्त्रज्ञ यांचे स्वाक्षरीचे आणि बांधकाम प्रस्ताव सोबत दिले पाहिजे. बांधकामाचा अंदाजित खर्चापैकी ५० टक्के खर्च संस्थेने स्वतः केला पाहिजे उर्वरीत खर्च मागविण्यासाठी नगरसेवक त्यांचे निधीतून रु.१५०००/- पर्यंत मदतीची शिफारस करु शकतील. एकत्रीत निधी रु.५०,०००/- पर्यंत मर्यादित राहील.

६. संस्थेने या कामासाठी अर्थ साह्याची मागणी केली असेल त्याच कामासाठी अर्थसह्याचा वापर केला पाहिजे. दुरुपयोग केल्या अर्थसहाय्य वसुल करण्याचे अधिकार मनपास राहतील.

७. संस्थेस दरवर्षी अर्थसहाय्य मंजूर करता येणार नाही. तीन वर्षातून एकदाच मदत मिळण्यास पात्र राहील. अशा संस्थेने अर्थ साह्याचे उपयोगिता प्रमाणपत्र (युटिलायझोन सर्टिफिकेट) महानगरपालिकेस सादर करणे आवश्यक राहतील.

**संवाद :**

श्री. हमीद ताबा : प्रस्तावातील अ.क्र.५ मधील १५०००/- ची मर्यादा २५०००/- करण्यात यावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : संस्था रजिस्टर्ड असावी, तिची कोणतीही चौकशी चालू नसावी, निधि त्याच उद्देशासाठी वापरला पाहिजे. गैरवापर केला तर तो निधी वसुल करण्याचा अधिकार महापालिकेस राहील.

स्वेच्छानिधी १५०००/- ऐवजी २५०००/- करण्यात यावी.

मा.महापौर : सूचना मान्य करण्यात येते.

ठराव : प्रस्तावात दर्शविल्यानुसार नगरसेवक स्वेच्छा निधी वापरात नियम क्र.२ पोटनियम क्र.२ ते ७ चा समावेश करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. तसेच पोटनियम क्र.५ मध्ये उर्वरीत खर्च भागविण्यासाठी नगरसेवक त्यांचे निधीतून रु.१५०००/- ऐवजी रु.२५०००/- पर्यंत मदतीची शिफारस करु शकतील. अशी दुरुस्ती करण्यास प्रस्तावाच्या कन्फॅमशनसह सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२/२ :**

औरंगाबाद महानगरपालिकेने भुतपूर्व नगर परिषदेच्या हद्दीसाठी मंजूर ११७५ च्या विकास योजनेतील ना विकास क्षेत्र वगळून व सिडको नियोजन प्राधिकरणाने अघोषित केलेल्या क्षेत्रासह विकास योजना सुधारित करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) नुसार प्रसिध्द केलेली आहे. सदरची अधिसुचना दि.२३.३.९५ रोजी स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली आहे. त्यानुसार मुदतीमध्ये नागरिकातर्फे प्राप्त झालेल्या हरकती सुचनावर सुनावणी देवून त्यावर विचार करुन निर्णय घेण्याकरिता व त्यानुसार सर्वसाधारण सभेपुढे अहवाल सादर करण्याकरिता उक्त अधिनियमांच्या कलम २८ अन्वये नियोजन समीतीची स्थापन करण्यास आलेली आहे.

सदर नियोजन समितीमध्ये शासनातर्फे ४ सदस्यांची नियुक्ती झालेली असून महानगरपालिकेतर्फे स्थायी समितीतील तीन सदस्यांची नियुक्ती सर्वसाधारण सभेने दि.९.६.९५ नुसार (१) स.श्री.प्रदिपकुमार जैस्वाल (२) स.श्री अ.रशिदखान (मामू) (३) स.श्री.बैनाडे यांची नियुक्ती ठराव क्र.२० दि.९.६.९५ अन्वये करण्यात आलेली आहे.

परंतु स्थायी समितीतील स.सदस्यांची मुदत ही दिनांक ३०.३.९६ रोजी संपल्याने यापैकी दोन सदस्य स.श्री.प्रदिपकुमार जैस्वाल व स.श्री.अ.रशिदखान (मामू) हे निवृत्त झाले पैकी श्री.रशिदखान (मामू) हे पुनःश्च दि.३०.३.९६ च्या सर्वसाधारण सभेतुन स्थायी समिती सदस्य म्हणून निवडून आलेले आहेत.

दिनांक १२.७.९६ च्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये मांडलेल्या प्रस्ताव क्र. ५८ नुसार विद्यमान सदस्यांपैकी स.श्री.गिरजाराम हाळनोर, सभापती, स्थायी समिती व स.श्री.अ.रशिद खान (मामू) ह्यांची नियुक्ती सदर नियोजन समितीवर करण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात आली आहे. तसेच सर्वसाधारण सभेमध्ये शिफारस करण्यात येते.

प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार स्थायीसमिती सदस्यांची मुदत दि.३०.३.९६ रोजी संपल्याने स.सदस्य श्री.प्रदिपकुमार जैस्वाल व रशिदमामू हे दोन सदस्य निवृत्त झाल्याने महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या नियोजन समितीवर पुन्हा सदस्यांची नेमणूक करण्यासाठी दि.१२.७.९६ च्या स्थायी समितीत प्रस्ताव मांडल्यानुसार विद्यमान सदस्यांपैकी

व श्री.गिरजाराम हाळनोर सभापती स्थायी समिती व श्री. अ.रशिदखान (मामू) ह्यांची नियुक्ती नियोजन समितीवर झालेल्या निवडीस सर्वानुमते मंजूरी देते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २३/३ :**

मो.रमानगर येथे हा परिसर जालना रोडला जोडण्याकरिता जालना रोड ते रमानगर (मिलींद बौध्द विहारासमोर) च्या रस्त्याचे काम महानगरपालिकेकडून सुरु करण्यात आले होते. रस्त्याचे खडीकरण झाले नंतर काही रस्ता झाले नंतर श्री. सय्यद अहेमद मोहीयुद्दीन घोरी पिता सुलतान मोहिउद्दीन घोरी यांनी आक्षेप घेतल्यामुळे रस्त्याचे पुढील बांधकाम थांबविण्यात आलेले आहे.

आक्षेपकाने सदरील जमीन त्यांचे मालकीची असल्याने नमुद करुन रस्त्या खालील जमिनीच क्षेत्राचा मोबदला मिळण्याची मागण करुन सदर रस्त्याचे काम थांबविलेले आहे व दरम्यान सदरील प्रकरण न्यायप्रविष्टही केलेले आहे. सदर रस्ता संपूर्ण रमा नगर हे न.भु.क्र.१४८१२ मध्ये असून रमानगर मधील घरांवर स्वतंत्र नगर भुमापन क्रमांक दिलेले आहे. न.भु.क्र.१४८१२ चे अभिलेख पाहता नोंदवही वरील नोंदी संबंधाने खुली जागा व रस्त्याखालील जागेचे आक्षेपक मालक आहेत.

रमानगर येथील जनतेची रस्त्याबाबतची मागणी व सदर रस्त्याची निवड रस्त्याखालील जमिनीचे वाटाघाटीने संपादन करुन संबंधितास योग्य तो मोबदला देण्याबाबतच्या कार्यवाही अंतर्गत या क्षेत्राचे मुल्यांकन करण्यात आलेले आहे. त्यानुसार ६६२-८२ चौ.मी.करिता रक्कम रु.२,९८,०००/- एवढी मोबदल्याची रक्कम होते.

प्रस्ताव मान्यतेनंतर सदर रस्ता खालील जमीन संबंधिताने नोंदणीकृत दस्तऐवजाने महानगरपालिकेस हस्तांतरीत करावयाची असून त्यासाठीच्या खर्चाची ५० रक्कम सबंधित जमीन मालकाने द्यावयाची आहे व उर्वरित ५० टक्के रक्कम महानगरपालिका खर्च करणार आहे तसेच सदर प्रकरणी न्यायप्रविष्ट असलेले प्रकरण संबंधिताने काढून घेतल्यानंतर संबंधितास द्येय होणारी मोबदल्याची रक्कम देण्यात येईल. करिता प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.रमानगर परिसर जालना रोडला जोडण्यासाठी जालना रोड ते रमानगर (मिलींद बौध्द विहारासमोर) त्या रस्त्याअंतर्गत न.भू.क्र.१४८१२ संदर्भाने प्रकरण न्यायप्रविष्ट झाले. सदर रस्त्याची निकड पाहता रस्त्याखालील जमिनीच्या वाटाघाटीने संपादन करुन संबंधितास योग्य तो मोबदला देण्याबाबतच्या कार्यवाही अंतर्गत त्या क्षेत्राचे मुल्यांकन करण्यात आले नुसार ६६२.८२ चौ.मी. करीता रु.२,९८,०००/- एवढी मोबदल्याची रक्कम होते. महापलिकेच्या अटी व शर्तीनुसार न्यायप्रविष्ट प्रकरणातील श्री.सय्यद अहेमद मोहियोद्दीन घोरी पिता सुलतान मोहिउद्दीन घोरी यांनी नोंदणीकृत दस्तऐवज महापालिकेस हस्तांतरित करावयाचे असून त्या साठीच्या खर्चाची ५० टक्के रक्कम संबंधित जमीन मालकाने द्यावयाची आहे व ५० टक्के रक्कम महापालिकेने खर्च करावयाची आहे. सदर प्रकरण संबंधिताने न्यायालयातून काढून घेतल्यानंतर संबंधितास द्येय होणारी मोबदल्याची रक्कम देण्यासाठी सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४/४ :**

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दि.८.३.९६ च्या स्थायी समितीच्या शिफारशीनुसार स.नगरसेवकाव्या स्वेच्छानिधीतून महानगरपालिकेच्या हद्दीतील दारिद्र्यरेषेखालील बेरोजगार युवका युवतींना विनामुल्य तांत्रि प्रशिक्षण देण्यात यावे.

सदर प्रशिक्षण १ महिना कालावधीपासून १ वर्ष कालावधीचे असावे. उदाहरणादाखल व्यवसाय प्रशिक्षण

१. दुचाकी वाहन दुरुस्त
२. चार चाकी वाहन दुरुस्ती
३. तिन चाकी वाहन चालक
४. चार चाकी वाहन चालक
५. संगणक क्षेत्रातील प्रशिक्षण
६. डी.टी.पी.ऑपरेटर कोर्स
७. रेडीयो टी.व्ही.दुरुस्ती
८. इलेक्ट्रानिक टायपरायटींग
९. रेडीया टी.व्ही.दुरुस्ती
१०.बुक बायडींग
११.पर्स बनविणे
१२.खडू फिनेल बनविणे
१३.शिवणकाम
१४.हस्तकला कोर्स
१५.पाकीट बनविणे
१६.फाईल तयार करणे

स्वेच्छा निधी वापराबाबतच्या नियमावलीत वरील प्रमाणे समावेश करुन कमकुवत घटक कल्याण निधीतून ही यासाठी तरतूद वापरण्यात आली.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार व दि.८.३.९६ च्या स्थायी समितीच्या शिफारशीनुसार स.नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून महापालिका हद्दीतील दारिद्र्यरेषेखालील बेरोजगार युवक/युवतींना प्रस्तावात दर्शविलेले अ.क्र.१ ते १६ पर्यंतचे विनामूल्य तांत्रिक प्रशिक्षक देण्याबाबत सदर प्रशिक्षणाचा स्वेच्छानिधी वापरबाबतच्या नियमावलीत समावेश करण्याबाबत सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५/५ :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, मनपा गणवेश विनीमय क्र.२५ दिनांक १८.६.९६ नुसार महानगरपालिका कर्मचाऱ्यांना (चतुर्थ श्रेणी व गणवेश परिधान करणारे तृतीय श्रेणी कर्मचारी) खालील साहीत्य द्येय आहे.

| | |
|---|---|
| १. गणवेश | दोन ड्रेस प्रत्येकी |
| २. चप्पल | १ जोड प्रत्येकी |
| ३. रेनकोट | |
| ४. स्वेटर | |

वास्तविक वुलनकोट पुरुषासाठी व कम्बल स्त्री कामागारांसाठी द्येय आहे. परंतु त्यामुळे खर्च जास्त प्रमाणात येईल. त्याकरिता स्वेटर खरेदीचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे.

५. छत्री

६. गणवेश साहित्य : जसे की, पी कॅप, लेदर शुज, लेदर बेल्ट, सॉक्स, ब्ल्यू, लॉरेट कॅप, केन लाठी इ.

यापूर्वी सदरील साहित्य खालीलप्रमाणे देण्यात आलेले आहे.

वाहन चालक :

गणवेश - ऑक्टो ९६

रेनकोट – नाही

स्वेटर – जाने ९४

चतुर्थश्रेणी कर्मचारी :

गणेवश – एप्रिल – ९४

रेनकोट – जुलै ९३

स्वेटर – जाने ८४

चप्पल - मार्च/एप्रिल ९४

खालीलप्रमाणे अंदाजित खर्च काढण्यात आलेला आहे. सदरील खर्चात कमी जास्त प्रमाण होवू शकते. गणवेश (खाकी व पांढरी)

| | |
|---|---|
| तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी - | अंदाजे कापड - खाकी - १००० मी. |
| | अंदाजे कापड - पांढरे - ३०० मी. |
| | अंदाजे खर्च – रु. २१,०००/- |
| चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी - | अंदाजे कापड - खाकी – ३५०० मी. |
| | अंदाजे कापड - पांढरा - ९०० मी. |
| | अंदाजे कापड - निळा – २०० मी. |
| | अंदाजे खर्च : रु.४,७७,०००/- |

| | |
|---|---|
| रेनकाटसाठी अंदाजे खर्च | रु. ३,६०,०००/- |
| स्वेटरसाठी अंदाजे खर्च | रु.५,६५,०००/- |
| छत्रीसाठी अंदाजे खर्च | रु. ८०,०००/- |
| चप्पलसाठी अंदाजे खर्च | रु. १,००,०००/- |
| गणवेषसाहित्यसाठी अंदाजे खर्च | रु. १,००,०००/- |
| गणवेश शिलाईसाठी अंदाजे खर्च | रु. १,५०,०००/- |
| अंदाजे खर्च | रु. २१,०९,०००/- |

माहे जाने.९७ मध्ये द्येय असणाऱ्या साडी शर्टसलवार साठी अंदाज खर्च रु.४,००,०००/- मागील पानावर दर्शविल्यानुसार एकुण रु.२५,००,०००/- अंदाजित खर्च दर्शविण्यात आलेला असून एकुण अंदाजपत्रकीय तरतूद रु.१०,००,०००/- ठेवण्यात आलेला आहे. एकुण दर्शविण्यात आलेले साहित्य देणे असल्यास पुन्हा रु.१५.०० लाख अतिरिक्त तरतुद करावी लागेल. अतिरिक्त तरतुद २५.९७ लक्षाचे रकमेच्या शिलकी अंदाजपत्रकातून १५.० लक्ष वर्ग करता येईल. यास्तव इतर लेखाशिर्षाची तरतूद कमी करण्याची आवश्यकता नाही.

सदरील प्रस्तावास दिनांक १२.७.९६ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता मिळालेली असून वरील साहीत्य खरेदी करणे झाल्यास अतिरिक्त रकमेची तरतूद करण्यात येवून स्थानिक वर्तमानपत्रातून निविदा प्रसिध्दीस देणे बाबत मा.सर्वसाधारण सभेपुढे विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. गिरजाराम हाळनोर :

मंजूरी देण्यास हरकत नाही. परंतु दिलेले गणवेश जर कर्मचाऱ्यांनी वापरले नाहीत तर त्यांचे विरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

मा.महापौर : याची सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार महापालिका अस्थापनेवरील गणवेश परिधान करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी विविध प्रकारचे गणवेश पुरविण्यासाठी येणाऱ्या अंदाजित खर्चास रु.२५ लाखास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. तसेच यासाठी अंदाजपत्रकीय तरतूद कमी असल्याने रु.१५ लाखाची अतिरिक्त तरतूद रु. २५.९७ लाखाच्या शिलकी अंदाजपत्रकातून वर्ग करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय ३६/६:**

सहाय्यक आयुक्त – १ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्री. के.बी. फंड यांची प्रतिनियुक्ती महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे आदेश क्रमांक डिपीटी-११९६/१६५३/प्र.क्र.१८/ई-१ मंत्रालय मुंबई ३२ दिनांक २९ जून १९९६ अन्वये उपआयुक्त-१ य पदावर सोबतच्या अटी व शर्ती प्रमाणे सदर पदाचा पदभार, स्विकारतील त्या दिनांकापासून प्रथम एक वर्षासाठी कण्यात आली आहे. श्री. के.बी.फंड हे उपआयुक्त-१ या पदावर दिनांक ९.७.९६ रोजी मध्यान्हानंतर रुजू झाले आहे.

करिता श्री. के.बी.फंड, उपआयुक्त-१ यांची दिनांक ९.७.९६ पासून प्रथम एक वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका येथे प्रतिनियुक्ती वरील कालावधीत सोबतच्या अटी व शर्तीनुसार मंजूरी देण्याबाबत ठराव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार श्री. के.बी. फंड यांची महानगरपालिका औरंगाबाद मध्ये महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग यांचे आदेश क्र.डिपीटी ११९६/१६५३/प्र.क्र.१८/ई-१ दिनांक २९ जून १९९६ करण्यात आलेल्या उपआयुक्त पदाच्या प्रतिनियुक्तीच्या एक वर्षाच्या कालावधीस व आदेशातील अटी व शर्तीस प्रस्तावाच्या कन्फर्मेशनसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७/७ :**

औरंगाबाद शहर हे झपाट्याने वाढत असून त्यामुळे कचऱ्यामध्ये वाढ होत आहे. हा जास्तीचा कचरा ट्रेचिग ग्राऊंडवर व्यवस्थित टाकला जात नाही. कचरा टाकण्यासाठी खड्डे तयार करणे व खड्ड्यात कचरा व्यवस्थित टाकण्यासाठी जे.सी.बी. आवश्यक आहे. तसेच उद्यानातील जमीन लेव्हल करणे, ग्राउंड लेव्हल करणे नाल्यातील गाळ काढणे, तलावातील गाळ काढून त्याची पाणी साठविण्यासाठी क्षमता वाढविणे, रस्ता फोडणे व लेव्हल करणे अतिक्रमण हटविणे इ.कामासाठी जे.सी.बी.चा उपयोग होईल.

जे.सी.बी.-३ डी मशिन खरेदी करण्यासाठी मे.एस्कॉर्ट लि.मुंबई स्थानिक अधिकृत विक्रेते मे.सिध्दार्थ ॲटो इंजीनिअर्स प्रा.लि.औरंगाबाद यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले.

१. एस्कॉर्ट जे.सी.बी.-३डी मशिन रु. १४,७८,५२०.००

महाराष्ट्र शासन रु. १,४३,०५२.००

प्रवेशकर

रु. १६,२१,५७२.००

जास्तीचा बलेकस व स्वेअर रु. १,१९,०९३.००
पार्ट कीट रु.
एकुण रु. १७,४०,६६५.००

वरीलप्रमाणे जे.सी.बी.-३डी मशिन खरेदी करण्यासाठी रु. १७,४०,६६५.०० खर्च येतो वरील रकमेपैकी मशिनची किंमत रु.१४,७८,५२०.०० मशिनचे निर्माते मे.एस्कॉर्ट लि.मुंबई त्यांना अदा करावी लागेल. तर जास्तीचा बकेट व स्पेअर पार्ट किट्टो पेमेंट मे.सिध्दार्थ ॲटो इंजिनीअर्स प्रा.लि.औरंगाबाद यांना अदा करावी लागेल. मशिनचा किंमतीत बदल होवू शकतो. जे.सी.बी. ताब्यात घेताना जी किंमत असेल त्याप्रमाणे पेमेंट करावे लागेल. ही किंमत जकात कर वगळून आहे. जे.सी.बी. खरेदी करिता अर्थसंकल्पात तरतूद नाही. परंतु, नविन वाहने खरेदीसाठी असलेल्या रुपये ६०.०० लाखाच तरतुदीतून खर्च भागविता येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्यानुसार ट्रेचिंग ग्राऊंडवरती खड्डे तयार करण्यास व ह्या खड्डयात कचरा टाकण्यासाठी मे.एस्कॉर्ट लि.मुंबई यांच्याकडून नविन जे.सी.बी.-३डी मशिन खरेदी करण्यास व प्रस्तावात दर्शविल्यानुसार त्या अनुषंगाने येणाऱ्या एकुण रु.१७,४०,६६५/- च्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. पैकी रक्कम रु. १४,७८,५२०/- मशिनचे निर्माते मे.एस्कॉर्ट लि.मुंबई यांना अदा करण्यास्तव जास्तीचे बकेट व स्पेअर पार्ट किटचे पेमेंट मे.सिध्दार्थ ॲटो इंजिनिअर्स प्रा.लि.औरंगाबाद यांना करण्यास तसेच सदरच्या खर्च नविन वाहने खरेदीसाठी असलेल्या रु.६० लाखाच्या तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय ३८/८ :**

शहरातील कचरा वाहतुकीसाठी एकूण २९ ट्रक/टिप्पर आहेत. त्यातील १० ट्रक दोन शिफ्टमध्ये काम करतात. दुपार पाळीतील ट्रक कामावर उशिरा जात असल्यामुळे बहुतांशी ट्रक एकच ट्रिप करतात त्यामुळे दुपार पाळी बंद करुन नवीन १० ट्रक खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यातील पाच टिप्पर सन १९९५-९६ मध्ये खरेदी करण्यात आले आहे. नविन पाटा टिप्पर खरेदी करवयाचा आहेत.

महानगरपालिकेकडे कचरा वाहतुकीसाठी सर्व टाटा कंपनीचे ट्रक्स / टिप्पर आहेत. हे टिप्पर मजबुत व चांगल्या प्रतीचे असतात तसेच दुरुस्ती व स्पेअर पार्ट उपलब्धतेच्या दृष्टीने सोईचे आहे. नवीन टाटा-७०९ टिप्पर खरेदीसाठी कंपनीचे स्थानिक अधिकृत विक्रेते मे.सतीश मोटार्स लि.औरंगाबाद यांचेकडून ( ) प्रमाणे दरपत्रके मागविण्यात आले.

टाटा एस एफ सी-७०९/३८ ५ नग
२३,७३,३७५.००
एकुण २३,७३,३७५.००

वरीलप्रमाणे नविन पाच टिप्पर खरेदी करण्यासाठी रु. २३,७३,३७५.०० खर्च येतो हे दर जकात कर वगळून आहेत. तसेच वाहनाचा पुरवठा करताना जी किंमत असेल त्या प्रमाणे पेमेंट अदा करावी लागेल. पाच टिप्पर खरेदीसाठी रु. २५.०० लाखाची तरतूद आहे.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद :

श्री. गिरजाराम हाळनोर : आपण कचऱ्यापासुन खत निर्मितीचा प्रस्ताव महापालिकेच्या विचारधीन आहे. यात संबंधित कंपनीनेच कचरा उचलून द्यावयाचा असतो. त्यामुळे महापालिकेस गाड्यांची आवश्यङ्कता भासणार नाही. ह्या संदर्भाने पुणे महापालिकेसही अशातच आपल्या काही स.सभासदांनी भेट दिलेली आहे. तेथे सध्या कचरऱ्यापासून खत निर्मितीचा प्रकल्प मे.वेस्टर्न पॅकेज कं. राबवत आहे. या संदर्भाने त्या कंपनीशी चर्चा झालेली आहे. तोपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

मा.महापौर : मंजूर करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार टाटा एसएफसी ७०९/३८ च्या ५ गाड्यांच्या खरेदीसाठी येणाऱ्या रु.२३,७३,३७५/- च्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

तथापि खत निर्मितीच्या प्रकल्पा संदर्भाने कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर आवश्यकता भासली तरच या गाड्या खरेदी करण्यात याव्यात.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय ३९/९ :**

सध्या शहरात उपयोगात येणाऱ्या सार्वजनिक संडास व मुताऱ्यांची ट्रॅक्टर, ट्रकद्वारे साफसफाई केले जाते. शहरातील सर्व सार्वजनिक संडास व मुताऱ्यांची स्वच्छता एका टँकरद्वारे करणे शक्य नसल्यामुळे सध्या आठवड्यातून दोन वेळा शौचालयाची स्वच्छता केली जाते. संडास व मुताऱ्यांची स्वच्छता नियमीतपणे दररोज करावयाची झाल्यास पाण्याच्या तीन टँकरची आवश्यकता आहे.

सन १९९६-९७ ह्या आर्थिक वर्षात २ ट्रॅक्टर विकत घेवून त्यावर पाण्याचे टँकर बसविण्याचा प्रस्ताव होता. परंतु ट्रॅक्टर ऐवजी टाटा-७०९ ट्रकवर टँकर बसविल्यास स्वच्छतेचे काम जास्तीचे व लवकर करता येईल तसेच फिनेल व इतर औषधी सुरक्षित ठेवता येईल. स्विपर्सना बसण्याची व्यवस्था चांगली आहे. करिता टँकर ऐवजी टाटा टँकर घेणे योग्य होईल.

नविन दोन टाटा-७०९-३८ टँकर करिता दोन चेसिस खरेदी करण्यासाठी टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.सतीश मोटर्स लि.औरंगाबाद यांचे ( ) दरपत्रकाप्रमाणे रु.७,५८,८१०.०० खर्च येतो. हे दर जकात दर वगळून असून वाहनाचा ताबा घेताना जी किंमत असेल त्याप्रमाणे पेमेंट करावे लागेल.

टँकर बनविणे व चेसिसवर बसविणे किर्लोस्कर इंजिन पंप व इतर फीटींगसह एकूण दोन टँकरकरिता अंदाजे रु.२,५०,०००.०० खर्च येईल. याप्रमाणे एकुण दोन टँकर करिता रु. १०,०८,८१०.०० खर्च येतो. वर्ष १९९६-९७ च्या अर्थसंकल्पात दोन टँकर खरेदी करीता रु. १२.०० लाखाची तरतुद आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरातील संडास व मुताऱ्यांची ट्रॅक्टर, टँकरद्वारे साफसफाई करण्यासाठी ९६-९७ या आर्थिक वर्षात २ ट्रॅक्टर खरेदी करुन त्यावर पाण्याचे टँकर बसविण्याऐवजी दोन टाटा ७०९ टँकर करिता बेसिस खरेदी करण्यासाठी गव्हर्नमेण्ट रेट दरपत्रकाप्रमाणे येणाऱ्या खर्चास रु. ७,५८,८१०/- ला तसेच सदरचे बेसिस टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.सतीश मोटर्स लि.औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्यास त्याचप्रमाणे टँकर बनविणे व चेसिसवर बसविणे, किर्लोस्कर इंजिन पंप व इतर फिटींगसह होणाऱ्या एकुण खर्चास रु. १०,०८,८१०/- सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, नेहरु बलोद्यान येथे बांधण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय इमारत बांधकामाचा सुधारित आराखडा मा.खासदार साहेब श्री.प्रदिप जैस्वाल मा.आयुक्त साहेब यांचे मार्गदर्शननुसार तयार करण्यात आला.

सुधारित आराखड्यात प्रदर्शनी हॉलचा भव्य आकार (३० X ५०) ठेवण्यात आला सपाट आर.सी.सी. स्लॅब ऐवजी अर्धगोलाकार आर.सी.सी.छताची रचना करण्यात येत आहे. या व्यतिरिक्त साईट डेव्हलपपेंट करणे. (. . . . . . .) विद्युती करण्याची व्यवस्था इ.साठी तरतुद आहे. वरीलप्रमाणे सुधारित आराखडा व आवश्यक फेरबदलासह सुधारित अंदाजपत्रक (वाढीव परिणाम व अतिरिक्त बाबींसह) रक्कम रु. ५९,८०,०००/- तयार करण्यात आले आहे. सुधारित अंदाजपत्रकातील दर सा.बां.विभाग दरसुची १९९५-९६ अनुसार तयार करण्यात आले असून सदरील अंदाजपत्रकासाठी खर्चाची तरतुद शा.अ.सन ९५-९६ (रुपये १०.०० कोटी) ह्या लेखा शिर्षा खालील उपलब्ध आर्थिक तरतुदी अधिन आहे.

तरी सदरील सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु.५९,८०,०००.००/- चे वाढीव परिणाम व अतिरिक्त बाबींसह मुळ कामाचे ठेकेदार मे. एलोरा कंस्ट्रक्शन यांचेकडून मुळ कामाचे निवीदा दराप्रमाणे (अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.०० टक्के अधिक दराने) करुन घेण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

शहर अभिर्येता : मुळ अंदाजपत्रक रु.२५ लाखाचे होते. मुळ प्रस्तावात काही बदल झालेले आहेत. त्यामुळे एस्टीमेट वाढले आहे.

श्री. रशिद मामू : आपल्याकडे स्टाफ असतांना आपण पाहणीसाठी बाहेरुन लोकांना का बोलावतो. आपले लोक काय करतात ?

श्री. मुश्ताक अहेमद : हे एस्टिमेट चेक करावे लागेल. पा.अबोव्ह देण्याचे कारण काय? एखादा आर्किटेक्ट महापालिकेत घेण्यात यावा.

श्री. निकाळजे : पा.अबोव्ह वरती काम देण्याची गरज नसावी.

सौ. अलका पाटील : महापालिकेच्या अस्थापनेवरच एखादा चांगला आर्किटेक्ट घ्यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार नेहरु बालोद्यान येथे बांधण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय इमारत बांधकामासाठी बनविण्यात आलेल्या सा.बां.विभाग दरसूची ९५-९६ नुसार तयार करण्यात आलेल्या सुधारित अंदाजपत्रक रु.५९,८०,०००.००/- ला तसेच वाढीव परिणाम व अतिरिक्त बाबींसह मुळ कामाचे ठेकेदार मे.एलोरा कन्सट्रक्शन यांचेकडून निविदा दराप्रमाणे (अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५ टक्के अधिक दराने) करुन घेण्यास मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय ४१/११ :**

मा.आयुक्त यांचे आदेशान्वये शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मसनतपुर मनपा प्राथमिक शाळेच्या जुन्या इमारतीच्या भिंतीस व फ्लोरींग मध्ये तडे गेल्यामुळे इमारत दुरुस्त करणे करीता शाळेच्या मुख्याध्यापक, शिक्षणाधिकारी व वॉर्ड क्र.१४ चे स.नगरसेवक श्री. अभिमन्यु भालेराव यांनी कळविले होते.

त्यानुसार सदरील जुन्या शाळेच्या इमारतीच्या भिंतीचे तडे दुरुस्त करणे करीता दोन स्ट्रक्चरल इंजीनियर यांच्याकडून मत घेवून त्याप्रमाणे इमारतीची दुरुस्ती सुरु करण्यात आली असता स.नगरसेवक श्री. अभिमन्यु भालेराव व मा.आयुक्त महोदय यांनी संयुक्तिक प्रत्यक्ष स्थळाची पाहणी केली व दुरुस्तीचे काम थांबवून सूचना दिल्या की, दुरुस्ती करुन चालणार नाही. अस्तित्वात असलेली जूनी इमारत (पाच खोल्या व व्हरांडा) पाडून नव्याने पूर्ण इमारत बांधावी. प्रस्तावित पाडावयाच्या इमारतीचे एकुण क्षेत्रफळ ३१९.१४ चौमी आहे व तेवढाच भाग नव्याने बांधणे आहे. सदरील प्रकरणात दोन तज्ञांचा सल्ला मा.आयुक्त महोदयांच्या आदेशान्वये घेण्यात आला असून तज्ञांनी देखील जुनी इमारत पाहून नव्याने बांधण्याचे बाबत शिक्षणाधिकारी यांनी मुख्याध्यापकाला सूचना दिल्या आहेत.

विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये म्हणून शाळेच्या परिसरामध्ये उपलब्ध असलेले पत्र्याचे शेड दुरुस्त करुन व एक अतिरिक्त पत्र्याचे शेड तयार करुन विद्यार्थ्यांना बसण्याची व्यवस्था करण्याच्या मिळालेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

तरी सदरील जुनी इमारत पाडून नविन इमारत बांधावयाची झाल्यास ढोबळ अंदाजपत्रकस रु.१३,९०,७९०/- चे अपेक्षित आहे. जुनी इमारत पाडून नविन इमारत बांधण्याच्या प्रस्तावास मंजूरी मिळाल्यास बाब निहाय अंदाजपत्रक तयार करण्यात येईल व निविदा इ. कार्यवाही झाले नंतर काम सुरु करता येईल, तसेच स.नगरसेवक यांचे बरोबर झालेल्या चर्चेनुसार शालेय इमारत कमी कालमर्यादेत पुर्ण करुन विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देणेच झाल्यास आदेश झाल्यास विना निविदा उपलब्ध एजन्सी मार्फत सन ९५-९६ च्या दरसूची नुसार करता येईल. अस्तित्वात असलेली जुनी इमारत पाडून तेवढाच भाग नव्याने बांधण्याचा योग्य त्या आदेशास्तव सादर.

**संवाद :**

श्री. रशिद मामू : डायरेक्ट एजन्सीस काम का देण्यात येत आहे?

श्री. महादेव सुर्यवंशी : ढोबळ अंदाजपत्रक म्हणजे काय? टेंडर न मागविता एवढे मोठे काम करता येते का?

शहर अभियंता : ढोबळ अंदाजपत्रक म्हणजे त्याचा एरिया व परस्वेयर याचा अंदाज घेवून अंदाजपत्रक बनवले आहे. यास मंजूरी मिळाल्यास नंतर डिटेल एस्टीमेट तयार करता येईल. यासाठी टेंडर कॉल करण्यात येईल. ही इमारत पडावयास आलेली आहे.

श्री. रशिद मामू : १०.१२ वर्षापूर्वी बनविलेली इमारत एवढ्या लवकर पडली कशी यासाठी पूर्वी पाया किती खोल खोदला होता.

श्री. महादेव सुर्यवंशी : या इमारतीस महाराष्ट्र डिस्टीलरी यांच्याकडून वसुल करावा अशी मागणी स.सदस्य श्री. अभिमन्यु भालेराव यांनी स्थायी समितीत मांडली होती. त्यावर महापालिकेने काही कार्यवाही केलेली आहे? ह्या एस्टिमेंटमध्ये बिल्डींग तोडण्याचा खर्च दाखविला आहे काय?

शहर अभियंता : महाराष्ट्र डिस्टीलरीस पत्र देण्यात आले आहे.

श्री. निकाळजे : सध्या तेथील मुले पत्र्याच्या शेडमध्ये बसत आहे. हे पाहता ठराव मंजूर करण्यात यावा. शाळा एवढया लवकर कशी पडली याचीही चौकशी करण्यात यावी.

मा.महापौर : प्रस्तावास मंजूरी देण्यात यावी तसेच मा.उपमहापौर उपआयुक्त-१, शहर अभियंता, मा.सभापती स्थायी समिती रशिद मामू व संबंधित नगर सेवक

यांनी पाहणी करुन पुढील सभेत अहवाल द्यावा. कामासाठी शॉर्ट टेंडर नोटीस काढण्यात यावी.

श्री. मुश्ताक अहेमद : मागे एकदा जालना जिल्हा परिषद इमारतीत क्रॅक आले होते तर त्याची पाहणी मुख्यमंत्र्यांनी केली होती व वरिष्ठ अधिकाऱ्यांना निलंबीत केले होते. अशा प्रकाराची चौकशी झाली पाहिजे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मसनतपुर महापालिका प्राथमिक शाळेच्या इमारतीच्या भिंतीस तडे गेल्याने व ते रिपेअर करता येत नसल्याने ती इमारत पाडून त्याच जागेवर ३१९.१४ चौमी क्षेत्रफळावर नव्याने इमारत बांधण्यासाठी तयार करण्यात आलेल्या ढोबळ अंदाजपत्रक रु.१३,९०,७९०/- ला सर्वानुमते संमती देण्यात येते. कामासाठी शॉर्ट टेंडर नोटीस काढण्यात यावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय : ४२/१२**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, श्री. कचरुजी नवपुते स.नगरसेवक यांचे वॉर्ड क्र.८२ मो.चिकलठाणा येथील आठवडी बाजाराच्या जागेत ओटे तयार करणे, पाण्याचा हौद बांधणेस व खडी रस्ता तयार करणचे कामासाठी सर्वसाधारण सभा ठराव क्र.५७/४ दि.२०.१०.९५ अन्वये रक्कम रु.१०.०० लाख मंजूरी प्राप्त झालेली आहे. तसेच ठराव क्र.३१९/१५ दि.२८.१२.९५ अन्वये काम करणारी एजन्सीचे निविदा दरास मान्यता मिळालेली आहे. तसेच सदर कामात वाढ झाल्यामुळे सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये १८,०८,१७७/- चे तयार करण्यात आले असून त्यास स्थायी समिती ठराव क्र.५१६/६४ दि.२९.२.९६ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. परंतु त्यात आणखी बऱ्याच अतिरिक्त बाबींचा समावेश करण्यात आला. ज्याकी मुळ अंदाजपत्रकात समाविष्ट नव्हत्या त्या बाबी म्हणजे ट्री गार्ड, मटन व बिफ मार्केटच्या गाळ्यात अँगल बोल्टसह ओट्याच्या शेजारी, दुकानाकरीता टेंट बांधण्याकरिता हुक पिंचीग पुरुष व महिला करिता मुतारीसह लोखंडी दरवाजे, आर.सी.सी. पाईप चेंबर दुकानांच्या नावाच्या पाट्या इ.नविन बाबी वाढल्यामुळे रक्कम रु.११,३२,१७५/- ची वाढ झाली आहे. परंतु ठराव क्र.५१६/६४ दि.२९.२.९६ अन्वये रक्कम रुपये ८,०८,१८७/- ला पुर्वीच मंजूरी प्राप्त झालेली आहे. व आता आणखी ३,२२,९८८/- या रकमेस मान्यता हवी आहे.

म्हणजेच सुधारित एकत्रीत अंदाजपत्रक रक्कम रुपये २१,३२,१७५/- ला तसेच सदरील मुळ अंदाजपत्रकीय रकमेच्या १२५/- पेक्षा जास्त वाढलेले काम सन ९५-९६ सार्वजनिक बांधकाम खात्याचे जिल्हा दरसुचीनुसार व अतिरिक्त बाबी चालु दर सुची नुसार मुळ गुत्तेदार श्री.एस.एम.मंडोरे यांचेकडून करुन घेण्यासाठी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर. सदर खर्च सन ९६-९७ या वर्षात आठवडी बाजार विकसीत करणे या लेखा शिर्षामधून १०.०० लाख व उर्वरित खर्च व्यापार संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षामधून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार वॉर्ड क्र.८२ चिकलठाणा येथील आठवडी बाजाराच्या जागेत ओटे तयार करणे पाण्याचा हौद बांधणे, खडी रस्ता तयार करणे यासाठी बनविण्यात आलेल्या रु.१० लाखाच्या प्रस्तावास दि.३०.१०.९५ च्या स्थायी समिती ठराव क्र.५७/४ अन्वये मंजूरी मिळाल्यानंतर कामात वाढ झाल्याने रु.१८,०८१०७/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीने ठराव क्र.५१६/६४ दिनांक २९.२.९६ अन्वये मंजूरी दिली. तथापि सदर ठिकाणच्या कामात अतिरिक्त बाबींचा उदा.ट्रीगार्ड, मटन व बिफ मार्केट गाळ्यास अँगल बोल्टसह

ओट्याच्या शेजारी दुकानांसाठी टेंट बांधणे आदी कामांमुळे रु.११,३२,१७५/- ची वाढ झाली. यामुळे सुधारित अंदाजपत्रक रु.२१,३२,१७५/- ला चे सा.बां. खात्याचे जिल्हा दरसुचीनुसार व अतिरिक्त बाबी चालु दरसुची नसार मुळ गुत्तेदार, श्री. एस.एम. मंडोरे यांच्याकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ४३/१३ :

प्रस्तावित करण्यात येते की, स्थायी समितीने दि.१८.३.९६ रोजी ठराव क्रमांक ६४१ अन्वये आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.दिनकर देशपांडे हे मनपा अस्थापनेवर सन १९८३ पासून रु.३००० ते ४५०० ह्या वेतनश्रेणीत कार्यरत आहेत. दिनांक ३१.१२.९३ रोजी ते वेतन श्रेणीतील कमाल मर्यादा रु. ४५००/- येथे कुंठीत झालेले मुळे त्यांना दिनांक १.१.९४ पासुन कुठलेही वेतनवाढ अथवा वेतनश्रेणी देण्यात आलेली नाही. आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद स्थायी असून भविष्यात त्यांना कोणतीही पदोन्नती नाही. हे पद वेतनश्रेणीत असणे जरुरी आहे. ही बाब लक्षात घेता त्यांना शासनाचे नियमानुसार पुढील वेतनश्रेणी रु.३७०० ते ५००० दिनांक १.१.९४ पासून देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली व मुंबई प्रांतिक अधिनियमानुसार ४५ (३) प्रमाणे हा प्रस्ताव मंजूर करुन सर्वसाधारण सभेत शिफारस करुन मंजूरीस्तव सादर केलेला आहे.

मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व दि.१८.३.९६ स्थायी समिती ठराव क्र.६४१ अन्वये मंजूरी व शिफारस करुन आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.दिनकर देशपांडे हे मनपा अस्थापनेवर सन १९८३ पासून रु.३००० ते ४५००/- या वेतन श्रेणीत कार्यरत आहेत. दि.३१.१२.९३ रोजी ते वेतनश्रेणीतील कमाल मर्यादा रु.४५००/- येथे कुठीत झाल्यामुळे व त्यांना दि.१.१.९४ पासून कुठलीही वेतनवाढ अथवा वेतनश्रेणी न मिळाल्यामुळे व भविष्यात त्यांना कुठलीही पदोन्नती नसल्याने तसेच हे पद वेतनश्रेणीत असणे जरुरी आहे. म्हणून शासनाच्या नियमानुसार पुढील वेतन श्रेणी रु. ३७००/- ते ५०००/- दि.१.१.९४ पासून मु.प्रा.म.न.पा.अधिनियम १९४९ चे कलम ४५(३) प्रमाणे ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येतो.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## : पुरवणी विषय पत्रिका :

**विषय क्र. ४४/१ :**

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीनंतर राष्ट्रीय मोर्चाचे सरकार अधिकारा रुढ झालेले आहे. या देशाच्या अकराव्या लोकसभेचे पंतप्रधान म्हणून मा.ना.श्री.एच.डी.देवेगौडा यांची निवड झालेली आहे. त्यांच्या सरकारास हार्दिक शुभेच्छा तसेच मा.पंतप्रधानाच्या अभिनंदन करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | : | श्री. गौतम खरात |
| अनुमोदक | : | श्री. सै.अ.एकबालोद्दीन |
| | : | श्री.मुजीब आलमशाह खान |
| | : | श्री.अ.रशिदखान मामू |
| | : | श्री. हमिउद्दीन ताबा |
| | : | श्री.अब्दुल रऊफ |
| | : | श्री.मोहसिन अहेमद |

: श्री.अलका पाटील
: श्री.आबेदा बेगम
: श्री.प्रकाश निकाळजे

**संवाद :**

श्री. गिरजाराम हाळनोर : सूचकसभागृहात उपस्थित नसल्याने विषय स्थगित ठेवावा.

श्री. रशिदखान (मामू) : एका शासनास आपण हार्दिक शुभेच्छा देत आहोत यात राजकारण नसावे.

मा.महापौर : सूचक उपस्थित नसल्याने प्रस्ताव स्थगित करण्यात येतो.

**ठराव :**

विषयाचे सूचक उपस्थित नसल्याने विषय सर्वानुमते स्थगित ठेवण्यात येतो. आघाडीचे नगरसेवक निर्णयाच्या निषेधार्थ सभात्याग करतात.

**विषय क्र. ४५/२ :**

मो.शहाबाजार (अशोकनगर) येथील नाल्यावरती जमीन एक्वायर करुन गोर-गरीब रहिवाश्यांकरिता टेलरिंग फार्म उघडून देवून प्रशिक्षणाचा लाभ मिळवून देण्याबाबत.

सूचक : सौ.मोहसिना बिल्कीस
अनुमोदक : श्री. मुजीब आलमशाह

**ठराव**

सूचक अनुपस्थित असल्याने ठराव सर्वानुमते स्थगित करण्यात येतो.

**विषय क्र. ४६/३ :**

मो.शहाबाजार भोईवाडा येथील तोडण्यात आलेले जुने स्वच्छता गृहाच्या जागेवर तेथील रहिवाशांकरिता व्यायामशाळा बांधण्याबाबत प्रस्ताव सादर.

सुचक : सौ. मोहसिना बिल्कीस
अनुमोदक : श्री. मुजीब आलमशाह खान

**ठराव :**

सूचक अनुपस्थित असल्याने ठराव सर्वानुमते स्थगित करण्यात येतो.

**विषय क्र ४७/४. :**

मो.शहाबाजार (अशोकनगर) येथील गौरीशंकर रोडवर असलेल्या तीन स्वच्छता गृहांपैकी एक स्वच्छतागृह तोडून त्या ठिकाणच्या रहिवाश्यांसाठी परिसरातील इतर नागरिकांकरिता एक मंगल कार्यालय बांधून देण्याबाबत प्रस्ताव सादर.

**ठराव :**

सूचक अनुपस्थित असल्याने ठराव सर्वानुमते स्थगित करण्यात येतो.

**विषय ४८/५ :**

चिकलठाणा येथे नव्याने उभारण्यात आलेल्या बाजार संकुलाचे नुकतेच उद्‌घाटन करण्यात आले असून सदर ठिकाणी बाजार भरविण्यात येत आहे. बाजाराची सध्या उपलब्ध करुन देण्यात आलेली जागा ३ एकर असून ही जागा बाजारासाठी अपुरी पडत आहे. गट नं.४१० मधील पुर्व बाजूस असलेली ३ एकर जागा भुसंपादन करुन बाजारासाठी खरेदी

केल्यास बाजारास प्रशस्त जागा मिळेल व्यापारी, किरकोळ विक्रेते व ग्राहकांची गैरसोय दुर होईल. रहदारीस अडथळे येणार नाहीत. अपघात होणार नाहीत. बाजारात भरपुर जागा उपलब्ध झाल्याने महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल.

प्रस्ताव विचारार्थ मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री. कचरु नवपुते
अनुमोदक : श्री. जयवंत ओक
श्री. सुदाम सोनवणे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार चिकलठाणा येथे नव्याने उभारण्यात आलेल्या बाजार संकुलास उपलब्ध करुन देण्यात आलेली ३ एकर जागा अपुरी पडत असल्याने गट नं.४१० मधील पुर्व बाजूस असलेली ३ एकर जागा भुसंपादन करुन बाजारासाठी उपलब्ध करुन देण्यासाठी सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९/६ :**

महानगरपालिकेच्या मुख्य सभागृहामध्ये सावित्रीबाई फुले अहिल्याबाई होळकर, इंदिरा गांधी, रजिया सुल्ताना मातोश्री रमाबाई आंबेडकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई इ.क्रातीकारक महिलांचे तैलचित्र लावण्याबाबत. प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : सौ. लता शकुंतला धांडे
अनुमोदक : सौ. लता दलाल
: सौ. अलका पाटील
: यशोदा धनंजय वाडेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार महानगरपालिकेच्या मुख्य सभागृहामध्ये सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, झाशीची राणी, लक्ष्मीबाई इ. क्रांतीकारक महिलांची तैलचित्रे लावण्यासाठी सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०/७ :**

अ) पाणी पट्टी व मालमत्ता कर वसुली करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दरमहा रु.१००/- (शंभर रुपये) वाहन भत्ता देण्यात यावा.

ब) नागेश्वर मंदिर नागेश्वरवाडी ते जुने उच्च न्यायालय व्हाया समर्थनगर ह्या रस्त्याचे स्वातंत्र्यवीर सावकर मार्ग असे नामकरण करणे बाबत.

सुचक : सौ. लता दलाल
अनुमोदक : सौ. रजनी जोशी

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्यानुसार पाणी पट्टी व मालमत्ता कर वसुली करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दरमहा रु.१०० वाहन भत्ता देण्यास तसेच जुने उच्च न्यायालय व्हाया समर्थनगर रस्त्याचे स्वातंत्र्यवीर सावकरकर मार्ग असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ५१/८ :**

वॉर्ड क्र.३६ नवाबपुरा, जिन्सी, रेंगटीपूरा, रणमसतपुरा, बुक्कलगुडा, शहबाजार, तेलंगवाडा व नवाबपुरा हे सर्व एकत्र करुन नवाबपुरा वॉर्ड रचण्यात आला हे सर्व भाग शहराचे जुने भाग असून या भागात अनेक ठिकाणी आजही निजामी राजवटीची वॉटर

सप्लाय पाईप लाईन टाकलेली असून ती अनेक ठिकाणी फुटलेली असून त्यास रिपेअर करणे ही अवघड जात असून दर आठवडयात कुठेही काहीही तांत्रिक बिघाड झाला तर अनेक ठिकाणी पाण्याचा त्रास होतो.

तरी या भागाचा सर्व पाईप लाईन बदलणे अत्यंत आवश्यक असून सभागृहात जुनी पाईप लाईन ऐवजी नविन पाईप लाईन टाकणेचा ठराव मंजुरीसाठी ठेवण्यात येतो. (''पाईप लाईन'')

सुचक : श्रीमती जाहेदा बेगम म.जगीर
अनुमोदक : सौ.अलका पाटील
: श्रीमती आबेदा बेगम

**ठराव**

स्थगित ठेवण्यात येवून पुढील बैठकीत विचारार्थ परत सादर करण्यबाबत सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२/९ :**

औरंगाबाद शहरामधील सर्व ६० अनाधिकृत वसाहती अधिकृत करणेत याव्यात. येथील सर्व घरांना महानगरपालिकेमार्फत मालमत्ता व इतर कर आकारण्यात येवून वसूल करण्यात यावे. सर्व अनधिकृत वसाहती मधील विविध आरक्षणे काढून टाकण्यात यावे. कारण या सर्वस वसाहती ९० टक्के विकसीत झालेल्या आहेत. येथील रहिवाश्यांना सर्व मुलभूत नागरी सुविधा उदा. रस्ते, पाणी, ड्रेनेज, विद्युत महापालिकेमार्फत पुरविण्यात याव्या. सदर प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देवून शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविणेस्तव प्रस्ताव विचारार्थ

सुचक : श्री. जयवंत ओक
: श्री. कचरु नवपुते
: श्री. महादेव सुर्यवंशी
: श्री.सुदाम सोनवणे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरातील अनधिकृत वसाहती अधिकृत करण्याबाबत व या भागातील मालमत्ता वरील मालमत्ता व इतर कर आकारण्यात येवून वसुल करण्याबाबत व या वसाहतींना सर्व मुलभूत नागरी सुविधा पुरविण्याबाबत सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३/१०** : वॉर्ड क्र.५३ भडकलगेट येथील ज्युब्लीपार्क येथे सिग्नलच्या पश्चिमेस एक सौंदर्यकण धबधबा बांधण्यात आलेला असून त्याठिकाणी चार रस्ते मिळतात, शिवाय तेथे बस स्टॉप असल्यामुळे व मेडीकलमध्ये रस्तास जात असल्यामुळे तेथे पाणपोईची आवश्यकता आहे. त्या ठिकाणी टाकी ५ X ७ बांधून देवून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा होईल. तरी पिण्याच्या पाण्याची टाकी (पाणपोई) करुन देण्यात यावी.

सुचक : सौ. अलका पाटील
अनुमोदक : श्रीमती जाहेदा बेगम

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार वॉर्ड क्र.५३ भडकलगेट येथील ज्युब्ली पार्क येथे सिग्लनच्या पश्चिमेकडे ५ X ७ ची पाणपोईसाठी पाण्याची टाकी उपलब्ध करुन देण्याबाबत सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४/११ :**

मो.जवाहर कॉलनी भागातील महानगरपालिकेतर्फे नव्यानेच बांधण्यात आलेल्या भाजी मंडीईस ''सावित्रीबाई फुले'' यांचे नाव देण्यात यावे.

सुचक : सौ. राधाबाई तळेकर
अनुमोदक : सै.अ.इकबालोद्दीन
: सौ. मोहसिना बिल्कीस
: श्री. मनमोहनसिंग ओबेराय

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार जवाहर कॉलनी भागातील महानगरपालिकेतर्फे नव्यानेच बांधण्यात आलेल्या भाजी मंडईस सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५/१२**

चेलीपुरा प्रा. शाळा ही शाळा ८ वर्षापूर्वी चेलीपुरा ह्या विभागात होती. परंतु आता ही शाळेची नवीन इमारत शहागंज, कक्कलगुडा या विभागात उभारण्यात आलेल्या आहे. आणि ही शाळा या इमारतीत सुरू आहे. म्हणून ह्या शाळेचे नामांतर करून शहागंज प्रा. शाळा क्र. ५ असे करण्याचा प्रस्ताव सादर.

सुचक - श्रीमती जाहेदा
विषय - सै. अ. इकबालोद्दिन.
सौ. मोहसिना बिल्कीस
श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय

**ठराव :**

सुचक-अनुमोदक सभागृहात उपस्थित नसल्याने विषय सर्वानुमते स्थगित ठेवण्यात येतो.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६/१३ :**

औरंगाबाद महानगरपालिकेत शिक्षणाधिकारी हे पद प्रतिनियुक्तीने भरण्यात येते. शिक्षणाधिकारी पदावर कार्या असलेले सध्याचे शिक्षणाधिकारी हे शिक्षण विभागातील दैनंदिन कामात निष्काळजीपणा करतात त्यांचे प्रतिनियुक्तीचे कालावधीत महापालिका शाळांचा दर्जा घसरला असून ते शाळांची तपासणी करीत नाहीत. शालेय शिक्षकांना हेतुपुरस्पर त्रास देतात. त्यांचे बाबतीत अनेक शिक्षकांच्या तक्रारी केलेल्य आहेत. शिक्षणाधिकारी हे महापालिका नगरसेवक तथा पदाधिकाऱ्यांना सहकार्य करत नाहीत. सध्याचे शिक्षणाधिकारी अकार्यक्षम असून शालेय विद्यार्थ्यांचे भविष्यांचा विचार करता, त्यांना त्यांचे मुळ खात्याकडे परत पाठविण्यात यावे व त्यांचे जागी कर्तव्यदक्ष व हुशार कार्यक्षम शिक्षणाधिकाऱ्यांची मागणी करुन हे पद भरणेबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री. जयवंत ओक
: श्री. नरसिंग ढगे
: श्री.कचरु नवपुते
: श्री. महादेव सुर्यवंशी
अनुमोदक : सौ. लता दलाल
: सौ. रजनी जोशी
: श्री. संजय जोशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविण्यात आल्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेत शिक्षणाधिकारी हे पद प्रतिनियुक्तीने भरण्यात येते. शिक्षणाधिकारी पदावर कार्यरत असलेले सध्याचे शिक्षणाधिकारी शिक्षण विभागातील दैनंदिन कामात निष्काळजीपणा करतात, त्यांचे प्रतिनियुक्ती कालावधीत महापालिका शाळांचा दजा घसरला असून ते शाळांची तपासणी करीत नाहीत. यररलेस शिक्षकांना हेतुपुरस्पर त्रास देतात. त्यांचे बाबतीत अनेक शिक्षकांनी तक्रारी केलेल्या आहेत. शिक्षणाधिकारी हे महापालिका नगरसेवक तथा पदाधिकाऱ्यांना सहकार्य करीत नाहीत. सध्याचे शिक्षणाधिकारी अकार्यक्षम असून विद्यार्थ्यांचे भविष्याचा विचार करता त्यांना त्यांचे मुळ खात्याकडे परत पाठविण्यास व त्यांचे जागी कर्तव्यदक्ष व हुशार कार्यक्षम शिक्षणधिकारी मागणी करुन हे पद भरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७/१४ :**

चिकलठाणा येथील अहिल्याबाई होळकर चौकाचे वाहतुकीचे दृष्टीने रुंदीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. तरी त्या चौकाचे रुंदीकरण व सुशोभीकरण करण्याचा प्रस्ताव सादर.

सुचक : श्री. संजय जोशी
अनुमोदक : सौ. अलका पाटील

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्यानुसार अहिल्याबाई होळकर चौकाचे वाहतुकीचे दृष्टीने रुंदीकरण करण्यास व त्या चौकाचे सुशोभीकरण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८/१५ :**

प्रस्ताव देण्यात येतो की, आपल्या महापालिकेतर्फे प्रॉजेक्ट विभागातर्फे दरवर्षी महिलांसाठी व्यवसाय प्रशिक्षण देत असतो. सदरील प्रशिक्षण केंद्र वॉर्ड क्र.५३ भडकलगेट मनपाच्या क्वार्टस लागून काही जागा रिकामी असून तेथे महापालिकेने एक प्रशिक्षण केंद्र शाळा बांधून देण्याचे करावे. आजुबाजूच्या वॉर्डात कुठेही व्यवसाय प्रशिक्षणाचे शाळा नाही. त्यामध्ये खालील व्यवसायाचे प्रशिक्षण द्यावे. तसेच हे केवळ महिला करीताच असेल.

व्यवसाय प्रशिक्षणाचे नाव :

१. पाकीट बनविणे
२. शिक्षण काम
३. हस्तकला
४. खडू बनविणे
५. बुक बायडिंग
६. पर्स बनविणे

७. फाईल बनविणे
८. टेलिफोन ऑपरेटर
९. फोर व्हिलर ट्रेनिंग

सुचक : सौ. अलका पाटील
अनुमोदक : श्री. नरसिंग ढगे
: श्री. संजय जोशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार वॉर्ड क्र.५३ भडकलगेट महानगरपालिकेच्या क्वार्टसला लागून रिकाम्या असलेल्या जागेवर एक प्रशिक्षण केंद्र शाळा बांधून देण्यात या प्रशिक्षण केंद्र शाळेत प्रस्तावात दर्शविलेले नऊ व्यवसायाचे प्रशिक्षण महिलांना देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९/१६ :**

महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात असलेला सर्व्हे नं.५५ लगत जणारा उत्तर दक्षिण १८ मिटरचा रस्ता व ५५ लगतच जाणारा पूर्व-पशिचम १८ मिटरचा रस्ता तयार करणेसाठी जमीन भुसंपादित करुन रस्ता विकसीत करण्यात यावा.

सुचक : श्री. नरसिंग ढगे
: श्री.प्रभाकर विधाते
अनुमोदक : श्री. संजय जोशी
: श्री. धिरज खखोरडीया

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात असलेला सर्व्हे नं.५५ लगत जाणारा रस्ता उत्तर दक्षिण १८ मीटर व ५५ लगतच जाणारा पुर्व पश्चिम १५ मिटरचा रस्ता तयार करण्यासाठी जमीन भुसंपादीत करुन रस्ता विकसीत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०/१७ :**

औरंगाबाद शहरातील मनपाच्या मालकीच्या सर्व भाजी मंडईतील गाळे धारकांनी सतत ३ महिने भाडे भरले नाही तर ४ थ्या महिन्यात नोटीस देवून त्याचा भाडेपट्टा रद्द करण्यात येईल. असा नियम करण्यात यावा.

सुचक : सौ. दलाल लता
अनुमोदक : श्री. संजय जोशी

**ठरावः** प्रस्तावात दर्शविल्यानुसार औरंगाबाद शहरातील महानगरपालिकेच्या मालकीच्य सर्व भाजी मंडईतील गाळे धारकांनी सतत तीन महिने भाडे भरले नाही तर चौथ्या महिन्यात नोटीस देवून त्यांचा भाडेपट्टा रद्द करण्यात येईल असा नियम करण्याबाबत सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सायंकाळी ६.०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | मा.महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १७.८.९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**शनिवार दि.१७.८.१९९६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.महापौर श्री. गजानन बारवाल यांच्या अध्यक्षतेखाली कै.केशव सिताराम ठाकरे सभागृहात औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभेस वंदे मातरम् ह्या राष्ट्रगीताने सुरुवात झाली.**

या सभेत कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. श्री.डॉ.विजयकुमार मेहेर | उप.महापौर |
| २. श्री. गिरजाराम हाळनोर | स.सदस्य |
| ३. श्री.जयवंत केशवराव ओक | --''-- |
| ४. श्री.मुजीब आलमशाह मीर आलमशाह | --''-- |
| ५. सौ.रुखमनबाई खंडेराव लोंखडे | --''-- |
| ६. श्री.अफसरखान यासिनखाँन | --''-- |
| ७. श्री.प्रभाकर सिताराम विधाते | --''-- |
| ८. सौ.साजेदा बेगम | --''-- |
| ९. श्री.म.सलिम म.हनिफ कुरैशी | --''-- |
| १०.श्री.गौतम भागाजी खरात | --''-- |
| ११.श्री.ॲड.गणेश किशनराव वानखेडे | --''-- |
| १२.सौ.रजनी रमेश जोशी | --''-- |
| १३.सौ.विमलाबाई नंदकुमार मुंडलिक | --''-- |
| १४.सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे | --''-- |
| १५.श्री.गौतम लिंबाजी लांडगे | --''-- |
| १६.श्री.महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --''-- |
| १७.श्री.अभिमन्यु रामभाऊ भालेराव | --''-- |
| १८.श्री.नरेंद्र यादवराव पाटील | --''-- |
| १९.श्री.काशिनाथ हरिभाऊ कोकाटे | --''-- |
| २०.श्री.सुदाम रामदास सोनवणे | --''-- |
| २१.श्री.रविंद्र बाबुराव इंगळे | --''-- |
| २२.श्री.कंवरसिंग किसनसिंग बैनाडे | --''-- |
| २३.सौ.पद्मा बाबुराव शिंदे | --''-- |
| २४.श्री.सुभाष भिकाजी टाकळकर | --''-- |
| २५.श्री.प्रफुल्ल लालचंद मालानी | --''-- |
| २६.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --''-- |
| २७.सौ.धनश्री अशोक विसपुते | --''-- |
| २८.श्री.फजलउल्लाखाँन अजमद उल्लाखान | --''-- |
| २९.श्री.अजीजखाँन गणीखाँ | --''-- |
| ३०.श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | --''-- |
| ३१.श्री.महंमद मुश्ताक अहेमद | --''-- |
| ३२.श्री.वसंत विनायकराव देशमुख | --''-- |

| | |
|---|---|
| ३३.श्री. सौ. मोहसिना बिल्कीस विखोरोद्दिन | --''-- |
| ३४.श्री.अ.जावेद रज्जाक | --''-- |
| ३५.श्रीमती स.जाहेदा बेगम म.जमीर | --''-- |
| ३६.श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे | --''-- |
| ३७.सौ.यशोदा धनंजय वाडेकर | --''-- |
| ३८.श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाल | --''-- |
| ३९.श्री.स.हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन | --''-- |
| ४०.श्री.स.म.अ.रऊफ म.अ.माबुद | --''-- |
| ४१.श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबउद्दीन | --''-- |
| ४२.श्री.धिरज शांतीलाल खखोरडीया | --''-- |
| ४३.श्री.सय्यद अली मीरा सलामी | --''-- |
| ४४.श्री.रमेश दिपचंद लाहोट | --''-- |
| ४५.श्री.फैय्याज अहेमद म.हाजी कुरैशी | --''-- |
| ४६.सौ.मुक्ताबाई सुदाम वाघमारे | --''-- |
| ४७.सौ.लता श्रिनिवास दलाल | --''-- |
| ४८.सौ. अलका रमेश पाटील | --''-- |
| ४९.सौ.शकुंतला हरिदास घांडे | --''-- |
| ५०.श्री.अब्दुल रशिदखान मामू | --''-- |
| ५१.श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह | --''-- |
| ५२.कु.माया लिंबाजी लाडवाणी | --''-- |
| ५३.डॉ.भागवत किशनराव कराड | --''-- |
| ५४.सौ.सविता संजय आव्हाड | --''-- |
| ५५.सौ.निर्मला विठ्ठल कांबळे | --''-- |
| ५६.श्री.अ.रशिद अ.सत्तार | --''-- |
| ५७.श्री.तरवेंद्रासिंह महेंद्रसिंह धिल्लन | --''-- |
| ५८.श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन | --''-- |
| ५९.श्री.मनमोहनसिंग करमसिंग ओबेराय | --''-- |
| ६०.श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे | --''-- |
| ६१.श्री. संजय रामदास जोशी | --''-- |
| ६२.श्री.अविनाश लक्ष्मण कुमावत | --''-- |
| ६३.सौ. ज्योस्ना दौलत हिवराळे | --''-- |
| ६४.श्री.राजकुमार उर्फ सांडू बचाटे | --''-- |
| ६५.श्री.नरसिंग मुरलीधर ढगे | --''-- |
| ६६.श्री.विठ्ठल किसन जाधव | --''-- |
| ६७.सौ.मंदा धनंजय काळुसे | --''-- |
| ६८.सौ.सुनंदा उत्तम कोल्हे | --''-- |
| ६९.श्री.बन्सी तुळशिराम गांगवे | --''-- |
| ७०.श्री.भागवत देविदास घडामोडे | --''-- |
| ७१.श्री.कचरु चंद्रभान नवपुते | --''-- |

स.सभासद श्री. जावेद रज्जाक आणि डॉ.भागवत कराड यांनी सुचविल्याप्रमाणे ज्येष्ठ सेनानी अरुणा आसेफ अली आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठाचे परिक्षा विभाग प्रमुख स्व.दौलतराव येलीकर यांचे निधानानिमित्ताने सभागृहातर्फे ००.०२ मिनीटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी स.सभासद श्री. अफसरखाँ, श्री. स.अली मिरा सलामी, श्री. गौतम लांडगे, श्री. गौतम खरात, श्री. प्रकाश निकाळजे, श्री. फजलउल्लाखान आणि श्री. अभिमन्यु भालेराव यांनी शिक्षणाधिकारी श्री. पंडीत यांच्या बदलीबाबत जातीयवादी मा.महापौरांचा निषेध असो अशा घोषणा देत सभागृहात प्रवेश केला.

त्यास प्रतिउत्तर म्हणून ॲड.गणेश वानखेडे, श्री. संजय जोशी, श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. नरसिंग ढगे, श्री. बन्सी गांगवे, सौ. लता दलाल व इतर स.सभासदांनी प्रतिघोषणा दिल्या.

मा.महापौर : स.सभासदांना विनंती करण्यात येते की, (वारंवार) सभासदांना अशा प्रकारे सभागृहात गोंधळ घालू नये. अन्यथा अशा सभासदांवर कार्यवाही करण्यात येईल. तसेच ज्या सभासदांना नियमबाह्य पोशाख परिधान केला आहे तो बदलून टाकावा. स.विरोधी पक्षनेता यांनी याबाबत दखळ घ्यावी. स.सभासदांनी कृपया असे गैरवर्तणूक करु नये. अन्यथा अशा सभासदांना सभागृहाबाहेर घालवण्यात येईल व सभासदत्व रद्द करण्यात येईल. याची दखल घ्यावी. हे सन्माननीय सभागृह आहे. सभागृहात असे वागणे योग्य होणार नाही. स.सभासदांना ज्या सुचना करावयाच्या आहेत त्यांसाठी वेळ देण्यात येईल. तत्पूर्वी स.सभासदांनी आक्षेपार्ह कपडे बदलून टाकावे. यानंतर आघाडीचे सदस्य सभागृहात घोषणा देतात. त्यापैकी काही सदस्यांनी मा.महापौरांच्या आसनासमोर बैठक मारली.

श्री. मनमोहनसिंग ओबेराय : शिक्षणाधिकारी यांच्या बदलीबाबत जो ठराव झाला आणि त्यावर चर्चा करण्यात यावी. झालेला ठराव योग्य नाही.

मा.महापौर : शिक्षणाधिकारी यांचे बदलीबाबत सभागृहाने निर्णय घेतलेला आहे. जो विषय पुन्हा चर्चेला घेतला जाणार नाही. सर्व सभासद एकाच वेळी बोलताता घोषणा देतात.

श्री. गिरजाराम हाळनोर : सभागृहाचे वातावरण विनाकारण खराब करण्यात येत आहे. उपआयुक्त-२ पद निर्माण करुन ज्या अधिकाऱ्यांना ह्या पदावर बसविण्यात आले आहे तो उपआयुक्त-२ पदाचे अधिकारी सुध्दा आमचे दलित बांधव आहेत. याची विरोधकांना कल्पना असावी. आमचे अनेक अधिकारी हे सुध्दा दलित बांधव आहेत. विरोधक विनाकारण राजकारणासाठी विरोध करत आहे. तेव्हा जे स.सभासद आदेशाचे पालन करत नाही अशा सभासदांवर नियमाप्रमाणे कार्यावाही करण्यात यावी.

मा.महापौर : स.सभासदांना पुन्हा पुन्हा विनंती करण्यात येते की, सभासदांनी अशा प्रकारचे गैरवर्तन करु नये. (अनेक सभासद एकाच वेळी बोलत होते) सभासदांनी आपआपल्या जागेवर बसावे. अनेक सभासद घोषणा देतात.

सभागृहात घातलेला गोंधळ आणिक कार्ये यामुळे आजची सभा ००.१० मिनिटांनी तहकुब करण्यात येते. अशी घोषणा मा.महापौर यांनी केली. वेळ अंदाजे ११.४०

तहकुब करण्यात आलेली सभा सुमारे १२.४५ वाजता पुन्हा सुरु झाली.

(अनेक सभासद ............. घोषणा देतात/प्रतिघोषणा देतात)

मा.महापौर : यापूर्वी सभागृहात जे प्रकरण घडले ते बाजूला ठेवून स.सभासदांनी इतिवृत्ताबाबत चर्चा करावी.

श्री. हमीदउद्दीन ताबा श्री.अफसरखान : महानगरपालिका अधिकाऱ्यांना सभात्याग कशासाठी केला. अधिकाऱ्यांना सभात्याग करण्याचा अधिकार नाही. हा मा.महापौरांचा अपमान आहे. मा. आयुक्त यांचे अंगाला कोणीही हात लावलेला नाही. फक्त मा. आयुक्त यांचेशी चर्चा करण्यासाठी स.सभासद गेले होते. अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी.

मा.महापौर : मा.आयुक्त मा.विरोधी पक्षनेता यांचेशी चर्चा झाली त्यावेळी मा.आयुक्तांचे अंगावर कोणीही धावून आले नसल्याची कबुली मा.आयुक्तांनी दिली आहे. अधिकाऱ्यांचा गैरसमज झालेला आहे. तो मी दूर करतो. अधिकाऱ्यांनी झालेला गैरसमज दूर करुन सभागृहात बसावे अशी त्यांना सूचना करण्यात येत आहे.

श्री. मनमोहनसिंब ओबेराय : मा.आयुक्तांनी प्रथम खुलासाकरावा त्यानंतर पुढील कार्यवाही करावी.

श्री. गिरजाराम हाळनोरः स.सभासदांचा तसा हेतू नव्हता असा खुलासा सभासदांकडून झालेला आहे. अधिकाऱ्यांचा गैरसमज झालेला आहे. तो गैरसमज दूर करण्यात यावा व अधिकाऱ्यांना पुन्हा सभागृहात बोलावण्यात यावे.

मा.महापौरः मा.आयुक्त खुलासा करतील मा.आयुक्तांनी अधिकाऱ्यांना सभागृहात घेवून यावे. सर्व सभासदांनी जागेवर बसावे. शांतत राखावी.

(अनेक सभासद एकाच वेळी बोलतात)

मा.आयुक्तांसह सर्व अधिकारी सभागृहात आलेले आहेत.

हमीदउद्दीन ताबा : मा.आयुक्तांना विनंती करण्यात येते की, काय झालं याचा खुलासा.

मा.महापौर : सभा पुन्हा सुरु होते. स.सभासदांनी आपआपले विषय व्यवस्थित मांडावेत व व्यवस्थित सूचना मांडाव्यात. एका वेळी एकाच सभासदाने सुचना मांडाव्यात अशी विनंती करण्यात येते.

श्री. रशिद मामू : सर्वप्रथम अधिकाऱ्यांनी सभागृहाबाहेर का गेले याचा खुलासा कररण्यात यावा. ज्यावेळी नविन आयुक्त येतात त्यावेळी अधिकारी बाहेर जातात. यापूर्वी सर्व नविन आयुक्तांच्या वेळी एक-एक वेळ अधिकारी सभागृहाबाहेर गेले होते याचा अर्थ आम्ही सर्व एकच आहोत असा दाखविण्यासाठी अधिकारी सभागृहाबाहेर जातात काय? सर्व स.सभासद आणि कर्मचारी हे सर्व एकच आहेत. अधिकारी किंवा सभासद वेगवेगळे नाहीत.

मा.महापौर : हा विषय येथे संपविण्यात यावा. उगाच हा विषय वादविवादाचा बनवू नये. स.सभासद श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांचेशी या विषयाबाबत

कॅबिनमध्ये बसून चर्चा झाली व तो विषय मिटलेला आहे. तेव्हा त्यावर चर्चा करणे योग्य वाटत नाही.

श्री. हमीदउद्दीन ताबा : आघाडीच्या नगरसेविकांची बदनामी झाली आहे. तेव्हा याबाबत खुलासा झालाच पहिजे.

मा.विरोधी पक्षनेता (श्री. मुजीब मालमशा खान) : कॅबिनमध्ये ह्या विषयांवर चर्चा झाली. मा. आयुक्तांनी कोणताही प्रकार झाला नसल्याचा खुलासा केला. याबाबत मा. महापौर यांनी सर्वांचा गैरसमज दूर केलेला आहे. तेंव्हा आपण सर्वांनी विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : कॅबिन मध्ये झालेल्या चर्चेनुसार खुलासा झाला असला तरी मा. आयुक्त व अधिकारी सभागृहातून उठून गेले. याबाबत मा. आयुक्तांकडून खुलासा व्हावयास पाहिजे अशी आमची विनंती आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी निवेदन दिले होते. त्याबाबत डॉ.रझवी सभागृहात खुलासा करत आहे.

श्री. हमीउद्दीन ताबा : अधिकाऱ्यांनी निवेदन दिलेच नाहीत तर अधिकारी सभैंत्याग कसा करतात.

डॉ. विजयकुमार मेहेर : मा. आयुक्तांचा अवमान झाला असा गैरसमज अधिकाऱ्यांचा झाला होता.

मा.महापौर : काय घडलं याबाबत मा.आयुक्त खुलासा करीत आहे. तेव्हा मा.सभागृहाकडे कृपया त्याकडे लक्ष द्यावे.

श्री. गिरजाराम हाळनोर : डॉ.रझवी हे अधिकारी संघटनेचे अध्यक्ष आहेत ते सभागृहात खुलासा करतील. अधिकारी सभागृहातून बाहेर का गेले याबाबत मा.आयुक्तकडून खुलासा झाला पाहिजे अशी मागणी स.सभासद करतात.

मा.महापौर : प्रथम अधिकारी सभागृहातून बाहेर गेले होते. त्यानंतर मा.आयुक्त सभागृहाबाहेर गेले होते. तेव्हा प्रथम अधिकारी बाहेर का गेले या बाबत अध्यक्ष डॉ.रझवी खुलासा करतील. त्यानंतर मा.आयुक्त खुलासा करतील. कृपया सर्व सभासदांनी जागेवर बसावे. मा.विरोधी पक्षानेता बोलतील.

मा.महापौर : स.सभासद श्री. ओबेराय यांनी प्रथम खुलासा ऐकून घ्यावा. खुलासा करण्याबाबत आपण मागणी केली आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेराय : मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.महापौर : स.सभागृहास विनंती आहे की, आपणांस खुलासा नको असेल तर विषय क्र.१ चर्चेला घ्यावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेराय : इतिवृत्त कायम करण्यापूर्वी आण चर्चा केल्याप्रमाणे ज्या विषयवर गरमागरम चर्चा झाली त्यावर चर्चा झाली तर त्यानंतर इतिवृत्तावर चर्चा करण्यात येईल.

मा.महापौर : स.सभासद श्री. ओबेराय आपण परवानगी दिली म्हणून इतिवृत्तावर चर्चा सुरु केली आहे ता विषय पुढे आला की, त्यावर चर्चा करु. सर्व सभासदांनी कृपया खाली बसावे. आपणा सर्वांना विनंती करण्यात येते

की, सभासदांनी विषय क्र.-१ दुरुस्तीसाठी द्यावा. दुरुस्ती सुचवतांना प्रथम पान क्र. व विषय क्रमांक सुचवावा अशी आपणा सर्वातर्फे विनंती करण्यात येते.

श्री. मनमोहनसिंग ओबेराय : शिक्षणाधिकारी यांच्यावर जेवढे आरोप ठेवण्यात आले होते ते दुरुस्त करण्यात यावे. असे ठरले आहे. त्याप्रमाणे तो ठराव दुरुस्त करण्यात यावा. तसेच दुसरे शिक्षणाधिकारी जोपर्यंत येत नाही. तोपर्यंत श्री. पंडीत यांना कार्यरत ठेवण्यात यावे. अशी इतिवृत्ता दुरुस्ती करण्यात यावी. अशी सभागृहनेता व विरोधपक्षनेता यांचीही मागणी आहे.

**विषय क्र.६१/१** : दिनांक २०.७.९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री. नरेंद्र पाटील : इतिवृत्त कायम करण्यापूर्वी १/२ बाबींचा मला सभागृहापुढे उल्लेख करावयाचा आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : इतिवृत्तावर चर्चा सुरु झालेली आहे. स.सभासद श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांच्या सुचनेशी मी सहमत आहे. पान नं.५२ वरील शिक्षणाधिकारी पंडीत यांचे ठिकाणी प्रभारी शिक्षणधिकारी म्हणून ते काम करतात. त्यांना पॉलिसी मॅटरवर काम करण्याचा अधिकारी द्यावा. ठरावातील आक्षेपार्ह वाक्य रचना ह्या ठरावातून वगळण्यात यावी आणि जोपर्यंत नविन शिक्षणाधिकारी येत नाही तोपर्यंत त्यांना कार्यमुक्त केले असले तरी चार्ज त्यांचकडूनच राहील ह्यांची नोंद घ्यावी.

मा.महापौर : मा.सभागृहातील सर्व स.नगरसेवकांच्या भावना लक्षात घेता शिक्षाणाधिकारी श्री.पंडीत एस.आर.यांनी जोपर्यंत नविन शिक्षणाधिकारी येत नाही तोपर्यंत शिक्षाणाधिकारी पदाचा चार्ज त्यांच्याकडेच राहील. यानंतर स.सभासद श्री. नरेंद्र पाटील बोलतील.

श्री. नरेंद्र पाटील : महानगरपालिका पदाधिकाऱ्यांचा कार्यालयातील कार्यकाळ फलक या पूर्वीच्या नगसेवकांच्या नावांचा (६०) कार्यकाळ फलक या सभागृहात यावा. ही विनंती सभागृहाने मान्य करण्यास काही हरकत नाही तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या सभागृहाची (बॉडी) निवडणूक पंचायत राज्य पध्दतीनुसार झालेली आहे. मा.महापौर, उपमहापौर यांच्या निवडी व्यतिरिक्त पंचरात राज्य कायदा अस्तित्वात आहे असे वाटत नाही. वॉर्ड समितीची स्थापना करण्याबाबत वारंवार मागणी करण्यात आलेली आहे. उद्याप यावर कार्यवाही झालेली नाही. येत्या ३० दिवसात वॉर्ड समितीची स्थापना करणे बाबत कार्यवाही झाली नाही तर पुढच्या वेळेस हे सभागृह आम्ही चालू दिला जाणार नाही. हे ८२ नगरसेवकांची मागणी आहे. व्यक्तिगत मागणी नाही. सभागृहात मागणी ठेवण्याचा अधिकारी आहे.

मा.महापौर : स.सभासद श्री. पाटील इतिवृत्तावर चर्चा चालू असतांना आपणांस बोलण्याची परवानगी दिली याचा अर्थ आपण सर्व काही दूसरे विषय

घेवू नका आपलं म्हणणं जरुर योग्य असेल. योग्य आहे अस आपण समजून चालू पण याप्रकारे विषयांतर करु नका.

श्री. नरेंद्र पाटील :चार महिन्यापूर्वी सभागृहात जि.प.शिक्षक भरी करु नये असा निर्णय झाला आहे. यात सभागृहाचा हक्कभंग झालेला आहे.

मा.महापौर : प्रथम इतिवृत्तावर चर्चा होईल. त्यानुसार शिक्षणाधिकारी श्री. पंडीत यांचे ठरावावर चर्चा चालू आहे. इतिवृत्त कायम झाल्यानंतर यवर चर्चा करण्यात येईल. व सर्व शंकाचे निरासन करता येईल्.

श्री. गिरजाराम हाळनोर : पान नं.१२ बोलत असताना जेसीबी मशिन खरेदी बाबत बोलत असतांना इतिवृत्तांत जेटींग मशिन खरेदी अअसा उल्लेख आलेला आहे. तेव्हा ‘‘जेटींग’’ मशिन ऐवजी ‘‘जेसीबी’’ मशिन अशी दुरुस्ती करण्यात यावी.

मा.महापौर : पान नं.१२ वर चुकून ‘‘जेटींग’’ मशिन असा शब्द आलेला आहे. त्या ऐवजी ‘‘जेसीबी’’ मशिन अशी दुरुस्ती करण्यास मंजूरी देण्यात येते.

श्री. गिरजाराम हाळनोर : पान १४ ठराव क्र.८/६ मागील सभेत स्थगित ठेवण्या आला होता. त्यास मंजूरी देण्यात यावी.

मा.महापौरः त्या ठरावास मंजूरी देण्यात येते.

श्री. गिरजाराम हाळनोर : पान नं.४७ ठराव क्र.४०/१ नुसार या आदेशाचे पंतप्रधान श्री.देवेगौडा यांच्या अभिनंदनाचा ठराव ठेवला होता. त्यावेळी आघाडी नगरसेवक सभागृहात नव्हते. तो ठरावही या ठिकाणी मंजूर करण्यात यावा. पान २१ य ठिकाणी कर्मचाऱ्यांच्या दुरुस्तीबाबतचा ठराव स्थगित ठेवण्यात आला होता. ह्या ठरावास मंजूरी देण्यात यावी.

मा.महापौर : ह्या ठरावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

श्री. मुश्ताक अहेमद : त्या ठरावास मान्यता देण्यात येवू नये. ह्या बाबत चर्चा करण्यात यावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : सभागृहात जी ध्वनीक्षेपणाची व्यवस्था करण्यात आलेली ती चूक आहे. ज्या गुत्तेदाराने हे काम केले असेल त्याचे कामाचे बील गुत्तेदाराला दिले नसेल तर ते रोखण्यात यावे.

मा.महापौर : सभागृहात जी ध्वनिक्षेपणाची व्यवस्था केलेली आहे त्या बाबत संबंधित अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी व ह्यापुढे ध्वनीक्षेपणाबाबत तक्रार येता कामा नये ह्याची नोंद घ्यावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : ध्वनीक्षेपणाची व्यवस्था बरोबर नाही हे बरोबर असले तरी त्याचे बील रोखणे योग्य होणार नाही. या सभागृहात पंख्याची व्यवस्थाही नाही. ती करण्यात यावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : पान २५ ठराव नुसार नगरसेवकांना गाडी खरेदीबाबत जे वक्तव्य नोंदविले आहे. त्यावेळी मा.महापौरांनी ज्या नगरसेविका गाडी खरेदी करु इच्छितात त्यांनी मागणी केल्यास त्यांना एक वर्षाचे मानधन एक रक्कमी देता येईल का? असा प्रशन विचारला होता. परंतु या वाक्यात ‘‘का?’’ हा शब्द नोंदवला गेला नाही तो नोंदविण्यात यावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेराय : नगरसेविकांना गाडी खरेदीसाठी एक रक्कमी माधन देण्यात मंजूरी दिलेली आहे.

मा.महापौर : एक रक्कमी मानधन देण्यास मंजूरी दिलेली नाही. अशी मंजूरी दिली तर सर्व सभासदांचे सभासदत्व रद्द होतील याची कृपया दखल घ्यावी. रत्नागिरी मध्ये सभासदांनी मालमत्ता कर रद्द करुन घेण्याचा ठराव केला असता त्यांचे सभासदत्व रद्द झाले. तेव्हा असे निर्णय घेणे योग्य होणार नाही. मानधन कधीही एक रकमी देता येत नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : स.सभासद श्री. नरेंद्र पाटील यांनी सांगितले होते की, ३०/४० नगरसेवकांना अशी रक्कम देण्यात यावी. परंतु सभागृहाला तसे करता येणार नाही. कारण महानगरपालिकेचा पैसा जनतेच्या कामासाठी वापरला गेला पाहिजे. नगरसेवकांसाठी वापरता येत नाही.

श्री. मनमोहनसिंग ओबेराय : मा.महापौरसाहेब जनतेची काळजी तुम्ही करु नका अनेक ए.सी.बसविले आहेत. आमच्या नगरसेविका गरिबीतून निवडून आलेल्या आहेत. नगरसेविकांना ज मानधन मिळते ते बारा महिन्याचे मानधन ॲडव्हान्स म्हणून देण्यात येणार होते. सुविधा म्हणून पैसा घेण्यात येणार होता. फक्त लोन म्हणून पैसा देण्यात येणार होता. लोकांची दिशाभूल करु नका.

श्री. गिरजाराम हाळनोर : ए.सी.मशिन महानगरपालिकेच्याच इमारतीत लावलेले आहेत.

मा.महापौर : स.सभासदांनी कृपय आरोप करु नयेत. मानधान एक रक्कमी घेता येत नाही. हा गंभीर विषय आहे. एक रक्कमी मानधन घेतलं तर आपलं सभासदत्व रद्द होईल.

श्री. गिरजाराम हाळनोर : स.सभासद या सभागृहाचे कधी महापौर राहिले आहे नगरसेवकांना जे मिळते ते मानधन आहे. पगार नाही. मानधन कधीही एक रकमी देता येत नाही. पगार देता येतो.

मा.महापौर : स.सभासद श्री. संजय जोशी बोलत आहेत.

श्री. संजय जोशी : सर्व अधिकाऱ्यांना वाहन खरेदीसाठी कर्ज देणार आहोत आणि ह्या अधिकाऱ्यांना अलाऊन्स पोटी रु.३०००/- देणार आहोत. रु.२५ प्रतिलिटर प्रमाणे रु.३०००/- मध्ये १२० लिटर पेट्रोल येवू शकते. १२० लिटर पेट्रोलमध्ये एका महिन्या ११००० किमी प्रवास होऊ शकतो. एक महिन्यात हिशोब केला तर फक्त २४ दिवस ऑफिस असते. म्हणजेच २० दिवसात कमीत कमी दररोज ७५ किमी गाडी फिरायला पाहिजे. तेव्हा अलाऊन्स पोटी जे रु.३०००/- देण्यात येणार आहेत. ते एका महिन्यात लागणार आहेत का?

मा.महापौर :चार चाकी गाडी एका लिटरमध्ये फक्त १० किमी फिरु शकते. चार चाकी गाडीचे एव्हरेज कमी असते. तेव्हा देण्यात येणारे रु.३०००/- कमी पडतात. यामध्ये अधिकारी जास्तीत जास्त ६० किमी फिर शकतात. स.सभासद श्री. अ.र.रशिखान (मामू) बोलतील. त्यानंतर स.सभासद श्री. कचरु नवपुते बोलतील. स.सभासदांनी खाली बसून घ्यावे.

श्री. कचरु नवपुते : पान ४६ चिकलठाणा आठवडी बाजाराच्या वाढीव कामाबाबतचा ठराव होता. या आठवडी बाजाराचे उद्घाटनही झालेले आहे. कामही झालेले आहे. या कामास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते. अशी दुरुस्ती करावी.

मा.महापौर : दुरुस्ती मंजूर करण्यात येते. स.सभासद श्री. अ.र.रशिदखान (मामू) बोलतील.

श्री.अ.रशिदखान : पान ३२ ठराव क्र. २ व ३६ हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो. पुढील सर्वसाधारण सभेत संपूर्ण माहिती ठेवण्यात येईल. अशी मंजूरी मिळाली आहे. त्यानुसार माहितीनुसार खुलासा करण्यात यावा.

मा.महापौर : सहासंचालक नगर रचना यांनी याबाबत खुलासा करावा.

सहा संचालक नगररचना : या बाबतचा ठराव झालेला आहे. आवश्यकता भासल्यास सदर ठराव आता दाखवता येईल. दिनांक २०.७.९६ च्या सभेचे इतिवृत्त कालच मिळाले. तथापि पुढील सभेत प्रस्ताव ठेवता येईल.

श्री. मुजीब आलमशाह खान : मागील सर्वसाधारण सभेत स्थगित विषय क्र.२८/२६ स्थगित ठेवून आज एक महिना झाला. तरीही प्रस्ताव ठेवला गेला नाही. प्रत्येक सभेच्या वेळी काही ना काही कारण दाखवून ठराव लांबणी टाकणे हे कुठपर्यंत चालणार. ही सभागृहाची दिशाभूल आहे. सभागृहाचा अपमान आहे.

मा.महापौर : मा.आयुक्तांना विनंती करण्यात येते की, सदर प्रस्ताव (२८/२६) पुढील सभेत कोणत्याही परिस्थितीत ठेवला जाईल अशी व्यवस्था करावी. मा.आयुक्त साहेब याबाबत खुलासा करतील.

मा.आयुक्त : या बाबत सर्वसाधारण प्रथा अशी असते की, सर्वसाधारण सभेत एखादा ठराव पारित झाल्यानंतर पुढील सर्वसाधारण सभेत तो कायम करण्यासाठी ठेवला जातो आणि तो कायम झाल्यानंतर कार्यवाहीसाठी प्रशासनाकडे येतो. मागील सभेचे इतिवृत्त आजच्या सभेत कायम झाल्यानंतर सहा.संचालक तो प्रस्ताव कार्यवाहीसाठी दाखल करतील. तोपर्यंत त्यावर कार्यवाही होवू शकत नाही.

श्री.अ.रशिखान (मामू) : मागील सभेत ठेवला प्रस्ताव व्यवस्थित न सपंल्यामुळे त्याबाबतचे नकाशे इ.माहिती पुढील सभेत देण्यात यावी असा निर्णय मागील सभेत झाला आहे.

मा.महापौर : ठराव क्र.२८/२६ बाबतचे सर्व नकाशे व इतर सविस्तर माहिती सभागृहाकडे ठेवणे आवश्यक होती असे स.सभासदांची मागणी होती. तशी माहिती ठेवण्यात न आल्यामुळे अडचण निर्माण झाली. या बाबीचा विचार करुन सभागृहाने सदर माहिती पुढील सभेत ठेवावी अशी सूचना के ली होती.

मा.आयुक्त : नियम काय आहेत याबाबत खुलासा ह्या ठिकाणी केला आहे.

श्री.अ.रशिदखान (मामू) श्री.अ.जावेद रज्जाक : जो प्रस्ताव सभागृहाकडे ठेवण्यात आला आहे. त्यात स.न.चा उल्लेख असता तरी स.न. कोणत्या भागातील आहे. किती जमीन आहे. कशासाठी ठेवणार याचा बोध झाला

नाही. म्हणून माहितीसाठी प्रस्ताव स्थगित ठेवला होता. तो मंजूर झाला नव्हता. मंजूर झालेल्या ठरावात इतिवृत्त कायम करताना दुरुस्ती करता येते.

मा.महापौर : पुढील सभेत सदर प्रस्तावाबाबत सविस्तर माहिती देण्यात येईल.

श्री. नरेंद्र पाटील : सभागृहात जे ठराव पारित होतात त्या ठरावाबाबत पुढील सभेत सदर कायम केल्यानंतर त्यावर प्रशासनाने कार्यवाही करावी असा नियम आहे. ही बाब खरी असली तरी जो ठराव माहिती देण्यासाठी सभागृहाने स्थगित ठेवून पुढील सभेत माहिती द्यावी असा निर्णय घेतला असेल अशा ठरावाबाबत प्रशासनाने पुढील सभेत माहिती दिली पाहिजे.

मा.महापौर : स.सभासद श्री. मुश्ताक अहेमद बोलतील.

श्री. मुश्ताक : सर्वसाधारण सभा ही महानगरपालिकेची सर्वोच्च सभा आहे. या ठिकाणी जे निर्णय घेतले जातात ते महानगरपालिकेच्या हिताचे असतात पान नं.१४ विषय क्र.८/६ सर्वसाधारण सभेत जे ठराव होतात त्याव महापौर जे रुलिंग देतात त्याची नोंद इतिवृत्ता आली पहिजे. परंतु ह्या ठरावावर चर्चा करतांना मी आर.आर.बाबत उपसमिती नेमण्यात यावी अशी सूचना केली असता अशी उपसमिती नेमण्यात येईल असे रुलिंग मा.महापौरांनी दिली आहे. परंतु ह्या ठरावात आर.आर. वर विचार करण्यासाठी मा.सभापती, विरोधी पक्षनेता मा.आयुक्त, उपआयुक्त यांचा समावेश असलेली उपसमिती स्थापन करण्यात आली असे रुलिंग नोंदविण्यात आले आहे. तर उपसमिती अंटीचेंबरमध्ये स्थापन झाली का?

सभागृह कशासाठी आहे. आर.आर.वर विचार विनिमय करण्यासाठी जर सभागृहात उपसमिती नेमण्याचा निर्णय झाला तर ही उपसमिती कशी? हा सभागृहाचा अपमान आहे. उपसमिती कायम करण्याबाबत मा.महापौरांनी आश्वासन दिले आहे. अशी समिती अद्याप तयार झाली नाही तर इतिवृत्तांत कमिटी बाबत नोंद कशी. ही समिती नियमबाह्य आहे. ही समिती डोमेस्टिक क्रियेशने तयार झाली आहे. सर्व सभासदांनी ह्याचा निषेध करावा.

मा.महापौर : स.सभासद श्री. मुश्ताक अहेमद आपण जे बोलत आहात ते योग्य नाही. सभागृहातच आर.आर.बाबत समितीच्या सदस्यांची नावे जाहिर करण्यात आली आहेत. ज्यात सर्व उल्लेख आहे. या समितीत विरोधी पक्ष नेत्याचाही समावेश आहे.

(काही सदस्य आपआपसांत) बोलतात.

श्री. गिरजाराम हाळनोर : माझ्या बोलण्याचा उद्देश आर.आर. वर विचार करण्यासाठी सभागृहात उपसमिती नेमण्यात आली असतानां स.सभासद अशी समिती नेमण्यात आली नाही असे म्हणतात.

मा.महापौर : कृपया आपण दिलगिरी व्यक्त करावी अशी सूचना मी करतो. श्री. हाळनोर यांची दिली व्यक्त केली .

(काही सदस्य आपआपसांत बोलतात)

मा.महापौर : दिलगिरी व्यक्त केलेली आहे. सभासदांनी सहाकार्य करावे. स.विरोधी पक्षनेता यांनी स.सभासदांना जागेवर बसवावे व सहाकार्य करावे. स.सभासद श्री.मुश्ताक अहेमद बोलतील. स.सभासदांनी आपआपसात बोलू नये. जागेवर बसावे.

श्री. मुश्ताक अहेमद : मी या सभागृहात एका विषयावर चर्चा करता असतांना स.सभासद श्री. हाळनोर यांनी मध्येच बोलून जी हरकत केली तो सर्व सभागृहाचा अपमान आहे. करीता आपणांस विनंती की, श्री. हाळनोर यांना कमीत कमी एक दिवसांसाठी सभागृहाबाहेर पाठवावे. दूसरे असे की, सभापती हे फक्त स्थायी समिती सभागृहात सभापती आहे. या सभागृहात ते फक्त एक सदस्य आहेत आणि त्यांनी सभागृहात सदस्य पुर्ता म्हणूनच रहावे. ते प्रत्येक वेळी आपण एकटेच सभागृहाचे मालक आहोत असे समजतात तेव्हा त्यांना समज द्यावी.

मा.महापौर : स.सभासदांनी विषयांतर करु नये. घडलेल्या घटनेवर पडदा टाकत असताना याबाबत चर्चा करणे योग्य होणार नाही. हा विषय संपलेला ओ. सभासदांनी इतिवृत्त कायम करणेबाबत चर्चा करावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : पान २५ ठराव क्र.२२/२१ अन्वये महापालिका अधिकाऱ्यांना वाहन खरेदीसाठी देण्यात येणाऱ्या कर्जावर ८ टक्के दराने व्याज आकारण्यात येईल असा निर्णय झालेला आहे. यात ८ टक्के ऐवजी ६ टक्के दराने व्याज आकारण्यात येईल अशी दुरुस्ती करण्यात यावी.

श्री.अ.जावेद रज्जाक : मागील सभेत स.सभासद श्री. गौतम खरात व श्री.अशफाक सलामी यांच्याकडून चूक झाली असता माफी मागितल्या नंतरही मा.महापौरांनी उक्त सभासदांना एक दिवसाचे सभासदत्व रद्द करण्याची शिक्षा दिली होती. मा.सभापती यांनीही अशाच प्रकारची चूक केली आहे. तेव्हा विनंती की, मा.महापौर यांनी सभापती यांचे एक दिवसाचे सभासदत्व रद्द करण्याची शिक्षा करावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : मा.महापौर आपल्या सुचनेप्रमाणे ह्या विषयावर मी दिलगिरी व्यक्ती केली कृपया अशा विषयावर पुन्हा चर्चा करु नये.

मा.महापौर : असा विषय पुन्हा सभागृहात चर्चेसाठी निघणार नाही. याची सर्व सभासदांनी दक्षता घ्यावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : मा.महापौर साहेब गेल्या सभेत मसनतपूर शाळेसाठी उपसमितीची स्थापना केली होती. ह्या समितीचा अहवाल आपणाकडे सादर करीत आहे.

मा.महापौर : मागील सभेत मसनतपूर शाळेबाबत उपसमिती स्थापन करण्यात आली होती. या समितीचा अहवाल आलेला आहे. याबाबत मा.सभापती बोलतील.

श्री. गिरजाराम हाळनोर : समितीने सादर केलेला अहवाल मंजूर करण्यात यावा.

मा.महापौर : समितीने दाखल केलेला अहवाल मंजूर करण्यात येतो. पूर्ण अहवाल इतिवृत्ता द्याव लागेल.

## मसनतपुर येथील तडे गेलेल्या शालेय इमारतीची पाहणी करीता सर्वसाधारण सभेने केलेल्या समितीचा पाहणी अहवाल

मा.आयुक्त व स.नगरसेवक श्री.अभिमन्यु भालेराव यांनी सुचविल्यानुसार मसनतपुर येथील तडे गेलेली इमारत तोडून नव्याने त्याच ठिकाणी ५ खोल्याची इमारत बांधण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभा दिनांक २०/७/१९९६ मध्ये विषय क्र. ४१/१२ अन्वये ठेवण्यात आला होता. सदरील विषयावर सभेमध्ये चर्चा होवून मा.महापौरांनी आदेश दिले की, सदरील प्रकरणात एक समिती गठीत करण्यात यावी व त्या समितीने प्रत्यक्ष इमारतीची पाहणी करुन निर्णय घ्यावा.

गठीत केलेली समिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| समितीचे अध्यक्ष | : | श्री. गिरजाराम हाळनोर<br>सभापती स्थायी समिती. |
| समिती सदस्य | : | १.डॉ.विजयकुमार मेहेर<br>उपमहापौर |
| | : | २. श्री. अभिमन्यु भालेराव<br>संबंधित वॉर्डाचे नगरसेवक |
| | : | ३.श्री अब्दुल रशिदखान (मामू)<br>नगरसेवक |
| | : | ४. श्री. जी.एम.अंभोरे<br>नगरसेवक |
| | : | ५. श्री. आय.टी.गायकवाड<br>शहर अभियेता |

ठरल्याप्रमाणे दिनांक ५.८.९६ रोजी उपरोक्त ५ सदस्यासहीत अध्यक्षांनी मसनतपूर येथील शालेय इमारतीची व परिसराची सविस्तर पाहणी केली. प्रत्यक्ष स्थळावर जातांना सन्मानीय नगरसेवक अब्दुल रशिदखान (मामू) सदस्य उपस्थित नसल्यामुळे त्यांच्या जागी पाहणीकरिता श्री.गौतम खरात सन्माननीय नगरसेवक ह्यांची नियुक्ती अध्यक्षांनी केली.

प्रत्यक्ष पाहणी करताना तडे कोणत्या कारणामुळे गेले तडे गेलेली इमारत दुरुस्त करुन चालू शकते काय इत्यादी सर्व बाबींची यप्रत्यक्ष स्थळावर चर्चा होवून समितीने असा निर्णय घेतला की, सध्या तडे गेलेली इमारत न पाडता आहे त्याच स्थितीत ठेवावी. व तडे गेलेल्या इमारतीसमोर उपलब्ध असलेल्या जागेवर एक नवीन इमारत बांधावी नवीन इमारत अंदाजे खर्च रक्कम रु.१३,०४,९३९/-.०० अपेक्षित आहे. हा अपेक्षित खर्च सन १९९५-९६ च्या चालू दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय दराने गाह्य धरण्यात आलेला आहे. परिसराची पाहणी वास्तूतज्ञ व स्ट्रक्चरल डिझायनर यांच्या मार्फत करुन घेण्यात यावी व भवितव्यात पुन्हा अशा प्रकारच इमारतीस तडे जाणार नाही असे बांधकामात नियोजन करावे तसेच शालेय विद्यार्थ्यांना पत्र्याच्या अपुऱ्या शेडमध्ये शिक्षण घ्यावे लागत असल्यामुळे अपुऱ्या इमारतीमुळे बसण्याकरिता

पावसापाण्याच्या दिवसात अडचण निर्माण होत असल्यामुळे नविन इमारतीचे बांधकाम ताबडतोब सुरु करण्याचे ठरले.

अंदाजपत्रकीय रक्कम रु.१३,०४,९३९.००/- चे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५ टक्के जास्त दराने उपलब्ध व योग्य गतीने काम करणाऱ्या गुतेदारामार्फत सुरु करण्यात यावे. १४ महिन्याच्या कालावधीत काम पूर्ण करण्याचे ठरले.

इमारत बांधकामचे स्थळ शहरापासून थोडे आत असल्यामुळे व प्रस्तुत परिसर लक्षात घेता तसेच इमारतीचे बांधकाम जलदगतीने करण्याचे असल्यामुळे कामाचा दर्जा चांगल्याप्रकारे ठेवून काम करणे करिता सन १९९५-९६ च्या दरसुचीच्या अंदाजपत्रकीय रक्कमपेक्षा ५ टक्के जास्त दराने उपलब्ध गुतेदारामार्फत काम करुन घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| अभिमन्यु भालेराव | गौतम खरात | डॉ.विजयकुमार मेहेर |
| नगरसेवक तथा | नगरसेवक तथा | उपमहापौर तथा |
| समिती सदस्य | समिती सदस्य | समिती सदस्य |
| स्वाक्षरित | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| गिरजाराम हाळनोर | जी.एम.अंभोरे | आय.टी.गायकवाड |
| सभापती स्थायी समिती | उपआयुक्त तथा | शहर अभियंता तथा |
| तथा समिती अध्यक्ष | समिती सदस्य | समिती सदस्य. |

श्री. अशफाक अहेमद : मा.महापौर आपण एकदा ह्या सभासदास तर एकदा त्या सभासदास बोलण्याची परवानी देतात. त्या ऐवजी कृपया एकच पध्दत ठेवावी व सभागृहात एका वेळीस एकच सदस्य बोलेल अशी शिस्त ठेवावी.

मा.महापौर : सर्वच सभासदांनी खाली बसावे . विषय क्र.१ संपलेला आहे. विषय क्र.२ चर्चेला घ्यावा.

श्री. मुश्ताक अहेमद : आर.आर. वर विचार विनीमय करण्यासाठी स्थापन केलेल्या समिती बाबत मी चर्चा करीत होतो. तीच पुढे चालू करत आहे. मागील सभेत उपसमिती नेमण्यात येईल. असे आश्वासन देण्यात आले होते. त्या समितीच्या सदस्यांच्या नावाची घोषणा झाली नव्हती. ह्या समितीच्या सभागृहाच्या दोन्ही पक्षाचे सभासदाचा समावेश राहील. असान करता फक्त सभापती व इतर याचा समावेश करुन ज्याचा समावेश केला आहे त्यांच्याकडून त्याचीच कामे होत नाही. मग त्यांना समितीचे काम देण्यात आले तर सभासंदाना समितीचे समितीचे काम देण्यात यावे. समितीची रचना करतांना या समितीत दोन्ही बाजूचे दूसरे सदस्य घेण्यात यावेत.

मा.महापौर : जी समिती तयार करण्यात आली आहे. त्यातील सदस्यांची घोषणा आपणा सर्वासमोर करण्यात आली. समती सदस्य पदाधिकारी आहे. त्यात कोणत्याही इतर सदस्याचा समावेश नाहीत.

श्री. मुश्ताक अहेमद : या समितीवर तीन सदस्य घेण्यात येतील अशी घोषणा सभागृहात झालेली आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : आर.आर.वर विचार करण्यासाठी एक स्टाफींग समीती यापूर्वीच नियुक्त झालेली आहे. त्या समितीचे कार्यही पूर्ण झाले आहे. आणि ही दूसरी समिती पुन्हा स्थापन झाली आहे.

मा.महापौर : सभागृहाने मागणी केल्यानुसार उपसमित स्थापन करण्यात आली आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : जी स्टाफींग कमिटी स्थापन झाली आहे. त्या सदस्यांना या कमिटीत घ्यावयाची नाही. कमिटी सदस्यांबाबत बसून विचार करण्यात येईल असे मागील सभेत ठरले होते.

श्री. रशिद खान (मामू) : दोन्ही बाजूचे २/३, २/३ सदस्य घेण्यात येतील अशी घोषणा मागील कमिटीत मा.महापौर यांनी केली होती.

मा.महापौर : समिती सदस्याबाबत निर्णय झाला असला तरी मा.विरोधी पक्षनेता आणि मा.सभागृह नेता यांनी या समिती सदस्य त्यासाठी नावे सुचवावित व तशी दुरुस्ती करण्यात यावी. स.सभासद श्री. नरेंद्र पाटील बोलतील.

श्री. नरेंद्र पाटील : पान ३० ठराव क्र. २५/२३ अन्वये जीवनबाई तापडिया चॅरिटेबल ट्रस्ट यांना नक्षत्रवाडी येथे स्व. मिनाबाई ठाकरे स्मृतीप्रित्यर्थ वृध्दाश्राम बांधण्यासाठी देण्यात आलेली जागा आरक्षाणातून वगळण्यास मंजूरी देण्यात आली आहे. वृध्दाश्रमासाठीची जागा वगळण्याबाबतचा ठराव यापूर्वी या सभागृहाने मंजूर करुन दिलेला आहे. हा दुसऱ्यांदा कसा मंजूर केला जातो. तीन महिन्यापूर्वी जेव्हा वृध्दाश्रमासाठी जागा देण्यात यावा असा ठराव आला होता. तेव्हा तो मंजूर झाला होता. त्यांच्यानंतर दुसरा ठराव असा आला होता की, त्याच्या आजूबाजूची जागा सुध्दा देण्यात यावी. तो ठरावही मंजूर झाला होता. म्हणून हा ठराव नामंजूर करण्यात येतो असे आपण (मा.महापौर) घोषीत केले होते.

मा.महापौर : वृध्दाश्रमासाठी जेवढी जागा दिली त्याबाबतचा ठराव आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : तीन महिन्यापूर्वी जो ठराव आला होता तो जागा वगळण्याचा ठराव होता आणि आता तो ठराव आला तो दुरुस्तीसाठी आहे. (काही सदस्य आपआपसात बोलतात)

मा.महापौर : मा.विरोधी पक्षनेता व सभागृहनेता ३/३ ऐवजी ४/४ सभासदांची नावे सुचवतील त्याप्रमाणे सभासद घेण्यात येतील. जीवनबाई तापडिया ट्रस्ट बाबत चर्चा चालू आहे. मागील ठराव काय झाला त्याबाबत खुलासा व्हावा.

श्री. नरेंद्र पाटील : मागील तीन महिन्यापूर्वी जो ठराव झाला त्यात फक्त तेवढी जागा वगळण्यात यावी. त्यावेळी अशी चर्चा झाली होती की, ही जागा मध्यभागी येते. तेव्हा वृध्दाश्रमाची जेवढी जागा आहे. ती या आरक्षणाच्या एका बाजूस घ्यावी व तेवढीच जागा आरक्षणातून वगळण्यात यावी व बाकी आरक्षण तसेच ठेवावे . ही वाक्य रचना त्यात हवी होती. तसं झालं नाही तर काहीही रहात नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : मागील ठराव जो झाला होता तो वृध्दाश्रमाला जागा देण्याबाबतचा होता आता जो ठराव झाला आहे तो महाराष्ट्र प्रादेशिकनगररचना नियमाप्रमाणे आहे त्यानुसार १ किरकोळ फेरदुरुस्ती करावी लागणार आहे. या ठिकाणी आरक्षण आलं होतं म्हणून ठराव आला आहे. ह्या ठरावात सर्व उल्लेख आहे. म्हणजेच वृध्दाश्रम बांधण्यासाठी जेवढी जागा दिली तेवढीच आरक्षणातून वगळण्यात येणार आहे. त्यापेक्षा जास्त जागा वगळण्यात येणार नाही.

श्री. नरेंद्र पाटील : वृध्दाश्रमाला जागा देण्याबाबतची सर्व कार्ये पूर्ण झालेले आहे. यात शासनाने असा पाठवला होता की, दोन्ही बाजूची जागा ही कामा येत नाही. सभागृहाने मध्यभागीच्या जागेत मंजूरी दिली. जेवढी जागा दिलेली आहे. तेवढीच जागा एका बाजूने दिली आहे. तेवढीच जागा त्यातून वगळली गेली पाहिजे.

मा.महापौर : सहाय्यक संचालक नगररचना या बाबत खुलासा करतील.

सहा.संचालक : पहिला ठराव १८.११.९५ ला झाला होता. त्या ठरावास त्यामुळे ही दुरुस्ती केलेली आहे. बाकी काही फरक केलेला नाही. आरक्षणाची जागा १० ते १५ एकर आहे. दोन्ही बाजूला ५/५ एकर जागा रहाते.

मा.महापौर : मध्यंतरी कोठेही आरक्षण करु शकतो. जागा मोठी असू शकते. आपण फक्त तेवढीच जागा घेणार.

श्री. नरेंद्र पाटील : ठराव मंजूर करतांना वृध्दाश्रमांची जागा आरक्षणाच्या एका बाजूला करण्यात यावी अशी विनंती केली होती. व बाकी जागेचे आरक्षण तसे कायम ठेवण्यात यावे अशी मंजूरी सभागृहात दिलेली आहे. वृध्दाश्रमाला आमचा विरोध नाही. मध्यभागीचे आरक्षण वगळल्यास आजूबाजूची जागा खुली होणार आहे. एकाच मालकीची सर्व जागा आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : हा ठराव मंजूर करतांना आरक्षित जागेचे आरक्षण वगळण्यासाठी ही जागा वृध्दाश्रमाला देण्यात आली आहे. तेव्हा वृध्दारमासाठी जेवढी जागा दिलेली आहे. तेवढीच जागा वगळण्यात येईल हा स्पष्ट उल्लेख त्या ठरावात केलेला आहे. तेव्हा वृध्दाश्रमासाठी ही जागा लागते तेवढयाच जागेचे आरक्षण वगळण्यात यावे. मग ती जागा बाजूला असो किंवा मध्यभागी असो.

श्री. जयवंत ओक : वृध्दारमासाठी जेवढी जागा दिलेली आहे तेवढीच जागा वगळण्यात यावी. बाकी जागेचे आरक्षण कायम ठेवावे. अशी मंजूरी मागील ठरावाच्या वेळी दिली आहे. ठराव तसाच आहे.

मा.महापौर : स.सभासद अशी दुरुस्ती सूचविण्यात येते की, वृध्दाश्रमाची जागा जेवढी असेल तेवढीच जागा एका बाजूला घेण्यात यावी व तेवढीचा जागा वगळण्यात यावी. (१) किती जागा देत आहोत (२) संपूर्ण जागा किती (३) कोठली जागा देण्यात येणार याबाबत सहा.संचालक यांनी पुन्हा खुलासा करावा.

सहा.संचालक : बगीच्याच आरक्षण १५ एकरच आहे. शासनाच्या परिपत्रकानुसार वृध्दाश्रमासाठी किमान ५ एकर जागा आवश्यक आहे. परंतु

वृध्दाश्रमासाठी तीनच एकर जमीन संपादित केली आहे. त्यामुळे मध्यभागो आरक्षण वगळण्यात येत आहे. बाकीची जागा बगीचासाठी आरक्षीत राहणार आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : या ठिकाणी जे आरक्षण आहे ते बगीच्यासाठी ठेवण्यात आले आहे. आपण वृध्दाश्रम बांधतो आहोत. त्या ठिकाणी ज्यांच्या आयुष्याचे शेवटचे दिवास राहिलेले आहे जे वृध्द आहेत ते त्य ठिकाणी रहायला जाणार आहेत. ही जागा मध्यभागी असेल तर त्या बाजूची आरक्षण वगळले जाणार नाही. त्या ठिकाणी बगीच्याचा विकास होईल. त्यामुळे वृध्दमंडळी बगीच्याच आतल्या बाजूला राहिली तर त्यात वाईट काय?

श्री. नरेंद्र पाटील : बगीच्याच्या एका बाजूला वृध्दाश्रम असणे किंवा दोन्ही बाजूला ५/५ एकर जागा ठेवून आरक्षण वगळून सोईचे आहे काय?

मा.महापौर : वृध्दाश्रमासाठी १५०० से.मी.जागेवर बांधकामाची परवानगी दिलेली आहे. त्यानुसार भुमिपूजनही झालेले आहे. या वृध्दाश्रमाच्या दोन्ही बाजूस गार्डन राहिले तरी त्यामुळे विशेष असा काही फरक पडणार नाही. ही बाब आपण सर्वांनी मान्य करावी अशी आहे.

श्री. अ.रशिदखान मामू, काशिनाथ कोकाटे : सभागृह ज्या जागेला मंजूरी देत आहे ती ३ एकर जागा एका मालकीची व दूसरी जागा दुसऱ्याय मालकीची आहे १५ एकरचा येथे काही विषय नाही. तीन एकर जागेत आपण मंजूरी दिलेली आहे. वृध्दाश्रमाच्या नावावर ३ एकर जमीनीबरोबर १५ एकर जमीन आरक्षणातून वगळण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा प्रस्ताव डेव्हलपमेंट कमिटीकडे पाठवावा.

मा.महापौर : ही जागा तापडीया कन्सट्रक्शनची आहे. या जागेबाबत सर्व काही कार्यवाही झाली आहे. सभागृहाला फक्त तत्वतः मान्यता द्यावयाची आहे. कृपया सहकार्य करावे अशी विनंती केली विषय क्र.१ मंजूर.

श्री.अ.रशिदखान (मामू) : पान ४५ ठराव क्र.४१/११ वरील चर्चेच्या इमारत बांधताना लोड बेरींग ऐवजी कॉलम मध्ये काम केल्यास इमारतीचे आयुष्य ५० ऐवजी १०० वर्षे राहते. पण सदर इमारत ५/६ वर्षात पडली. या प्रस्तावावर निर्णय देताना व हा समिती अहवाल यासाठी उपसमिती स्थापन करण्यात येईल. असे रुलींग मा.महापौरांनी दिले होते. पण ठरावात मात्र मंजूरी देण्यात येते व शॉर्ट टेंडर काढण्यात यावे असा निर्णय दिला आहे.

मा.महापौर : स.सभासद श्री. अब्दुल रशिदखान (मामू) यांची सूचना योग्य आहे. या प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी उपसमितीने अहवाल द्यावा असे रुलींग दिलेले आहे. चुकून नोंद झाली याची दखल प्रस्तावास सभागृहाने मंजूरी दिली आहे. मा.महापौर, उपआयुक्त-१, शहर अभियंता, मा.सभापती, श्री.रशिदखान (मामू) व संबंधित नगरसेवक यांनी पहाणी करुन पुढील सभेत अहवाल द्यावा. तशीच नोंद

श्री.अ.रशिदखान (मामू) : असा निर्णय झाला तरी कोणी काही केले का? पहाणी झाली का? कोणी काही केले नाही शहागंज बाजाराजवळील जागेबाबतही अशाप्रकारची उपसमिती स्थापन झाली होती. ही जागा कोर्टात उद्याही जागाही महानगरपालिकेच्या हातून निघून जाईल. उपसमिती स्थापन झाल्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी पत्र देवून बोलावले पाहिजे. मसनतपूर इमारत ७ वर्षात तर अधिकाऱ्यावर काय कार्यवाही करणार.

मा.महापौर : मा.सभापती यांनी अहवाल दिलेला आहे. तसेच तो प्रस्ताव सभागृहाने मंजूर केलेलाच आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर : स.सभासद श्री.गौतम खरात श्री.गौतम लांडगे श्री.अभिमन्यू भालेराव यांच्यासह कामाची पाहणी केलेली आहे व अहवाल दिलेला आहे. इमारतीची पाहणी करुन बांधकाम करण्याची मंजूरी दिलेली आहे. चौकशीचे काम करण्यात येत आहे. असे अहवालात म्हटलेले आहे. अहवालात इमारतीचे बांधकाम सुरु करावे असे म्हटलेले आहे.

मा.महापौर : आर.आर.बाबत जी उपसमिती नेमली त्यात कोण अध्यक्ष राहणार याबाबत ते बोलत होते.

श्री. गिरजाराम हाळनोर : मा.साहेब यांनी अशी सूचना केली की, जी स्टाफ पॅर्टनर्ड कमिटी मागील सर्वसाधारण सभेने मंजूर केलेली आहे. त्यात ४/४ सभासदांचा समावेश करावा. स.सभासद श्री. मनमोहनसिंग ओबेराय, श्री. मुजीब आलमशाह खान यांनीच तशी सूचना केलेली आहे. स्टाफिंग पॅटर्न कंपनीचे कामकाज चालू आहे.

मा.महापौर : मसनतपूर शाळेच्या बांधकामाबाबत नेमण्यात आलेल्या उपसमितीचे मा.सभापती हे अध्यक्ष होत त्यांनी तो अहवाल सभागृहापुढे ठेवावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : मसनतपूर येथील इमारत मोडकळीस आलेली आहे. करिता त्वरित बांधकाम सुरु करण्यात यावे. या शाळेचे विद्यार्थी पत्र्याच्या शेडमध्ये सध्या बसतात. असा अहवाल प्रथम दिला आहे. तसेच या बांधकामाचे गुत्तेदार कोण होते, अधिकारी कोण होते. याबाबत अहवाल दुसऱ्या मिटींगमध्ये देण्यात येणार आहे.

श्री.रशिद खान (मामू), श्री.अ.जावेद रज्जाक : प्रथम इमारत पडतेच का? याबाबत गुन्हा दाखल करावा. दोन्ही अहवाल एकाच वेळी का देण्यात आले नाही?

डॉ.विजयकुमार मेहेर : मसनतपूर शाळेच्या इमारतीची प्रत्यक्ष पाहणी केली. सदर इमारत खचली आहे. या इमारतीमुळे विद्यार्थ्यांना धोका होईल. म्हणून एकमताने नविन इमारत बांधण्याचा निर्णय घेवून त्याप्रमाणे अहवाल दिला आहे. निर्णय घेवून त्याप्रमाणे अहवाल दिला आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मागील सभेत रस्त्यावरील माती उचलण्यासाठी जेसीबी मशिन खरेदी बाबत चर्चा झाली. याबाबत शासनाचे मशिनचे दर काय आहेत. बाजार भावाप्रमाणे काय दर येतात. असे मशिन रेट कॉट्रॅक्टवर घेण्यात यावे. अशा प्रकारे रेट कॉट्रॅक्टवर मशिन घेण्यात झाल्यास

महानगरपालिकेच्या आर्थिक फायदा होईल. याबाबत मा.आयुक्त, मा.महापौर व सभापती यांनी विचार करावा. तशी दुरुस्ती करावी.

मा.महापौर : स.सभासद श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी जेसीबी मशिनबाबत ज्या सुचना केला आहेत. जास्तीत जास्त प्रयत्न करुन कार्यवाही करण्यात येईल.

श्री. गौतम खरात : महानगरपालिकेतर्फे विविध प्रकारच्या मशिनरी/वाहने खरेदी करण्यात येतात. यावेळी पुस्तक खरेदी करतांना ज्याप्रमाणे विशिष्ट सूट देण्याबाबत जशी संबंधित एजन्सीशी चर्चा केली जाते. त्याचप्रमाणे जेसीबी मशिन खरेदी करतांनाही सूट मिळणेबाबत चर्चा करावी. जेसीबी बाबत जे दर आलेले आहेत तो दर बाजारभावाप्रमाणे आहेत असे मला वाटते.

श्री.स.अली मिरा सलामी : पान ४७ ठराव क्र.४३ अन्वये आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना पुढील वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सभागृहातील चर्चेच्या वेळी मा.सभापती यांनी स्टाफिंग पॅटर्न समिती कार्यरत असल्याचे सांगितले. माझ्या माहितीप्रमाणे त्या समितीची फक्त एकच बैठक झाली. त्यानंतरच्या तीन बैठका रद्द करण्यात आल्या. जर स्टाफिंग पॅटर्न कमिटी आहे तर असे प्रस्ताव सभागृहापुढे का ठेवले जातात.

मा.महापौर : सदर प्रस्ताव स्थायी समिती मार्फत आला असून ऐनवेळी ठेवलेला आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : हा विषय ठेवला गेला ही बाब वेगळी पण असे विषय सभागृहापुढे ठेवले गेले तर जी उपसमिती नेमली आहे. त्याचा उपयोग होणार नाही. याचाही विचार होणे आवश्यकय आहे.

मा.महापौर : स.सभासदांच्या सूचना जरुर विचारात घेण्यात येतील.

श्री. जयवंत ओक : पान ५० ठराव क्र.५२ मध्ये शहरातील ६० अनधिकृत वसाहती या २० ते २५ वर्षापासून ९० टक्के वसाहती झालेल्या आहेत. तो उल्लेख ठरावात आलेला नाही. तशी दुरुस्ती करण्यात यावी.

मा.महापौर : मा.सभागृहनेता यांचे सुचनेप्रमाणे दुरुस्ती करण्यास मंजूरी देण्यात येते. तसेच दि.२०.७.९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे सर्व इतिवृत्त कायम करण्यात आले असे घोषित करतो.

**ठराव :**

दिनांक २०.७.९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तात खालीलप्रमाणे दुरुस्ती व वाढ करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

२.ठराव क्र.८/६ अन्वये स्थगित ठेवण्यात आलेल्या प्रस्तावाऐवजी महानगरपालिका आयुक्त यांचेकडे नेहमीच बैठका आयोजित केल्या जातात. तसेच पदाधिकारी व इतर खात्याशी समन्वये राखण्याच्या दृष्टीने आवश्यक माहितीचे संकलन करणे इ.शासनाची मराठीतून कारभार करावा लागत असल्याने महापालिका अस्थापनेवरील रु.१४०० ते २३०० या वेतनश्रेणीतील मराठी लघुटंकलेखनाच्या पद रु.२००० ते ३२०० (मराठी) या उच्च श्रेणी पदावर रुपांतरीत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

३.स्थगित ठेवण्यात आलेल्या ठराव क्र. २१/१९ मध्ये प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घर

बांधणी खरेदी उपविधी मध्ये प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अ.क्र.०४ अ.ते.डे. प्रमाणे दुरुस्ती व वाढ करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

४. ठराव क्र.२२/२० मध्ये व्याज दर ८ टक्के ऐवजी ६ टक्के दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

५. ठराव क्र. २५/३० मध्ये जीवनबाई तापडीया चॅरिटेबल ट्रस्ट यांना त्यांचे तीन एक जागेवर गट नं.११४/पै नक्षत्रवाडी येथे, शासनाच्या आदेशानुसार वृध्दाश्रमाच्या योजनाकरिता पाच एकर पर्यंत जमीन असावी व त्यात जास्तीत जास्त १५०० चौमी पर्यंत बांधकाम अनुज्ञेय राहील.

स्व.मिनाताई ठाकरे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ वृध्दाश्रम बांधण्याकरिता आरक्षण क्र. एस-१ ही उद्यानमधून वगळून रहिवास विभागात अंतर्भुत करण्यासाठीची कार्यवाही करणेस मंजूरी देण्यात येते.

६. ठराव क्र. ४१/११ मध्ये मा.उपमहापौर, उपआयुक्त-१ शहर अभियंता, मा.सभापती स्थायी समिती स.स.श्री.अ.रशिद खान (मामू) व संबंधित वार्डाचे नगरसेवक यांचा समावेश असलेली उपसमिती नेमण्यास व सदर समिती पाहणी करावी व अहवाल द्यावा अशी वाढ करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येत.

७. ठराव क्र.४२ अन्वये चिकलठाणा आठवडी बाजार येथील काम पूर्ण झाले असल्याने ह्या कामास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते. अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

८. स्थगित ठेवलेल्या ठराव क्र.४४/१ मध्ये प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अकराव्या लोकसभेचे पंतप्रधान म्हणून राष्ट्रीय आघाडीचे श्री.एच.डी.दैवेगौडा यांचे सभागृहातफे हार्दिक अभिनंदन करण्यात येते. ठरावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

९. ठराव क्र.५२/९ मध्ये शहरातील ६० अनाधिकृत वसाहती यानंतर गेल्या २० ते २५ वर्षापासून वसाहतीत ९० टक्के बांधकाम झालेले असल्यामुळे या वसाहती अशी वाढ करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

१०. ठराव क्र.५६/१३ मधील ‘‘शिक्षणाधिकारी शिक्षण विभागातील दैनंदिन कामात निष्काळजीपणा करतात. त्यांचे प्रतिनियुक्ती कालावधीत महापालिका शाळांचा दर्जा घरला असून ते शाळांची तपासणी करीत नाही. शालेय शिक्षकांना हेतुपुरस्पर त्रास देतात. त्यांचे बाबतीत अनेक शिक्षकांच्या तक्रारी आहेत. शिक्षणाधिकारी महापालिका नगरसेवक तथा पदाधिकाऱ्यांना सहकार्य करत नाहीत. सध्याचे शिक्षणाधिकारी अकार्यक्षम असून ही आक्षेपार्ह वाक्य रचना वगळण्यस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वरील प्रमाणे अ.क्र.१ ते १० मधील दुरुस्ती व वाढ यासह दि.२०.७.९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ६२ :** स.सभासदांच्या मागणीनुसार शिक्षक भरती बाबत चर्चा व्हावी.

**संवाद :**

श्री. हमीद उद्दीन ताबा : गेल्या वर्षी सर्वसाधारण सभेत जिल्हा परिषदेतील शिक्षक महानगरपालिकेत भरती करु नये असे असतांना सुध्दा महानगरपालिकेत का भरती केल्या गेली चर्चा व्हावी.

श्री. जावेद रज्जाक : माझ्या असे निदर्शनास दिसून आले आहे की, एका मराठी शिक्षकाला ४८.८ टक्के असतानांही मुलाखतीचे पत्र मिळाले नाही, सदर शिक्षक प्रथम श्रेणीत विशेष प्राविण्य प्राप्त केलेला आहे. त्यांना मुलाखत पत्र मिळाले नाही. ज्या शिक्षकांची नेमणूक झाली त्यात मराठी उर्दूचे शिक्षक किती आहेत याचा खुलासा व्हावा याशिवाय प्रतिज्ञापत्र दाखल करण्याबाबत आदेश देवूनही काही जि.प.शिक्षकांनी प्रतिज्ञापत्र लिहून दिलेले नसतांना अशा शिक्षकांना नेमणूकीचे आदेश दिलेले आहेत.

सौ. मोहसिना बिल्कीस : सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार ३५ शिक्षक भरतीची मंजूरी मिळालेली असतांना ३७ शिक्षकांची भरती करण्यात आली आहे तेव्हा २ शिक्षकाची जास्तीची भरती कशी करण्यात आली. याचा खुलासा व्हावा.

श्री. स.अली मिरा सलामी : दि.२०.७.९६ च्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.४ अन्वये जि.प. शिक्षकांची भरती न करता सेवायोजन कार्यलयातर्फे शिक्षक भरती करावी. ह्या ठरावाचा चुकीचा अर्थ घेवून जि.प.मध्ये काम करणाऱ्या शिक्षकांचा समावेश केला आणि अशा शिक्षकांकडून प्रतिज्ञापत्र घेण्यात आलेला असतानासुध्दा शिक्षक भरती करतांना जि.प.त काम करणाऱ्या शिक्षकांची नेमणूक झाली त्याबाबत खुलासा करण्यात यावा.

श्री. सुदाम सोनवणे : शिक्षक भरती करताना मराठी माध्यमासाठी १७ जागा सर्वसामान्य (ओपन) शिक्षकांसाठी ठेवलेल्या होत्या. पण प्रत्यक्षात १७ मराठी माध्यमाच्या जागा न भरता त्याा उर्दू माध्यमाच्या शिक्षकाची भरती करण्यात आली आहे. ह्या ५ जाग रद्द करुन सर्व ५ जागा मराठी माध्यमाच्या सर्वसामान्य (ओपन) शिक्षकांतून भरण्यात याव्या.

श्री. प्रकाश निकाळजे : शिक्षक भरतीसाठी सेवायोजन कार्यालयाकडून जी यादी पाठविण्यात आली त्यात बरेच उमेदवार जि.प.व इतर ठिकाणी नोकरी करतात असे असतांना सुध्दा सदर अमेदवारांनी महापालिकेस खोटी माहिती दिली तेव्हा जि.प. नोकरीस असताना सुध्दा अशा शिक्षकांची नावे सेवायोन कार्यालयाकडे कशी नोंदविली होती याबाबत अशा शिक्षकांवर कार्यवाही करण्यात यावी. व त्यांना देण्यात आलेली नेमणूक आदेश रद्द कण्यातबाबत ठराव घ्यावा.

सौ. अलका पाटील : जि.प.त असा एक नियम आहे की, डी.एड च्या विद्यार्थ्यांना डी.एड.ची परिक्षा देता येत नाही. तरी सुध्दा अशा विद्यार्थ्यांना महापालिकेत प्रवेश मिळाला आहे. आणि ते उत्तीर्णही झालेले आहेत तेव्हा असा नियम महापालिकेत आहे का?

श्री. भगवान घडामोडे : काही शिक्षकांना प्रतिज्ञापत्रात जे नोकरी असल्याचे लिहून दिलेले आहेत. त्या सभागृहाने जि.प.तील शिक्षक घेतले जाणार नाही असा निर्णय घेतलेला आहे. तरी सुध्दा अशा शिक्षकांना नेमणूका दिल्या आहेत? यावरुन सभागृहात घेतलेल्या निर्णयाला काहीच महत्व नाही का? तेव्हा नोकरीत असल्याचे प्रमाणपत्र दिलेल्या शिक्षकांना नेमणूक आदेश कसे दिले याबाबत खुलासा व्हावा.

श्री. विठ्ठल जाधव : ज्या शिक्षकांनी प्रतिज्ञापत्र दिले आहे अशा शिक्षकंनी जि.प. ते राजीनामा दिल्यानंतर प्रतिज्ञापत्र लिहून दिले की आता आम्ही कोठेही नौकरीस नाही. स.सभासद सभागृहाची दिशाभूल करीत आहे. याची सभागृहाने दखल घ्यावी.

(अनेक सभासद आपआपसात बोलतात)

श्री. जयवंत ओक : ज्या शिक्षकांची नेमणूक झाली त्यांना नेमणूकीपूर्वी ते कोठे नोकरीत आहेत का याची माहिती अधिकाऱ्यांनी घ्यायला हवी होती. आज जो शिक्षक नेमले आहे ते त्याच्या खात्यात राजीनामा देवून आले आहेत. आता त्यांचे नेमणूक आदेश रद्द केले तर ते शिक्षक ना इकडे ना तिकडे होतील. अधिकाऱ्यावर कार्यवाही झाली पाहिजे. या मताचा मी आहे.

श्री. विखारोद्दीन : नेमणूक झालेल्या शिक्षकांपैकी १०/१२ शिक्षक माझ्याकडे आले होते. त्यावेळी शिक्षकांनी जि.प.मध्ये नोकरी करीत असल्याचे प्रमाणपत्र दिल्यांनतरही अशा शिक्षकांना नेमणूकीचे आदेश दिले गेले. यावरुन या प्रकरणात काही भ्रष्टाचार झाला आहे. भ्रष्टाचार करणाऱ्या विरुध्द कार्यवाही करावी.

श्री. महादेव सुर्यवंशी : १३ जि.प. तील शिक्षक महापालिकेकडे वर्ग करुन द्यावेत व त्याचा सेवेचा विचार करावा असा ठराव सभागृहापुढे आलेला होता. ह ठराव रद्द करुन नविन उमेदवारांना नेमणूक द्यावी असा निर्णय झाला ही निवड करतांना काय झालं हा प्रशन वेगळा आहे. पण सभागृहात काय निर्णय झाला? जाहिरात काय दिली याची आम जनतेला माहिती नाही. ह्या बाबींचा जाहिरातीत उल्लेख नाही. नियमाप्रमाणे सेवा योजन समाज कल्याण ह्या विभागाकडून ज्या याद्या आल्या त्या सर्वांना मुलाखतीचे पत्र दिले गेले. यानंतरची नियमाप्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर नेमणूक आदेश रद्द केले तर कायदेशिर अडचण निर्माण होणार आहे. याचा संपूर्ण विचार करुन निर्णय घेण्यात यावा अशी सभागृहाला विंनती आहे.

सौ. लता दलाल : शिक्षक भरती बाबत स.सभासदांनी आपले विचार मांडले आहेत. शिक्षक भरती करताना त्यांच्याकडून प्रतिज्ञापत्र लिहून घ्यावे आणि जर शिक्षक जि.प.मध्ये नोकरीत असतील त्यांना नेमणूक देण्यात येवू नये अशी चर्चा सभागृहात झाली होती. याची माहिती अधिकाऱ्यांनी उमेदवारांना देणे अवश्यक होते. तरीसुध्दा सबंध सभागृहाचा अवमान कोणी केला त्याच्यावर काय कार्यवाही करण्यात येणार याचा खुलासा झाला पाहीजे.

श्री. जावेद रज्जाक : प्रश्न जिल्हा परिषद शिक्षकांचा नाही प्रश्न पैशाचा आहे. सर्वसाधारण सभेत निर्णय झाल्यानंतर ६ महिन्यांनी त्यावर अंमलबजावणी होते. बरेच शिक्षक असे आहेत की, ज्यांनी राजीनामा दिला नाही. पण मुलाखत दिल्यानंतर नेमणूक दिली गेली. सेवायोजन कार्यालयाकडून जे उमेदवार आले त्या वर्षाच्यामहिला उमेदवारास नेमणूक न देता जे जि.प.कडून आले त्या शिक्षकांना नेमणूक दिली जाते. हे शिक्षक नियमाप्रमाणे वर्यामर्यादा धारण करणारे आहे का? यात सर्वांचीच बदनामी होत आहे. सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार जि.प.शिक्षकांना घेता कामा नये. नुकतेच डी.एड.परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना नेमणूक देता जि.प.शिक्षकांना नेमणूक दिली जाते. यात कोणाचा स्वार्थ आहे. याचा खुलासा झाला पाहिजे. यात जे सामील असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी.

सौ. सुनंदा कोल्हे : नविन शिक्षक भरतीचा ठराव सर्व सभासदांच्या संमतीने मंजूर झालेला आहे. त्यानुसार वृत्तपत्रात जाहिरात ठेवून नियमाप्रमाणे भरती करण्यात येईल. संबंधीत अधिकाऱ्यांनी सांगितले होते. सेवायोजन व समाज कल्याण विभागाकडून यांच्याकडून आलेल्या यादीनुसार लेखीपरिक्षा झाल्या नंतर यात

जि.प.शिक्षकांनी सुध्दा भाग घेतला होता. अशी माहिती मिळाली. यावरुन मा.आयुक्तांना जे जि.प.शिक्षक असतील त्यांना मुलाखतीस बोलावू नये असे का दिले आहे.

श्री.अ.रशिद खान (मामू) : शिक्षक भरती बाबत सभागृहात जो निर्णय झाला त्यावेळी जि.प.स तशा आशयाचे पत्र देण्यात यावे. अशी चर्चा झाली होती. परंतु अद्याप तशा आशयाचे पत्र जि.प.स पाठविले नाही. याशिवाय स्थायी समितीतील चर्चेच्यावेळी कॅसेट ऐकल्याशिवाय नेमणूक आदेश दिला जाऊ नये असा निर्णय झालेला असतांना नेमणूक आदेश देण्यात आले हे कसे? यामुळे सभागृहाचा जो अपमान झाला त्याबाबत पोलिस केस करावयस हवी.
(काही सभासद आपआपसात बोलतात)
जि.प. शिक्षक न्यायालयात धाव घेतील याबाबत भिती बाळगण्याचे कारण नाही. कारण त्या प्रकरणात महापौरांशी कोणती सल्लामसलत करण्यात आलेली नाही. ज्यांनी नेमणूकीचे आदेश दिले त्याच अधिकाऱ्यांनी याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

श्री.वसंत देशमुख : ह्या सभागृहात घेतलेला निर्णय आपल्याशी निर्णयांकीत असतो हा नुसता सभागृहाचा प्रश्न नाही. नगरसेवकांनी जनतेला उत्तर दिले पाहिजे. शिक्षक भरती प्रकरणात भ्रष्टाचार झाला अशी चर्चा आम जनतेत पसरली आहे. या सर्व बाबींचा विचार करता मा.महापौरांचा निर्णय महत्त्वपूर्ण राहील.

श्री. गिरजाराम हाळनोर : बऱ्याच वेळेपासून सभागृहात जि.प.शिक्षकाबाबत चर्चा चालू आहे. जि.प.चे शिक्षक वर्ग करुन घेणार नाही. असा सभागृहाने निर्णय घेतला. त्यानंतर ज्यांनी मुलाखत पत्र देवून लेखी परिक्षेसाठी अशा शिक्षकांना बोलावणे त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. मुलाखत घेतलेल्या शिक्षकांची गुणवत्ता यादी ज्यानी प्रसिध्द केली त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे.

श्री. हमीद उद्दीन ताबा : शिक्षण भरती प्रकरणाबाबत स्थायी समितीत झालेल्या चर्चानुसार कॅसेट ऐकल्यानंतर नेमणूक आदेश दिले जातील. असा निर्णय झाल्यानंतरही नेमणूक आदेश दिले गेले आहेत.

श्री. जावेद रज्जाक : शिक्षकांच्या रिक्त पदावर काही शिक्षकांना नेमणूक आदेश दिले आहे अशा शिक्षकांना दिलेले आदेश रद्द करुन त्यांना नेमणूकीचे आदेश दिले गेले नाही तर योग्य होईल.

श्री. गिरजाराम हाळनोर : शिक्षकांना देण्यात आलेले नेमणूक आदेश रद्द करु नये असे आदेश रद्द केल्यास प्रकरण न्याय प्रविष्ट होईल. तेव्हा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी न खेळता दिलेले आदेश तसेच ठेवावे व ज्यांनी ही कार्यवाही केली त्यांची चौकशी करावी. याशिवाय चार शिक्षकांची नेमणूकीचे नियमाप्रमाणे त्वरीत करावे. महापालिकेकडे शिक्षक कमी आहेत. तेव्हा आहेत ते शिक्षक काढून टाकावयाचे हे धोरण योग्य नाही. झालेली चूक विद्यार्थी किंवा उमेदवारांची नाही.

श्री.प्रकाश निकाळजे : शिक्षक भरती बाबत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. म्हणून जि.प.कडून जे शिक्षक आलेले आहेत. त्या नेमणूका रद्द कराव्यात ही प्रमुख मागणी आहे.

श्री. मुजीब आलमशाहखान :यावर बरीच चर्चा झाली. माजी महापौरांचे पत्र अधिकाऱ्यांना मिळाल्यावरही अधिकाऱ्यानी त्यावर कार्यवाही केलेली नाही. तेव्हा ज्या जि.प. शिक्षकांना नेमणूका दिल्या त्या रद्द कराव्यात व ज्या अधिकाऱ्यांनी ही

कार्यवाही केली त्यांच्याविरुध्द कडक कार्यवाही झाली पाहिजे. तेव्हा अधिकाऱ्याकडून खुलसा न घेता सभागृहानेता मा.आयुक्त, सभापती, उपमहापौर यांनी एकत्र बसून निर्णय घ्यावा.

श्री. जयवंत ओक : विरोधी पक्षनेता यांचे सुचनेशी सहमत आहे. पण ह्या शिक्षकांनी जि.प.सोडली आहे का? याचा खुलासा संबंधित अधिकाऱ्यांना करावा.
(काही सभासद जोरजोरात बोलतात)

नगरसेवकाच्या अपमान झाला या विचारांशी मी सहमत आहे. माजी महापौरांनी दिलेले पत्र आणि सभागृहाने घेतलेला निर्णय बाजूला ठेवून ज्या अधिकाऱ्यांनी जि.प.शिक्षकांना बोलावून घेतला अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहिजे.

मा.महापौर : सभागृहाची मागणी लक्षात घेता प्रशासनाकडून खुलासा घेण्यात येत आहे. यासाठी मा.आयुक्त-१ खुलासा करतील.

श्री.स.अली मिरा सलामी : शिक्षक भरतीबाबात सभागृहात बरीच चर्चा झाली. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी खेळ करु नये असे मा.सभापती यांनी सुचविले त्या विचारांशी मी सहमत आहे. महापालिकेमध्ये शिक्षकांची संख्या कमी असल्याने शिक्षकांची भरती लवकर करणे आवश्यक आहे. तेव्हा ज्या शिक्षकांची नेमणूक झाली त्यापैकी ते जि.प.शिक्षक आहेत. त्यांची नेमणूक रद्द करुन प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना घेण्यात यावे व संख्या पूर्ण करावी. जि.प.च्या शिक्षकांनी जी चुक केली ती त्यांनी स्वतःहून केली आहे.

श्री. अभिमन्यु भालेराव : शिक्षक भरती प्रकरणाबाबत सभासदांनी त्याचे विचार मांडले आहेत. महापालिका सभागृहाचा निर्णय आणि माजी महापौर यांचे पत्र प्रशासनाकडे आहे. अशा परिस्थितीत ज्या शिक्षकांची नेमणूक झाली ते जि.प.चे आहेत का आणखी कुठले आहेत याचा विचार न करता ज्या अधिकाऱ्यांनी नेमणूक केली त्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही झाली पहिजे.

श्री. प्रभाकर विधाते : शिक्षक भरती बाबत सभागृहात सविस्तर चर्चा झाली ही भरती सरळ करण्यात आली त्यावेळी या शिक्षणाकडून इतरत्र कोठे नोकरी करतात का असे प्रतिज्ञापत्र लिहून घेतले त्यात शिक्षकांचा काही दोष नाही. तेव्हा ज्या अधिकाऱ्यांनी भरती केली त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी.

सौ. पदमा शिंदे :शिक्षक भरतीचा विषय फार काळापासून गाजत आहे. स्वातंत्र्यसैनिक, धरणग्रस्त, इ.साठी चार जागा राखून ठेवल्या आहेत. याबाबत शासनाचे परिपत्रकही आहे. या जागा राखून का ठैवल्या नाहीत याचा अधिकाऱ्यानी खुलासा करावा.

श्री. संजय जोशी : शिक्षक भरती बाबतची सर्व कार्यवाही अस्था-१ विभागाकडून झाली आहे. तेव्हा अधिकाऱ्यांनी त्यांच्या काळात कार्यवाही झाली. त्यांच्याकडून खुलासा घेणे योग्य राहील.

श्री. जावेद रज्जाक : शिक्षक भरती प्रकरणात सर्वसधारण सभेत घेतलेल्या निर्णयाविरुध्द निर्णय झाल तर आमरण उपोषण सुरु करण्यात येईल.

मा.महापौर : केव्हा पासून ...............

डॉ.विजयकुमार मेहेर : शिक्षक भरती प्रकरणात जि.प.च्या १० शिक्षकांना आदेश दिल्याबाबतचा प्रश्न स्थायी समितीत उपस्थित झाला. त्यावेळी सर्वसाधारण सभेत जि.प.च्या कोणत्याही शिक्षकांस महापालिका सेवेत सामावून घेऊ नये

असा निर्णय झाला. पण अधिकाऱ्यांनी जो ठराव लिहला त्यात शब्दाचा खेळ केला आहे. ह्या ठरावात "सरळ" हा शब्द घालून जि.प.च्या शिक्षकांना आदेश दिले. याबाबत माजी महापौरांनी सर्वसाधारण सभेच्या निर्णयाचे आदेशपत्र देऊन अशा शिक्षकांना घेणे योग्य नाही. असे कळविलेले आहे. सर्व ८२ नगरसेवकांना अंधारात ठेवण्यात आले आहे. ही बाब अत्यंत वाईट आहे. सर्वसाधारण सभेच्या ठरावाचा अवमान झाला. तेव्हा अशा अधिकाऱ्यांना दंड झालाच पाहिजे. आठ शिक्षक रुजू झाले आहेत. त्यांनी जि.प.कडे राजीनामा दिला असेल तर कायदेशिर बाब म्हणून नाही तर मानवतेच्या दृष्टीकोनातून या शिक्षकांना आपण सजा द्यावयाची का? याचा सभागृहाने विचार करावा.

श्री. हमीदउद्दीन ताबा : स्थायी समितीत झालेल्या निर्णयाप्रमाणे कॅसेट ऐकल्यानंतर आदेश देण्याचे ठरले असताना शिक्षकांना आदेश देण्याची घाई का करण्यात आली. यात भ्रष्टाचार झाला असा माझा आरोप आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : ज्या अधिकाऱ्यांनी शिक्षकांच्या परिक्षा घेतल्या,गुणवत्ता यादी तयार केली त्या अधिकाऱ्यांवर प्रथम कार्यवाही करावी. या अधिकाऱ्यांनी सभागृहाचा आदेश डावलला आहे.

श्री. मुजिब आलमशाह खान : शिक्षक भरती प्रकरणाचा खुलासा कोणत्याही गैर जरुरी अधिकाऱ्यावर दबाव टाकू नये. तेव्हा ह्या प्रकरणातील मुख्य अधिकार आहेत त्यांनीच खुलासा करावा.

मा.उपआयुक्तः शिक्षक भरती अनुषंगाने दि.१२.७.९६ अन्वये सूचना केली. शिक्षक भरती बाबतचे आदेश दिलेले नाहीत. ह्या शिक्षकांची गुणवत्ता यादी तयार आहे. तेव्हा शिक्षक भरती करावी अशी मागणी स.सभासद श्री. हमीदउद्दीन ताबा यांनी केली नाही तर उपोषणास बसणार असे स.सभासदांन सुचविले होते. त्यानुसार मा.आयुक्त यांचेशी चर्चा करण्यात आली. २८.८.९५ च्या सर्वसाधारण सभेत महापलिकेतील शिक्षकांच्या १३ जागा रिक्त पदावर (जि.प.१०० पेक्षा जास्त शिक्षकांचे अर्ज) सेवा वर्ग करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात अला होता. हा प्रस्ताव सभागृहाने नामंजूर करुन जि.प.कडून शिक्षक भरती करावी असा निर्णय घेतलेला आहे. महानगरपालिकेत ४०/४१ शिक्षकांच्या जागा रिक्त असल्याचे महापालिका प्रशासनाच्या निदर्शनास आले. त्यानुसार सेवायोजन समाज कल्याण इ.विभागाकडून शिक्षकांच्या मागविण्यात आल्या. या यादीनुसार १७.१२.९५ ला ४२० उमेदवारांची लेखी चाचणी घेण्यात आली. त्यातून तत्कालीन कमिटीने गुणानुक्रमे आरक्षणाच्या वर्गवारी नुसार यादी तयार करण्यात आली होती. याच काळा आचार संहिता लागू झाल्यामुळे नेमणूकीचे आदेश देता येत नव्हते. सभागृहाच्या ठरावानुसार शासनाचे आदेशाप्रमाणे आरक्षण गुणवत्ता या सर्व बाबींचा अवलंब करुन गुणानुक्रमे हे आदेश दिलेले आहेत. यात सभागृहाचा अवमान करण्याचा कोणताही हेतू नाही. स्थायी समितीत चर्चा होण्यापूर्वी आदेश देण्यात आले होते.

श्री. मुश्ताक अहेमद : ज्यावेळी उमेदवाराची मुलाखात घेण्यात आली त्यावेळी हे उमेदवार कोठे नौकरी करतात का ही बाब माहीत नसली तरी मुलाखतीनंतर घेण्यात

आलेल्या प्रतिज्ञापत्रावरुन ही बाब स्पष्ट झाली तेव्हा अशा उमेदवारांना नेमणूक देण्याचा प्रश्न येतो कोठे.

मा.आयुक्त : या सर्व प्रकरणात जो काही घोळ झाला तो ठरावाचा (ड्राफ्टींग) करण्यात मला मनपातील १३ जागेसाठी १३० अर्ज आले होते. त्यावेळी सभागृहाने ज्यांना नोकरी आहे अशा सर्व शिक्षकांना संधी न देता जे सुशिक्षित बेकार आहेत, तरुण आहेत अशांना संधी देता यावी म्हणून जि.प.तील शिक्षकांची सेवा मनपात वर्ग करुन घेऊ नये त्याऐवजी मनपाचे जे सेवाभरती नियम शिस्त नियम आहेत. त्या नियमाप्रमाणे शिक्षकांची भरती करावी असा निर्णय झाला. मनपाचे जे सेवाभरती नियम आहेत त्याप्रमाणे समाज कल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग सेवायोजन कार्यालय यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आले. त्यात ४२० अर्ज आहे. जे मात्र उमेदवार होते त्यांची लेखी/तोंडी परिक्षा घेण्यात आली. वैधानिकरित्या नेमलेल्या समितीने गुणवत्ता यादी तयार केली. ही गुणवत्ता यादी वृत्तपत्रात जाहीर करण्यात आली.

पण त्यावेळी समाज कल्याण खाते सेवायोजन कार्यालयात असे कळवले असते का जे मुळात नोकरीस आहेत अशा उमेदवारांचा यादी समावेश करु नये दुसरा असा विचार आहे की, जि.प.सेवेत आहेत अशांना मनपा सारख्या स्वायंत्ता संस्थेत अर्ज करता येणार नाही का? असे बंधन आपण टाकू शकतो का? डिसक्वालीफाईड करु शकतो का? या बाबींचा विचार ठराव पारित करताना करण्ययाची आवश्यकता होती, मनपाच्या सेवाभरती नियमानुसार या देशात राहणारा, कुठल्याही जातीचा कुठल्याही प्रातांचा कुठल्याही धर्माचा पात्र उमेदवार अर्ज करु शकतो. शिक्षक या पदासाठी शालांत परिक्षा अद्यापनाची पदवी परीक्षा, शाळा सोडण्याचा दाखला वयाचा दाखला ह्या सर्व बाबींची पुर्तता करण्याचा उमेदवारांना आपण वैधानिकरित्या नाकारु शकतो का? हा प्रश्न सभागृहाने प्रथम लक्षात घ्यावयल पाहिजे. त्यावर सभागृहाने चर्चा करण्याची आवश्यकता आहे. असे मला वाटते. स्थायी समिती स.सभासद श्री हमीदउद्दीन ताबा यांना शिक्षक भरतीची यादी तयार आहे. सर्व प्रक्रिया पुर्ण झाली आहे. विद्यार्थी शिक्षणांपासून वंचीत होत आहेत. शिक्षकांच्या संख्या कमी आहेत. शिक्षकांच्या जागा रिकाम्या आहेत. यात कोणाला घ्यावयाची कोणाला द्यायची नाही यात भ्रष्टाचाराचे संशय निर्माण होतात. आदेश ताबडतोब द्यावेत अशी जोरदार सभापतीकडे मागणी केली. चौकशी केली असता गुणवत्ता यादी तयार आहे. पण सभागृहाच्या निर्णयाप्रमाणे आदेश काढता येत नाही. त्यावेळी ठरावाचे विश्लेषण केले असता जि.प.स नोकरीस असलेल्या शिक्षकांना वर्ग करुन घेणे. ज्यांना अर्ज केले यांना घेण्यात येवू नये असा उल्लेख ठराव नाही. गुणवंत यादी तयार होता. विद्यार्थी शिक्षणापासून वंचीत होत होते म्हणून गुणवंत्ता यादीनुसार आदेश काढण्याची सूचना दिली होती. यावर सभागृहाने गंभीरपणे विचार करुन पॉलिसी ठरवावी. ठरविण्यात आलेल्या पॉलिसी असे विधानातील असेल तर त्याबाबत शासनाकडून आदेश मागवावे लागतील. जर संबंधाताने असेल तर या सभागृहाचा अपमान करण्याचा प्रशासनाला १ टक्के सुध्दा इंट्रस्ट नाही. या सभागृहाची शान राहील या सभागृहाचा मान राहील. या सभागृहाची

प्रतिष्ठा उंचावेल हिच भूमिका व दृष्टीकोन प्रशासनाचा निश्चित असेल याबाबत मी हमी देवू इच्छितो.

मा.विरोधी पक्षनेता : मा.आयुक्त यांना सविस्तर खुलासा केला त्यात ठरावात काही ठरावात चुक आढळून आल्याचे सुचविले, त्यात ठरावात जि.प.चा उल्लेख केला गेला तर याबाबत मा.महापौर यांचेशी चर्चा करुन निर्णय घ्यायला हवा होता. त्या नंतर आदेश घ्यावयाला हवा होता. पण चर्चा न करता ठरावातील छोटीशी बाजू समोर ठेवून अधिकाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला गेला तेव्हा मा.महापौरांनी निर्णय घ्यावा.

श्री. मुश्ताक अहेम : शिक्षक भरतीचा ठराव सभागृहाकडे ठेवला असता जि.प.च्या कोणत्याही शिक्षकांस मनपात घेतले जाणार नाही. असा निर्णय झाला होता. त्यानंतर स.सभासद श्री.हमीदउद्दीन ताबा यांनी प्रश्न उपस्थित केला असता उमेदवारांची सही तपासली जाईल व उमेदवाराकडून नोकरीत आहे किंवा नाही याबाबत प्रतिज्ञापत्र देण्या येईल. (ज्यावेळेच्या) असे मा.आयुक्त यांनी आश्वासन दिले होते. नौकरीस ाहे असे प्रतिाापत्र दिले नंतरही नेमणूक आदेश दिले जातात याचाच अर्थ सभागृहाचा अपमान (खुली खुली) करतात. मा.आयुक्तांनी जो खुलासा केला त्यावर सभागृहाच्या विरुध्द निर्णय घेतला आहे असे कुणीही सांगू शकेल. याचा खुलासा व्हावा अन्यथा आम्हास हायकोर्टात जावे लागेल.

श्री. विखारोद्दीन : मा.आयुक्त यांच्या खुलाशावरुन अधिकाऱ्यांची बाजू घेतली जाते दिसते. उमेदवारांना दिलेल्या प्रतिज्ञापत्रावरुन सदर उमेदवार जि.प.च्या नौकरीत आहे व ते नौकरी सोडून मनपाकडे येत आहे. या बाबींची कल्पना असतांना सुध्दा अशा उमेदवारांना आदेश कोणी दिले याचा खुलासा करावा. यात निश्चित भ्रष्टाचार झाला.

सौ. लता दलाल : ऑगस्टमध्ये ठराव झाल्यानंतर लेखी/तोंडी चाचणी घेण्यात आली माजी महापौर तत्कालीन मा.आयुक्तांना दिलेल्या पत्रात जि.प.कार्यरत असलेल्या शिक्षक सरळ सेवा भरती मनपात सेवासंधी देण्यात येवू नये. असे लेखी चाचणीवेळी जि.प.च्या शिक्षकांना परीक्षा दिली आहे. त्यांना नेमणूक देण्यात येवू नये असे कळविले आहे. त्यावर गांभीर्याने विचार केला गेला नाही सर्व सभागृहा अंधारात ठेवून सभागृहाचा अवमान करुन भरती केली गेली आहे. माजी महापौरांच्या जत्राचा प्रशासनाने विचार का केला नाही. प्रतिज्ञापत्र दिलेल्या शिक्षकापैकी किती शिक्षकांनी जि.प. नौकरीत होते असे लिहून दिले आहे. याचा खुलासा व्हावा.

मा.उपआयुक्त : प्रतिज्ञापत्रात शिक्षकांना जि.प.सेवेत असल्याचे लिहून दिले आहे.

सौ. लता दलाल : त्यावरुन ज्या अधिकाऱ्यांना मुलाखत घेतली त्यांनाही शिक्षक जि.प.नौकरीत आहेत हे माहित होते असा निष्कर्षातून निघतो. यावरुन सभागृह मा.महापौर सभापती त्यांना अंधारात का ठेवले त्याचा खुलासा झाला पाहिजे. यामुळे प्रशासन जि.प.यची फसवणूक झाली सभागृहाचा अपमान झाला व सुशिक्षित बेकार वंचीत राहीले. या बाबीला जे को्णी अधिकारी जबाबदार असतील त्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे.

श्री. हमीद उद्दीन ताबा : जि.प.त नौकरीस असातांनाही शिक्षकांना मुलाखत दिली तर ह्या शिक्षकाने सेवायोजनातील नाव कमी का झाले नाही सेवायोजन कार्ड कसे

चालू राहिले या उमेदवारांवर दिवानी दावा करण्यात यावा.(अनेक सभासद एकाच वेळी बोलतात.)

मा.महापौर : सर्व सभासदांच्या सभागृहातील भावना विचारात घेता असे दिसून येते की, माजी आयुक्तांना गुणवत्तेनुसार शिक्षक भरतीची यादी तयार केली. त्याच यादीला अधिन राहून प्रस्तुत प्रशासनाने शिक्षक भरतीपैकी त्या यादीतूनच जि.प. शिक्षकांची प्रशासनाने नेमणूक केली मा.सभागृहाचा अपमान झाला. त्यास कारणीभूत ठरलेल्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी. ही माझी भूमिका आहे. ज्या शिक्षेकेची भरती झाली त्यातून जि.प. शिक्षकांबाबत सर्वांचे म्हणणे आहे. इतर शिक्षकाबाबत गुणवत्ता यादी बाबत कोणाचाही काही आक्षेप दिसून येत नाही. त्यामुळे निर्णय घेण्यात येतो की, जि.प.शिक्षकांची भरती रद्द करण्यात येते. गुणवत्ता यादीनुसार बाकीचे जे शिक्षक भरती करण्याा आले ते कायम राहतील. ह्या पुढचे नेमणूकीत प्रशासनापुढे कोणीही ह्या ठिकाणी प्रशासनातर्फे जी नेमणूक झाली त्या नेमणूकीत कोणत्याही पदाधिंकाऱ्यांचा किंवा नगरसेवकांचा हात नाही हे महापौर म्हणून नमूद करतो. याची चौकशी मा.आयुक्त करतील.

सौ. लता दलाल : मा.सभृहात जो निर्णय झाला याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना होती. त्या अधिकाऱ्यांना उमेदवारांची मुलाखत घेताना खरी खरी माहिती घ्यावयाची होती व त्याच उमेदवारांना खुलासा करावयाला हवा होता म्हणून संबंधित अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही करणार याचा खुलासा व्हावा.

मा.महापौर : ह्या प्रकरणात कोणकोणत्या अधिकाऱ्यांचा हात आहे याची चौकशी करण्यांत येईल. मा.आयुक्त चौकशी करतील विषय क्र.२ चर्चेला घेण्यात यावा.

**ठराव :**

सर्व सभासदांच्या भावना लक्षात घेता दिनांक २०.७.९५ च्या ठरावानुसार जि.प.मधून कोणत्याही शिक्षकास मनपात भरती करुन घेवू नये. असा निर्णय घेण्यात आला होता. यावर स्थायी समितीतही चर्चा झाली. माजी आयुक्तांना शिक्षण भरतीची गुणवत्ता यादी तयार केली. त्याच यादीला अधिन राहून प्रस्तूत प्रशासनाने शिक्षक भरती केली या यादीतून जि.प.शिक्षकांची प्रशासनाने नेमणूक केली व मा.सभागृहाचा अपमान झाला. ह्या प्रकरणी कारणीभूत ठरलेल्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यत यावी. तसेच ह्या यादीतून जिल्हा परिषद व्यतिरिक्त इतर शिक्षक भरती करण्यात आले आहे. त्यांचे बाबत सभागृहाचे काहीही म्हणने नसल्याने जि.प. शिक्षकांची भरती रद्द करण्यात येते. सदरील भरती प्रकरणात मा.आयुक्तांनी चौकशी करावी व अहवाल येत्या सर्वसाधारण सभेत सादर करावा.

ठरावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.६३/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, सिडको अग्निशमक केन्द्राजवळ सध्या अस्तित्वात असलेल्या निवास स्थानावर एक मजला वाढविणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.१२,०३,२००/- चे तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांची मान्यता घेण्यात आलेली आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली इमारती सन ९६-९७ च्या लेखा शिर्षाअंतर्गत उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक रक्कम रु.१२,०३,२००/- चा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री. जयवंत ओक, संजय जोशी : अत्यावश्यक सेवा असल्यान अग्निशमन विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच क्वार्टर देण्यात यावे. सिडको अग्निशमन कार्यालयातील क्वार्टरसचे मागील भिंतीस तडा गेलेला आहे. अशा परिस्थितीत पहिल्या मजल्याचे बांधकाम करता येईल का खुलासा व्हावा या ठिकाणी बन्सीलाल नगर, अग्निशमन दलात काम करणारे काही कर्मचारी रहातात याबाबत प्रश्न विचारलेला आहे. अग्निशन अधिकारी सभेस उपस्थित नाही.

मा.महापौर : अग्निशमन अधिकारी यांनी नोंद घ्यावी व कार्यवाही करावी. अतिरिक्त शहर अभियंता पाहणी करुन अहवाल देतील.

श्री. जावेद रज्जाक : ह्या इमारतीचे बांधकाम किती आहे. किती खोल्या बांधणार हे क्वार्टर अग्निशमन विभागाचे कर्मचाऱ्यांनाच देण्यात यावे.

अति.शहर अभियंता : सिडको अग्निशमन कार्यालय येथे आठ क्वार्टर बांधण्यात येणार आहेत. एकुण ३४५० स्वेफु. बांधकाम आहे. त्या कामासाठी १२ लाख ३२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. अग्निशमन कर्मचाऱ्यांत वाढ झाली आहे.

श्री. महादेव सुर्यवंशी : त्या कामाचा खर्च भांडवली इमरती ह्या शिर्षकातून करण्यात येणार असल्याने अति.शहर अभियंता यांच्याकडून ठराव कसा ठेवला गेला ह्याबाबत खुलासा व्हावा.

अति.शहर अभियंता : ह्या पूर्वीचे बांधकाम याच विभागाकडून झालेले आहे. म्हणून नविन बांधकाम ह्या विभागाकडून होत आहे.

मा.आयुक्त : अग्निशमन दलाचे क्वार्टरमध्ये अग्निशमन कर्मचारीच राहतील याची दखल घेण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिडको अग्निशमन केंद्राजवळ सध्या अस्तित्वात असलेल्या निवासस्थानावर एक मजला वाढविण्याचे कामासाठी सा.बा.खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु.१२,०३,२००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च इमारती सन ९६-९७ च्या लेखा शिर्षकाअंतर्गत उपलब्ध तरतुदीमधून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, शहागंज चमन भोवती व निजामोद्दीन दर्ग्यापर्यंत डांबरीकरण करणे ह्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचा सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.११,५३,५६७/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती सन १९९६-९७ च्या लेखा शिर्षकामधून करण्यात येईल.

**संवाद :**

श्री. महादेव सुर्यवंशी : प्रस्तुत प्रस्तावातील काम यापूर्वी केव्हा झाले व आजची परिस्थिती काय आहे.

श्री. जावेद रज्जाक : शहागंज पासून निजामोद्दीन दर्गा पर्यंत डांबरीकरणाचा प्रस्ताव आहे. यात अंदाजपत्रक रक्कम जादा वाटते. हा रस्ता दोन नगरसेवकांच्या वार्डात येतो. तेव्हा वार्डाप्रमाणे किती खर्च याची माहिती देण्यात यावी.

अति. अतिरिक्त शहर अभियंता : शहागंज ते निजामोद्दीन दर्गापर्यंतच्या डांबरीकरण ५-६ वर्षापूर्वी झाले. त्या रस्त्याचे डांबरीकरण अगत्याचे आहे.

मा.महापौर : विषय क्र.३ मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहागंज चमन भोवती व निजामोद्दीन दर्ग्यापर्यंत डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु.११,५३,५६७/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च रस्ते व देखभाल व दुरुस्ती सन १९९६-९७ च्या लेखा शिर्षकामधून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४/४ :**

अतिरिक्त अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, बारापुल्ला दरवाजा ते लिटर फ्लॉवर स्कुलपर्यंत रस्त्याचे डांबरीकरण रुंदीकरण करणे व खडीकरण करुन रस्त्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.१०,५४,२००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामांचा खर्च भांडवली रस्ते सन १९९६-९७ ह्या लेखा शिर्षाकामधून करण्यात येईल सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रु.१०,५४,२००/- चा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री. प्रभाकर विधाते : प्रस्तावित रस्त्यात किती अतिक्रमण येतात किती घरे बधित होतात.

अति. शहर अभियंता : प्रस्तावित रस्त्याच्या जास्तीत जास्त भाग मोकळा आहे. २/४ किंवा त्यापेक्षा जास्त अतिक्रमण असतील ते काढून रस्ता मोकळा करण्यात येईल.

श्री. महादेव सुर्यवंशी : प्रस्तावित रस्त्याचे रुंदीकरण किती घरे बाधित होतात याचा खुलासा झालेला नसल्याने प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवून पाहणी करण्यात यावी.

सौ. शकुंतला धांडे : प्रस्तावित रस्त्यात एकही अतिक्रमण नाही तेव्हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री. जावेद रज्जाक : रस्ता किती रुंद आहे किती अतिक्रमण आहे हे काम नगरसेवकाचे नसून प्रशासनाचे आहे.

श्री. संजय जोशी : ह्या सभागृहाला हा रस्ता किती रुंद आहे किती खोल आहे किती अतिक्रमण आहे हे विचारण्याचा पूर्ण अधिकार आहे.

श्री. अभिमन्यू भालेराव : प्रस्तावित रस्ता रुंद असावा अशी नगरसेवकाची मागाणी आहे. पण तो किती रुंद असावा याबाबत शहर अभियंता यांनी मोजमाप करावे व त्याप्रमाणे अंदाज पत्रक मंजूर करावे.

सौ. लता दलाल : रस्ता रुंदीकरणास कोणत्याही नगरसेवकाचा विरोध असण्याचे कारण नाही. प्रस्तावित कामाबाबत माहिती विचारण्याचा नगरसेवकांना अधिकार आहे. तेव्हा अधिकाऱ्यांनी प्रस्तावाबाबत किती रुंदीकरण करणार किती घरे

बाधित होतात त्यापैकी मातीची किती पक्के किती त्यासाठी किती पैसा लागेल इ.सर्व माहिती दिली पाहिजे.

श्री. गौतम खरात : नगरसेवकांना कुठलीही माहिती विचारण्याचा अधिकार आहे. प्रस्तावित रस्ता महापालिकेचा की बी ॲण्ड सी चा आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याचा असेल तर त्याचा विकास करण्याचा अधिकार महापालिकेला आहे का?

अतिरिक्त शहर अभियंता : प्रस्तावित रस्ता सार्वजनिक बांधकाम खात्याचा आहे पण शहरात येतो.

श्री. कचरु नवपुते सौ. सुनंदा कोल्हेः जालना रोडचे रुंदीकरणाची मागणी केली असता तो रस्ता मा.आयुक्तेचा नाही असे सांगितले जाते. मग प्रस्तावित रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाचा असताना रुंदीकरणचा प्रस्ताव कसा मांडला गेला प्रस्ताव रद्द करावा.

श्री. प्रकाश निकाळजे : ह्या प्रस्तावाबाबत गल्लत होत आहे. जालना रोड हा हायवे रस्ता आहे आणि प्रस्तावित रस्ता हा शहरात आहे. त्यात बाधित एकही घर नाही. तेव्हा हा प्रस्ताव मंजूर करावा.

मा.महापौर : विषय क्र.४ रद्द करण्यात आहे. मा.आयुक्त यांनी सदर रस्ता महापालिकेकडे हस्तांतर करुन घेण्याबाबत कार्यवाही करावी.

**ठराव :** प्रस्तावित रस्त्याचे महानगरपालिकेकडे हस्तांतर होत नाही तो पर्यंत काम रद्द करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

सौ. लता दलाल : सार्वजनिक बांधकाम विभागाने जालना रोड क्रॉस करुन पाईप लाईन टाकण्यास मंजूरी दिली नाही त्यामुळे पैठणगेट दलालवाडी खोकडपूरा हा भाग पाण्यापासून वंचीत रहात आहे. महापालिका अधिकाऱ्यांनी अनेकदा भेट घेतली याबाबत तातडीने कार्यवाही व्हावी.

मा.महापौर : सूचनेची दखल संबंधीत अधिकारी घेतील.

**विषय क्र. ६६/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, लिटल फ्लॉवर स्कुल ते विद्यापीठ गेटपर्यंत रोडचे डांबरीकरण कारणे ह्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रु.२३,८२,५००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते व देखभाल व दुरुस्ती सन १९९६-९७ च्या लेखा शिर्षकाअंतर्गत उपलब्ध तरतुदी मधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु.२३,८२,५००/- चा प्रस्ताव मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. महादेव सुर्यवंशी : प्रस्तावित रस्ता महापालिकेच्या मालकीचा आहे का?

अतिरिक्त शहर अभियंता : प्रस्तावित रस्ता महापालिकेच्या मालकीचा आहे यात ११०० मीटर लांब व १९ मिटर रुंद डांबरीकरण करण्यात येणार आहे.

मा.महापौर : विषय क्र.५ मंजूर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार लिटल फ्लॉवर स्कुल ते विद्यापीठ गेटपर्यंत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु..२३,८२,५००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती सन १९९६-९७ च्या लेखाशिर्षका अंतर्गत उपलब्ध तरतुदीमधून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७/६ :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, व्यंकटेश नगर सुराणानगर सेव्हन व्हिल्स कॉलनी आणि रघुवीर नगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण ह्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ दरसूचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.७,७३,६१३/- जे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते व देखभाल व दुरुस्ती या रात १९९६-९७ च्या लेखा शिर्षकामधून उपलब्ध तरतूदी मधून करण्यात येईल. क्षरी अंदाजपत्रक रक्कम रुपये. ७,७३,६१३/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार व्यंकटेश नगर सुराणानगर सेव्हन हिल्स कॉलनी आणि रघुवीर नगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु.७,७३,६१३/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाव व दुररुस्ती या सन १९९६-९७ या लेखा शिर्षकामधून उपलब्ध तरतुदीमधून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८/७ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.हर्षनगर स्लम येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे बाबतच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रु.९,९०,९००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम डांबरी रस्ते रु.७०.०० लाख या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दिनांक १६.७.९६ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रु.९,९०,९००/- यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो. हर्षनगर स्लम येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता सा.बां.खाते यांच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु.९,९०,९००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम डांबरी रस्ते रु.७०.०० लाख ह्या शिर्षकातून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९/८ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.रहेमानिया कॉलनी स्लम येथे डांबरीकरण करणेबाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रु.१९,९५,०६७/- अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम डांबरी रस्ते रु.७०.०० लाख ह्या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दिनांक ६.७.१९९६ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

करिता सदरील कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रुपये रु.१९,९५,०६७/- या मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

ठराव : प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.रहेमानिया कॉलनी स्लम येथे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता सा.बां.खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु.१९,९५,०६७/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम डांबरी रस्ते रु.७०.०० लाख या शिर्षकातुन करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०/९ :**शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.नागसेननगर व मिलींदनगर स्लम भागात अर्धगोलाकार सरफेस गटार बांधकाम करणे करिता रु.२६,००,०००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची १९९५-९६ अनुसार तयार करण्यात आले असून मा.आयुक्तांनी दिनांक २९.६.९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. करिता अंदाजपत्रक रु.२६,००,०००/- चा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

सौ. रजनी जोशी : अर्ध गोलाकार गटाराची साफसफाई योग्य प्रमाणाा होत नाही म्हणून भुमिगत गटाराचे काम करावे.

मा.महापौर : स.सभासदांची सुचना योग्य आहे. यानंतर सुचनेचा विचार करण्यात येईल. विषय क्र.९ मजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.नागसेननगर व मिलींदनगर स्लम भागात अर्धगोलाकार सखोस गटार बांधणे करिता सा.बां.विभाग औरंगाबाद यांची दरसुची १९९५-९६ नुसार तयार करण्यात आलेले रु.२६,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ७१/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.हर्षनगर स्लम येथे खांडकी दुरुस्त करणे व फरशी बसविणे व गटार दुरुस्त करणे बाबतच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रुपये ८,३८,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम खांडकी रस्ते रु.१८.०० लाख या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.९.७.९६ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रुपये ८,३८,०००/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.हर्षनगर स्लम येथे खांडकी दुरुस्त करणे व फरशी बसविणे व गटार दुरुस्त करणे बाबतचे कामाकरिता सा.बां.खाते यांचे वर्ष १९९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रुपये ८,३८,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम खांडकी रस्ते रु.१८.०० लाख या शिर्षकातून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२/११ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.घाटी जयभिमनगर स्लम येथे संरक्षित भिंत बांधणेबाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९५-९६ च्या दरसूचीनुसार रु.५,७८,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम खुली गटार बांधणेत रु.१००.०० लाख ह्या शिर्षामधून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.६.७.९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु.५,७८,३००/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.घाटी, जयभीमनगर स्लम येथे संरक्षित भिंत बांधणे बाबतचे कामाकरिता सा.बां.खाते यांचे वर्ष ११९५-९६ ह्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु.५,७८,३००/- चे अंदाजपत्रस तसेच सदरील काम खुली गटार बांधणे रु.१.०० लाख ह्या शिर्षामधून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे. की, मो.पिसादेवी ते हर्सुल येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९४-९५ च्या दरसुचीनुसार रु.१२,९८,००५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम नविन डांबरीकरण ११०.०० लाख या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.०७.०७.९६ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रु.१२,९८००५/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

ठराव : प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.हर्षनगर स्लम येथे नाल्याच्या बाजुने संरक्षित भिंत बांधणे बाबतचे कामाकरिता सा.बां. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसूची नुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु.११,०३,६६७/-चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम खुल्या गटारी बांधणे रु.१००.०० लाख या शिर्षकातून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.हर्षनगर स्लम येथे नाल्याच्या बाजूने संरक्षित भिंत बांधणे बाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसूचीनुसार रु.११,०३,६६७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम खुल्या गटारी बांधणे रु.१००.०० लाख ह्या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.२५.७.९६ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.हर्षनगर स्लम येथे नाल्याच्या बाजुने संरक्षित भिंत बांधणेबाबतचे कामाकरीता सा.बां.रस्ते यांच्या वर्ष ९६-९७ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु.११,०३,६६७/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम खुल्या गटारी बांधणे रु.१००.०० लाख या शिर्षकातून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.संजयनगर बायजीपुरा स्लम येथे शहाबाद फरशी बसविणे बाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१८.०० लाख ह्या शिर्षकातून करण्यात येईल. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.४.८.९६ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रुपये ९,५४,५२२/- यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.संजयनगर, बायजीपुरा स्लम येथे शहाबाद फरशी बसविणे बाबतचे कामाकरिता सा.बां.खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु. ९,५४,५२२/- अंदाजपत्रकास तसेच सदरील काम खांडकर रस्ते रुपये १८.०० लाख या शिर्षकातून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. भावसिंगपुरा गाव स्लम येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु.६,४८,६७७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम १८ खेडी विकास योजना मधील खडी रस्ते रु.८०.०० लाख ह्या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी ६.७.९६ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रु.६,४८,६७७/- यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्ताव दर्शविल्यानुसार मो.भावसिंगपुरा गांव स्लम येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता सा.बां खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु. ६,४८,६७७/-चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम १८ खे्डी विकास योजना मधील खडी रस्ते रु.८०.०० लाख ह्या शिर्षकातून करण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.इंदिरानगर, बायजीपुरा स्लम येथील डांबरीकरण करणे बाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.२५,७२,७६७/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील काम नविन डांबरीकरण रस्ते रु.७०.०० लाख ह्या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.६.७.९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु.२५,७२,७६७/- यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथ मंजूरीस्तव सादर.

ठराव : प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.इंदिरानगर बायजीपुरा स्लम येथील डांबरीकरण करणेच्य कामारिता सा.बां. खाते याच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार

करण्यात आलेले रक्कम रु.२५,७२,७६७/- चे अंदाजपत्रक तसेच सदरील काम नवीन डांबरीकरण रु.७०.०० लाख ह्या शिर्षकातून करण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८/१७ :**

नगर सचिव ह्यानी प्रस्ताव सादर केला की, दि.३०.७.९६ च्या स्थायी समितीमध्ये चर्चा झाल्यानुसार महानगरपालिका शाळांची स्थिती योग्य नाही. महानगरपालिका शाळेस भेट दिली असता इयत्ता ७वी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यवस्थित वाचता पण येत नाही. असे स.नगरसेवकांनी मा.सभापती यांच्या निदर्शनास आणून दिले आहे. त्यासाठी स्थायी समिती समितीचे तीन सभासद आणि ज्या वॉर्डात महानगरपालिकेची शाळा असेल त्या वॉर्डाचे संबंधित नगरसेवक असा ग्रुप तयार करन शाळा तपासणी करतील. तसेच विद्यार्थ्यांची शैक्षणिक पातळी वाढविण्याचे प्रयत्न करतील. ह्या समितीतील महानगरपालिका शाळांची तपासणी करण्याचे सर्व अधिकार देण्यात यावे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री. संजय जोशी : महापालिका शाळेतील इयत्ता ७ वीच्या विद्यार्थ्यांस वाचता येत नाही. ही अतिशय निंदणीय बाब आहे. ह्या बाबीस शिक्षक जबाबदार आहेत. तेव्हा अशा शिक्षकांची वेतनवाढ रोखण्यात यावी किंवा त्यांच्यावर कडक कार्यवाही करावी. जेणेकरुन महापालिका शाळांचा शैक्षणिक दर्जा सुधारेल.

श्री. मुश्ताक अहेमद सौ. मोहसिना बिल्कीस : स.सभासदांनी सुचविल्याप्रमाणे अशा शाळांची यादी तयार करुन शाळांना भेटी देण्यासाठी (दोन्ही बाजूंचे) एक उपसमिती नेमण्यात यावी.

श्री. गौतम लांडगे : दि.३०.७.९६ च्या स्थायी समितीतील चर्चेनुसार महापालिका शाळेच्या स्थिती बाबत जो आढावा घेण्यात आला त्यानुसार कोणत्या शाळा आहेत की, ज्यांना भेट देण्यात आली व संबंधीत वर्गात कोणते शिक्षक काम करतात याबाबतचा खुलासा सभागृहात करण्यात यावा.

सौ. मोहसिना बिल्कीस : ५ ते ७ वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या शाळेतील शिक्षक आठवीत प्रवेश देण्यास (खुरेद) नकार करतात. याचे कारण काय? याचा अर्थ महापालिका शाळेतील शिक्षणाचा शैक्षणिक दर्जा खालावलेला आहे. म्हणून आताच सुचविल्याप्रमाणे समिती नेमण्यात यावी.

सौ. लता दलाल : उपसमितीस माझा विरोध नाही. महापालिकेच्या शाळेत शालेय समिति नेमण्यत आली आहे. अशा शालेय समितीचा अध्यक्ष शाळा ज्या वॉर्डात सेल असेल तेथील नगरसेवक असतो. जी उपसमिती नेमण्यात येणार आहे त्या उपसमितीने शाळेस भेट देतांना संबंधित वॉर्डाचे नगरसेवकांबाबत भेट देणे योग्य राहील. याशिवाय नगरसेवक/नगरसेविका स्वतंत्र्यपणे शाळेस भेट देवू शकतील अशी व्यवस्था असावी.

मा.महापौर : सर्व सुचना लक्षात घेवून विषय क्र.१७ मंजूर करण्यात येतो.

श्री. जावेद रज्जाक : शिक्षण उपसमितीच का? नेमली जात आहे. आरोग्य विकास समिती का नेमल्या जात नाही? महापालिका नियमानुसार सर्व समिती नेमल्या गेल्या पाहिजे. तसेच पंचायत राज नियमाप्रमाणे इतर समितीची स्थापना का केली जात नाही. त्या समितीस ३ ऐवजी कमीत कमी सदस्य होणे आवश्यक आहे.

मा.महापौर : स्थायी समितीचे ३ सदस्य व संबंधित वॉर्डाचे नगरसेवक अशी चार सदस्यांची समिती राहील त्यामुळे काही अडचण येणार नाही.

अल्का पाटील : महापालिकेच्या शाळेत शारीरिक शिक्षणाची सोय कोठे कार्यरत आहे. वॉर्ड क्र. च्या शाळेत कधी शारीरिक शिक्षणाचा तास झालेला नाही.

श्री. मुश्ताक अहेमद : प्रस्तावानुसार समिती नेमण्याऐवजी शिक्षण कमिटी (बहाल) करण्यात यावी व सभापतीची नेमणूक करावी.

मा.महापौर : स.सभासदांच्या सूचनांशी दखल आयुक्त घेतील विषय क्र.१७ मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार दि.३०.७.९६ च्या स्थायी समितीमध्ये चर्चा झाल्यानुसार महापालिका शाळांची स्थिती योग्य नसुन महापालिका शाळेस भेट दिली असता इयत्ता ७ वी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यवस्थित वाचता पण येत नाही. ही बाब स.नगरसेवकांनी मा.सभापती यांचे निदर्शनास आणून दिली असता त्यासाठी स्थायी समितीचे तीन (३) सभासद व त्या वॉर्डात महापालिके ची शाळा असेल त्या वॉर्डाचे संबंधित नगरसेवक असा ग्रुप तयार करुन शाळा तपासणी करणे व विद्यार्थ्यांची शैक्षणिक पातळी वाढविण्याचा प्रयत्न करणेसाठी ह्या समितीला महापालिका शाळांची तपासणी करणेचे सर्व अधिकार प्रदान करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९/१८ :** जकात अधिक्षक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका नियम १९८४ चे अनुसूची ‘‘ओ’’ मध्ये दुरुस्ती व जकात दर वाढीचा प्रस्ताव (ठराव) क्र.६७ दि.१०.२.९५ अन्वये शासनास मान्यतेसाठी पत्रक क्र.मनपा जकात किरकोळ/४३३२/९५ दि. १८.३.९५ ला पाठविण्यात आला होता. त्यानंतर सदरच्या प्रस्तावाबाबत शासनाचे पत्र दि.९.५.९५ च्या पत्राद्वारे सदरच्या प्रस्तावास नवनिर्वाचीत सर्वसधारण सभेची मंजूर घेवून सदर प्रस्ताव पुन्हा शासनास पाठवावा असे सुचित केल्यामुळे मा.आयुक्त यांनी सन १९९६-९७ च्या मुळ अंदाजपत्रकास सदरील प्रस्तावातील ५५ ॲटम वरील जकात दर वाढीपैकी ह्या सोबतच्या जोडलल्या तक्त्यातील काही ॲटमवरील वस्तुवर जकात दरवाढ दर्शवून रुपये ५ (पाच) कोटीचे अधिकचे उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा धरली आहे. तेव्हा सन १९९६-९७ ह्या आर्थिक वर्षाकरिता दि.१९.२.९६ च्या स्थायी समिती सभागृहाने सादर केलेल्या अर्थसंकल्पास मान्यता देवून सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभा दि.११.३.९६ रोजी भरलेल्या सभेत मानयतेस्तव शिफारस करण्यात आली असून त्यात ठराव क्र.१६०/१ वर सविस्तरपणे विचार विनिमय होवून दिनांक १२.३.९६ च्या सर्वसाधारण सभेने सन १९९६-९७ च्या मुळ अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता दिलेली आहे. त्यानुसार शासनाचे दि.९.५.९६ च्या पत्रानुसार जकात दरवाढीसाठी एक स्वतंत्र अंतिम ठराव पारित करुन शासनास पाठविण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे अवलोकनार्थ व विचार विनिमयास्तव सादर.

**संवाद :**

श्री. रशिदखान (मामू) : विषय क्र.१८ नुसार ८६ साहित्यांना किती जकात लावायाची याचा निर्णय घ्यावयाचा आहे. प्रशासकाचे काळात ओ शेड्युल मध्ये माहिती मागविण्यात आली होती. तथापि महानगरपालिकेने पाच महिन्यापुर्वीच ह्या दराने मिळणारे उत्पन्न जमा होईल असे मानले आहे. तेव्हा प्रस्तावास उशिर

का झाला. प्रस्ताव आता मंजूर झाल्यास मागील पाच महिन्याची थकबाकीचे काय? आर्थिक नुकसान झाले आहे.

जकात अधिक्षक : स.सभासदांची सूचना बरोबर आहे. १९९४ मध्ये प्रस्ताव पाठवला असता सभागृहांची मंजूरी घेवून ठराव पाठवावा असे पत्र मिळाले, त्या नुसार स्थायी समितीपुढे प्रस्ताव ठेवण्यात आला. १२.३.९६ ला सर्वसाधारण सभेत ठेवण्यात आला होता. त्यावेळी अंदाजपत्रकास मंजूरी दिली असा ठरावात उल्लेख आहे. वस्तुनिहाय मान्यता पाहिजे म्हणून पुन्हा सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आला आहे.

मा.महापौर मा.सभापती : ह्यापूर्वी ठेवण्यात आलेल्या स्थायी समिती प्रस्तावात सविस्तर प्रस्ताव ठेवला गेला नाही. म्हणून सविस्तर प्रस्ताव ह्या ठिकाणी ठेवण्यात आला आहे. त्यास मंजूरी देयास हरकत नसावी. आचार संहितेनंतर एकच सभा झाली.

मा.आयुक्त : स.सभासदांची सूचना महत्वाची आहे. आर्थिक उत्पन्नाचा ठराव प्रस्ताव आहे. त्यास मंजूरी द्यावी लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल.

मा.महापौर : स.सभासदांच्या सूचनेप्रमाणे शासनाकडून लवकरात लवकर मंजूरी मिळण्याची कार्यवाही केली जाईल. ॲटम क्र.२६ मध्ये ४ टक्के आणि ॲटम क्र. ....... मध्ये ५ टक्के वाढ करण्यात येते.

गौतम खरात : चालू वर्षाच्या अंदाजपत्रकास जकात कर वाढीपासून ५ कोटी जादा उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले आहे. ठराव पाठविण्यास उशिर झालेला आहे. शासनाची मंजूरी मिळण्यास काही कालावधी लागेल तेव्हा ५ कोटीचे अपेक्षित उत्पन्नाची उणीव कशी भरुन काढणार.

लेखाधिकारी : जकात करापासून ४७ कोटी अपेक्षित उत्पन्न आहे. मागील वर्षी ३० कोटी उत्पन्न मिळाले. चालू वर्षात १५ टक्के ते २० टक्के वाढ करुन चालू वर्षात ३५ कोटी निव्वळ उत्पन्न व ५.२५ कोटी रुपये महाराष्ट्र डिस्लरी आणि बी.डी.ए. कंपनी आणि सिरीट वरील वाढ ७५ लाख असे उत्पन्न विचारात घेता अपेक्षित उत्पन्न ४१ कोटी मिळेल. ५ कोटींचे कमी उत्पन्नाचा विचार सुधारित अंदाजपत्रकात करावा लागेल अशी टिप्पणी सादर केलेली आहे. यात रोपवे, विज्ञान केंद्र, तारांगण अशी जी हाती घेतली नाहीत त्यातून तूट भरुन काढता येईल.

मा.महापौर : विषय क्र. १८ मंजूर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमााणे औरंगाबाद महापालिकेने मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम १२७ (२) १४९, १५४ व ४६० अन्वये जकात नियम १९८४ चे अनुसूची "ओ" मध्ये दुरुस्ती व जकात दर वाढीस ठराव क्र.६७ दिनांक १७.२.९५ अन्वये मान्यता झाल्यावर तसा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी पाठविण्यात आला होता शासनाचे दि.९.५.९५ च्या पत्रानुसार सदर प्रस्ताव नवनिर्वाचीत सर्वसाधारण सभेची मंजूरी घेऊन पाठविण्यास सुचित केल्याप्रमाणे सर्वसाधारण सभेने ठराव क्र.६७ दि.१७.२.९५ मधील गॅट नं. क्र.१ ते ८६ पैकी ५५ ॲटम वरील जकात दर वाढीपैकी फक्त ५ खालील क्रमांकाचे आहेत.

ॲटम क्र.१ ब, ४,७,अ,ब, ३२ अ ते ३,३४, अ ते ५ ३५, ४७ अ ते ३ ५४ अ,ब,५७,५८ अ.ब. ५९,६६, अ,ब, ६७,६८, अ,ब,क, ६९ अ,ब, ७०,७१, अ,ब, ७२ अब ७३ अ ७५ ७७, ७८ अबक ८२,८५ अ ८६ ह्या जकात दर वाढीस सर्वानुमते मंजूरी दिली जाते व सदर प्रस्ताव

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५५ अन्वये शासनास मान्यतेसाठी पाठविण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ८०/१ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, हॉटेल अमरप्रितचे चेतनानगर ह्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी रक्कम रु.१३,७५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या जिल्हा दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामासाठी शासनाकडून मिळालेल्या रक्कम रु. १०.०० कोटीच्या अनुदानातून करण्याचे प्रस्तावति आहे.

करिता सदर कामाचे रक्कम रु.१३,७५,०००/- चे अंदाजपत्रक सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार हॉटेल अमरप्रित ते चेतनानगर ह्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन १९९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु.१३,७५,०००/- चे मिळालेल्या रक्कम रु. १०.०० कोटीच्या अनुदानातून अंदाजपत्रकास तसेच सदरील काम शासनाकडून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८१/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, पन्नालालनगर ते पीरबाजार ह्या ८० फूट रुंद विकास रस्त्याचे रुंदीकरण करणे रस्त्याच्या मधोमध दुभाजक टाकणे ह्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रु.११,५०,०५०.००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९६-९७ च्या भांडवली रस्ते या शिर्षकातून करण्याचे प्रस्तावित आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.११,५०,०५०.००/- चे अंदाजपत्रक मंजूरी बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार पन्नालालनगर ते पीरबार या ८० फूट रुंद विकास रस्त्याचे रुंदीकरण करणे व रस्त्याच्या मधोमध दुभाजक टाकणे या कामासाठी सा.बां. खात्याच्या जिल्हा दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु.११,५०,०५०.००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च सन १९९६-९७ च्या भांडवली रस्ते ह्या शिर्षकामधून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो.देवडीबाजार येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधण्याची कामे करण्याबाबत सतत मागणी होत असल्याने सदर कामाचे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी विभागाचे वर्ष ९४-९५ चे दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असून अंदाजपत्रकाची रक्कम रु.१३,२७,०००/- इतकी आहे.

या विभागातील प्रस्तावित नाल्याच्या एका बाजूस सध्या संरक्षित भिंत बांधण्याचे काम चालू आहे. दुसऱ्या बाजूस संरक्षित भिंत बांधण्यासाठी नविन कामे आणि मागील वर्षाची उर्वरित कामांसाठी लागणारा निधी विचारात घेतल्यास चालू आर्थिक वर्षात "नाला ट्रेनिंग" ह्या लेखा शिर्षकातून निधी अपुरा पडत असल्याने सदर काम ह्या आर्थिक वर्षात तरतूद वाढवून मिळाल्यास करण्याचे ठरविण्यात आले असून तो पर्यंत निविदाची आवश्यक ती कार्यवाही करुन आर्थिक तरतूद उपलब्ध होताच हे काम हाती घेण्यात येईल. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.देवडीबाजार येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधण्याची कामे करण्याबाबत सतत मागणी होत असल्याने सदर कामाचे परिसर अभियांत्रिकी विभागाचे वर्ष ९४-९५ चे दरसूचीप्रमाणे तयार करण्यात आलेले रक्कम रु.१३,२७,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच दुसऱ्या बाजूस संरक्षित भिंत बांधण्यासाठी नविन कामे आणि मागील वर्षाचे उर्वरित कामांसाठी लागणारा निधी चालू आर्थिक वर्षात "नाला ट्रेनिग" ह्या लेखा शिर्षातून आणि आर्थिक वर्षात तरतूद वाढवून देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८३/४ :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मो.मुलमूची बाजार लोटाकारंजा आणि रोहिला गल्ली भागातील रस्त्यांचे खडीकरण करणे शहाबाद फरशी व खांडकी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्त करणे ह्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.६,४१,०००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती सन १९९६-९७ ह्या लेखा शिर्षकांतर्गत उपलब्ध असणाऱ्या तरतुदीमधून करण्यात येईल्.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रू.६,४१,०००/- चे मंजूरीबाबतचा ऐनवेळचा प्रसताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचरार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.मुलमची बाजार लोटाकारंजा आणि रोहिला गल्ली भागातील रस्त्यांचे खडीकरण करणे शहाबाद फरशी व खांडकी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्त करणे ह्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रू.६,४१,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल दुरुस्ती सन १९९६-९७ ह्या लेखा शिर्षकाअंतर्गत उपलब्ध असणाऱ्या तरतूदी मधून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४/५ :**

नगरसचिव यांनी प्रस्ताव सादर केला की, मा.सभागृहनेता व विराधीपक्षेनता यांची मुदत दि.१७.५.९६ रोजी संपुष्टात आलेली आहे. ठराव क्र.४ दि.१८.५.९५ ह्या ठरावान्वये

एक वर्षाचा कार्यकाल संपुष्टात आल्यामुळे वर्षे ९६-९७ साठी मा.महापौर यांनी महानगरपालिकेच्या प्रथेनुसार सभागृहनेता श्री. जयवंत केशवराव ओक व विरोधी पक्षनेता श्री. मुजीब आलम शहा मीर आलमशहा यांची शिफारस केलेली आहे. प्रस्ताव मा. सभागृहास सादर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वर्ष ९६-९७ साठी महानगरपालिकेच्या प्रथेनुसार श्री. जयवंत केशवराव ओक यांची सभागृह नेतेपदी व मुजीबआलम शहा मीर यांची विरोधी पक्षनेते पदी शिफारस केल्यानुसार सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैयक्तिक कार्यवाही व्हावी.

**विषय ८५/६ :**

मा.कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिडको एन ३ भागात १०० व १५० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणे बाबतच्या कामासाठी रक्कम रु.१७,५१,५१३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

उपरोक्त काम हे पाणीपूरवठा भांडवली ९६-९७ ह्या शिर्षकाअंतर्गत परिसर अभियांत्रिकी विभाग यांची १९९४-९५ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले आहे.

तरी रक्कम रू.१७,५१,५१३.००/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिडको एन ३ भागात १०० ते १५० मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबतच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभाग यांची ११९४-९५ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रू.१७,५१,५१३.००/- चे अंदाजपत्रकास तसेच उपरोक्त काम हे पाणीपुरवठा भांडवली १९९६-९७ ह्या शिर्षकाअंतर्गत करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८६/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, खडकेश्वर वाचनालय जुनी इमारत तोडून नविन इमारत बांधण्याचे ठरल्यानुसार पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्याचे वाढीव काम हाती घेण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसूची नुसार रक्कम रु.१५,२३,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी दि.१३.८.९६ रोजी प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव सादर करण्याकरिता शिफारस केली आहे. प्रस्तुत बांधकामामध्ये पाठीमागील इमारत तोडून होणाऱ्या उपलब्ध जागेवर पहिला व दुसरा मजला बांधणे प्रस्तावित आहे. कारण सध्या पाठीमागील इमारत अत्यंत जिर्ण झालेली असून संपूर्णपणे गळते. भविष्यात औरंगाबाद शहराची वाढती लोकसंख्या व वाचकप्रेमी यांचा विचार करता सदरील वाढीव काम करणे आवश्यक आहे. त्यासाठी इमारतीस लागणारे सर्व प्रकारचे नकाशे, इमारत बांधकामाच्या वेळी लागणारा वास्तुतज्ञांचा सल्ला, स्ट्रक्चरल डिझाइन इ.बाबत वास्तुतज्ञ, श्री. राजीव कुलकर्णी ह्यांना नियुक्त करण्यात आलेले आहे. ह्यापुर्वीचे पहिल्या टप्प्याचे बांधकामाचे वास्तुतज्ञ श्री. राजीव कुलकर्णी हेच होते. त्यामुळे पहिल्या व दुसऱ्या टप्प्याच्या बांधकामात सुसूत्रता आणणे करिता सबंधित वास्तुतज्ञ श्री. राजीव कुलकर्णी यांना अंदाजपत्रकीय

रक्क्मेवर २.५ टक्के फिस करार करुन घ्यावयाचे ठरले आहे. सदरील कामास दि.२६.७.९६ रोजी मा.आयुक्तांनी मान्यता मिळालेली आहे. सदर वाचनालयाच्या वाढीव दुसऱ्या टप्प्याचे कामासाठी रक्कम रु.१५,२३,०००/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजूरीच्या विचारार्थ तथा योग्य त्या आदेशास्तव सादर.

सदरचा खर्च सन १९९६-९७ ह्या वर्षात रक्कम रु.१५.०० लाख खडकेश्वर वाचनलय (भांडवली इमारती) ह्या लेखा शिर्षकातून व रु.२३,०००/- हे इत वाचनालय ह्या शिर्षातून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार खडकेश्वर वाचनालयाची जुनी इमारत तोडून त्या ठिकाणी नविन इमारत बांधणेच्या दुसऱ्या टप्प्याचे वाढीव काम हाती घेण्यासाठी सन ९५-९६ चे सा.बां.खात्याचे जिल्हा दसूचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु.१५,२३,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच दुसऱ्या टप्प्याचे बांधकाम करण्यासाठी श्री. राजीव कुलकर्णी यांची नियुक्ती वास्तुतज्ञ म्हणून करण्यात आली आहे. कारण पहिल्या टप्प्याचे बांधकामाचे वास्तुतज्ञ श्री. राजीव कुलकर्णी हेच होते. म्हणून दुसऱ्या टप्प्याच्या बांधकाम करिता त्यांना अंदाजपत्रकीय रकमेवर २.५ टक्के फीस देवून वास्तुतज्ञ म्हणून नियुक्ती करणेस व सदरचा खर्च सन ९६-९७ ह्या वर्षात रक्कम रु.१५.०० लाख खडकेश्वर वाचनालय (भांडवली इमारती) ह्या लेखा शिर्षतून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

“जन गण मन” या राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगरसचिव<br>महानगरपालिका औरंगाबाद

मा.महापौर<br>महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका , औरंगाबाद

दिनांक २०.९.९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**शुक्रवार दि.२०.७.९६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.महापौर श्री. गजानन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली कै.केशव सिताराम ठाकरे सभागृहात औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस ''वंदे मातरम'' ह्या राष्ट्रगीताने सुरुवात झाली. ह्या सभेला कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| ७७. श्री.विजयकुमार मेहेर | उपमहापौर |
| ७०. श्री.गिरजाराम हाळनोर | स.सभासद |
| ५२. श्री.जयवंत ओक | --''-- |
| ३३. श्री.मुजीब आलमशाह मीर आलमशाह | --''-- |
| १. सौ.रुखमनबाई खंडेराव लोंखडे | --''-- |
| २. श्री.अफसरखान यासिनखाँन | --''-- |
| ३. श्री.प्रभाकर सिताराम विधाते | --''-- |
| ४. सौ.साजेदा बेगम | --''-- |
| ५. श्री.म.सलिम म.हनिफ कुरैशी | --''-- |
| ६. श्री.गौतम भागाजी खरात | --''-- |
| ७. श्री.ॲड.गणेश किशनराव वानखेडे | --''-- |
| ८. सौ.रजनी रमेश जोशी | --''-- |
| ९. सौ.विमलाबाई नंदकुमार मुंडलिक | --''-- |
| १०.सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे | --''-- |
| ११.श्री.गौतम लिंबाजी लांडगे | --''-- |
| १२.श्री.महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --''-- |
| १३.श्री.अभिमन्यु रामभाऊ भालेराव | --''-- |
| १४.श्री.नरेंद्र यादवराव पाटील | --''-- |
| १५.श्री.काशिनाथ हरिभाऊ कोकाटे | --''-- |
| १६.श्री.सुदाम रामदास सोनवणे | --''-- |
| १७.श्री.रविंद्र बाबुराव इंगळे | --''-- |
| १८.श्री.कंवरसिंग किसनसिंग बैनाडे | --''-- |
| १९.सौ.पद्मा बाबुराव शिंदे | --''-- |
| २०.श्री.सुभाष भिकाजी टाकळकर | --''-- |
| २१.श्री.प्रफुल्ल लालचंद मालानी | --''-- |
| २२.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --''-- |
| २३.सौ.धनश्री अशोक विसपुते | --''-- |
| २४.श्री.फजलउल्लाखाँन अजमद उल्लाखान | --''-- |
| २५.श्री.अजीजखाँन गणीखाँ | --''-- |
| २६.श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | --''-- |
| २७.श्री.महंमद मुश्ताक अहेमद | --''-- |
| २८.सौ.नुरजहाँ बेगम अ.रहेमान खान | --''-- |
| २९.श्री.वसंत विनायकराव देशमुख | --''-- |

| | |
|---|---|
| ३०.श्री.हाजी मोहसिन अहेमद हाजी बशिर | --''-- |
| ३१.सौ.स.मोहसिना बिहकीस विखारोद्दीन | --''-- |
| ३२.श्री.अ.जावेद रज्जाक | --''-- |
| ३३.श्रीमती स.जाहेदा बेगम म.जमीर | --''-- |
| ३४.श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे | --''-- |
| ३५.सौ.यशोदा धनंजय वाडेकर | --''-- |
| ३६.श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाल | --''-- |
| ३७.श्री.स.हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन | --''-- |
| ३८.श्री.स.म.अ.रऊफ म.अ.माबुद | --''-- |
| ३९.श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबउद्दीन | --''-- |
| ४०.श्री.प्रदीप शिवनारायण जैस्वाल | --''-- |
| ४१.श्री.सय्यद अली मीरा सलामी | --''-- |
| ४२.श्री.रमेश दिपचंद लाहोट | --''-- |
| ४३.श्री.संजय किसनराव केनेकर | --''-- |
| ४४.श्री.फैय्याज अहेमद म.हाजी कुरैशी | --''-- |
| ४५.सौ.मुक्ताबाई सुदाम वाघमारे | --''-- |
| ४६.सौ.लता श्रिनिवास दलाल | --''-- |
| ४७.सौ.अल्का रमेश पाटील | --''-- |
| ४८.सौ.शकुंतला हरिदास धांडे | --''-- |
| ४९.श्री.अब्दुल रशिदखान मामू | --''-- |
| ५०.कु.माया लिंबाजी लाडवाणी | --''-- |
| ५१.डॉ.भागवत किशनराव कराड | --''-- |
| ५२.सौ.सविता संजय आव्हाड | --''-- |
| ५३.सौ.निर्मला विठ्ठल कांबळे | --''-- |
| ५४.श्री.अ.रशिद अ.सत्तार | --''-- |
| ५५.श्री. विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन | --''-- |
| ५६.श्री.विकास रतनलाल जैन | --''-- |
| ५७.श्री.गंगाधर सुखदेव गाडे | --''-- |
| ५८.श्री.मनमोहनसिंग करमसिंग ओबेराय | --''-- |
| ५९.श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे | --''-- |
| ६०.श्री.संजय रामदास जोशी | --''—— |
| ६१.श्री.अविनाश लक्ष्मण कुमावत | --''-- |
| ६२.सौ.ज्योत्स्ना दौलतराव हिवराळे | --''-- |
| ६३.श्री.राजकुमार उर्फ सांडू बचाटे | --''-- |
| ६४.सौ.राधाबाई तळेकर | --''-- |
| ६५.श्री.विठ्ठल किसन जाधव | --''-- |
| ६६.सौ.मंदा धनंजय काळुसे | --''-- |
| ६७.सौ. सुनंदा उत्तम कोल्हे | --''-- |
| ६८.श्री.बन्सी तुळशिराम गांगवे | --''-- |
| ६९.श्री.भगवान देविदास घडामोडे | --''—— |
| ७०.श्री.कचरु चंद्रभान नवपुते | --''—— |

**विषय क्र.** दिनांक १७.८.९६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री. नरेंद्र पाटील : महापालिकेतर्फे खरेदी करण्यात येणाऱ्या सिंमेट बाबतचे प्रकरणे न्याय प्रविष्ट झाल्या बाबतची बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली आहे. ह्या बाबत खुलासा झाला पाहिजे. या प्रकरणात एक तर भ्रष्टाचार झाला असेल किंवा वृत्त पत्रात बातमी प्रसिध्द होणे महापालिकेच्या स.सभासदांचा अपमान आहे.

श्री. प्रदिपकुमार जैस्वाल : प्रथम मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्या बाबतचा विषय चर्चेला घेण्यात यावा.

श्रीमती नुरजहाँ बेगम : शिक्षक भरती प्रकरणांत भ्रष्टाचार झाला. वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली. ह्या बाबींचा खुलासा सभागृहात झाला पाहिजे.

श्री. संजय जोशी : शिक्षक भरती प्रकरणाबाबत मागील सभेत ठराव पारित झाला. ह्यावरुन ह्या प्रकरणावर पडदा पडला आहे. तरीपण शिक्षक भरती करतांना प्रसिध्दीस दिलेल्या जाहिरातीत जिल्हा परिषद शिक्षकांनी अर्ज करु नये असा स्पष्ट खुलासा केला होता. अस्थापना विभागाने महापालिकेत रुजू झालेल्या नविन अधिकाऱ्यांना या प्रकरणात फसविले आहे. तेव्हा ह्या प्रकरणांची आताच चौकशी करण्यात यावी वा निर्णय देण्यात यावा.

श्रीमती मोहसिना बिल्कीस : जिल्हा परिषदेत नौकरी करत असतांनां सेवायोजन कार्यालयात शिक्षकांनी दोन वेळा नांव नोंदणी कशी केली. ह्याबाबत महापालिका अधिकाऱ्यांनी चौकशी का केली नाही. सुशिक्षित बेरोजगारांना नौकरीची संधी मिळावी म्हणून सभागृहाने निर्णय घेतलेला आहे.

सौ. अलका पाटील : मागील सभेच्या वेळी शिक्षक भरती प्रकरणात अधिकाऱ्यांची चौकशी करावी अशी सूचना केली होती. त्याची नोंद का घेण्यात आली नाही.

श्री. अ.जावेद रज्जाक : महापालिका सभागृहास मलिक अंबद सभागृह असे नाव देण्याची सूचना केली होती. त्याऐवजी कै.केशव सिताराम ठाकरे यांचे नाव महापालिका सभागृहास देण्याची सूचना करण्यात आली. त्यानुसार अंमल बजावणी करण्यात आली. परंतु महापालिका प्रवेशद्वारास आजपर्यंत मलिक अंबर गेट हे नाव देण्याची कार्यवाही झाली नाही. जिल्हा परिषद शिक्षक भरती प्रकरणात सत्ताधारी व आघाडी अशा दोन्ही पक्षाच्या सभासदांची बदनामी झाली आहे. महापालिका अधिकाऱ्यांबरोबर सत्ताधारी पक्ष सहमत आहे. शिक्षक भरती प्रकरणाबाबत जो ठराव झाला तो ठराव का बदलण्यात येत आहे. शिक्षक न्यायालयात धांव घेतील. असे असले तरी त्या शिक्षकांना न्यायालयात जाऊ द्या. एका खात्यात नौकरी करत असतांनाही ह्या शिक्षकांनी सेवायोजन कार्यालयात आपली नोंदणी का चालू ठेवली शिक्षक भरती करतांना महानगरपालिकेतर्फे प्रतिज्ञापत्र लिहून घेण्यात आले आहे. ह्या प्रतिज्ञापत्रात इतरत्र नोकरीस असे लिहून दिलेले असतांनाही अशा शिक्षकांना नौकरीची संधी दिली गेली. याबाबतच्या चौकशीत सर्व प्रकरण समोर येईलच.

श्री. प्रकाश निकाळजे : ह्या पूर्वीच्या तिसऱ्या सर्वसाधारण सभेत जे सुशिक्षित बेरोजगार आहेत अशा उमेदवारांना नोकऱ्या देण्यात याव्यात असे सभागृहात ठरले होते. जिल्हा परिषद शिक्षकांनी नौकरीसाठी अर्ज करु नये अशी जाहिरातही

प्रसिध्द करण्यात आली होती. ह्यानंतर महापालिकेतर्फे प्रतिज्ञापत्रही भरून घेण्यात आले आहे. प्रतिज्ञापत्र भरून घेतल्यानंतरही जे शिक्षक जिल्हा परिषदमध्ये नौकरीस आहेत अशा अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी व ज्या जि.प.शिक्षकांना आदेश दिले ते आदेश रद्द करण्यात यावेत.

श्री. प्रदिपकुमार जैस्वाल : शिक्षक भरती प्रकरणाबाबत जे रुलिंग देण्यात आले आहे. त्यात कायद्यानुसार स्पष्ट खुलासा नाही. तेव्हा ह्या प्रकणात जास्त चर्चा न करता पांच सदस्यांची समिती नेमण्यात यावी.

श्री. गंगाधर गाडे : शिक्षक भरती प्रकरणांत अद्याप काहीही निर्णय झाला नाही.ठराव संमत झाल्यानंतर सुशिक्षित बेरोजगारांना प्राधान्य देण्याची सभागृहाचा विचार असावा.

आता शासनाचे नियाम दाखविण्यात येत आहेत. ज्यावेळी ठराव संमत झाला त्यावेळी शासन नियमांचा खुलासा अधिकाऱ्यांनी का केला नाही. उमेदवारांकडून प्रतिज्ञापत्र लिहून धेण्यात आले. त्यातून सत्य समोर आले आहे. हा दोष उमेदवारांचा नाही तर प्रशासनाचा आहे. तेव्हा प्रशासनावर कार्यवाही झाली पाहिजे. ह्या प्रकरणात कनिष्ठ कर्मचाऱ्यावर कार्यवाही करणे योग्य होणार नाही.

श्री.सै.अली मिरा सलामी : स.सभासद श्री. गाडे यांनी सभागृहात सविस्तर खुलासा केला आहे. शिक्षक भरती करतांना जि.प.शिक्षकांनी अर्ज करु नयेत अशी स्पष्ट जाहिरात प्रसिध्द केली होती. तरी पण जि.प. शिक्षकांनी अर्ज केले तेव्हा अशा शिक्षकांवरती कार्यवाही झाली पाहीजे. जि.प.शिक्षकांना देण्यात आलेले नेमणुकीचे आदेश रद्द करण्यात यावेत ह्या शिक्षकांना न्यायालयात जाऊ द्यावे.

श्री. संजय जोशी : मानवतेच्या दृष्टीने शिक्षक घेण्याचा विचार करणे योग्य होईल. पण ठरावात बदल करणे योग्य होणार नाही. शिक्षक भरती बाबत माजी महापौर यांनी पत्र दिले असतांना त्यावर कार्यवाही का करण्यात आली नाही. तेव्हा शिक्षकांच्या सर्व नेमणुका रद्द करण्यात याव्यात व पुन्हा नव्याने नेमणूक करावी.

श्री. नरेंद्र पाटील : शिक्षक भरती बाबत सभागृहात दोन गट पडलेले दिसून येतात. ह्या प्रकरणाची चर्चा थांबवावयाची असेल तर हा प्रस्ताव मतदानात टाकावा व त्यावर सभागगृहात निर्णय घेण्यात यावा.

डॉ.भागवत कराड : एखाद्या खात्यात नोकरीत असतांना सेवायोजन कार्यालयातील नांव नोंदणी कमी करणे ही त्या उमेदवाराची जबाबदरी होती. ही जबाबदारी त्या उमेदवाराने पूर्ण केली नाही. शिक्षक भरती बाबत जो ठराव झाला तोच कायम ठेवण्यात याव व जि.प.शिक्षकांची नेमणूक रद्द करावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मानवतेच्या दृष्टीकोन समोर ठेवून शिक्षकांच्या ज्या नेमणूका झाल्या आहेत त्या नेमणूका कायम ठेवण्यात याव्यात व ह्या प्रकरणात जे अधिकारी दोषी आहेत त्यांची चौकशी करण्यात यावी. त्यासाठी एक उपसमिती नेमण्यात यावी.

श्री. मुजिबआलमशा खान श्री. जयवंत ओक : सभागृहात शहर विकासाची कामे करावयाची आहेत तेव्हा जि.प.शिक्षकांच्या भरतीबाबत सभागृहात बरीच चर्चा झाली आहे. या बाबत एक उपसमिती नेमण्यात यावी या समितीने एक आठवड्यात निर्णय घ्यावा व त्याची माहिती सर्व सभासदांना द्यावी.

श्री. अफसर खाँ : शिक्षक भरती प्रकरणात उपसमिती नेमण्यात यावी अशी सूचना सभागृहात केली जात आहे. त्यास माझा विरोध आहे. या प्रकरणात आजच्या सभागृहात निर्णय देण्यात यावा.

श्री. नरेंद्र पाटील : शिक्षक भरती प्रकरणाबाबत सभागृहाला आज दोन निर्णय घ्यावयाची आहेत. (१) शिक्षकभरती प्रकरणाबाबत चौकशी समिती नेमणे (२) दहा शिक्षकांच्या नेमणूकीबाबत याची

मा. महापौर : मा. आयुक्त खुलासा करित आहे.

मा.आयुक्त : गेल्या तीन महिन्यापासून शिक्षक भरती प्रकरणाबाबत सभागृहात वादळी चर्चा चालू आहे. या प्रकरणात आज कोणत्याही परिस्थितीत सभागृहाने निर्णय घ्यावा. या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. सभागृहाचा निर्णयाचा सन्मान राखणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. महापालिका नियमाप्रमाणे माजी कुशल आयुक्तांनी शिक्षक भरतीबाबतची गुणवत्ता यादी तयार केलेली आहे. हे सभागृह संपूर्ण गुणवत्ता रद्द करु शकते. किंवा जे जि.प.शिक्षक आहेत त्यांची नेमणूक रद्द करु शकते किंवा जी गुणवत्ता यादी आहे ती योग्य आहे. त्याप्रमाणे नेमणूक द्यावी असा निर्णय घेवू शकते. भारतीय संविधानाप्रमाणे जो उमेदवार वयात आहे तो महापालिकेमध्ये नोकरीसाठी अर्ज करु शकतो. महापालिकेचे नियम पाळून उमेदवारांची नेमणूक झाली असेल तर तो त्या उमेदवाराचा हक्क आहे. शिक्षक भरती प्रकरणात आज जो निर्णय होईल त्यांची तंतोतंत अंमलबजावणी केली जाईल. तेव्हा सभागृहाला जो निर्णय द्यावयाचा आहे तो योग्य असावा.

श्री. भगवान घडोमोडे : आतापर्यंत किती निर्णयांची अंमलबजावणी झाली याचा खुलासा व्हावा. शिक्षक भरती बाबत माजी महापौर यांनी दिलेल्या पत्रावर का कार्यवाही झाली. सेवायोजन कार्यालयावर महापालिकेतर्फे फौजदारी खटला भरण्यात यावा.

आजची सभा ००.१० मिनिंसाठी तहकुब करण्यात येते असे मा.महापौर यांनी घोषित केले. (अंदाजे वेळ १२.१०)

००.१० मिनिंटासाठी तहकुब करण्यात आलेली सर्वसाधारण सभेस पुन्हा १.३० वाजता सुरुवात करण्यात आली.

सौ. लता दलाल : ठराव क्र. ६१ मधील अ.क्र.२ मधील "स्थगित ठेवण्यात आलेल्या" अशी वाक्य रचना वगळण्यात यावी.

मा.महापौर : सूचना मान्य तसेच "शिक्षकभरती प्रकरणाबाबत स.सभासद सर्वश्री प्रदिपकुमार जैस्वाल, सौ. अलका पाटील, मोहसीना बिल्कीस, सौ. लता दलाल, श्री. संजय जोशी, श्री. जयवंत ओक, श्री. मुजीब आलमशाह खान सौ. नुरजहाँ बेगम, श्री. गंगाधर गाडे इ. स.सभासदांनी सभागृहात विचार मांडले आहेत. या विषयावर बरीच चर्चा झाली आहे. सभागृहाची भावना, भारतीय संविधानाचे खंड आणि महापालिका सेवा भरती नियम ह्या कायदेशीर बाबी लक्षात घेता महापालिका नियमान्वये गुणवत्ता यादीनुसार करण्यात आलेल्या शिक्षक भरतीस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

शिक्षक भरती प्रकरणांत गैरप्रकार झालेला आहे. अशी सभागृहाची भावना आहे. सबब सभागृहाच्या भावना लक्षात घेता या प्रकरणात गैरप्रकार झाला किंवा काय ही बाब तपासणी करुन याची चौकशी करण्यासाठी मा.महापौर,

मा.उपमहापौर, मा.विरोधी पक्षनेता, मा.सभापती, मा.सभागृहनेता, मा.आयुक्त, स.स.श्री.संजय जोशी, श्री गंगाधर गाडे सौ. लता दलाल, सौ.सुनंदा कोल्हे, सौ. नुरजहॉं बेगम, सौ. अलका पाटील, सौ. मोहसिना बिल्कीस, श्री.अ.जावेद रज्जाक इ.चा समावेश असलेली उपसमिती नेमण्यात येते.

**ठराव :**

दि.१७.८.९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील खालीलप्रमाणे दुरुस्ती व वाढ करण्यास सर्वानुमते मंजूर देण्यात येते.

१. दि.१७.८.९६ च्या ठराव क्र.६१ व अ.क्र. २२ मधील ''स्थगित ठेवण्यात आलेल्या'' ही वाक्य रचना वगळण्यात येते.

२. दिनांक १७.८.९६ च्या सभेत ठराव क्र.६२ अन्वये मंजूर झालेल्या ठरावात खालीलप्रमाणे बदल करण्यात येतो.

''शिक्षक भरती प्रकरणाबाबत स.सभासद सर्वश्री प्रदिपकुमार जैस्वाल, सौ.अलका पाटील, मोहसिना बिल्कीस, सौ.लता दलाल, श्री.संजय जोशी, श्री.जयवंत ओक, श्री.मुजीब आलमशाह खॉं, नुरजहॉं बेगम, श्री.गंगाधर गाडे इ. सभासदांनी सभागृहात विचार मांडले आहेत. या विषयावर बरीच चर्चा झालेली आहे. सभागृहाची भावना भारतीय संविधानाचे खंड आणि महापालिका सेवा भरती नियम या कायदेशिर बाबी लक्षात घेता महापालिकनियमान्वये गुणवत्ता यादी नुसार करण्यात आलेल्या शिक्षक भरतीस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

शिक्षक भरती प्रकरणांत गैरप्रकार झालेला आहे. अशी सभागृहाची भावना आहे. सबब सभागृहाच्या भावना लक्षात घेत या प्रकरणात गैरप्रकार झाल किंवा काय ही तपासणी करुन याची चौकशी करण्यासाठी मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.विरोधी पक्षनेता, मा.सभापती, म.सभागृहनेता, मा.आयुक्त व श्री.संजय जोशी, श्री.गंगाधर गाडे, सौ.लता दलाल, सौ.सुनंदा कोल्हे, नुरजहॉं बेगम, सौ.अलका पाटील, मोहसिना बिल्कीस, श्री.अ.जावेद रज्जाक इ.चा समावेश असलेली उपसमिती नेमण्यात येते. ठरावास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

वरीलप्रमाणे दुरुस्ती व वाढ यास.दि.१७.८.९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**विषय क्र. ८८/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, अलंकार सोसायटी, परिमल सोसायटी व रोषन सोसायटीमध्ये रस्त्यांचे डांबरीणकरण करणेच्या कामाचे सन १९९५-९६ चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांची मंजूरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च ''रस्ते दुरुस्ती व देखभाल'' सन १९९६-९७ साठी असलेल्या तरतुदीमधून प्रस्तावित आहे. तरी सदर कामाचे अंदाजपत्रकास मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर मान्यता असल्यास सदरचा खर्च सन्ा १९९६-९७ साठी असलेल्या रस्ते देखभाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार अलंकार सोसायटी परिमल सोसायटी व रोषन सोसायटी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९५-९६ चे सा.बां.खात्याचे डि.एस.आर.दराने तयार करण्यात आलेले रक्कम रु.५,५९,१५७.००/- चे अंदाजपत्रकास

तसेच सदरील कामाचा खर्च ‘‘रस्ते देखभाल सन १९९६-९७ साठी असलेल्या तरतुदीमधून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९/३ :**

मनपा तर्फे पीर बाजार येथे बांधण्यात आलेल्या शाळा इमारतीचे दि.३१.७.९६ रोजी मा.आयुक्त यांनी उपआयुक्त-२ सहा.संचालक नगररचना, शहर अभियंता,शिक्षणाधिकारी यांच्या सोबत पाहणी करण्यात आली. पाहणी केल्यावर असे दिसून आले की, पिरबाजार येथील सध्या अस्तित्वात असलेल्या शाळेच्या परिसरातील वातावरण शैक्षणिक दृष्टीकोनातून चांगले (पोषक) नसून विद्यार्थ्यांच्या संस्कार आरोग्य व रहदारीचा विचार करता योग्य वाटत नाही. करिता तेथे शाळेचे स्थलांतर स.नगरसेवक श्री.गंगाधर गाडे यांचे इमारतीमध्ये करण्यास हरकत नाही. स.नगरसेवक श्री.गाडे हे शाळेसाठी जागा मोबदला वर्ग चालविण्यासाठी देण्यास तयार आहेत. तरी ह्याबाबत स.नगरसेवक श्री.गंगाधर गाडे यांचे अभिनंदन व आभारप्रदर्शन करण्यात यावे म्हणून मा.आयुक्त यांनी सुचविले आहे.

तसेच पीरबाजार येथील शाळेची इमारत पोलिस स्टेशनसाठी भाड्याने मिळणेबाबत यापूर्वी पोलिस आयुक्त,औरंगाबाद तर्फे वेळोवेळी पत्र व्यवहार केलेला आहे. ही रिकामी झालेली इमारत पोलिस स्टेशनकरिता भाड्याने देणे.

तरी वरीलप्रमाणे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे विचारार्थ मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार महापालिकेने बांधलेल्या पीरबाजार येथील शालेय इमारतीची दि.३१.७.९६ रोजी मा.आयुक्त यांनी उपआयुक्त-२ सहा.संचालक नगररचना, शहर अभियंता, शिक्षणाधिकारी याचेसह संयुक्त पाहणी केली असता पिरबाजार स्थित शाळेच्या परिसरातील वातावरण शैक्षणिक दृष्टीकोनतून चांगले (पोषक) नसुन विद्यार्थ्यांच्या संस्कार, आरोग्य व रहदारीचा विचार करता योग्य वाटत नसून सदर इमारतीत शाळा स्थलांतर करणे योग्य राहणार नाही. तथापि सदर शाळा स.नगरसेवक श्री.गंगाधर गाडे हे शाळेसाठी विना मोबदला वर्ग चाविण्यासाठी देण्यात येणार असल्यामुळे त्यांचे इमारतीत स्थलांतर करणेस तसेच स.नगरसेवक श्री.गंगाधर गाडे यांनी त्यांची इमारत विना मोबदला शालेय वर्ग चालविण्यासाठी उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन तसेच आभार माननेस तसेच पीरबाजार येथील शालेय इमारत मा.पोलिस आयुक्त, औरंगाबाद यांनी वेळोवेळी पत्र व्यवहार करुन पोलिस स्टेशन करिता भाड्याने देणे बाबत मागणी केल्यानुसार सदर रिकामी झालेली शालेय इमारत मा.पोलिस औरंगाबाद यांना पोलिस स्टेशन करिता भाड्याने देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९०/४ :** औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना १९७५ नुसार आरक्षण क्र.१५० व १५१ ‘‘खुली जागा व प्रा.शाळा व क्रीडांगण’’ ह्या प्रस्तावाने बाधित मिळकत शहानूरवाडी येथील सर्व्हे नं. ९/२ चे मिळकतधारक यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिलेली आहे. जागेचे क्षेत्र सहा एकर आहे. मंजूर विकास योजनेतील आरक्षणाखालील जमिन १० वर्षानंतर संपादन केल्या नाही तर अशी खरेदी सूचना देता येते.

सदरील खरेदी सुचनेनुसार सहा महिन्याच्या आत भुसंपादनाची कार्यवाही करणे व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार भुसंपादनाची कार्यवाही करणे बंधनकारक आहे. जर भुसंपादनाची कार्यवाही वरील मुदतीत केली नाही तर आरक्षीत जमिन विकास योजनातून वगळी जाते व लगतच्या वापरानुसार अर्जदारास विकास परवानगी द्येय होते. अर्जदाराने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिली असल्याने भुसंपादनाची कार्यवाही मुदतीत करणेसाठी भुसंपादन प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ९१/५ :**

औरंगाबाद शहराचे मंजूर विकास योजनेमधील अमरप्रीत हॉटेल ते शहानूरमियॉं दर्गा ह्या २४.० मी रुंद रस्त्याचे विकासाचे काम हाती घेतलेले असून त्या कार्यवाही अंतर्गत सि.स.न.१५८५२/ब व सि.स.नं.१५८५४/अ खालील जमिनीचे अनुक्रमे १६०६.७४ चौमी व ३८३.५० चौमी क्षेत्र खाजगी वाटाघाटीने संपादीत करण्यात येत आहे. ह्या भुसंपादनामुळे अमरप्रीत हॉटेल ते शहानुरमियॉं दर्गापर्यंत हा रस्ता रहदारीस खुला होवून जालना रोडच्या दक्षिणेकडील भाग सरळ जालना रोडला जोडला जातो.

ह्या संपादीत करावयाच्या जमिनीचे मुल्यांकन रु.१०,२१,२२५/- इतके होत असून खाजगी वाटाघाटीने ठरल्यानुसार नोंदणीकृत दस्तऐवज जागा हस्तांतर करण्यासाठीचा खर्च संबंधित जमीन मालक व महापालिका निम्मा निम्मा करणार आहे. नोंदणीकृत दस्तऐवजकरिता खर्च रु.१,६५,०००/- इतका येणार असून ह्या खर्चाचे निम्मी रक्कम रु.८२,५००/- ही संबंधित जमीन मालकास श्री.भगवानदास आईलदास काल्डा यांना उर्वरित र.रु.९,३८,७२५/- धनादेशद्वारे देण्यात येईल. नोंदणीकृत दस्तऐवज करण्यासाठी र.रु.१,६५,०००/- एवढी रक्कम रु. श्री.डी.डी.कालेले शाखा अभियंता यांना अग्रीम म्हणून देण्यात येईल.

करिता प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.प्रस्ताव मान्यतेनंतर नोंदणी दस्तऐवजाद्वारे जागा हस्तांतरित करुन घेण्यात येईल.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार औरंगाबाद शहराचे मंजूर विकास योजनेतील हॉटेल अमरप्रीत ते शहानूर मियॉं दर्ग्याला २४.० मी रुंद रस्त्याचे विकास कामा अंतर्गत सि.स.न.१५८५२/ब व सि.स.न.१५८५४/अ खालील जमीनीचे अनुक्रमे १६०६.७४ चौमी. व ३८३.५० चौमी. क्षेत्र खाजगी वाटाघाटीने संपादीत करणेस व संपादित करावयाच्या जमिनीचे मुल्यांकन र.रु.१०,२१,२२५/- होत असून खाजगी होत असून खाजगी वाटाघाटीने नोंदणीकृत दस्तऐवज जागा हस्तांतर करणेसाठीचा खर्च जमीन मालक व महापालिका निम्मा निम्मा करणार असल्याचे ठरल्यानुसार नोंदणीकृत दस्तऐवजासाठी येणारा खर्च र.रु.१,६५,०००/- ह्या खर्चाची निम्मी रक्कम रु.८२,०००/- ही संबंधित जमीन मालकास द्येय होणाऱ्या रकमेमधून वजा करुन उर्वरीत र.रु.९,३८,७२५/- धनादेशद्वारे जमीन मालक श्री.भगवानदास आईलदास काल्डा यांना देणेस तसेच सदर जागेचे दस्तऐवज करणेसाठी र.रु.१६५,०००/- एवढी रक्कम श्री.डी.डी.कालेले शाखा अभियंता यांना अग्रीम म्हणून देणेस व सदर जागा नोंदणीकृत दस्तऐवजाद्वारे हस्तांतरित करुन घेणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, बालाजीनगर व राहुलनगर भागातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाचे १९९५-९६ चे सार्वजनिक बाधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.१६,२३,८४३/- अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यांस मा.आयुक्त यांची मंजूरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च "भांडवली रस्ते" १९९६-९७ मधून प्रस्तावित आहे. तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १६,२३,८४३/- चे अंदाजपत्रक मंजूरी बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार बालाजीनगर व राहुलनगर भागातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे १९९५-९६ चे सां.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने तयार करण्यात आलेले रक्कम रु.१६,२३,८४३/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामचा खर्च "भांडवली रस्ते १९९६-९७" ह्या लेखा शिर्षकातून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, लेखा परिक्षक सहकारी गृह निर्माण संस्था हर्सुल येथील रस्त्यांचे खडीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.७,३८,२००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते (नविन खडी रस्ते) ह्या लेखा शिर्षकामध्ये उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यात येईल.

ठराव : प्रस्तावात दर्शविल्यानुसार लेखा परिक्षक सहकारी गृहनिर्माण संस्था, हर्सुल येथील रस्त्यांचे खडीकरण करणेच्या कामासाठी सा.बां. खात्याचे सन १९९४-९५ चे दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु.७,३८,२००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते (नवीन खडी रस्ते) या लेखा शिर्षकामधील उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ९४/८ :**

अतिरिक्त शहर यांनी प्रस्ताव दिला की, अभियंता कटकटगेट ते सिडको ह्या १०० फुटी विकास रस्त्यांचे डांबरीकरण करणे ह्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.२३,८१,०३१/- चे तयार करण्यात आले असून सदरील कामाचा खर्च शा.अ.सन १९९५-९६ (१०.०० कोटी) च्या अनुदानातून आणि उर्वरीत रक्कम रु.३,८१,०३१/- हा खर्च भांडवली रस्ते सन १९९६-९७ ह्या लेखा शिर्षकामध्ये उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु.२३,८१,०३१/- चे मंजूरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार कटकटगेट ते सिडको ह्या १०० फुटी विकास रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु.२३,८१,०३१/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान सन १९९५-९६ (१०.०० कोटी) च्या अनुदानातून आणि उर्वरीत रक्कम रु.२३,८०,०३१/- चे अंदाजत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान सन १९९५-९६ (१०.०० कोटी) च्या अनुदानातून आणि उर्वरीत रक्कम रु.३,८१,०३१/- हा खर्च भांडवली रस्ते सन १९९६-९७ ह्या लेखा शिर्षकामध्ये उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेतर्फे करण्यात येणाऱ्या बांधकामासाठी वेगवेगळ्या व्यासाचे पिळदार लोखंडाची गरज आहे. शहर अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा मिळून एकुण ४३९ मे.टन लोखडांची आवश्यकता दर्शविलेली आहे.

पैकी तूर्त २०० मे.टन लोखंडाची खरेदी करण्याचा प्रस्ताा सादर केला आहे. त्याकरीता सन १९९५-९६ साली सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूची प्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु.३५,७०,०००/- (पस्तीस लाख सत्तर हजार) रु.चे तयार करण्यात आले व त्यास मा.आयुक्त साहेबांनी दि.२६.८.९६ रोजी मान्यता दिली आहे. आवश्यक असलेले वेगवेगळ्या व्यासाचे लोखंड खालीलप्रमाणे खरेदी करणे आहे.

| | |
|---|---|
| १. ६ एम.एम. | २० मे.टन |
| २. ८ एम.एम | ६० –"— |
| ३. १० एम.एम. | ४० –"— |
| ४. १२ एम.एम | ४० –"— |
| ५. १६ एम.एम | २५ –"— |
| ६. २० एम.एम | १० –"— |
| ७. २५ एम.एम. | ०५ –"— |

वरीलप्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार महानगरपालिकेतर्फे करण्यात येणाऱ्या बांधकामासाठी विविध व्यासाचे पिळदार लोखंडाची गरज असल्याचे शहर अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता, कार्यकारी अभियंता यांनी एकूण ४३९ मे.टन लोखंडाची आवश्यकता दर्शविल्यानुसार तयार करण्यात आलले रक्कम रु.३५,७०,०००/- (पस्तीस लाख सत्तर हजार) चे अंदाजपत्रक तसेच आवश्यक असलेले वेगवेगळ्या व्यासाचे लोखंड खालीलप्रमाणे खरेदी करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

| | |
|---|---|
| ८. ६ एम.एम. | २० मे.टन |
| ९. ८ एम.एम | ६० –"— |
| १०.१० एम.एम. | ४० –"— |

| | |
|---|---|
| ११.१२ एम.एम | ४० –"— |
| १२.१६ एम.एम | २५ –"— |
| १३.२० एम.एम | १० –"— |
| १४.२५ एम.एम. | ०५ –"— |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९६/१० :**

कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा व जलनिःसरण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.एस.टी.कॉलनी येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता अ.प.रक्कम रु.१०,००,०००/- चे कामाकरिता परिसर अभियांत्रिकी दरपत्रक ९४-९५ नुसार रक्कम रु.१०,००,०००/- तयार करण्यात आले आहे.

सदरील कामाचा खर्च नाला ट्रेनिंग ९६-९७ च्या लेखा शिर्षकाअंतर्गत उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येईल. सदर कामास मा.आयुक्तांनी दि.२२.८.९६ ला प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

तरी अंदाजपत्रकीय रक्कम रु.१०,००,०००/- च्या प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.एस.टी.कॉलनी येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकी खात्याचे ९४-९५ चे दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु.१०,००,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च नाला ट्रेनिंग ९६-९७ ह्या लेखा शिर्षकाअंतर्गत उपलब्ध तरतुदीमधून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९७/११ :**

पाणी पुरवठा विभाग क्र.२ (सिडको) झोन क्र.५ आणि झोन क्र.७ अंतर्गत येणाऱ्या जलवाहिण्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी आय.एस.आय. मार्कचे मेकॅनिकल ॲडॉप्टर, रेड्युसर खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.५,१२,०००/- चे तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी मिळालेली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु.५,१२,०००/- चे मंजूरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार पाणीपुरवठा विभाग क्र.२ (सिडको) झोन क्र.५ आणि झोन क्र.७ अंतर्गत येणाऱ्या जलवाहिण्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी आय.एस.आय. मार्कचे मेकॅनिकल ॲडॉप्टर, रेड्युसर खरेदी करण्यासाठी तयार करण्यात आलेली रक्कम रु.५,१२,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९८/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.मोतीकारंजा, नाईकवाडा येथे नवीन खांडकी बसविणे, जुनी खांडकीची दुरुस्ती करणे नविन गटर बांधणे व गटार दुरुस्त करणे बाबत कामाकरिता सा.बां.खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु.६,५२,६६२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम ५ टक्के कमकुवत घटक कल्याण योजना ह्या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.३०.८.९६ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रु.६,५२,६६२/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.मोतीकारंजा, नाईकवाडा येथे नविन खांडकी बसविणे व जुनी खांडकीची दुरुस्ती करणे, नविन गटार बांधणे व दुरुस्त करणे बाबत कामाकरिता सा.बां.खाते यांचे वर्ष ९५-९६ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु.६,५२,६६२/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम ५ टक्के कमकवत घटक कल्याण योजना ह्या शिर्षकातून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९९/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.संजयनगर, बायजीपुरा स्लम येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे बाबत कामाकरिता सा.बां.खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु.१२,५१,१७८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "डांबरी रस्ते" ह्या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.२६.८.९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु.१२,५१,१७८/- यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.,

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.संजयनगर, बायजीपुरा स्लम येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे बाबतचे कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु.१२,५१,१७८/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम "डांबरी रस्ते" ह्या शिर्षकामधून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. १००/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, टाऊन हॉल येथे जिम्नॅस्टिक हॉल बांधणे बाबतचे अंदाजपत्रक सन ९५-९६ च्या सा.बां.खात्याच्या दरसूचीनुसार रक्कम रु.६,७२,६००/- तयार करण्यात आले आहे.

अंदाजपत्रक रकमेपैकी रु.५,००,०००/- (पाच लाख) स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत या खासदार निधीतून उर्वरित रक्कम रु. १,७२,६००/- महापालिकेच्या

इमारती तरतुदीमधून करण्यात येणार आहे. सदर कामामध्ये ६८ फूट  X ३८ फूट या आकाराचा हॉल व ऊंची २० फूट राहील.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार टाऊन हॉल येथे जिम्नॅस्टिक हॉल बांधणे बाबतचे कामासाठी सन ९५-९६ च्या सार्जनिक बांधकाम खात्याच्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु.६,७२,६००/- चे अंदाजपत्रका तसेच अंदाजपत्रकीय रक्कमेपैकी रुपये ५,००,०००/- (रुपये पाच लाख) स्थानिक विकास कार्यक्रमांअंतर्गत मा. खासदार निधीतून उर्वरित रक्कम रुपये १,७२,६००/- महानगरपालिकेच्या इमारती तरतुदीमधून करणेस व सदर कामामध्ये ६८ फूट  X ३८ फूट या आकाराचा हॉल व ऊंची २० फूट उंचीचा हॉल बांधणेस खासदार निधीतून रक्कम रु.५,००,०००/- हे औरंगाबाद म्युनिसिपल ऑफिसर्स असोसिएशन यांना प्रदान करण्यात आले असल्यामुळे सदर हॉल महानगरपालिकेतर्फे बांधून दिल्यानंतर औरंगाबाद म्युनिसिपल ऑफिसर्स असोसिएशन यांना हस्तांतर करण्यात येईल. वरीलप्रमाणे मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना कळविण्यात यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>पुरवणी – विषय पत्रिका</u>

**विषय क्र. १०१/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७२ रमानगर हा भाग स्लम असून या भागांत बहुतांश गरीब व आर्थिकदृष्ट्या मागासलेले लोक राहतात. त्या वस्तीतील नागरिकांच्या मुलांना मनपा तर्फे सार्वजनिक बगीचा, खेळण्यासाठी क्रिडांगण उपलब्ध करुन द्यावे. याकरिता महानगरपालिकेतर्फे रमानगर स्मशानभूमीच्या बाजूला महानगरपालिकेच्या जागेत मनपा तर्फे गार्डन व क्रिडांगण तयार करुन देण्यात यावे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | : | सौ. ज्योत्स्ना हिवराळे |
| अनुमोदक | : | कु.माया लाडवाणी |
| दिनांक | : | १२.८.९६ |

**ठरावः**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रभाग क्र.७२ रमानगर येथील गरीब वसाहतीतील मुलांसाठी महापालिकेतर्फे खे्ळण्यासाठी क्रिडांगण व सार्वजनिक बाग रमानगर स्मशानभूमीच्या बाजूस असलेल्या जमिनीवर क्रिडांगण व गार्डन तयार करुन देण्याची सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०२/२ :**

विठ्ठलनगर येथे कही दवाखाना नाही. तरी नागरिकांची गैरसेय होत आहे. तरी सिडकोची विठ्ठलनगर येथे सिडको शॉपिंग सेंटरच्या बाजूला मोकळी जागा आहे. सदर

जागा दवाखान्यासाठी योग्य आहे. तरी सदर जागा सिडको कार्यालयाकडून दवाखाना सुरु करण्याची कार्यवाही व्हावी.

| | | |
|---|---|---|
| सुचक | : | श्री. भगवान घडामोडे |
| अनुमोदक | : | श्री. बन्सीलाल गांगवे |
| दिनांक | : | १३.९.९६ |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार विठ्ठलनगर सिडको येथे शॉपिंग सेंटरच्या बाजूला मोकळ्या जागेत महापालिकेतर्फे प्राथमिक आरोग्य केंद्र उघडण्याची सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०३/३:**

एन-२ ह्या भागात प्रकाशनगर येथे भाड्याच्या खोलीत शाळा कार्यरत आहे व तेथेच विमानतळाच्या कंपाउडलगत उत्तर दिशेला ३६०० चौ.मी.ची सिडकोची जागा उपलब्ध आहे. सिडको कार्यालयाकडून न सदर जागा शाळेच्या इमारतीसाठी हस्तांतर करुन घेण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सुचक | : | श्री. भगवान घडामोडे |
| अनुमोदक | : | श्री. बन्सीलाल गांगवे |
| दिनांक | : | १३.९.९६ |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार एन-२ ह्या भागात प्रकाशनगर येथील भाड्याच्या खोलीत कार्यरत असलेली महापालिकेची शाळेसाठी विमानतळाच्या उत्तर दिशेकडील कंपाउडलगतची जागा ३६०० चौमी. सिडकोची जागा संपादीत करण्याची सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०४/४ :**

प्रस्तावात सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात अनाधिकृत वसाहती बऱ्याच झालेल्या आहेत ह्या वसाहंतीना अद्यापपर्यंत कर आकारणी झालेली नसल्यामुळे मनपाचे लाखो रुपयांचे उत्पन्न बुडित आहे. ह्या बाबत सर्वसाधारण सभेत अनाधिकृत वसाहतींना कर आकारणी करून अधिकृत करण्याचा ठराव संमत झालेला असून त्यावर अद्याप कार्यवाही करण्यात आलेली नाही.

करिता शहरातील सर्व अनाधिकृत वसाहतीतील तसेच आरक्षणात झालेल्या वसाहतीतील प्रत्येक घरास कर आकरणी करुन "घर तेथे कर" ह्या तत्वाने त्वरित अंमलबजावाणी करुन मनपाचे उत्पन्न वाढविणे करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील अनाधिकृत वसाहती बऱ्याच झालेल्या त्या वसाहतींची पाहणी करुन अनाधिकृत वसाहतीतील आरक्षण वगळून "जैसा घर वैसा कर" आकारण्याची सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०५/५ :**

औरंगाबाद शहरात लागलेल्या आगी च्या प्रामुख्याने मुख्य कापडाच्या बाजारा पेठा, लाकडाच्या वखारी सॉमिल्स तसेच शहरातील धान्य बाजार पेठ इ. ठिकाणी अग्निशामक नळखांब आवश्यक ती यंत्रसामुग्री व साहयता साहित्य यांची तरतुद करुन ती सुस्थितीत राहिली पाहिज त्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका कायदा कलम १९३ अन्वये कार्यवाही करणे, शहराचा वाढता विकास व्याप व संभाव्य धोके अडचणी विचारात घेऊन गरजेचे ठरत आहे. शहरामध्ये अनेक वेळा आगी लागतात लाखो रुपयांच्या मालमत्तेची हानी झाली हे सर्वांनाच ज्ञात आहे. या कामी टप्याटप्याने का होईना ही कार्यवाही केल्यामुळे शहरातील व्यापार व्यवहारात गुंतलेल्या लोकांसाठी एक योजना कार्यान्वित केल्याप्रमाणे होणार आहे. त्यामध्ये शहरातील सॉमिल्स कापडा व्यापारी, मोंढ्यातील व्यापारी इ.चे असोसिएशी बोलणीकरुन त्यांचा या कामी सहभाग करुन घेवून ही योजना राबविणे शक्य होणार आहे. यावर विचारास्तव व कार्यवाहीस्तव सदा प्रस्ताव सभागृहासमोर ठेवला आहे. त्यावर विचार होवून योजना कार्यान्वित करणेस मान्यता द्यावी. अशी विनंती करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| सुचक | : | श्री. व्ही.व्ही.देशमुख |
| अनुमोदक | : | श्री. हमीदउद्दीन ताबा |
| दिनांक | : | १५.८.९६ |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरातील मुख्य कापडाच्या बाजारपेठा, लाकडाच्या वखारी, सॉमिल तसेच धान्य बाजारपेठा इ.ठिकाणी अग्निशाम नळखांब यंत्र सामुग्री बसविण्याची सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०६/६ :**

महापालिका हद्दीतील सर्वात मध्यवर्ती अशा नागरी वसाहती म्हणजे कैलासनगर, संजयनगर, जिन्सी, दादा कॉलनी, भवानीनगर, बायजीपुरा दोन वॉर्ड अशा सर्व नागरी वसाहती या गरीब आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या कामगारांच्या व रहिवाश्यांच्या असून ह्या भागातील २०X३० अशा रो हौसिंग टाईप घरांची वस्ती असून कोणत्याही प्रकारची खेळण्यासाठी या भागातील रहिवाशी तरुणांना सुविधायुक्त जागा नाही. या सात वॉर्डातील तरुणांना सदर सुविधा प्राप्त करुन देण्यासाठी स्मशान मारोती समोर एक एकर जागेपेक्षा जास्त जागा क्रिडा संकुलासाठी उपलब्ध जागा मिळण्यास अडचण येणार नाही. संबंधित जागा भुसंपादित करुन कायम स्वरुपी भविष्य काळातील गरज ओळखून प्रश्न सोडविणे कामी सहकार्य करुन भुसंपादित जागा ही क्रिडा संकुल तयार करणेची कार्यवाहीस्तव प्रस्ताव सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | : | श्री. व्ही.व्ही.देशमुख |
| अनुमोद | : | श्री. गौतम खरात |
| | | श्री. हमीदउद्दीन ताबा |
| दिनाक | : | १३.८.९६ |

**ठराव :**

सदरील विषय परत मा.सभागृहात चर्चेसाठी ठेवण्यात यावा.

**विषय क्र. १०७/७ :**

औरंगाबाद मनपाच्या हद्दीमध्ये (कार्यक्षेत्रात) लहान मोठ्या १०० चे आसपास अनाधिकृत वसाहती वसल्या आहेत. ह्या वसाहती बरोबरच या शहरात सिमेंट काँक्रिटने वसाहती, फ्लॅट, बंगले सुध्दा झाले आहेत. या सर्वांचा विचार करता महापालिका त्यांना कमी अधिक प्रमाणात सोयी सुविधा पुरविणे कामी सध्या कार्यरत आहे. या सोयी पुरवित असतांना महापालिकेला (उत्पन्नाची बाब) जमेला कोणतीही तरतूद व्यवहार्य दृष्टीकोन ठेवून करण्यात आलेली नाही. त्यामुळे ज्या वसाहती महापालिकेच्या हद्दीत आहेत जेथे घर आहे तेथे कर आकारणी करुन जेथ पर्यंत घर आहे तो पर्यंत कर आकरणी असावी. या धोरणाने कर आकरणी व्हावी अशी सभेसमोर विनंती आहे. त्याचप्रमाणे दर पांच वर्षाने शहराच्या (मनपाच्या) हद्दीतील मालमत्तेचे रिव्हिजन होणे जरुरीचे आहे तसे १९८५ पासून झालेले नाही. त्यासाठी सुध्दा येणाऱ्या अडचणी कार्ये करणेसाठीच्या समस्यांच्या अधिकाऱ्यांशी चर्चा होवून या प्रस्तावाला मान्यता द्यावी. अशी विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| सुचक | : | श्री. व्हि.व्हि.देशमुख |
| अनुमोद | : | श्री.किशोर तुळशिबगवाले |
| | | श्री. गौतम खरात |
| दिनांक | : | १३.८.९६ |

**ठराव :**

सदरील प्रस्ताव विषय क्र.१०४/४ शी सुसंगत आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्याची सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०८/८ :**

जालना रस्त्यावर बऱ्याच प्रमाणात रहदारी वाढल्याने प्रशासनाने प्रारुप विकास योजनेअंतर्गत लक्ष्मण चावडी ते मोतीवाला नगर हा २४ मिटर रुंदीचा रस्ता प्रस्तावित केला आहे तो योग्य आहे. परंतु संजयनगर मधील नागरिकांना जालना रोड कडे जाण्यासाठी व जालनारोड वरुन स्मशान भूमीकडे येण्यासाठी जवळचा मार्ग या करीता जालना रोड ते नविन प्रस्तावित रस्ता असणे आवश्यक आहे. त्यानुसार डॉ.बाहेती व डॉ.कोडलेगिरीकर यांचे हॉस्पीटल समोरुन कॉलनी अंतर्गत जाणारा रस्ता हा सध्या रेखांकनानुसार जागेवर अस्तित्वात आहे. सदर रस्ता पुढे वाढविल्यास व तो प्रस्तावित २४ मिटर रस्त्यांपर्यंत केल्यास ह्या भागातील नागरिकांच्या समस्या सुटतील. तसेच दोन्ही मोठ्या रस्त्यांअंतर्गत एक साखळी रस्ता होवून जादा रहदारी एका रस्त्यावरुन होणार नाही. तरी जालना रोड ते प्रस्तावित २४ मिटर रस्ता ह्या दरम्यान डॉ.कोडलेगिरीकर यांच समोरील ९ मिटर रस्त्याची लांबी वाढवून व आवश्यक भुसंपादन करुन रस्ता तयार करणेसाठी सभागृहाला विनंती करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| सुचक | : | श्री. व्ही.व्ही.देशमुख |
| अनुमोदक | : | श्री. हमीदउद्दीन ताबा |
| दिनांक | : | १४.८.९६ |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगरमधील नागरिकांसाठी जालना रोडकडे जाण्यासाठी डॉ.बाहेती व डॉ.कोडलेगिरीकर यांच्या हॉस्पीटल समोरुन कॉलनी अंतर्गत जाणाऱ्या रस्त्याची सहा.संचालक नगररचना यांनी पाहणी करुन ९ मिटर रस्त्यासाठी जागा भुसंपादन करण्याची कार्यवाही करुन अहवाल पुढच्या सर्वसाधारण सभेत सादर करावा. असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०९/९ :**

औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक शहर असून ह्या शहराचा झपाट्याने वाढ होत आहे. ह्या शहरातील पर्यटन स्थळांना विविध देशाचे नागरिक भेट देतात. शहरात विविध महापुरुष तथा राष्ट्रीय पुरुषांचे पुतळे पवनचक्की, बिबी का मकबरा, औरंगाबाद लेण्या, सिध्दार्थ उद्यान इ.प्रेक्षणिय स्थळे असून सध्या महापालिकेमार्फत डॉ.बाबासाहेब आबेडकर तथा छत्रपती शिवाजी महाराज स्मारकांचे बांधकाम चालू आहे. या ऐतिहासिक नगरात साहित्यसम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे देखिल उचीत स्मारक असावे त्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचे पश्चिमेकडील बाजूस महापालिकेची बरीच जागा उपलब्ध असून सदर जागी साहित्यसम्राट लोकशाहीर अणाभाऊ साठे यांचे भव्य स्मारक उभारण्यात यावे. जेणेकरुन अणाभाऊ साठे प्रेमींना याचा लाभ होईल या थोर साहित्यकांचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात नव्हे देशात अमर राहील.

प्रस्ताव विचारार्थ मंजूरीस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | : | श्री. महादेव सुर्यवंशी |
| अनुमोदक | : | श्री. गिरजाराम हाळनोर |
| | | श्री. गौतम खरात |
| | | श्री. सुभाष कच्छवाह |
| | | श्री. विकास जैन |
| दिनांक | : | १४.८.१९९६ |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार लोकशाहीर अणाभाऊ साठे यांचे स्मारक उभारण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचे पश्चिमेकडील बाजूची मनपाची जागा प्रदान करण्याची सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११०/१० :**

नारेगाव प्रभाग क्र.१३ येथे स्मशानभुमी नाही. येथील महापालिकेच्या प्रथमिक शाळेच्या पश्मिचेमडील नाल्याच्या लगत महानगरपालिका मालकीची बरीच जागा पडलेली असून भविष्यात सदर जागेवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर जागेवर वरुड रोडच्या दक्षिण बाजूस सार्वजनिक स्मशान भूमीसाठी एक एकर जागा देण्यास यावी. सदर जागी अद्ययावत व सुसज्ज अशी स्मशानभूमी तयार करण्यात यावी. स्मशानभूमीत नागरिकांना बसणेसाठी रोड उभारण्यात यावे. जेणेकरुन येथील रहिवाश्यांची अंत्यविधीसाठी होणारी गैरसोय दूर होईल.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री. महादेव सुर्यवंशी

अनुमोदक : श्री. गिरजाराम हाळनोर
श्री. कचरु नवपुते
श्री. सुभाष कच्छवाह
श्री. विकास जैन
दिनांक : १४.८.१९९६

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगाव येथील लोकासाठी स्मशानभूमीसाठी वरुड रोडच्या दक्षिण बाजूस व मनपा शाळेच्या पश्चिमेकडील मनपाच्या मालकीची आवश्यक असलेली जागा सार्वजनिक स्मशानभूमीसाठी न.र. विभागाने पाहणी करुन योग्य ती कार्यवाही करावी. असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १११/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात महापालिकेच्या उर्दू शाळा आहेत ह्या शाळांचा दर्जा दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. या शाळेवर सुपरव्हिजन (पाहणी करण्याकरिता) जिल्हा परिषदेमार्फत सुपरवायझर येत असतात ज्यांना उर्दू भाषेची माहिती सुध्दा नसते. अशा सुपरवायझरकडून उर्दू शाळेची तपासणी काय होणार.

करिता उर्दू शाळेचा दर्जा सुधारण्याकरिता महानगरपालिकेतर्फे उर्दू शाळेवर सुपरव्हिजनसाठी दोन ग्रॅज्युएट शिक्षकांची सिनियारटीप्रमाणे (ज्येष्ठतेनुसार) नियुक्ती करावी. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : सौ. मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन
अनुमोदक : श्री. मुजीब आलमशाह खान
दिनांक : १४.८.९६

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाच्या उर्दू शाळेवर सुपरव्हिजन करण्याकरिता दोन उर्दू भाषिक जाणकाराची आर.आर.प्रमाणे नेमणूक करता येईल किंवा कसे शिक्षणाधिकाऱ्यांनी पुढील मिटींगमध्ये अहवाल सादर करावा. असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११२/१२ :** आरेफ कॉलनी येथे मंगल कार्यालय बांधणे.

सुचक : श्री.म.सलिम म.हनिफ कुरैशी
अनुमोदक : श्रीमती आबेदा बेगम
दिनांक : ३.९.९६

**ठराव :**

आरेफ कॉलनी येथे नगर रचना विभागाने पाहणी करुन अहवाल पुढील मिटींगमध्ये ठेवावा असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११३/१३ :**

मुलमची बाजार येथील दि.१४.८.९६ रोजी पाईप लाईन खोदकाम चालू असतांना बाजुच्या इमारतीची भिंत कोसळून त्याखाली महिला मरण पावली करिता तीच्या कुटुंबासाठी व इमारतीची झालेली नुकसान महापालिकेतर्फे नुकसान भरपाई व त्या महिलेाा आर्थिक मदत देण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सुचक | : | श्री. अब्दुल रऊफ |
| अनुमोदक | : | श्री. मुजीब आलमशाहखान |
| दिनांक | : | ४.९.९६ |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.मुलमची बाजार येथे दि.२४.८.९६ रोजी पाईपलाईन खोदकाम चालू असताना त्या कामावर मजूरीन म्हणून काम करत असलेल्या महिलेवर बाजूच्या इमारतीची भिंत कोसळून सदरील मजूरीन महिला मरण पावली. या नुकसान भरपाईपोटी मनपातर्फे मरण पावलेल्या महिलेच्या वारसास रक्कम रु.१२,५००/- ज्यांच्या इमारतीची भिंत कोसळली त्या इमारत मालकास रक्कम रु.१२,५००/- देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११४/१४ :**

संयजनगर हा भाग स्लम घोषित असून ह्या वॉर्डातील बहुतांशी जनता ही कामगार वर्ग असून आर्थिकदृष्ट्या मागासलेली आहे. ह्या भागातील विद्यार्थ्यांना आर्थिकबळ वेळोवेळी प्राप्त होत नसल्याने त्यांच्या विकासाच्या दृष्टीकोनातून व अडचण विचारात घेता अभ्यासिका केंद्र असणे आवश्यक आहे. त्याकरिता २०X३० फुटाची संजयनगर मधील गल्ली नं.ए-७ चा कॉर्नरचा प्लॉट जो जाधव यांच्या मालकीचा आहे. तो भुसंपादित करुन विद्यार्थ्यांना भविष्य कालीन सोयी उपलब्ध करुन देणे कामी व मनपाच्या कायम स्वरुपा मालमत्ता होण्याच्या दृष्टीकोनातून माझ्या स्वेच्छानिधीतून १,००,०००/- रु.कामी वापरुन अभ्यासिका केंद्र सुरु करणेसाठीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | : | श्री. व्ही.व्ही.देशमुख |
| अनुमोदक | : | श्री. मिरा सलामी |
| | | श्री. हमीद ताबा |
| दिनांक | : | ११.९.९६ |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर येथील गल्ली नं.ए-७ या कॉर्नरचा प्लॉट २०X३० फूट श्री.जाधव यांच्या मालकीचा असून सदरील जागेवर विद्यार्थ्याच्या अभ्यासिकेसाठी खोली बांधणेकरिता सदरील जागा संपादन करण्यास स.नगरसेवक व्ही.व्ही.देशमुख यांच्या स्वेच्छानिधीतून भुसंपादन करण्यास स.नगरसेवक व्ही.व्ही. देशमुख यांच्या स्वेच्छा निधीतून भुसंपादन करण्याची सर्वानुमते मंजूरी दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# “ऐनवेळचे विषय”

**विषय क्र. ११५/१५ :**

मौलाना आझाद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मजहर मोहियोद्दीन ३१ ऑगस्ट ९६ रोजी ३० वर्षाच्या काळानंतर सेवानिवृत्त झाले आहे. त्यांच्या समर्थकांनी प्राचार्य डॉ.मजहर मोहियोद्दीन फि.लिकेटेशन कमिटी स्थापन करुन त्यांचा सत्कार करण्यात येत आहे. प्राचार्य डॉ.मजहर मोहियोद्दीन हे शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य असल्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात येत आहे. जे जे नगरसेवक आपल्या स्वेच्छा निधीतून प्राचार्य डॉ.मजहर मोहियोद्दीन ह्यांना मदत करण्यास उत्सुक असेल अशा सर्व नगरसेवकांनी आपल्या स्वेच्छा निधीतून ह्या संस्थेला मदत करण्यास संमती दर्शवावी.

| | | |
|---|---|---|
| सुचक | : | श्री.म.मुश्ताक अहेमद |
| अनुमोदक | : | श्री. मुजीब आलमशाह खान |
| दिनांक | : | २०.९.९६ |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मौलाना आझाद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मजहर मोहियोद्दीन ३१ ऑगस्ट ९६ रोजी ३० वर्षाच्या काळानंतर सेवानिवृत्त झाले असून त्यांच्या समर्थकांनी प्राचार्य डॉ.मजहर मोहियोद्दीन फिलीकेशन कमिटी स्थापन करुन त्यांचा सत्कार करणार आहे. प्राचार्य डॉ.मजहर मोहियोद्दीन यांचे शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनिय कार्ये असल्याने त्यांचे सत्कारासाठी जे जे नगरसेवक स्वेच्छनिधीतून प्राचार्य डॉ.मजहर मोहियोद्दीन ह्यांना मदत करण्यास उत्सुक असतील अशा सर्व नगरसेवकांनी स्वेच्छानिधीमधून वरील संस्थेस मदत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ११६/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.मुकूंदवाडी येथील शाळेच्या एकूण (११) खोल्या पैकी पत्र्याचे छत असलेल्या सुमारे ग्रामपंचायतच्या काळातील जुन्या दोन खोल्या तोडून त्या ठिकाणी मुलांना खेळण्याचे मैदान तयार करुन पश्चिमेकडील मोकळ्या असलेल्या शाळेच्या परिसरास नविन दोन वर्ग खोल्या स्टाफरुम, स्वच्छतागृह बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रु.१०,५३,५४०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सर्वसाधारण सभेमधे प्रस्ताव सादर करण्यासाठी मा.आयुक्तांनी दि.१९.९.९६ ला मान्यता दिलेली आहे. सबब सदर कामासाठी रक्कम रु.१०,५३,५४०/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे ह्या लेखा शिर्षामधून सन ९६-९७ ह्या वर्षात करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.मुकूंदवाडी येथील शाळेच्या एकूण (११) खोल्यांपैकी पत्र्याचे छत असलेल्या ग्रामपंचायतचे काळातील जुन्या दोन खोल्या तोडून त्या ठिकाणी मुलांना खेळण्यासाठी मैदान तयार करणे पश्चिमेकडील मोकळ्या असलेल्या शालेय परिसरात नविन दोन वर्ग खोल्या, स्टाफरुम, स्वच्छतागृह बांधणेच्या कामासाठी सा.बां.खात्याचे सन १९९५-९६ चे जिल्हा दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम

रु.१०,५३,५४०/- चे अंदाजात्रकास तसेच सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे ह्या लेखा शिर्षकामधून सन ९५-९६-९७ ह्या वर्षात करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११७/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, आमखास मैदान येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राजवळ मागासवर्गीय अनुसूचित जाती/जमाती/इतर मागासवर्गीय होतकरु विद्यार्थीसाठी वसतीगृह बांधणेच्या कामासाठी रक्कम रु.२०,००,०००/- (वीस लाख) चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून आधी सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव सादर करुन मान्यता घ्यावी या अटीवर मा.आयुक्तांनी दि.२०.९.९६ ला मंजूरी दिलेली आहे.

सबब सदर कामासाठी रक्कम रु.२०,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च सन ९६-९७ ह्या वर्षात ५ टक्के कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजनामधून १०.०० लाख उर्वरित १०.०० लाख विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आमखास मैदान येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राजवळ मागासवर्गीय अनुसूचित जाती/जमाती/इत मागासवर्गीय होतकरु विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.२०,००,०००/- (वीस लाख) चे अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च सन ९६-९७ ह्या वर्षात ५ टक्के कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना मधून १०.०० लाख व उर्वरित १०.०० लाख विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणेच्या लेखा शिर्षामधून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११८/४:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.जिल्हाधिकारी ह्यांनी त्यांचेकडील पत्र क्र.९६/जिबी/डेस्क-१/नपा/कावि/९०५ दिनांक २.७.९६ अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्राचा समावेश महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ च्या कलम ३४२ अन्वये अनुसूची क्र.मा.क्र.१ मधील भाग-४ मध्ये करण्याच्या संदर्भाने महानगरपालिकेचे शिफारस/नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत कळविले आहे. या सर्वसाधारण सभेमध्ये खालील मुद्दावर चर्चा होणे आवश्यक आहे.

यापुर्वीच महानगरपालिकेने वाळूज येथील एम.आय.डी.सी. क्षेत्र महानगरपालिका क्षेत्रात अंतर्भूत करण्याबाबत सर्वसाधारण सभेने ठराव मंजूर केलेला त्याचा विषय क्र.२१ दिनांक १६.९.१९९५ असा आहे.

या क्षेत्रातील चिकलठाणा, रेल्वेस्टेशन येथील औद्योगिक विकास महामंडळाचे क्षेत्र महानगरपालिका क्षेत्रामधील क्षेत्र आहे.

ह्या क्षेत्रामधील चिकलठाणा, रेल्वेस्टेशन येथील औद्योगिक विकास महामंडळाचे क्षेत्र महानगरपालिका क्षेत्रामधील क्षेत्र आहे.

ह्या क्षेत्रातील मालमत्ता कराची चालू मागणी रु.१.०६ कोटी आहे व थकीतबाकी रु.३.९१ कोटी आहे. रु. ३.९१ कोटी रस्ते व लाईटसाठी १९८८ पासून आतापर्यंत रु. २.६१ कोटी खर्च मनपातर्फे करण्यात आलेला आहे.

वरील औद्योगिक क्षेत्र हि शहराच्या मध्यभगी (                    ) आहेत. त्यामुळे त्यांना सर्वदृष्ट्या महानगरपालिकेवर अवलंबून राहावे लागणार आहे.

महानगरपालिकेस जकातीतील मोठा वाटा उपरोक्त औद्योगिक क्षेत्रापासून मिळत आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकावर प्रतिकुल परिणाम होईल.

पर्यायाने शहाराचे विकासास बाधा होईल. कारखान्यामधील मालाची ने आण करणे तसेच कामगारांच्या बसेस व त्यांच्या रहिवासकरिता जागा इ.मुळे महापालिकेच्या सर्व सुविधा व वाहतुकीवर ताण तर पडेलच परंतु उत्पन्न मात्र काहीही मिळणार नाही. त्यामुळे महापालिका तोट्यात जाईल.

उपरोक्त क्षेत्रात देखभालीसाठी १ उपअभियंता अर्धवेळ (पार्ट टाईम), १ कनिष्ठ अभियंता, दुय्यत आवेक्षक, १ रोड कारकून असा तांत्रिक वर्ग कार्यरत आहे. तसेच इतर वर्गामधील कर्मचारी देखील आहेत. त्यांचे सेवेचा प्रश्न उपस्थित होईल. त्यांना इतरत्र समवून घेणे आवश्यक होईल.

उपरोक्त क्षेत्रामधे लोकसंख्या तुलनात्मकदृष्ट्या कमी असल्याने स्थानिक प्राधिकरणाचे काम कसे होईल याबाबत शंका आहे.

नविन जकात नाक्याची उभारणी करणे व जकातीचे वसुली करणे हे काम अत्यंत क्लिष्ट होईल. स्वराज्य संस्था व औद्योगिक महामंडळ स्थापन करण्याच्या मागील मुळ हेतू साध्य होती काय हे तपासणी आवश्यक आहे.

उपरोक्त मुद्या संदर्भाने सविस्तर चर्चा झालेवर सभागृहाचा निर्णय मा.जिल्हाधिकारी ह्यांना कळविण्यात येईल.

**ठराव :**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्राकरिता नविन नगर परिषद स्थापण्याबाबत मा.जिल्हाधिकारी यांचे पत्र संदर्भाने शिफारस ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत चर्चेकरिता समोर ठेवण्यात आलेल्या मुद्यांचा विचार करता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे औद्योगिक क्षेत्र करिता नविन वेगळी नगरपरिषद स्थापन करण्यास औरंगाबाद महानगरपालिकेचा सक्त विरोध असून सर्वानुमते या प्रस्तावाचा विरोध कण्यात येत आहे व तसे मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना कळविण्यात यावे

वैधानिक कार्यवाही व्हावी.

''जन गण मन'' ह्या राष्ट्रगीतानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | मा.महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १९.१०.९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**शनिवार दि.१९.१०.९६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.महापौर श्री. गजानन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली कै.केशव सिताराम ठाकरे सभागृहात औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस ''वंदे मातरम'' ह्या राष्ट्रगीताने सुरुवात झाली. ह्या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| स.स. | श्री.विजयकुमार गजानन मेहेर | उप महापौर |
| --''-- | श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर | स.सभासद |
| --''-- | श्री.जयवंत केशवराव ओक | --''-- |
| --''-- | श्री.मुजीब आलमशाह मीर आलमशाह | --''-- |
| --''-- | सौ.रुखमनबाई खंडेराव लोंखडे | --''-- |
| --''-- | श्री.प्रभाकर सिताराम विधाते | --''-- |
| --''-- | सौ.साजेदा बेगम | --''-- |
| --''-- | श्री.म.सलिम म.हनिफ कुरैशी | --''-- |
| --''-- | श्री.गौतम भागाजी खरात | --''-- |
| --''-- | श्री.ॲड.गणेश किशनराव वानखेडे | --''-- |
| --''-- | सौ.रजनी रमेश जोशी | --''-- |
| --''-- | सौ.उषाबाई दिलीप गायकवाड | --''-- |
| --''-- | सौ.विमलाबाई नंदकुमार मुंडलिक | --''-- |
| --''-- | सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे | --''-- |
| --''-- | श्री.गौतम लिंबाजी लांडगे | --''—— |
| --''-- | श्री.महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --''-- |
| --''-- | श्री.अभिमन्यु रामभाऊ भालेराव | --''-- |
| --''-- | श्री.नरेंद्र यादवराव पाटील | --''-- |
| --''-- | श्री.काशिनाथ हरिभाऊ कोकाटे | --''-- |
| --''-- | श्री.सुदाम रामदास सोनवणे | --''-- |
| --''-- | श्री.कंवरसिंग किसनसिंग बैनाडे | --''-- |
| --''-- | सौ.पद्मा बाबुराव शिंदे | --''-- |
| --''-- | श्री.प्रफुल्ल लालचंद मालानी | --''-- |
| --''-- | श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --''-- |
| --''-- | सौ.धनश्री अशोक विसपुते | --''-- |
| --''-- | श्री.फजलउल्लाखाँन अजमद उल्लाखान | --''-- |
| --''-- | श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | --''-- |
| --''-- | श्री.महंमद मुश्ताक अहेमद | --''-- |
| --''-- | सौ.नुरजहाँ बेगम अ.रहेमान खान | --''-- |
| --''-- | श्री.वसंत विनायकराव देशमुख | --''-- |
| --''-- | श्री.हाजी मोहसिन अहेमद हाजी बशिर | --''—— |
| --''-- | सौ.स.मोहसिना बिहकीस विखारोद्दीन | --''-- |

| | | |
|---|---|---|
| --''-- | श्री.अ.जावेद रज्जाक | --''-- |
| --''-- | श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे | --''-- |
| --''-- | सौ.यशोदा धनंजय वाडेकर | --''-- |
| --''-- | श्री.किशोर बाबुलाल तुळशिबागवाले | --''-- |
| --''-- | श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाल | --''-- |
| --''-- | श्री.स.हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन | --''-- |
| --''-- | श्री.स.म.अ.रऊफ म.अ.माबुद | --''-- |
| --''-- | श्रीमती स.जाहेदा बेगम म.जमीर | --''-- |
| --''-- | श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबउद्दीन | --''-- |
| --''-- | श्री.धिरज शांतीलाल खखोरडीया | --''-- |
| --''-- | श्री.प्रदीप शिवनारायण जैस्वाल | --''-- |
| --''-- | श्री.सय्यद अली मीरा सलामी | --''-- |
| --''-- | श्री.रमेश दिपचंद लाहोट | --''-- |
| --''-- | श्री.संजय किसनराव केनेकर | --''-- |
| --''-- | सौ.मुक्ताबाई सुदाम वाघमारे | --''-- |
| --''-- | सौ.लता श्रिनिवास दलाल | --''-- |
| --''-- | सौ.अलका रमेश पाटील | --''-- |
| --''-- | सौ.शकुंतला हरिदास धांडे | --''-- |
| --''-- | श्री.अब्दुल रशिदखान (मामू) | --''-- |
| --''-- | श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह | --''-- |
| --''-- | कु.माया लिंबाजी लाडवाणी | --''-- |
| --''-- | डॉ.भागवत किशनराव कराड | --''-- |
| --''-- | सौ.सविता संजय आव्हाड | --''-- |
| --''-- | सौ.निर्मला विठ्ठल कांबळे | --''-- |
| --''-- | श्री.अ.रशिद अ.सत्तार | --''-- |
| --''-- | श्री.तरवेंद्रासिंह महेंद्रसिंह धिल्लन | --''-- |
| --''-- | श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन | --''-- |
| --''-- | श्री.विकास रतनलाल जैन | --''-- |
| --''-- | श्री.मनमोहनसिंग करमसिंग ओबेराय | --''-- |
| --''-- | श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे | --''-- |
| --''-- | श्री.संजय रामदास जोशी | --''-- |
| --''-- | सौ.ज्योत्स्ना दौलतराव हिवराळे | --''-- |
| --''-- | श्री.राजकुमार उर्फ सांडू बचाटे | --''-- |
| --''-- | सौ.राधाबाई तळेकर | --''-- |
| --''-- | श्री.नरसिंग मुरलीधर ढगे | --''-- |
| --''-- | श्री.विठ्ठल किसन जाधव | --''-- |
| --''-- | सौ.मंदा धनंजय काळुसे | --''-- |
| --''-- | श्री.बन्सी तुळशिराम गांगवे | --''-- |
| --''-- | श्री.भागवत देविदास घडामोडे | --''-- |
| --''-- | श्री.कचरु चंद्रभान नवपुते | --''-- |

हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील थोर स्वातंत्र्य सेनानी, थोर सामाजिक कार्यकर्ते कै.भाऊराव खैरे ह्यांच्या दुःखद निधनानिमित्त सभागृहाने ००.०२ मिनिटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली. सुचक सभागृहनेता श्री. जयवंत ओक अनुमोदक श्री. नरेंद्र पाटील

**संवाद :**

श्री. नरेंद्र पाटील : मागील महिन्यापूर्वी सर्वसाधारण सभेसाठी काही प्रश्न देण्यात आले होते. ह्या प्रश्नावर सभागृहात चर्चा करण्याची परवानगी देण्यात यावी. ह्या प्रश्नावर प्रशासनातर्फे अद्याप काहीही कार्यवाही झाली नाही.

नगरसचिव : स.सभासदकडून प्राप्त झालेले प्रश्न माहिती घेण्यासाठी संबंधित विभागाकडे पाठविले आहेत. त्यांच्याकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर संबंधित नगरसेवकांना त्याबाबतचा खुलासा पाठविण्यात येईल.

श्री. नरेंद्र पाटील : औरंगाबाद महानगरपालिकेच सार्वत्रिक निवडणूक पंचायत राज्य पध्दतीनुसार झालेली आहे. सभागृहाच सदस्य श्री.प्रदिपकुमार जैस्वाल यांची खासदारपदी निवड झाली आहे. नियमानुसार एक व्यक्ती दोन पदावर राहू शकतात का? या बाबत आयोगकडून माहिती घेण्यात यावी. असा प्रश्न मी विचारला होता. याबाबत विधी सल्लागार यांना माहिती असेल.

मा.महापौर : नगरसचिव यांनी स.सभासदांचे प्रश्नाबाबत दखल घ्यावी व स.सभासदांना प्रश्नांची उत्तरे वेळेवर मिळतील अशी व्यवस्था करावी.

श्री. नरेंद्र पाटील : महापालिका नगरसेवक ह्या व्यतिरिक्त इतर कोणतेही पद सभासदांकडे नाही त्यामुळे नागरिकांच्या समस्याबाबत चर्चा करण्यात यावी. सर्वसाधारण सभेचा एकच दिवस सभासदांना मिळतो. या बाबींचा विचार करता वॉर्डातील समस्याबाबत चर्चा करण्यासाठी सभागृहात वेळ दिला जावा. त्यासाठी आधी प्रश्नोत्तराचा तास घ्यावा. त्यानंतर इतिवृत्तावर चर्चा करावी. नियमाप्रमाणे प्रथम प्रश्नोत्तराबाबत चर्चा व्हावी असा नियम आहे.

श्री. अ.जावेद रज्जाक : मागील सर्वसाधारण सभेच्या वेळी इतिवृत्तावर चर्चा न करता सर्व विषय मंजूर करुन पूर्ण करण्यात आले होते. आजही मा.महापौरांना कार्यक्रमनिमित्त जावयाचे आहे. अशी माहिती मिळाली आहे. तेव्हा आजची सभाही चर्चा न होता पूर्ण होणार का?

**विषय क्र. १९१ :**

दि.२०.९.९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

मा.महापौर : विषय क्र.एक चर्चेला घेण्यात येत आहे मला कोणत्यही कार्यक्रमाला जाणे आवश्यक नाही. नियमाप्रमाणे मिटींग होईल.

सौ. मोहसिना बिल्कीस : जि.प. शिक्षक भरती बाबत एक महिन्याचा कालावधी लोटला आहे. तथापि ह्या प्रकरणी अद्याप काहीही निर्णय झाला नाही.

श्रीमती आबेदा बेगम : उपसमतीच्या दोन बैठका झाल्या तरीही ठोस निर्णय झालेला नाही. तेव्हा ह्याबाबत खुलासा व्हावा.

मा.महापौर : स.नगरसेविका उपसमितीच्या सभासद आहेत. या प्रकरणी उपसमितीच्या दोन बैठका झाल्या आहेत. मा.आयुक्त बाहेर गावांहून नुकतेच आहेत. लवकरच उपसमिती बैठक घेतली जाईल व त्याबाबतचा अहवाल दिला जाईल.

श्री.अ.जावेद रज्जाक : उपसमितीच्या दोन बैठका झाल्या. ह्या समितीचा मी सभासद आहे. पण बैठकीबाबतची माहिती देण्यात आली नाही.

मा.महापौर, श्रीमती जाहेदा बेगम : उपसमितीच्या बैठकीबाबत आपणांस माहिती होती. सेवा भरती नियमाबाबत खुलासा व्हावा.

मा.महापौर : यावर नंतर चर्चा केली जाईल.

श्री. हमीदउददीन ताबा : जि.प. शिक्षकांच्या भरती प्रकरणाबाबत सभागृहाने उपसमितीची नियुक्ती केली आहे. पण ह्या प्रकरणाशी संबंधित काही अधिकाऱ्यांच्या बदल्या प्रशासनाने केल्या आहेत काय ? ह्या अधिकाऱ्यांचे पद आणि त्यांच्यावरील आरोप गंभीर स्वरुपाचे आहेत.

मा.महापौर : शिक्षक भरती प्रकरणाबाबत नेमण्यात आलेल्या उपसमितीची बैठका झाल्या. त्यात संबंधित अधिकारी उपस्थित होते. अधिकाऱ्यांची बदली झाली तरी अशा अधिकऱ्यांना चौकशीचे कामी हजर राहता येते. ह्या बदल्या प्रशासनाने केल्या आहेत.

श्री. नरेंद्र पाटील : सर्वसाधारण सभा दि.२०.९.९६ ठराव क्र.८७ अन्वये नेमलेल्या उपसमितीच्या सभासदांचे नावानंतर ''इ'' अशी नोंद घेण्यात आली आहे. ह्या ''इ'' शब्दाचा अर्थ काय?

मा.महापौर : स.सभासदांच्या सुचनेनुसार ''इत्यादी'' हा शब्द इतिवृत्तातून वगळण्यात यावा. दखल घेण्यात यावी.

श्री. महादेव सुर्यवंशी : दि.२०.९.९६ च्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.१०९/९ आणि ११७/३ ह्या दोन प्रस्तावाचा आशय एकच आहे. तेव्हा सदर दोन्ही प्रस्ताव एकत्र करण्यात यावे व तशी दुरुस्ती करावी.

श्री. नरेंद्र पाटील : मागील सभेत सिमेंट खरेदीबाबत जो काही भ्रष्टाचार झाला किंवा नाही याची चर्चा या सभागृहात होणार होती परंतु त्याबाबत सभागृहात चर्चा न करता ''जन गण मन'' होवून सभा संपली होती. हे मी आपल्या समोर नमूद करु इच्छितो.

मा.महापौर : मागच्या सभेत तो निर्णय का घेतला याची सर्व कारण सर्व सन्मानिय सभागृहास माहित आहे. ज्याच्या वेळी सभागृहास खाली बसण्याबाबत विनंती करत होते व सर्व विषय घेऊ अशी विनंती करीत होतो परंतु तस न होता सभागृहासमोर विषय ठेवले असता सर्वांनी मंजूर/मंजूर म्हणून एकमुखाने मंजूरी दिली आहे. त्याव ता निर्णय घेतला आहे. मी एकट्याने तो निर्णय घतलेला नसून मा.सभागृहाने त्यास बहुमताने मंजूरी दिलेली आहे. त्यामुळे तो निर्णय घेतलेला आहे. तेव्हा इतिवृत्ताबाबत काही सूचना असतील तर त्या सुचवाव्यात त्याचा जरुर विचार केला जाईल.

श्री. महादेव सुर्यवंशी : दि.२०.९.९६ च्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.१०९/९ आणि ११७/२ ह्या दोन प्रस्तावाचा आशय एकच आहे. तेव्हा सदर दोन्ही प्रस्ताव एकत्र करण्यात यावे व तशी दुरुस्ती करावी. ही दुरुस्ती करतांना प्रस्तावात फक्त मागासवर्गीय असा उल्लेख आहे. त्यात अनुसूचित जमाती विमुक्त जाती याचाही उल्लेख असावा.

श्री.गौतम खरात : स.सभासदांनी सुचविलेल्या सूचनेस माझी सहमती आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्म वर्षानिमित्त हर्सुल येथे वसतीगृह बांधण्याच्या कामासाठी मंजूरी दिली होती. परंतु हर्सुल येथे वसतीगृह बांधण्याच्या कामासाठी शाळेच्या इमारतीची गरज लक्षात घेऊन त्यानुसार त्या ठिकाणी शाळा सुरु करण्यात आली आहे. ह्या ठिकाणी मुद्दाम आठवण करुन देतो. आमखास मैदान येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटरचे काम बऱ्याच दिवसांपासून चालू आहे. शाहीर आण्णाभाऊ साठे यांनी डॉ.आंबेडकरांना गुरु मानले होते. या बाबींचा विचार करवा. ह्या सूचनेसाठी माझा पूर्ण पाठिंबा आहे.

मा.महापौर : स.सभासदांच्या सुचनेनुसार अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जाती अशा दुरुस्तीसह दोन्ही ठराव एकत्र दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

श्री. नरेंद्र पाटील : दि.२०.९.९६ च्या सर्वसाधारण सभेच्या वेळी सर्व ठराव एकाच वेळी मंजूर करुन सभागृहाने विक्रम केला आहे. त्यातील दोन तीन ठरावावर सभागृहात चर्चा झालीच पाहिजे. तेव्हा त्याबाबत मार्गदर्शन व्हावे.

मा.महापौर : दि.२०.९.९६ च्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताबाबत चर्चा होत आहे. स.सभासदांनी त्याबाबत काही दुरुस्त्या असतील तर त्या सुचवाव्यात.

श्री. नरेंद्र पाटील : दि.२०.९.९६ च्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र.१००/१४ अन्वये जिम्नॅस्टिक हॉल बांधण्याच्या कामासाठी मंजूरी दिली आहे. शहरात विविध प्रकारचे हॉल आहेत. त्यांचा असा उपयोग होत नाही. सिडको भागात ही नविन हॉल बांधण्यासाठी पालकमंत्र्यांनी निधी मंजूर केला आहे. शासनाकडून मिळालेल्या निधीबाबत महापालिका कार्यालयात मिटींग झाल्याची माहिती मिळाली आहे. अशा मिटींगला संबंधित नगरसेवक किंवा विरोधी पक्षाच्या सभासदांना निलंबित केले जात नाही याची खंत आहे. मा.खासदारांचा निधी शहराच्या विकास कामासाठी उपयोगात आला असता तर योग्य झाले असते. शासनाने दिलेले अनुदान कसे खर्च करावे हा महापालिकेचा अधिकार आहे.

मा.महापौर : महापालिका कार्यालयात शासकीय अनुदानाबबत झालेल्या मिटींगसाठी फक्त निमंत्रित प्रतिनिधींच बोलावण्यात आले होते. सदर मिटींग शासनातर्फे आयोजित करण्यात आली होती. ह्या मिटींगमध्ये १० कोटींच्या खर्चाबाबत माहिती देण्यात आली आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : शासकीय अनुदानाबाबत महापालिका कार्यालयात झालेल्या मिटींगच्या वेळी मा.पालकमंत्र्यांनी एक कोटी रुपयाचा निधी सिडकोकरिता देण्याचे मान्य करुन त्यापैकी २५ लाख रुपये दिले आहेत. ह्या पालकमंत्र्यांच्या निर्णयास मा.खासदार यांनी विरोध केला आहे. अशी बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली आहे. हे खरे आहे काय? याचा खुलासा व्हावा.

श्री. प्रदिप जैस्वाल : सिडको हडको हा शहराचाच भाग आहे. महापालिका कार्यालयास झालेल्या मिटींगमध्ये शासकीय अनुदानातून रु.२५ लाख देवून काम सुरु करावे. अशी सूचना मिटींगमध्ये केली आहे.

**ठराव :**

१. दिनांक २०.९.९६ च्या इतिवृत्तातील ठराव क्र.८७ मधील ''इत्यादी'' शब्द वगळण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

२. ठराव क्र.१०९/९ आणि ११७/३ ह्या ठरावाचा आशय एकच असल्यामुळे दोन्ही ठराव एकत्र करण्यास तसेच ठरावास अनुसूचित जमाती व विमुक्त जमातींचा सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वरीलप्रमाणे दुरुस्ती व वाढ यासह दि.२०.९.९६ च्या सर्वसाधारण सभेच इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात आली.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री. अ.रशिद खान (मामू), श्री.हमीदउद्दीन ताबा :शहरात साफसफाईचे काा योग्य प्रमाणात होत नसल्याने घाण मोठ्या प्रमाणावर होत नसल्याने घाण मोठ्या प्रमाणावर जम झालेली आहे. त्यामुळे ज्याप्रमाणे दिल्ली मुंबई ह्या ठिकाणी साथीची रोगाची लागण ह्या शहरात होते की, अशी भिती उत्पन्न झालेली आहे. यावर उपाय म्हणून मुंबई सारख्या शहरात स्वच्छतेचे काम युध्द पातळीवर हाती घेण्यात आले आहे. ह्या शहरातही अशा प्रकारे सफाई काम हाती घेण्याबाबत विचार व्हावा. दूरदर्शन वृत्तपत्राच्या बातमीनुसार दिल्ली सारखा रोग महाराष्ट्रतही सुरु झाल्याच्या बातम्या आहेत. याबाबत मा.आयुक्तांशी चर्चा केली आहे. दिल्लीगेट जवळ असलेल्या तलाात घाण पसरली आहे. त्यापासून रोग उत्पन्न होण्याची भिती आहे. महापालिकेची मशिनरी दुरुस्त असल्याचे समजते. रोलर पाच दिवसापसून बंद असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. यांत्रिकी विभागाचे काम योग्य नसल्याचे साफसफाईच्या कामास वेळेवर वाहने उपलब्ध होत नाही. अधिकारी कर्मचारी लक्ष देत नाही.

मा.महापौर : आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी यावर खुलासा करावा.

श्री. मुजीब आलमशहा खान : स.सभासद श्री.रशिद मामू यांचे विचारांशी सहमत आहे. आरोग्य बाबत अधिकाऱ्यांना पत्र देवूनही संबंधित अधिकारी त्या ठिकाणी पहाणी करण्यास तयार नाहीत. शहरात असलेल्या गोठ्याच्या ठिकाणी डासांचे प्रमाण वाढले आहेत. याबाबत पत्र देवूनही अधिकारी टाळाटाळ करीत आहे. महापालिकेचे कामगार अधिकाऱ्यांच्या घरी काम करतात. यासाठी मा.महापौर, मा.आयुक्त यांनी झोनच्या कामासाठी स्वतः पाहणी करावी. जनावरांच्या गोठ्याच्या दुर्लक्षामुळे तेथे मुले आजारी पडली आहेत. याबाबतही पत्र देण्यात आले आहे. तेव्हा त्याबाबत मा.महापौरांनी निर्णय घ्यावा.

मा.महापौर : स.विरोधी पक्षनेता यांनी दिलेल्या सूचना लक्षात घेता प्रशासनाने स्वच्छतेबाबतची विशेष मोहिम हाती घ्यावी.

सौ. अलका पाटील : मा.विरोधी पक्षनेता यांचे विचाराशी मी सहमत आहे. वॉर्ड क्र.५३ येथील मेडीकल कॉलेज भागातील कुंडीतील कचरा उचलला जात असते. अशी घाण उचलण्यास सफाई कामगारांना हातमोजे देण्यात यावेत. याबाबत पत्र दिलेले आहे.

श्री. जयवंत ओक : शहराच्या साफसफाईच्या दृष्टीने शहरात असलेले सर्व गोठे शहराबाहेर हलविण्यात आले पाहिजे. नाल्याची साफसफाई झाली पाहिजे. या विषयी नविन असे आश्वासन देण्यात यावे असे प्रश्न सुटतील.

श्री. कचरु नवपुते : चिकलठाणा भागात दुग्धशाळेसाठी अर्थसंकल्पात तरतूद केली आहे. त्या बाबींची अंमलबजावणीसाठी तर शहरातील गोठे या भागास हलविता येतील. तेव्हा प्रथम कार्यवाही होणे आवश्यक आहे.

मा.महापौर : चिकलठााणा ते दुग्धशाळा सुरु करण्याबाबतची कार्यवाही प्रशानाने सुरु केली आहे.

डॉ.भागवत कराड : स.नगरसेविका सौ. पाटील यांनी सुचविल्याप्रमाणे मेडीकल कॉलेज/हॉस्पीटल येथील कचराकुंडी मानवी शरीराचे अवयव असतील तर ती गंभीर बाबा आहे. अशा मानवी शरीराच्या अवयवांची वेगळी व्यवस्था झाली पाहिजे. कचराकुंडीत मानवी शरीराचे अवयव टाकीत असतील तर संबंधित बबीचा पंचनामा करुन त्यावर योग्य कार्यवाही झाली पाहिजे.

मा.महापौर : प्रशासनातर्फे खुलासा करण्यात येत आहे.

मा.आयुक्त : सभागृहात स्वच्छता आरोग्य आणि संभाव्य डेंगू रोगाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. सुदैवाने आतापर्यंत एकही डेंग्युची केस ह्या शहरात आढळली नाही. तथापि याकडे दूर्लक्ष करून चालणार नाही. दिल्ली शहरात या रोगाची लागा झाली. त्यात काही जण मृत्युमुखी पडले. ही दुर्देव बाब आहे. आज सभागृहात ज्या भावना व्यक्त करण्यात आल्या आहे. त्याबाबत प्रशासन सतर्क आहे. प्रशासनाने यापूर्वी हिवताप पांरवडा मोहीम साजरी केली आहे. यातून डासांचे निर्मूलन झाले अशा प्रशासनाचा दावा नाही. स्वच्छतेच्या बाबतीत प्रशासन काम करीत नाही. प्रशासन झापले असा समज सभागृहाने कृपा करुन घेवू नये, अशी माझी विनंती आहे. जे करणे शक्य आहे जे जे करत येईल ते त सर्व करण्याचा प्रशासकीय अधिकारी आणा सर्वाच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न करत आहे. जरुर काही गाड्या आमच्या बंद आहे. महापालिकेचा आकृतीबंध शासनाने अद्याप मंजूर केलेला नाही. प्रशासनान ६०० कामगारांची मागणी केलेली आहे. काही कामगार सेवानिवृत्त झाले आहेत त्यांच्या जागी कामगार नेमावयाचे आहेत. ३/४ स्वच्छता निरिक्षकांच्या जागा कमी आहेत. घाण कचऱ्यापासून खत निर्मीतीचा प्रकल्प अशा प्रकारच्या योजना राबवायच्या आहेत. ह्या सर्व बाबी करीत असतांना, शहराचे आरोग्य आणि स्वच्छता कोणत्याही परिस्थितीत अडचणीत येणार नाही. हे पहाण्याच लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यातर्फे पाहण्याचा प्रयत्न आहे. प्रशासनातर्फे गाजर गवत निर्मुलनाची मोहिम हाती घेण्यात आली आहे. यासाठी प्रशासनातर्फे १०० कामागारांना ह्या कामावर हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. इतर कामासाठी हे कामगार हजर राहतात. परंतु गाजर गवत काढण्याच्या कामासाठी हे कामगार हजर राहत नाहीत. गाजर गवत काढत असतांना हाताना इजा होणे, इन्फेक्शन होणे, असे प्रकार होतात. म्हणून हे कामगार हजर राहत नाहीत. सफाई कामगारांना हातमोजे नाहीत. अवजारे नाहीत. अशा सूचना सभागृहात केल्या आहेत, त्यासाठी प्रशासनाने सतर्कतेने आदेश दिले आहेत. लवकरच हे साहित्य मजूरांना देण्यात येईल. ह्या महापालिकेत पदभार स्विकारुन तीन महिन्याचा कालावधी झाला. त्यात पहिला महिना शिक्षक भरती, दुसरा महिना उत्तर

प्रदेश निवडणुकीत गेला. सभागृहाला खात्री देवू इच्छितो की, त्या संदर्भात प्रशासन सभागृहाच्या भावनाशी सहमत आहे. त्या बाबतीत जेवढी काळजी सतर्कता आवश्यक असेल ती निश्चित पूर्ण होईल. गोठ्या बाबतचा प्रश्न सभागृहात उपस्थित झाला आहे. ती जागा उपलब्ध होत नव्हती. त्याबाबत मा.जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करण्यात आली. जवळजवळ २७ एकर जागा ताब्यात घेण्यात आली आहे. त्या जागेच्या सर्व्हे चालू आहे. प्रत्येक झोनमध्ये असलेल्या जनावरांची (म्हशी,गाई,शेळ्या) गणना करण्याचे काम विभागीय अधिकाऱ्यातर्फे १५ नोंव्हेबर पर्यंत पूर्ण होईल. त्यानंतर शरातील गोठे हलविण्यात येईल. यासाठी नऊ एकर जागेचा लेआऊट तयार करण्यात येईल. त्या बाबत सर्व गोठे धारकांची सभा मा.महापौरांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येईल.

सौ. नुरजहाँ बेगम : स्वच्छतेच्या बाबतीत पाहणी करत असताना अनेक कामगाराजवळ असलेले कचरा उचलण्याचे टोपले, हातगाड्या, फुटलेल्या आहेत. त्यामुळे जमा केलेला कचरा उचलताना पुन्हा रस्त्यावर पडतो. तेव्हा सर्व झोन अधिकाऱ्यांशी मिटींग घेवून किती हातगाड्या टोपले खराब आहेत. याची माहिती घेण्यात यावी. संजयनगर भागाची स्वच्छता होत नाही, त्यामुळे डासांचे प्रमाण वाढले आहे.

श्री.मुजीब आलमशा खान : प्रशासनाला पत्र दिल्यानंतरही १५/१५ दिवस उत्तर मिळत नाही. आणि कामही केले जात नाही. मा.आयुक्त अधिकाऱ्यांची बाजू घेत आहे. स.सभासद श्री.म.अ.रऊफ यांना काम होत नाही म्हणून उपोषनास बसण्याची वेळ आली. लाईट विभागाची परिस्थिती फारच वाईट आहे. सभागृहाची दिशाभूल केली जात आहे. शहरात डास वाढले आहेत. सभागृहात चर्चा करुन काही उपयोग होत नाही.

श्री.गणेश वानखेडे : वॉर्ड क्र.७ मधील भरतनगर भागातील मागी बाजूचे लाईनमन – पणी पुरवठा पुढच्या बाजुला घेतलेला आहे. यासाठी जे लोक पाठविण्यात आले होते. त्या लोकांनी रु.१८५ ऐवजी रु.२५० अशाप्रकारे मोठ्या वॉर्डातील नागरिकांकडून वसूल केले आहेत. त्याची माहिती माझ्याकडे आहे. कार्यकारी अभियंता यांनी याबाबत खुलासा करावा. ह्या प्रकरणात गुत्तेदार दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही करावी.

मा.महापौर : स.सभासदांनी जी सूचना मांडली त्याबाबत संबंधित अधिकऱ्यांनी दखल घ्यावी व चौकशी करावी.

सौ. धांडे : वॉर्ड क्र.५४ मध्ये स्वेच्छा निधीतून मुरुम टाकण्याबाबत पत्र दिले असता संबंधित विभागाचे कनिष्ठ अभियंता यांनी रक्कम दूसरीकडे वापरण्यात आल्यांची माहिती दिली आहे. पत्राचा काही उपयोग झाला नाही. रद्द झाले आहे. तर नगरसेवकाच्या पत्राला काही किंमत नाही का?

मा.महापौर : स.नगरसेवकांनी स्वेच्छानिधीतून कामे घेण्याबाबत जी जी पत्रके दिली आहेत. त्या सर्व पत्रकाबाबत संबंधित विभागाने १५ दिवसाचे आत काम पूर्ण करावीत. अन्यथा याबाबत अधिकाऱ्यावर कार्यवाही केली जाईल.

श्री. नरेंद्र पाटील : हिवताप मोहिमेबाबत जो स्वच्छतेबाबत पंधरवाडा वगळण्यात आला तो योग्य वाटत नाही. ह्या पंधरवाड्याच्या काळात चांगल्याप्रकारे पावसाळा असल्यामुळे हा पंधरवाडा यशस्वी आला नाही. आजही शहरात डास

आहेतच त्यासाठी डास निर्मूलन फवारणी दुप्पट, प्रमाणात वाढविण्यात यावी. पावसाळा परत झाल्यामुळे डासांची निर्मिती असल्यामुळे सध्या शहरात डासांचे थैमान चालू आहे. डास निर्मूलनासाठी फवारणी करताना शहराबाहेरच सिडको/हडको भागातही फवारणी मोहिम हाती घेण्यात यावी. ह्या फवारणीसाठी सिडकोकडे अशी कोणतीही यंत्रणा नाही. ह्या शिवाय आरोग्य विभागाने शहरात ज्या क्लिनिक आहेत. त्यांच्याशी सतत संपर्क ठेवला पाहिजे. म्हणजे वेळोवेळी माहिती उपलब्ध होईल आणि पर्यायाने रोंगावर वेळीच नियंत्रण करणे शक्य होईल.

श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग : मनपा शासनाकडे भरपुर वाहने असल्याचा खुलासा सभागृहात केला आहे. तरीपण सफाईचे काम योग्य प्रमाणात होत नाही. वाहने भरपुर असतील तर पुर्वीप्रमाणे दोन पाळीत सफाई काम करण्यात यावे. यापुर्वीच्या प्रशासकीय काळात अशी व्यवस्था करण्यात आली होती. मनपाच्या वाहनाची स्थिती चांगली आहे. महाराष्ट्रात अशी चांगली वाहने कोणत्या ही मनपातर्फे नाही. प्रत्येक झोनसाठी स्वतंत्र वाहनाची व्यवस्था आहे. सफाईच्या कामासाठी एक स्वतंत्र कक्ष उभारण्यात यावे. ह्या कक्षाने पूर्ण नियंत्रण मा.आयुक्त यांचेकडे असावे. झोनची संख्याही वाढली आहे. उपआयुक्ताचीही दोन पदे आहेत. ह्या सर्व बाबींचा विचार करता सफाईच्या कामात प्रगती आणण्याचे काम प्रशासनाने करावे.

मा.महापौर : सफाईबाबत सभागृहात बरीच चर्चा झाली आहे. सभागृहाच्या सूचनाची दखल घेण्यात आली आहे.

श्री. ताबा : माजी आयुक्तांचे काळात साफसफाईचे काम दोन शिफ्टमध्ये चालत असे त्या काळात शहरातील कुंड्यातील कचरा उचलला जात होता. तीच पध्दत पुन्हा सुरु करण्यात यावी. एक वेळेस काम करण्याच्या पध्दतीमुळे तीन तीन दिवस कुंड्यतील कचरा दिवसातून एकवेळ उचलला जाईल याची दक्षता घेण्यात येत आहे.

डॉ.कराड भागवत : यापूर्वी शहरातील कचरा कुंड्यात कचरा दोनवेळा उचलला जात होता. आता कुंड्यातील कचरा उचलला जात नाही. कुंड्या व्यवस्थित उचलून कचरा साफ केला जात नाही. म्हणून काही कर्मचाऱ्यांना रविवार ऐवजी इतर दिवशी सुटी द्यावी आणि दररोज कुंडी साफ होईल अशी व्यवस्था करावी. म्हणजे नागरिकांच्या आरोग्यास धोका पोहचणार नाही. डेंग्यु रोगाचा प्रादूर्भाव होवू नये म्हणून पुन्हा स्वच्छता मोहिम हाती घेण्यात यावी.

मा.महापौर : सभागृहाच्या भावना लक्षात घेता आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी याबाबत सविस्तर खुलासा करावा.

श्री. अब्दुल रशिद खान : सभागृहात चर्चा झाल्याप्रमाणे वरिष्ठ अधिकारी वगळता इतर अधिकऱ्यांच्या घरी काम करणारे कामगार सफाई कामासाठी उपयेगात आणल्यानंतर सफाईच्या कामात सुधारणा होवू शकेल. अधिकाऱ्याच्या घरी दोन दोन सफाई कामगार काम करतात. अशा व्यवस्थेमुळे सफाई कामासाठी मजूर कमी पडतात.

मा.महापौर : सभागृहाच्या सुचनेप्रमाणे अधिकाऱ्यांच्या घरी काम करणाऱ्या सफाई कामगाराबाबत जी दखल प्रशासनाने घ्यावी व नियमाप्रमाणे कोणत्याही अधिकाऱ्याकडे कामगार राहणार नाही याची दखल प्रशासनाने घ्यावी.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : डेंगू हा रेग एका सूक्ष्म जीवनामुळे होतो. हे डांस दिवसा चालणारे असतात. या जिवाणूला एडीबेस असे म्हणतात. हे जिवाणू पाण्याची भांडी टायरमध्ये ठेवलेले पाणी अशा ठिकाणी मोठ्या प्रमाणावर होतात. अशा ठिकाणचे पाणी काढून टाकले पाहिजे. शहरात डेंगू रोगाची साधना किंवा तशा प्रकारची कुठलीही लागण नाही. एडीस माक्सीटोचे जीवाणूही नाही. पण भविष्यात होण्याची शक्यता विचारा घेवून नागरीकांनी घरात पाणी साठविण्याची टाकी मासे ठेवण्याची जागा, टायर अशा ठिकाणचे पाणी दर आठवड्याला स्वच्छ करावे. म्हणजे हे जीवणू तयार होणार नाहीत. नाले डबके यांच्यापासून तयार होणार जीवाणू किडे आहेत त्यापासून हा रोग हात नाही. प्रशासनाने जो पंधरवाडा साजरा केला त्यातून जनजागरण करु शकतो. नाल, डबके यातील डासांचे निर्मूलन होणे आवश्यक आहे. याशिवाय एक महिना विशेष मोहिम हाती घेवून प्रत्येक घरोघरी डेंगू जिवाणू कशापासून निर्माण होतात. त्यासाठी काय खबरदारी घेणे आवश्यक आहे. याबाबीची प्रशिक्षण नागरिकांना देण्यात येईल. याच बरोबर स्वच्छतेच्या कामासाठी १०० कामगार नेमून विशेष मोहिम हाती घेण्यात येईल. अशा प्रकारची खबरदारी घेण्यात येईल.

श्री. मोहम्मद मुश्ताक : आरोग्याच्या दृष्टीने यापुढे काय कार्यवाही करण्यात येणार याचा विचार केला गेला पाहिजे. फक्त मुख्य रस्ते साफ करुन चालणार नाही. यासाठी एक समिती नेमण्यात यावी. ह्या समितीने संबंधित वॉर्डाचे नगरसेवक यांना बरोबर घेवून पाहणी करुन वॉर्डातील कर्मचाऱ्याबाबत संबंधितांना सूचना देवून एक आठवड्याला पुन्हा पाहणी करुन सुचनेनुसार काम झाले किंवा नाही याची पाहणी करावी. म्हणजे साफसफाईचे काम योग्य होईल असे वाटते.

मा.महापौर : स्वच्छता विषयक मोहिम हाती घेण्यात येणार आहे. तेव्हा अशा प्रकारची उपसमिती नेमणे योग्य नाही. स्वच्छता मोहिमेअंतर्गत सर्व नगरसेवकांचे सुचनेनुसार वॉर्डात काम करण्यात येईल. यानंतर प्रश्नोत्तरावर चर्चा होईल.

श्री. व्ही.व्ही.देशमुख : साफसफाई कामाबाबत प्रत्यक्ष पाहणी करुन काम केले तर बराचफरक पडेल संजयनगर, भवानीनगर स्मशानमारुती येथील नाल्याची साफसफाई होत नाही. सभागृहात नाले साफ केले जातात असे सांगितले तरी प्रत्यक्षात नाले साफ होत नाही. निवडून आल्यापासून आतापर्यंत आरोग्य अधिकारी आमच्या वॉर्डात किती वेळा आले याचा खुलासा त्यांनी करावा. सभागृहात आज केलेल्या सूचना आणि त्याबाबत दिलेले आश्वासन यांची पुर्तता होते का याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे.

श्री. ताबा हमिदोद्दीन, श्री. मिरा सलामी : सभागृहात ऐनवेळचे प्रश्न वाटप कले जात आहेत. त्यात सेवाभरती नियमासारखा महत्वाचा प्रश्न या बरोबर ऐनवेळी चर्चेसाठी दिला जात आहे. या सेवाभरती नियमाबाबत सभासदांना अभ्यास करण्यासाठी वेळ मिळणे आवश्यक आहे. अशा प्रकारे ऐनवेळचे प्रश्न ठेवण्यात येऊ नये.

मा.महापौर : सभागृहास योग्य वाटेल अशीच ऐनवेळच्या प्रश्नावर चर्चा केली जाईल. प्रश्नोत्तरावर चर्चा होईल. प्रथम स.स.श्री.देशमुख यांनी विचारलेल्या प्रश्न.

नगरसचिव : प्रश्न १ शहरातील कोणते रस्ते विस्तारीत करण्यासाठी विकास कामाअंतर्गत घेण्यात आले आहेत.

श्री. नरेंद्र पाटील, श्री. ताबा हमीदोद्दीन : स.सभासदकडून सभागृहात लेखी प्रश्न विचारला जातो आणि अधिकाऱ्यांकडून त्याचे उत्तर येत नाही. ही बाब योग्य नाही. हा नगरसेवकाचा अपमान आहे.

मा.महापौर : सहा.संचालक नगररचना यांनी खुलासा करावा.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल : स.नगरसेवक श्री. देशमुख यांनी सात दिवसापूर्वी प्रश्न विचारला आहे. नियमाप्रमाणे विचारलेल्या प्रश्नाबाबत सभासदांना प्रश्नाचे उत्तर देणे आवश्यक आहे. तेव्हा नियमाप्रमाणे विचारलेल्या प्रश्नास उत्तर का देता आले नाही. याचा खुलासा आधी करावा.

मा.महापौर : स.नगरसेवकांनी प्रश्न विचारल्यानंतर संबंधित विभागाकडे जाणे आवश्यक असते. त्याबाबतची माहिती संबंधित विभागाने तयार करुन मा.आयुक्तामार्फत सचिवाकडे द्यावयाची असते. याबाबत पध्दत समजण्यात थोडा घोळ झाला आहे. तोंडी माहिती देता येईल पण लेखी स्वरुपात का आली नाही. हे पाहण्यात येत आहे.

श्री. मिरा सलामी : सभासदांनी नियमाच्या आत विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे सात दिवसाच्या आत द्यावी लागतात ही बाब अधिकारी व नगरसचिवांना माहित आहे. पण त्याबाबत टाळाटाळ केली जाते. तेव्हा नगरसेवकांनी विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे देण्याबाबत संबंधितांना आदेश द्यावेत.

मा.महापौर : मा.आयुक्त यावर खुलासा करतील.

मा.आयुक्त :सभागृहामध्ये जनहिताच्या सर्व प्रश्नाची तड लागावी आणि लोकप्रतिनिधी निर्माण केलेल्या सर्व प्रश्नांना उत्तरे मिळावीत म्हणून लोकप्रतिनिधींना प्रश्न विचारण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. स.सभासद आयुक्तांना भेटून त्यांच्या वॉर्डातील कामासंबंधाने जनतेच्या अडचणी संदर्भात जी पत्र का देत असतात. त्यावर देण्यात येणारी उत्तरे आणि लोकप्रतिनिधींना सभागृहात विचारावयाचे प्रश्न त्यावर करावयाची कार्यवाही आणि त्याची उत्तर यात गलत निर्माण झालेला आहे. स.सभासदांना जो प्रश्न सभागृहात विचारावयाचा आहे तो प्रश्न नगरसचिवाकडे द्यावयाचा असतो. तो प्रश्न सभागृहात उपस्थित करण्यास परवानगी द्यावयाची किंवा नाही यावर मा.महापौर निर्णय घेतात व तसे आदेश नगरसचिवांना दिल्यानंतर नगरसचिव त्याबाबतची माहिती प्रशासकाला देतात. प्रशासनाकडून तयार झालेली उत्तरे सचिवामार्फत स.नगरसेवकांना पुरविली जातात. दिलेले उत्तरांना स.सभासदांचे समाधान होत नसेल तर त्यावर सभासदांना सभागृहात चर्चा करता येते. स.सभासद श्री. देशमुख यांनी कलम ५ नुसार ११ तारखेला पत्र दिले आहे. त्यावर मा.महापौरांनी प्रश्न अनुज्ञेय आहे. असा शेरा मारल्यानंतर सचिवानी ते पत्र १६ तारखेला प्रशासनाकडे पाठविलेले आहे. चे पत्र अद्याप आमच्याकडे आले नाही त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर आम्ही देवू शकलो नाही.

श्री. विखारोद्दीन : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे मा.आयुक्तांकडे दिलेल्या प्रश्नाची उत्तरे सभागृहात मिळतात परंतु नगरसचिव यांचेकडे दिलेल्या पत्रकाची उत्तरे मिळत नाहीत. दि.८ ला नगरसचिव यांना पत्र दिले पण अद्याप उत्तर मिळाले नाही. त्याबाबत चौकशी केली असता संबंधिताकडे पाठविण्यात आले आहे. असे उत्तर सचिवांकडून मिळाले.

मा. महापौर : स. सभासदाचे दि. ८ चे पत्र ९-१० ला मिळाले आहे. त्याबाबतचा खुलासा नगरसचिव यांनी आजच स. सभादांना देण्याची व्यवस्था करावी.

श्री. नरेंद्र पाटील : यापूर्वीच्या लोकप्रतिनिधीच्या काळातही प्रश्नोत्तरांचा तास सभागृहात घेण्यात येत होता. स.सभासदांनी नियमाप्रमाणे विचारलेल्या प्रश्नांची नगरसचिव यांना सभासदांना खुलासा केल्यावर तो सभागृहात वाचून दाखवायचा असतो. त्यावर काही उपप्रश्न निर्माण झाले तर त्यांची चर्चा सभागृहात होत असते. प्रश्नोत्तराचा तास सुरु करण्याबाबत मागील सभेच्या वेळी चर्चा झाली. सभागृहातील अनेक सभासद नव्याने निवडून आले आहेत. तेव्हा प्रश्नोत्तराच्या तासाबाबतची सविस्तर माहिती नगरसचिवांनी सभासदांना का दिली नाही.

श्री. अब्दुल रशिद खान मामू : विधानसभेच्या कामाच्या पध्दतीबाबत सभागृहात खुलासा झाला. विधानसभा ३/३ दिवस चालते. सभागृहात सभासदांच्या प्रश्नाबाबत चर्चा झाल्यानंतर विषय पत्रिकेवरील विषय एका पाठोपाठ एक याप्रमाणे मंजूर केले जातात अशा वेळी एखाद्या सभासदास प्रस्तावाबाबत चर्चा करता येत नाही. तेव्हा प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होवून प्रस्ताव मंजूर केले जावेत.

मा.महापौर : सभागृहाकडून सभेतील कामकाजाबाबत अशा प्रकारे योग्य सहकार्य मिळत असेल तर त्याबाबत जरुर विचार करता येईल.

श्री. जावेद रज्जाक : सभागृहाचा कामकाजाबाबत बरीच चर्चा झाली. यामागे काही दिवसापुर्वी नगरसचिव यांच्याकडे अशा प्रकारचा प्रश्न दिला आहे. त्याबाबत खुलासा झाला नाही. सर्वसाधारण सभेचे कामकाज दोन दिवस चालू शकते. ऐनवेळी प्रस्तावावर अभ्यास करता येत नाही. आणि अशा प्रस्तावांना सभागृहात मंजूरी दिली जाते हे योग्य नाही.

मा.महापौर : स.सभासदांनी सर्वसाधारण सभेसाठी नगरसचिवाकडे दिलेल्या प्रश्नाबाबत मला प्रशासनाकडून त्याबाबत आर्थिक तरतूद वाचनालयासारख्या प्रश्नात आवश्यक असलेली जागा, अशी आवश्यक माहिती द्यावी लागते. अन्यथा प्रस्ताव मंजूर करुन नंतर आर्थिक तरतुद आवश्यक जागा उपलब्ध नसल्यामुळे प्रस्ताव पडून राहतात. म्हणून या पध्दतीत थोडा वरीलप्रमाणे बदल केला आहे. त्या पध्दतीमुळे स.सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना वेळेवर उत्तरे मिळू शकली नाहीत. याची मला जाणीव आहे.

श्रीमती आबेदा बेगम : मनपा सेवभरती नियमाबाबत स.नगरसेविका श्रीमती आबेदा बेगम यांच्यासह नगरसचिवांकडे प्रश्न सात दिवसापूर्वी दिलेला आहे. परंतु अद्यापपर्यंत उत्तरे मिळालेले नाही.

मा.महापौर : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे यापुढे होणाऱ्या सभेत सभासदांना विचारलेल्या प्रश्नाबाबतची उत्तरे मिळतील अशी व्यवस्था केली जाईल याची नगरसेवांनी कृपया नोंद घ्यावी.

श्रीमती जाहेदा बेगम : मनपा सेवाभरती बाबत विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मा.आयुक्त यांना द्यावे उत्तर द्या.

श्री. मुजीब आलमशा खाँ : प्रश्नोत्तराबाबत मा.आयुक्त यांनी सभागृहास खुला केला आहे की, नगरसचिव यांचेकडे स.सभासद श्री. फजलउल्लाखान, श्रीमती साजेदा बेगम, श्रीमती आबेदा बेगम यांनी नियमाप्रमाणे सात दिवसाच्या आधी प्रश्न दिले आहेत पण ह्या प्रश्नांना अद्यापर्यंत उत्तर मिळालेल नाही. शहरात

१५०० विद्युत पोल लावण्यात आले त्यावर दोन लाईन ओढल्या आहेत. तिसरी लाईन केव्हा ओढली जाईल. विद्युत विभागातील कर्मचारी काम करीत नाही. त्यांच्या बदल्या करण्यात याव्यात. सर्व बाबींत सभागृहात खुलासा करावा.

मा.महापौर : सभासदांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत आवश्यक कार्यपध्दतीचा खुलासा सभागृहात करण्यात आला आहे. स.सभासदांचे प्रश्न योग्य असतील पण त्याबाबतची माहिती घेण्याबाबत स्पष्ट आदेश दिले आहेत विद्युत विभागाचे काम संथगतीने का चालू आहे याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : एकुण १५०० विद्युत पोलची तरतुद होती. त्यापैकी १४३६ पोल उभे करण्यात आले आहेत. मनपातर्फे उभरण्यात आलेल्या पोलची म.रा.वि.मंडळाकडून आवश्यक तो सर्वे झालेला आहे. त्याबाबतची रु.सात लाखाची रक्कम म.रा.वि.मंडळाकडे भरण्यात आली आहे. यात १३२० पोलचा सर्वे पूर्ण झाला आहे. सव पूर्ण झालेल्या पोलपैकी ८०३ पोलवर पिक्चर बसविण्याचे काम झाले आहे. उर्वरित पेलवर फिक्चर बसविण्याचे काम येत्या ४/५ दिवसात पूर्ण करुन एक महिन्याच्या कालावधीत सर्व पोलवर फिक्चर लावले जतील. म.रा.वि.मंडळच्या सर्वे नंतरही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या इलेक्ट्रिक निरिक्षाकडून याबाबतचा सर्व्हे करणे आवश्यक असते.

श्री. मुजीब आलमशा खाँ वि.पक्षनेता : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे ८०३ पोल कोणत्या भागात बसविण्यात आले याचा खुलासा संबंधिताने करावा. विद्युत पोलबाबत सर्व सभासदांच्या तक्रारी आहेत. लेखीपत्र पण आहेत. मग हे पोल कोणत्या भागात लावले.

मा.महापौर : स.सभासदांना विचारलेल्या प्रश्न आणि विरोधी पक्ष नेता यांनी केली सूचना याप्रमाणे प्रभाग निहाय किती विद्युत पोल बसविण्यात आले. याची सविस्तर माहिती देण्याची संबंधित विभागास सुचना देण्यात येते.

श्री. स.अली : अधिकारी सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. सभागृहात दिलेली माहिती चुक आहे. वॉर्ड क्र.४६ मधील ९० टक्के लाईट बंद आहेत. गणेशोत्सवाचे काळात शहरात अंधार राहणार नाही. असे जाहीर करण्यात आले होते. सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे कोणत्याही पोलवर फिक्चर लावण्यात आले नाहीत. तर विद्युत विभागातील साहीत्य कोणत्या ठिकाणी लावण्यात येते याची चौकशी झाली पाहिजे. प्रत्येकवेळी चोक नाही, सोडियम नाही, साहित्य नाही असे सांगितले जाते मग खरेदी करण्यात आलेले साहित्य कुठे जाते.

मा.महापौर : गणोशोत्सवाचे काळात नियंत्रण कक्ष उघडण्यात आले होते. त्यात ज्यांच्या तक्रारी आल्या त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. नवरात्रोत्सवातही अशाच प्रकारचे नियंत्रण कक्ष चालू ठेवण्यात आले आहे. तरी वॉर्डातील दिवे लावण्यात आले नसल्याची तक्रार सभासदांकडून होत आहे. या बाबींचा विचार करता अति.शहर अभियंता यांनी १५ दिवसाच्या आत लाईट बाबत असलेल्या तक्रारीची माहिती घेवून सर्व ठिकाणी लाईट लागतील अशी व्यवस्था करावी. विद्युत विभागातील तक्रारीबाबत आवश्यकता असेल तर स्वतंत्र सभा घेण्यात येईल.

श्री. नरेंद्र पाटील : १९९० साली सभागृहात महत्वाची सूचना मांडली होती. त्या सुचनेप्रमाणे कार्यवाही झाल्यामुळे त्यावेळी विद्युत बाबतच्या तक्रारी दूर झाल्या होत्या. त्याचप्रमाणे ८२ नगरसेवकांच्या वॉर्डाच्याकरिता स्वतंत्र (प्रत्येकी) विद्युत तक्रार रजिष्टर ठेवण्यात यावे या रजिष्टरमध्ये किती पोल आहेत त्यावरील किती लाईट बंद आहेत, किती लाईट जोडले आहेत. त्याबाबतची माहिती ठेवण्यात यावी. व त्यावर संबंधित नगरसेविकांची सही घेण्यात यावी. अशा प्रकारे एका कार्यालयात व एक रजिष्टर नगरसेवकाकडे ठेवण्यात यावे.

मा.महापौर : स.सभासदांनी सूचना मान्य करण्यात येते. प्रशासनाने याची दखल घ्यावी. विद्युत विभागाची तक्रार व ऐनवेळचे प्रश्न यावर ३०.१०.९६ ला विशेष सभा घेण्यात येईल.

श्री. संजय : सभागृहात ऐनवेळचे विषय म्हणून जी विषयपत्रिका मिळाली २०.९.९६ च्या सभेचे इतिवृत्त या सोबत दिले आहे. यात मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडील दि.२.७.९६ च्या पत्रकाचा उल्लेख आहे. तर मा.जिल्हाधिकारी यांचेकडील पत्र माहे जुलै ९६ चे होत आहे तर माहे ऑगस्ट ९६ च्या सर्वसाधारण सभेत हा विषय का ठेवण्यात आला नाही याचा अर्थ महत्वाचे पत्र तन तीन महिने प्रलंबित ठेवून त्याची तातडी दाखविली जाते आणि ते वेळेवर असे महत्तवाचे विषय घाईत मंजूर घेतले जातात. ही पध्दत चुकीची आहे. इतिवृत्त आता का दिले याचा खुलासा घ्यावा.

मा.महापौर : सभागृहाची सूचना मान्य करण्यात येते. सदर प्रस्ताव पुढील मिटींगमध्ये घेण्यात येईल. यानंतर स.सभासदांनी विचारलेले प्रश्न योग्य असतील तर त्याबाबत खुलासा केला जाईल. विषय क्र.२ चर्चेला घेण्यात येत आहे.

**विषय क्र. १२०/२ :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, खाम नदीजवळ अलहिलाल कॉलनी येथे खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.५,८६,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदर कामाचा खर्च सन १९९६-९७ च्या भांडवली रस्ते ह्या लेखा शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.५,८६,५००/- चे अंदाजपत्रकास मंजूरी बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खाम नदीजवळ अल हिलाल कॉलनी येथे खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.५,८६,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२९/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, कलेक्टर ऑफिस ते मजनूहिल पर्यंतच्या रोडचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.२४,३०,७००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील

कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती (पुनडांबरीकरण) सन १९९६-९७ या लेखा शिर्षकांर्गत उपलब्ध तुरतुदीमधून करण्यात येईल. त्या ठिकाणी यापुर्वी सहा वर्षापूर्वी काम केले होते. आता काम करणे आवश्यक आहे. रस्ता बराच खराब झाला आहे. पुन्हा नव्याने एकवेळ मजबुतीकरण करणे आवश्यक आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु.२४,३०,७००/- चे मंजूरी बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कलेक्टर ऑफिस ते मजनुहिल पर्यंतच्या रोडचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२४,३०,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२२/४ :** अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, महावीर चौक ते रेल्वे स्टेशन या १०० फूट रस्त्याचे रुंदीकरण करणे व पुलाचे रुंदीकरणाचे काम सन ९५-९६ चे सा.बां. खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.११,२५,०५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांची मंजूरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च "भांडवली रस्ते" या लेखा शिर्षकामधून सन ९६-९७ साठी असलेल्या तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.११,२५,०५०/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. अब्दुल रशिद खाँ : प्रस्तावित रस्ता विकास आराखड्याप्रमाणे १०० फूटाचा आहे की ११५ फूटाचा आहे याबाबत खुलासा व्हावा. तसेच या कामासाठी आर्थिक तरतूद ओ काय? पदमपुरा भागातील मंदिरा मस्जीदच्या इमारती या रस्त्यात बाधीत होणार नाहीत याचा विचार कावा बांधकाम परवानगी बाबत दाखल झालेल्या प्रकरणात मात्र ११५ फूटाचा नियोजित रस्ता ग्राह्य धरुन बांधकाम परवानगी दिली जाते. हा काय प्रकार आहे?

अतिरिक्त शहर अभियंता : नियोजित १०० फूट रस्त्याबाबत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. भविष्यात रस्त्यांची रुंदी वाढल्यास त्याप्रमाणे पुन्हा रस्ता रुंदीकरण करता येईल्.

श्री. प्रदिप कुमार जैस्वाल : स.सभासद नियोजन समितीचे सदस्य आहेत. सुधारीत विकास आराखड्यानुसार प्रस्तावित रस्ता ११५ फूट रुंदीचा आहे. या आराखड्यास मंजूरी मिळाल्यानंतर सदर रस्ता ११५ फूटाचा वरचा येईल. सध्या मूळ आराखड्यानुसार १०० फूट रुंदीकरणाचा प्रस्ताव मंजूरीस्तव ठेवण्यात आला आहे. त्यास सभागृहाने मंजूरी द्यावी.

श्री. मो.मुश्ताक अहेमद : बांधकाम परवानगीचे प्रकरण दाखल झाल्यानंतर ११५ फूट रुंदीचा रस्ता आहे. असे गृहीत धरुन बांधकाम परवानगी दिली जाते. तर सभागृहासमोर १०० फूट रुंदी करण्याचा प्रस्ताव कसा ठेवण्यात आला. त्यासाठी कोणता नियम उपयोगात आणला जातो. जर मुळ

आराखड्यानुसार रस्ता विकसीत केला जात आहे तर बांधकाम परवानगी देताना ११५ फूटाचा उल्लेख येणार नाही. अशा सूचना नगररचना विभागास देण्यात याव्यात.

मा.महापौर : सुधारीत विकास आराखड्यात सदर रस्ता ११५ फूटाचा दाखविण्यात आला आहे. भविष्यात रस्ता रुंदीकरणास अडचण निर्माण होवू नये हा उद्देश समोर ठेवून सुधारीत आराखड्यानुसार ११५ फूटावर बांधकाम परवानगी दिली जात आहे. सभागृहासमोर मुळ आराखड्यानुसार प्रस्ताव ठेवला आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : मुळ विकास आराखड्यानुसार प्रस्तावित रस्ता १०० फूट आहे व त्याप्रमाणे विकसीत केला जात आहे. सुधारीत विकास आराखड्यात तो रस्ता ११५ फूट रुंद करण्याचा प्रस्ताव आहे. सहा प्रादेशिक नगररचना अधिनियमानुसार प्रस्तावास मंजूरी मिळाल्यावरच त्याची अंमलबजावणी केली जाते.

मा.महापौर : विषय क्र.४ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महावीर चौक ते रेल्वे स्टेशन या १०० फूट रस्त्याचे रुंदीकरण करणे व पुलाचे रुंदीकरणाच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.११,२५,०५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२३/५ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.चिकलठाणा (गाव) येथे खांडकी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता रक्कम रु.६,७०,६००/- चे अंदाजपत्रक सा.बां.विभाग औरंगाबादची दरसूची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आले असून मा.आयुक्त यांनी दि.१९.९.९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

करिता प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा (गाव) येथे खांडकी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.६,७०,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२४/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.घाटी जयभिम नगर येथील जुनी खांडकी दुरुस्त करणे व नविन खांडकी बसविणेच्या कामाकरिता सा.बां.खात्याच्या वर्ष ९५-९६ च्या दरसूचीनुसार रक्कम रु.६,१४,२५३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम खुल्या गटारी बांधणे या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.८.८.९६ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु.६,१४,२५३/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.घाटी जयभिम नगर येथील जुनी खांडकी दुरूस्त करणे व नविन खांडकी बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.६,१४,२५३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२५/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.घाटी जयभिमनगर स्लम येथे ३०० एमएस व्यासाची अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरिता सा.बां.खात्याच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.६,३७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम खुली गटार बांधणे या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.८.८.९६ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु.६,३७,०००/- ला मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीसतव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.घाटी जयभिमनगर स्लम येथे ३०० मीमी व्यासाच अर्धगोलाकर गटार बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.६,३७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२६/८ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.गौतमनगर स्लम येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबतच्या कामाकरिता सा.बां.खात्याच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.७,१२,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम डांबरी रस्ते या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.८.८.९६ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यात आलेले रक्कम रु.७,१२,४००/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.गौतमनगर स्लम येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.७,१२,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२७/९ :** पाणीपुरवठा विभाग क्र.२ (सिडको) मनपा झोन क्र.५ आणि झोन क्र.७ अंतर्गत येणाऱ्या जलवाहिण्याच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी मेकॅनिकल जॉईन्ट व जाकी जॉईन्ट बेन्ड पाईप खरेदी करण्यासाठी रक्कम रु.५,७४,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील कामावर होणारा खर्च देखभाल व दुरुस्तीच्या लेखा शिर्षकातील तरतूदीमधून करण्यात येणार आहे.

अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी मिळालेली आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.५,७४,३००/- चे अंदाजपत्रकास मंजूरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणीपुरवठा विषय क्र.२ (सिडको) मनपा झोन क्र.५ आणि झोन क्र.७ अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्यांच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी मेकॅनिकल जॉईन्ट जाकी जॉईन्ट बेन्ड पाईप खरेदी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.५,७४,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२८/१० :** मा.कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एस.एफ.आर.सी. गोलाकार रिंग व ढापे व चौकोनी ढापे खरेदी करण्यासाठी रक्कम रु.३१,७५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यांचे दर हे डि फॉर्म नुसार मागविण्यात येतील.

शहरात विविध ठिकाणी नविन जलनिःसारण वाहिनी टाकणे तसेच देखभाल दुरुस्ती नाल्यावर चौकोनी ढापे टाकणे इत्यादीचे अंदाजपत्रक मंजूर आहेत. त्या अंदाजपत्रकात यचा समावेश आहे. या सर्व कमाकरिता एकत्रीत खरेदी करणेची आहे.

तरी एकत्रित अंदाजपत्रकीय रक्कम रु.३१,७५,०००/- यास मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.नरेंद्र पाटील : प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे चौकोनी व गोल ढापे किती खरेदी करण्यात येणार आहेत. एका वर्षासाठी प्रस्तावात दर्शविलेल्या किंमतीचे ढापे खरेदी करणे आवश्यक आहे काय? याचा विचार करुन आवश्यक तेवढेच ढापे खरेदी करण्यात यावेत. मनपाने टाकलेल्या ढाप्यापैकी किती ढापे चोरी जातात. किती काम चालू आहेत याची माहिती संबंधित विभागाने द्यावी. या सर्व बाबींची माहिती उपलब्ध होईपर्यंत सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

कार्यकारी अभियंता : मनपा कार्यालयाने जलनिःसरणाच्या कामासाठी आतापर्यंत २२ लाख रुपयांचे ढापे खरेदी केले आहेत. सदर ढापे आतापर्यंत उपयोगात आणण्यात आले आहेत. शहरात विविध जलनिःसरणाची कामे मंजूरीनुसार चालू आहेत. या कामाच्य अनुषंगाने काही चौकोन व काही गोल ढापे खरेदीचे अंदाजपत्रक तयार करण्या आले आहे. यातून ३००० गोल व २००० चौकोनी ढापे खरेदी करण्यात येईल. चोरीस गेलेल्या ढाप्यांची माहिती तूर्त उपलब्ध नाही.

श्री. मुश्ताक अहेमद : महत्वाच्या विषयावर चर्चा होत आहे. एक ढापा साधारण ८०० ते ९०० रुपयापर्यंत पडतो. याऐवजी मनपाने स्वतः ढापे तयार करण्याची योजना सुरु केली तर हेच ढापे कमी किमतीत उपलब्ध होवून मनपाचा आर्थिक फायदा होईल.

मा.महापौर : स.सभासदांची सूचना चांगली आहे. पण त्यासाठी लागणारी मशिनरी आणि कंपनी याचा विचार करता नियमाप्रमाणे मनपाला तशी योजना राबविता येणार नाही. स्पर्धात्मक पध्दतीने ढापे खरेदी करता येतील.

डॉ.भागवत कराड : खरेदी केलेले ढापे कोठे वापरले जाणार त्याचे लाईफ किती याची माहिती घेऊनच ढापे खरेदी करावेत.

श्री. गिरजाराम हाळनोर : प्रस्तावित प्रस्तावानुसार मनपा प्रशासनाने यापूर्वी ज्या कंपनीकडून ढापे खरेदी केले आहेत. त्याच कंपनीकडून ढापे खरेदी केल्यास मनपाचा आर्थिक फायदा होईल.

श्री. प्रदिप कुमार जैस्वाल : नियमाप्रमाणे तशी करता येणार नाही. निविदा मागवाव्या लागतील.

मा.महापौर : विषय क्र.१० मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एस.एफ.आर.सी. गोलाकार रिंग व ढापे व चौकोनी ढापे खरेदी करण्याकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३१,७५,०००/- च्या एकत्रीत अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२९/११ :**

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या १९९६-९७ च्या अंदाजपत्रकात झोपडपट्ट्यामध्ये एकुण १० अभ्यासिका सुरु करण्यासाठी प्रति अभ्यासिका रु. १ लक्ष याप्रमाणे रु.१० लक्षची तरतुद केलेली आहे. या अभ्यासिकामध्ये इ.५वी ते पदवी (कला,वाणिज्य,विज्ञान) पर्यंतची क्रमिक पुस्तके सामान्य ज्ञानाची पुस्तके, स्पर्धात्मक परिक्षेसाठी त्रैमासिके, मासिके, ग्रंथ, साप्ताहिके व वृत्तपत्रे ठेवण्यात येतील. आवश्यक फर्निचर त्या ठिकाणी पुरविण्यात येईल. वरती शेजारील शाळेतील एक शिक्षका शिक्षिकेस द.म.रु.३००/- मानधनावर अभ्यासिका प्रमुख म्हणून नियुक्ती देण्यात येईल. अभ्यासिका दु.२ ते सायं.९ पर्यंत खुली राहील. ग्रंथ मासिके वृत्तपत्रे बरी घरी नेण्यास परवानगी राहणार नाही. ज्या घोषित झोपडपट्ट्यामध्ये महानगरपालिकेचे समाजमंदिर, बालवाऊीची इमारत आहे तेथे प्राधान्याने अभ्यासिका कार्यान्वित करण्यात यावी.

ह्या अभ्यासिका कोणत्या वसाहतीमध्ये सुरु कराव्यात याबाबत निर्णय सर्वसाधारण सभेने घेण्यास्तव प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोपडपट्ट्यामध्ये दहा अभ्यासिका सुरु करण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. या अभ्यासिका सुरु करतांना वॉर्ड क्र.५८ मधील समतानगर वॉर्ड क्र.८१ मधील कामगार कॉलनी, वॉर्ड क्र.४८ आणि वॉर्ड क्र.५४ या भागात अभ्यासिका उघडण्यास प्रथम प्राधान्य देण्यात यावे. असे सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन गण मन" ह्या राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| नगरसचिव | मा.महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि.३०.१०.९६ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत.**

**बुधवार दिनांक ३० ऑक्टो.१९९६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.महापौर श्री.गजानन बारवाल यांच्या अध्यक्षतेखाली कै.केशव सिताराम ठाकरे सभागृहात औरंगाबाद महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेस ''वंदे मातरम्'' ह्या गीताने सुरुवात झाली.**

**ह्या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील स.सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स.स. श्री.विजयकुमार गजानन मेहेर | उप महापौर |
| २. | --''-- श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर | स.सभासद |
| ३. | --''-- श्री.जयवंत केशवराव ओक | --''-- |
| ४. | --''-- श्री.प्रभाकर सिताराम विधाते | --''-- |
| ५. | --''-- श्री.म.सलिम म.हनिफ कुरैशी | --''-- |
| ६. | --''-- श्री.गौतम भागाजी खरात | --''-- |
| ७. | --''-- सौ.रजनी रमेश जोशी | --''-- |
| ८. | --''-- सौ.उषाबाई दिलीप गायकवाड | --''-- |
| ९. | --''-- सौ.विमलाबाई नंदकुमार मुंडलिक | --''-- |
| १०. | --''-- सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे | --''-- |
| ११. | --''-- श्री.गौतम लिंबाजी लांडगे | --''-- |
| १२. | --''-- श्री.महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --''-- |
| १३. | --''-- श्री.अभिमन्यु रामभाऊ भालेराव | --''-- |
| १४. | --''-- श्री.नरेंद्र यादवराव पाटील | --''-- |
| १५. | --''-- श्री.काशिनाथ हरिभाऊ कोकाटे | --''-- |
| १६. | --''-- श्री.सुदाम रामदास सोनवणे | --''-- |
| १७. | --''-- श्री.कंवरसिंग किसनसिंग बैनाडे | --''-- |
| १८. | --''-- सौ.पद्मा बाबुराव शिंदे | --''-- |
| १९. | --''-- श्री.सुभाष भिकाजी टाकळकर | --''-- |
| २०. | --''-- श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --''-- |
| २१. | --''-- सौ.धनश्री अशोक विसपुते | --''-- |
| २२. | --''-- श्री.फजलउल्लाखाँन अजमद उल्लाखान | --''-- |
| २३. | --''-- श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | --''-- |
| २४. | --''-- श्री.महंमद मुश्ताक अहेमद | --''-- |
| २५. | --''-- सौ.नुरजहाँ बेगम अ.रहेमान खान | --''-- |
| २६. | --''-- श्री.वसंत विनायकराव देशमुख | --''-- |
| २७. | --''-- श्री.हाजी मोहसिन अहेमद हाजी बशिर | --''-- |
| २८. | --''-- सौ.स.मोसिना बिहकीस विखारोद्दीन | --''-- |
| २९. | --''-- श्री.अ.जावेद रज्जाक | --''-- |
| ३०. | --''-- श्रीमती स.जाहेदा बेगम म.जमीर | --''-- |
| ३१. | --''-- श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे | --''-- |
| ३२. | --''-- श्री.किशोर बाबुलाल तुळशिबागवाले | --''-- |

३३.--''-- श्री.स.हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन --''--
३४.--''-- श्री.स.म.अ.रऊफ म.अ.माबुद --''--
३५.--''-- श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबउद्दीन --''--
३६.--''-- श्री.रमेश दिपचंद लाहोट --''--
३७.--''-- श्री.संजय किसनराव केनेकर --''--
३८.--''-- श्री.फैय्याज अहेमद म.हाजी कुरैशी --''--
३९.--''-- सौ.मुक्ताबाई सुदाम वाघमारे --''--
४०.--''-- सौ.लता श्रिनिवास दलाल --''--
४१.--''-- सौ.अल्का रमेश पाटील --''--
४२.--''-- सौ.शकुंतला हरिदास धांडे --''--
४३.--''-- श्री.अब्दुल रशिदखान मामू --''--
४४.--''-- कु.माया लिंबाजी लाडवाणी --''--
४५.--''-- डॉ.भागवत किशनराव कराड --''--
४६.--''-- सौ.सविता संजय आव्हाड --''--
४७.--''-- सौ.निर्मला विठ्ठल कांबळे --''--
४८.--''-- श्री.अ.रशिद अ.सत्तार --''--
४९.--''-- श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन --''--
५०.--''-- श्री.विकास रतनलाल जैन --''--
५१.--''-- श्री.गंगाधर सुखदेव गाडे --''--
५२.--''-- श्री.मनमोहनसिंग करमसिंग ओबेराय --''--
५३.--''-- श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे --''--
५४.--''-- श्री.संजय रामदास जोशी --''--
५५.--''-- श्री.अविनाश लक्ष्मण कुमावत --''--
५६.--''-- सौ.ज्योत्स्ना दौलतराव हिवराळे --''--
५७.--''-- श्री.राजकुमार उर्फ सांडू बचाटे --''--
५८.--''-- सौ.राधाबाई तळेकर --''--
५९.--''-- श्री.नरसिंग मुरलीधर ढगे --''--
६०.--''-- श्री.विठ्ठल किसन यादव --''--
६१.--''-- सौ.मंदा धनंजय काळुसे --''--
६२.--''-- सौ.सुनंदा उत्तम कोल्हे --''--
६३.--''-- श्री.बन्सी तुळशिराम गांगवे --''--
६४.--''-- श्री.भागवत देविदास घडामोडे --''--
६५.--''-- श्री.कचरु चंद्रभान नवपुते --''—
६६.--''-- सौ.रुखमनबाई खंडेराव लोंखडे --''—

**संवाद :**

मा.महापौर : सभागृहाच्या विनंतीवरुन विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. एक विशेष सूचना म्हणजे विद्युत विभागची संपूर्ण माहिती देण्यासाठी थोडा वेळ लागणार आहे. त्यासाठी विद्युत विभागाच्या प्रश्नावर नंतर चर्चा करण्यात येईल. तसे सहकार्य सभागृहाने करावे अशी नम्र विनंती आहे.

श्री. गौतम खरात : स्लम भागातील नागरिकांना नागरी सुविधा गतीने मिळाव्यात यासाठी शहरातील स्लमची संख्या लक्षात घेत स्लम विभागाकरिता स्वतंत्र कार्यकारी अभियंता असे पद निर्माण करावे अशा आशयाचा एक प्रस्ताव मागील सभेच्या पूर्वी नगर सचिवाकडे देण्यात आला आहे. तो प्रस्ताव अद्याप सभागृहापुढे का ठेवण्यात आला नाही याचा खुलासा व्हावा, या प्रस्तावाबरोबरच २५ वर्षापूर्वी आमखास येथे उभारलेल्या हॉस्पिलटल जवळ कमी प्रमाणात वस्ती होती. शहरात मोठ्या प्रमाणात वाढत असल्यामुळे या टी.बी.दवाखान्याच्या आसपास वसाहत व रहदारी मोठ्या प्रमाणावर वस्ती वाढत असल्यामुळे या टी.बी. दवाखान्याच्या आसपास वसाहत व रहदारी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. अशा नागरी वसाहतीजवळ असलेल्या संसर्गजन्य टीबीचा दवाखाना त्या ठिकाणाहून हलविण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता.

थोर स्वतंत्र सेनानी तसेच आदिवसी समाजाच्या कार्यकर्त्या आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पक्षनेत्या श्रीमती गोंदूताई परुळीकर आणि थोर साहित्यिक श्री.विद्याधर गोखले यांचे दुःखद निधानाबाबत सभागृहाने ००.०२ मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.

सुचक : स. नगरसेवक श्री. व्ही.व्ही.देशमुख

मा.महापौर : सभासदांकडून मांडण्यात येणाऱ्या महत्वाच्या विषयावर संबंधित विभागाकडून अवश्यक माहिती देण्यात येत आहे. ती माहिती प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करता येईल.

श्री. प्रकाश निकाळजे, श्री. गंगाधर गाडे : शहरतील स्लम भागास नागरी सुविधा देण्याबाबत जाणीवपूर्वक दूर्लक्ष केले जात आहे. शासनाच्या नियमाप्रमाणे अर्थ संकल्पातील करण्यात आलेली तरतुद स्लम भागासाठी खर्ची केली जात नाही. मागील अर्थसंकल्पात तरतुद तशी पडून आहे. त्याबाबत संबंधित विभागाकडे विचारणा केली असता कर्मचारी वर्ग अपुरा असल्याची माहिती दिली जाते.

श्री. गिरजाराम हाळनोर : स.सभासदांच्या सूचना योग्य आहेत. स्लम विभागाच्या विकासाठी शासनाने अनेक योजना केल्या आहेत. ह्या सर्व बाबींचा विचार करता शासकीय योजनेवर स्लम भागात आवश्यक रक्कम खर्च होण्यासाठी स्वतंत्र कार्यकारी अभियंता हे पद आवश्यक त्या कर्मचारी वर्गासह निर्माण करणे जरुरीचे आहे. याचबरोबर विद्युत विभागाचे कार्य व्यवस्थित होण्यासाठी या विभागाकरिता ही स्वतंत्र कार्यक्‍ारी अभियंता हे पद निर्माण करणे जरुरी आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : स्लम भागातील कामाची अंदाजपत्रके दिली नाहीत म्हणून म्हाडाकडून आवश्यक तो निधी उपलब्ध झाला नाही यातून महानगरपालिकेचे शहाऐंशी लाखाचे नुकसान होणार होते. स्लम विभागाबरोबरच लाईट विभागातील कामांचीही हीच परिस्थिती आहे. ह्या दोन्ही विभागाकरिता स्वतंत्र कार्यकारी अभियंता यांची पदे निर्माण करणे आवश्यक आहे.

मा.महापौर : मा.आयुक्त याबाबत खुलासा करतील.

मा.आयुक्त : स्लम बाबत कोणत्याही प्रकारचे दुर्लक्ष होणार नाही. याची ग्वाही देतो. स्लम विकासाबाबत जो निधी महापालिकेला प्राप्त झाला आहे. त्याचा एक समयब्ध

आराखडा तयार करण्यात आला आहे. शासनाच्या योजनेप्रमाणे झोपडपट्टीवासियांना घरे ही योजना आपण राबवू शकत नसलो तरी शहरातील स्लमचे अपग्रेडेशन करता येईल. त्यानुसार चालू आर्थिक वर्षात आमखास येथील स्लम भागाचे अपग्रेउेशन अंतर्गत गटार डांबरीकरण एका लाईनमध्ये भिंती बांधून देणे शौचालय अशी कामे हाती घेण्यात येणार आहेत. त्या कामासाठी स.सभासद श्री. खरात यांनी या भागातील नागरिकांची सहमती मिळवून देण्याबाबत सहकार्य करावे याच बरोबर आंबेडकर सोसायटीत सुध्दा असाच विकास करण्यात येणार आहे. यासाठी शासनाकडे एक कोटी अशी लाख रुपयांची मागणी करण्यात आली आहे. ही मागणी शासनाने मान्य केली आहे. या योजनेची कामे मार्च पर्यंत खर्च होतील अशी ग्वाही देण्यात येत आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : आजची विशेष सभा ही विद्युत विभागातील तक्रारी आणि मागील सभेत ऐनवेळी देण्यात आलेल्या प्रस्तावाबाबत आयोजित करण्यात आली आहे. असे असताना याच सभेत उपअभियंत्यांना वाहन देणे बाबतचा ऐनवेळीचा विषय वाटप कण्यात येत आहे. हा प्रश्न तातडीचा नाही. अशा ऐनवेळच्या विषयाबाबतच्या सभासदांना अभ्यास करता येत नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : पाणी लाईट ह्या नागरी सुविधा बरोबरच महापालिकेची आर्थिक बाजू वाढविणे ही महत्वाचे काम आहे. त्यासाठी अधिकाऱ्यांना वाहनाची गरज आहे. यावर विचार व्हावा.

सौ. नुरजहाँ बेगम, सौ. मोहसिना बिल्कीस, अ.रशिद खान (मामू) : स्लम भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याऐवजी ह्या भागात क्रॉकीट रस्ते तयार करण्यात यावेत. ह्या भागातील डांबरी रस्ते लवकर खराब होतात आणि पर्यायाने तक्रारी वाढतात. तेव्हा स्लम भागातील रस्त्यांच्या डांबरीकरणाची जी अंदाजपत्रके तयार झाली आहेत. त्यातुन डांबरीकरणाऐवजी क्रॉकीट रस्ते तयार करण्यात यावे. स्लममधील कामाबाबत स्वतंत्र विशेष सभा घेण्या यावी.

मा.महापौर : स.सभासदांच्या सुचनेचा जरुर विचार करण्यात येतील विषय क्र.१ चर्चेला घेण्यात येत आहे. क्रॉकीट तयार करण्यापूर्वी त्या भागातील पाणीपुरवठा जलनिःसरण लाईन या सर्व बाबींचा विचार करुन त्यावर निर्णय घ्यावा लागेल.

श्री. काशिनाथ कोकाटे : पाणी लाईट असा प्रश्नाबाबत ऐनवेळचे प्रस्ताव ठेवता येतात अशी सूचना सभापती यांनी केली आहे. सिडको भागांत मा.आयुक्त यांचे समवेत झालेल्या बैठकीच्या वेळी सिडकोतील अनेक भागात पाणीपुरवठा लाईन नाही काही लाईन पी.व्ही.सी. पाईपमध्ये आहेत ती बाब मा.आयुक्तांचे निदर्शनास आणून देण्यात आली आहे. पाणीपूरवठा विभागासाठी स्वतंत्र कार्यकारी अभियंता कार्यरत आहेत पण अद्याप या कामाची पाहणी सुध्दा झाली नाही. गेल्या सहा महिन्यापासून पाण्याची लाईन बदलण्याची मागणी करण्यात येते परंतु ह्या बाबतच्या ४२ लाखाचा प्रस्ताव अद्याप सभागृहापुढे ठेवण्यात आला नाही याला कारण काय? आणि ही सूचना मांडण्याची गरज का पडावी.

मा.महापौर : स.सभासदांचा काही तरी गैरसमज होत आहे. पैशाचा प्रश्न नाही. आपल्या सूचनेशी दखल घेण्याबाबत संबंधितांना सूचना देण्या येत आहे. याबाबत

माझ्या दालनात बैठक घेण्यात येवून त्याची माहिती स.सभासदांस दिली जाईल.

श्री. नरेंद्र पाटील : अशा बैठका ह्या शहरामध्ये पालकमंत्री/खासदार महापौर यांचेतर्फे लावण्यात येतात यात वाद नाही. परंतु अशा बैठकाना संबंधित वॉर्डाचे नगरसेवक यांना बोलावण्यात येत नाही. हा पक्षपात आहे आणि त्यामुळे हे प्रकार घडतात.

श्री. गिरजाराम हाळनोर : ज्यावेळी अशा बैठका घेण्यात आल्या आहेत त्या त्या वेळी सिडको भागातील नगरसेवकांना आमंत्रीत करण्यात आले आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : कार्यकारी अभियंता यांनी सिडको भागाच्या प्रस्तावाबाबत माहिती देण्यास काय हरकत आहे. सभागृहाने अधिकाऱ्यांना पाठीशी घालू नये जो ऐनवेळचा प्रश्न नाही.

मा.महापौर : स.सभासदांच्या भावना कळल्या आहेत कृपया सहकार्य करावे व विषय क्र. १ चर्चेला घेण्यात यावा.

श्री. प्रकाश निकाळजे : काल मा.उपआयुक्त यांची भेट घेवून दुपारी ४.०० वाजेपर्यंत कोणीही अधिकारी कार्यालयात उपस्थित नसल्याचे त्यांचे निदर्शनास आणून देण्यात आले आहे. तेव्हा प्रशासन अशी विनंती करण्यात येते की, अधिकाऱ्यांना कमीत कमी ३.०० वाजता कार्यालयात हजर राहण्याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात.

श्री. गिरजाराम हाळनोर : अधिकाऱ्यावर अशा प्रकारे आरोप करणे योग्य नाही अधिकारी वेळेवर कार्यालयात बसतात, जर काही महत्त्वाचे काम असेल तर ते विचारुन गेलेले असतात.

मा.महापौर : मा.आयुक्त याबाबत खुलासा करत आहेत.

मा.आयुक्त : काल स.सभासदांना कार्यालयात अधिकारी हजर नसल्याबाबतची तक्रार केली त्यावेळी उपआयुक्त-२ यांना महापालिकेच्या विविध विभागात पाठविले असता असे समजले की, अतिरिक्त शहर अभियंता टाऊन हॉलमध्ये आजच्या मिटींग बाबत उपअभियंता, शाखा अभियंता यांच्याशी चर्चा करत असल्याची माहिती मिळाली. शहर अभियंता हे म्हाडाच्या कार्यालयास एक कोटी एकोनसत्तरचा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी गेलेली होती. तसेच आरोग्य अधिकारी हे डेंगू आणि स्वच्छतेच्या कामात व्यग्र होते. उर्वरित अधिकारी कार्यालयात उपस्थित होते. फिरती करणाऱ्या अधिकाऱ्यांना सकाळी ८.०० ते १.०० पर्यंत वॉर्डातील नगरसेवक नागरिक यांच्या सूचना आणि काम यांची पाहणी कराणाऱ्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

सौ. दलाल : मा.आयुक्तांशी सभागृहात केलेल्या खुलाशाने समाधान झाले नाही. ह्या खुलाशात कालच्या घटनेचा खुलासा झालेले आहे. परंतु, गेल्या दोन महिन्यापासुन कामानिमित्त चौकशी केली असता साईटवर गेले आहेत. चव घेण्यास गेले आहेत अशी माहिती मिळते. फिरती काम करणाऱ्या तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या व्यतिरिक्त कार्यालयात उपलब्ध होत नाही. नगरसेवक हे जनतेचे प्रश्न घेवून कार्यालयात येतात. अशा वेळी अधिकारी किंवा कर्मचारी जागेवर उपस्थित नसतील तर कामे कशी करावीत.

नरेंद्र पाटील : गेल्या महिन्यापूर्वी ह्या जिल्ह्याचे खासदार यांनीही कार्यालयात अशीच पाहणी केल्याची माहिती वृत्तपत्रातून मिळाली त्यावेळी अधिकारी कार्यालयात

उपस्थित नव्हते. तेव्हा ३.०० ते ६.०० या वेळात अधिकारी महत्वाचे काम असले तरी कार्यालयात उपस्थित असलेच पाहिजेत.

श्री. जावेद रज्जाक : ज्या ज्या वेळी अधिकाऱ्यांकडे विचारणा करण्या आली त्या वेळी मा.सभापतीकडून बोलावणे आल्यामुळे त्यांच्या दालनात होते असा खुलासा केला जातो.

मा.महापौर : स.सभासदांनी सभागृहात असे शब्द वापरु नयेत त्यांनी त्यांचे शब्द मागे घ्यावेत.

श्री. गिरजाराम हाळनोर : मी माझे स्वतःचे नियम तयार केलेले नाहीत. अधिकाऱ्या समवेत मिटींग घ्यावयाची असेल तर त्यांना दालनात बोलावयाचे अधिकार आहेत.

मा.महापौर : महापालिकेचे सर्व विषय हे स्थायी समितीशी संबंधित असतात. त्या निमित्त सभापतींना अधिकाऱ्यांना दालनात दालनात बोलवावे लागते ही बाब सभागृहास माहित आहे. मा.सभापतीकडून अधिकाऱ्यांना दालनात बोलवावे लागते ही बाब सभागृहास माहित आहे. मा.सभापतीकडून योग्य तो खुलासाही झालेला आहे. विषय क्र. १ घेण्यात यावा.

**विषय क्र. १३०/१ :**

३० व्या आखिल भारतीय महपौर परिषद दिनांक १९ व २० ऑगस्ट १९९६ रोजी त्रिंवेद्रम येथे संपन्न झाली. या परिषदमध्ये परिषदचा ठराव क्र.१४ अन्वये ठरविण्यात आले आहे की, सन १९९६-९७ या वर्षात औरंगाबाद महापालिकेने अखिल भारतीय आंतर महानगरपालिका क्रिकेट स्पर्धा आयोजित करावी.

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे माहे डिसे.९६ मध्ये या क्रिडा स्पर्धा आयोजित करणे योग्य होईल. भारतातील विविध महानगरपालिकेंचे अधिकारी कर्मचारी या निमित्ताने वार्तालाप होवून एकमेकांच्या कार्यालयीन कामांची देखिल देवान होईल, शिवाय संपूर्ण भारतातील कर्मचारी एकत्र येवून औरंगाबाद शहरातील जनतेला भारतीय संस्कृतीची प्रचीती दिसून येईल.

या क्रिकेट स्पर्धेसाठी सुमारे ७ लाख खर्च अपेक्षित आहे. तरी सर्वसाधारण सभेने पार पाडण्यसाठी होणाऱ्या संभाव्य खर्चास म्हणजेच रु.७.०० लक्षासाठी मंजुरी व्हावी. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.महापौर : देशातील महानगरपालिका कर्मचाऱ्यांची ओळख व्हावी. समन्वय व्हावा असा विचार समोर ठेवून क्रिकेट स्पर्धा घेण्यात येतील असे विचार त्रिवेंद्रम येथील महापौर परिषदेत मांडला होता. त्यानुसार या स्पर्धा शहरात आयोजित करण्यात येणार आहे. त्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे.

श्री. नरेंद्र पाटील : औरंगाबाद शहराचे नाव देशाच नकाशावर या स्पर्धेमुळे येणार ही चांगली बाब आहे. परंतु या स्पर्धासाठी २० लाखाच्या तरतुदीतुन सात लक्ष खर्च करण्यत येणार असा प्रस्ताव आहे. तसे न करता या स्पर्धेसाठी वेगळा निधी खर्च करण्यात यावा. या शहरात विविध प्रकारचे खेळ वर्षभर चालतात, त्यामुळे या स्पर्धासाठी पैसा कमी पडल्यास त्या खेळावर अन्याय होईल असे वाटते.

मा.महापौर : या स्पर्धा आयोजनसाठी एक बैठक आयोजनासाठी एक बैठक घेण्यात आली होती. त्यात क्रिकेट खेळा संबंधित मान्यवर क्रिडाप्रेमी मनपा क्रिकेटप्रेमी

यांचा समावेश होता. त्यांच्या पुर्वानुभवावरुन निवास, भोजन, खेळाचे मैदान, वाहतुक, उद्‌घाटन, बक्षीस व इतर बाबी यासाठी अंदाजित खर्च सात लाख येईल असा खुलासा आला त्याप्रमाणे हा ठराव ठेवण्यात आला आहे. यासाठी विद्यापीठ सांस्कृतिक मंडळ या सारख्या मैदानाची आवश्यकता भासणार आहे.

डॉ.भागवत कराड : अभिनंदन. २० लाखाच्या तरतुदीतुन या खेळासाठी खर्च करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ३० व्या आखिल भारतीय महापौर परिषद दि.१९ व २० ऑगस्ट १९९६ रोजी त्रिवेंद्रम येथे संपन्न झालेल्या परिषदेतील ठराव क्र.१४ अन्वये सन ९६-९७ या वर्षात औरंगाबाद महानगरपालिकेने आखिल भारतीय आंतरमहानगरपालिका क्रिकेट स्पर्धा आयोजित करावी असे ठरविण्यात आले त्यानुसार औरंगाबाद महापालिकेतर्फे माहे डिसे.९६ मध्ये या क्रिडास्पर्धा आयोजित करणेस तसेच या क्रिकेट स्पर्धेसाठी येणाऱ्या सुमारे ७ लक्ष रुपये अपेक्षित खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३१/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, आमखास मैदान येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानात टप्पा दोन अंतर्गत माहिती केंद्र/सांस्कृतिक गृह इत्यादी इमारतीचे बांधकाम करावयाचे अंदाजपत्रक रक्कम रु.१०,००,०००/- (दहा लाख) तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी मंजूरी दिली आहे.

टप्पा क्र.१ मध्ये (१) दोन मिनाव (२) प्रवेशद्वार ३) कस्केड ४) टेरेसेस ५) कंपाउडवॉल ६) माऊसस इत्यादी कामे पुर्ण करण्यात आली आहे. नविन उद्याने या लेखा शिर्षाखाली सन ९६-९७ वर्षाकरिता १ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. यापैकी ७३.१७ लाखाची कामे शासकीय अनुदान १० कोटी अंतर्गत करावयाची आहेत. त्यामुळे नविन उद्याने या लेखा शिर्षाखाली आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्यात येईल.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आमखास मैदान येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानात टप्पा दोन अंतर्गत माहिती केंद्र/सांस्कृतिक गृह इत्यादी इमारतीचे बांधकाम करणेसाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.१०,००,०००/- (दहा लाख) चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च नविन उद्याने या लेखा शिर्षाखाली सन १९९६-९७ वर्षाकरिता १ कोटीचे तरतुदीमधून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३२/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, श्री. विनायक पाटील चौक ते रेल्वेस्टेशन या १०० फूट विकास रस्त्याचे रुंदीकरणाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.२३,१३,४८०/- असून सदरील अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९५-९६ चे दरसूचीनुसार तयार करण्यात आले आहे. सदरील कामास मा.आयुक्त यांनी मान्यता दिली असून अंदाजपत्रक सर्वसाधारण

सभेच्या विचारार्थ सादर. मान्यता झाल्यास सदरचा खर्च भांडवली रस्ते ९६-९७ या लेखा शिर्षामधून करण्यात येईल.

**संवाद :**

श्री. रशिदखान (मामू) : प्रस्तावित प्रस्तावानुसार निश्चित काम करण्यात येणार आहे. याचा स्पष्ट बोध होत नाही. सदर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम यापूर्वी केव्हा झाले, यात किती लांबच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात येणार आहे. याबाबत सविस्तर माहिती असणे आवश्यक आहे. सभागृहात विविध विभागाकडून मांडण्यात येणाऱ्या प्रस्तावाच्या पध्दतीत बदल झाला पाहिजे. ढापे खरेदी बाबतच्या प्रस्तावाच्या वेळी कोणतीही माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडे उपलब्ध नव्हती.

मा.महापौर : स.सभासदांच्या सूचनांची दखल घेण्यात येते. संबंधित अधिकाऱ्यांनी यापुढे प्रस्ताव सभागृहापुढे ठेवतांना प्रस्ताव सविस्तर माहिती दिल्यानंतरच प्रस्ताव सभागृहापुढे ठेवावा.

मा.आयुक्त : विषय पत्रिकेवर फक्त प्रस्ताव मांडला जातो. प्रशासनाकडून देण्यात आलेल्या प्रस्तावास मा.महापौरांनी सभागृहापुढे मांडण्याची परवानगी दिल्यानंतर नगरसचिवांनी त्या प्रस्तावाबाबतची सविस्तर नसती तयार करुन सभागृहाला माहिती द्यावयाची असते. यावरुन सभासदांनी प्रशासनास जे जे प्रश्न विचारले जातील त्याची उत्तरे प्रशासनाकडून घ्यावयाची असतात ही खरी पध्दत आहे. ही पध्दत नसेल तर ती सुरु करण्यात येईल.

मा.महापौर : स.सभासदांच्या सुचनेनुसार संबंधित विभागने काम करावयाच्या रस्त्यांची लांबी यापूर्वी डांबरीकरण किंवा इतर काम केल्याचा कालावधी सध्या अस्तित्वात असलेला रस्ता, त्यात वाढ होणार असेल तर वाढीव कामांची रुंदी त्याबाबतची सविस्तर टिप्पणी संबंधित विभागने देण्याची व्यवस्था यापुढे करावी.

अतिरिक्त शहर अभियंता : विनायकराव पाटील चौक ते रेल्वेस्टेशन या रस्त्याची लांबी २.०३ किमी आहे. सद्यःस्थितीत हा रस्ता १५ मिटर डांबरीकरण झाला आहे. म्हणजेच ५० फूट आहे. या रस्त्यावरील रहदारी वाढल्यामुळे रुंदीकरण करणे आवश्यक आहे. त्यासाठी रस्त्याच्या रुंदीकरणासाठी प्रथम खडी रस्ता करण्यात येणार आहे त्याच्या साधारण ४.५ ५.०० ३.०० मीटर अशा प्रकारे रुंदीकरण करावे लागेल.

मा.महापौर : विषय क्र.३ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. विनायकराव पाटील चौक ते रेल्वेस्टेशन या १०० फूट विकास रस्त्याचे रुंदीकरणाचे कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९५-९६ चा दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रुपये २३,१३,४८०/- चे अंदाजपत्रक तसेच सदरचा खर्च भांडवली रस्ते सन ९६-९७ या लेखा शिर्षामधून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३३/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्क मिल कॉलनी यथील रस्त्यांना पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९५-९६ चे डी.एस.आर. दरसूचीनुसार रक्कम रु.७,७५,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ चे रस्ते दुरुस्ती पुर्नडांबरीकरण या लेखाशिर्षामधून प्रस्तावित आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.७,७५,१००/- चे अंदाजपत्रक मंजूरी बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

डॉ.भागवत कराड : प्रस्तावित रस्त्याचे यापूर्वी केंव्हा डांबरीकरण करण्यात आले होते याची माहिती देण्यात यावी.

अतिरिक्त शहर अभियंता : प्रस्तावित रस्त्याचे डांबरीकरण सन १९९१ मध्ये करण्यात आले होते. त्या रस्त्याची लांबी ३१३९ मीटर आणि ४ मिटर रुंदी आहे. पाहणीमध्ये डांबरीकरण आवश्यक असल्याचे दिसून आले.

मा.महापौर : विषय क्र.४ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्क मिल कॉलनी येथील रस्त्यांना पुर्नडांबरीकरणेच्या कामासाठी सा.बां. खात्याचे सन ९५-९६ चे डी.एस.आर. दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु. रक्कम रु.७,७५,१००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ चे रस्ते दुरुस्ती पुर्नडांबरीकरण या लेखा शिर्षामधून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३४/५ :** मा.आयुक्त यांच्या १५.१०.९६ च्या मान्यतेनुसार अग्निशमन विभाग हा मोस्ट इसेनशियल सर्व्हिस मध्ये येत आहे. सध्या वाळूज/सिडको/औरंगाबाद येथे तीन अग्निशमन केंद्र कार्यरत आहेत. तसेच चिकलठाणा येथे नविन अग्निशमन केंद्र डिसेंबरमध्ये सुरु होत आहे. प्रत्येक वर्षी अग्निशमन विभागस आगीचे कॉल्स ३०० ४०० येतात तसेच प्रत्यक्ष आगीवर काम करण्यासाठी (घटनास्थळी) पाच मिनिटे गेल्यास दुर्गघटनेतील जनतेला मदत करता येऊ शकते. ह्या विभागास ७५ टक्के कॉल्स हे वाळूज/चिकलठाणा/रेल्वेस्टेशन या औद्योगिक क्षेत्रातून प्रत्येक वर्षी येतात. सदरील वाळूज औद्योगिक क्षेत्राचे अंतर हे ६० ते ७० किमी कारखान्यात जाईपर्यंत होते. तसेच औरंगाबाद जिल्ह्यात कोठेही सुसज्ज अग्निशमन केंद्र नसल्यामुळे अग्निशमन विभागस महापालिका हद्दी बाहेर वेळोवेळी घडलेल्या दुर्घटनेवेळी मदतीस धावावे लागते.

गरवारे फिल्म चिकलठाणा येथे ९.१२.९५ रोजी ४.५९ वाजता लागलेल्या आगी व स्फोटामधून ४३ कर्मचारी सुखरुप वाचविले तसेच पश्चिम केमिकल्स वाळूज येथे १.७.९५ रोजी लागलेल्य मोठ्या केमिकल्स वाळूज येथे (७) कर्मचारी वाचविले. तसेच व्हिडीओकॉन व कॉस्मो फिल्म वाळूज येथील मोठ्या आगीच्या वेळी अडकलेल्या कर्मचारी सुखरुप बाहेर काढण्यास फार मोठ्या अडचणी निर्माण होवून त्यांच्या जिवितास धोका निर्माण झाला होता. सदरील उपरोक्त बाबींचा विचार करता अग्निशमन विभाग हा अपग्रेड करुन सुसज्ज करण्यासाठी अग्निशमन विभागास ठेवलेल्या सन ९६-९७ या वर्षीच्या आर्थिक तरतुद (४३)

लाखमधून खालील प्रमाणे वाहने खरेदी करण्याचा प्रस्ताव आर्थिक मंजूरीसाठी ठेवण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. इमर्जन्सी फीम टेंडर डिसीएकटोयटा कॉल ॲड चेसीज | ४,९३,१४७/- |
| विथ पिटीओ बॉडी विथ इक्वीपमेंट ........ | १६,००,०००/- |
| २. वॉटर फायर टेंडर टाटा १६१२/४२ चेसिस विथ पिटीओ | ५,१७,१३९/- |
| बॉडी विथ इक्वीपमेंट | १०,५०,०००/- |
| ३. ॲम्बेसेडर पेट्रोलकार (आयएसझेड) १८०० | ३,५१,३२३/- |

चेसिस व कारचे किंमतीत बदल होण्याची शक्यता आहे तरी देयके देते वेळी अस्तित्वात असलेल्या दरानुसार अग्निशमन विभागासाठी एकुण खर्च रक्कम रु.३९,११,६०९/- आर्थिक तरतूद (४३) लाख मधून करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे आर्थिक मंजूरीच्या मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा.आयुक्त : प्रस्तावित विषयातील अ.क्र. ३ मधील अम्बेसिडर कार हा वगळण्यात यावा.

मा.श्री.गौतम खरात : मा.आयुक्तांच्या सूचनेशी सहमत आहे. अग्निशमन अधिकारी हे वर्ग-२ चे अधिकारी आहेत.

मा.महापौर : अग्निशमन हा विभाग अत्यावश्यक सेवेत आहे. या विभागास हवी तशी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : अग्निशमन अधिकाऱ्यांना तातडीची कामे असतात. शहरात आग लागल्यानंतर तातडीने त्या ठिकाणी पोहचण्याच्य दृष्टीने अग्निशमन अधिकाऱ्यांना पेट्रोल कार असणे जरुरीचे आहे. सध्या त्यांच्याकडे जी जीप आहे. ती ढकलण्या शिवाय चालू होत नाही. तेव्हा अग्निशमन अधिकाऱ्यांच्या करिता पेट्रोल कार किंवा मारोती कार देण्यात यावी.

श्री. गंगाधर गाडे : सभागृहापुढे ठेवण्यात आलेला प्रस्ताव व प्रशासकीय आहे. त्याबाबतचा मा.आयुक्त यांनी खुलासा केला आहे. आग लागलेल्या ठिकाणी अग्निशमन अधिकाऱ्यावर ऐवजी पाण्याचा पंप व कर्मचारी लवकर पोहचतात किंवा नाही हे पाहण्याची गरज आहे. शासन पेट्रोल ऐवजी डिझेलची वाहने वापरुन इंधनावरील खर्च कमी करण्याच्या सूचना देत आहे. तेव्हा मा.आयुक्तांचे सूचनेनुसार अ.क्र.३ चा पेट्रोल कारचा प्रस्ताव वगळण्या यावा.

श्री. भगवान घडामोडे : प्रस्वातील अ.क्र. २ बाबत सभागृहाने निर्णय घ्यावयाचा आहे, त्या प्रस्तावाबाबत प्रशासनाने आगोदरच विचार करावयाला हवा होता. हा प्रस्ताव वगळल्याने अधिकाऱ्यांचा गैरसमज होईल.

मा. आयुक्त : अग्निशमन विभागातर्फे दोन चॅसिस घेण्याचा प्रस्ताव होता त्यात अग्निशमन अधिकाऱ्याकरीता पेट्रोल कार खरेदीचा प्रस्ताव होता. अग्निशमन अधिकारी हे वर्ग-२ चे अधिकारी देखिल पेट्रोल कारची मागणी करतील. आग लागलेल्या ठिकाणी अग्निशमन अधिकाऱ्यांना वेळेवर पोहचता यावे यासाठी मारोती जिप्सी गाडी योग्य आहे.

श्री. अ.रशिद खाँन : शहर मोठ्या प्रमाणाव वाढले आहे. त्यादृष्टीने वर्ग-१ च्या अग्निशमन अधिकाऱ्याच्या नेमणूक अधिकारी प्रथम पोहचण्या ऐवजी कर्मचारी आधी पोहचणे जरुरीचे आहे.

मा.महापौर : शहरात आग लागल्यानतर त्याबाबतची सूचना मलाही मिळते. त्यानुसार आग लागल्याची सूचना मिळाल्यानंतर त्या ठिकाणी गेलो असता कामाचे स्वरुप वाहून अनेक वेळा माझी स्वतःची गाडी पाठवून जास्तीचे वाहन चालक आणि कर्मचाऱ्यांना बोलावून आणावे लागले. ह्या बाबींचा विचार करता अग्निशमन अधिकाऱ्यांना वेळ प्रसंगी गाडी असणे जरुरी आहे. असे मला वाटते.

श्री. रशिद खान (मामू) : मा.महापौरांनी केलेला खुलासा योग्य वाटत नाही. आग लागण्याच्या प्रसंगी वेळचे महत्त्व लक्षात घेवून कारचे दार उघडून उतरणे आणि कामाची आखणी करणे यात वेळ लागू शकतो. त्या ऐवजी या कामासाठी जिपच योग्य आहे.

मा.महापौर : सभागृहाच्या सूचना लक्षात घेता विषय क्र. ५ मधील अ.क्र.३ नुसार ॲम्बेसेडर कार ऐवजी जिप्सी खरेदी करण्यास मंजूरी देवून विषय क्र.५ मंजूर करण्यात येत आहे.

श्री. गंगाधर गाडे : मा.आयुक्त हे प्रशासनाचे केंद्रबिन्दू आहेत. मा.आयुक्तावर सर्व जबाबदाऱ्या आहे. अग्निशमन अधिकाऱ्यासाठी जीप चांगली आहे. कार कोठेही जावू शकत नाही. प्रस्ताव मंजूर करण्याची पध्दत नाही. मा.महापौर यांचे मत सभासदांवर लादत आहे. अग्निशमन कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्यावर विचार होणे जरुरी आहे.

श्री. कचरू नवपुते, श्री. गिरजाराम हाळनोर : विषय क्र.५ बाबत मा.महापौरांनी रुलींग दिलेले आहे. विषय क्र.६ चर्चेला घेण्यात यावा.

मा.महापौर : विषय क्र.५ मंजूर झालेला आहे. विषय क्र.६ चर्चेला घेण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वाळूज/सिडको औरंगाबाद येथे असलेल्या अग्निशतन केंद्राबरोबर चिकलठाणा येथे नव्याने उघयडण्यात येणाऱ्या अग्निशमन केंद्र आणि या सर्व अग्निशान केंद्रात वाढलेल्या कामाची व्याप्ती विचारात घेता अग्निशमन केंद्रसाठी सन १९९६-९७ च्या आर्थिक तरतूदीतून खालीलप्रमाणे वाहने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

| | |
|---|---|
| १. इमर्जन्सी फीम टेंडर डिसीएम टोयटा कॉल ॲड चेसीज विथ पिटीओ बॉडी विथ इक्वीपमेंट ........ | ४,९३,१४७/-<br>१६,००,०००/- |
| २. वॉटर फायर टेंडर टाटा १६१२/४२ चेसिस विथ पिटीओ बॉडी विथ इक्वीपमेंट | ५,१७,१३९/- |
| ३. मारोती जिप्सी, | १०,५०,०००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३५/६ :**

महानगरपालिकेचे कर्मचारी सेवा भरती नियम ९ जून १९९४ रोजी राजपत्रात प्रसिध्द झालेले आहेत व त्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे. या सेवा भरती नियमाअंतर्गत कलम ५ अ ब क नुसार कर्मचाऱ्यांस सतत ७(सात) वर्षे व १५ वर्षे एकाच पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना निवड श्रेणी/समयश्रेणी देण्यात मान्यता दिलेली आहे. त्यासाठी वेतनश्रेणीचे परिशिष्ट व नियम तयार करुन स्थायी समितीच्या शिफारशी नुसार सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यात येत आहे. त्याच्या अटी व शर्ती शासन निर्णय व स्थायी समिती ठरावानुसार खालीलप्रमाणे राहतील.

१. शासन निर्णय क्रमांक एस आर व्ही – १०९५/प्र.क्र./१/९५/बारा दि.८ जून ९५.

२. शासन निर्णय क्र एएमसी / १८९३/१२/९/प्र.क्र.९७/नावि.२४ दि.१६ मे १९९४

३. स्थायी समिती ठराव क्र.११५/३१ दिनांक ११.९.९५

४. स्थायी समिती ठराव क्र. १२१/1 आयटम क्र.४ दिनांक ३०.७.९६

याची तपशिलवार योजना खालील प्रमाणे आहे. :

गट क्र. क व ड (पूर्वीचे वर्ग ३ व ४ ) मधील पदाधिकाऱ्यांना ७ व १५ वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्यांच्या पदोन्नती साखळीतील वरच्या पदावर पदोन्नतीसाठी पद अस्तित्वात नाही. अशा कर्मचाऱ्यांना ह्या निर्णया सोबतच्या परिशिष्टामध्ये दर्शविण्यात आल्यानुसार वरीष्ट वेतनश्रेणी देण्यात येईल. या योजनेची इतर प्रमुख वैशिष्ट्ये १ अंमल बजावणीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

अ. ही योजना ९ जून १९९४ पासून अंमलात येईल.

ब. या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीसाठी विहित कार्यपध्दती ज्येष्ठता पात्रता, अर्हता, विभागीय परिक्षा या बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

क. सरळ सेवेने प्रविष्ट झालेल्या अथवा पदोन्नतीतीने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत एक वेगळ्या योजनेअंतर्गत ७ वर्षानंतरचा नियमीत सेवेनंतर वरिष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय राहील.

ड. ज्या कर्मचाऱ्यांना यापूर्वी दोनपेक्षा जास्त पदोन्नती मिळाल्या आहेत अशा कर्मचाऱ्यांना या योजनेअंतर्गत वरिष्ठ श्रेणी मिळणार नाही.

इ. गट क्र.''ड'' मधील कर्मचाऱ्यांना या योजनेअंतर्गत गट ''क'' मधील वेतनश्रेणी म्हणजे रु.९५०-१४०० दिली तरी त्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० हेच असेल. मात्र गट ''क'' मधील अन्यवरिष्ठ पदांवर त्यांना पदोन्नती मिळाल्यस त्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ राहील. गट ''क'' मधील पदधारकांना गट ''ब'' मधील राजपत्रित पदावर पदोन्नती या योजनेअंतर्गत विचार केला जाणार नाही.

म. या पदोन्नतीमुळे जबाबदारी आणि कर्तव्ये यात वाढ होत नसली तरी नियमित पदोन्नतीप्रमाणे वेतन निश्चित लाभ देण्यात येईल्. मात्र वेतन निश्चितीत मिळालेला लाभ त्याच वेतनश्रेणीत (कार्यात्मक) ( )पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा द्येय होणार नाही.

न. जर कर्मचाऱ्यांस विशेष वेतन मिळत असेल तर या योजनेखालील पदोन्नती नंतर कर्मचाऱ्यांस मूळ वेतनश्रेणीमधील विशेष वेतन अनुज्ञेय राहणार नाही.

य. या योजनेअंतर्गत पदोन्नती मिळाली तरी कर्मचाऱ्यांचे नाव कनिष्ठ मुळ संवर्गाच्या ज्येष्ठता सुचीत राहील आणि सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार उपलब्ध रिक्तेत योग्य वेळी नियमीत पदोन्नतीसाठी ( ) त्याचा विचार करण्यात येईल. नियमीत पदोन्नतीस अपात्र ठरलेल्य कर्मचाऱ्यांस या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्याचप्रमाणे नियमीत पदोन्नती नाकरलेल्या कर्मचाऱ्यास देखील या पदोन्नतीचा लाभ मिळू शकरणार नाही. या आधिच त्यांना ( ) पदोन्नती दिली असल्यास मूळच्या पदावर पदावनत करण्यात येईल. अशा आशयाचे बांधपत्र कर्मचाऱ्यांना लिहून द्यावे लागेल. मात्र देण्यात आलेल्या आर्थिक लाभांची वसुली केली जाणार नाही.

१. निवड श्रेणीचा कायदा कर्मचाऱ्यांना दि.९ जून ९४ पासून (शासन राजपत्रात नियम प्रसिध्द झालेल्या तारखेपासून) मिळेल.

२. महानगरपालिकेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना चटोपाध्यात आयोगानुसार समय श्रेणी लागू केली असल्यामुळे त्यांना ही वेतनश्रेणी देता येणार नाही.
३. कनिष्ठ अभियंता यांना शासन नियमाप्रमाणे ५ वर्षानंतर सुधारीत वेतनश्रेणी देण्यात येते. त्यामुळे त्यांना ही निवड श्रेणीचा फायदा देता येणार नाही.
४. महानगरपालिकेतील शासन अनुदानित पदासाठी त्यांचे संचालकामार्फत मान्यता मिळाल्याशिवाय निवड श्रेणीचा फायदा देता येणार नाही.
५. निवडश्रेणीचा फायदा वर्ग-३ वर्ग-४ चे कर्मचाऱ्यांनाच शासन निर्णयाप्रमाणे देता येतो, त्यामुळे वर्ग-१ व वर्ग-२ चे अधिकाऱ्यांना निवड श्रेणीचा फायदा मिळणार नाही.
६. निवडश्रेणी दि.९/६/९४ पासून देण्यात येईल ज्यांची सेवा सलग ७ वर्ष पुर्ण झाली आहे. त्यांनाच फायदा मिळेल. तसेच त्या पूर्वीच्या जास्तीच्या सेवेचा कालावधी विचारात घेतला जाणार नाही.
७. ७ वर्षानंतर निवड श्रेणीचा लाभ मिळाल्यानंतर पुढील समय श्रेणी मिळण्यापूर्वी कर्मचाऱ्यांस पदोन्नतीचा लाभ मिळाल्यास १५ वर्षानंतर द्येय होणारी समय श्रेणीस ते पात्र राहणार नाहीत.
८. शासनाने ज्या अटी समयश्रेणी लागू करताना दिलेल्या आहेत त्याच अटी महानगरपालिकेने ही लागू करण्यात फक्त १२ ऐवजी कालावधी ७ वर्षाचा असेल.
९. वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांना निवडश्रेणी मंजूर केल्यानंतर महानगरपालिकेवर प्रत्येक महिन्यास अंदाजे ३ लक्ष रुपये आर्थिक भार पडेल.
१०. कनिष्ठ लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना शासननिर्णया क्र.एएमसी/१२९१/९३८/सीआर-३१/९२/नावि-२४/दि.१७ जून १९९३ अन्वये वरिष्ठ लिपिक कर्मचाऱ्यांना देण्यात येणारी वेतनश्रेणी रु.१४००-४०-१८०० शे.५० २३०० ही देण्यात यावी. करिता प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५ द्वारा, दि.८ जून १९९५ सोबतचे परिशिष्ट

| अ.क्र. | विद्यमान वेतनश्रेणी | पदोन्नतीची वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १. | ७५०-१२-८७० द.शे.१४-९४० | ७७५-१२-९५५-द.शे.-१५-१०३०-२०-११२० |
| २. | ७७५-१२-९५५ द.शे.१५-१०३०-२०११५० | ९५०-२०-११५०-द.शे. २५-१४०० |
| ३. | ८२५-१५-९०० द.शे. २०-१२०० | ९५०-२०-११५० द.शे.२५-१५०० |
| ४. | ९५०-२०-११५०- द.शे. २५-१४०० | १२००-३०-१४०० द.शे. ३०-१८०० |
| ५. | ९५०-२०-११५० द.शे.-२५-१५०० | १२००-३०-१५६० द.शे. ४०-२०४० |
| ६. | ९७५-२५-१५० द.शे. ३०-१५४० | १२००-३०-१५६० द.शे. ४०-२०४० |
| ७. | ९७५-२५-११५० द.शे. ३०-१६६० | १३२०-३०-१५६० द.शे. ४०-२०४० |
| ८. | १२००-३० १४४० द.शे. ३०-१८०० | १३५०-३०.१४४०-४०-१८०० द.शे.५०-२२०० |
| ९. | १२००-३०-१५६० द.शे.४०-२०४० | १४००-४०-१८०० द.शे.५०-२३०० |
| १०. | १३२०-३०-१८८०- द.शे.४०-२०४० | १४००-४०-१८०० द.शे.५०-२३०० |
| ११. | १३५०-३०-१४४०-१८०० द.शे.५०-२२०० | १६००-५०-२३०० द.शे.६०-२६६० |
| १२. | १४००-४०-१८०० द.शे.५०-२३०० | १६४०-६०-२६०० द.शे.७५-२९०० |
| १३. | १४००-४०-१६००-५०२३०० द.शे.६०-२६०० | १६४०-६०-२६०० द.शे.७५-२९०० |

| | |
|---|---|
| १४. १६००-५०-२३०० द.शे.६०-२६६० | २०००-६०-२३०० द.शे.७५-३२०० |
| १५. १६४०-६०-२६०० द.शे.७५-२९०० | २०००-६०-२३०० द.शे.७५-३२००-१००-३५०० |
| १६. २०००-६०-२३०० द.शे.७५-३२०० | २०००-६०-२३०० द.शे.७५-३२००-१००-३५०० |

**संवाद :**

मा.महापौर : विषय क्र.६ हा महत्वाचा आणि कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न सभागृहापुढे याबाबत सभासदांनी आपआपले विचार मांडावेत अशी विनंती आहे.

श्री. नरेंद्र पाटील , जयवंत ओक,सौ. लता दलाल : सेवाभरती बाबसाचा प्रस्ताव मोठा आहे. सेवाभरती बाबतच्या नियमाची पुस्तिका कालच मिळाली आहे. त्यामुळे सभासदांना त्याबाबतचा अभ्यास करता आला नाही. याबाबीचा विचार करता सदर प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी स्वतंत्र सभा घेण्यात यावी किंवा सदर प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

कर्मचाऱ्यांच्या हिताचा प्रश्न असल्यामुळे या प्रस्तावाबाबत कर्मचारी संघटनाशी प्रथम चर्चा करण्यात यावी. म्हणजे योग्य निर्णय सोईचे होईल. सेवाभरती नियमाबाबत कर्मचाऱ्यांकडून काही आक्षेपही आलेले आहेत त्यावर निर्णय झालेला नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : सभागृहापुढे ठेवण्यात आलेल्या प्रस्तावाचा सेवाभरती नियमाशी तसा काही संबंध नाही, सात वर्षानंतर निवडश्रेणी व पंधरा वर्षानंतर समयश्रेणी देण्याबाबत काही नियम ठरवून त्यास मान्यता देण्यात येत आहे. तरी पण सभागृहाची भावना असेल तर कामगार संघटनाशी चर्चा करुन खास बैठक घेण्यात यावी व त्यात हा निर्णय यावा.

श्री. मुश्ताक अहेमद : सेवाभरती नियम हा एक महत्त्वपूर्ण विषय आहे. यापूर्वीच्या सेवाभरती नियमासाठी एक उपसमिती तयार करण्यात यावी असे ठरले होते, पण समिती तयार करण्यात आली नाही. आजच्या सभागृहासमोर हा विषय झाल्यांनतर त्यासाठी विशेष सभा घेण्यात यावी अशी सूचना आली आहे.

मा.महापौर : सभागृहाच्या सूचना लक्षात घेता सेवा भरती नियमावर विचार करण्यासाठी विशेष सभा आयोजित करण्यात येइल. त्याचबरोबर सेवा भरती नियमाबाबत महापालिका कर्मचारी संघटना बरोबर या विषयावर चर्चा करण्यासाठी मा.आयुक्त यांनी बैठक आयोजित करावी.

त्यानंतर विशेष सभा आयोजित करण्यात येईल.

**ठराव :** सर्वानुमते असे ठरले की, भरती नियमाबाबत महानगरपालिका कर्मचारी संघटनशी मा.आयुक्त यांनी सविस्तर चर्चा करावी. त्यांनतर या विषयाबाबत विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात यावे.

## “ऐनवेळचे विषय” (पूरवणी विषयपत्रिका)

**विषय १३६/१ :**

युवक व महिला ज्युदो असोसिएशन ही रजिष्टर संस्था आहे. य संस्थेमार्फत आपल्या दशमेशनगर येथे युवकांना व युवतींना ज्युदोची ट्रनिंग दिली जाते. संस्थेमार्फत प्रशिक्षण घेतलेले मुले राष्ट्रीयपातळीवर चमकले आहेत पण पुढील प्रकारच्या प्रशिक्षणसाठी त्यांना ज्युदोसाठी लागणाऱ्या मॅटसची गरज आहे. एकूण ३० मॅटस त्याची अंदाजे किंमत ७५,०००/- रु.होते. मनपातर्फे सदरील मदत करावी. ही विनंती.

सुचक : डॉ.बी.के.कराड

श्री. गिरजाराम हाळनोर
अनुमोदक : श्री. रशिद खान (मामू)
दिनांक : निरंक

**ठराव (संवाद) :**

श्री. गिरजाराम हाळनोर : संघटनेस रक्कम न देता मॅट घेऊन देण्यात यावी. कुठल्याही संघटनेस नगरस्वेच्छा निधीतून रक्कम द्यावयाची नाही असा नियम आहे.

मा.महापौर : विषय क्र. मंजूर झालेला आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे युवक व महिला ज्युदा असोसिएशन ह्या रजिष्टर संस्थेस ज्युदो प्रशिक्षणाकरिता लागणाऱ्या मॅटस (३० मॅटस) मनपातर्फे खरेदी करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. नियमाप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करून घेण्यात यावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३७/२ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागामध्ये व प्रकल्प विभागामध्ये जवळपास ७५ बालवाड्या चालू आहेत. सर्व शाळेला जोडून सुरु असणाऱ्या बालवाडी शिक्षकांना दरमहा रु.५००/- याप्रमाणे मानधन दिले जाते. गेल्या ५ वर्षापासून बालवाडी शिक्षिका कार्यरत आहेत. आणि मनपाची सेवा करीत असतांना मुलांची स्वच्छताा, खेळ, शैक्षणिक दर्जा, शिस्त या प्रमुख बाबी हाताळत असताना मुलांना आत्मनिर्भरता प्राप्त करणे, शिक्षकांना जाणीव निर्माण करणे, संघटनात्मक मार्गाने शिक्षणाची त्यांच्या बालविकासाच्या प्रवाहास सहभाग घेण्यास प्रवृत्त करणे. शैक्षणिक दर्जा व बालकाचे जीवनमान त्याचप्रमाणे त्याचा जिवनस्तर उच्चावण्याचा प्रयत्न करणे, बालकाचे राष्ट्रीय बालकाचे शिक्षण, समानता, विकास इ.मुल्य रुजविणे व भावी पिढी घडविण्याचे काम बालवाडी शिक्षीका करीत आहेत. य प्रयत्नामागील प्रामाणिकता आणि तळमळ आपणांस बालवाडी शिक्षकांमध्ये दिसून येते. आणि शिक्षणाची बालकामध्ये त्यांच्या कुटुंबामध्ये शिकण्याची व विकासासची प्रेरणा निर्माण करण्यासाठी वातावरण निर्मितरीवर या बालवाडी शिक्षीका आपली सेवा देत आहेत. सेवा करीत असतांना त्यांना मिळणारे मानधन त्यांच्या कुटुंबियांना पुरे आहे काय? याचा विचार होणे आवश्यक आहे. महागाईच्या दिवसात ते अत्यल्प आहे.

बालकांवर संस्कार करण्याऱ्या बालवाडी शिक्षकांना वेतनश्रेणी नाही. पुरेसे मानधन नाही, बोनस, रजा, वैद्यकीय रजा इ.सवलती मिळत नाही. याबाबत विचार होणे आवश्यक आहे. बालवाडी शिक्षकापसून आपण ज्या पध्दतीने अपेक्षा महापालिकेला हवे वाटते त्याच पध्दतीने त्यांना सवलती देणे गरजेचे आहे. इतर महानगरपालिकेनमध्ये म्हणजे पुणे, ठाणे, महानगरपालिका, मनमाड, चोपडा, नगरपालिका यामध्ये आपल्यापेक्षा मानधन वाढवून देत आहे. त्याचप्रमाणे बालवाडी शिक्षकांना किमान वेतनश्रेणी देणे योग्य वाटते व बालवाडी वर्ग ती तास ऐवजी पाच तास करण्यात यावा.

करीता बालवाडी वर्ग पाच तास चालविणे मानधन दरमहा रु.१५००/- रूपये देणे. जेणेकरुन मनपाच्या शाळेचा दर्जा जनसामान्यता उंचावेल तरी सहानुभूतीपूर्वक विचारास्तव व प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री. अशफाक सलामी
अनुमोदक : श्री. अब्दुल रऊफ
दिनांक : १७.१०.९६

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, प्रस्तावित विषयाचे सूचक सभागृहात नसल्याने सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**विषय १३८/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझे वॉर्ड क्र.४२ लोटाकारंजा येथे शाळा व फंक्शन हॉल बांधण्यासाठी वेगवेगळे अर्थसंकल्प तरतुर करण्यात आली होती. शाळेकरिता रु.७,००,०००/- व फंक्शन हॉल करिता रु.५,००,०००/- तरतुद होती. परंतु फंक्शन हॉल हा मोठ्या प्रमाणावर बांधण्यात यावा आणि नागरिकांची मागणी असल्यामुळे सध्या असलेले फंक्शन हॉल हे हॉल नसून गोदात आहे.

तरी दोन्ही मिळून रु.१२,००,०००/- रुपये एकाच बिल्डींगमध्ये रुंपातर करावे व या बिल्डींगच्या ग्राऊंउ फ्लोअर व तरचा फर्स्ट फ्लोअर मधील अर्धा भाग फंक्शन हॉलसाठी बांधावा व आर्धा भाग शाळेकरिता बांधण्यात यावा व खर्च जास्त लागल्यास तरतुद करण्यात यावी. करीता मंजुरीस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | : | श्री. अ.अ.रऊफ म.अ.माबुद |
| अनुमोदक | : | श्री. प्रदिप जैस्वाल |
| दिनाक | : | १८.१०.९६ |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.४२ लोटाकारंजा येथे (७,००,००० शाळेकरिता असलेली तरतुद व रु.५,००,०००/- फंक्शन हॉल करीता असलेली तरतुद) तरतुदीनुसार रु.१२,००,०००/- खर्चाची रक्कम इमारत बांधण्यात येवून या इमारतीचा तळमजला आणि पहिल्या मजल्यावरील अर्धाभाग व फंक्शन हॉलकरिता आणि पहिल्या मजल्यावरील अर्धाभाग हा शाळेकरिता उपयोगात आणण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. इमारत बांधकामाचे आर्थिक तरतुद कमी पडल्यास तशी व्यवस्था करण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले. सदर प्रस्तावास याच सभेमध्ये स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३९/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, एन-५ सिडको,औरंगाबाद भागात १०० मीमी व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेसाठी सन १९९४-९५ व ९५-९६ च्या डी.एस.आर प्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु.६,४१,८६०/- चे तयार करण्यात आले असून सदरील आर्थिक तरतुद भांडवली या शिर्षकाखली करण्यात येईल. तरी अंदाजपत्रक रक्कम रू.६,४१,८६०/- यास मंजूरी मिळणेसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-५ सिडको,औरंगाबाद भागात १०० मीमी व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी सन ९४-९५ व ९५-९६ च्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.६,४१,८६०/- च अंदाजपत्रकास तसेच सदरील आर्थिक तरतूद भांडवली च्या शिर्षकाखाली करणेस सर्वानुमते मंजूरी देण्या येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## "ऐनवेळचे विषय"

**विषय क्र. १४०/१ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा.आयुक्त यांच्य मंजुरी नुसार प्रस्ताव सादर करीत आहे की, नाथ मार्केट येथील पहिल्या मजल्यावरील मागील बाजूच्या दुकानाकरिता वारांर निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु नागरिकांकडून पाहिजे तेवढा प्रतिसाद न मिळाल्यामुळे परंतु सर्वात जास्त अनामत रक्कम देणाऱ्यासाठी बोली लिलाव पध्दतीने करण्यात आला होता.परंतु प्रतिसाद मिळाला नाही.

तथापि नाथ मार्केट मागील बाजूच्या दुकानासाठी दुकान क्र.१२ बाबत उपकार्यकारी अभियंता विद्युत मंडळ, शहर विभाग क्र.१ यांनी पत्र देऊन सदर गाळ्याची मागणी केली असता दि.२४.९.९६ रोजी पत्राद्वारे कळविण्यात आले आहे की, दि.२५.९.९६ रोजी ११.०० वाजता होणाऱ्या बोली लिलावात भाग घ्यावा. त्या संदर्भात दि.२५.९.९६ रोजी त्यानी पत्र देवून विनंती केली की, कृपया सरकारी नियमाप्रमाणे (डी.एस.रेन्ट) प्रमाणे विद्युत मंडळास भाड्याने द्यावे. शासकीय मंडळ असल्यामुळे अनामत रक्कम न लावता फक्त डी.एस.आर. रेन्टप्रमाणे भाडे लावून फ्यूज कॉल सेंटर गाळा क्र.१२ विद्युत मंडळास द्यावे. जेणेकरुन त्या भागातील विद्युत ग्राहकांची सोय होईल.

तसेच कार्यालयातर्फे सुभाष गाई यांना दूकान क्षेत्रफळ २१७.३ रितसर अनामत रक्कम घेवून दरमहा प्रति १ मी. व ५०/- पोटमाळा २५/- प्रति. चौमी.प्रमाणे व राज्य हातमाग मंडळ, महाराष्ट्र शासनाचे अंगिकृत प्रतिष्ठान व कन्झुमर्स फेडरेशन यांना पहिल्या मजल्यावरील दुकान क्र.१६, १७, व १८ समोरील भागातील दूकान रितसर अनामत दरमहा भाडे ६०/- प्रति चौमी. प्रमाणे रीतसर अनामत रक्कम घेवून भाड्याने घेण्यात आली आहे.

तसेच पहिल्या मजल्यावरील मागील बाजूच्या दूकान क्र.३,६,७ या दूकान क्षेत्रफळ २५/- प्रति चौमी. प्रमाण रितसर अनामत घेवून भाड्याने देण्यात आली आहे.

दूकान क्र.१२ दूकान क्षेत्रफळ ४९.२२ चौमी. व पोटमाळ्याच ४१.४० चौमी. आहे रितसर अनामत र.रु.१,३६,३८०/- आहे

करीता वरील मंडळाकडून अनामत रक्कम घेण्यात यावे किंवा नाही तसेच काय भाड्याने आकारणी करण्यात यावी या बाबत मा.सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. मुश्ताक अहेमद : प्रत्येक महिन्याला एक सभा होते मग ऐनवेळचे विषय का ठेवले जातात प्रत्येकवेळी हीच पध्दत आहे.

मा.महापौर : सदर प्रस्ताव महत्वाचा आणि जरुरी आहे. त्यामुळे तो ऐनवेळी घेण्यात येत आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : सुपर मार्केटमध्ये फ्यूज कॉल सेंटरला जागा देणे बाबत प्रस्ताव आहे. मरावि मंडळ ही एक स्वायत्त संस्था असल्यामुळे अनामत रक्कम घेण्यात येवू नये. असे मंडळाने पत्र दिले आहे. त्यानुसार डीएसआर दराने भाडे आकारणी करण्यात येत आहे. त्यास मंजूरी देण्यास हरकत नसावी. शिवाय मालमत्ता विभागाकडून जो दूसरा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे त्यात रु.२१.४० आणि २५ वाढीव भाडे दाखविण्यात आले आहे. त्यामुळे सुपर मार्केट मधील गाळे भाड्याने जात नव्हते तेव्हा पूर्वीच मनपा ज्या पध्दतीने

भाडे आकारणी करीत होती. त्याच पध्दतीने सुपर मार्केट येथील गाळे भाड्याने देण्यात यावे.

मा.महापौर : सुपर मार्केट मधील गाळे भाड्याने जात नव्हते या बाबत सभापती यांनी बैठक घेऊन सविस्तर चर्चा करून माहिती घेतलेली आहे व प्रस्ताव सभागृहापुढे ठेवलेला आहे. त्यास सभागृहाने मंजूरी द्यावी अशी विनंती आहे.

विषय क्र.२ आणि ३ मंजूर करण्यात आलेले आहेत.

श्री. रशिद खान (मामू) : सुपर मार्केट येथील दूकानासाठी अनामत रक्कम देऊ शकत नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. त्याठिकाणी आपले फ्युजकॉल सेंटर सुरु होवू शकते.

मा.महापौर : सुपर मार्केट येथील गाळे भाड्याने देण्याबाबत ज्या ज्या वेळी आपण फॉर्म वाटप केले, जाहिरात दिली व टेंडर मागविला बोली बोलण्यासाठी प्रयत्न केला त्यावेळी कोणीही पुढे आले नाही. सात वर्षापूर्वी तयार झालेल्या इमारतीचा योग्य असा विनियोग झालेला नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. मरावि मंडळाकडून अनामत बाबत पत्र आले आहे ते आपण मान्य करावे भाडे कोठेही कमी करता येत नाही. मरावि मंडळाने मागच्या वेळी मनपास मोठी आर्थिक मदत केली आहे. या बाबतचा सहानूभूतीपूर्वक विचार करुन सहकार्य करावे. समन्वय बैठकीच्या वेळी मंडळाने ५०/६० हजाराची आर्थिक माफी दिली आहे.

श्री. नरेंद्र पाटील : सभागृहात अनेक उपसमिती तयार झाल्या त्यावर चर्चा झाली नाही. उदा.शिक्षक भरती उपसमिती, रस्ता दुभाजक उपसमिती, सिमेंट प्रकरण, जालना रोडवरील अतिक्रमण, दुभाजकाबाबत शहरात मोठी चर्चा चालू आहे. शहरातील रस्ता दुभाजकाचे डिझाईन एकसारखे असावेत अशी सूचना करण्यात आली होती. या सुचनेकडे लक्ष न देता प्रत्येक रस्त्यावर वेगवेगळ्या प्रकारचे डिझाईन उभारण्यात आले आहे. रस्ता दुभाजकाचे कामही चांगल्या प्रकारे झाले नाही. यावर मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च झाला आहे. सभागृहात ज्या ज्या बाबींचा उल्लेख होतो. त्यावर सविस्तर अशी चर्चा झाली पाहिजे पण गेल्या सहा महिन्याच्या काळात अशा प्रकारची चर्चा कधीही झाली नाही. तेव्हा अशा विषयी चर्चा घडवून आणावी व निर्णय घेण्यात यावा. जालना रोडवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण आहे. सिग्नलजवळ ट्रान्सपोर्टवाल्याच्या गाड्या उभ्या असतात. याकडे कोणीही लक्ष देत नाहीत. सा.बां.खात्याने जालना रोडवरील रामा इंटरनॅशनल समोर झुणका भाकर केंद्र बांधकाम परवानगी दिली आहे. अशी परवानगी देण्याचा सा.बां.विभागास अधिकार आहे काय? असे अनेक प्रश्न आहेत.

मा.महापौर : सभागृहासमोर स.सभासदांनी मांडलेल्या महत्त्वाच्या विषयावर जरुर चर्चा घडवून आणली जाईल जालना रोड सार्वजनिक बांधकाम खात्याकडे आहे. त्याच्यानियमाप्रमाणे झुणका भाकर केंद्र हा शासनाचा उपक्रम आहे. यानंतर विद्युत विभागाच्या विषयावर चर्चा करण्यात येईल.

श्रीमती जाहेदा बेगम : शिक्षक भरती बाबत उपसमिती नेमण्यात आली आहे. त्याबाबत काय निर्णय झाला सभागृहाला धोका देण्यात येत आहे. खुलासा करावा.

मा.महापौर : शिक्षकभरती उपसमिती बैठक मा.आयुक्त यांचे बरोबर लवकर लावण्यात येत आहे. त्यानंतर त्याचा निर्णय सभागृहाला देण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगपूरा येथील नाथ मार्केटमधील दुकान क्र.१२ महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ शहर विभाग क्र.१ यांना अनामत रक्कम न घेता डीएसआर रेन्टप्रमाणे भाडे आकारुन फ्युज कॉल सेंटरकरिता देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

दुकान क्र.१२ क्षेत्रफळ ४९.२२ चौमी व पोटमाळ्याचे ४१.४० चौमी. क्षेत्राचे आहे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. १४१/२** : मालमत्ता अधिकारी यांनी मा.आयुक्त यांच्या मंजूरीनुसार प्रस्ताव सादर करीत आहेत की, नाथ मार्केट येथील पहिल्या मजल्यावरील मागील बाजूच्या रिकामी दुकाने भाड्याने देण्यासाठी वारंवार निविदा मागविण्यात आल्या होत्या. तसेच सर्वात जास्त अनामत रक्कम (जास्त) देणाऱ्यासाठी बोली लिलाव करण्यात आला होता. परंतु नागरिकांकडून पाहिजे तेवढा प्रतिसाद न मिळाल्यामुळे नाथ मार्केट अनामत रक्कम व भाडे निश्चिम करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. तथापि समितीने खालीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

तयार केलेले प्रचलित शिघ्रगणकाच्या (                    ) विचारात घेणे. सिध्द शिघ्र गणकाचे दर बांधकामासाठी सुध्दा आहेत. त्याचप्रमाणे तळमजला पहिला त्यावरील मजल्याकरिता स्वतंत्र दर आहेत.

१. अनामत रक्कम

अनामत रक्क्म ठरविताना सिध्द शिघ्रगणकाच्या १/३ एवढी रक्कम विचारात घ्यावी व दर चौमी प्रमाणे अनामत रक्क्म ठरविण्यात यावी. जर पोटमाळा असेल तर वरील दराच्या १/३ इतका दर पोटमाळ्याची अनामत रक्कम ठरविण्यात यावी.

२. मासिक भाडे :

मासिक भाडे ठरविताना सिध्द शिघ्रगणकाच्या २/३ एवढी रक्कम विचारात घ्यावी त्यावर १० टक्के अपेक्षित वार्षिक उत्पन्न (व्याज) धरुन मासिक भाडे ठरविण्यात यावे. पोटमाळ्याचे भाडे ठरविताना वरील भाड्याच्या १/३ एवढी भाडे आकारावे.

नाथ मार्केट दुकानाच्या बाबत वरीलपध्दतीने नुसार खालील प्रमाणे भाडे व अनामत रक्कम समीतीतर्फे निश्चित करण्यात येत आहे.

१. शासकीय सिध्द शिघ्र गणकानुसार वरील भागात पहिल्या मजल्यावरील बांधीव क्षेत्राचा प्रति चौ.मी. दर रू.१३,२००/- आहे.

अ. दुकान १३२००X१/३ = ४४०० प्रति चौमी दुकानाकरिता

१. पोटमाळा ४४००X१/३ = १४९६ प्रति चौमी मासिकभाडे

अ. दुकान १३२००X २ = ८८०० प्रति चौमी दुकानाकरिता

वरील रक्कम १५ वर्षामध्ये संपूर्णपणे वसुल व्हावी असे अपेक्षित आहे. त्यानुसार

३. दुकान भाडे ८८००/१८० = ४९ प्रति चौमी दरमहा

ब. पोटमाळा ४०X१/३ = १६ प्रति चौमी दरमहा

यातील एकाच मजल्यावरील पूढील दूकानात (रस्त्याकडील) १० टक्के ज्यादा व मागील बाजूच्या दूकानात १० टक्के कमी दराने आकारणी करण्यात यावी.

वरील प्रमाणेच आशा इतर प्रकरणात ही याच पध्दतीने कार्यवाही करावी असे समितीचे मत आहे.

तथापि सदरील भाडे व अनामत रक्कम धोरण लागू करण्याबाबत वरील प्रस्ताव चर्चा होवून मा.सर्वसाधारण सभेपुढे विचार होण्यास्तव प्रस्ताव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नाथ सुपरमार्केटमधील गाळे भाड्याने देण्याकरिता अनामत रक्कम व भाडेदर निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीने शिफारशी केल्यानुसार खालीलप्रमाणे अनामत रक्कम आणि मासिक भाडे निश्चित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

१. शासकीय सिध्द शिघ्र गणकानुसार वरील भागात पहिल्या मजल्यावरील बांधीव क्षेत्राच्या प्रति चौ.मी. दर रु. १३२००/- आहे.

अ. दुकान १३२००X१/३ = ४४०० प्रति चौमी दूकानाकरिता

ब. पोटमाळा ४४००X१/३ = १४६६ प्रति चौमी मासिक भाडे

अ. दुकान १३२००X२/३ = ८८००

वरील रक्कम १५ वर्षामध्ये संपूर्णपणे वसुल व्हावी असे अपेक्षित आहे.

अ. दूकानभाडे ८८००/१८० = ४९ प्रति चौमी. दरमहा

ब. पोटमाळा ४०X१/३ = १६ प्रति चौमीटर दरमहा

यातील एकाच मजल्यावरील पुढील दुकानांना (रस्त्याकडील) १० टक्के जादा व मागील बाजूच्या दुकानांना १० टक्के कमी दराने आकारणी करण्यात यावी.

वरीलप्रमाणेच अशा इतर प्रकरणातही याच पध्दतीने कार्यवाही व्हवी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४२/३ :**

शहरातील विद्युत प्रकरणांबाबत चर्चा करणे.

**संवाद :**

श्री. गिरजाराम हाळनोर : गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवाचे काळात विद्युत विभागाचे सर्वच कर्मचाऱ्यानी आणि अधिकाऱ्यंनी मा.आयुक्तांचे मार्गदर्शनाखाली शहराच्या सर्वच भागात विद्युत व्यवस्था चोख ठेवण्यासाठी अथक असे प्रयत्न केले आहेत. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. पूर्वीच्या पध्दतीप्रमाणेच प्रत्येक वॉर्डाकरिता स्वतंत्र रजिष्टर ठेवून संबंधित विद्युत लाईनमन यांनी वॉर्डाच्या नगरसेवकाबरोबर पाहणी करुन विद्युत दिव्यांची व्यवस्था करावी आणि काम पूर्ण झाल्याबद्दल नगरसेवकाची सही घ्यावी अशा पध्दतीने सर्व विद्युत दिव्याबाबतच्या तक्रारी दूर होतील.

मा.महापौर : सभागृहाने दिलेल्या सूचनेनुसार विद्युत विभागाचे चांगल्या प्रकारे काम केले आहे. व त्या विभागाचे कामाबाबतची सविस्तर माहिती सर्वसभासदांनी दिलेली आहे. त्यावरुन सभासदांचे चांगल्याप्रमाणे समाधान झाले असेल असे मला वाटते. कामाबाबत काही त्रूटी असतील तर त्या भरुन काढण्यात येईल.

श्री. जयवंत ओक : सर्व नगरसेवकांचा विद्युत विभागांचा प्रश्न आहे. १५०० पैकी १४५० पोल महानगरपालिकेतर्फे शहरात उभारण्यात आलेले आहेत. त्यावर दोन वायर

ओढण्यात आल्या आहेत. त्या पोलवर ८/१५ दिवसात मराविमं मंडळातर्फे कनेक्शन ओढले जाणार आहे का? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. दूसरा प्रश्न नगरसेवक स्वेच्छा निधीतून सोडीयम दिवे लावण्याची मागणी करतात. अशी मागणी केल्यानंतर निश्चित अवधीच्या काळात असे सोडीयम दिवे लावले पाहिजेत. त्याबाबत आजच्या सभेत निर्णय घेण्यात यावा. बंद दिव्याबाबत नगरसेवक/नागरिकांनी तक्रार केल्यानंतर निश्चिम अवधीच्या काळात असे सोडीयम दिवे लावले गेले पाहिजेत. या बाबत आजच्या सभेत निर्णय घेण्यात यावा. बंद दिव्याबाबत नगरसेवक/नागरिकांनी तक्रार केल्यानंतर ८/८ दिवस असे दिवे चालू केले जात नाही. मा.सभापती यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे ८२ नगरसेवकांकरीता स्वतंत्र रजिष्टर तयार करण्याच्या मताशी मी सहमत आहे. या सर्व बाबीबाबत सभागृहात निर्णय घेण्यात यावा आणि त्यानंतर तक्रार आली तर त्याबाबत विचार करावा.

मा.महापौर : विद्युत दिव्याबाबत प्रभाग निहाय सूचना ऐकून घेण्यात येतील. त्यानंतर मा.आयुक्त आणि मी त्यावर खुलासा करु. अशी पध्दत सुरू करण्यात येत आहे. प्रथम वॉर्ड क्र.१ सुरू करण्यात येते.

श्री. गौतम खरात : सभागृहात गंभीर अशा विषयावर चर्चा सुरु होत आहे. सन १९८१ मध्ये शहरात ५००० पोल होते. त्यावेळी मरावि मंडळ व मनपा अशा दोन स्वायत्त संस्था मिळून शहराच्या सार्वजनिक दिवाबत्तीची कामे पाहत होते. या कामासाठी म.रा.वि.मंडळाच्या बारा गँग काम करत होत्या. सध्या शहरात १७ हजार पोल आहेत त्या मानाने या कामासाठी असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या अंत्यत तोकडी आहे. या सर्व कामांसाठी दोन उपअभियंता, तीन कनिष्ठ अभियंता आणि २४ लाईनमन काम करतातृ याकडे प्रशासनाचे लक्ष नाही. नियमाप्रमाणे महापलिकेचा कर्मचारी पोलवर चढू शकत नाही. नियमाप्रमाणे एका उपअभियंत्याकडे ५ कनिष्ठ अभियंता लाईन इन्सपेक्टर आणि लाईनमन असा कर्मचारी वर्ग असणे जरुरीचे आहे. तो स्टाफ कमी आहे. या विभागासाठी स्वतंत्र कार्यकारी अभियंताचे पद असणे आवश्यक आहे. सार्वजनिक दिवा बत्तीच्या व्यवस्थे बरोबरच या कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या सर्व इमारती शाळा, उद्याने दवाखाने कार्यालये या सर्वाच्या विद्युत व्यवस्थेची कामे करावी लागतात या शिवाय गणेशोत्सव, शारदोत्सव ईद-ए-मिलाद गरबा शिवजयंती, आंबेडकर जयंती या सार्वजनिक उत्साहाचे वेळी ही या कर्मचाऱ्यांना काम करावे लागते. लाईट पाणी या सारख्या नित्याच्या नागरी सुविधा बाबात नेहमीच तक्रारी येतात. त्याची कारणे आहेत. या विभागाच्या अनेक अडचणी आहेत. त्या पुरविण्याची प्रशासन व्यवस्था करणार का? याचाही विचार होणे आवश्यक आहे. जनतेच्या आशा वाढल्या आहेत. प्रभागात लाईट बाबत काही तक्रार नाही.

सौ. रजनी जोशी : वॉर्ड क्र.८ मधील कामधेनू सोसायटी विकास खर्चाची सर्व रक्कम भरली आहे. या सोसायटी विद्युत पोल टाकण्याबाबात पत्रही देण्यात आले आहे. मी स्थायी समितीची सदस्य आहे. अद्याप त्या ठिकाणी लाईटची व्यवस्था झाली नाही. परवाच या सोसायटीत दरोडा पडला त्यात स्त्रीया व मुलांना मारहाण करण्यात आली आहे. मा.महापौरांनी याची पाहणी करावी.

अतिरिक्त शहर अभियंता : कामधेनू सोसायटीत पोल बसविण्याबाबत जे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे लवकरच काम होईल.

मा.महापौर : कामधेनू सोसायटीत पोल बसविण्याचे काम लवकरात लवकर कसे होईल याचा अधिकाऱ्यांनी विचार करावा व कार्यवाही करावी.

श्री. गौतम खरात : आवश्यक तेव्हा हे पोल उभारुन दोन लाईन ओढल्या आहेत. त्यावर तिसरी लाईन ओढण्याबाबत अद्याप परवानगी मिळाली नाही. ती ओढून दिवे लावण्यात यावेत. प्रभागांतून जळगाव रोड हा व्हि.आय.पी. रोड जात आहे. त्यावर मर्क्युरी लाईट लावण्यात यावे अशी विनंती आहे.

अतिरिक्त शहर अभियंता : लाईट पोल टाकण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल. मराविमंडळाकडे रु.६,००,०४६ भरले आहेत. इलेक्ट्रिकल्स इन्सपेक्टर सर्व्हे बाकी आहे ते काम ८/१० दिवसांत पूर्ण होईल. जास्तीत जास्त एक महिन्याच्या कालावधीत हे सर्व काम पूर्ण होईल.

श्री. महादेव सुर्यवंशी : भागात ३० पोल रोवण्यात येवून त्यावर तारही ओढले आहे. त्यावर मेनलाईन ओढण्यात आलेली नाही. विद्युत विभागामध्ये बऱ्याच ठिकाणचे पोल हलविण्याबाबतची माहिती त्यात आली नाही. नारेगाव ट्रेचिंग ग्राउंड येथील पोलवर लाईट त्वरीत बसविण्यात यावेत. नारेगाव/ब्रीजवाडी येथील शालेय इमारतीत विद्युत फिटींग करण्यात आली आहे. परंतु त्या ठिकाणचे लाईट अद्याप चालू झालेले नाहीत. ते त्वरीत चालू करण्यात यावे. ब्रीजवाडी येथील बौध्द पुतळ्याजवळील फोकस गेल्या अनेक दिवसापासून बंद आहेत. याबाबत विचारणा करण्यात आली आसता हेड्रोलिक गाडी मिळत नाही असे सांगण्यात येते. ब्रीजवाडी येथे रोवण्यात आलेल्या नऊ पोलवर वायर त्वरीत ओढण्यात यावी. जेणेकरुन लाईट सुरू करता येतील.

अतिरिक्त शहर अभियंता : नविन रोवण्यात आलेल्या पोलची पाहणी झाल्या बरोबर लाईटचे काम करण्यात येईल. त्याचबरोबर शाळेच्या लाईटबाबत स्वतः लक्ष मंडळाच्या काही अडचणी आहेत. त्या प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन त्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. महापालिकेकडे असलेल्या गाड्यापैकी एक गाडी आरटीओ पासिंग करण्याकरिता गेलेली असल्याने उपलब्ध होवू शकली नाही.

श्री. अभिमन्यु भालेराव : वॉर्ड क्र.१४ मधील लाईट बाबतच्या तक्रारी गेल्या दीड वर्षापासून चालू आहेत. एकआयडीसी कडून कोट्यावधी रुपये महापालिकेला जमा होतात. या भागात लाईटची व्यवस्था नसल्याने अनेक अपघात, अन्य प्रकार या भागात घडत आहेत. त्यामुळे या भागावर जाणून बुजून दुर्लक्ष होत आहे. असा माझा समज आहे. वॉर्ड क्र.१४ मधील रसता रुंदीकरणाच्या कामानंतर रस्त्याचे मध्ये असलेले पोल हटविण्याबाबत अनेकवेळा सर्व्हे झाला तरी पोल हटविण्यात आला नाही. या भागातील शाळेत लाईटची व्यवस्था नाही. विद्युत विभागाकडून देण्यात आलेल्या अहवालात दहा पोलवर फिक्चर लावण्यात आले आहेत. अशी माहिती देण्यात आली पण प्रत्यक्षात पाच पोलवर फिक्चर बसविण्यात आले आहेत. सभागृहात अधिकाऱ्यांना आदेश दिले जातात पण त्यांचे पालन होत नाही. करिता मा.महापौरांनी अधिकाऱ्यांना कामाबाबत मुदत ठरवून द्यावी म्हणजे कामास गती मिळेल.

अतिरिक्त शहर अभियंता : एमआयडीसी भागात सोडीयम दिवे लावण्याचे सर्व साहित्य उपलब्ध झाले आहे. तेव्हा ताबडतोब काम करण्यात येईल. हे काम दोन महिन्यात पूर्ण करण्यात येईल.

श्री. काशिनाथ कोकाटे : वॉर्ड क्र.२० अविष्कार कॉलनी भागात पोल रोवण्याबाबत स.नगरसेविका व स्थायी समिती सदस्य यांनी एक वर्षापूर्वी पत्र दिले आहे त्याची दखल घेण्यात आली नाही याचा अर्थ का? १ पोल का रोवण्यात आले नाही. याशिवाय महापालिकेकडून सिडकोकडून न हस्तांतर करुन घेतलेल्या भागात लाईटचे काम होत नाही. स्मशानभूमीतील लाईटची दुरावस्था वाईट आहे. त्या ठिकाणी पोल नाहीत. यासाठी अंदाजपत्रक मंजूर करुन आवश्यक त्या सुविधा लवकर देण्यात याव्यात. ही कामे किमान एक महिन्याच्या आत पूर्ण करावीत.

अतिरिक्त शहर अभियंता : कामधेनू कॉलनी बाबत खुलासा करण्यात आला आहे. अविष्कार कॉलनी भागातील पोलची व्यवस्था करण्यात आली आहे. आणखी नविन पोलची आवश्यकता असल्यास ती करण्यात येईल.

सौ. पद्‌मा शिंदे :अविष्कार कॉलनी हा म्हाडाचा भाग एप्रिल पूर्वीच १७ दिवस अगोदर म्हणजेच मी निवडून येण्यापूर्वी महापालिकेच्या ताब्यात आला आहे. या भागात दहा पोल रोवण्याबाबत मा.श्री.जैस्वाल साहेब सभापती असताना मंजूरी दिली आहे. वारंवार तक्रारी केल्या तरीही अद्याप पोल बसविण्यात आले नाही. अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देतात.

मा.महापौर : संबंधित अधिकाऱ्यांनी स.सभासदांच्या सूचनेची नोंद घ्यावी. १५०० पोल लावण्याचे काम पूर्ण झाले आहे. तेव्हा ज्या ज्या भागात पोल लावले गेले नाहीत अशा भागात नविन पोल लावताना प्राधान्याने पोल रोवण्याचे काम करण्यात यावे सिडको हा महापालिकेचाच एक भाग आहे.

श्री. सुदाम सोनवणे : वॉर्ड क्र. १७ मध्ये जाधववाडी भागात २४ पोल व सुरेवाडी भागात ५० पोल रोवण्यात आले व अद्याप विद्युत कनेक्शन देण्यात आले नाही. १९८१ साली ५००० पोल असतानां १२ गँग काम करीत होत्या. आता १६०० पोल असतानाही १० गँग काम करीत आहेत. कर्मचाऱ्यांची संख्या वाढण्याऐवजी कमी झाली आहे. दिवाळीपूर्वी या भागातील लाईट चालू करण्यात यावे सिडकोकडील स्लम भागात महापालिकेने ताब्यात घेतले आहेत. शहराप्रमाणे सिध्दार्थनगर जाधववाडी भागात साफसफाई होत नाही. फवारणी होत नाही. याकडेही लक्ष देण्यात यावे.

मा.महापौर : स.सभासदांनी साफसफाई बाबत जी सूचना केली आहे त्याबाबत प्रशासनाने दखल घ्यावी. तसेच विद्युत विभागाबाबत ज्या सूचना मांडल्या आहेत त्याची दखल घेवून त्वरित कार्यवाही करावी.

सौ. आबेदा बेगम : वॉर्ड क्र. २८ मध्ये ३५ पोल रोवण्याची माहिती चुकीची आहे. या भागात फक्त २८ पोल रोवण्यात आले आहेत. लाईटची व्यवस्था वाईट आहे. नवीन लाईट लावला तरी आठ दिवसात पुन्हा बंद होतो. रोशनगेट भागात लाईट नाही.

श्री. महंमद मुश्ताक : लाईट विषयावर विशेष सभा घेण्याची आवश्यकता नव्हती. लाईट बाबत दोन प्रकारच्या तक्रारी आहेत. १. नगरसेवकांच्या आहेत. २. लाईट विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या काही अडचणी आहेत. सार्वजनिक दिवा बत्तीवर मराविं मंडळाचे नियंत्रण आहे. या विभागाकडून महापालिका कर्मचाऱ्यांना लाईनमन वेळेवर मिळत नाहीत. मनपाचे लाईनमन काम करीत नाही. असा प्रश्न नाही. पण त्यात काही दुरुस्ती करण्याची गरज आहे. त्या बाबत सूचना १. प्रत्येक विभागनिहाय साहित्याचे एक रजिष्टर ठैवण्यात यावे २.

प्रभाग निहाय पोलनंबर व नकाश असावा. ३. लाईनमनने रोज लाईटची पाहणी करावी. ४. काही मेनरोड नगरसेवकांच्या हद्दीत येत नाही. अशा रोडवरील लाईटबाबत विशेष लक्ष लाईमनने देणे आवश्यक आहे. ५. गल्लीच्या किंवा रस्त्याच्या वळणाचे ठिकाणी मर्क्युरी लाईट लावण्यात यावे. जेणेकरुन गल्ली किंवा रस्त्याच्या मधील लाईट बंद असल्यास मर्क्युरीमुळे त्या ठिकाणीही उजेड राहू शकेल. ६. आवश्यक पोल बाबत सर्व्हे करण्यात यावा व त्याप्रमाणे नवीन पोल बाबत तरतुद करण्यात यावी. ८. आवश्यकतेनुसार कर्मचारी वर्ग वाढण्यात यावी. ९. सार्वजनिक दिवाबत्तीसाठी वापरण्यात येणारे मर्क्युरी लाईट निकृष्ट दर्जाचे आहेत. त्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

सौ. नुरजहाँ बेगम : स.सभासद श्री. मुश्ताक अहेमद यांच्या विचाराशी सहमत आहे. महापालिकेचे लाईनमन बरोबर काम करतात. पण ह्या कामासाठी सध्या असलेला कर्मचारी वर्ग कमी पडतो तो वाढविण्यात यावा. लाईनमन ने बंद दिव्याबाबत रोज पाहणी करावी व दुसऱ्या दिवशी दिवे चालू करावेत म्हणजे तक्रारी कमी होतील. स.सदस्य मुश्ताक अहेमद यांचे विचारांशी सहमत आहे.

श्री. जावेद रज्जाक : वॉर्ड क्र.३६ करिता सहा पोल मंजूर करण्यात आले आहत. त्यापैकी फक्त पाच पोल रोवण्यात आले आहे. या पोलपैकी एका पोलवर ट्युब बसविण्यात आली आहे. या बाबत वारंवार सूचना देवूनही काम होत नाही. निजामोद्दीन दर्गा हा रहदारीचा रस्ता आहे. या रस्त्यावर पोल वाकला आहे. त्यामुळे तार खाली आली आहे. अपघात होण्याचा संभव आहे. याबाबतही अनेकवेळा सूचना केली आहे कार्यवाही होत नाही.

मा.महापौर : स.सभासद श्री. मुश्ताक अहेमद यांनी महत्त्वाचे असे अकश मुद्दे मांडले आहे. त्याची दखल प्रशासनाने घ्यावी. त्याचबरोबर स.सभासद श्री. जावेद रज्जाक सौ. मोहसिना बिल्कीस सौ. जाहेदा बेगम यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्याची दखल प्रशासनाने घ्यावी. खास करुन दर्गा रोडवर वाकलेल्या पोल बाबत त्वरीत कार्यवाही करावी.

श्री. किशोर तुळशिबागवाले : अभिमन्यू टॉकीज ते चौराहा या रस्त्यावर लाईटची व्यवस्था करण्याबाबत फेब्रुवारी ९६ ला पत्र दिली आहे. त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्याबाबतचे साधे उत्तरही देण्यात आले नाही. चौकशी केली असता अंदाजपत्रकावर चर्चा झाली नाही असे कळले. काही ठिकाणी फोरसट लावण्याची सूचना केली होती. त्याबाबतही व्यवस्था करण्यात आली नाही.

अतिरिक्त शहर अभियंता : अभिनय टॉकीज ते चौराहा हा मुख्य रस्ता आहे. शासकीय अनुदानातून सोडीयम व्हेपरची जी कामे हाती घ्यावयाची होती ती कामे निश्चित झाली होती. त्यामुळे या कामास तरतुद उपलब्ध करुन देता आली नाही. यावर्षी हे काम हाती घेण्यात आले आहे.

मा. महापौर : स. सभासदांनी फोरसेट लावण्याबाबत केलेल्या चुचनाशी संबधी त्यांनी दखल घेऊन काम लवकरात लवकर करून द्यावे.

श्री. हमीद उद्दीन ताबा : विद्युत साहित्य नसल्याने काही कामे अर्धवट राहिली आहेत. मरावि मंडळातर्फे योग्य सहकार्य मिळत नाही. त्यामुळे तक्रारी वाढत आहेत. लाईट विभागासाठी कर्मचारी वर्ग वाढविण्यात यावा. वॉर्डातील सार्वजनिक दिवा बत्तीसाठी आणखी पोलची आवश्यकता आहे.

मा.महापौर : स.सभासदांच्या सूचनांशी दखल घेण्यात आली आहे. मरावि मंडळाच्या समन्वय बैठकीबाबत मा.आयुक्त खुलासा करतील.

श्री. स.अ.एकबालोद्दीन : वॉर्ड क्र. मधील लाईटचे काम चांगले आहे. जे काही दोनचार लाईट बंद आहेत ते येत्या एक-दोन दिवसात चालू होतील. विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांचे अभिनंदन.

सौ. लता दलाल : काही मुद्दे निदर्शनास आणून द्यावयाचे आहेत मनपा तर्फे शहरात उभारण्यात आलेल्या पोल बाबत पाहणीसाठी सार्व.बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांनी मा.महापौर व मा.आयुक्त यांनी चर्चा करुन त्यांचे विभागाचे विद्युत निरिक्षकांनी लवकरात लवकर पाहणी करुन अहवाल देण्याबाबत सूचना द्याव्यात जेणेकरुन उभारण्यात आलेल्या पोलवर लाईटची व्यवस्था करणे साईचे होईल. लाईट विभागाबाबत सर्वाच्या तक्रारी आहेत. पण येत्या आठ दिवसात विद्युत विभागाच्या कर्मचाऱ्यांनी चांगले करुन दिव्याची व्यवस्था केली आहे. तरी पण त्यांच्याही काही अडचणी आहेत. शहरात १५४२३ पोल आहेत. ह्या पोलवर लाईट लावण्यासाठी ३९ लाईनमन आहेत. एक लाईमन साधरण ३०० पेलचे काम पाहू शकतो. या प्रमाणे आणखी ५० लाईनमनची आवश्यकता आहे. शहराचे सात झोन आहेत. ह्या सर्व झोनकरिता फक्त ३ कनिष्ठ अभियंत्याची आवश्यकता आहे. या कनिष्ठ अभियंता यांना मदत म्हणून सहा सुपरवायझर असणे आवश्यक आहे. मनपा लाईनमन नियमाप्रमाणे पोलवर चढू शकत नसल्यामुळे मरावि मंडळाच्या लाईनमनचे कामाची वेळ वाढवून घेण्यात यावी आणि या लाईनमनना मनपा कार्यालयात येवून लाईट दुरूस्तीच्या कामावर जावे, प्रभाग निहाय तक्रारी बाबतचे रजिष्ठर ठेवण्यात यावेत. त्यात सर्व नोंदी घेण्यात याव्यात एका फ्यूज कॉल सेंटरच्या दोन/दोन वॉर्ड येतात. त्याबाबत विचार करण्यात यावा. सर्व दिव्यांच्या दुरूस्तीसाठी मनपाकडे फक्त दोन वाहने आहेत. शहरात बऱ्याच ठिकाणी ही वाहने जाऊ शकत नाही. शहरातील विद्युत पोलची संख्या लक्षात घेता आणखी दोन वाहने बंद दिवे दुरूस्तीच्या कामासाठी खरेदी करण्यात यावेत. त्याबाबतचा ठराव या सभेत ऐनवेळवर मंजूर करण्यात यावा. विद्युत विभागाकडून कामाची माहिती संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी घ्यावी आणि दूसऱ्या दिवशी क.अभियंता यांनी आदल्या दिवशी केलेल्या कामाची माहिती त्या संबंधित नगरसेवकांना देण्याची व्यवस्था करावी.

मा.महापौर : स.नगरसेविका सौ. लता दलाल यंनी चांगल्या प्रकारचे नऊ मुद्दे सभागृहात मांडले आहेत. या सूचनांची दखल घेण्यात येत आहे.

श्री. जयवंत ओक : वॉर्ड क्र.५२ मध्ये २५ पोल रोवण्यात आले आहेत. या पोलवरील लाईट केव्हा चालू होणार याचा विचार करावा. आणखी काही नविन पेल आणि काही पोल हलविण्याची आवश्यकता आहे त्याच्याप्रमाणे काही ठिकाणी मर्क्युरी लाईट बसविण्याची आवश्यकता आहे. या बाबत मागणीपत्रही दिलेले आहे. पूर्वीप्रमाणे प्रभाग निहाय रजिष्टर ठेवण्याची पध्दत पुन्हा चालू करण्यात यावी. बंद लाईट बाबत ज्या प्रमाणे नगरसेवक तक्रारी करतात त्याचप्रमाणे नागरिकांकडून तक्रारी येतात. तेव्हा नागरिकांकडून आलेल्या तक्रारी कशाप्रकारे सोडविण्या येणार याचाही विचार या ठिकाणी करण्यात

यावा. शहरातील राष्ट्रीय पुरुषांचे पुतळे अंधारात असतात. या ठिकाणी साईडचे फोकस न लावता वरुन फोकस लावण्यात यावेत.

मा.महापौर : पोल हलविण्याबाबत मा.आयुक्त सविस्तर खुलासा करतील. याचबरोबर प्रभाग निहाय रजिष्टर पध्दत सुरु करण्यात येत आहे. नागरिकांच्या तक्रारीबाबात जी सूचना करण्यात आली आहे. त्याबाबत मनपाने उघडलेले नियंत्रण कक्ष यापुढेही चालू ठेवण्याची भुमिका आहे. प्रभाग निहाय ठेवलेल्या रजिष्टरमध्येही नागरिकांकडून आलेल्या तक्रारीची दखल घेण्यात येईल. राष्ट्रीय पुतळ्याच्या ठिकाणी लाईटबाबत जी सूचना करण्यात आली आहे. त्याचीही दखल घेण्यात आली आहे.

सौ. अलका पाटील : विद्युत विभागाच्या कामाबाबत स.नगरसेविका सौ. लता दलाला यांनी ज्या सूचना मांडल्या आहेत त्याच्याशी सहमत आहे. वॉर्ड क्र.५३ मध्ये लाईटबाबत तक्रारी नाहीत. वॉर्डात सोळा पोल आहेत त्यापैकी बारा पोलवर तारा ओढण्यात आल्या आहेत. या शिवाय आणखी काही पोलची आवश्यकता आहे.

सौ. शंकुतला धांडे : वॉर्ड क्र.५४ वॉर्डात २० पोल रोवण्यात आले आहेत. त्यापैकी एक पोल हा वादात आहे. तो वादात का ठेवण्यात आला हे कळले नाही. छावणीच्या रस्त्यावरील तेरा पोल हलवायचे आहेत. यापैकी ४/५ पोल रस्त्यात आहेत. या वॉर्डात काम करणारे लाईनमन केंव्हाही भेटत नाहीत. नगरसेवक वॉर्डात स्वेच्छानिधीतून सोडीयम लाईट लावण्याबाबत पत्र देतात अशी कामे लवकर करण्यात येत नाहीत. कर्मचारी वाढवून देण्यात यावेत.

अतिरिक्त शहर अभियंता : ज्या जागेवर पोल रोववायचा आहे. ती जागा एका खाजगी मालकीची आहे अशी माहिती मिळाली नाही. त्याबाबत चौकशी करण्यात येत आहे.

मा.महापौर : वादग्रस्त जागेबाबत अतिरिक्त शहर अभियंता यांनी लवकरात लवकर माहिती घ्यावी. तसेच समन्वय बैठकीत ठरल्याप्रमाणे पोल हलविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

श्री. अ.रशिद खान (मामू) : वॉर्ड क्र.५५ लाईनमन वाढविण्याऐवजी हेल्पर वाढविण्यात यावेत. बंद दिव्याच्या दुरूस्तीसाठी ढकलगाडीचा उपयोग केल्यानंतर मराविमंडळाच्या लाईनमनची गरज भासणार नाही. आणि ही गाडी हेल्पर ढकलू शकतात. नविन रोवण्यात आलेल्या पोलवर तिसरी लाईन लवकर ओढण्यात यावी. त्यासाठी आवश्यक फी मराविमंडळाकडे भरण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना सर्विस वायर घेणे सोईचे होईल. दिवसा केलेल्या दुरुस्तीच्या कामाची रात्रीच्या वेळी पाहणी करण्यात यावी. यामुळे किती लाईट चालू आहे हे कळू शकेल. अनेक ठिकाणी पालवर लावण्यात आलेल्या लाईटवर झाडांच्या फांद्या येतात. यासाठी अशा फांद्या तोडण्यासाठी कायम स्वरुपी कर्मचारी नेमण्यात यावा. मनपातर्फे जी आयपोल रोवण्यात आले आहेत या पोलवर लाईनमनला चढता येत नाही. त्याऐवजी दुसरे पोल रोवण्यात यावेत. ज्या लाईनमनच्या वॉर्डात वर्षभरात तक्रार येणार नाही. अशा लाईनमन करिता बक्षिस योजना ठेवण्यात यावीत. अशा प्रकाराने कामात सुधारणाही होईल. लाईनमन कोणत्या ठिकाणी बंद दिव्याच्या दुरूस्तीचे कामासाठी गेले आहेत याची माहिती होण्यासाठी कार्यालयात लाईनमनचे नाव आणि त्यासमोर त्या दिवशी करण्यात येणाऱ्या

कामाची माहिती दर्शविणारा फलक लावण्यात यावा. बंद दिव्याची तक्रार त्वरीत सांगण्यासाठी पोलवर नंबर टाकण्यात यावेत. त्याचबरोबर वॉर्ड नंबरही देण्यात यावे.

मा.महापौर : स.सभासदांनी चागल्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार पोलवर नंबर टाकणे लाईनमनच्या नियमित कामाचा फलक या सूचनाची दखल संबंधित विभागाने घ्यावी.

कु.माया लाडवाणी : वॉर्ड क्र.५७ वॉर्डात लाईटबाबत फार थोड्या तक्रारी आहेत. बाबा पेट्रोल पंप ते क्रांतीचौक या रोडवर ज्याप्रमाणे डबल लाईन टाकण्यात आली आहे. तशी डबल लाईन सतिश मोटार ते निराला बाजार या रोडवर टाकण्यात यावी. याचबरोबर बाबा पेट्रोल पंप ते बस स्टॅण्ड या रोडवरही डबल लाईन टाकण्यात यावी.

मा.महापौर : स.नगरसेविका यांच्या सूचनेप्रमाणे रोडवर डबल लाईन टाकण्याची कार्यवाही संबंधित विभागाने करावी.

डॉ.भागवत कराड : वॉर्ड क्र.५८ वॉर्डातील लाईट व्यवस्थेबाबत समाधानी आहे. तरीपण शहराच्या लाईट बाबत काही सूचना देत आहे.

नविन पोल लावण्यापूर्वी मरावि मंडळाची परवानगी अगोदर घेणे योग्य झाले असते. यापुढे तरी याबाबीची दखल घ्यावी.

बंद दिव्यांची दुरूस्ती करतांना प्रथम सबंधित वॉर्डात गाडी आल्यानंतर कनिष्ठ अभियंता यांनी संबंधित चौकातील लाईट बंद होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

लाईटच्या कामाचे खाजगीकरण केल्यास मनपास आर्थिक लाभ होतो काय? याची प्रोयोजित तत्त्वावर चाचणी घेण्यात यावी.

लाईट दुरूस्तीसाठी वापरण्यात येणाऱ्या भाड्याने एका दिवसात कमीत कमी १५ लाईट दुरूस्तीचे काम केले पाहिजे. असे बंधन टाकण्यात यावेत. या गाडी बरोबर कामाचा चार्ट असावा.

मा.महापौर : स.सभासदांनी चांगल्या सूचना मांडल्या आहेत. त्यातील खाजगी करण्याची सूचनाही विशेष आहे. त्याबाबतही विचार विनिमय चालू आहे. अ.क्र. ५ च्या सूचनेची संबंधित विभागाने दखल घ्यावी.

सौ. सविता आव्हाड : वॉर्ड क्र. ५९ वॉर्डात नविन सहा पोल रोवले पण त्यावर तारही ओढले नाहीत आणि लाईटही लावले नाहीत.

मा.महापौर : स.नगरसेविकाच्या सूचनाची दखल घेवून त्याप्रमाणे संबंधिताने कार्यवाही करावी.

सौ. निर्मला कांबळे : वॉर्ड क्र.६० वॉर्डात नविन दहा पोल उभारण्यात आले पण त्यावर वायर ओढण्यात आलेली नाहीत. प्रिट्रेव्हल ते ............ हॉस्पीटल पर्यंतचे पूर्ण लाईट बंद आहेत.

मा.महापौर : स.नगरसेविका यांच्या सूचनाची संबंधित विभागाने योग्य ती दखल घेवून कार्यवाही करावी.

श्री. गजानन बारवाल : वॉर्ड क्र.६६ शहराचा महापौर या नात्याने सविस्तर अशा सूचना देण्यात आल्या आहेत या सूचनांची दखल संबंधित विभागाने घ्यावी तसेच प्रभागातील लाईटच्या कामाबाबतही सूचना देण्यात आल्या आहेत. त्याची दखल संबंधित विभागने घ्यावी. स.सभागृह नेता यानी सभागृहात मांडलेल्या सूचनेप्रमाणे नागरिकांची दूरध्वनी वरुन लाईटबाबत तक्रार केली तरी त्यांची संबंधित विभागाने दखल घ्यावी या शिवाय महापौर या नात्याने शहरातील

गृहनिर्माण संस्था, विविध संघटना, नागरिक यांनी लाईट बाबत दिलेली पत्रके आवश्यक ती सूचना देवून संबंधित विभागाने दखल घ्यावी. या पत्रकाबाबत कार्य कार्यवाही झाली या बाबतचा अहवाल संबंधित विभागाने दाखल करावा.

श्री. गंगाधर गाडे : वॉर्ड क्र.६५ बाबतच्या सूचना अपेक्षित असल्याने आयाजित करण्यात आलेल्या सभेबाबत अभिनंदन तक्रार आल्यानंतर लावण्यात आलेला लाईट हा ५/६ दिवसानंतर पुन्हा बंद पडत असल्याची सूचना स.सभासदांनी सभागृहात मांडली आहे. या बाबीचा खोलवर विचार करण्यची गरज आहे. लावण्यात येणारे साहित्य योग्य आहे का वापरण्यात येणाऱ्या साहीत्य आय.एस.आय. मार्कचे आहेत का, याचाही विचार होणे आवश्यक आहे. लाईटबाबतच्या नगरसेवकाकडून तक्रार आली की, लाईट लावावयाचा आणि बंद झाला की, पुन्हा काढून लावावयाचा एवढच काम करुन भागणार नाही तर ज्या संस्था किंवा कंपनी या कामासाठी साहित्य पुरविते ते साहीत्य योग्य प्रकरचे आहे किंवा नाही, निविदा अटीनुसार साहित्य पुरविण्यात आले किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची आहे अशी पाहणी केली असता पुरविण्यात आलेले साहित्य निविदा अटीनुसार नाही असे निदर्शनास आल्या नंतर पुन्हा भागविण्यात आलेल्या निविदामध्ये पूर्वीच्याच पुरवठाधरकास साहित्य पुरविण्याची निविदा दिली गेली नाही ना या बाबत खुलासा होणे आवश्यक आहे. मिळालेल्या माहितीनुसार काही ठराविक साहित्य ठराविक संस्थेकडूनच खरेदी केले जाते. हे साहित्य योग्य प्रकारचे नाही असा अनुभव आल्यानंतही वारंवार त्याच संस्थेकडून साहित्य खरेदी का करण्यात येते हे कळत नाही. निविदा मागविल्यानंतरही निविदा शर्तीनुसार संस्था मालपूरवठा करत नसेल तर प्रशासनाने या बाबत आपले अधिकार वापरवेत. आणि पुढे अशा संस्थाना आदेश दिल्या जाणार नाहीत अशी कार्यवाही करावी या ऐवजी नामांकीत आय.एस.आय. मार्क असलेल्या कंपन्याना साहित्याचा पुरवठा करण्याबाबतचे आदेश देणे असलेल्या कंपन्यांना साहित्याचा पुरवठा करण्याबाबतचे आदेश देणे योग्य होईल. कार्यालतयातून शहाच्या विविधी भागात लावण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याबाबत स्टॉक रजिष्टर ठेवण्यात यावे दिवा बत्तीच्या कामासाठी आवश्यक तो कर्मचारी वर्ग वाढविण्यात यावा. मरावि मंडळ ही धंदेवाईक संस्था आहे. सदर संस्था मनपाच्या जागेवर पोल उभारुन त्यावर भाडे आकारते. स्टॉक रजिष्टर ठेवल्यामुळे कोणत्या ठिकाणचा पोल बंद आहे. त्यावर पूर्वी कोणते कंपनीचे साहित्य लावण्यात आले होते. बदलेले साहित्य कोणत्या कंपनीचे आहे. याची माहिती घेण्यासाठी स्टॉक रजिष्टर ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वतंत्र क्लार्क ठेवण्यात यावा. यामुळे कोणत्या वॉर्डात लाईट लावण्यात आला तो किती दिवसांनी बंद पडला याची माहिती होईल. लाईट दुरूस्तीच्या कामासाठी मरावि मंडळाचे लाईनमनवर मनपाला विसंबून राहावे लागते. त्यामुळे मनपाचे अधिकारी हतबल होतात. मरावि मंडळाकडून लाईनमन वेळेवर मिळत नाहीत. तेव्हा मंडळाचे लाईनमन प्रतिनियुक्तीवर घेतल्यास त्यांच्या मनपा अधिकाऱ्यांवर अंकुश राहील व कामात सुसूत्रता येईल व मनपा व मंडळ यांच्यात सहयोग राहील.

मा.महापौर : सार्वजनिक दिवा बत्तीच्या कामासाठी खरेदी करण्यात येणारे साहित्य हे आयएसआय मार्कचेच खरेदी करण्यात येते. याशिवाय स.सभासदांनी सूचविल्याप्रमाणे महापालिका जागेवर मरावि मंडळाचे उभे करण्यात आलेल्या पोलच्या जागेचे आकारणी बाबत ठराव मंजूर करण्यात आला. मरावि मंडळाचे लाईनमन मनपाकडे प्रतिनियुक्तीवर घेवून दिवाबत्तीच्या कामात सुधारणा घडवून आणल्या बाबत स.सभासदांनी जी सूचना केली आहे त्याबाबत सभागृहात ठराव घ्यावा लागेल. स.सभासदांनी याशिवाय आणखी काही चांगल्या सूचना केल्या आहेत. त्याची दखल घेण्यात येत आहे .

श्री. प्रकाश निकाळजे : वॉर्ड क्र. ६८ बंद असलेले दिव्यांची दुरूस्तीचे काम सकाळी करुन गेल्यानंतर त्याच दिवशी सायंकाळी दुरूस्त केलेले दिवे बंद असतात. यावरुन दिवाबत्तीच्या कामासाठी वापरण्यात येणारे सर्वच साहित्य आयएसआय मार्कचे असले तर त्यापैकी काही भाग किरकोळ कंपनीचे असतात. सातारा रोडवरील एमआयटी कॉलेज ते तरुण भारत कार्यालयापर्यंतच्या रस्त्यावरील रहदारी विचारात घेता या भागात लाईट व्यवस्था करणे आवश्यक आहे. संजय सोसायटी या भागात लाईट लावण्या बाबात वारंवार सूचना देवूनही लाईट लागलेले नाहीत. वॉर्ड क्र.६८ मध्ये असलेल्या स्मशान भूमी मर्क्युरी लाईटची व्यवस्था असणे आवश्यक आहे. सार्वजनिक दिवा बत्तीची दुरूस्ती वेळेवर न झाल्याने नागरिक सारख्या तक्रारी करतात. सार्वजनिक दिवा बत्तीच्या कामासाठी चांगल्या प्रकारचे साहित्य खरेदी केल्यास वारंवार येणाऱ्या तक्रारी दूर होण्यास मदत होईल. झोपडपट्टी भागात लाईट व्यवस्था चांगली राहील अशी व्यवस्था करण्यात यावी.

मा.महापौर : स.सभासदांनी त्यांचे विचार चांगल्याप्रकारे मांडले आहेत. स्मशान भूमीत जे लाईट बंद असतील ते त्वरीत चालू करण्याची व्यवस्था संबंधित विभागाने करावी. तसेच संजय सोसायटी भागात गेल्या पाच सहाया वर्षापासून त्या भागात वसाहत झालेली आहे ही बाब लक्षात घेता त्या ठिकाणी रोवण्यात आलेल्या पोलवर तारा ओढण्याचे काम त्वरीत करण्यात यावे.

श्री. संजय जोशी : वॉर्ड क्र.६९ सार्वजनिक दिवे चालू करण्याचे काम सध्या मरावि मंडळाकडे आहे. हे काम महापालिकेकडे घेण्यात यावे. सार्वजनिक रस्त्यावरील लाईट बंद असल्यची तक्रार फ्युज कॉलला दिली तर त्या ठिकाणी हे काम मनपाकडे आहे असे सांगण्यात येते. त्यामुळे नागरिकांचा गोंधळ होतो. बंद लाईटची तक्रार देणे नागरिकांना सोईचे व्हावे या दृष्टीने झोन कार्यालयात तक्रार निवारण केंद्र देण्यात यावे. आणि त्या त्या भागाचे क.अभियंता यांनी झोनमध्ये रोज सकाळी भेट देवून आलेल्या तक्रारी नोंद घ्यावी व बंद लाईट च्या तक्रारीचे निवारण करावे. मरावि मंडळातर्फे शहरात विविध ठिकाणी डीपी बसविण्यात येताना अशा डीपी उभारणीपूर्वी संबंधित विभागाने मनपाची परवनगी घेतल्याशिवाय डीपी उभारण्याचे काम करु नये जेणे करुन रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या किंवा डीपी हलविण्यासाठी मनपाला सोसावा लागणारा आर्थिक खर्च वाचेल.

मा.महापौर : स.सभासद श्री. जोशी यांनी महत्त्वपूर्ण अशा सूचना केल्या आहेत त्या नागरिकांच्या सोईचे दृष्टीने झोन कार्यालयात बंद दिव्याबाबतचे तक्रार

निवारण केंद्र उघडण्याच्या सूचनेचा समावेश आहे. नागरिकांनी संबंधित झोन कार्यालयात बंद लाईट बाबत सूचना केली तरी त्याची दखल घेण्यात येते. याशिवाय मनपाच्या परवानगीशिवाय कुठेही डीपी उभारण्यात येणार नाही. या सूचनेची संबंधित विभागाने दखल घ्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : वॉर्ड क्र.७० सार्वजनिक दिवाबत्तीच्या कामासाठी हैड्रोलिक लेडर खरेदीसाठी मंजूरी मिळाली असून त्याबाबतची रक्कमही भरण्यात आलेली आहे. पण अद्याप हैड्रोलिक लेडर आलेले नाही. या दोन गाड्या सार्वजनिक दिवाबत्तीच्या कामासाठी आल्यास बंद लाईटचे दुरुस्तीच्या कामात बरीच मदत होणार आहे. शहरात अनेक ठिकाणी लहान लहान गल्ली बोळा आहेत. त्याचप्रमाणे मनपाने सुध्दा पोलक्रमांक आणि वॉर्ड क्र.१ पोलवर नोंदविण्यास यावेत. जेणे करुन नागरिंकाकडून कोणत्या पोल बाबत आणि कोणत्या वॉर्डातील पोल आहे याची तक्रार आली आहे. याबाबत माहिती मिळणे व नागरिकांना तक्रार करतांना पोलनंबर देणे सोईचे घेईल. शहरात बऱ्याच ठिकाणी आयलॅण्ड लाईट बंद आहेत. त्याची त्वरित दुरूस्ती करण्यात यावी. सिडको विभागातर्फे फिक्चर तयार ठेवण्यात येतात. बंद लाईट बाबत तक्रार आल्यास किरकोळ दुरूस्ती असेल तर ती ताबडतोब करण्यात येते पण जर मोठ्या प्रमाणावर पोलवर असलेल्या फिक्चरची दुरूस्ती करावी लागणार असेल तर अशा प्रसंगी तयार असलेला फिक्चर त्या ठिकाणी बसविण्यात येतो. व त्या दुरूस्त काढलेल्या फिक्चर दुरूस्तीसाठी ठेवण्यात येतो. अशी पध्दत मनपातर्फे चालू करण्यात यावी. यामुळे वेळेची बचत आणि जास्तीचे काम होण्यास मदत मिळेल. शहराचा वाढता विचार लक्षात घेऊन प्रशासनाने लाईटकरिता दोन अभियंते नेमलेले आहेत. पण या विभागात आवश्यक तो कर्मचारी वर्ग अद्याप पुरविण्यात आला नाही. याशिवाय लाईट विभागाकरिता कार्यकारी अभियंता हे पद भरण्यात यावे. नवरात्रोत्सव, गणशोत्सव या काळात लाईट विभागातर्फे उत्कृष्ट असे काम करण्यात आले आहे. त्याबद्दल अभिनंदन स.सभासद श्री.गंगाधर गाडे यांनी केलेल्या सूचनेबाबत खुलासा करण्यात येतो की, यावर्षी स्थायी समितीने स्थानिक विक्रेत्याकडून साहित्य खरेदी न करता नामांकित म्हणजेच फिलिप्स/बजाज अशा कंपन्याकडून साहित्य खरेदीस मंजूरी दिली आहे. या ट्युबवर मनपाच्या नावाचा सिक्काही भरण्यास मंजूरी दिली नाही. त्यामुळे साहित्यात होणाऱ्या अफरातफरीच्या तक्रारी आणि दर्जाचा माल वापरण्यात आल्याच्या तक्रारी कमी होण्यास मदत होईल.

अतिरिक्त शहर अभियंता : बंद दिव्याच्या दुरूस्तीसाठी लागणारे हैड्रोलिक लॅडरबाबतच्या चॅसिस आल्या आहेत. त्यावर हैड्रोलिक लॅडर उभारण्यासाठी निविदा मागविण्यात प्राप्त झाली आहे. त्यासाठी पुन्हा निविदा मागविण्यात येत आहे.

मा.महापौर : स.सभापती श्री. गिरजाराम हाळनोर यांना महत्त्वपूर्ण अशा सूचना केल्या आहेत त्याप्रमाणे बंद लहान लहान गल्ली बोळातील बंद दिवे दुरुस्तीच्या कामासाठी चाक असलेली सिडी, आयलॅण्ड वरील बंद असलेले दिवे दुरूस्तीच काम या बाबत संबंधित विभागाने योग्य ती दखल घ्यावी आणि बंद असलेले दिवे नियमीत चालू राहतील अशी व्यवस्था करावी.

सौ. ज्योत्स्ना हिवराळे : लाईटच्या तक्रारी बाबत प्रत्येक तीन महिन्यात घेण्यात यावा. लाईटचे उपअभियंता बंद लाईटच्यिा तक्रारीबाबत उडवा उडवीची उत्तरे देतात. नागरिकांची कामे होत नाहीत. महुनगर भागात लाईन शिफ्टींगबाबत वारंवार सांगूनही कामे होत नाहीत. याबाबत कार्यवाही का झाली नाही याचा खुलासा करण्यात यावा. मरावि मंडळाने याबाबत कोटेशनही मनपाकडे पाठविलेले आहे.

अतिरिक्त शहर अभियंता : महुनगर येथील लाईन शिफ्टींगबाबतचे प्रकरण मरविमंडळाकडे पाठविलेले नाही. ते पाठविण्यात येईल.

मा.महापौर : लाईन शिफ्टींगबाबतचे जी जी प्रकरणे असतील त्याबाबत अतिरिक्त शहर अभियंता यांनी पाठपुरावा करावा. तसेच त्याबाबतचे चार्जेस भरण्याची कार्यवाही करुन काम लवकर करून घ्यावे.

श्री. महंमद मुश्ताक : लाईटबाबतच्या तक्रारीवर सभागृहात चर्चा होत आहे. तेव्हा या बाबतचे एक बुक तयार करण्यात यावे. म्हणजे सभेत त्याबाबत माहिती घेता येईल या सर्व चर्चेबाबतचा एक प्रस्ताव तयार करण्यात यावा.

मा.महापौर : विशेष सभेतील चर्चेबाबतची माहिती या ठिकाणी राहणारच आहे.

श्री. राजकुमार बचाटे : वॉर्ड क्र.७३ लाईटच्या कामासाठी सहकार्य मिळते त्याबद्दल अभिनंदन. लाईट लावल्यानंतर दुसऱ्या दिवशी लावलेला लाईट बंद होतो याबाबत स.सभासद श्री. गाढे यांनी जी सूचना केली आहे ती योग्य वाटते्. लाईटच्या तक्रारी दूर करण्याचे काम झोन कार्यालयास व्हावे तसेच मोंढा नाका ते तानाजी चौक या रस्त्यावरील सोडीयम व्हेपरचे बसविण्याच्या कामासाठी मंजूरी मिळाली आहे. पण त्याबाबत कार्यवाही का झाली नाही याचा खुलासा व्हावा.

अतिरिक्त शहर अभियंता : मोंढा नाका ते तानाजी चौक या रस्त्यावर सोडीयम व्हेपरचे दिले लावण्याबाबतचा प्रस्ताव कार्यवाहीसाठी अद्याप हाती घेण्यात आलेला नाही.

मा.महापौर : स.सभासदांनी सूचविल्याप्रमाणे सोडीयम व्हेपरचे दिवे लावण्याचा ठराव मंजूर झालेला आहे. तेव्हा संबंधित विभागाने याची दखल घ्यावी व कार्यवाही करावी.

सौ. राधाबाई तळेकर : वॉर्ड क्र.७४ वॉर्डात लाईट बाबत काही तक्रारी नाही. त्रिमुर्ती चोकात अपघात होतात ही बाब लक्षात घेता त्या ठिकाणी पोल रोवणे आवश्यक आहे. सदर काम दिवाळीपर्यंत पूर्ण व्हावे. शहरातील पोलवर पोलनंबर व वॉर्डनंबर देण्यात यावेत. जेणेकरुन तक्रार करतांना निश्चित माहिती देणे सोईचे होईल. सार्वजनिक दिवाबत्तीच कामासाठी चांगल्या कंपनीचे साहित्य वापरण्यात यावे. वॉर्डाकरिता १५ पाल मंजूर करण्यात आले होते. ते रोवण्यात आले असून त्यापैकी अकरावर पोलवर तारा ओढण्यात आल्या आहेत. त्यावर लाईट लावण्यात आले नाहीत. ते दिवाळीपूर्वी लावण्यात यावेत.

मा.महापौर : स.नगरसेवका यांनी महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या आहेत. त्यापैकी त्रिमूर्ती चौक हा महत्त्वपूर्ण चौक आहे. या ठिकाणी पोल व ट्रिसेट फिटींग टाकण्यात यावे. रोवण्यात आलेल्या १५ पोलवर लाईट बसविण्यची व्यवस्था संबंधित विभागाने करावी.

श्री. नरसिंग ढगे : वॉर्ड क्र. ७५ विद्युत विभागात कर्मचारी वर्ग वाढविण्याबाबत स.स.गौतम खरात यांनी केली आहे. पण या दिवसात शहरात जी कामे झाली त्याच पध्दतीने विद्युत विभागाने काम केले तर लाईटबाबतच्या तक्रारी कमी होण्यास खूपच मदत होईल. याशिवाय ज्या मोठ्या लाईन टाकण्याचे काम केले जाते. ते काम गुत्तेदारामार्फत केले जाते. या कामाची वर्षभर देखभाल करण्यास काम त्याच्या गुत्तेदाराच असते. पण प्रत्यक्षात तसे घडत नाही. उदा.द्यावयाचे झाले तर वॉर्डात गजानन महाराज मंदिर रोड लाईटचे काम झाले पण अर्धवट आहे. याबाबत गेल्या वर्षभरापासून सूचना देण्यात येत आहे. दरवेळा गाडी नाही असे उत्तर दिले जाते. गेल्या दिड वर्षाच्या काळात वॉर्डात लाईटचे कामाकरिता फक्त तीन वेळेस गाडी देण्यात आली आहे. याची दखल घ्यावी. तसेच वॉर्डात जो मर्क्युरी बल्ब लावण्यात येतात ते नगरसेवक स्वेच्छानिधीतूनच लावले जातात का निधितून लावण्यात येतात याचा खुलासा करण्यात यावा.

अतिरिक्त शहर अभियंता : गजानन महाराज मंदिर ते दर्गा रोडवरील लाईटची पाहणी केली त्यावेळी ते लाईट चालू होते (नवरात्र काळात) आता लाईट फ्यूज गेल्यामुळे बंद आहेत किंवा इतर कारणासाठी बंद आहेत याची पाहणी करावी लागेल.

मा.महापौर : स.सभासदांनी गजानन महाराज मंदीर ते दर्गा रोडवरील लाईट बंद असल्याबाबतची सूचना केली आहे. हा रस्ता मुख्य रस्ता (व्ही.आय.पी.) असून त्यावर बरीच रहदारी वाढली आहे. याचा विचार करता संबंधित विभागाने बंद लाईटबाबत दखल घ्यावी. तसेच दीडवर्षाच्या काळात लाईट दुरूस्तीसाठी फक्त तीन दिवस गाडी मिळाली ही बाब योग्य नाही याचीही दखल संबंधित विभागाने घ्यावी.

श्री. विठ्ठल जाधव : वॉर्ड क्र.७६ लाईट विभागाच्या कामाबाबत सभा बोलावण्यात आली. त्याबद्दल अभिनंदन वॉर्डात २० पोल लावण्याच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. दि.१६.१०.९५ ला मराविं मंडळाने कोटेशनही दिले आहे. त्याचे पैसे केव्हा भरले याचा खुलासा व्हावा. वॉर्डातील सार्वजनिक दिवाबत्तीकरिता आणखी १०/१२ पालची आवश्यकता आहे. पुंडलिकनगर येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला आहे. या पुतळ्याच्या ठिकाणी फोकस लावण्यात यावा.

अतिरिक्त शहर अभियंता : वॉर्ड क्र.७६ चा काही भाग सिडको नोटीफाईड भागात येतो. या ठिकाणचा रस्ता तयार करण्याबाबत टिप्पणी सादर केली आहे. हा रस्ता रुंद केल्याशिवाय त्या ठिकाणी पोल टाकता येत नाही.

डॉ. विजयकुमार मेहेर : वॉर्ड क्र.७७ दिवाळीचा मोठा सण नजीक आला आहे. त्या दृष्टीने शहरातील सर्वभागात लाईट कसे लागतील याची खबरदारी घेण्यात यावी. लाईटच्या कामासाठी मनपा तर्फे जी.आय. पोल रोवण्यात येतात. त्या ऐवजी सिमेंटचे पोल वापरल्यास ते टिकावू आणि आर्थिकदृष्टया स्वस्त पडतील. यावरही विचार करण्यात यावा.

मा.महापौर : मा.उपमहापौर यांनी महत्त्वपूर्ण अशा सूचना केल्या आहेत. ाबाबीची दखल संबंधित विभागाने घ्यावी. आणि उपअभियंता यांनी पाहणी करुन त्याबाबतचा अहवाल द्यावा.

सौ. मंदा काळुसे : वॉर्ड क्र. ७८ वॉर्डाकरिता मंजूर झालेल्या पोलपैकी पाच पोल रोवण्याचे काम बाकी आहे. ते काम दिवाळीपूर्वी पूर्ण करावे. जयभवानी नगर भागात लाईटची व्यवस्था करण्यासाठी मरावि मंडळाकडून प्राप्त झालेल्या कोटेशन प्रमाणे आवश्यक ती रक्कम भरण्यात यावी. म्हणजे या भागातील लाईटची व्यवस्था लवकर होईल.

स.नगरसेवका यांनी सुचविल्याप्रमाणे जय भवानी नगर भागातील लाईट व्यवस्थेकरिता मरावि मंडळाकडील कोटेशन प्रमाणे आवश्यक ती रक्कम त्वरीत भरण्याची कार्यवाही संबंधित विभागाने करावी.

सौ. सुनंदा कोल्हे : वॉर्ड ७९ वॉडाकरिता २० पोल मंजूर करण्यात आले होते. त्यापैकी फक्त १० पोल उभारण्यात आले आहे. नगरसेवक स्वेच्छानिधीतून वॉर्डात वॉटर कुलर उभारण्याच्या कामास मंजूरी मिळाली असून वॉटर कुलरही बसविण्यात आले आहे. पण त्या ठिकाणी मिटर बसविण्यात आले नाही. तेव्हा लावण्यात आले नाही. याचा खुलासा व्हावा.

वॉर्ड क्र.७९ येथे बसविण्यात आलेल्या वॉटर कुलरच्या मीटर बाबतची आवश्यक ती रक्कम मंडळाकडे भरण्यात आली असून येत्या आठवड्यात काम पूर्ण होईल याचा खुलासा अतिरिक्त शहर अभियंता यांनी केला. त्यावर नागरिकांच्या तक्रारींना नगरसेवकांना तोंड द्यावे लागते तेव्हा अधिकाऱ्यांनी स.सभासदांना गैसमज होईल असे आश्वासन देवू नये अशी सूचना मा.महापौर यांनी दिली.

श्री. बन्सीलाल गांगवे : वॉर्ड क्र.८० हा स्लम भाग आहे. या भागातील २५ टक्के लाईट बंद आहेत. या बाबत तक्रार केली असता साहीत्य उपलब्ध नाही. असे विद्युत विभागाकडून सांगण्यात येते. वॉर्डात दहा नविन पोल बसविण्यात आले आहेत. त्यापैकी पाच पोलवर तारा ओढण्यात आल्या आहेत. उर्वरीत पाच पोलवर तारा ओढण्यात याव्यात व त्याठिकाणी लाईट बसविण्यात यावेत. वॉर्डात उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज डॉ.बाबासाहेब आंबेडकर या थोर पुरुषांच्या पुतळ्याच्या ठिकाणी फोकस लाईट बसविण्याची सूचना करण्यात आली पण अद्याप काम झाले नाही.

विद्युत विभागासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग पुरविण्यात आल्यानंतर स.सभासदांनी सुचविलेल्या २५ टक्के तक्रारी कमी होतील. नविन उभारण्यात आलेल्या पोलवर तारा ओढण्याचे काम लवकर पूर्ण करता येईल. फोकस लाईटची व्यवस्था करण्यासाठी अर्थसंकल्पात या कामासाठी तरतूद नाही. यासाठी वेगळ्या बाबीतून खर्च करावा लागतो. सर्वसाधारणपणे सोडीयम दिव्यांची जास्त प्रमाणात मागणी आहे. तशी तरतूद नाही असा खुलासा अतिरिक्त शहर अभियंता यांनी केला असता सोडीयम दिवे बसविण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्याबाबतचा विचार करण्यात येईल तथापि सध्या सोडीयम दिवे बसविण्याचे काम नगरसेवक स्वेच्छानिधीतून हाती घेण्यात यावे असे प्रतिपादन मा.महापौर यांनी केले.

श्री. कचरु नवपुते : वॉर्ड क्र.८० मधील सार्वजनिक दिवे चालू असतात आणि रात्री बंद असतात अशी परिस्थिती लाईट विभागाच्या कामाची आहे. या लाईटचे टायमर ना दुरुस्त आहे. विमानतळ ते जालना नाका या रस्त्यावर बऱ्याच मोठ्या प्रमाणात रहदारी असल्यामुळे या रस्त्यावर लाईट लावण्यात यावेत.

स.सभासदांच्या वॉर्डात बंद असलेले सार्वजनिक दिवे लवकर चालू करण्याची दखल संबंधित विभागाने घ्यावी. तसेच जालना रोडवर लाईट लावण्याची स.सभासदांची

मागणी ही जुनीच आहे. याबाबत मा.आयुक्त यांनी विशेष लक्ष देवून लाईट लावण्याची व्यवस्था करावी असे प्रतिपादन मा.महापौर यांनी केले.

सौ. रुख्मनताई लोखंडे : वॉर्ड क्र.१ विद्युत विभागाने पुरविलेल्या माहितीमध्ये वॉर्ड क्र.१ मध्ये पंधरा पोल लावण्यात आल्याचे दाखविले पण त्यापैकी एकही पोल लावलेला नाही. लोकमंगल कॉलनीत लाईटची व्यवस्था करण्याबाबत अनेकवेळा तक्रार केली विकास खर्च भरलेला आहे. या भागात अंधार असल्यामुळे चोऱ्या झाल्या आहेत. त्याबाबत खुलासा करावा छावणी मनपा नाका ते पडेगाव या रस्त्यावर अंधार असतो त्यामुळे नागरिकांना रहदारीस त्रास होतो. या ठिकाणी ही लाईटची व्यवस्था करण्यात यावी व खुलासा करावा.

वॉर्ड क्र.१ मधील लोकमंगल कॉलनी येथे पंधरा पोल लावण्यात आल्याचा खुलासा अतिरिक्त शहर अभियंता यांनी केला.

शहरातील रस्ते जलनिःसरण आणि पाणी पुरवठा लाईनच्या कामाबाबत कार्यालयास ज्या प्रमाणे संयोजन केले जाते. त्याचप्रमाणे लाईटच्या कामाबाबतही संयोजन करण्यात यावे. अशी सूचना स.सभासद डॉ.भागवत कराड यांनी मांडली.

लाईट विभागाच्या तक्रारीबाबत विशेष सभा आयोजित केल्याबाबत आघाडीच्या सभासदांतर्फे स.स.श्री.मुश्ताक अहेमद यांनी मा.महापौरांचे स्वागत करुन ड्रेनेज पाणी पुरवठा, शिक्षण यासारख्या विषयावरही विशेष सभा घेण्यात यावी व स.सभासदांना त्यांचे विचार मांडण्याची संध्यी द्यावी अशी सूचना केली.

स.सभासदांनी लाईटच्या तक्रारी निवारणासाठी चांगल्याप्रकारे विचार मांडले आहेत. लाईटच्या कामाबाबत अनेक तक्रारी आहेत. लाईट बाबत आवश्यक त्या सूचना संबंधित विभागास दिल्या आहेत. नविन पोल फोकस लाईटच्या कामाचे खाजगीकरण बंद लाईटची दुरूस्ती याबाबत महत्त्वपूर्ण अशा सूचना स.सभासदांनी केल्या आहेत त्या सूचनांची दखल घेण्यात शहराच्या विविध ठिकाणी असलेल्या महत्त्वाच्या व्यक्तींचे पुतळ्याच्या ठिकाणी फोकस बंद असता कामा नये याची दखल संबंधित विभागाने घ्यावी. भविष्यात लाईटचे काम चांगल्याप्रकारे कसे होईल याची दक्षता घेण्यात येईल असे विचार मा.महापौर यांनी मांडले.

मा.सभागृहनेता मा.विरोधी पक्षनेता यांचेकडील मागणीनुसार मा.महापौर यांनी लाईट विभागाच्या कामासाठी विशेष सभा बोलावली आहे. सभासदांच्या भावनांचा विचार करुन लाईट विभागाच्या कामाचा दूष्परिणाम दिसेल असे काम करण्याची सूचना दिल्या आहेत. आज लाईट विभागाच्या कामाबाबत अभिनंदनाचा वर्षाव झाला. यातून चांगल्याप्रकारे काम केल्यास अभिनंदनाचा वर्षाव कसा होतो ह दिसून आले आणि तो वर्षाव टिकून ठेवण्याचा प्रयत्न करेल अशाच प्रकारे इतर विषयासाठीही विशेष सभा घेण्यात याव्यात. आज शहराचा विस्तार वाढलेला आहे. ह्या शहरात १५८४३ पोल आहत या पोलवर ८१५३ ट्यूब १०२४ पोलवर मर्क्युरी दिले, २३९८ सोडीयम १०० थ्री फेस फिटींग आणि चार सेट फिटींग आहेत. ९१३ जीआय पोल आहेत याशिवाय प्रशासकीय इमारत व इतर इमारती याच काम असतंच. शहरातील स्ट्रीटलाईटची देखभाल करण्याचे काम मनपाचे नाही हे काम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचाच कर्मचारी वर्ग असतो. तो कर्मचारी वर्ग वाढवून देण्याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे केलेल्या मागणी नुसार २० गॅग वाढवून मिळाल्या आहे. महापालिकेने रोवलेले १५०० पोल दिवाळीपूर्वी चार्ज करुन देण्याचे आश्वासन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने दिले आहे.

बजाज / फिलीप्स अशा नामांकीत कंपन्याकडून लाईटच्या कामासाठी लागणारे साहित्य खरेदी बाबतच्या ऐतिहासिक निर्णय स्थायी समितीने घेतला आहे. या कंपन्याकडून साहित्य खरेदी होत असल्याने महापालिकेकडे निकृष्ट साहित्य येणार नाही. येत्या

जानेवारी-९७ पूर्वी स्ट्रिट लाईटच्या दुरूस्ती व देखभालच्या कामासाठी जी गँग मिळणार आहे. ती मिळाल्यानंतर कर्मचारी वर्ग वाढविण्याबाबतचा प्रस्ताव सभागृहापुढे ठेवता येईल. चोक/स्टार्टस कार्बन या कारणामुळे स्ट्रिट लाईटच्या तक्रारी वाढतात याचा विचार करता लाईनमन गँगमन वाढविणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने लाईट बिलाबाबत जो विलंब शुल्क आणि व्याज आकारला आहे. तो माफ करण्याचा प्रस्ताव लवकरच ठेवण्यात येईल याचबरोबर शेतकऱ्यांना ज्याप्रमाणे सवलतीच्या दरात वीज पुरविली जाते त्याच दरात महापालिकेला स्ट्रिट लाईटसाठी वीज पुरविण्यात यावी असा ठराव घेऊन शासनास त्याबाबत विनंती करण्यात येईल. असा खुलासा मा.आयुक्त यांनी केली.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ आणि महापालिका यांची एक संयुक्त बैठक झाली आहे. या बैठकीत लाईट बिलावरील व्याज माफ करणे. पोल शिफ्टींग बाबत काही अटीवर मंजूरी देण्याच्या धाडसी निर्णय झाला आहे. याच बरोबर शहरातील डी.पी.बाबतच्या प्रस्तावाचा ही विचार करण्यात येईल. सभागृहाच्या सूचनेप्रमाणे ज्या अडचणी आहे त्यासाठी चांगले साहित्य खरेदी करण्यात येणार असल्याने भविष्यात हे प्रश्न सुटतील अशी खात्री आहे. सभागृहाने विद्युत विभागातील कर्मचारी वर्ग वाढविण्याबाबत जी सूचना केली आहे. त्याबाबत प्रशासनाने योग्य ती पावले उचलावीत असे प्रतिपादन मा.महापौर यांनी केले.

सभागृहाने लाईटच्या कामाबाबत दिलेल्या महत्त्वपूर्ण सूचनांची संबंधित विभागाने दखल घेवून नजीकच्या काळात ज्याप्रमाणे चांगल्याप्रकारे काम केलेले आहे. असेच काम यापुढेही सतत करण्याची काळजी घ्यावी. शहराच्या विविध ठिकाणी असलेल्या थोर पुरुषांच्या पुतळ्यांचे ठिकाण चौरस्ता महत्त्वाचे प्रमुख रस्ते आणि अन्य रस्त्यावरील लाईट बंद राहणार नाही याची दखल घ्यावी.

याशिवाय कर्मचारी वर्ग वाढविणे, आवश्यक ती वाहने खरेदी करणे याबाबत सभागृहाच्या सुचनेनुसार, प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन गण मन" ह्या राष्ट्रगीतानंतर आजची सभा संपल्याचे मा.महापौर यांनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| नगरसचिव<br>महानगरपालिका,औरंगाबाद | मा.महापौर<br>महानगरपालिका,औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि.२०.११.९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**बुधवार दि.२०.११.९६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.महापौर श्री. गजानन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली कै.केशव सिताराम ठाकरे, सभागृहात औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस ''वंदे मातरम'' या राष्ट्रगीताने सुरूवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| स.स.श्री. विजयकुमार मेहेर | उप महापौर |
| स.स.श्री.गिरजाराम हाळनोर | स.सभासद |
| स.स.श्री.जयवंत (बंडू) ओक | --''-- |
| स.स.श्री. मुजीब आलमशाह मीर | --''-- |
| --''-- सौ.रुखमनबाई खंडेराव लोंखडे | --''-- |
| --''-- श्री.अफसरखान यासिनखाँन | --''-- |
| --''-- श्री.प्रभाकर सिताराम विधाते | --''-- |
| --''-- सौ.साजेदा बेगम | --''-- |
| --''-- श्री.म.सलिम म.हनिफ कुरैशी | --''-- |
| --''-- श्री.गौतम भागाजी खरात | --''-- |
| --''-- श्री.ॲड.गणेश किशनराव वानखेडे | --''-- |
| --''-- सौ.रजनी रमेश जोशी | --''-- |
| --''-- सौ.विमलाबाई नंदकुमार मुंडलिक | --''-- |
| --''-- सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे | --''-- |
| -''-- श्री.महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --''-- |
| --''-- श्री.अभिमन्यु रामभाऊ भालेराव | --''-- |
| --''-- श्री.नरेंद्र यादवराव पाटील | --''-- |
| -''-- श्री.काशिनाथ हरिभाऊ कोकाटे | --''-- |
| --''-- श्री.सुदाम रामदास सोनवणे | --''-- |
| --''-- श्री.सुभाष भिकाजी टाकळकर | --''-- |
| --''-- श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --''-- |
| --''-- सौ.स.फरहदबानो भ्र.मो.नवाब | --''-- |
| --''-- श्री.फजलउल्लाखाँन अजमद उल्लाखान | --''-- |
| --''-- श्री.अजीजखाँन गणीखाँ | --''-- |
| --''-- श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | --''-- |
| --''-- श्री.महंमद मुश्ताक अहेमद | --''-- |
| --''-- श्री.वसंत विनायकराव देशमुख | --''-- |
| --''-- श्री.हाजी मोहसिन अहेमद हाजी बशिर | --''-- |
| --''-- सौ.स.मोहसिना बिहकीस विखारोद्दीन | --''-- |
| --''-- श्री.अ.जावेद रज्जाक | --''-- |
| --''-- श्रीमती स.जाहेदा बेगम म.जमीर | --''-- |
| --''-- श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे | --''-- |

| | |
|---|---|
| --''-- सौ.यशोदा धनंजय वाडेकर | --''-- |
| --''-- श्री.किशोर बाबुलाल तुळशिबागवाले | --''-- |
| --''-- श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाल | --''-- |
| --''-- श्री.स.हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन | --''-- |
| --''-- श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबउद्दीन | --''-- |
| --''-- श्री.धिरज शांतीलाल खखोरडीया | --''-- |
| --''-- श्री.सय्यद अली मीरा सलामी | --''-- |
| --''-- श्री.रमेश दिपचंद लाहोट | --''-- |
| --''-- सौ.लता श्रिनिवास दलाल | --''-- |
| --''-- सौ.अल्का रमेश पाटील | --''-- |
| --''-- सौ.शकुंतला हरिदास धांडे | --''-- |
| --''-- श्री.अब्दुल रशिदखान मामू | --''-- |
| --''-- कु.माया लिंबाजी लाडवाणी | --''-- |
| --''-- डॉ.भागवत किशनराव कराड | --''-- |
| --''-- सौ.सविता संजय आव्हाड | --''-- |
| --''-- सौ.निर्मला विठ्ठल कांबळे | --''-- |
| --''-- श्री.अ.रशिद अ.सत्तार | --''-- |
| --''-- श्री.चरवेंद्रासिंह महेंद्रसिंह धिल्लन | --''-- |
| --''-- श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन | --''-- |
| --''-- श्री.विकास रतनलाल जैन | --''-- |
| --''-- श्री.गंगाधर सुखदेव गाडे | --''-- |
| --''-- श्री.मनमोहनसिंग करमसिंग ओबेराय | --''-- |
| --''-- श्री.संजय रामदास जोशी | --''-- |
| --''-- श्री.अविनाश लक्ष्मण कुमावत | --''-- |
| स.स. सौ.ज्योत्स्ना दौलतराव हिवराळे | स.सभासद |
| --''-- श्री.राजकुमार उर्फ सांडू बचाटे | --''-- |
| --''-- सौ.राधाबाई तळेकर | --''-- |
| --''-- श्री.विठ्ठल किसन जाधव | --''-- |
| --''-- सौ.मंदा धनंजय काळुसे | --''-- |
| --''-- सौ.सुनंदा उत्तम कोल्हे | --''-- |
| --''-- श्री.बन्सी तुळशिराम गांगवे | --''-- |
| --''-- श्री.भागवान देविदास घडामोडे | --''-- |
| --''-- श्री.कचरु चंद्रभान नवपुते | --''— |

दिल्ली मधील विमान दुर्घटनेत मृत झालेल्या व्यक्ती स.सभासद श्री.म.अ.रऊफ यांचे वडील माजी नगरसेवक सामाजिक कार्यकर्ते अब्दुल माबुद, उपअभियंता श्री.कलीम अख्तर यांचे वडील माजी उपशिक्षणाधिकारी शमीम अख्तर महापालिकेचे ज्येष्ठ स्वच्छता निरिक्षक अशोक प्रामाणिक यांचे दुःखद निधनानिमित्त सभागृहाने ००.०२ मिनिट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.

**विषय क्र. १४३ :** विषय

**संवाद :**

श्री. गंगाधर गाडे : आंध्र प्रदेशात चक्री वादळामुळे जे आर्थिक जिवित हानी निमित्त नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून प्रत्येक रु.१०००/- आर्थिक सहाय्यक देण्यात यावेत. नगरसेवकाप्रमाणे प्रशासनानेही या आपदग्रस्तांना विशेष अशी आर्थिक मदत करावी. नरसेवकातर्फे स्वेच्छानिधीतून मदत करताना ज्या नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतील अर्थिक तरतुद संपलेली असेल अशा नगरसेवकांच्या पुढील वर्षाच्या स्वेच्छानिधितून मदत देण्यात यावी.

श्री. नरेंद्र पाटील : स.सभासदांनी सुचविल्याप्रमाणे नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून आंध्र प्रदेश आपदग्रस्तांना नगरसेकांच्या मानधनातून आर्थिक मदत देण्यात यावी.

मा.आयुक्त : आंध्र प्रदेशातील वादग्रस्तांना महापालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या पगारातील एक दिवसाचे वेतन आर्थिक मदत म्हणून देण्यात येणार आहे. नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून आर्थिक मदत देण्याबाबत सभागृह जो निर्णय घेईल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

मा.महापौर : आंध्र प्रदेशातील चक्रीवादळामुळे झालेल्या वित्तहानी व प्रमाण हानीतील आपदग्रस्तांना स.नगरसेवकाच्या स्वेच्छानिधीतून रु.१०००/- (प्रत्येकी) आणि कर्मचाऱ्यांच्या पगारातून एक दिवसाचे वेतन या प्रमाणे आर्थिक मदत देण्यास मंजूरी देण्यात येते. ज्या नगरसेवकांचा स्वेच्छानिधीतीला रक्कम संपलेली असेल अशा नगरसेवकांनी सम्मती दिल्यास त्यांच्या मानधनातून रु.१०००/- निधी जमा करण्यात यावा.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, औरंगाबाद महापालिकेतील कर्मचाऱ्यांच्या पगारातून एक दिवसाचा पगार आणि स.नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीमधून रु.१०००/- या प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे आंध्र प्रदेशातील वादळग्रस्तांना मदत देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

तसेच ज्या नगरसेवकांचा स्वेच्छा निधीतील रक्कम संपलेली असेल अशा नगरसेवकांनी सम्मती दिल्यास त्यांच्या मानधनातून रु.१००० निधी जमा करण्यात यावा असे सर्वानुमते ठरलेप्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री. गंगाधर गाडे : सामाजिक कार्यकर्ते श्री. अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचार विरोधात लढाई सुरू केलेली आहे. श्री. अण्णा हजारे यांनी सुरू केलेली भ्रष्टाचारा विरोधात सुरू झालेल्या लढाईस पाठिंबा देत आहे. असा ठराव या सभागृहात घेण्यात यावा.

मा.महापौर : सामाजिक कार्यकर्ते श्री. अण्णा हजारे यांनी सुरू केलेल्या भ्रष्टाचार विरोधातील लढ्याचे हे सभागृह स्वागत करत आहे.

सौ. लता दलाल : राज्यात सुरू झालेल्या भ्रष्टाचार विरोधातील लढ्याबाबत या सभागृहात निर्णय घेण्या ऐवजी त्या पक्षाने पक्षी पातळीवर भ्रष्टाचार विरोधी लढ्याबाबत निर्णय घेणे योग्य राहील.

**विषय क्र.१४४/१ :** दिनांक १९.१०.९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

मा.महापौर : मागील सभेचे इतिवृत्त मंजूरीबाबतचा विषय क्र.१ चर्चेला घेण्यात येत आहे. त्याबाबत स.सभासदांना काही दुरूस्त्या सुचवावयाच्या असतील तर त्या सुचवाव्यात. पान क्र.१४ वर स.सभासदांच्या नावामध्ये झालेली चुक दुरूस्त करण्यास मंजूरी देण्यात येते. पान क्र.२९ ठराव क्र.१२९/११ अन्वये झोपडपट्टी भागात अभ्यासिका सुरू करण्यास मंजूरी दिली आहे. त्यानुसार दहा अभ्यासिका सुरू करण्यात येणार आहे. या अभ्यासिक कोणत्या भागात सुरू करण्यात याव्यात. याबाबत सभागृहाने निर्णय घ्यावा.

श्री. गंगाधर गाडे : ठराव क्र.१२९/११ अन्वये सुरू झोपडपट्टी भागात सुरू करावयाच्या अभ्यासिका निश्चित चांगल्या करण्याचे अधिकर प्रशासनावर सोपविण्यात यावेत.

मा.महापौर : स.सभासद श्री. गाढे यांची सूचना मान्य करण्यात येते.

श्री. नरेंद्र पाटील : पान नं.२० ठराव क्र.१२०/१० अन्वये ढापे खरेदी प्रकरणात ढाप्याची साईज व संख्या याबाबत कार्यकारी अभियंता यांनी दिलेला खुलासा नोंदविला गेला नाही.

मा.महापौर : खरेदी करण्यात येणाऱ्या ढाप्याच्या संख्येची नोंद इतिवृत्तात आहे. १ मिटर X ०६० मीटर आणि ७५ X ६० मिटर आकारा ढापे खरेदी करण्यात येणार आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : कार्यालयाकडे ढापे उपलब्ध नसल्यामुळे बऱ्याच ठिकाणचे मेनहोल आणि गटारी उघड्या आहेत त्यामुळे नागरिकांना दुर्गंधीचा त्रास होत आहे. झालेल्या ठरावाप्रमाणे लघुनिविदा काढण्यास मंजूरी देण्यात यावी.

श्री. हमीदउद्दीन ताबा : श्री. जावेद अहमद श्री.स.अली दिनांक १९.१०.९६ च्या सभेत चर्चा झाल्याप्रमाणे अधिकाऱ्यांच्या घरी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत काय कार्यवाही झाली याचा खुलासा करण्यात यावा. महापालिकेत ज्या कर्मचाऱ्यांची शहरातील मोकाट कुत्रे पकडण्याच्या कामासाठी झाली आहे. असे कर्मचारी मुळ काम न करता अधिकाऱ्यांच्या घरातील काम करतात या बाबत खुलासा व्हावा. बरेच अधिकारी / कर्मचारी कार्यालयात हजर नसतात.

उपआयुक्त-१ : दि.१९.१०.९६ च्या सर्वसाधारण सभेतील चर्चेनुसार नियमाप्रमाणे जे कर्मचारी ठेवता येतात असे कर्मचारी ठेवून ज्यादा कर्मचारी कमी करण्यात आलेले आहेत.

**ठराव :**

दि.१९.१०.९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

लक्षवेधी सूचना :

जकान नाका कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आलेले आहे. या संबंधित प्रशासनाने खुलासा करावा.

सुचक : श्री. गंगाधर गाढे
अनुमोदक : सौ. शंकुतला धांडे

**संवाद :**

मा.महापौर : उपआयुक्त-१ यांनी या प्रकरणाचा खुलासा करावा.

मा.उपआयुक्त-१ : दि.१८.११.९६ रोजी मा.महापौर मुंबई येथून परत असताना मुंबई नगर नाक्यास भेट दिली असताना नाक्यावरील कर्मचारी झोपलेले आढळले. त्यानंतर मा.महापौर यांनी रात्री १.४५ वाजता जकात अधिक्षकासह माझा संपर्क साधून नाक्यांना भेटी दिल्या असताना अंजिठा/पैठण/जालना/बीड/वाल्मी/बस स्टॅण्ड अशा विविधी नाक्यांना भेटी दिल्या असता नाक्यावरील कर्मचारी झोपलेले आढळून आले. कार्यालयीन कामाच्या काळात झेपणे हे नियमाच्या विरुध्द असल्याने नाक्यावरील दहा कर्मचाऱ्यांना निलंबीत करण्यात आले असून गैरहजर असलेल्या दोन कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे.

श्री. रशिद खान मामू : नाका कारकुनाप्रमाणे जकात निरिक्षक हि या बाबतीत जबाबदार नाहीत का? नाका कर्मचाऱ्याप्रमाणे किती जकात निरिक्षकांना निलंबीत करण्यात आले आहे याचा खुलासा व्हावा. जकात कर्मचाऱ्यांचे निलंबनाबाबत स्थायी समितीत सविस्तर चर्चा झाली आहे.

श्री. हमीदउद्दीन ताबा : जकात कराचे उत्पन्न वाढावे या दृष्टीने मा.महापौर यांनी नाक्यांना अचानकपणे भेट दिली याबद्दल त्यांचें अभिनंदन. पण ज्याप्रमाणे नाका कारकुनावर कार्यवाही झाली त्याप्रमाणे या बाबतीत जबाबदार असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कार्यवाही झाली का? त्यांना निलंबीत केले का?

श्री. स.अली मिरा सलामी : महापालिका प्रशासनातस वर्ग तीन/चार कर्मचाऱ्यावर अशी कार्यवाही लवकर करण्यात येते. पण वरिष्ठ अधिकाऱ्यावर मात्र कार्यवाही केली जात नाही. जकात उत्पन्नात घट झाली आहे. नुकताच दिवाळीसारखा मोठा सण झाला आहे. मग जकात उत्पननात घट का झाली? काही दिवसापूर्वी जकात उत्पन्न पाहिले असता ११ लाखापर्यंत होते. हे जकात कराचे उत्पन्न कमी झाले हे पाहण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे तेव्हा वर्ग ३/४ कर्मचाऱ्याप्रमाणे वरीष्ठ अधिकाऱ्यांवर ही कार्यवाही करावी.

श्री. जावेद रज्जाक : जकात उत्पनाच्या बाबींचा विचार करून जकात विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात येतील असे सभापतींनी सांगितले आहे. त्याप्रमामाणे जकात विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या नाही. याप्रमाणे यात शंका येते. जकात विभागातील वर्ग ३/४ च्या कर्मचाऱ्यांना निलंबीत करण्यात आले आहे. यास जबाबदार असलेल्या वरीष्ठ अधिकाऱ्यांचे काय? याचा खुलासा करावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : जकात विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याबाबत प्रशासनाने सुचन्या दिल्या आहेत. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील कर्मचाऱ्यांच्या जकात विभागातून बदल्या झाल्या आहेत. दूसऱ्या टप्प्यातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या लवकरच होतील. जकात कर्मचाऱ्याप्रमाणेच जकात निरीक्षक ही जबाबदार आहेत त्यांच्यावर ही कार्यवाही करण्यात यावी. जकात उत्पन्नाबाबत मा.उपआयुक्त जबाबदार नाहीत. त्यांच्याकडे जकात विभागाबरोबर इतर विभागाचेही कामे आहेत.

श्री. अ.रशिदखान मामू, श्री.हमीदउद्दीन ताबा : महापालिका प्रशासनात वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मर्जीनुसार बदल्या केल्या जातात. त्या बदल्या करतांना अधिकारी वर्ग १/१ व २/२ अशाप्रकारे कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या जातात.

सौ. रजनी जोशी : जकात उत्पनाबाबत जकात निरिक्षक हे जबाबदार आहेत. त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. मा.उपआयुक्त यांच्यावर कार्यवाही करण्याचा प्रश्नच येत नाही. जे रिलिव्हर कर्मचारी कामावर आले नाहीत. त्यांना निलंबीत करण्यात यावे.

श्री. गंगाधर गाडे : जकात कराचे उत्पन्न वाढविणे हा वर्ग-४ च्या कर्मचाऱ्याची जबाबदारी नाही. जकात उत्पन्नात वाढ करण्यासाठी अधिकाऱ्यांनी रात्र दिवस काम करावयास हवे. अधिकाऱ्याकडे सर्व सोयी उपलब्ध आहेत. महापालिकेत काही कर्मचारी २४ तास काम केल्यानंतर तो कर्मचारी कर्तव्यदक्ष कसा राहील तेव्हा वरिष्ठ अधिकाऱ्यावरही कार्यवाही झाली पाहिजे.

सौ. लता दलाल : जकात कर्मचाऱ्यावर कार्यवाही झाल्यानंतर ज्या कर्मचाऱ्यांनी २/२, ३/३ ड्युट्या केल्या आहे. असा खुलासा करण्यात आला आहे. याबाबत जकात निरिक्षकांनी नाक्यावर राऊंड घेतला होता का, राऊंडचे वेळी असे किती कर्मचारी आहे. नाक्यावरच रजिष्टर तपासले का हे पाहावे. यापूर्वी असा प्रकार घडला होता का, त्यावेळी २४ तास काम कर्मचाऱ्यांनी किती वेळा केले आहे. याचाही विचार घेणे आवश्यक आहे.

श्री. गौतम खरात : जकात कराचे उत्पन्न कमी झाले तर लगेच वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द होते. एक महिन्याच्या काळात किती जकात वसुल झाली हे पाहावे. एकुण उत्पन्नाच्या ७० टक्के उत्पन्न महापालिकेला जकात करातून मिळते. ही उत्पनाची बाजू लक्षात घेता जकात विभागासाठी कोणकोणत्या सुविधा दिल्या हे पाहाणे आवश्यक होते. प्रशासनाने सुविधा बाबत कसलीही कार्यवाही केलेली नाही. जकात विभागासाठी दिलेल्या जीप जुन्याच आहेत. जकात नाके हे शहराबाहेर आहेत. असलेले नाके अशा किती ठिकाणी बांधण्यात आले की, रस्त्यावरुन येणाऱ्या वाहनांना ते सहजरित्या दिसत नाहीत. काही दिवसापूर्वी अजिंठा नाक्यावर दरोडा पडला होता. ज्या जकातीपासून महापालिकेला उत्पन्न मिळते त्या ठिकाणी कर्मचारी वर्ग कमी आहे. जकात विभागासाठी कर्मचारी वर्ग वाढविला पाहिजे. याकडे प्रशासन लक्ष देत नाही पण जकात कर्मचाऱ्यांना निलंबीत केले जाते. जे जकात कर्मचारी निलंबीत आहे. त्यांना प्रथम त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी संधी द्यावयास हवी होती. दंड करावयास हवा होता, त्यांची बदली करावयास हवी होती. त्यांची चौकशी करावयाला हवी होती. या प्रकारची कार्यवाही करावयास हवी होती. यापैकी कोणत्याही बाबींचा अवलंब झाला नाही. हा मार्ग अवलंबण्यात आला असता तर बरेच काही साध्य झाले असते दुसरा मुद्दा असा की, काही कर्मचारी (जवान) गेल्या १०/१५ वर्षापासून जकात विभागात काम करीत आहेत. हे जवान वरिष्ठांचे ऐकत नाही. गाड्या सोडून देतात. त्याबाबत प्रशासनाकडे तक्रारी आल्या आहेत. या सर्व गोष्टींवर बसून विचार करण्यात यावा. कर्मचाऱ्यांच्या बदल्या ताबडतोब करण्यात याव्यात. आणि जे कर्मचारी निलंबीत केले आहेत. त्याच्याबाबत सामंजस्याने विचार करुन एक महिन्यांच्या आत त्यांना कामावर घेण्यात यावे.

श्री. नरेंद्र पाटील : स.सभासदांनी आपल्या भावना व्यक्ती केल्या आहेत. जकात कराचे उत्पन्न हे महापालिकेचा प्राण आहे. जकात कराचे उत्पन्न नसेल तर महापालिकेचे काम चालू शकत नाही. नुकत्याच झालेल्या दिवाळीच्या सणामुळे शहरात जवळजवळ ४/५ कोटीची उलाढाल झाली अशावेळी सभागृहात खुलासा केलेल्या घटना घडत असतील तर त्या निषेधार्थ आहेत. कारकून/जवान झोपला आहे ही बाब नविन नाही. फक्त कोणी पकडले नाही/पाहिले नाही ही गोष्ट वेगळी. या सर्व बाबीवर नियंत्रण ठेवण्यासाठी काही कृती यापुर्वी केली असती तर ती योग्य झाली असती. महापालिकेच्या एकुण उत्पन्नापैकी ६० टक्के उत्पन्न जकात पासून मिळत असल्याने सर्व लक्ष या विभागाकडे केंद्रित होणे आवश्यक आहे. जकात नाक्यावर विशेषतः पहाटेच्या वेळी घोळ होते आणि नेमके त्यावेळी आपले कर्मचारी झोपलेले असतात. या सर्व बाबींचा विचार करता नियंत्रण ठेवण्यासाठी काही ठोस कृती करणे आवश्यक आहे.

डॉ.भागवत कराड : मा.महापौरांनी जी कार्यवाही केली त्याबाबत अभिनंदन. जकात कराच्या उत्पन्नावर महापालिका चालते. प्रशासनाने जी निलंबनाची कार्यवाही केली आहे. त्याबाबत अभिनंदन जकात कराच्या उत्पन्नावर ही महानगरपालिका चालते प्रशासनाने जी निलंबनाची कार्यवाही केली आहे. ती योग्यच आहे. यातून चौकशी केली जाईल. आणि त्यानुसार जे दोषी असतील त्याच्यावर कार्यवाही केली जाईल.

श्री. जावेद रज्जाक : जकात विभागातील कर्मचारी निलंबीत झाले आहे. या जकात विभागात किती अधिकारी किती वर्षापासून काम करीत आहे. याचा विचार करणेत यावा. ८/१० वर्षापासून काही अधिकारी जकात विभागात काम करतात या अधिकाऱ्यांना जकात कर्मचारी झोपतात यांनी पाहण केली आहे काय? तसा अहवाल दिला आहे का? या सर्व बाबीची जबाबदारी या अधिकाऱ्यांवरही येते. म्हणून त्यांनाही करण्यात यावे.

श्री. मुजीब आलमशा खाँन : जकात विभागाचे बाहेर काही दलाल बदलेले असतात. त्यांचा संबंध मोठ्या पार्टीशी आहे. दिवसभर आलेल्या गाड्यांचे पैसे दुसऱ्या तिसऱ्या दिवशी वसुल केले जातात. काही गाड्याचे वजनही कमी दाखविले जाते काही अधिकारी यात सामील आहेत. हे प्रकार बंद झाले पाहिजे.

श्री. जयवंत ओक : स.सभासदांनी आपआपले विचार मांडले आहेत. मा.विरोधी पक्ष नेता यांनी ज्या बाबी सुचवल्या आहेत. त्याबाबत प्रशासनाने गंभीरपणे विचारा करावा. २४ तास ड्युटी करण्यामागे कर्मचाऱ्याची भावना आहे. ही भावना का आहे? या विभाग ८/१० वर्षापासून काही कर्मचारी निरिक्षक जवान काम करीत आहेत. त्यांच्या बदल्या का होत नाहीत? याबाबत दोनपत्र प्रशासनास दिले आहेत. याप्रमाणे ज्या बदल्या झाल्या आहेत. याबाबत गंभीर विचार केला पाहिजे. या शहरात ट्रान्सपोर्ट मार्फत येणाऱ्या मालाची ओपण डिलेव्हरी घेण्यात अशा प्रकाराने जकात उत्पन्न वाढेल.

श्री. स.अली मिरा सलामी : जकात विभागाबाबत बरीच चर्चा सभागृहात झाली आहे. सभागृहनेता यांनी खुलासा केल्याप्रमाणे कर्मचारी २४ तास ड्युटी मागवून घेतात तर जे अधिकारी त्या कर्मचाऱ्यांना २४तास ड्युटी देतात त्याचा काय उद्देश असतो हे पाहणे आवश्यक आहे. याकडे अधिकाऱ्यांन लक्ष दिले पाहिजे.

सौ. रजनी जोशी : मा.महापौरांनी प्रथम भेट दिली तेव्हा कर्मचारी झोपलेले होते. त्यानंतर अधिकाऱ्यांसह मा.महापौरांनी पुन्हा भेट दिली. तेव्हाहही हे कर्मचारी झोपलेले होते. हा काय प्रकार आहे?

श्री. अब्दुल रशिन खान (मामू) : मा.महापौरांनी पुन्हा भेट दिल्यावरही कर्मचारी झोपलेले आढळून आले आहेत. यावरुन कर्मचाऱ्यांना भिती राहिलेली नाही. या सर्व परिस्थितीचा बदल करण्यासाठी कामाची पध्दत कशी असावी याचा विचार करणे आवश्यक आहे.?

जकात विभागातील कर्मचाऱ्यांना बदल्या करण्याबाबत गेल्या तीन महिन्यापासून मागणी करण्यात आली आहे. प्रत्येक वेळी १/२ दिवसात आदेश दिले जातील. कर्मचाऱ्याची यादी तयार झाली अशी उत्तरे दिली जातात. तेव्हा जकात विभागाचे काम मा.आयुक्ताकडे सोपविण्यात यावे.

श्री. व्हि.व्हि. देशमुख : जकात विभागातील कर्मचाऱ्यांवर जी कार्यवाही झाली त्याच्यावर सक्रीय दृष्टीने कार्यवाही झालीच पाहिजे.

श्री. भगवान घडामोडे : सभागृहातील उलट सुलट चर्चेमुळे विरोधाभास होत आहे. जे कर्मचारी दोषी असतील अशा कर्मचाऱ्यावर कार्यवाही करावी ती कार्यवाही करताना नियमाप्रमाणे करण्यात यावी. यात अधिकारी दोषी असतील तर त्यांच्यावरही कार्यवाही करण्यात यावी.

श्री. मुश्ताक अहेमद : जकात विभागाबाबत बरीच चर्चा झाली आहे. या चर्चेत जकात विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर आहे. पण कर्मचाऱ्यांच्या बदल्याबाबत ३ ते ५ वर्ष असा नियम ठरविण्यात यावा. या नियमाप्रमाणे ठराविक कालावधी पूर्ण झाल्यानंतर या सर्व कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या पाहिजेत. यामुळे बदली करणे किंवा न करणे याबाबतची शिफारस बंद होईल. उपआयुक्त यांच्याकडून ज्या बदल्या झाल्या त्यात अधिकाऱ्यांची चर्चा करून बदल्या झाल्या. पक्षपात झाला असा पक्षपात होता कामा नये.

श्री. गिरजाराम हाळनोर : सन्माननीय सभासदांनी बदली बाबत जो खुलासा केला तो समाधानकारक नाही. बदल्या करताना कर्मसचाऱ्यांच्या कार्यकुशलतेवर बदल्या प्रशासनाने कराव्यात.

श्री. महादेव सुर्यवंशी : जकात कराचे उत्पन्न कमी येते अशी तक्रार सभागृहात नेहमी केली जाते. याबाबत प्रशासनाने काहीच कार्यवाही केली नाही. जकात कर्मचाऱ्यांवर जी निलंबनाची कार्यवाही केली नाही. जकात कर्मचाऱ्यांवर ही निलंबनाची कार्यवाही झाली ती योग्य आहे. यामुळे कर्मचाऱ्यांत घबराट निर्माण झाली ती योग्य आहे. १९८८ पासून ही पहिलीच घटना आहे. असे मला वाटते. ज्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही झाली त्या नाक्यांना जकात निरिक्षकांनी भेट दिली किंवा नाही यापुर्वी जकात निरिक्षकांनी किती वेळ रात्रीची भेट दिली आहे. ती वेळोवेळी दिली का? अशी भेट जकात निरिक्षकांनी दिली नसेल तर निरिक्षकावर कार्यवाही होणे आवश्यक आहे.

डॉ.भागवत कराड : जकात उत्पन्नात झालेली घट आणि त्यात करावयाची वाढ या बाबत विचार करण्यासाठी प्रशासकीय अधिकारी व नगरसेवक यांची समिती नेमण्यात यावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : जकात कर्मचाऱ्यांचे निलंबन योग्य आहे. जे दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही झाली आहे. याबाबत कोणत्याही शिफारशींचा विचार करु नये. या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. असा ठराव घेण्यात यावा.

मा.आयुक्त : जकात विभागाविषयी जी कार्यवाही झाली त्या संदर्भाने सभागृहात चर्चा झाली आहे. या चर्चेत बऱ्याच बाबी सभासदांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणल्या आहेत. ज्या सुचना सभासदांनी केल्या आहेत. त्यांची अंमलबजावणी करण्याच्या प्रशासन प्रयत्न करील. जकात विभागाच्या कर्मचाऱ्यावर जी कार्यवाही मिळेल हे उद्दिष्ट समोर ठेवून अनेक कामे शहरात हाती घेण्यात आली आहेत. आजपर्यंत रु.१९,७७,०००,०००/- चा जकात कर वसुल झाला आहे. मागील वर्षी याच वेळी जकार कर पासून रु.१७,९९,००,०००/- वसुल झाले होते. जकात कराच्या उत्पन्नात वाढ कशी होईल. हे पाहण्याचा आपणा सर्वांचा दृष्टीकोन आहे. जकात कर हा महापालिकेचा पाया आहे. याशिवाय दूसरा पर्याय महापालिकेस नाही. हा आर्थिक पाया कमकुवत करणारा जो घटक आहे. त्याच्यावर कडक कार्यवाही करणे हे आपणा सर्वाचे कर्तव्य आहे. या शहराचे प्रथम नागरिक जकात नाक्याची पाहणी करताना कर्मचारी झोपलेले आढळतात त्यामुळे ही कार्यवाही करणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे. या शहराचे प्रथम नागरिक जकात नाक्याची पाहणी करता कर्मचारी झोपलेले आढळतात त्यामुळे ही कार्यवाही करावी लागली आहे. ह्या कार्यवाहीस सभागृहाने मंजुरी द्यावी. सभागृहाने कर्मचाऱ्यांना न्याय देण्याची मागणी केली आहे. पण निलंबन ही शिक्षा नाही. निलंबन हे कार्यालयीन चौकशीसाठी पाहिले पाऊल आहे. निलंबनावर अपील नाही. निलंबनानंतर चौकशीसाठी कारणे दाखवा नोटीस, पुरावे, दखल करण्याची व प्रशासनाकडे असलेले कागदापत्र व पुरावे संबंधित कर्मचाऱ्यास पुरविले जातात. त्यानंतर चौकशी करुन कर्मचारी दोषी असेल तर त्यावर कार्यवाही केली जाते. दुसरा मुद्दा ओपन डिलेव्हरी बाबतचा आहे. यात वरिष्ठ अधिकारी दोषी असतील तर त्याच्यावर निश्चित कार्यवाही केली जाईल कोणताही भेदभाव केला जाणार नाही.

डॉ.विजयकुमार मेहेर : शहरात आयात होणाऱ्या मालाबरोबर बिल्टी असते या बिल्टीवर मालाचे वजन/नग याची नोंद असते. या विषयी शंका आली तर त्या मालाचे वजन कमी केल्यास माहिती घेता येईल. या कागदाबरोबर मालाचा मेमोही असतो. त्यातून फरक दिसून येवू शकतो. ओपन डिलेव्हरी घेण्याऐवजी हातगाड्यावरुन जो माल व्यापाराकडे पोहचला जातो. त्या गाड्या पकडल्यास त्यात बरीच माहिती मिळू शकेल.

श्री. नरेंद्र पाटील : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे गतवर्षाच्या तुलनेत जकात कराचे उत्पन्न दोन कोटीने वाढलेले आहे. असा खुलासा करण्यात आला आहे. त्या दोन कोटी रूपयात अर्थसंपकल्पावर झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र डिस्ट्रलरी कंपनीकडून वसुल झालेली रक्कम किती आहे. याशिवाय जकात विभागाचे कर्म चाऱ्यावर कशाप्रकारे नियंत्रण ठेवण्यत येणार आहे याचा खुलासा व्हावा.

श्री. हमीदउद्दीन ताबा : शिक्षण विभागात सतत काम केलेल्या कर्मचाऱ्यांची जकात विभागात बदली करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यास जकात विभागाच्या कामाची माहिती नसताना बदली कशी करण्यात आली.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : बाजारात प्रत्येक मालाची किंमत दिवसेंदिवस वाढत आहे. महापालिका शहरात आयात होणाऱ्या मालाच्या किंमतीवर जकात कराची वसुली करते तेव्हा जकात कराचे उत्पन्नाबाबत चालू वर्षाची वसुली आणि मागील वर्षाची तुलना करुन चालणार नाही. अशा तुलनेने महापालिका अर्थसंकल्पात वाढ झाली तर त्यास कोण जबाबदार आहे. ही सभागृहाची दिशाभूल आहे.

मा.महापौर : जकात विभागाबाबत चालू असलेल्या चर्चेच्या संदर्भाने स्थायी समितीचे सभापती यांनी निवेदन केलेले आहे. याशिवाय महानगरपालिका या स्थानिक वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली आहे. त्याप्रमाणे जकात नाक्याची पाहणी केली असता मुंबई नाका येथे सुरक्षारक्षक जकात कराच्या पावत्या फाडत असताना दिसून आला आहे. याबाबत नाका कारकुनांना योग्य ती समज देण्यात आली. नाका कारकूनही झोपलेला होता. नगर नाक्यावर ही तीच परिस्थिती होती. हा प्रकार बघून उपआयुक्त-१ आणि जकात अधिक्षक यांचे समवेत जकात नाक्याची पाहणी केली असता या नाक्ावरही तोचप्रकार आढळून आला. फक्त जालना नाका येथे व्यवस्थीत काम चालू होते. सभागृहाने दिलेल्या सुचनांची प्रशसनाने योग्य ती दखल घ्यावी. जकात नाक्याच्या कर्मचाऱ्यावर प्रशासनाने योग्य तीच कार्यवाही केली आहे. यात सुधारणा होण्यासाठी सभागृहाच्या सुचनेप्रमाणे भरारीपथक नेमण्यात यावे. जकात कर्मचाऱ्यावर केलेल्या कार्यवाहीबाबत प्रशासनाने योग्य खुलासा सभागृहास दिलेला आहे. यात जे कर्मचारी दोषी आहेत असे दिसू येईल त्याच्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही होईल. सभागृहाच्या भावना लक्षात घेता कंपन्याची पाहणी करुन त्याबाबत योग्य ती कार्यवाही घेण्यात येईल.

भरारी पथकास अनुभवी अधिकाऱ्यांच्या समावेश व्हावा.

श्री. प्रकाश निकाळजे, मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री. विखारोद्दीन : सिल्क मिल्क कॉलनी येथे सार्वजनिक आरोग्य केंद्राचा इमारती बांधण्याच्या कामाचा ठराव सर्वसाधारण सभेत मंजूर झाला होता त्यानुसार या कामाचा शुभारंभ या शहराचे पालकमंत्री यांचे हस्ते १४ जुलै ९६ रोजी करण्यात आले आहे. त्यानंतर या कामासाठी न्यायालयाचा मनाई हुकूम असल्याने काम थांबले आहे. तेव्हा या कामावरील न्यायालयाचा मनाई हुकूम खेरीज करुन सिल्कमिल्क कॉलनी भागात सार्वजनिक आरोग्य केंद्राची इमारत उभारण्यात यावी. न्यायालयाचे मनाई हुकूमाबाबत विधीसल्लागार यांना खुलासा करावा. याबाबतच्या संचिकेचा शोध गेल्या दोन महिन्यापासून करण्यात येत आहे. सदर संचिका उपलब्ध होत नाही. न्ययालयाकडून जो मनाई हुकूम मिळाला आहे त्याबाबचा सुध्दा दाखल झालेला नाही.

मा.महापौर : स.सभासद श्री. विखारोद्दीन यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबाबत विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

श्री. स.अली मिरा सलामी : स.सभासदांनी सिल्मिल्क कॉलनी येथील मुद्दा सभागृहात उपस्थित केला असून न्यायालयाच्या मनाई हुकू मावर विधी विभागाने स्टे दाखल केला नसल्याचा खुलासा केला आहे. परंतु महापालिका विधी विभागातर्फे न्यायालयीन प्रकरणात मोठ्या प्रमाणावर दिरंगाई केली जात आहे. न्यायप्रविष्ट असलेल्या मनपा प्रॉपर्टी प्रकरणात जेवढ्या प्रमाणात विधी सल्लागार यांनी लक्ष देणे आवश्यक आहे. ते दिले जात नाही. एक

प्रकरणास १८ तारीख असताना १९ तारीख आहे असे सांगून दिशाभूल केली आहे. विधी सल्लागार यांच्या सांगण्यानुसार स.सभासद १९ तारखेला न्यायालयात हजर झाले. पैठणगेट येथील रस्त्याच्या कामाबाबत वारंवार मागणी करण्यात आली आहे. या रस्त्याचे कामावर गेल्या दीडवर्षापासून न्यायालयाचा मनाई हुकूम आला आहे. तो अद्याप खारीज झालेला नाही. यावरुन विधी सल्लागार यांचे याकडे लक्ष नाही असे दिसून येते.

मनमोहनसिंग ओबेरॉय : सिल्कमिल्क कॉलनी येथील आरोग्य केंद्राचे काम कसे सुरू होईल हे प्रथम पाहण्यात यावे. या कामाचा शुभारंभ करण्यात आला असून सदर जमिन महापालिकेचे आहे. याची मा.आयुक्त यांनी दखल घ्यावी सर्वसाधारण सभेचा कोणताही ठराव आहे. त्याबाबत विधी सल्लागार यांनी प्रस्ताव द्यावे.

मा.महापौर : स.सभासद आणि माजी विरोधी पक्षनेता यांनी ज्या सूचना दिल्या आहेत त्याबाबत विधीसल्लागार यांनी खुलासा करावा.

विधी सल्लागार : सिल्म मिल्क कॉलनी स.न. १७ या नावाने ही जागा महराष्ट्र शासनाची आहे. नगर परिषद काळात ही जागा प्ले ग्राउंडसाठी देण्यात यावी असा ठराव झालेला आहे. सन १९८६ मध्ये त्यावेळेचे आयुक्त यांनी मा.जिल्हाधिकारी आणि महाराष्ट्र शासनास विशिष्ट अटीवर जमीन परत करण्यास तयार आहे असे कळविले होते. त्यानुसार सदर जमिन मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रदान करण्यात आली. सदरील जमिनीचे मूळ कागदपत्र महाराष्ट्र शासनाच्या नावावर आहेत. त्यानंतर महापालिकेने त्या ठिकाणी सार्व.आरोग्य केंद्र बांधण्याचे काम हाती घेंतले आहे. त्याबाबत सिल्म मिल्म कॉलनीच्या नागरिकांनी न्यायालयात मनाई हुकूमाची मागणी केली होती. या प्रकरणी मुळ कागदपत्र न्यायालयात दाखल करण्यासाठी विधी विभागाकडे अद्याप दाखल झालेले नाहीत. यामुळे ते दाखल करता आले नाही. विशेष कागदपत्र नसल्यामुळे ते दाखल करेपर्यंत महापालिका त्या जागेवर बांधकाम करणार नाही असे लेखी न्यायालयात दाखल केले आहे. या प्रकरणात मागील तारखेच्या वेळी स्टे दाखल करता आला नाही. म्हणून ३० तारखेला महापालिकेतर्फे से दाखल करण्यात येईल अशी न्यायालयास विनंती करण्यात आली नाही. म्हणून ३० तारखेला महापालिकेतर्फे से दाखल करण्यात येईल अशी न्यायालयास विनंती करण्यात आली आहे.

श्री. अ.रशिद खान मामू : सिल्म मिल्म कॉलनी येथे ज्या ठिकाणी सार्वजनिक आरोग्य केंद्र बांधण्यात येणार आहे. त्या इमारतीचे बाजूची जागा शालेय मुलांना खेळण्यासाठी देण्यात यावी अशी त्यांची मागणी आहे. त्याप्रमाणे या मैदानावर मुले खेळण्यास हरकत नाही पण ही मोकळी जागा कायमची शाळेची होता कामा नये शालेय वेळेनंतर सदर मैदान आरोग्य केंद्राचे उपयोगासाठीच राहील. असा ठराव मंजूर करुन घेतल्यास आरोग्य केंद्राचे काम होवू शकते. हा मार्ग यातून निघू शकतो.

श्री. संजय जोशी : मुलांसाठी खेळाचे मैदान देण्याचा प्रश्न हा त्या शैक्षणिक संस्थेचा आहे. आज खेळासाठी जागा द्या अशी मागणी करण्यात येत असली तरी पुढे ती जागा सदर संस्थाच ताब्यात ठेवील. या संस्थेकडे मुलांचें खेळाचे मैदानासाठी जागा उपलब्ध असताना शासनाची जागा ताब्यात घेण्याचा

संस्थेचा प्रयत्न आहे. असे यावरुन दिसून येते. तेव्हा सर्व जागा मनपाच्या ताब्यात ठेवण्यात यावी.

श्री. म.विखारोद्दीन : सिल्म मिल कॉलनी येथे असलेली शिक्षणसंस्था ही खाजगी जागेवर आहे. त्या संस्थेकडे स्वतःची जागा नाही. शिक्षणसंस्थेने लीजवर जागा घेतलेली आहे. शासकीय जागेच्या मूळ कागदपत्राची संचिका गहाळ आहे. महापालिकेने जागा परत का केली याची चौकशी करण्यात यावी व लवकरात लवकर दवाखाना सुरू करण्यात यावा. शिक्षण संस्थेस जागा देण्याचा प्रश्नच येत नाही.

श्री. मोहसीन अहेमद : सिल्म मिल्क कॉलनी येथे दवाखान्याचे काम सुरू करण्यापूर्वी ही जागा मनपाची आहे किंवा नाही हे पाहण्याचे काम नगररचना विभागाचे होते. शासनाची जमीन असताना एक खाजगी नागरिक त्याबाबत मनाई हुकूम मिळवतो व मनपाच्या दवाखान्याचे काम बंद होते. त्या पध्दतीने काम केले गेले नाही. सिल्कमील्क कॉलनी येथील नागरिकांच्या जनसेवेसाठी नगरसेवकांनी समाजसेवेच्या इच्छेने काम केले आहे. तेव्हा सिल्ममिल कॉलनी भागात दवाखाना बांधण्याचा ठराव आला त्यासाठी निविदा मागविण्यात आल्या काम सुरूही झाली. या सर्व बार्बीच विचार करुन विधी विभागाने लवकरात लवकर निर्णय घेवून काम सुरू करण्याची कार्यवाही करावी.

श्री. म.विखारोद्दीन : नगर परिषद काळात या संदर्भाने झालेल्या ठरावात सिल्ममिल कॉलनी शिक्षण संस्थेने मुलांना आणि मोहल्ल्यातील मुलांना ह्या मैदानावर खेळता येईल अशा अटी दिलेल्या आहेत. तेव्हा पुन्हा तसा ठराव घेऊन न्यायालयात दाखल करावा व दवाखाना सुरू करावा.

मा.महापौर : मा.आयुक्त या बाबत खुलासा करतील.

मा.आयुक्त : सिल्कमिल कॉलनी येथील जागा शासनाची आहे. नगरपालिका अस्तित्वात असताना ही जागा शासनाने प्रशासनास दिली होती. पण प्रशासकीय काळात सदर जागा शासनाने परत करण्यात आली आहे. या बाबीस सुमारे १२/१४ वर्षे झाले आहेत. सुधारीत विकास आराखडा तयार करताना ही जागा खेळाचे मैदान म्हणून आरक्षीत करण्यात आली आहे. त्यामुळे ही जागा महापालिकेस मिळणार. या बाबत दुमत नाही. मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत ती जागा सिल्ममिल कॉलनी आणि शिक्षण संस्थेच्या मुलांना खेळण्यासाठी देण्यात आली आहे. याबाबत दुमत नाही. मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत ती जागा सिल्ममिल कॉलनी आणि शिक्षण संस्थेच्या मुलांना खेळण्यासाठी देण्यात आली आहे. त्याबाबत मा.जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करण्यात येईल. सिल्ममिल कॉलनी येथील दवाखान्याच्या भूमीपुजनाचा कार्यक्रम झाला. त्यावेळी नुकताच पदभार स्विकारलेला होता. सिल्कमिल कॉलनी येथील नागरिकांना त्यावेळी या कामास विरोध दर्शवून खेळाचे मैदान आणि दवाखान्याची जागा यांचे डिमार्ककेशन करण्याची मागणी केली होती. त्यानुसार येथील नागरिकांना बैठकीत हजर राहिले नाहीत. कालही याच संदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. तेव्हा सिल्ममिल कॉलनीतील लोक आले नाहीत. या प्रकरणात पुन्हा एक बैठक आयोजित करण्यात येईल. त्यावेळी सन्माननीय तोडगा कसा निघेल हे पाहण्यात येईल

व तसे न्यायालयास कळविण्यात येईल. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने यावर जास्त चर्चा करता येणार नाही.

सौ. मोहसिना बिल्कीस : मागील वेळेस पल्स पोलिओचा जो कार्यक्रम झाला त्यावेळी वॉर्डातील जे कार्यकर्ते चांगले काम करतील त्यांना प्रशस्तीपत्र देण्यात येईल अशी माहिती आरोग्य अधिकारी दिली होती पण पल्स पोलिओ कार्यक्रम झाल्यानंतर प्रशस्तीपत्र न देता एक/एक गुलाबाचे फुल देण्यात आले. नगरसेवक आणि कार्यकर्त्यांनी कार्यक्रम पुर्ण होईपर्यंत त्यात भाग घेतला आहे.

मा.महापौर : सदर कार्यक्रमास मी स्वतः उपस्थित होतो या कार्यक्रमात मान्यवर व्यक्तींच्या हस्ते कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला आहे. माजी आयुक्तांनी त्याबाबत सुचना दिल्या होत्या त्याप्रमाणे सत्कार करण्यात आला नाष्टापाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. त्यावेळी मागील पल्स पोलिओ कार्यक्रम आणि पुढे होणाऱ्या पल्स पोलिओ कार्यक्रमात जे काम करतील त्यांना प्रशस्तीपत्र देण्यात येईल असे त्याचवेळी घोषित करण्यात आले आहे.

हा विषय येथेच संपविण्यात येतो.

**विषय क्र. १४५/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चंपा मस्जीद ते रोशनगेट या ५० फुट विकास रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाचे सन १९९५-९६ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.आधारे रुपये ८,४४,८०१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे. सदर रस्त्यावर यापूर्वी तीन वर्षापूर्वी डांबरीकरण केले होते. मात्र या रस्त्यावर एकदा टेलिफोन डक्ट, एकदा टेलिफोन केबल तसेच परिसर अभियांत्रिकी खात्यातर्फे एकदा असे विविध कारणासाठी अनेकदा खोदकाम झाले आहे. नुकतेच या रस्त्याचे मध्यभागी विद्युत खांब रोवण्यासाठी व त्याचे केबलसाठी खोदकाम झालेले आहे. त्यामुळे या रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे आवश्यक आहे. रस्त्याची एकुण लांबी ४००४ मी.आहे. सरासरी रुंदी १३.८ मीटर आहे. सदरील कामासाठी खर्च "रस्ते व देखभाल" दुरुस्ती पुर्नडांबरीकरण १९९६-९७ साठी असलेल्या तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रुपये ८,४४,८०१/- चे अंदाजपत्रक मंजूरीबाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चंपा मज्जीद ते रोशनगेट या ५० फूट विकास रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ८,४४,८०१/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "रस्ते दुरुस्ती व देखभाल" पुर्नडांबरीकरण १९९६-९७ च्या तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४६/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.इंदिरानगर बायजीपुरा स्लम वॉर्ड क्र.२४ येथे फरशी बसविण्याबाबात कामा करिता सा.बां. खात्याच्या वर्ष १९९५-९६ च्या

दरसूचीनुसार रु.१६,८९,२८२/- चे करण्यात आले आहे. सदरील काम म्हाडा अनुदान ह्या शिर्षकातून करण्यात येईल. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.२६.८.९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु.१६,८९,२८२/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री. गिरजाराम हाळनोर : आजच्या सभेत अंदाजपत्रकीय रकमेचे जे जे ठराव आहेत त्या सर्वांना याच सभागृहात स्विकृती देण्यात यावी म्हणजे त्या कामाची निविदा मागविणे सोईचे होईल.

मा.महापौर : नियमाप्रमाणे स्विकृती देता येत नाही. पण सभागृह ज्या ज्या विषयांना स्विकृती देण्यास संमती देईल त्याप्रमाणे मंजूरी देता येईल.

श्री. संजय जोशी, डॉ.भागवत कराड : विषय क्र.३ प्रमाणे फरशी बसविण्याचा प्रस्ताव आहे. त्याऐवजी दगडी फरशी बसविण्यात यावी. शहाबाद फरशी वरुन बैलगाडी गेल्यास फरशी फुटते. तेव्हा जास्त लहान गल्ली असेल तर शहाबाद फरशी व थोडी मोठी गल्ली असेल तर दगडी फरशी बसविण्यात यावी.

शहर अभियंता : प्रस्तावात प्रस्तावानुसार प्रत्यक्ष मोक्यावर पाहणी करण्यात आली आहे. ज्या ठिकाणी शहाबाद फरशी बसविण्यात येणार आहे. त्या गल्ल्या २/५ फूट रुंद आहे. अशा ठिकाणी बैलगाडी किंवा रिक्षा जात नाही. अशा गल्ल्या आहेत. अशा लहान लहान गल्ल्यात शहाबाद फरशी बसविण्याचा प्रस्ताव आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदीनगर बायजीपुरा स्लम वॉर्ड क्र.२४ येथे फरशी बसविण्याच्या कामाकरिता करण्यात आलेल्या र.रु. रु.१६,८९,२८२/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च म्हाडा अनुदाना या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४७/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जकात नाक्यावर बिनतारी संदेश व्यवस्था (वायरलेस सिस्टीम) करण्यासाठी मे. त्रपषी डाटा नेटस प्रा.लि.कल्याण मुंबई यांचेतर्फे सर्वेक्षण करुन घेण्यात आले आहे. त्याप्रमाणे त्यांना सर्वेक्षण अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये त्यांना र.रु.१५,५०,७००/- एवढा अंदाजित खर्च येईल असे नमूद केले आहे. उपरोक्त काम हे निविदा मागवून करण्यात येईल.

तरी जकात नाक्याव बिनतारी संदेश व्यवस्था करण्यासाठी येणारा अंदाजित खर्च र.रु.१५,५०,७००/- यास मंजूरीस्तव तसेच १९९६-९७ च्या मूळ अंदाजपत्रकामध्ये सदर कामास तरतूद करण्यात आलेली नाही.

सुधारीत अर्थसंकल्पामध्ये तरतूद उपलब्ध करुन घ्यावी लागते. करिता प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री. गिरजाराम हाळनोर : प्रस्तुत प्रस्तावामध्ये खरेदी करण्यात येणाऱ्या वायरलेस सेटचे एक/एक कनेक्शन मा.महापौर आणि मा.आयुक्त यांचेकडे असावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जकात नाक्याव बिनतारी संदेश व्यवस्था (वायरलेस सिसटीम) करण्याकरिता मे. त्रपषी डाटा नेटस प्रा.लि. मुंबई यांच्या सर्वेक्षणाच्या अहवालानुसार र.रु.१५,५०,७००/- च्या खर्चास तसेच सदर कामाकरिता सुधारित अंदाजपत्रक ९६-९७ मध्ये तरतुद करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४८/५ :** कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मुख्य जलनिःसरण वाहिण्याचे उर्वरित काम करणे व उपजलःनिसारण वाहिण्या मुख्य जलनिःसारण वाहिण्यास जोडणे बाबत अंदाजपत्रक र.रू.१४,३५,०००/- चे परिसर अभियांत्रिकी विभागाचे दरसूची सन १९९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च मुख्य जलनिःसारण वाहिण्या या आर्थिक शिर्षकाअंतर्गत केला जाईल.

तरी र.रू.१४,३५,०००/- च्य अंदाजपत्रकास मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुख्य जलनिःसारण वाहिण्याचे उर्वरित काम करणे व उपजलनिःसारण वाहिण्या मुख्य जलनिःसारण वाहिण्यांस जोडणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रू.१४,३५,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च ''मुख्य जलनिःसारण वाहण्या'' या लेखा शिर्षकांर्गत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४९/६ :** पाणीपुरवठा विभाग क्र.२(सिडको) अंतर्गत एन-१ सेक्टर या भागात पी.व्ही.सी. पाईप लाईन बदलून नवीन ए.सी. जलवाहिणी टाकण्यासाठी कामाचे अंदाजपत्रक र.रु.२१,८६,७६७/- चे तयार करण्यात आले असून सदर कामावर होणारा खर्च हा १९९६-९७ च्या अर्थसंकल्पातील पाणी पुरवठा भांडवली कामासाठी ठेवण्यात आलेल्या तरतुदीमधून करण्या येणार आहे. सदर अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी विभागाच्या दरसूचीनुसार करण्यात आले असून प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.२१,८६,७६७/- चे अंदाजपत्रकास मंजूरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री. गिरजाराम हाळनोर : विषय क्र.६ अन्वये सिडको एन-५ भागात जलवाहिणी टाकण्याचा प्रस्ताव सभागृहापुढे आहे. सिडकोने सिडको भागात पी.व्ही.सी.ची लाईन टाकल्यामुळे त्या बदलण्याचे काम मनपाला करावे लागते आहे. हे काम करताना ह्या कामावर जो खर्च होणार आहे त्या बाबत सिडकोकडून काही निधी महापालिकेला मिळणार आहे का?

कार्यकारी अभियंता : एन-१ येथील पीव्हीसी लाईन बदलून त्या नविन ए.सी. जलवाहिणी टाकण्याच्या कामासाठी होणारा खर्च महापालिकेतर्फे करण्यात येणार आहे.

श्री. महादेव सुर्यवंशी : सिडको भागात सर्वच ठिकाणी पीव्हीसी लाईन टाकलेली आहे. पीव्हीसी लाईन बदलण्यासाठी येणारा खर्च सिडकोकडून करणे आवश्यक आहे. यापूर्वीही असा खर्च सिडकोकडून वसुल केला गेला आहे.

श्री. भगवान घडामोडे : प्रस्तावाला मंजूरी देण्यात यावी व काम सुरु पावेतो सिडकोकडे याबाबतचा खर्च महापालिकेकडे जमा करण्याची मागणी करण्यात यावी.

मा.महापौर : विषय क्र.६ मंजूर करण्यात येतो या कामासाठी येणारा खर्च महापालिकेकडे जमा करण्याबाबत संबंधित विभागाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणीपुरवठा विभाग क्र.२ (सिडको) अंतर्गत एन-१ सेक्टर या भागात पीव्हीसी पाईपलाईन बदलून नवीन ए.सी. जलवाहीणी टाकण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु.२१,८६,७६७/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च भांडवली कामासाठी ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५०/७ :** नगरसचिव यांनी प्रस्ताव सादर केला की, दि.३०.७.९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये जकात विभागाच्या प्रकरणात जकातचे दर व इतर अभ्यास रुपाने पाहणी करण्यासाठी नासिक ठाणे मुंबई या महानगरपालिकास खालील सन्माननीय सदस्य (स्थायी समिती) मनपा अधिकाऱ्यासमवेत अभ्यास दौऱ्यावर जाण्यास मान्यता मिळालेली आहे.

१. श्री. गिरजाराम हाळनोर (सभापती स्थायी समिती)
२. मा.डॉ.भागवत कराड
३. मा. श्री. डॉ.विजयकुमार मेहेर
४. मा. श्री. कंवरसिंग बैनाडे
५. मा. श्री. अभिमन्यु भालेराव
६. मा. श्री. सुभाष टाकळकर
७. मा. त्रिंबक तुपे
८. मा. सौ. रजनी जोशी
९. मा. श्री. रशिद खान मामू
१०. मा. कु.माया लाडवाणी
११. मा. श्री. विनायकराव कुलकर्णी (जकात अधिक्षक)
१२. मा. श्री. टी.डी.राजपूत (करमूल्य निर्धारण अधिकारी)
१३. मा. श्री. वाय.आर.अभंग (सहाय्यक आयुक्त)

स्थायी समितीच्या मंजूरीनुसार अभ्यास दौरा संपन्न झाला आहे.

करिता सर्वसाधारण सभेच्या कार्योत्तर मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि.३०.७.९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीची सभेच्या निर्णयानुसार खालील सदस्यांचा समावेश असलेल्या समितीस जकात विभागाचे प्रकरणात जकातीचे दर व इतर अभ्यास रुपाने पाहणी करण्यासाठी नासिक, ठाणे, मुंबई या महानगरपालिकांना भेटी देण्याकरिता मनपा अधिकाऱ्यांच्या समवेत संपन्न झालेल्या अभ्यास दौऱ्यास सर्वानुमते कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

अभ्यास दौऱ्यातील स.सदस्य/अधिकारी

१. श्री. गिरजाराम हाळनोर (सभापती स्थायी समिती)
२. मा.डॉ.भागवत कराड

३. मा. श्री. डॉ.विजयकुमार मेहेर
४. मा. श्री. कंवरसिंग बैनाडे
५. मा. श्री. अभिमन्यु भालेराव
६. मा. श्री. सुभाष टाकळकर
७. मा. त्रिंबक तुपे
८. मा. सौ. रजनी जोशी
९. मा. श्री. रशिद खान मामू
१०. मा. कु.माया लाडवाणी
११. मा. श्री. विनायकराव कुलकर्णी (जकात अधिक्षक)
१२. मा. श्री. टी.डी.राजपूत (करमूल्य निर्धारण अधिकारी)
१३. मा. श्री. वाय.आर.अभंग

# "ऐनवेळचे विषय"

**विषय क्र. १५१/१ :**

पाणी पुरवठा विभाग क्र.२ (सिडको) झोन क्र.५ आणि झोन क्र.७ मधील जलवाहिण्यांच्या कामासाठी स्लूस व्हॉल्व खरेदी करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.५,५८,०००/- चे तयार करण्यात आले असून त्यावर होणारा खर्च हा देखभाल दुरुस्ती या लेखा शिर्षातून करण्यात येणार आहे.

तरी स्लूस व्हॉल्व खरेदी करण्याचे अंदाजपत्रक र.रु.५,५८,०००/- चे मंजूरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा वि.क्र.२ सिडको झोन क्र.७ मधील जलवाहिण्याच्या कामाकरिता स्लूईस वॉल्व खरेदी करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु.५,५८,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "देखभाल दुरुस्ती" या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५२/२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, समता नगर येथील पोलिस वर्कशॉप ते मुक्ती सोपान समर्थनगर पर्यंत ९०० मी.मी. व्यासाची समतानगरमधून वाहणाऱ्या नाल्याचा प्रवाह बदलण्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभाग सन ९६-९७ च्या दरसूचीप्रमाणे अंदाजपत्रक र.रु.६,०२,५००/- चे तयार करण्यात आले आहे. संबंधित खर्च हा मुख्य जलनिःसारण वाहिणी टाकणे (मेन सिव्हर लाईन या आर्थिक शिर्षकाखाली करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समतानगर येथील पोलिस वर्कशॉप ते मुक्ती सोपान समर्थ नगरपर्यंत ९०० मीमी व्यासाचे समतानगर मधून वाहणाऱ्या नाल्याचा प्रवाह बदलणेकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु.६,०२,५००/- च्या अंदाजपत्रकास तसेच हा खर्च मुख्य जलनिःसारण वाहिणी टाकणे या आर्थिक शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५३/३ :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहेत की, पुंडलिकनगर वॉर्ड क्र. ७६ येथे खडी रस्ते तयार करण्यात यावे सदरील भाग हा सिडको नोटीफाईड क्षेत्रातील आहे. परंतु तेथे खडी रस्ते तयार करण्यात यावेत. असे तेथील नगरसेवक श्री.विठ्ठल जाधव यांची मागणी आहे. परंतु सदरील भाग हा सिडको नोटीफाईट क्षेत्रातील असल्यामुळे तेथे खडी रस्ते तयार करावे किंवा नाही? या विषयी धारेणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

तरी सर्वसाधारण सभेमध्ये धोरणात्मक निर्णय मंजूरी मिळाल्यास सविस्तर अंदाजपत्रक सादर करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुंडलिकनगर वॉर्ड क्र.७६ येथे खडी रस्ते तयार करण्यास्तव येथील नगरसेवक श्री. विठ्ठल जाधव यांच्या मागणीच्या अनुषंगाने या भागात खडी रस्ते तयार करण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही होवून अंदाजपत्रक तयार करण्यात यावे.

**विषय क्र. १५४/४ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.बुढ्ढीलाईन येथे शहर भुमापन क्र.३८७८ शीट क्र. ३३ येथे सांस्कृतिक हॉल बांधणेच्या कामासाठी सा.बां.खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसूचीनुसार र.रु.६,२०,५१२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून प्रस्ताव मान्यतेस्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याचे अटीवर मा.आयुक्तांनी दि.४.११.९६ अन्वये मंजूरी दिलेली आहे. सबब सदर कामाची र.रु.६,२०,५१२/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च ९६-९७ या वर्षात विकास इमारती शाळा, दवाखाने बांधणे या लेखा शिर्षमधून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बुढ्ढीलाईन येथे शहरभूमापन क्र.३८७८ शीट क्र.२३ येथे सांस्कृतिक हॉल बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.६,२०,५१२/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च सन ९६-९७ या वर्षात विकास इमारती शाळा दवाखाने बांधणे या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५५/५ :**

वॉर्ड क्र.१२ डॉ.आंबेडकरनगर येथील लोकसंख्या दहा हजारावर असून सध्या त्या भागात एकच बालवाडी आहे. लोकसंख्येच्या मानाने गौतमकार व महात्मा फुले नगर येथे प्रत्येकी एक मराठी माध्यमाची बालवाडी चालू शकतील. गौतम नगर व महात्मा फुलेनगर येथे बालवाडी सुरू करणेबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१२ डॉ.आंबेडकर नगर येथील लोकसंख्या विचारात घेता एक बालवाडी पुरेशी होत नसल्याने गौतमनगर व महात्मा फुले नगर येथे प्रत्येकी एक मराठी माध्यमाची बालवाडी सुरू करण्याकरिता सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५६/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण व प्रकल्प विभागामध्ये जवळपास ७५ बालवाड्या चालू आहेत. बालवाडी शिक्षकांना दरमहा ५००/- रु.मानधान म्हणून दिले जाते. बालवाडी शिक्षिका पाच वर्षापासून कार्यरत आहेत. त्या बालकांना शैक्षणिक खेळ, मुलांना स्वच्छता, शिस्त, अंकज्ञान इ.बाबी शिकविण्याचा प्रयत्न करतात. बाल विकासाच्या प्रवाहात सहभागी होवून बालकांचे जीवनमान उंचविण्याचा प्रयत्न करतात एक एक राष्ट्रीय काम असून भावी पिढी घडविण्याचे काम बालवाडीतच केले जाते.

बालकांवर संस्कार करणाऱ्या शिक्षकांना बोनस रजा वैद्यकीय रजा इ.सवलती नाहीत. ठाणे मनपा, मनमाड व चोपा नगरपालिका इ.ठिकाणी मानधन वाढवून देत आहे. करीता आपण या बालकताईना वेतनश्रेणी किंवा १५००/- रु.देवून त्यांची शिकविण्याचा वेळ ३ तास ऐवजी ५ तास करणे बाबातचा प्रस्ताव विचारार्थ सादार.

सुचक : श्री.सै. अली मिरा सलामी

अनुमोदक : श्री. अब्दुल रऊफ.

**संवाद :**

डॉ.विजयकुमार मेहेर : बालवाडी शिक्षकांना मानधन वाढवून देण्याबाबतचे प्रस्तावावर प्रशासनाकडून खुलासा घेतल्यानंतर प्रस्तावास मंजूरी देण्यात यावी.

मा.आयुक्त : बालवाडी शिक्षकाचे मानधन यापूर्वी रु.३००/- वरुन रु.५००/- सभागृहाचे मंजूरीनुसार करण्यात आले आहे. मानधन वाढविताना या बाबत शासनाकडून काही अनुदान मिळणार का याशिवाय इतर महापालिका मधील बालवाडी शिक्षकांना किती पगार दिला जातो या सर्व बाबींचा विचार करुन प्रशासन त्याबाबत ठराव सभागृहापुढे ठेवावेत.

डॉ.विजयकुमार मेहेर : महापालिका बालवाडी शिक्षकांना प्रशिक्षण दिल्यानंतर त्या शिक्षकांचे मानधन रु.३००/- वरुन ५०० वाढविण्याबाबतचा ठराव मंजूर करुन फक्त दोन महिने झाले आहेत. याशिवाय सर्व शिक्षकांना अर्धवेळ काम करणारे आहे. हे मानधन रु.५००/- वरुन १५००/- वाढविणे योग्य होणार नाही.

श्री. म.मुश्ताक अहेमद : बालवाडी शिक्षकांचे मानधन वाढविण्याबाबत संघटना कडून वेळोवेळी मा.आयुक्त, मा.महापौर यांचेकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे. परंतु त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही. म्हणून सदर प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे. शासनाकडून प्राथमिक शिक्षणस प्रोत्साहान देण्यात येत आहे. शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणावर वाढला आह. अशा परिस्थितीत एखादी बालवाडी शिक्षीका रोशनगेट येथे राहत असेल आणि त्याची ड्युटी रेल्वेस्टेशन शाळेत असते. अशा परिस्थितीत या शिक्षकाना रु.५००/- मानधन योग्य नाही. याचाही विचार करण्यात यावा. जिल्हा परिषद अंतर्गत काम करणाऱ्या बालवाडी शिक्षकांना

भाऊबीज स्वरुपात अनुदान दिले आहे. त्याप्रमाणे मा.महापौरांनी महापालिका बालवाडी शिक्षकांना अनुदान देण्याचा विचार करावा.

मा.महापौर : बालवाडी शिक्षकांना मानधन वाढविण्याबाबत सभागृहाने ज्या सूचना केल्या आहेत त्याची दखल घेण्यात येईल. या बाबत प्रशासनाने ठराव ठेवण्यात आल्यानंतर किती खर्च वाढेल याचा विचार करुन त्यावर निर्णय घेण्यात येईल.

श्री. महंमद मुश्ताक अहेमद : बालवाडी शिक्षकांचे मानधन वाढविण्याबाबत प्रशासकीय स्तरावर प्रस्ताव ठेवावा ही सूचना असली तरी बालवाडी शिक्षकांचे मानधन वाढविण्याबाबतचे पुरवणी प्रस्ताव ठेवला आहे. त्याचा विचार करुन बालवाडी शिक्षकांच्या मानधनात वाढ करण्यांस मंजूरी देण्यात यावी.

श्री. मनमोहनसिंग : बालवाडी शिक्षकांचे मानधन वाढविण्यास विरोध नाही पण मानधन वाढविताना आर्थिक तरतुद काय आहे. विकास कामावरील खर्च या सर्व बाबींचा अभ्यास करुन हा ठरावाबरोबरच प्रशासनाची बाजू समोर आल्यानंतर मानधनात वाढ करणेत यावी.

श्री.स.अली मिरा सलामी : बालवाडी शिक्षक/सफाई कामगारा दैनिक वेतनावी कामगार यांच्या बाबतचा प्रस्ताव सभागृहापुढे आला की, आर्थिक बाजूचा प्रश्न पुढे केला जातो . इतर प्रस्तावाबाबत हा प्रश्न पुढे केला जात नाही. हे कसे.

मा.महापौर : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे बालवाडी शिक्षकांचे मानधन वाढविणे बाबत प्रशासकीय दृष्टीने प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात आल्यानंतर यावर विचार करण्यात येईल.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, बालवाडी शिक्षकांचे मानधन वाढविण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत प्रशासकीय माहितीनुसार ठराव सभागृहापुढे ठेवण्यात आल्यानंतर त्यावर विचार करण्यात यावा.

**विषय क्र. १५७/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भावसिंगपुरा गाव येथे मनपाची एकही बालवाडी सुरू नसल्यामुळे तेथील मुलांना बऱ्याच लांब असलेल्या बालवाडीत जावे लागते. करिता मनपाच्या खुल्याजागेवर एक बालवाडी बांधून दिल्यास तेथील मुलांना सोईस्कर होईल. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : सौ. रुख्मनबाई लोखंडे
अनुमोदक : श्री. गिरजाराम हाळनोर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा गाव येथील लहान मुलांना बालवाडीची सुविधा नसल्याने बरेच लांब जावे लागते. म्हणून मनपाच्या खुल्या जागेवर बालवाडी करीता इमारत बांधून बालवाडी सुरू करण्याकरिता सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५८/३ :** औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये सध्या दैनिक वेतनावर लिपिक व रोड कारकून म्हणून बरेच कर्मचारी काम करतात. कार्यरत असलेल्या या कर्मचाऱ्यांना

महानगरपालिका सेवेत ५-७ वर्ष झालेले असून कर्मचाऱ्यांना पूर्वीपासून प्रतिदिन रु.२५ या दराने दैनिक वेतन दिले जाते. दैनिक वेतनात गेल्या पाच वर्षात वाढ करण्यात आली नाही. दिवसेंदिवस महागाई वाढतेच आहे. वाढत्या महागाईचा विचार करता सध्या देण्यात येत असलेले दैनिक वेतन अत्यंत तुटपुंजे व अपुरे पडते. दैनिक वेतनात वाढ करणे बाबत या कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी कार्यालयाकडे लेखी व तोंडी मागणी केलेली आहे. महापालिका अस्थापनेवर कार्यरत असलेल्या दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना रु.७५/- प्रतिदिन या दराने दैनिक वेतन अदाई करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ् व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, प्रशासनाकडून सविस्तर अभ्यास करुन अहवाल आल्यानंतर प्रस्ताव पुन्हा सभागृहापुढे ठेवण्यात यावा.

# ऐनवेळचे विषय

**विषय क्र. १५९/१ :** लेखाधिकारी वर्ग-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जिल्हा वॉर्ड बिल्डर्स असोसिएशन औरंगाबाद यांचे तर्फे औरंगाबाद येथे नोव्हेंबर ९६ मध्ये मराठवाडा पातळीवर ''शरीर सौष्ठ व स्पर्धा'' आयोजित केली असून महानगरपालिकेतर्फे स.नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून स्पर्धेसाठी आर्थिक मदत मिळावी यासाठी विनंतीपत्र सादर केलेले आहेत. य स्पर्धेसाठी खालीलप्रमाणे स.नगरसेवकांना त्यांच्या स्वेच्छानिधीतून रक्कम देण्याबाबत पत्र दाखल केले आहेत.

| | |
|---|---|
| १. सौ. शकुंतला हरिदास घांडे | रु.१५०००/- |
| २. सौ. आबेदा बेगम | रु.१५०००/- |
| ३. श्री. व्ही.व्ही.देशमुख | रु.१५०००/- |
| ४. सौ. मोहसिना बिल्कीस | रु.१५०००/- |
| ५. सौ. नुरजहॉं बेगम | रु.१५०००/- |
| ६. सौ. जाहेदा बेगम | रु.१५०००/- |
| | रु.९०,०००/- |

उपरोक्त नुसार एकत्रीत रक्कम रु.९०,०००/- (रु.नव्वद हजार) जिल्हा बॉडी असोसिएशन या संस्थेस देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ.

नगरसेवकांच्या स्वेच्छानिधी नियमानुसार सार्वजनिक व लोकहिताचे काम असल्यास काही नगरसेवकांनी मिळून एकत्रीतपणे रु.एक लाखापर्यंत आर्थिक मदत देता येते असा नियम आहे. तसेच त्यांना नियमावलीनुसार आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करणे बंधनकारक राहील. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. मुजीब आलमशा खान : जिल्हा बॉडी बिल्डर्स असोसिशन ही संस्था कुठे आहे. या संस्थेचे कोठेही रेकॉर्ड नाही. लेखा परिक्षक झालेले नाही. या सर्व बाबी जापर्यंत समोर येत नाही तोपर्यंत त्या ठरावावर विचार करण्यात येवू नये. ज्या संस्थेस तीन वर्षाचा काळात आर्थिक मदत देण्यात आली आहे अशा संस्था पुन्हा मदत देण्यात येवू नये असे ठरलेले आहे. या सर्व बाबीचा विचार करण्या यावा.

श्री. मोहसिना अहेमद : ठरावाला विरोध करणारे स.सभासद ऐकेकाळी बॉडी बिल्डर्स म्हणून राहिलेले आहे. त्यांना पहिल्या क्रमांकाचे बक्षीस ही मिळालेले आहे. बॉडी बिल्डर्सचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे. आपसी मतभेदाने संस्थेस पैसे मंजूर होवू नयेत हा उद्देश नियंमाच्या विरुध्द आहे. नगरसेवकांना त्यांच्या स्वेच्छा निधीतून संस्थाना आर्थिक मदत देण्याचा ठराव सभागृहात मंजूर झालेला आहे. आर्थिक मदत देणारे सभासद सभागृहात हजर आहेत. सभागृहात मंजूर झालेल्या ठरावाप्रमाणे नियमानुसार हा ठराव ठेवलेला आहे. तो मंजूर झाला नाही तर न्यायालयात जावे लागेल.

मा.महापौर : सभागृहास विनंती करण्यात येते की, हा ठराव वादग्रस्त न करता जर सभागृह मंजूरी देत असेल तर त्यावर निर्णय घेण्यात येईल. बहुमताने हा ठराव मंजूर करावयाचास असेल तर त्यावर मतदान घ्यावे.

श्री. अब्दुल रशिद खान (मामू) : ज्या स. नगरसेविकांना संस्थेस आर्थिक मदत देण्यास संमती दिली आहे. त्याचेही विचार घेण्यात यावे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून आर्थिक मदत देण्याबाबतचा ठराव सभागृहात मंजूर झालेला आहे. त्यानुसार हा प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे. त्यावर सभागृहाने आर्थिक मदत द्यावयाची किंवा नाही याबाबत निर्णय घ्यावयचा आहे.

श्री. मुजीब आलमशहा : १९९५ मध्ये शहरातील कोणकोणत्य संस्थाना नगरसेवक स्वेच्छानिधीतून आर्थिक मदत करण्यात आली आहे. आणि किती याबाबतची माहिती मिळावी म्हणून १९९५ मध्ये मा.आयुक्त, मा.महापौर व नगरसचिव यांना पत्र देण्यात आले होते. त्यावेळी सविस्तर माहितीचे पुस्तक देण्यात येईल असा खुलासा करण्यात आला होता. परंतु, पुस्तके आजपर्यंत मिळालेले नाही. या बाबत वृत्तपत्रात प्रसिध्द झाले होते. तेव्हा मागणी केल्याप्रमाणे आवश्यक माहिती जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत कोणत्याही संस्थेस मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत दिली जाते व ज्या लहान लहान संस्था आहेत किंवा जे गरीब आहे त्यांना अर्थिक मदत दिली जात नाही याचे काय कारण आहे.

श्री. मोहसिन अहेमद : महापालिका अस्तित्वात आल्यापासून या संस्थेस यापूर्वी आर्थिक मदत दिली असेल तर नगरसेवक पदाचा राजीनामा देण्यात येईल.

श्री. जयवंत ओक : यापूर्वीच्या काळात अशा संस्थाना नगरसेवकांच्या निधीतून रु.१५०००/- पर्यंत आर्थिक मदत दिली आहे काय? हा पहिला मुद्दा आहे. याचा खुलासा करण्यात यावा. स.नगरसेवकांच्या निधीतून आर्थिक मदत देवून या स्पर्धा घेण्यात येणार असल्याने या स्पर्धा महापालिका घेणार का सदर संस्था घेणार याचा खुलासा होणे आवश्यक आहे. यावर प्रशासनाने काय मत आहे याचाही खुलासा होणे जरुरी आहे. स.सभासदाना आर्थिक मदत देण्यास विरोध नाही पण त्याविषयी नियम ठरले पहिजेत.

श्री. व्ही.व्ही.देशमुख : माझ्या वॉर्डाचे शेजारी असलेल्या वॉर्डात ही संस्था आहे. माझ्या वॉर्डातील जिन्सी भागात मोठे खेळाचे मैदान आहे. त्या जागेवर जे जे क्लब संस्थेच्या कामाचा शुभारंभ मा.खासदार यांचे हस्ते झाला आहे. ते काम दोन वर्षात पूर्ण झालेले नाही. वॉर्डात तरुण युवक या स्पेर्धेसाठी तयार करावयाचे उद्देश समोर ठेवून आर्थिक मदतीबाबतचे पत्र देण्यात आले आहे. संस्थेस

आर्थिक मदत द्यावयाची किंवा नाही हा अधिकार सभगृहाचा आहे. वॉर्डात व्यायाम शाळा नाही. ह्यासाठी प्रशासनाकडून योग्य मागदर्शन झाले नाही.

मा.महापौर : मा.आयुक्त खुलासा करीत आहेत.

मा.आयुक्त : वॉर्डातील नागरिकांची जनहिताची कामे सोडविण्यासाठी स्वेच्छानिधी मंजूर केलेला आहे. यासाठी सभागृहाने स्वेच्छा निधीचा वापर कसा करता येईल याबाबत नियमही तयार केलेले आहेत. या ठरावानुसार ५० हजारपर्यंतच्या खर्चाचे अधिकार मा.आयुक्तांना देण्यात आलेले आहेत. त्यावर ठरावाच्या निकषानुसार मंजूरी देण्यात येते. जिल्हा बॉडी बिल्डर्सला देण्यात येणारी आर्थिक मदत ही रु. ५० हजारापेक्षा जास्त असल्याने हा ठराव सभागृहापुढे ठेवला आहे. ठरावाच्या नियमाप्रमाण् सदर संस्थेचे सर्व कागदपत्र तपासले त्याप्रमाणे ते आहे तर त्यावर सभागृहाने निर्णय घ्यावयास निर्णयानुसार प्रशासन कार्यवाही करील.

मा.महापौर : ज्या ज्या सभासदांना हा प्रस्ताव मंजूर आहे. त्या त्या सभासदांनी हात वर करावेत.

सदर प्रस्ताव बहुमताने मंजूर करण्यात येतो.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय, मुजीबआलमशहा खान : हा निर्णय योग्य नाही हा ठराव मंजूर नाही.

मा.महापौर :स.नगरसेविका सौ. शंकुतला धांडे आपल्याला हा प्रस्ताव मंजूर आहे का?

सौ. शंकुतला घांडे : या शरीरसौष्ठ स्पर्धेचे ऑडीट रिपोर्ट व कागदपत्र दाखविण्यात आहे. त्यास रु.१५०००/- देण्याचे कबूल केले होते. पण ही स्पर्धा पुरुषांची असल्याने या संस्थेस रु.१५ हजार ऐवजी रु.५०००/- स्वेच्छानिधी देत आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : स.सभासद सदर संस्थेस स्वेच्छानिधीतून किती रक्कम द्यावयाची आहे. याबाबत लेखी पत्र देतील.

श्री. मुजीब आलमशा खान : जिल्हा बॉडी बिल्डर्स संस्थेस रु.१५०००/- आर्थिक मदत देण्याचे कबूल केल्यानंतर सभागृहात रु.१५०००/- ऐवजी रु. ५०००/- आर्थिक मदत देण्यात यावे. असे स.नगरसेवकांनी सांगितले आहे हे योग्य नाही तेव्हा हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

सौ. आबेदा बेगम : रु.१५०००/- ऐवजी रु.१०,०००/- स्वेच्छानिधीतून देण्यात तयार आहे.

श्री. व्ही.व्ही.देशमुख : स्वेच्छानिधीतून रु.१५०००/- देण्यात तयार आहेत.

मा.महापौर : स.नगरसेविका सौ. नुरजहाँ बेगम सभागृहात उपस्थित नसल्याने स्वतंत्र पत्र आयुक्तांकडे देतील त्यानुसार मा.आयुक्त त्यावर निर्णय घेतील.

श्री. मोहसिना अहेमद : जिल्हा बॉडी बिल्डर्स असोसिएशनला स्वेच्छा निधीतून आर्थिक मदत देण्याबाबतचे पत्र देत आहे. मा.आयुक्तांकडे यापूर्वी पत्र दिलेले आहे.

मा.महापौर : जिल्हा बॉडी बिल्डर्स असोसिएशनला स्वेच्छा निधीतून आर्थिक मदत देण्याबाबतचा प्रस्ताव सभागृहापुढे आलेला आहे. त्याबाबत प्रश्न उपस्थित झाला त्यानुसार सौ. शकुंतला धांडे रु.५०००/- सौ.आबेदा बेगम रु.१०,०००/- श्री. व्हि.व्हि.देशमुख रु.१५०००/- सौ. मोहसिना बिल्कीस रु.१००००/- आणि सौ.नुरजहाँ बेगम यांनी मा.आयुक्त यांचेकडे पत्र देवून किती निधी द्यावयाचा याचा खुलासा करावा.

श्री. मुजीब आलमशाह खान : एखाद्या संस्थेत नगरसेवक त्याच संस्थेचा सभासद असेल तर असा नगरसेवक स्वेच्छानिधीचा फायदा घेवू शकतो का याबाबत खुलासा व्हावा.

सौ. जाहेदा बेगम : नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून रु.१५०००/- याप्रमाणे रु.९००००/- निधी देण्यात यावा.

मा.महापौर : स्वेच्छा निधीबाबत सभागृहाने मंजूर केलेल्या ठरावाच्या नियमानुसार रु.५००००/- पेक्षा जास्त रक्कम असेल तर त्यास सभागृहाच्या मंजूरीची आवश्यकता असते कोणत्याही संस्थेचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष पण संस्थेशी संबंध असेल तर नगरसेवकाचे सभासदत्व रद्द होतो. याची सभासदांना जाणीव आहे. जिल्हा बॉडी बिल्डर्स असोसिएशन ह्या संस्थेस स्वेच्छानिधीतून आर्थिक देण्याबाबत सभासदांनी जे पत्र दिले आहे. त्याप्रमाणे आर्थिक मदत देण्यास या ठिकाणी मंजूरी देण्यात येते.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : नगरसेवक स्वेच्छानिधीतून किती रक्कम देण्यात येणार त्याची निश्चित रक्कम सभागृहात मंजूर करावी.

मा.महापौर : सभागृहापुढे रु.९०,०००/- चा प्रस्ताव ठेवलेला आहे. त्याप्रमाणे ९०,०००/- रकमेस मान्यता देण्यात आलेली आहे. नियमाप्रमाणे एखाद्या संस्थेस रु.५०,०००/- पर्यंत आर्थिक मदत देता येते. सभागृहापुढे असलेल्या प्रस्तावास आमचा विरोध आहे तो नोंदविण्यात यावा अशी मागणी स.सभासद श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय श्री. मुजीब आलमशा खान व आघाडीच्या सभासदांनी केली.

मा.महापौर : स.सभासदांच्या विरोधाची नोंद घेण्यात येते.

मा.आयुक्त : सभागृहाचा ठराव क्र. अन्वये संस्थाना स्वेच्छानिधी देण्याबाबत नियम तयार केले आहे. त्या नियमाचे अ.क्र. नुसार मंजूरीसाठी प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे. सभागृहाची मंजूरी मिळाल्यानंतर त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

श्री. मोहसिन अहेमद : जिल्हा बॉडी बिल्डर्सतर्फे नोव्हेंबर मध्ये स्पर्धा घेण्यात येणार असल्याने या ठरावास स्विकृती देण्यात यावी.

श्री. मनमोहन सिंग ओबेरॉय : सदरील संस्थेस स्पर्धेसाठी आर्थिक मदत लागत नसून बांधकामासाठी लागत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात शरीर सौष्ठ व स्पर्धाना नगरसेवकाच्या स्वेच्छानिधीतून आर्थिक मदत देण्यास आघाडीच्या नगरसेवकांनी विरोध नोंदवून सभा त्याग केल्यानंतर प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिल्हा बॉडी बिल्डर्स असोसिएशनतर्फे नोव्हेंबर ९६ मध्ये औरंगाबाद येथे आयोजित करण्यात येणाऱ्या मराठवाडा पातळीवरील शरीर सौष्ठ व स्पर्धाना नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून खालीलप्रमाणे आर्थिक मदत देण्यास बहुमताने मंजूरी देण्यात आली.

| | |
|---|---|
| १. सौ. शकुंतला हरिदास घांडे | रु.१५०००/- |
| २. सौ. आबेदा बेगम | रु.१५०००/- |
| ३. श्री. व्ही.व्ही.देशमुख | रु.१५०००/- |
| ४. सौ. मोहसिना बिल्कीस | रु.१५०००/- |
| ५. सौ. नुरजहॉ बेगम | रु.१५०००/- |

एकुण रु.९०,०००/- च्या आर्थि मदत देण्यास मंजूरी देण्यात येते. सदर प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# **"ऐनवेळचे विषय"**

**विषय क्र. १६०/१ :** औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे मोठ्या जागा विविधी सामाजिक संस्थाना विकसीत करण्याकरिता दिल्या जातात अशा वेळी या संस्थांना जो दर लावला जातो तो जास्त प्रमाणात लावण्यात येत असतो. त्यांना त्या जागेवरील अनुज्ञेय बांधकामाकरिता नाममात्र लिजदर लावण्यात यावा.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | : | श्री. गिरजाराम हाळनोर<br>सभापती स्थायी समिती |
| अनुमोदक | : | श्री. जयवंत ओक |
| दिनांक | : | २०.११.९६ |

**संवाद :**

श्री. गिरजाराम हाळनोर : महानगरपालिका गृहनिर्माण संस्थेच्या जागा ताब्यात घेताना रु.१ याप्रमाणे नाममात्र लिजवर ताब्यात घेत पण त्याच संस्थेने अथवा एखाद्या नागरिकांन महापालिकेकडे जागेची मागणी केल्यास महापालिका अशा जागा आजच्या बाजारभावाप्रमाणे १० टक्के जागा भाड्याने देते तेव्हा अशा जागा मिळण्यासाठी नागरिकांना अथवा संस्थांना तयारी दर्शविल्यास या जागा नाममात्र दराने देण्यात याव्यात.

श्री. अ.रशिद खान मामू : यासाठी एक कमिटी नेमण्यात यावी त्या कमिटीत मा.महापौर व मा.आयुक्त यांचा समावेश करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मनपातर्फे मोकळ्या जागा विविधी सामाजिक संस्थांना विकसीत करण्याकरिता लिजवर दिल्या जातात अशा जागा देतांना संबंधित संस्थांना लिजचा जो दर लावला जातो तो जास्त प्रमाणात लावण्यात येत असतो.

तरी ज्या संस्थाना धर्मदाय (चॅरिटेबल पर्पज) करिता कार्य करण्यास्तव जागेचा वापर करणार असेल अशा संस्थांना नाममात्र (वार्षिक १००/-रुपये) लिजवर देण्यात यावी आणि ज्या संस्था व्यापार विषय क्र. (कमर्शियल) दृष्टीने जागेचा वापर करणार असेल अशा संस्थांना नियमीत नियमाप्रमाणे लिजचा दर आकरण्यात यावा.

असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६१/२ :** औरंगाबाद शहर हे आंतरराष्ट्रीय किर्तीचे शहर असून या शहराचे ऐतिहासिक महत्त्व तसेच वेरुळ, अजिंठा दौलताबाद, पैठण अशा ऐतिहासिक व पौराणिक पर्यटन स्थळ असल्यामुळे या शहरामध्ये नेहमी विविध संमेलने प्रशिक्षण शिबिरे राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय स्तरावर होत असतात. त्याचप्रमाणे विविध क्रिडा स्पर्धाही संपन्न होत असतात.

अशावेळी संबंधित संस्थाकडून मा.महापौरांना अशा पाहुण्यांकरिता आदरातिथ्य करण्याकरिता विनंती करण्यात येत असते व या शहराच्या लौकिकामुळे हे कार्य मनपास करावे लागते. तथापि मा.महापौरांना अतिथी भत्ता सद्यःस्थितीत वार्षिक एक लक्ष रुपये असून हा अत्यंत अपूरा असल्याचे जाणवत आहे.

करिता याद्वारे प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.महापौरांचा अतिथी भत्ता एकलक्ष रुपये करण्यात यावा व तशी तरतूद अंदाजपत्रकात प्रशासनाने करावी.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| सूचक | : | श्री. गिरजाराम हाळनोर<br>सभापती स्थायी समिती |
| अनुमोदक | : | श्री. जयवंत ओक |
| दिनांक | : | २०.११.९६ |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराची आंतरराष्ट्रीय किर्ती व पर्यटन स्थळ तसेच शहराचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता शहरामध्ये नेहमी विविध संमलने, प्रशिक्षण शिबीरे राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय स्तरावर होत असतात. तसेच विविध क्रिडा स्पर्धाही आयाजित करण्यात येतात. आणि मंत्री मंडळाच्या बैठका अशाप्रकारचे आयोजन होत असते. अशावेळी संबंधित संस्थाकडून आलेल्या पाहुण्यांना आदरातिथ्य करण्याची विनंती करण्यात येत असते. सध्या मा.महापौरांचा अतिथी भत्ता वार्षिक एकलक्ष रुपये असून हा अत्यंत अपुरा असल्याचे जाणवल्यामुळे सदरील अतिथी भत्यामध्ये वाढ करुन रु.एकलाख वरुन वाढवून वार्षिक पाच लक्ष अतिथी भत्ता करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

सन १९९६-९७ च्या सुधारीत अंदाजपत्रकास याबाबतची तरतूद करण्यात यावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

(महापौर अतिथी भत्त्यात वाढ करण्यास स.सभासद श्री.स.अली मिरा सलामी, श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री.प्रकाश निकाळजे यांनी विरोध दर्शवून महापौर अतिथी भत्ता एक लक्ष रु.ठेवण्याची मागणी केली. या भत्त्यात वाढ करण्यास निषेध नोंदवून सुमारे २.५५ वाजता सभात्याग केला)

**विषय क्र. १६२/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.हर्षनगर मंजुरपुरा पुलाजवळ बहुउद्देशिय हॉल व दुकाने बांधण्याच्या कामासाठी सन ९५-९६ चे सार्वजनिक बांधाकाम विभागाचे जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रु.१७,७५,२१९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी दि.१९.११.९६ अन्वये मंजूरी दिलेली आहे. सबब सदर कामाचे रक्कम रु.१७,७५,२१९/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षामधून करण्यात येईल.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्षनगर मंजूर पूरा पुलाजवळ बहुउद्देशिय हॉल व दुकाने बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१७,७५,२१९/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च ''व्यापारी संकुल व इतर इमारती'' या लेखा शिर्षामधून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

(सभात्याग केलेल्या सभासदांनी ००.०२ मिनीटांनी पुन्हा सभागृहात प्रवेश केला)

''जन गण मन'' या राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.महापौर यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/-<br>नगरसचिव<br>महानगरपालिका औरंगाबाद<br>औरंगाबाद | स्वाक्षरीत/-<br>मा.महापौर<br>महानगरपालिका औरंगाबाद<br>औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १९.१२.९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**दि.१९.१२.९६ रोजी मा.महापौर श्री. गजानन बारवाल यांच्या अध्यक्षतेखाली कै.केशव सिताराम ठाकरे सभागृहात ''वंदे मातरम'' या गीताने सर्वसाधारण सभेस सुरूवात झाली. सभेस महापालिका अधिकारी व निम्ननिर्दिष्ट सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १ स.स. श्री.जयवंत केशवराव ओक | स.सभासद |
| २ --''—श्री. गिरजाराम हाळनोर | --''-- |
| ३ --''-- श्री.मुजीब आलमशा खान मीर | --''-- |
| ४ --''-- सौ.रुखमनबाई खंडेराव लोंखडे | --''— |
| ५ --''-- श्री.प्रभाकर सिताराम विधाते | --''-- |
| ६ --''-- सौ.साजेदा बेगम | --''-- |
| ७ --''-- श्री.गौतम भागाजी खरात | --''-- |
| ८ --''-- सौ.रजनी रमेश जोशी | --''-- |
| ९ --''-- सौ.उषाबाई दिलीप गायकवाड | --''-- |
| १० --''-- सौ.विमलाबाई नंदकुमार मुंडलिक | --''-- |
| १३ --''-- श्री.महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --''-- |
| १५ --''-- श्री.नरेंद्र यादवराव पाटील | --''-- |
| १६ --''-- श्री.काशिनाथ हरिभाऊ कोकाटे | --''-- |
| १७ --''-- श्री.सुदाम रामदास सोनवणे | --''-- |
| १८ --''-- श्री.रविंद्र बाबुराव इंगळे | --''-- |
| १९ --''-- श्री.कंवरसिंग किसनसिंग बैनाडे | --''-- |
| २० --''-- सौ.पद्मा बाबुराव शिंदे | --''-- |
| २१ --''-- श्री.सुभाष भिकाजी टाकळकर | --''-- |
| २२ --''-- श्री.प्रफुल्ल लालचंद मालानी | --''-- |
| २४ --''-- श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --''-- |
| २६ --''-- श्री.फजलउल्लाखाँन अजमद उल्लाखान | --''— |
| २७--''-- श्री.अजीजखाँन गणीखाँ | --''-- |
| २८--''-- श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | --''-- |
| २९--''-- श्री.वसंत विनायकराव देशमुख | --''-- |
| ३२--''-- श्री.हाजी मोहसिन अहेमद हाजी बशिर | --''-- |
| ३१--''-- श्री.वसंत विनायकराव देशमुख | --''-- |
| ३०--''-- सौ.नुरजहाँ बेगम अ.रहेमान खान | --''-- |
| ३४--''-- सौ.स.मोहसिना बिहकीस विखारोद्दीन | --''-- |
| ३५--''-- श्री.अ.जावेद रज्जाक | --''-- |
| ३६--''-- श्रीमती स.जाहेदा बेगम म.जमीर | --''-- |
| ३७--''-- श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे | --''— |
| ३८--''-- सौ.यशोदा धनंजय वाडेकर | --''-- |
| ३९--''-- श्री.किशोर बाबुलाल तुळशिबागवाले | --''-- |

४०--''-- श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाळ --''--
४२--''-- श्री.स.म.अ.रऊफ म.अ.माबुद --''--
४३--''-- श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबउद्दीन --''--
४५--''-- श्री.प्रदीप शिवनारायण जैस्वाल --''--
४६--''-- श्री.सय्यद अली मीरा सलामी --''--
४७--''-- श्री.रमेश दिपचंद लाहोट --''--
४८--''-- श्री.संजय किसनराव केनेकर --''--
४९--''-- श्री.फैय्याज अहेमद म.हाजी कुरैशी --''--
५०--''-- सौ.मुक्ताबाई सुदाम वाघमारे --''--
५१--''-- सौ.लता श्रिनिवास दलाल --''--
५३--''-- सौ.अल्का रमेश पाटील --''--
५४--''-- सौ.शकुंतला हरिदास घांडे --''--
५५--''-- श्री.अब्दुल रशिदखान (मामू) --''--
५६--''-- श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह --''--
५७--''-- कु.माया लिंबाजी लाडवाणी --''--
५८--''-- डॉ.भागवत किशनराव कराड --''--
५९--''-- सौ.सविता संजय आव्हाड --''--
६०--''-- सौ.निर्मला विठ्ठल कांबळे --''--
६१--''-- श्री.अ.रशिद अ.सत्तार --''--
६२--''-- श्री.चरवेंद्रासिंह महेंद्रसिंह धिल्लन --''--
६३--''-- श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन --''--
६४--''-- श्री.विकास रतनलाल जैन --''--
६५--''-- श्री.गंगाधर सुखदेव गाडे --''--
६७--''-- श्री.मनमोहनसिंग करमसिंग ओबेराय --''--
६८--''-- श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे --''--
६९--''-- श्री.संजय रामदास जोशी --''--
७०--''-- सौ.ज्योत्स्ना दौलतराव हिवराळे --''--
७३--''-- श्री.राजकुमार उर्फ सांडू बचाटे --''--
७४--''-- सौ.राधाबाई तळेकर --''--
७५--''-- श्री.नरसिंग मुरलीधर ढगे --''--
७६--''-- श्री.विठ्ठल किसन जाधव --''--
७७--''-- सौ.मंदा धनंजय काळुसे --''--
७९--''-- सौ.सुनंदा उत्तम कोल्हे --''--
८०--''-- श्री.बन्सी तुळशिराम गांगवे --''--
८१--''-- श्री.भगवात देविदास घडामोडे --''--
८२--''-- श्री.कचरु चंद्रभान नवपुते --''—

सभेच्या सुरूवातीस माजी नगरसेवक श्री. अजिम खाँ दादामियाँ यांच्या मातोश्री श्रीमती स.स.श्री.खखोरडीया यांचे बंधू कै.किशोर खखोरडीया यांना दोन मिनीटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

सभेच्या सुरूवातीस मा.महापौर यांनी त्यांना झालेल्या अपघातात स.पदाधिकारी स.नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी, नगरवासीय यांनी भेटूस धिर दिला याबद्दल सर्वांचे आभार मानले.

**संवाद :**

श्री. संजय जोशी : महापालिकेचे कर्मचारी श्री. सरोदे हे कुस्तीगीर कुस्ती खेळण्यासाठी नासिक येथे गेले होते. तथापि ते जखमी झाल्याने पुढे खेळू शकले नाहीत. त्यांनी पार पाडलेल्या कामगिरी बाबत त्यांचे सर्वसाधारण सभेत अभिनंदन करावयास हवे. पुढेही त्यांना चांगले खेळता यावे, यासाठी चांगली प्रॅक्टीस करता यावी. जेणेकरुन ते चांगल्याप्रकारे खेळू शकतील.

श्री. मोहसिना अहेमद : याचप्रकारे जे खेळाडू इतर खेळ राज्य पातळीवर खेळत असतील त्यांनाही अशा प्रकारची सुट देण्यात यावी.

मा.महापौर : याची दखल घेण्यात यावी.

सौ. मोहसिना बिल्कीस : मा.आयुक्तांकडे माझ्या वॉर्डातील साफसफाई संदर्भाने मी तकार केली होती. यावर मा.आयुक्तांनी स्वतः लक्ष घालून स्वच्छता मोहिम राबवून घेतली याबाबत त्यांचे अभिनंदन.

श्री. नरेंद्र पाटील : गरवारे स्टेडियम बांधून तयार झालेले आहे. परंतु ते अद्याप खेळासाठी उपलब्ध करुन दिले जात नाही याचे कारण काय? ते पडून राहून देऊ नये तात्काळ जनतेस उपलब्ध करुन द्यावे.

श्री. प्रदिपकुमार जैस्वाल : या संदर्भाने मी सात दिवसापूर्वीच प्रश्न विचारलेला आहे.

श्री. नरेंद्र पाटील : महानगर दैनिकावर झालेला हल्ला हा निषेधार्ह आहे. (त्यावेळी अघाडीचे अनेक नगरसेवक शेमशेमच्या घोषणा देतात )

मा.महापौर : स्टेडियमचे उद्घाटन करण्याच्या संदर्भाने मा.मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यासाठी मी मुंबईस गेलो होतो. लवकरच या स्टेडियमचे उद्घाटन करून खेळांसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.,

श्री. नरेंद्र पाटील : महापालिका अधिकारी संघटनेत फुट पडण्याची बातमी आम्ही वृत्तपत्रात वाचली आहे. यात मा.महापौरांचा सहभाग होता म्हणून हा प्रश्न विचारत आहे. संघटनेने काय करावे हा संघटनेचा भाग आहे. लोकप्रतिनिधींनी संघटनेत ढवळाढवळ करू नये.

मा.महापौर : आम्ही. या संघटनेचे सल्लागार आहोत. स.सभासदांनी आरोप प्रत्यारोप करु नये.

श्री. संजय जोशी : अधिकाऱ्यांचे कर्मचाऱ्यांचे काही प्रश्न मार्गी लागत नसतील तर त्यांची बाजू घेवून बोलून लोकप्रतिनिधींचे कर्तव्यच आहे. यात गैर काय?

श्री. नरेंद्र पाटील : महानगर दैनिकावर झालेल्या हल्ल्याचा आम्हाला येथे निषेध नोंदवायचा आहे.

सौ. लता दलाल : कर्मचारी/ अधिकारी यांचे प्रश्न सोडविण्या संदर्भाने त्यांना मदत करणे म्हणजे संघटनेत फूट होत नाही.

श्री. प्रभाकर विधाते : टपरी समितीच्या अहवालावर काय कार्यवाही झालीस आहे याची माहिती देण्यात यावी. स.नगरसेवक सभागृहात काही वृत्तपत्रांचे अंक वाटतात.

मा.महापौर : स.नगरसेवक श्री. गौतम खरात यांनी वृत्तपत्रे सभागृहात वाटू नयेत. अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीशिवाय अशी वृत्तपत्रे वाटणे नियमबाह्य आहे.

श्री. गौतम खरात : यापूर्वीही सभागृहात वृत्तपत्रे वाटण्या आलेली आहे.

याच वेळी काही सदस्य वृत्तपत्रे फाडून फेकतात. सभागृहात घोषणा/प्रतिघोषणा दिल्या जातात.

मा.महापौर : स.नगरसेवक श्री. गौतम खरात यांचे सभासदत्व एक दिवसासाठी रद्द करण्यात येते. ११.३५ वाजता सभा तहकूब केल्याची घोषण मा.महापौर करतात.

दुपारी १२.०० वाजता सभा पुन्हा सुरू होते.

श्री. प्रभाकर विधाते : टपरी कमिटीने अहवाल तयार केलेला आहे. यावर ताबडतोब निर्णय देण्यात यावा.

मा.महापौर : टपरी कमेटी संबंधाने बैठक बोलावण्यात येईल. टपरी कमेटीने बनविलेला अहवाल चांगलाच आहे तो सर्वांना मंजूर असेल तर त्यास मंजूरी देण्यात येईल.

श्री. गिरजाराम हाळनोर : शहरात विविध ठिकाणी टपऱ्या देण्यासंदर्भाने शहरातील वाहतूकीचा विचार करुन पोलिस विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र मागविलेले आहे. अशी माहिती उपआयुक्त-२ यांनी स्थायी समितीस माहिती दिलेली आहे. यास विलंब होण्याची शक्यता आहे. तेव्हा पोलिस विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्राची वाट न पाहता रहदारीस अडथळा होणार नाही याची खबरदारी घेवून टपऱ्या देण्यात याव्यात.

सौ. नुरजहाँ बेगम : अदालत रोडवरील अनधिकृत टपऱ्या संदर्भाने मी यापूर्वी उपआयुक्त अंभोरे मालमत्ता अधिकारी वाहूळ मराठे साहेब यांच्याकडे तक्रारी केल्या आहे. यावर कार्यालयाने काहीही कार्यवाही केलेली नाही. अधिकारी नेहमी उडवाउडवीची उत्तरे देतात. यात भ्रष्टाचार करुन टपऱ्या बसविल्या गेल्या आहेत.

मा.महापौर : अधिकाऱ्यावर आरोप करण्यापूर्वी स.सदस्यांनी पुरावे सादर करावेत. त्यावर मा.आयुक्त चौकशी करतील.

श्री. नरेंद्र पाटील : अशा प्रकरणात काहीही पुरावे सापडत नसतात. स.सदस्याच्या अरोपामुळे अधिकारी सभागृहाबाहेर जाऊ लागतात.

मा.महापौर : अधिकाऱ्यांनी परवानगी न घेता सभागृहाबाहेर जाऊ नये त्यांनी जागेवर बसावे.

श्री. अ.जावेद रज्जाक : अशा प्रकरणात पुरावे देण्याची आवश्यकता नाही. स.नगरसेवक सांगत आहेत त्यावर चौकशी व्हावी.

डॉ.रझवी : स.सदस्यांनी आरोप केला आहे की, अधिकाऱ्यांनी टपरी वाटपात पैसे घेतलेले आहे. असे आरोप करण्यापूर्वी त्यांनी पुरावे द्यावयास पाहिजे होते. यामुळे अधिकाऱ्यांचीही बदनामी होते. यामुळे चिडून जाऊन अधिकारी सभागृहाबाहेर गेले आहेत.

मा.महापौर : स.सदस्यांनी सांगितले की, त्यांनी वारंवार पत्रे देवूनही त्यांची दखल घेतली जात नाही. हे योग्य नाही.

श्री. प्रदिप जैस्वाल : अधिकारी स.नगरसेवकांना एक दुसऱ्यास सहकार्य करावयास हवे. स.सदस्यांनीही आरोप करण्यापूर्वी ठोस पुरावा सादर करुन नंतरच आरोप करावेत. अधिकाऱ्यांनीही स.सदस्यांनी दिलेल्या पत्रावर तात्काळ कार्यवाही करावयास पाहिजे. यापुढे असे घडणार नाही याची दखल घ्यावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : स.सदस्य काही बोलत होते त्याचवेळी अधिकारी सभागृहाबाहेर गेलेत. भ्रष्टाचाराची संभावना आहे असे स.सदस्यांचे म्हणणे होते. कामाचा

अहवाल प्रशासनास सभागृहात द्यावा लागेल. अधिकाऱ्यांनी आमच्यावर दडपण आणू नये.

डॉ.भागवत कराड : चर्चा चालू असलेल्या प्रश्नाचा वॉर्ड माझा आहे. अदालत रोडवर टपऱ्या देता येत नाही. दुसरी टपरी साधारणतः चार महिन्यापूर्वी बसली आहे. माझ्या माहितीप्रमाणे कोणत्याही अधिकाऱ्याने टपरी टाकण्यास मदत केलेली नाही. परंतु अशा टपऱ्या उठावयाच्या की नाही हा आपला प्रश्न आहे.

श्री. मिरा सलामी : टपरी कमिटीने अहवालात असे म्हटले आहे की, सध्या अस्तित्वात असलेल्या टपऱ्या तेथेच ठेवल्या जातील व त्यांना परमीशन देणाचा प्रयत्न करु नये. या प्रकरणाची चौकशी केली पाहिजे.

श्री. मुश्ताक अहेमद : टपरी कमेटीच्या अहवालास सभागृहाने मान्यता दिलेली आहे. जर नगरसेवकाकडून एखाद्या चूकीचा शब्द वापरला गेला तर अधिकाऱ्यांनी सभागृह सोडणे हा मार्ग नाही. हा नगरसेवकांचा अपमान आहे.

सौ. लता दलाल : अधिकाऱ्यांचा सभात्याग योग्य नाही. अधिकारी व लोकप्रतिनिधी ही महापालिकेची दोन चाके आहेत. त्यांनी आपली बाजू सभागृहात मांडावयास पाहिजे होती. टपऱ्यांचे वाटप कशाप्रकारे व किती दिवसात होणार याबाबत आजच्या बैठकीत निर्णय घेण्यात यावा. अधिकाऱ्यांनीही सभागृहाचा मान ठेवून सभागृहात परत यावे.

श्री. गंगाधर गाडे : महापालिकेच्या इतिहासात दुसऱ्यांदा ही घटना घडत आहे. स.नगरसेविकेने उपस्थित केलेल्या मुद्याच्या मागील भावना लक्षात घ्यावयास पाहिजे. हे सभागृहात जनतेच्या भावनेस वाचा फोडल्या जातात. यात चूक काय आहे? राज्यात सर्वत्र भ्रष्टाचार विरोधी वादळ चालू असताना अधिकाऱ्यांनी अशाप्रकारे सभेवर बहिष्कार घालावा हे योग्य नाही. अधिकाऱ्यांच्या ह्या कृतीवर कार्यवाही झाली पाहिजे. अन्यथा आम्हास आमच्या भावना व्यक्त करता येणार नाही. अधिकाऱ्यांचे हे दहशत तंत्र लोकशाहीस मारक आहे. आमच्या विचार स्वातंत्र्यावर ही गदा आहे. आमचा त्यांच्या युनियनला विरोध नाही. त्यांनी त्यांचे प्रश्न युनियनच्या माध्यमापासून जरुर सोडवावेत. परंतु त्यांनी एक दुसऱ्यांच्या गैरवर्तणुकीस हातभार लावू नये.

श्री. अ.रशिद खान (मामू) : स.सभासदांचे म्हणणे काही औरच आहे. जनतेची कामे झाली नाही तर त्यांचा रोष लोकप्रतिधिवर निघतो. अधिकाऱ्यांना आम्ही नेहमीच साथ देत आलेलो आहोत. तथापि सभागृहात कसे वागावे, बोलावे याबाबत लोकप्रतिनिधींनाही ट्रेनिंग द्यावयास पाहिजे. सभागृहात कसे बोलावे ते समजले पाहिजे. अधिकाऱ्यांनी सभागृह का सोडले याचा त्यांना जाब विचारावयास हवा.

सौ. नुरजहाँ बेगम : आम्हास ट्रेनिंगची गरज नाही. गरिबांच्याच टपऱ्या का उडविल्या जातात. मी ज्या अधिकाऱ्यांची नावे घेतली त्यांना मी वारंवार टपऱ्या संदर्भाने विचारणा करत आहे. आम्ही लोकप्रतिनिधी आहोत आम्हांस सभागृहात लोकांच्या भावना मांडण्याचा अधिकार आहे.

मा.महापौर : सर्व अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येते की, त्यांनी सभागृहात परत यावे. त्यांच्या कृत्याची दखल घेण्यात आलेली आहे.

सौ. मोहसिना बिल्कीस : मा.महापौरांनी सांगितल्यानंतरही अधिकारी सभागृहाबाहेर आहेत. ते सभागृहात येत नाही. हा सभागृहाचा अपमान आहे.

श्री. नरेंद्र पाटील : अधिकारी संघटनेत अंतर्गत वाद असल्याबाबतचा प्रश्न मी सभेत सुरुवातीसच मांडला होता. अधिकाऱ्यांचा स्वतः ऐकमेकावरही विश्वास राहिलेला नाही. ते आम्हास सहकार्य करतील.

सौ. नुरजहाँ बेगम : माझ्याकडे भ्रष्टचारा संदर्भाने पुरावे आहेत.

श्री. नरेंद्र पाटील : अधिकाऱ्यांची चुक आम्ही नेहमीच माफ केली आहे. एखादा आरोप चुकीचा असेल किंवा बरोबर असेल तर एकदम टोकाची भूमिका घ्यावयास नको पाहिजे होती. जर अधिकारी सभागृहात येत नसतील तर त्यांना महापालिकेत लोकप्रतिनिधी नको आहेत असा अर्थ होतो.

श्री. गिरजाराम हाळनोर : नगरसेवक व अधिकारी दोघांचेही वागणे बरोबर नाही. स.नगरसेवकांनीही कोणाचा अपमान होणार नाही याची काळजी घ्यावी. त्याचबरोबर अधिकाऱ्यांनीही सभागृहात निषेध निषेध करीत बसू नये अधिकाऱ्यांनी सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्याची प्रोव्हीजन नाही. मा.आयुक्तांनीच सर्व प्रश्नाची उत्तरे द्यावयास हवीत. लोकप्रतिनिधीचा अपमान आम्ही सहन करणार नाही.

अधिकारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मा.महापौरांना एक निवेदन सादर केले आहे.

श्री. महादेव सुर्यवंशी : सभागृहात एका सदस्याच्या निवेदनामध्ये अधिकाऱ्याचे नाव व पैसे घेवून टपऱ्या बसवल्या आहेत असा आक्षेप निघाल्याबरोबर अधिकाऱ्यांनी सभागृह सोडले हे कोणत्या नियमात बसते हा महत्त्वाचा मुद्दा आहे. संघटनेच्या माध्यमातून लोकप्रतिनिवर दबाव आणण्याचा प्रयत्न अधिकाऱ्यांनी करु नये. संघटना वेगळी व सभागृह वेगळे. संघटनेचे प्रश्न सभागृहात आणून सभागृह सोडणे कोणत्या नियमाप्रमाणे करता येते. अधिकाऱ्यांवर या बाबत कोणती कठोर कारवाई करणार हेही आज ठरविले पाहिजे. अन्यथा लोकप्रतिनिधींना आपल्या भावना सभागृहात मांडता येणार नाही.

ही संघटना अधिकृत आहे काय?

श्री. काशिनाथ कोकाटे : टपऱ्यांच्या मुद्यावर अनेक आरोप प्रत्योरोप झाले. आम्हीही ट्रेड युनियन चालविल्या आहेत. जर सदस्यांच्या भाषणामुळे कोणाच्या भावना दुखविल्या गेल्या असतील तर त्यांनी सभागृहाच्या तसे निदर्शनास आणून द्यावयास पाहिजे होते. हा सभागृहाचा अपमान आहे.

पुराव्याची प्रथम शाहनिशा करावयास हवी होती. स्वतःचा भ्रष्टाचार लपविण्यासाठी ते संघटनेची आड घेत आहेत. आम्ही याचा जाब विचारु यावर कार्यवाही झाली पाहीजे. सभागृहाने नेहमीच अधिकाऱ्यांची बाजू घेतलेली आहे. शिक्षकभरती प्रकरणांत मा.आयुक्तांच्या निवदेनावर सभागृहाने विचार केला होताच.

श्री. अ.जावेद रज्जाक : सभागृह सोडण्यापूर्वी संबंधीत अधिकाऱ्यांनी सिध्द करावयास पाहिजे होते की, त्या टपऱ्या त्यांनी दिलेल्या नाहीत. अधिकाऱ्यांनी अशी टोकाची भूमिका घ्यावयास नको होती. अधिकाऱ्यांनी सभात्याग कोणत्या नियमाने केला. यांची चौकशी व्हावयास हवी.

मा.महापौर : अधिकारी संघटनेचे पदाधिकारी खुलासा करीत आहेत. कृपया सभागृहात स्तब्धता ठेवावी.

डॉ.रझवी संघटना अध्यक्ष : अधिकारी कधीही स.सभासदांचा अपमान करीत नाहीत. तशी आमची भावनाही नाही. आम्ही स.सभासदांना नेहमीच रिस्पेक्ट देतो. ज्या टपरीबाबत वाद चालू आहे ती टपरी श्री. अब्बास यांची आहे. स.सदस्यांनी

दिलेल्या पत्रांवरती कार्यवाही केली जाते. मात्र काही काही प्रकरणात थोडा बहुत विलंबही होतो. स.सभागृहाचा अपमान करण्याचा कोणाचाही विचार नाही. मात्र अधिकाऱ्यांच्या वरतीही आरोप करण्यापूर्वीही पुरावे द्यावयास पाहिजे होते. असे आरोप प्रसिध्द होतात व त्यामुळे अधिकाऱ्यांनाही मनस्ताप सहन करावा लागतो. आम्ही आजची एक दिवसाची सामुहिक रजा मा.आयुक्तांकडे देत आहोत.

मा.आयुक्त : अधिकाऱ्यांनी दिलेली एक दिवसाची सामुहिक किरकोळ रजा नामंजूर केलेली आहे.

अधिकाऱ्यानी सभागृहात बसावे.

अधिकारी सभागृहातून बाहेर पडतात.

श्री. जयवंत ओक : अधिकाऱ्यांना जर या आरोपवर एवढ राग आला असेल त त्याच्या प्रॉपर्टीची चौकशी करण्यात यावी. ही चौकशी सी.बी.आय.मार्फत व्हावी. अधिकाऱ्यांना खुलासा करण्याची संधी देण्यात आलेली होती. त्यानंतरही त्यांनी सभागृह सोडलेले आहे. हे योग्य नाही. याची चौकशी व्हावयास पाहिजे.

श्री. मुजीब आलमशा खान : अधिकाऱ्यांकडे एवढी मालमत्ता आली कोठून याची सी.बी.आय. मार्फत चौकशी व्हावयास हवी. अधिकाऱ्यांनी संघटनेच्या माध्यमातून सदस्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न करु नये.

मा.आयुक्त : टपरी समितीच्या अहवालानंतर करावयाच्या कारवाई संदर्भाने स.सदस्य श्री.संजय जोशी यांनी प्रश्न उपस्थित केला होता. चर्चेच्या ओघात स.स.श्रीमती नुरजहाँ बेगम यांनी अदालत रोडवरती उभारण्यात आलेल्या टपरी संदर्भाने वाहुळ, अंधारे मराठे यांनी पैसे घेवून टपरी उभारण्यास परवानगी दिली असे सांगितले या विधानावर गदारोळ होवून अधिकाऱ्यांनी सभात्याग केला. यावर स.स.श्री.रशिद (मामू), नरेंद्र पाटील, मनमोहनसिंग ओबेरॉय, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता, सभापती, स्थायी समिती तसेच इतरही अनेक स.सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. सभागृहास वाटले की, अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर दबाव टाकला, भ्रष्टाचारावर पांघरुण घालण्याचा अधिकाऱ्यांनी प्रयत्न केला. अशा एकंदर स.नगरसेवकांच्या भावना होत्या. मा.महापौरांनी आदेश दिला की, अधिकाऱ्यांनी ताबडतोब सभागृहात येऊन बसावे. त्यांच्या आदेशास मान देवून डॉ. राझवी यांनी निवेदन केले. त्यांचे म्हणणे बरोबर नाही. अशी भूमिका मा.मुजीब आलमशाखान यांची आहे. प्रशासकीय अधिकारी म्हणून मी खुलासा करु इच्छितो की, स.नगरसेवक व अधिकारी प्रशासनाची व शहर विकासाची दोन चाके आहेत. याचा अर्थ असा नाही की, लोकप्रतिनिधींनी त्यांच्या भावना व्यक्त करू नयेत. अधिकाऱ्यांनीही झालेल्या टिकेचे आत्मपरिक्षण करावे. अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर झालेल्या आरोपामुळे एक दिवसाची किरकोळ रजा दिलेली आहे. मी हा अर्ज नामंजूर केलेला आहे व सभागृहात उपस्थित राहणेबाबत सुचविले आहे. सभागृहास माझी विनंती आहे की, भावना व्यक्त करण्याचा अधिकार सर्वानांच आहे. परंतु टिका करताना सर्वांनीच विचार करावयास हवा. स.नगरसेविकेने तिघाची नांवे घेवून आरोप केले आपण पुरावे द्या. अशा पुराव्यांची चौकशी करुन संबंधित विरुध्द कार्यवाही केली जाईल. आपण सर्वच त्यांची बाजू घेता. जर भ्रष्टाचार झाला असेल तर

पुरावा द्या. त्यांच्या विरुध्द तातडीने कार्यवाही करण्यात येईल. झालेल्या प्रकरणावर पडदा टाकण्यात यावा.

सौ. नुरजहाँ बेगम : मा.आयुक्तांच्या भुमिकेच अभिनंदन. मी पुरावे देण्याचा अवश्य प्रयत्न करेन.

श्री. मुजीब आलम खान : अधिकाऱ्यांनी स.नगरसेवकांना इज्जतीने वागविले पाहिजे. श्री. जयवंत ओक यांनी मागणी केल्याप्रमाणे अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची सी.बी.आय.तर्फे चौकशी करण्यात यावी.

श्री. गंगाधर गाडे : मोजके व आवश्यक ते खुलासा या ठिकाणी केलेला आहेत. अधिकरी संघटना सभासदांनी ज्याप्रकारे वर्तणुक केली ती योग्य नाही. हा सभागृहाचा व लोकप्रतिनिधींच अपमान आहे. या सभागृहातच सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली जाऊ शकते झाल्या प्रकाराची चौकशी करण्यात यावी.

श्री. मुजीब आलमशा खान : बाहेर एक व्यक्ती आलेली आहे. त्यांने एका अधिकाऱ्यांस रुपये १००० दिलेले आहेत असे त्याचे म्हणणे आहे. त्यास सभागृहात बोलाविण्या यावे.

मा.महापौर : त्यांनी लेखी तक्रार द्यावी. त्यांना सभागृहात घेता येणार नाही. स.नगरसेवक व अधिकारी हे महानगरपालिकेची दोन चाके आहेत. त्यात समन्वय नसेल तर शहराचा विकास होणार नाही. दोघांनाही सहकार्याची भावना ठेवावयास हवी. यापुढे असे प्रकार होणार नाहीत याची दखल घ्यावी.

**विषय क्र. १६३/१ :** दिनांक २०.१०.९६ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे तसेच दिनांक २०.११.९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री. संजय जोशी : २०.११.९६ च्या सर्वसाधारण सभेतील इतिवृत्ताचे पान क्र.१३ सिल्मिल्क कॉलनीत ज्या ठिकाणी सार्वजनिक आरोग्य केंद्र बांधण्यात येणार आहे त्यांच्या बाजूची जागा शालेय विद्यार्थ्यांसाठी देण्याचा प्रस्ताव येत आहे. विद्यार्थ्यांना खेळाचे मैदान उपलब्ध करुन देणे ही त्या संस्थेची जबाबदारी आहे. संस्थेस महापालिकेची जागा देवू नये अशी माझी सूचना आहे.

मा.महापौर : सूचना मंजूर करण्यात येते.

श्री. गिरजाराम हाळनोर : पत्रकारभवनसाठी महानगरपालिकेतर्फे जागा देण्यात आलेली आहे. या जागेत आकारण्यात आलेले भाडे कमी करावे अशी त्यांची मागणी आहे. तेव्हा पत्रकारभवनासाठी देण्यात आलेल्या जागेस नियमानुसार कमीत कमी भाडे आकारावे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मा.महापौर यांच्या अतिथी भत्यामध्ये जी रु. पाच लाखांची वाढ करण्यात आली आहे. त्या ऐवजी तीन लाख रु.अशी दुरुस्ती करुन मंजूरी देण्यात यावी.

श्री. अ.रशिदखान मामू, श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री.गंगाधर गाडे, श्री.संजय जोशी, सौ.लता दलाल : ठराव क्र.१४३ दि.२०.११.९६ सर्वसाधारण सभेने आंध्र प्रदेशातील चक्रीवादळ ग्रस्तांना आर्थिक मदत म्हणून स्वेच्छानिधीमधून एक हजार रुपये देण्याचा ठराव झालेला आहे. त्याऐवजी स.नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून ५०० रु. व मानधनातून ५०० रु.असे एकुण एक हजार रुपये चक्रीवादळग्रस्तांना प्रदान करण्याच्या दुरुस्तीसह मंजूर करावे.

मा.महापौर : सूचना मान्य करण्यात येते.

**ठराव :**

उपरोक्त दोन्ही सूचनासह दि.३०.१०.९६ व २०.११.९६ च्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजूरी देण्या येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६४/२ :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मो.बुक्कलगुडा, रणमस्तपुरा, नवाबपुरा आणि जिन्सी भागातील रोडचे डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक र.रु.८,७१,३२०/- चे तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती (पुर्नडांबरीकरण) सन ९६-९७ च्या लेखा शिर्षाअंतर्गत उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येईल. सदरील काम अंदाजे सहा वर्षापूर्वी करण्यात आले होते. सदर कामाची एकूण लांबी २९०० मीटर असून रुंदी एकूण ४.०० मीटर आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले र.रु.८,७१,३२०/- चे मंजूरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेचे विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बुक्कलगुडा, रणमस्तपुरा, नवाबपुरा आणि जिन्सी भागातील रोडच्या डांबरीकरणाचे काम अंदाजे सहा वर्षापूर्वी करण्यात आलेले आहे. प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सदर कामाची एकुण लांबी २००० मीटर व रुंदी ४.०० मीटर आहे. सदर रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसूचीनुसार र.रु.८,७१,३२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील कामाच्या अंदाजपत्रकीस र.रु.८,७१,३२०/- ला तसेच सदरचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती (पुनर्डांबरीकरण) ९६-९७ या लेखाशिर्षकाअंतर्गत करण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६५/३ :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, किराडपूरा राम मंदिर ते सिडको हद्दी पर्यंतच्या रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.१२,३५,६२५/- चे तयार करण्यात आले आहे. या रस्त्याचे काम पूर्वी साधारणतः ५ वर्षापूर्वी करण्यात आले होते. स.नगरसेविका आणि नागरिकांच्या मागणीचा विचार करता सदर अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. ज्यामध्ये रस्त्यांची लांबी ही ८६७ मीटर असून रुंदी ११.५ मीटर घेण्यात आलेली आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाव व दुरुस्ती (पुर्नडांबरीकरण) सन ९६-९७ या लेखा शिर्षकाअंतर्गत उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु.१२,३५,६२५/- चे मंजूरी मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दर्शविल्यानुसार किराडपुरा, राममंदिर ते सिडको हद्दीपर्यंतच्या रोडचे डांबरीकरण साधारणतः ५ वर्षापूर्वी करण्यात आलेले आहे. स.नगरसेविका आणि नागरिकांच्या मागणीचा विचार करुन हा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. ज्यामध्ये रस्त्यांची लांबी ही ८६७ मीटर व रुंदी ११.५ मीटर घेण्यात आलेली आहे.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किराडपुरा राममंदिर ते सिडको हद्दीपर्यंतच्या रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या ९५-९६ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१२,३५,६२५/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च रस्ते देखभाल दुरुस्ती (पुर्नडांबरीकरण) ९६-९७ या लेखा शिर्षकांतर्गत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६६/४ :** अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, भाग्यनगर, श्रीरामनगर कॉलनी व उदयनगर अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाचे सा.बा. खात्याचे डी.एस.आर. दराने रक्कम रु.५,३२,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांची मंजूरी मिळालेली आहे. सदरील कामाचा "रस्ते दुरुस्ती" पुर्नडांबरीकरण सन १९९६-९७ साली असलेल्या तरतुदीमधून प्रस्तावित आहे. सदर रस्त्यावर पूर्वी सन १९९० मध्ये डांबरीकरण करण्यात आले होते. रस्त्याची एकुण लांबी २०१५ मीटर आहे. सरासरी रुंदी ४.०० मी ते ५.५० मीटर आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.५,३२,३००/- चे अंदाजपत्रक मंजूरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भाग्यनगर श्रीरामनगर कॉलनी व उदयनगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण पूर्वी १९९० मध्ये करण्यात आलेले आहे. रस्त्याची एकुण लांबी २०१५ मीटर आहे. सरासरी रुंदी ४ मी ते ५.५० मी.आहे. प्रस्तावात दर्शविल्यानुसार भाग्यनगर, श्रीरामनगर कॉलनी व उदयनगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी सा.बां. खात्याच्या डी.एस.आर.दराने तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.५,३२,३००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च रस्ते दुरुस्ती पुर्नडांबरीकरण ९६-९७ मधून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६७/५ :** अतिरिक्त शहर अभियंता सादर करीत आहे की, खोकडपुरा भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामाचे सन ९५-९६ चे सा.बां.खात्याच्या डी.एस.आर.दराने रक्कम रु.५,३६,८६६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांची मंजूरी मिळालेली आहे. सदर रस्त्यावर पूर्वी १९९१-९२ मध्ये डांबरीकरण करण्यात आलेले होते. रस्त्याची एकुण लांबी २१३५ मीटर आहे. सरासरी रुंदी ४.५० मी.आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.५,३६,८६६/- चे अंदाजपत्रक मंजूरीबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खोकडपुरा भागात पूर्वी १९९१-९२ मध्ये डांबरीकरण करण्यात आलेले आहे. प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खोकडपुरा भागातील २१३५ मी.लांब व सरासरी ४.५० मी.रुंद रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी ९५-९६ च्या सा.बां.खात्याच्या डी.एस.आर.दराने तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.५,३६,८६६/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६८/६ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.हर्सुल गांव स्लम येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेबाबत कामारिता सा.बां.यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु.१३,५८,६९६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम ‘‘अठरा खेडी विकास योजना’’ या शिर्षातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.७.११.९६ ला प्रशासकीय मंजूरी दिली आहे.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रु.१३,५८,६९६/- यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल गांव स्लम येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु.१३,५८,६९६/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम ‘‘अठरा खेडी विकास योजना’’ या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६९/७ :** औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना १९७५ नुसार आरक्षण क्र.१५० व १५१ ‘‘खुलीजागा व प्रा.शाळा क्रिडांगण’’ या प्रस्तावाने बांधित मिळकत शहानूरवाडी येथील सव्हे क्र.९/२ चे मिळकतधारक यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिलेली आहे. जागेचे क्षेत्र सहा एकर आहे. मंजूर विकास योजनेतील आरक्षणाखालील जमिनी १० वर्षानंतर संपादन केल्या नाहीत तर अशी खरेदी सुचना देता येते.

सदरील खरेदी सुचनेनुसार सहा महिन्याच्या आंत भूसंपादनाची कार्यवाही करणे व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार भूसंपादनाची कार्यवाही करणे बंधनकारक आहे. जर भुसंपादनाची कार्यवाही वरील मुदतीत केली नाही तर आरक्षीत जमीन विकास योजनातून वगळली जाते व लगतच्या वापरानुसार अर्जदारास विकास परवानगी द्येय होते.

अर्जदाराने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिली असल्याने भूसंपादनाची कार्यवाही मुदतीत करणेसाठी भूसंपादन प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना १९७५ नुसार आरक्षण क्र.१५० व १५१ ‘‘खुलीजागा व प्रा.शाळा क्रिडांगण’’ या प्रस्तावाने बांधित मिळकत

शहानूरवाडी येथील सर्व्हे क्र.९/२ चे मिळकत धारक यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिलेली आहे. जागेचे क्षेत्र सहा एकर आहे. मंजूर विकास योजनेतील आरक्षण खालील जमिनी १० वर्षानंतर संपादन केल्या नाहीत तर अशी खरेदी सूचना देता येते.

सदरील खरेदी सुचनेनुसार सहा महिन्यांच्या आत भुसंपादनाची कार्यवाही करणे व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार भुसंपादनाची कार्यवाही करणे बंधनकारक आहे. जर भुसंपादनाची कार्यवाही वरील मुदतीत केली नाही तर आरक्षीत जमीन विकास योजनातून वगळली जाते व लगतच्या वापरानुसार अर्जदारास विकास परवानगी द्येय होते.

अर्जदाराने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिली असल्याने भुसंपादनाची कार्यवाही मुदतीत करण्यासाठी भुसंपादन प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७०/८ :** मालमत्ता अधिकारी यांनी मा.आयुक्त यांच्या मंजूरीनुसार प्रस्ताव सादर करीत आहे की, क्रांतीचौक व्यापारी संकुलातील निविदा अन्वये दुकाने भाड्याने देण्यात आली आहे. निविदा अटी व शर्ती क्र.३ अन्वये दूकान ३० वर्षाच्या भाड्याने देण्यात आली आहे. तसेच अट क्र.१५ अन्वये महसूल अधिनियमान्वे आवश्यक किंमतीच्या मुद्रांकन पेपरवर निविदा धारकांनी मनपाच्या हक्कात करारनामा करुन देणे बंधनकारक राहील. वरील निविदा अटी शर्तीच्या अधिन राहून दूकान धारकांना करारनामा करणेबाबत नोटीस देण्यात आल्या होत्या.

त्यापैकी काही दुकानदारांनी अट क्र.३ व १५ च्या अधिन राहून एकुण दुय्यम निबंधक-१ औरंगाबाद यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून दुकान क्र.५ व ६ मनपाच्या हक्कात करारनामा दिला आहे.

तथापि काही दुकान धारकांनी अट क्र.३ व १५ च्या अधिन राहून दुय्यम निबंधक-१ औरंगाबाद यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून दुकान क्र.५ व ६ मनपाच्या हक्कात करारनामा लिहून दिला आहे.

तथापि काही दूकान धारकांनी अर्ज देवून ५००/- रु.स्टॅम्प पेपरवर लिजवर डीड करावी म्हणून विनंती केली होती. अट क्र.१५ नुसार ५००/- रु.स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन शक्य नाही.

तरी दुकानधारकांनी ३० ऐवजी ११ महिन्याच्या कराराने दूकान घेणेबाबत संमती असल्यास त्यांच्या भाडेपट्ट्याच्या कालावधी ११ महिने राहील.

निविदा अट क्र.३ अन्वये भाडेपट्ट्याचा कालावधी ३० वर्षाऐवजी ११ महिन्याचाच करण्याबाबत मा.सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक व्यापारी संकुलातील दुकाने भाड्याने देण्यात आली. निविदा अटी व शर्ती क्र.३ अन्वये दूकान ३० वर्षाच्या भाडेपट्ट्याने देण्यात आली आहेत. तसेच अट क्र.१५ अन्वये महसूल अधिनियमान्वये आवश्यक किमतीच्या मुद्रांक पेपरवर निविदा धारकांनी मनपाच्या हक्कात करारनामा करुन देणे बंधनकारक राहील. वरील निविदा अटी व शर्तीच्या अधिन राहून दुकान धारकांना करारनामा करणेबाबत नोटिसा देण्यात आल्या आहेत.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे काही दूकान धारकांनी अट क्र.३ व १५ च्या अधिन राहून दुय्यक निबंधक-१ औरंगाबाद यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून दुकान क्र. ५ व ६ मनपाच्या हक्कात करारनामा करुन दिला आहे.

तथापि काही दूकान धारकांनी अर्ज देवून ५००/- स्टॅम्प पेपरवर लिजडीड करावे म्हणून विनंती केली होती. अट क्र.१५ नुसार रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुण घेणे शक्य नाही.

निविदातील अट क्र.३ अन्वये भाडेपट्ट्याच्या कालावधी ३० ऐवजी ११ महिन्याचा करण्यास व इतर सर्व अटी शर्ती तशाच ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७१/९ :** कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, परिसर अभियांत्रिकी प्रकल्प विभाग, औरंगाबाद यांचे पत्र क्र.९७८/९६ दि.१७.७.९६ प्रमाणे "औरंगाबाद पाणीपुरवठा योजना टप्पा क्र.३ ग्रामीण पुरवठा योजनेसह जि.औरंगाबाद" या योजनेचा आराखडा तयार करण्यात येत आहे.या योजनेअंतर्गत शासनाच्या पाणी पुरवठा योजनेच्या संबंधीच्या श्वेतपत्रिकेनुसार शहरी विभागाच्या पाणी पुरवठा योजनेच्या संबंधिच्या श्वेतपत्रिकेनुसार शहरी विभागाच्या पाणी पुरवठा योजना तयार करतांना शहराच्या हद्दीत ५ किमी अंतरापर्यंत एरियातील सर्व गावांचा समावेश करावा तसेच योजनेची पाईप लाईन ज्या गावामधून जाते त्या गावांचाही समावेश त्या योजनेत नमूद आहे. ही योजना सन २०३१ हे अंतिम टप्प्यासाठी वर्ष गृहीत धरून तयार केले आहे. त्यामध्ये छावणी भागाचा समोवश आहे. ही योजना सन २०३१ ला ४७.२७ लाख एवढी लोकसंख्या गृहीत धरुन व त्यातून अस्तित्वात असलेल्या योजनेची उपलब्ध क्षमता वजा केली असता या योजनेचा आराखडा ६०० दशलक्ष प्रतिदिन एवढया क्षमतेचा येतो.

या योजनेत शहराच्या सभोवतालच्या ५ किमी परिघातील ६५ गावांचा समावेश असून पाईपलाईन ज्या गावतून जाते अशा १४ गावांचा समावेश करण्यात आलेला आहे. या योजनेच्या आराखड्यासाठी ढोबळ किंमत रु.६००/- कोटी एवढी होते. पाण्याचा दर प्रतिहजार लिटरला ४.८ एवढा येईल. सदरचा खर्च हा शासनाच्या मंजूरीकरीता पाठविण्या अगोदर मनपा तर्फे आराखडा स्विकृतीचा ठराव होणे आवश्यक आहे. खालील बाबीवर विचार करणे योग्य राहील.

१. शहराच्या हद्दी बाहेरील खेड्यांचा समावेश आराखड्यामध्ये असल्याने याची जबाबदार मनपा घेणार नाही.
२. ग्रामीण भागावरील येणारा खर्च मनपातर्फे स्विकारला जाणार नाही.
३. ग्रामीण भागातील दैनंदिन देखभाल व दुरुस्ती, पाणी पुरवठा मनपा स्विकारणार नाही.

तरी फक्त शहरातील आराखड्यास मान्यता देणे योग्य राहील.

करिता प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे परिसर अभियांत्रिकी प्रकल्प विभाग, औरंगाबाद याचे पत्र क्र.९७८/९६ दि.१७.७.९६ प्रमाणे औरंगाबाद पाणीपुरवठा योजना टप्पा यांचे क्र.३ ग्रामीण पुरवठा योजनेसह जि.औरंगाबाद या योजनेचा आराखडा तयार करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत शासनाच्या पाणीपुरवठा योजना तयार करताना शहराच्या हद्दीत ५ किमी अंतरापर्यंत परिसरातील सर्व गावांचा समावेश करावा. तसेच योजनेची पाईपलाईन ज्या

गावातून जाते त्या गावांचाही समावेश त्या योजनेत करावा असे ही योजना सन २०३१ हे अंतिम टप्प्यासाठी वर्ष गृहीत धरुन तयार केले आहे. त्यामध्ये छावणी विभागाचा समावेश आहे. ही योजना सन २०३१ व त्यातून अस्तित्वात असलेल्या योजनेची उपलब्ध क्षमतेचा येतो.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहराच्या सभोवतालच्या ५ किमी परिघातील ६५ गावाचा समावेश असून पाईपलाईन ज्या गावातून जाते अशा १४ गावांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेचा आराखड्यांची ढोबळ किंमत रु.६०० कोटी एवढी येते. पाण्यचा दर प्रतिहजार लिटरला ४.८० एवढा येईल. सदरचा आराखाडा हा शासनाच्या मंजूरीला पाठविण्या अगोदर मनपातर्फे आराखडा स्विकृतीचा ठराव देणे आवश्यक आहे. प्रस्तावात दर्शविल्यानुसार खालील बाबींना सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

१. शहराच्या हद्दी बाहेरील खेडयांचा समावेश आराखड्यामध्ये असल्याने त्याची जबाबदारी मनपा घेणार नाही.
२. ग्रामीण भागावरील येणारा खर्च हा मनपातर्फे स्विकारला जाणार नाही.
३. ग्रामीण भागातील दैनंदिन देखभाल व दुरुस्ती पाणीपुरवठा मनपा स्विकारणार नाही.

शहरातील आराखड्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७२/१० :** औरंगाबाद शहराचे मंजूर विकास योजनामधील लक्ष्मण चावडी ते सिउकोसह (स्मशान मारोती मार्गे) हा २४०० मीटर रुंद रस्ता जो शहराचे मध्यभागातून जाणाऱ्या नासिक-निर्मल राज्य मार्गाचा भागास असलेल्या जालना रोडला पर्यायी रस्ता म्हणून आहे. सदर रस्ता विकासामुळे जालनारोड वाहतूक वाहनांची वर्दळ कमी होवून अपघाताचे प्रमाण कमी होईल. हा रस्ता जालना रस्त्यास समातंर असल्याने विकासामुळे मध्यवर्ती बस स्थानक, समर्थनगर, सिल्लेखाना खोकडपुरा या भागातून सिडकोकडे जालना रोड टाळून थेट वाहतूक होवू शकते. तसेच हा शहर बस वाहतुक मार्गही होवू शकतो. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या स्मशान भूमीसाठी या रस्ता विकासामुळे प्रशस्त व मोठा रस्ता मिळू शकतो. या सर्व बाबी पाहता सदर रस्ता विकसीत करणे गरजेचे आहे. या रस्त्याचा लक्ष्मण चावडी ते स्मशान मारोती मंदिर हा भाग मंजूर विकास योजनानुसार आहे तर स्मशान मारुती मंदिर ते रोड हा प्रारुप शहर विकास योजना नुसार आहे.

२. चंपा मज्जीद ते जालना रोड (३०.०० मी.रुंद रस्ता) शहागंज शहाबाजार रोशनगेट भागातील वाहनाचा वर्दळ/वाहतुक पाहता विकसीत करणे गरजेचे आहे. या रस्त्याचे विकासामुळे गणेश कॉलनी विभागीय आयुक्त कार्यालय परिसर या भागातून जालना रोडकडे शहाबाजार, शहागंज मार्गे थेट वाहतुक होवू शकते. त्यामुळे मोंढा जाफरगेट भागात होणारी वाहतुकीची कोडी सोडविणे शक्य होईल.

३. काचीवाडा ते शहाबाजार (१२.०० मी.रुंद रस्ता) चेलीपुरा काजीवाडा भागातील वाहतुक थेट शहाबाजार मार्गे जाणाऱ्या ३०.०० मीटर रुंद रस्त्यास जोडण्याचे दृष्टीने सदर रस्ता विकसीत करणे आवश्यक आहे. हा रस्ता चेलीपुरा पोलिस चौकीस लागून शहाबाजारकडे जाणाऱ्या १५.०० मी.रुंद रस्त्यास या नंतर पर्यायी रस्ता आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे सदर तिन्ही रस्त्याचे शहरातील वाढती वाहनांची संख्या रहदारी इ.दृष्टीने विचार करता विकास योजना प्रस्तावानुसार रुंदीकरण करणे आवश्यक असल्याने त्यासंदर्भाने सदर रस्ते विकसीत करणेकरिता रस्ता रुंदीकरणाने बाधीत होणारी

जागा संपादीत करण्यासाठीचा भुसंपादनाकरिता लागणाऱ्या खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

प्रस्ताव मान्यतेनंतर भुसंपादनाची कार्यवाही करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रस्तावित तिन्ही रस्त्यांचे शहरातील वाहनांची संख्या/रहदारी इत्यादी दृष्टीने विचार करत विकास योजना प्रस्तवानुसार रुंदीकरण करणे आवश्यक असल्याने त्या संदर्भाने सदर रस्ते विकासीत करणे करता रस्ता रुंदीकरणाने बाधीत होणारी जागा संपादीत करण्यासाठीचा भुंसंपादनाकरिता लागणाऱ्या खर्चाच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७३/११ :** औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार ५० फूट रुंद रस्ता देवडीबाजार चौक (कामाक्षी लॉज) ते लोटाकारंजा चौक या रस्त्याने न.भू.क्र.६५०९,६५,११ या मिळकती बाधीत असून मिळकत धारकांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिलेली आहे.

मंजूर विकास योजनेतील आरक्षणाखालील जमिन किंवा रस्त्याखालील जमीन १० वर्षापर्यंत संपादन केल्या नाहीत तर तशी खरेदीची सुचना अर्जदार/मिळकत धारक देवू शकतात. सदर रस्ता मंजूर विकास योजना १९७५ चा आहे. त्यामुळे अर्जदाराने दिलेली खरेदी सूचना अधिनियमाच्या तरतुदीनुसार आहे. त्यामुळे अर्जदाराने दिलेली खरेदीसूचना अधिनियमाच्या तरतुदीनुसार आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९९६ चे कलम १२७ नुसार भुसंपादनाची कार्यवाही ६ महिन्यांच्या आत सुरु करणे आवश्यक आहे. नसता रस्त्याखालील जमीन वगळले जाते आणि वापरानुसार अर्जदारास विकास परवानगी द्येय होते.

सबब भूसंपादनाची कार्यवाही मुदतीत सुरु करणेसाठी भुसंपादन प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहर मंजूर विकास योजनेनुसार ५० फूट रुंद रस्ता देवडी बाजार चौक (कामाक्षी लॉज) ते लोटा कारंजा चौक या रस्त्याने न.भू.क्र.६५०९,५६,१० व ६५११ या मिळकत बांधीत असून मिळकत धारकांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिलली आहे.

मंजूर विकास योजनेतील आरक्षण खालील जमिन किंवा रस्त्याखालील जमीन ४० वर्षापर्यंत संपादन केल्या नाहीत तर अशी खरेदी सूचना अर्जदार/मिळकतधारक देवू शकतात. सदर रस्ता मंजूर विकास योजना १९७५ चा आहे. त्यामुळे अर्जदाराने दिलेली खरेदी सूचना अधिनियमाच्या तरतुदीनुसार आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ नुसार भुसंपादनाची कार्यवाही ६ महिन्याच्या आत सुरु करणे आवश्यक आहे. नसता रस्त्याखालील जमीन वगळली जाते आणि लगतच्या वापरानुसार अर्जदारास विकास परवानगी द्येय होते.

सबब प्रस्तावात दर्शविल्यानुसार भुसंपादनाची कार्यवाही मुदतीत सुरु करण्यासाठी भुसंपादन प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७४/९२ :** शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२८ अन्वये भूतपूर्व औरंगाबाद नगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील (१९७५) ''नाविकासक्षेत्र'' वगळून व शासनाने सिडको अधिसूचीत (नवीन औरंगाबाद सुधारीत) या प्रसिध्दी झालेल्या विकास योजनेसंबंधी आलेल्या सूचना व हरकती यांचा विचार करणेकरिता शासन निर्णय क्र.टीपीएस/३०९५/९५४/सीआर-६७/९५ युडी दि.८.१.९६ रोजीच्या आदेशान्वये नियोजित समीतीची नेमणूक केली आहे.

सदर नियोजन समितीने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २(१) अन्वये नियोजन समितीने विकास योजनेसंबंधी प्राप्त सूचना व हरकती संदर्भाने संबंधितास सुनावणी देवून त्यावर नियोजन समितीने विचार करून आपला अहवाल निर्णय नेमणुकीचे पासून दोन महिन्यांचे आत सादर करावयाचा असतो.

नियोजन समितीने प्रारुप विकास योजना मधील सूचनाव हरकती प्राप्त आरक्षणाची तसेच रस्त्याची स्थळ पाहणी व नागरिकाना सुनावणी देण्याचे काम पूर्ण केलेले आहे. नियोजन समीतीस यापूर्वी ठराव क्र.१७१/११ दि.१६.३.९६ अन्वये सर्वसाधारण सभेने दि.८.३.९६ पावेतो मुदत वाढ दिलेली होती. लोकसभा निवडणूक १९९६ व पदवीधर मतदार संघाचे निवडणूकी मुळे लागू असलेल्या आचारसंहितेमुळे नियोजन समितीचे काम करु शकलेली नसलेले व कामाचे स्वरुप पाहता नियोजन समिती पुन्हा सर्वसाधारण सभा ठराव क्र.२७/२५ दिनांक १७.७.९६ पासुन पुढे सहा महिन्यासाठी मुदत वाढ मिळालेली आहे. समितीने आपला अहवाल सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यास दि.८.१२.९६ पासून ३१.३.१९९७ पावेतो मुदत वाढ मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२८ अन्वये भूतपूर्व औरंगाबाद नगर पालिकेच्या मंजूर विकास योजनेतील (१९७५) ''नाविकासक्षेत्र'' वगळून व शासनाने सिडको अधिसूचित (नविन औरंगाबाद) क्षेत्रातून वगळलेल्या क्षेत्राकरिता प्रारुप विकास योजना औरंगाबाद (सुधारीत) या प्रसिध्द झालेल्या विकास योजनेसंबंधी आलेल्या सूचना व हरकती याचा विचार करणेकरिता शासन निर्णय क्र.टीपीएस/३०९५/९५४/सीआर-६७/९५ युडी दि.८.१.९६ रोजीच्या आदेशान्वये नियोजन समितीची नेमणूक केली आहे. प्रस्तावात दर्शविल्यानुसार नियोजन समितीने प्रारुप विकास योजनामधील सूचना व हरकती प्राप्त आरक्षणांची तसेच रस्त्याची स्थळ पाहणी व नागरिकांना सुनावणी देण्याचे काम पूर्ण झालेले आहे. नियोजन समितीस आपला अहवाल सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यांस १२.९६ ते ३१.३.९७ पावेतोची मुदतवाढ सर्वानुमते देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ''ऐनवेळचे विषय''

**विषय क्र. १७५/१३** : शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.राजनगर (शहानूरवाडी) येथील मनपाच्या जागेवर आयुर्वेदिक दवाखाना बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसूचीनुसार र.रु.६,६२,४४०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यासाठी मा.आयुक्तांनी दि.१८.१२.९६ अन्वये शिफारस केलेली आहे. सदरचा खर्च विकास इमारती शाळा दवाखाने बांधणेच्या लेखा शिर्षामधून सन ९६-९७ या वर्षात करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.राजनगर (शहानुरवाडी) येथील महापालिकेच्या जागेवर आयुर्वेदिक दवाखाना बांधण्याच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या ९५-९६ च्या जिल्हादरसूचीनुसार तयार करण्यात आलेल्या र.रु.६,६२,४४०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे कामाचा खर्च विकास इमारती शाळा दवाखाने बांधणे ९६-९७ या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७६/१४ :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, छावणीपुलाच्या पूर्व दिशेला मोकळ्या जागेत औरंगाबाद मुंबई रस्त्यावर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती ब्रॉन्झ धातूचा १० फूट उंचीचा पुतळा बसविणे व सभोवताली सुमारे १०५मी.X१०मी. आकाराचे बेट विकसीत करुन त्यांचे सौंदर्यीकरण करण्याच्या कामाकरिता सा.बां.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.४,५०,०००/- तसेच सिव्हील वर्क व विद्युतीकरणासाठी रक्कम रु.१२,२९,१५०/- ची तरतुद करण्यात आलेली आहे. सदरील कामाचा खर्च शासनकडून प्राप्त रक्कम रु.१०.०० कोटीच्या अनुदानामधून हाती घेतलेल्या कामामधून जी बचत होणार आहे त्या बचतीमधून करण्यात येईल.

सदरील पुतळा ज्या ठिकाणी बसवावयाचा आहे ती जागा महानगरपालिकेच्या मालकीची नसून ती सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मालकीची (महाराष्ट्र शासनाची) आहे. करिता जागा सार्वजनिक बांधकाम खात्याकडून हस्तांतरित करुन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याशी पत्रव्यवहार करुन सदर जागा संपादनाची कारवाई करण्यात येईल.

तरी या कामाकरिता संभाजी महाराजांचा पुतळा खरेदीस्तव रु.४,५०,०००/- च्या कामासाठी दरपत्रके मागविण्यात येतील योग्य शिल्पकारांकडून काम करुन घेण्यात येईल. तसेच वाहतूक बेट विकसीत करणे व इतर सिव्हील वर्क तसेच विद्युतीकरणाच्या रु.१२,२९,१५०/- च्या कामासाठी लघुनिविदा मागवून अनुभवी कंत्राटदाराकडून हे काम करण्यात येईल.

तरी रु.१६,७९,१५०/-च्या अंदाजपत्रकास छावणी पुलाजवळ पूर्व दिशेला सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मालकीच्या जागेवर संभाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्याच्या प्रस्तावास तसेच ही जागा सार्वजनिक बांधकाम खात्याकडून मनपाकडे हस्तांतरीत करुन घेण्यास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभा यांचेपुढे तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे छावणी पुलाच्या पूर्वेस मोकळ्या जागेत औरंगाबाद मुंबई रस्त्यावर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती ब्रॉन्झ धातूचा १० फूट उंचीचा पुतळा बसविणे व सभोवताली १०५मी.X१०मी. आकाराचे वाहतूक बेट विकसीत करुन त्याचे सौंदर्यीकरण करण्याच्या कामाकरिता सा.बां.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसूचीनुसार रक्कम रु.१६,८९,१५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. यामध्ये पुतळा बसविण्यासाठी रक्कम रु.४,५०,०००/- तसेच सिव्हील वर्क व विद्युती करणासाठी रक्कम रु.१२,२९,१५०/- ची तरतुद करण्यात आलेली आहे. सदरील कामाचा खर्च शासनाकडून

प्राप्त रक्कम रु.१०.०० कोटीच्या अनुदानातून हाती घेतलेल्या कामातून जी बचत होणार आहे त्यातून करण्यात येईल.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संभाजी महाराजांचा पुतळा खरेदीस्तव रु.४,५०,०००/- च्या कामासाठी दरपत्रके मागविण्यास व योग्य शिल्पकाराकडून काम करुन घेण्यास तसेच वाहतूक बेट विकसीत करणे व इतर सिव्हील वर्क विद्युतीकरणाच्या रुपये करण्यास व छावणी पुलाजवळ पूर्व दिशेला सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मालकीच्या जागेवर संभाजी जागेवर संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळा बसविण्याच्या व ही जागा सार्वजनिक बांधकाम खात्याकडून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७७/१५ :** सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, मा.आयुक्त साहेब यांच्या आदेशान्वे दैनिक वेतन कामगारांचे दैनिक वेतनदर निश्चित करणे बाबत मा.उपआयुक्त-१ यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर शिफारशी अन्वये कालेलकर आयोगाअनुसरुन महानगरपालिका अस्थापनेवरील दैनिक वेतन रु.४३/- दर देण्याची शिफारस केलेली आहे. सध्या दैनिक वेतन कामगारांना रु.३५/- दैनिक देण्यात येत आहे.

सध्यास्थितीत मनपा अस्थापनेवरील दैनिक वेतन कामगारांना नविन सुधारीत दैनिक वेतन दर रु.४३/- देणे झाल्यास खालीलप्रमाणे आर्थिक बोजा पडेल. ८०० कर्मचारी दैनिक वेतन रु. ४३ प्रमाणे.

प्रतिमहा खर्च ८,९४,४००
८०० कर्मचारी दैनिक वेतन रु.३५ प्रमाणे
प्रतिमहा प्रमाण खर्च ७,२८,०००
८०० कर्मचारी फरकाची रक्कम रु. १,६६,४००
या प्रमाणे खर्च

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिका अस्थापनेवरील चतुर्थश्रेणी दैनिक वेतन कामगारांना रु.३५ ऐवजी रु.४३/- दैनिक वेतन देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

करिता मनपा अस्थापनेवरील चतुर्थश्रेणी दैनिक वेतनदेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर १.२० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.महापौरांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | मा.महापौर |
| महानगरपालिका,औरंगाबाद | महानगरपालिका,औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका*

**दिनांक २३.१२.१९९६ रोजी दुपारी ३.३० वाजता मा.महापौर श्री.गजानन बारवाल यांच्या अध्यक्षतेखाली कै.केशव सिताराम ठाकरे सभागृहात विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. ह्या सभेस खालील स.सभासद उपस्थित होते. सभेची सुरुवात वंदेमातरम् ह्या गीताने झाली.**

| | | |
|---|---|---|
| १. | स.स. श्री.गिरजाराम हाळनोर | स.सभासद |
| २. | --''-- श्री.जयवंत केशवराव ओक | --''-- |
| ३. | --''-- श्री.मुजीबशाह आलम खान | --''-- |
| ४. | --''-- सौ.रुखमनबाई खंडेराव लोंखडे | --''— |
| ५. | --''-- श्री.अफसरखान यासिनखाँन | --''-- |
| ६. | --''-- श्री.प्रभाकर सिताराम विधाते | --''-- |
| ७. | --''-- सौ.साजेदा बेगम | --''-- |
| ८. | --''-- श्री.म.सलिम म.हनिफ कुरैशी | --''-- |
| ९. | --''-- श्री.गौतम भागाजी खरात | --''-- |
| १०. | --''-- सौ.रजनी रमेश जोशी | --''-- |
| ११. | --''-- सौ.उषाबाई दिलीप गायकवाड | --''-- |
| १२. | --''-- सौ.विमलाबाई नंदकुमार मुंडलिक | --''-- |
| १३. | --''-- सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे | --''-- |
| १४. | --''-- श्री.गौतम लिंबाजी लांडगे | --''— |
| १५. | --''-- श्री.महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --''-- |
| १६. | --''-- श्री.अभिमन्यु रामभाऊ भालेराव | --''-- |
| १७. | --''-- श्री.नरेंद्र यादवराव पाटील | --''-- |
| १८. | --''-- श्री.काशिनाथ हरिभाऊ कोकाटे | --''-- |
| १९. | --''-- श्री.रविंद्र बाबुराव इंगळे | --''-- |
| २०. | --''-- सौ.पद्मा बाबुराव शिंदे | --''-- |
| २१. | --''-- श्री.सुभाष भिकाजी टाकळकर | --''-- |
| २२. | --''-- श्री.प्रफुल्ल लालचंद मालानी | --''-- |
| २३. | --''-- श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --''-- |
| २४. | --''-- सौ.धनश्री अशोक विसपुते | --''-- |
| २५. | --''-- श्री.फजलउल्लाखाँन अजमद उल्लाखान | --''-- |
| २६. | --''-- श्री.अजीजखाँन गणीखाँ | --''— |
| २७. | --''-- श्रीमती आबेदा बेगम | --''— |
| २८. | --''-- श्री.महंमद मुश्ताक अहेमद | --''-- |
| २९. | --''-- सौ.नुरजहाँ बेगम अ.रहेमान खान | --''-- |
| ३०. | --''-- श्री.वसंत विनायकराव देशमुख | --''-- |
| ३१. | --''-- श्री.हाजी मोहसिन अहेमद हाजी बशिर | --''-- |
| ३२. | --''-- सौ.स.मोहसिना बिहकीस विखारोद्दीन | --''-- |
| ३३. | --''-- श्री.अ.जावेद रज्जाक | --''-- |
| ३४. | --''-- श्रीमती स.जाहेदा बेगम म.जमीर | --''-- |

३५.--''-- श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे --''--
३६.--''-- सौ.यशोदा धनंजय वाडेकर --''--
३७.--''-- श्री.किशोर बाबुलाल तुळशिबागवाले --''--
३८.--''-- श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाळ --''--
३९.--''-- श्री.स.हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन --''--
४०.--''-- श्री.स.म.अ.रऊफ म.अ.माबुद --''--
४१.--''-- श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबउद्दीन --''—
४२.--''-- श्री.प्रदीप शिवनारायण जैस्वाल --''--
४३.--''-- श्री.सय्यद अली मीरा सलामी --''--
४४.--''-- श्री.रमेश दिपचंद लाहोट --''--
४५.--''-- श्री.संजय किसनराव केनेकर --''--
४६.--''-- श्री.फैय्याज अहेमद म.हाजी कुरैशी --''--
४७.--''-- सौ.लता श्रिनिवास दलाल --''--
४८.--''-- सौ.शकुंतला हरिदास घांडे --''--
४९.--''-- श्री.अब्दुल रशिदखान (मामू) --''--
५०.--''-- श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह --''--
५१.--''-- सौ.सविता संजय आव्हाड --''--
५२.--''-- सौ.निर्मला विठ्ठल कांबळे --''--
५३.--''-- श्री.अ.रशिद अ.सत्तार --''--
५४.--''-- श्री.चरवेंद्रासिंह महेंद्रसिंह धिल्लन --''--
५५.--''-- श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन --''--
५६.--''-- श्री.विकास रतनलाल जैन --''--
५७.--''-- श्री.गंगाधर सुखदेव गाडे --''--
५८.--''-- श्री.मनमोहनसिंग करमसिंग ओबेराय --''--
५९.--''-- श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे --''--
६०.--''-- श्री.संजय रामदास जोशी --''--
६१.--''-- श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर --''--
६२.--''-- श्री.राजकुमार उर्फ सांडू बचाटे --''--
६३.--''-- श्री.विठ्ठल किसन जाधव --''—
६४.--''-- सौ.मंदा धनंजय काळुसे --''--
६५.--''-- सौ.सुनंदा उत्तम कोल्हे --''--
६६.--''-- श्री.बन्सी तुळशिराम गांगवे --''--
६७.--''-- श्री.भगवान देविदास घडामोडे --''--
६८.--''-- श्री.अविनाश लक्ष्मण कुमावत --''—
६९.--''-- श्री.कचरु चंद्रभान नवपुते --''—

**संवाद :**

मा.महापौर : आज या ठिकाणी विशेष सर्वसाधारण सभा बोलविण्यात आलेली आहे. यामध्ये विषय क्र.१ पाणीपुरवठा प्रश्नाबाबत चर्चा करण्यात यावी.

श्री. मुजीब आलमशा खान : विषय क्र.१ वरती चर्चा करण्या अगोदर मी ऐनवेळचे दोन विषय मांडत आहे. त्यावर प्रथम चर्चा व्हावी. श्री. जयवंत ओक यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर : स.विरोधी पक्षनेता व स.सभागृहनेता यांनी ऐनवेळचे दोन प्रस्ताव सभागृहासमोर ठेवलेले आहेत. त्यांनी विनंती केली आहे की, ऐनवेळचा प्रस्ताव प्रथम घ्यावा. त्यांचे विनंतीस मान देवून ऐनवेळचे प्रस्ताव घेण्यात येताता.

**विषय क्र. १७८/१ :** सद्यपरीस्थिती व भविष्य काळात पाणीपुरवठा योजनेवर विचार विनीमय करणे.

**ठराव :**

सदरचा विषय पुढील बैठकीत घेण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

# “ऐनवेळचे विषय”

**विषय क्र. १७९/१ :** महानगरपालिकेचे अधिकारी ॲड.एम.वाय.कांबळे डॉ.रझवी महेंद्र खैरनार विजय जावरे डॉ.दिनकर देशपांडे यांनी शिस्तीचे पालन केले नाही तसेच गैरवर्तणुक केली असल्याने सदर घटनेची चौकशी करुन सबंधित अधिकाऱ्यांना निलंबीत करावे.

तसेच प्रशासनाने कायदेशिर कार्यवाही करुन अंमलबजावणी करावी.

**संवाद :**

श्री. मुजीब आलमशा खान : सभागृहाने विनंती केल्या नंतरही अधिकाऱ्यांनी त्याचा मान ठेवला नाही. याशिवाय त्यांनी गेट मिटींग घेवून व वृत्तपत्रातून स.नगरसेवकांबद्दल जे शब्द वापरले त्यामुळे नगरसेवकांना चिंता वाटते. मा.महापौर यांना विनंती आहे की, मी जी नांवे दिलेली आहेत त्या अधिकाऱ्यांना निलंबीत करण्यात यावे.

मा.महापौर : ९ तारखेच्या सर्वसाधारण सभेत जी घटना घडली त्या बाबत विरोधी पक्षनेता यांनी निवेदन केलेले आहे. सभागृह नेत्यांनी त्यास अनुमोदन दिलेले आहे. त्यांचे विनंतीस मान देवून व सभागृहाची भावना लक्षात घेवून मी असे जाहीर करतो की, आज या ठिकाणी डॉ.रझवी, महेन्द्र खैरनार, विजय जावरे, डॉ.देशपांडे, ॲड.कांबळे व इतर यांना शिस्तभंग व गैरवर्तणुक केल्याने हे मा.सभागृह आदेश देत आहे की, प्रशासनाने याची त्वरीत कायदेशिर कार्यवाही करुन व घटनांची सविस्तर चौकशी करून निलंबनाची कार्यवाही करावी. अशी सूचना प्रशासनास देत आहे.

श्री. मुजीब आलमशा खान : आपण केलेल्या निर्णयाबद्दल आपले आभार ह्या ठिकाणी दूसरा ऐनवेळचा प्रस्ताव आहे.

त्यावरही चर्चा करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व मा.महापौर यांनी आदेशित केल्यानुसार महानगरपालिकेचे अधिकारी डॉ.एम.वाय.कांबळे, डॉ.रझवी, महेद्र खैरनार, विजय जावरे, डॉ.दिनकर देशपांडे व इतर यांनी शिस्तीचे पालन केले नाही. तसेच गैरवर्तणूक केली असल्याने सदर घटनेची चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांना निलंबीत करण्याबाबत प्रशासनाने कायदेशिर कार्यवाही करुन अंमलबजावणी करण्याबाबत सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८०/२ :** औरंगाबद महानगरपालिकेच्य खालील विभागात राज्य शासनाच्या वतीने प्रती नियुक्तीवर प्रथम की अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी.

१. आरोग्य विभाग
२. लेखाविभाग
३. जलनिःसारण व पाणीपुरवठा
४. प्रकल्प विकास अधिकारी
५. पशुधन विकास अधिकारी
६. बांधकाम विभाग एस.ई.

सूचक : मुजीब आलमशहा
अनुमोदक : श्री. जयवंत (बंडू) ओक

**संवाद :**

मा.महापौर : या ठिकाणी स.सभागृहनेता बंडू ओक व विरोधी पक्षनेता मुजीब आलमखाह यांना ऐनवेळच्या दूसरा प्रस्ताव दिला आहे. तोही सभागृहापुढे ठेवला आहे. मला असे वाटते सर्व स.सभासदांची यांस मंजूरी असेल मा.सभागृहाचा मान ठेवून मी हा प्रस्ताव मंजूर करत आहे. वरील प्रमाणे दोन ठराव या ठिकाणी मंजूर करण्यात आलेले आहेत. पाणीपुरवठा विषयावर आपणांस चर्चा करावयाची आहे. याबाबत स.सभासदांनी आपले निवेदन करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या खालील विभागात राज्य शासनाच्या वतीने प्रतिनियुक्तीवर प्रथम वर्ग अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

१. आरोग्य विभाग
२. लेखाविभाग
३. जलनिःसारण व पाणीपुरवठा
४. प्रकल्प विकास अधिकारी
५. पशुधन विकास अधिकारी
६. बांधकाम विभाग एस.ई.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : पाणीपुरवठा संदर्भाने स्वतंत्र बैठक बोलविण्यात यावी.

मा.महापौर : मागणी मान्य करण्यात येते व सदरील इतिवृत्त याच सभेत कायम करण्यात येते.

दुपारी ४.०० वाजता राष्ट्रगीतानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | मा.महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ३१.१२.९६ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

मंगळवार दिनांक३१.१२.९६ रोजी दुपारी ३.०० वाजता मा.महापौर श्री.गजानन बारवाल ह्यांचे अध्यक्षतेखाली कै.केशव सिताराम ठाकरे सभागृहात औरंगाबाद महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

सभेची सुरुवात ''वंदे मातरम'' या गीताने करण्यात आली.

| | |
|---|---|
| १. स.स. श्री.विजयकुमार मेहेर | स.सभासद |
| २. --''-- श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर | --''-- |
| ३. --''-- श्री.जयवंत केशवराव ओक | --''-- |
| ४. --''-- श्री.मुजीब आलमशाह मीर आलमशाह | --''-- |
| ५. --''-- सौ.रुखमनबाई खंडेराव लोंखडे | --''-- |
| ६. --''-- श्री.प्रभाकर सिताराम विधाते | --''-- |
| ७. --''-- सौ.साजेदा बेगम | --''-- |
| ८. --''-- श्री.म.सलिम म.हनिफ कुरैशी | --''-- |
| ९. --''-- श्री.गौतम भागाजी खरात | --''-- |
| १०.--''-- सौ.रजनी रमेश जोशी | --''-- |
| ११.--''-- सौ.उषाबाई दिलीप गायकवाड | --''-- |
| १२.--''-- सौ.विमलाबाई नंदकुमार मुंडलिक | --''-- |
| १३.--''-- सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे | --''-- |
| १४.--''-- श्री.गौतम लिंबाजी लांडगे | --''-- |
| १५.--''-- श्री.महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --''-- |
| १६.--''-- श्री.अभिमन्यु रामभाऊ भालेराव | --''-- |
| १७.--''-- श्री.नरेंद्र यादवराव पाटील | --''-- |
| १८.--''-- श्री.काशिनाथ हरिभाऊ कोकाटे | --''-- |
| १९.--''-- श्री.सुदाम रामदास सोनवणे | --''-- |
| २०.--''-- श्री.रविंद्र बाबुराव इंगळे | --''-- |
| २१.--''-- सौ.पद्मा बाबुराव शिंदे | --''-- |
| २२.--''-- श्री.सुभाष भिकाजी टाकळकर | --''-- |
| २३.--''-- श्री.प्रफुल्ल लालचंद मालानी | --''-- |
| २४.--''-- श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --''-- |
| २५.--''-- सौ.धनश्री अशोक विसपुते | --''-- |
| २६.--''-- श्री.फजलउल्लाखाँन अजमद उल्लाखान | --''-- |
| २७.--''-- श्री.अजीजखाँन गणीखाँ | --''-- |
| २८.--''-- श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | --''-- |
| २९.--''-- श्री.महंमद मुश्ताक अहेमद | --''-- |
| ३०.--''-- सौ.नुरजहाँ बेगम अ.रहेमान खान | --''-- |

| | | |
|---|---|---|
| ३१.--''-- | श्री.वसंत विनायकराव देशमुख | --''-- |
| ३२.--''-- | श्री.हाजी मोहसिन अहेमद हाजी बशिर | --''-- |
| ३३.--''-- | सौ.स.मोहसिना बिहकीस विखारोद्दीन | --''-- |
| ३४.--''-- | श्री.अ.जावेद रज्जाक | --''-- |
| ३५.--''-- | श्रीमती स.जाहेदा बेगम म.जमीर | --''-- |
| ३६.--''-- | श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे | --''-- |
| ३७.--''-- | सौ.यशोदा धनंजय वाडेकर | --''-- |
| ३८.--''-- | श्री.किशोर बाबुलाल तुळशिबागवाले | --''-- |
| ३९.--''-- | श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाळ | --''-- |
| ४०.--''-- | श्री.स.हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन | --''-- |
| ४१.--''-- | श्री.स.म.अ.रऊफ म.अ.माबुद | --''-- |
| ४२.--''-- | श्री.धिरज शांतीलाल खखोरडीया | --''-- |
| ४३.--''-- | श्री.सय्यद अली मीरा सलामी | --''-- |
| ४४.--''-- | श्री.रमेश दिपचंद लाहोट | --''-- |
| ४५.--''-- | श्री.संजय किसनराव केनेकर | --''-- |
| ४६.--''-- | श्री.फैय्याज अहेमद म.हाजी कुरैशी | --''-- |
| ४७.--''-- | सौ.मुक्ताबाई सुदाम वाघमारे | --''-- |
| ४८.--''-- | सौ.लता श्रिनिवास दलाल | --''-- |
| ४९.--''-- | सौ.अल्का रमेश पाटील | --''-- |
| ५०.--''-- | श्री.अब्दुल रशिदखान (मामू) | --''-- |
| ५१.--''-- | श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह | --''-- |
| ५२.--''-- | कु.माया लिंबाजी लाडवाणी | --''-- |
| ५३.--''-- | सौ.सविता संजय आव्हाड | --''-- |
| ५४.--''-- | सौ.निर्मला विठ्ठल कांबळे | --''-- |
| ५५.--''-- | श्री.अ.रशिद अ.सत्तार | --''-- |
| ५६.--''-- | श्री.चरवेंद्रासिंह महेंद्रसिंह धिल्लन | --''-- |
| ५७.--''-- | श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन | --''-- |
| ५८.--''-- | श्री.विकास रतनलाल जैन | --''-- |
| ५९.--''-- | श्री.गंगाधर सुखदेव गाडे | --''-- |
| ६०.--''-- | श्री.मनमोहनसिंग करमसिंग ओबेराय | --''-- |
| ६१.--''-- | श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे | --''-- |
| ६२.--''-- | श्री.संजय रामदास जोशी | --''-- |
| ६३.--''-- | श्री.अविनाश लक्ष्मण कुमावत | --''-- |
| ६४.--''-- | सौ.ज्योत्स्ना दौलतराव हिवराळे | --''-- |
| ६५.--''-- | श्री.राजकुमार उर्फ सांडू बचाटे | --''-- |
| ६६.--''-- | सौ.राधाबाई तळेकर | --''-- |
| ६७.--''-- | श्री.नरसिंग मुरलीधर ढगे | --''-- |
| ६८.--''-- | सौ.सुनंदा उत्तम कोल्हे | --''-- |
| ६९.--''-- | सौ.मंदा धनंजय काळुसे | --''-- |
| ७०.--''-- | श्री.बन्सी तुळशिराम गांगवे | --''-- |
| ७१.--''-- | श्री.भागवान देविदास घडामोडे | --''-- |

७२.--''-- श्री.कचरु चंद्रभान नवपुते --''—

७३.--''-- श्री.अविनाश लक्ष्मण कुमावत --''--

**विषय क्र. १८१/१ :** सद्यःपरिस्थितीत व भविष्य काळात पाणी पुरवठा योजनेवर विचार विनिमय करणे.

**संवाद :**

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : आज बोलावण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत पाणी पुरवठ्याच्या प्रश्नावर चर्चा होणार असली तरी पाणपुरवठा प्रश्नाची विनापरवाना नळ कनेक्शन, कमी दाबाने होणारा पाणी पुरवठा स्लम भागातील पाणी पुरवठा लाईनपैकी कोणत्या विषयावर चर्चा करण्यात येणार आहे. याचा स्पष्ट बोध विषय पत्रिकेवरील प्रस्तावात होत नाही. ह्या शिवाय विशेष महत्त्वाची बाब म्हणजे सध्या हिवाळ्याचे दिवस असताना पाणी पुरवठा प्रश्नावर ही ठेवली याचा अर्थ ही सभा आयोजित करण्यात काही तरी राजकारण आहे. असे दिसते.

मा.महापौर : शहराच्या पाणी पुरवठा एक महिन्याच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात गॅप आला आहे. याची माहिती जलगृह अभियंता यांनी दिली त्या अनुषंगाने पाणी पुरवठ्यात येणाऱ्या गॅप बाबत महापौर निवास येथे परिसर अभियांत्रिकी विभाग आणि महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांचे कडील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत चर्चा करतात शहरास पाणीपुरवठा होणाऱ्या जायकवाडी जलाशयाच्या पाईप लाईनवरील ढोरकीन येथील बुस्ट बंद असल्याचे माहिती मिळाली. चर्चेअंती बंद असलेले मिटर, सुरू करण्यास मंजूरी दिली आहे. त्यामुळे शहरा जास्त प्रमाणात पाणीपुरवठा केला जावू शकतो. बुस्टर व नक्षत्रवाडी ढोरकीन येथील पंप सुरु झाल्याने शहराच्यापाणी पुरवठ्याचा फरक पडला आहे. भविष्यात पाण्यापट्ट्याचा प्रश्न भिषण बनेल असे गृहीत धरुन आजची मिटींग बोलावण्यात आली आहे.

गारखेडा येथील हनुमाननगर गजानन नगर पुंडलिकनगर अशा अनधिकृत वसाहत मनपातर्फे टँकरद्वारे पाणीपुरवठा होत आहे. टँकरद्वारे पाणीपुरवठ्यात मनपाला आर्थिक झळ सोसावी लागत आहे. याचा विचार करुन प्रयोतत्वार या भागात पाणीपुरवठा लाईन टाकण्याचा प्रस्ताव सभागृहाने मंजूर केला आहे. या ठरावानुसार सदर भागातून आतापर्यंत फक्त तीन लाख रुपये वसुल झाले. या सर्व बाबी विचारात घेण आवश्यक आहे.

डॉ.भागवत कराड, श्री. गिरजाराम हाळनोर : मागील विशेष सर्वसाधारण सभेत पाणी प्रश्नावर विशेष सभा आयोजित करण्यात यावी अशी चर्चा झाली आहे. या चर्चेप्रमाणे आजची विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. यात पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर चर्चा करण्यात येईल. विद्युत विभागाच्या कामकाजा बाबतही अशा प्रकारची विशेष सभा या पूर्वी झालेली आहे. स.सभासद ज्येष्ठ सभासद आहे, तसेच मा.महापौर पदावरही राहिलेले आहेत. शहरात पाणीपुरवठ्याचा प्रश्न कसा आहे याची त्यांना पूर्ण माहिती

आहे. पाणी पुरवठा प्रश्नावर विशेष सभेचे आयोजन केल्याबाबत मा.महापौर यांचे अभिनंदन करण्यात येते.

मा.महापौर : पाणी पुरवठ्याच्या प्रश्नवर आवश्यक ती माहिती तयार झाली आहे. कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा व जलनिःसारण हे त्याबाबतची माहिती सभागृहाला देतील. कृपया एक एक सभासदांनी सभागृहात बोलावे. आजची विशेष सभा ही कायदेशिर सभा आहे.

श्री. जावेद रज्जाक, श्री. हमीदउद्दीन ताबा, सौ. नुरजहाँ बेगम : पाणीपुरवठा प्रश्नासंबंधीत आयोजीत करण्यात आलेली ही आजची विशेष सर्वसाधारण ही कायदेशिर रित्या योग्य आहे की, बेकायदेशिर याचा खुलासा करण्यात यावा.

मा.महापौर : सन्माननीय सभासदांनी एकाच वेळी न बोलता एक एक सभासदांनी आपले विचार मांडावेत प्रथम स.सभासद श्री. नरेंद्र पाटील हे बोलतील आजची विशेष सर्वसाधारण सभाही कायदेशिर आहे. पाणी पुरवठ्यासारख्या गंभीर विषयावर चर्चा असताना सभासदांनी अशा प्रकारे गोंधळ घालणे योग्य नाही. या विषयाचे गांभीर्य स.सभासदांनी कृपया समजून घ्यावेत.आजही शहराचे बऱ्याच वॉर्डात पाणी पुरवठ्याचा अनेक समस्या आहेत. त्यादृष्टीने आजची बैठक बोलविण्यात आली आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : पाण्यासारख्या गंभीर विषयावर चर्चा होत असताना विरोधी पक्षाच्या सभासदांनी अशाप्रकारे गोंधळ घालणे ही बाब गंभीर आहे.

श्री. अब्दुल रशिद मामू : पाणीपुरवठा प्रश्नाबाबत आयोजित करण्यात आलेली आजची सभा कायदेशिर आहे किंवा बेकायदेशिर आहे याचा खुलासा करण्यात यावा. कोणत्याही तातडीच्या प्रश्नावर चर्चा करावयाची असेल तर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमान्वये स्थायी समितीच्या चार सदस्यांनी तशा आशयाची मागणी करावी लागते. तेव्हा या नियमाप्रमाणे आजची सभा घेण्याबाबत मा.स्थायी समितीच्या सभासदांनी मा.महापौर यांचेकडे मागणी केली आहे काय?

मा.महापौर : शहराचा पाणीपुरवठा प्रश्न हा महत्त्वाचा समजून विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. आयोजित करण्यात आलेली सभा ही नियमाप्रमाणे बोलावण्यात आली आहे. त्याबाबत रितसर नोटीसही सभासदांनी पाठविण्यात आली आहे. स्थायी समितीच्या चार सभासदांनी मागणी पत्रही दिले आहे.

श्री. मुजीब आलमशा खान : पाणीप्रश्नाबाबत आयोजित करण्यात आलेली आजची विशेष सर्वसाधारणसभा कायद्याचा कोणत्या नियमाप्रमाणे घेण्यात आली आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

श्री. संजय जोशी : पाणीपुरवठ्या सारख्या ज्वलंत प्रश्नावर सभागृहात चर्चा होत असतांना विरोधी पक्षांच्या सभासदांनी असा पवित्रा घेणे योग्य वाटप नाहीृ सभागृहात एक सभासद बोलत असताना दुसऱ्या सभासदांनी मध्ये बोलू नये.

मा.महापौर : शहराच्या काही वॉर्डात पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. परिसर अभियांत्रिकी विभाग आणि महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांची एक संयुक्त बैठक महापौर निवास येथे आयोजित करण्यात आली होती. त्याबाबतची सविस्तर माहिती मी सभागृहास देवू शकतो. पाणी पुरवठ्यासारख्या गंभीर विषयावर चर्चा चालू असताना सभासदांना अशाप्रकारे गोंधळ घालणे योग्य नाही. याची दखल घ्यावी. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४२ च्या प्रकरण २ च्या

१/३ व ६ नुसार आजची विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. अशा प्रश्नावर विशेष सर्वसाधारण सभा घेण्याचा अधिकार आहे. स.सभासदांनी पाणी प्रश्नावर चर्चा करावी. आजची सभा ही कायदेशिर आहे. सभागृहात कार्यालयीन पत्र कोणी फाडले याचा खुलासा व्हावा. सर्वसभासदांनी जागेवर बसून द्यावे.

श्री. अब्दुल रशिद खान (मामू) : आजच्या मिटींगचा ठराव चुकीचा आहे.

श्री. प्रफुल्ल मालानी : महापालिकेचे पत्र फाडणे हा सभागृहाचा अपमान आहे.

मा.महापौर : सन्माननीय सभासदांना विनंती करण्यात येते की, सभागृहात असा गोंधळ घालणे योग्य नाही. स.सभासद श्री.म.अ.रऊफ यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सभागृहाबाहेर जावे. स.सभासद श्री. म.अ.रऊफ यांचे सभासदत्व एक दिवसासाठी रद्द करण्यात येते. सर्व सभासदांना जागेवर बसण्याची विनंती करण्यात येते. सभासदांनी सभागृहात एक जबाबदार असे पत्र फाडले आहे. म्हणून त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सभागृहाबाहेर जावे. त्यांचे एक दिवसाचे सभासदत्व रद्द करण्यात आले आहे. मा.सभागृहनेता आणि मा.विरोधीपक्षनेता यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपआपल्या सभासदांना जागेवर बसण्याची विनंती करावी.

श्री. गिरजाराम हाळनोर, जयवंत ओक : पाणीपुरवठ्यासारख्या गंभीर विषयावर चर्चा करण्यात येत आहे. ज्या सभासदांना ह्या चर्चेत भाग घ्यावयाचा नसेल ते सभासद सभागृहाबाहेर जाऊ शकतात. कृपया या प्रश्नावर वॉर्ड वाइज चर्चा करण्यात यावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय, रशिदखान (मामू) : शहराच्या पाणीपुरवठ्या बाबत स्थायी समितीच्या चार सभासदांनी विशेष सभा आयोजित करण्याबाबत मागणी केली होती. तर त्या बाबीचा उल्लेख विषयपत्रिकेवर का घेण्यात आला नाही याचा खुलासा व्हावा.

श्री. हमीदउद्दीन ताबा : वॉर्डनिहाय प्रश्नावर चर्चा करण्याची पध्दत चुकीची आहे.

मा.महापौर : स.सभासदांनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तरे देण्यात आली आहे. तेव्हा पुन्हा उत्तरे देण्याची गरज नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : पाणी पुरवठ्याचा प्रश्न हा जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. त्यावर चर्चा होणे जरुरीचे आहे.

मा.महापौर : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे वॉर्ड निहाय पाणी प्रश्नाबाबत चर्चा करुन प्रत्येक स.सभासदांना संधी देण्यात येईल. स.सभासदानी गोंधळ करु नये खाली बसावे. स.सभासदांनी गोंधळ केल्यास त्याचे सभासदत्व रद्द केले जाईल.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : आजच्या सभेचा उद्देश हा पाणीप्रश्नावर चर्चा नसून दूसराच उद्देश आहे. असे दिसते.

श्री. स.अली मिरा सलामी : आजची विशेषसभा कायदेशीर आहे का?

मा.महापौर : पाणी प्रश्नाबाबत स.सभासदांनी त्यांचे प्रभागातील अडचणी लेखी सुचना दाखल कराव्यात त्यबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात येतात. स.सभासदांच्या पाणी प्रश्नांच्या अडचणी निश्चितपणे सोडविण्यात येतील.

**ठराव :**

शहरातील पाणी प्रश्नाबाबत स.सभासदांना त्यांच्या प्रभागातील अडचणीबाबत लेखी सूचना करव्यात असे रुलींग मा.महापौर यांनी दिले.

## "ऐनवेळचे विषय"

**विषय क्र. १८२/१ :** दिनांक २३ डिसें.१९९६ रोजी विष क्र.१७९/१ नुसार महानगरपालिकेने अधिकारी श्री.एम.वाय.कांबळे, डॉ.रझवी, महेंद्र खैरनार, विजय जावरे, डॉ.दिनकर देशपांडे इतर अधिकारी यांनी शिस्तीचे पालन केले नाही. तसेच गैर वर्तणुक के ली असल्याने सदर घटनेची चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांना निलंबीत करावे म्हणून ठराव पारित केलेला आहे. प्रकरणात दि.१९ डिसें.१९९६ रोजीच्या घटनेबाबत अधिकारी संघटनेमार्फत सभागृहाची दिलगिरी व्यक्त करण्यात आलेली आहे. शहराच्या विकासाचा गाडा व्यवस्थित चालावा व नगरसेवक/अधिकारी यांचेत सामंजस्य व सलोखा असावा. असा उदात्त हेतू ठेवून दि.२३.१२.९६ रोजी विषय क्र.१७९/१ नुसार पारीत केलेला ठराव रद्द करण्यात यावा.

सूचक : १. श्री. जयवंत (बंडू) ओक, २. श्री. राजकुमार बचाटे ३. श्री. विजयकुमार मेहेर

अनुमोदक : १. श्री. संजय जोशी, २.श्री.संजय जोशी, ३.श्री.महादेव सुर्यवंशी ४. श्री.सुभाष टाकळकर, ५. श्री.गिरजाराम हाळनोर (सभापती,स्थायी समिती) ६. श्री.त्र्यंबक तुपे, ७. श्री.भगवान घडामोडे ८. श्री.अविनाश कुमावत, ९. श्री.डॉ.भागवत कराड, १०. श्री.प्रफुल्ल पटेल, ११. श्री.संजय केनेकर, १२. सौ.लता दलाल, १३. श्रीमती चंपाबाई पांचाळ, १४. सौ.मंदा काळुसे, १५ सौ.यशोदा धनंजय, १६. सौ.राधाबाई तळेकर, १७.सौ.रजनी जोशी, १८. श्रीमती रुखमनबाई लोखंडे, १९. श्रीमती पुष्पाताई गंगवाळ, २०. श्री.बन्सीलाल गांगवे, २१. सौ.सविता आव्हाड, २२. सौ.मुक्ताबाई वाघमारे, २३. श्रीमती शिलाबाई गुंजाळे, २४. श्रीमती विमलबाई मुंडलिक, २५. श्री.नरसिंग ढगे, २६.सौ.पद्मा शिंदे, २७. श्री.तरविंदर धिल्लन, २८.सौ.धनश्री विसपुते, २९. सौ.ज्योत्स्ना हिवराळे, ३०.कु.माया लाडवाणी, ३१. सौ.सुनंदा कोल्हे, ३२. श्री.रमेश लाहोट, ३३. श्री.सुदाम सोनवणे, ३४. श्री.कचरु नवपुते, ३५. श्री.धिरज खखोरडीया, ३६. श्री.विकास जैन, ३७. श्री.प्रभाकर विधाते, ३८.सौ.निर्मला कांबळे, ३९. श्री.सुभाष कच्छवाह.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेचे अधिकारी श्री. एम.वाय.कांबळे, श्री.विजय जावरे, श्री. महेंद्र खैरनार, डॉ.दिनकर देशपांडे, डॉ.रझवी व इतर यांच्य विरुध्द ठराव क्र.१७९/१ नुसार प्रस्तावित केलेली कार्यवाही त्या शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून अधिकारी, नगरसेवक यांचेत समन्वय व सलोखा ठेवण्याचा उदात्त हेतू ठेवून रद्द करण्यास बहुमताने मंजूरी देण्यात येते

वैधानिक कार्यवाही व्हावी.

अधिकाऱ्यांना ताकीद देण्यात येते की, यानंतर गैरवर्तन व शिस्तभंग करु नये त्यांनी नगरसेवकांचा मान ठेवावा अशी समज देण्यात येते.

"जन गण मन" या राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केला.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | मा.महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |